# मराठी वाङ्मयातील व्यक्तिचित्रे :
# एक दृष्टिक्षेप

प्रा. डॉ. संजय कल्याणराव कुलकर्णी

# मराठीतील वाङ्मयातील व्यक्तिचित्रे : एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. संजय कल्याणराव कुलकर्णी**

**© सौ. अनघा संजय कुलकर्णी**
सर्व हक्क सुरक्षित
प्रथमावृत्ती : **२०१३**

**प्रकाशक**
**अक्षरलेणं प्रकाशन,**
पुरुषोत्तम कुलकर्णी
६, तारका, ऊर्जा नगर, जुनी मिल कंपौंड,
सोलापूर - ४१३ ००१.
मोबाईल - ९५९५२७३५९५
Email - pk.akshar@gmail.com

**मुद्रक**
विनंद ऑफसेट,
टिळक चौक, सोलापूर.

**ISBN : 978-93-81528-18-1.**

**किंमत : रु. २५०/-**

# अर्पण...

लहान मोठ्यांपासून गोरगरीबांविषयीची
जाणिव व तळमळअसणारी  माझी आई
कै. शांताबाई कल्याणराव कुलकर्णी
हिच्या स्मृतीस ही शब्दफुले अर्पण!'

**प्रा.डॉ.संजय कुलकर्णी**

# मनोगत

मराठीमध्ये व्यक्तीचित्रे विपुल प्रमाणात लिहिलेली आहेत. पण त्यावर फारसे लेखन झालेले दिसत नाही. ही उणीव लक्षात घेऊन सदर प्रबंध पुस्तकरूपाने प्रकाशित व्हावा अशी इच्छा अनेक सूज्ञ अभ्यासकांनी व तसेच माझे मार्गदर्शक प्रा.डॉ.कृष्णा इंगोले यांनी व्यक्त केली. त्यातूनच हा माझा ग्रंथ प्रकाशित झाला. माझे मार्गदर्शक प्रा.डॉ.कृष्णा इंगोले हेच या प्रबंधाचे योग्य मूल्यमापन करतील असे वाटल्यामुळेच मी इंगोले सरांना प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली. सरांनी तत्काळ विनंती स्वीकारून मला एक प्रकारे आशीर्वादच दिला आहे.

हा ग्रंथ लिहिताना मला डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ.रविंद्र ठाकूर, डॉ.रणधीर शिंदे, डॉ.हिमांशू स्मार्त, डॉ.राजशेखर शिंदे आणि शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरचे अध्यक्ष मा.श्री. मधुकरराव चव्हाण, सचिव, मार्गदर्शक व प्रेरणास्थान मा.श्री. सि.ना.आलुरे (गुरूजी) यांचे प्रेमळ सहाय्य व मार्गदर्शन लाभले. तसेच जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व स्टाफ यांचे सहकार्य मिळाले.

हे सर्व काम करताना माझी पत्नी सौ.अनघा हिच्या सहकार्यामुळेच मी काम करू शकलो. चि.आदित्य व चि.स्वास्तिक यांचा खोडकरपणाही काम करताना आनंददायी वाटला. या सर्वामागे माझी आई कै.शांताबाई कल्याणराव कुलकर्णी, वडील कै.कल्याणराव व्यंकटेशराव कुलकर्णी (नंदगावकर) यांचे आशीर्वाद आहेत. श्री दीपक, संतोष,अविनाश, उदय कल्याणराव कुलकर्णी ही माझी चार भावंडे, श्री के.टी.राजुरीकर, अरुणमामा यांचे प्रेमळ सहाय्य आहे.

'अक्षरलेणं प्रकाशनाचे' श्री.पुरुषोत्तम कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांनी सुंदर व सुबक ग्रंथनिर्मिती केली. त्याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

**प्रा.डॉ.संजय कल्याणराव कुलकर्णी**

**९८९०५२४४९४**

***

# प्रस्तावना

प्रा.डॉ.संजय कल्याणराव कुलकर्णी हे अणदूर येथील जवाहर महाविद्यालयात मराठीचे विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या डॉ. कुलकर्णी यांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपले शिक्षण पूर्ण केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फील. व पीएच.डी. या पदव्या त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली अतिशय जिद्दीने, चिकाटीने आणि परिश्रमाने प्राप्त केल्या. या निमित्ताने त्यांनी केलेले संशोधन हे वाचकांच्या समोर येत आहे ही समाधानाची बाब आहे. अनेकदा पदवीसाठी केलेले संशोधन ग्रंथालयांच्या कपाटात पडून राहते. फारच मर्यादित अभ्यासक त्याचा वापर करतात. पण हे संशोधन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होत आहे याचा मला मार्गदर्शक म्हणून मनापासून आनंद होत आहे. त्यासाठी पाठराखण म्हणून आशीर्वादपर चार शब्द लिहीत आहे.

इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणातून एकोणिसाव्या शतकात मराठीत आधुनिक वाङ्मयनिर्मितीस प्रारंभ झाला. ज्ञानप्रसार आणि प्रबोधनाच्या प्रेरणेतून निबंध लिहिले जाऊ लागले. नियतकालिकांतून ते प्रसिद्धही होऊ लागले. पुढे कथा, कादंबरी, आधुनिक कविता, नाटक हे महत्वाचे वाङ्मयप्रकार विकसित होत गेले. प्रारंभीच्या निबंधाचे लघुनिबंध-ललित निबंध-ललितगद्य असे परिवर्तन होत गेले. ललितगद्य लेखनात निसर्गचित्रण, आठवणी, अनुभवकथन, पत्रे या सर्वांचा समावेश केला जातो. ललितगद्य लेखन हा लवचिक वाङ्मयप्रकार आहे. अनुभवाच्या मर्यादित अवकाशामुळे या लेखनप्रकाराकडे मराठी अभ्यासकांचे दुर्लक्ष झाले असावे, पण लेखन तर मोठ्या प्रमाणात होत होते. कोणत्याही साहित्यात अगोदर  लेखन होत असते व नंतर त्याचे वर्गीकरण, समीक्षा केली जाते. वाङ्मयप्रकार हा साहित्याचा एक विशेष मानला जातो. हे वाङ्मयप्रकार का निर्माण होतात याची चर्चा झाली आहे. लेखक आपला जीवनानुभव-आशय वाङ्मयकृतीतून कलात्मकपणे मांडत असतो. प्रत्येक अनुभवाचे स्वरूप वेगवेगळे असते. कथनात्मक स्वरूपाचा अनुभव असेल तर तो कथा, कादंबरी, आख्यानकाव्य, महाकाव्यातून व्यक्त होतो. नाट्यात्मक अनुभव असेल तर तो नाटक, एकांकिका यांतून आविष्कृत होतो आणि काव्यात्म अनुभव असेल तर तो काव्याच्या वेगवेगळ्या प्रकारांतून व्यक्त होतो. प्रत्येक अनुभवाच्या स्वभावधर्मानुसार तो आपला आकृतीबंध धारण करतो. त्यातल्या घटकांची एकजीव

कलात्मक मांडणी होत असते. सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन परिस्थितीनुसार वाङ्मयप्रकाराच्या स्वरूपात थोडाफार बदल होत जातो. साचेबंदपणा आला तर एखादा प्रतिभावंत आपल्या वेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभवाच्या कलात्मक आविष्कारासाठी वाङ्मयीन रूपबंधाची मोडतोड करून नवीन वाङ्मयीन रूपबंध तयार करू शकतो.

या सगळ्या वाङ्मयप्रकारात माणूस मानवी जीवन, संस्कृती आणि निसर्ग हाच अनुभवाशयाचा प्रमुख भाग असतो. मानवी जीवनात मोठ्या अनुभवाला जसे स्थान असते तसे लहानसहान अनुभवांना त्याचे म्हणून वैशिष्ट्यपूर्ण स्थान असते. अनेकदा सामान्य माणसांचे जीवन हे अशा लहान लहान अनुभवांची साखळी असते. त्यात सुटेपणा आणि स्फुटता असली तरी त्यालाच आपण जीवन म्हणतो. त्यामुळे अशा अनुभवांना साकार करणाऱ्या वाङ्मयप्रकाराला साहित्यात स्थान असले पाहिजे. मागे उल्लेखिल्याप्रमाणे ललितगद्यात वेगवेगळ्या प्रकारांचा समावेश केला जातो. प्रारंभी प्रादेशिक आणि ग्रामीण साहित्यात पार्श्वभूमीसाठी निसर्गाचे चित्रण केले जात असे, पण पुढे व्यंकटेश माडगूळकर, दुर्गा भागवत, श्रीनिवास कुलकर्णी, मारूती चितमपल्ली यांच्या निसर्गपर गद्य लेखनातून निसर्ग साहित्याचा एक प्रवाह विकसित झाला आहे. प्रवासवर्णनपर साहित्याची परंपरा गोडसे भटजींपासून ते अनंत काणेकर, पु.ल.देशपांडे, मीना प्रभु, फ्रान्सिस दिब्रिटो यांच्यापर्यंत विकसित झाली आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या काळात जग जवळ येत चालले असताना प्रवासवर्णनपर साहित्य मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. या वाङ्मयप्रकाराच्या विकासाला आज मोठा वाव आहे. 'प्रवासवर्णन : एक अभ्यास' असा वसंत सावंत यांचा प्रबंध प्रसिद्ध झाला आहे.

व्यक्तिचित्रे हा लेखनप्रकार थोडा उशिरा सुरू झाला असला तरी मराठीत विपुल प्रमाणात व्यक्तिचित्रे लिहिली गेली आहेत. बहुतेक सगळ्या महत्त्वाच्या लेखकांनी या प्रकारचे लेखन केले आहे. तेव्हा विपुल लेखन झालेल्या या प्रकाराचे संशोधन करून त्याचा स्वतंत्रपणे अभ्यास व्हावा म्हणून मीच डॉ. कुलकर्णी यांना त्यांच्या संशोधनासाठी 'मराठीतील व्यक्तिचित्रे-एक अभ्यास' (१९४० ते १९९०) असा विषय सुचविला होता. व्यक्तिचित्रे या वाङ्मयप्रकाराच्या प्रेरणा, स्वरूप, विशेष आणि इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळेपण मांडून हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून सिद्ध करणे आणि मराठीत लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचा इतिहास मांडणे हा त्या पाठीमागील प्रमुख उद्देश होता. डॉ. कुलकर्णी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने हे संशोधन पूर्ण केले आहे याचे समाधान वाटते. त्यांचा अभ्यास मौलिक स्वरूपाचा आहे.

या संशोधनपर ग्रंथाचे फक्त काही विशेष मी नोंदविणार आहे. डॉ.कुलकर्णी यांनी आपल्या संशोधनासाठी एक निश्चित अभ्यासपद्धती स्वीकारली आहे. व्यक्तिचित्रे या वाङ्मयप्रकाराची सैद्धांतिक मांडणी करून १९४० जे १९९० या कालखंडातील मराठीतील व्यक्तिचित्रात्मक लेखनाचा इतिहास मांडला आहे. ही पद्धत अंशतः सैद्धांतिक वा तात्त्विक

स्वरूपाची व अंशतः वाङ्मयेतिहास लेखनाची आहे. त्यामुळे ग्रंथाच्या पूर्वार्धात वाङ्मयप्रकाराचे अनुषंगाने तर उत्तरार्धात वाङ्मयीन इतिहासाच्या आढाव्याच्या स्वरूपाचे लेखन केले आहे.

दुसरे असे की व्यक्तिचित्रपर लेखनाला लेखक आणि समीक्षक यांनी अनेक शब्द वापरले आहेत. इंग्रजी शब्दकोषात चार्लस् डिकन्स यांनी 'स्केचेस' असा शब्द वापरून त्यात स्थळचित्रे, प्रसंगचित्रे, व्यक्तिचित्रे यांचा समावेश करतो. मराठी व्यक्तिचित्र लेखकांना प्रेरणादायी ठरलेल्या गार्डीनर यांनाही 'िझशींलह' असेच संबोधले आहे. हिंदीत शामसुंदरदास हे व्यक्तिचित्राला रेखाचित्र म्हणतात. मराठीतील काही लेखक 'व्यक्तिचित्रे', काही लेखक 'शब्दचित्रे' तर काही थोडे लेखक स्वभावचित्रे असा शब्द वापरतात. त्यात व्यक्तिचित्रपर लेखन कधी कथासंग्रहात, कधी व्यक्तिचरित्रपर लेखनात, कधी निबंधसंग्रहातून प्रसिद्ध झाल्यामुळे गोंधळात आणखीनच भर पडली आहे. व्यक्तिचित्र हा मूळ चित्रकलेतील शब्द आहे. रेखाचित्रातून जसे काही मोजक्याच पण उठावदार रेषांमधून व्यक्तीचे चित्र सहजतेने प्रभावीपणे पण तितकेच कलात्मकतेने साकार केले जाते. त्यामुळे मोजक्याच शब्दांच्या माध्यमातून काढलेले ते व्यक्तीचे शब्दचित्र असते. शब्दचित्र हा शब्द थोडा व्यापक आहे. त्यात निसर्गचित्रण, प्रसंगचित्रणाचाही समावेश होऊ शकतो. 'स्वभावचित्र' यात व्यक्तीच्या फक्त स्वभावचित्रणावर भर असू शकतो. त्यात बाह्यवर्णन, लकबी, गुणदोष यांचा समावेष होऊ शकत नाही. म्हणून व्यक्तिचित्र हा शब्द सर्वाधिक योग्य आहे असे लेखकाचे मत आहे. हा भाग मुळातून वाचला पाहिजे. वाङ्मयप्रकारासाठी योग्य शब्दांची निवड करताना त्या वाङ्मयप्रकाराच्या जास्तीत जास्त छटा ज्या शब्दात येतात तोच शब्द स्वीकारणे योग्य ठरते. नंतर त्या शब्दाचा अर्थविस्तारही होऊ शकतो.

व्यक्तिचित्र हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे हे सिद्ध करताना डॉ.कुलकर्णी यांनी या वाङ्मयप्रकाराच्या प्रेरणा, स्वरूप, विशेष हे इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळे आहेत हे दाखवून दिले आहे आणि व्यक्तिचित्र लेखनाचे प्रकार मांडले आहेत. नव्या मूल्यव्यवस्थेत व्यक्तिस्वातंत्र्य हे एक प्रभावी मूल्य आहे. माणूस म्हणून प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व व जगण्याचा हक्क आहे. व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य केंद्रस्थानी ठेऊन जीवनाच्या वेगवेगळ्या व्यवस्थेची पुनर्मांडणी करावी लागत नाही. व्यक्तीला केंद्रबिंदू मानून साहित्याची निर्मिती होऊ लागली. लेखकाच्या सानिध्यात आलेल्या वा त्यास भावलेल्या व्यक्तींचा प्रभाव, त्याच्याविषयी सांगण्याची ऊर्मी, परस्परसंबंध, प्रादेशिक स्वरूपाच्या प्रातिनिधिक व्यक्ती साकार करण्यासाठी महान व्यक्तींचे मर्यादित दर्शन, सामान्य माणसांतील असामान्यत्व या महत्वाच्या प्रसंगांसाठी कार्याची नोंद करणे या प्रेरणेतून व्यक्तिचित्रांचे लेखन केले जाते.

'व्यक्तिचित्र' लेखनाचे स्वरूप आणि विशेष डॉ.कुलकर्णी यांनी नोंदविले आहेत. मर्यादित अवकाशात लेखकाला भावलेल्या व्यक्तींचे त्याच्या ठळक विशेषांसह चित्रण करणे असे व्यक्तिचित्र लेखनाचे स्वरूप असते. त्यासाठी लेखक त्या व्यक्तीच्या शारीरिक

ठेवणीचे, पोषाखाचे, बोलण्या-चालण्याचे व लकबींचे वर्णन करतो. त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या ठळक वैशिष्ट्यांचे मोजक्याच प्रसंगातून सहजतेने चित्रण करतो, मोजक्याच शब्दांत ते परिणामकारकपणे उभे केले जाते. त्यासाठी वर्णन, निवेदन, निरूपण, प्रसंगचित्रण, संवाद यांचा उपयोग लेखक करीत असतो. पु.ल.देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे 'व्यक्तिचित्रांचे लेखन हे पोर्ट्रेट पेंटिंगसारखे असते. ते पोर्ट्रेट ज्याचे आहे त्याची आणि त्याबरोबर ते काढणाऱ्या चित्रकाराचीही त्यातून ओळख पटावी लागते, आणि हे दर्शन नकळतपणे घडावे लागते'. यावरून व्यक्तिचित्रात नकळतपणे लेखकाच्या व्यक्तिमत्वाचाही सहजतेने आविष्कार होत असतो.

माणूस हाच साहित्याचा केंद्रबिंदू आहे. व्यक्तिचित्रात त्या व्यक्तीला मर्यादित शब्दात साकार करण्याचा लेखकाचा प्रयत्न असतो. व्यक्तिचित्रपर लेखनाचे विशेष डॉ.कुलकर्णी यांनी शोधलेले आहेत. लेखकाच्या सानिध्यात आलेल्या, त्याच्या मनात घर करून राहिलेल्या आणि त्यास भावलेल्या व्यक्तीला अंतर्बाह्य साकार करणे, त्यासाठी घटना, प्रसंग, आठवणी, अनुभवकथन याचा वापर केला जातो. त्यात व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाचे चित्रण करणे हा हेतु नसतो, तर लेखकाला भावलेल्या, जाणवलेल्या वेगळेपणाचे चित्रण केले जाते. इथे लेखक आणि वर्णव्यक्ती यांच्या भावसंबंधाचे चित्रण येत असले तरी वर्णव्यक्ती प्रधान व लेखक गौण असतो. वर्णव्यक्तीचे वेगळेपण आणि प्रत्येक लेखकाचे प्रतिभासामर्थ्य यामुळे व्यक्तिचित्रणात भिन्नता आढळते. वर्ण व्यक्तीविषयीचा जिव्हाळा, त्यातून निर्माण होणारा जिवंतपणा, सहज पण लालित्यपूर्ण भाषा, प्रतिभासामर्थ्याने केलेली नवनिर्मिती यामुळे व्यक्तिचित्रे हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार ठरतो. मराठीतील विपुल व्यक्तिचित्र लेखन हाच त्याचा पुरावा ठरतो.

स्थूलमानाने व्यक्तिचित्रणाचे काल्पनिक व चरित्रात्मक असे दोन प्रकार पडतात. लेखकाने पाहिलेल्या, पण इतरांना अज्ञात असणाऱ्या सामान्य माणसांच्या गुणदोषांवर भर देऊन लिहिलेल्या व्यक्तिचित्रास काल्पनिक व्यक्तिचित्रे म्हणतात. त्यात काल्पनिकता असू शकते. समाजात जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्यकर्तृत्व करणारी माणसे असतात. त्यांच्याकडे विशेष गुण असतात. अशा कर्तबगार व्यक्तींच्या सानिध्यात लेखकाला जाणवलेले गुण-दोष, मोठेपण यांच्या प्रभावामुळे काही व्यक्तिचित्रे लिहिली जातात, त्यांना चरित्रात्मक व्यक्तिचित्रे म्हणतात. यात मोठ्या प्रमाणात सत्यांश असतो.

व्यक्तिचित्रपर लेखनात वर्णव्यक्ती व लेखकाची प्रकृती यामुळे कथनात्मकता अधिक आली तर ते कथेला जवळ जाते. त्यात वर्णव्यक्तीच्या चरित्रातील सत्यप्रसंगांवर भर असेल तर ते चरित्राच्या जवळ जाते. विचारप्रधानता आली तर ते निबंधासारखे वाटते. हलक्या फुलक्या पद्धतीने साकार झाले तर ते लघुनिबंधासारखे वाटते. पण मर्यादित अवकाशात व्यक्तीला साक्षात साकार करणारे, व्यक्तीच्या जीवनाचे विविध पैलु इत्यादी वेगळेपण उलगडून दाखविणारे, प्रतिभासामर्थ्याने कलात्मक उंचीवर पोहोचलेले मनोहर पण सहज

भाषेत अभिव्यक्त होणार 'व्यक्तिचित्र' हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे असे अभ्यासकाने सप्रमाण दाखवून दिले आहे.

डॉ.कुलकर्णी यांनी या ग्रंथाच्या उत्तरार्धात मराठीतील व्यक्तिचित्रपर लेखनाचा इतिहास १९४० ते १९६० व १९६० ते १९९० या दोन भागात मांडला आहे. १९३२ साली कुमार रघुवीर यांचा 'हृदय' हा व्यक्तिचित्रांचा पहिला संग्रह प्रसिद्ध झाला. याच सुमारास दि.वा.दिवेकरांनीही चांगली व्यक्तिचित्रे लिहिली. पुढे वि.द.घाटे, प्र.के.अत्रे, व्यंकटेश माडगूळकर, मधु मंगेश कर्णिक, न.वि. गाडगीळ यासारख्या महत्वाच्या सुमारे पंचवीस लेखकांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्राचे स्वरूपविशेष व योगदान यांचा विस्ताराने परामर्श घेतला आहे. १९६० नंतरच्या वास्तववादी कालखंडात य.गो.जोशी, पु.ल.देशपांडे, गोपाळकृष्ण भोबे, आनंद यादव, दुर्गा भागवत, ग.दि.माडगूळकर, विजय तेंडुलकर, शिवाजी सावंत, विद्याधर पुंडलिक, रामकृष्ण बाक्रे, गंगाधर गाडगीळ यांसारख्या महत्वाच्या ३५ लेखकांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचा आढावा घेतलेला आहे. या वाङ्मयाचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास कसा होत गेला हे ही नमुद केले आहे. व्यक्तिचित्रपर वाङ्मयप्रकाराच्या इतिहासात मौलिक भर घालणाऱ्या आणि परिवर्तन घडविणाऱ्या आणि मानदंड ठराव्या अशा लेखकांचा, त्यांच्या योगदानाचा सविस्तर परामर्श घेतला आहे. यामुळे हा ग्रंथ एका वाङ्मय प्रकाराचा सविस्तर परिचय करून देणारा, परामर्श घेणारा ठरला आहे.

हा प्रबंध एका दुलर्क्षित विषयाला न्याय देणारा, एका वाङ्मयप्रकाराची तात्त्विक मांडणी करून इतिहास सिद्ध करणारा असल्यामुळे मराठीच्या अभ्यासक, संशोधकांना उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. डॉ. संजय कुलकर्णी यांचा हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे म्हणून मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

**डॉ. कृष्णा इंगोले**
**सांगोला.**

दिनांक : १५ मार्च २०१३

# अनुक्रमणिका


* मनोगत ..............................................चार

* प्रस्तावना ........................................... पाच

१. व्यक्तिचित्रे - एक वाङ्मयप्रकार -------------------१.

२. व्यक्तिचित्रे - प्रेरणा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये----------३०.

३. मराठीतील व्यक्तिचित्रे - भाग १ (१९४० ते १९६०) --७२.

४. मराठीतील व्यक्तिचित्रे - भाग २ (१९६०–१९९०)---- १२३.

५. उपसंहार ------------------------------------१९०.

६. संदर्भग्रंथ--------------------------------------२००.

७. साधनग्रंथसूची ---------------------------------२०४

## प्रकरण पहिले

# व्यक्तिचित्रे - एक वाड्मयप्रकार

**प्रस्तावना :**

मराठीतील अनेक वाड्मयप्रकारांपैकी कथा हा वाड्मयप्रकार हा सर्वसामान्यांच्या वृत्ती-प्रवृत्तीला जवळचा वाटत आला आहे. त्यामुळे काही प्रमाणात कथा वाचण्याकडे कल वाढत आहे. त्या कथांच्या संदर्भात विचार करताना काही कथांना शब्दचित्रांचे, व्यक्तिचित्रांचे रूप येते, तर काही कथा ललितनिबंधाच्या जवळ जातात असे दिसून येते. वाचनाच्या संदर्भात आत्मचरित्रासारखे लेखनही अनेकजणांना वाचायला आवडते. यामुळे वाड्मयीन प्रकाराच्या संदर्भात काही मूलगामी प्रश्न काही अभ्यासकांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे.

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात वेगवेगळ्या वाड्मयप्रकारांचा अंतर्भाव केलेला असतो. या वाड्मयप्रकारांची विविध वैशिष्ट्ये अभ्यासताना त्या त्या वाड्मयप्रकाराच्या लक्षणांची व्यवच्छेदकता मनाला बोचत राहते. एका वाड्मयप्रकाराचे घटक दुसऱ्या प्रकारालाही लागू पडतात असे दिसल्यावर त्या त्या वाड्मयप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण कोणते? हा प्रश्न मनाला सतावीत राहतो व त्यातून मग वाड्मयप्रकार या विषयावर चिंतन करावे असे वाटल्यावरून 'व्यक्तिचित्रे' या वाड्मयप्रकाराकडे आकर्षिले जातात.

विशिष्ट वाड्मयप्रकार निर्माण होताना सामाजिक व सांस्कृतिक स्थितिगती, लेखकाची मूळ प्रवृत्ती, अभिव्यक्तीची स्वाभाविक गरज, आशयाचे विशिष्ट स्वरूप, वाड्मयीन परंपरा या सर्वांचा साकल्याने परिणाम होत असतो. प्रत्यक्ष वाड्मयप्रकाराच्या (आकृतिबंधाच्या) जडणघडणीत या व्यावहारिक घटकांचा अधिक भाग असतो. एकंदरीत, मराठीत या संदर्भात फारसा विचार झालेला दिसत नाही. मराठीत वाड्मयप्रकाराचा विचार ब्रिटिशपूर्व काळात फारसा झाला नाही, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे असा विचार करण्याची त्या काळात भूमिका नव्हती. मध्ययुगीन कालखंडात पद्यलेखनावर भर होता. त्यामध्ये अभंग, ओवी, पदे, भारूड, लावणी, पोवाडे, लोकवाड्मय इत्यादींचा समावेश होतो. गद्य वाड्मयात लिळा, स्मृती, बखर, पत्रव्यवहार इत्यादी मधून लिखाण

झालेले दिसते. का.बा. मराठे यांच्या नावल व नाट्यविषयक निबंध अध्यापनातून त्यांनी 'नावल' हा शब्द सुचविला, इंग्रजी 'नॉव्हेल' यावरून हा 'नावल' मराठीत त्यांनी आणला असावा.

दुसरी गोष्ट अशी की, एकोणिसाव्या शतकात मराठी साहित्याच्या संदर्भातला विचार आशयानुगामी असल्यामुळे बोधवाद, नीतिवाद, प्रचार, उद्बोधन इत्यादी दिशेने विवेचन होत राहिलेले दिसेल. प्रा.वा.ल. कुलकर्णी ज्याला 'साहित्याच्या घाटाची जाणीव' (Form Consciousness) म्हणतात, ती सामान्यपणे १९२० नंतरच आलेली दिसते. सुरुवातीला विविध वाङ्मयप्रकारांची चिकित्सा झालेली दिसेल. रविकिरण मंडळाचा काळ (इ.स. १९२०-१९२५) किंवा त्याच्या आसपासचा काळ या अर्थाने महत्त्वाचा वाटतो. म्हणजे विशिष्ट वाङ्मयप्रकाराची; विशेषत: काव्यप्रकाराच्या आशयाची चिकित्सा होताना दिसते. थोडक्यात; काव्य, कादंबरी, कथा, नाटक या वाङ्मयप्रकाराविषयी चर्चा होत होती.

आधुनिक काळात वाङ्मयप्रकाराची ही चिकित्सा आणखी डोळस बनत गेली. इंग्रजी राजवटीचा काळ हा एकंदरीने संश्लेषणापेक्षा विश्लेषणाचा, नव्याचा स्वीकार करण्याचा होता. इ.स. १९३० नंतरचा काळ सबंध जीवनालाच एक प्रकारची गतिपूर्णता देणारा होता. त्यामुळे सर्व वाङ्मयप्रकारांना एक प्रकारचा आटोपशीरपणा आला. लघुनिबंध याच काळात निर्माण झाला. 'काय सांगितले' या बरोबरच 'कसे सांगितले' याकडे लक्ष वेधले गेले. याचे श्रेय प्रामुख्याने ना.सी. फडके यांच्याकडे जाते. त्यांनी आशयापेक्षा अभिव्यक्तीच्या अंगाने विचार अधिक केला. लघुनिबंधाचे लेखन केले. लघुकथेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. लघुनिबंधाची वैशिष्ट्ये ठाशीव पद्धतीने सांगितली. 'प्रतिभासाधन' सारख्या तंत्राचे विवेचन करणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. यामुळे वाङ्मयप्रकाराबाबतची जाणीव वाढू लागली. अनेक कलांपैकी वाङ्मय ही एक कला आहे. ही मानवनिर्मित कला आहे. अनेकदा लेखकाला तिच्या निर्मितीचे गूढ वाटत असले तरी ती माणसाने निर्माण केलेली भौतिक जीवनातील गोष्ट आहे. मानवी प्रतिभा, प्रज्ञा, कल्पनाशक्ती, संवेदना आणि सौंदर्यनिर्मिती या क्षमता पणाला लावून साहित्यकृती निर्माण केली जाते. अशा मानवनिर्मित गोष्टीचा, त्यातील प्रकारांचा आपणांस भौतिक अंगाने अभ्यास करता येतो.

**विषयाचे महत्त्व व अभ्यासपद्धती :**

मराठीमध्ये वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांचे अभ्यास झालेले आहेत. पण काही गौण वाङ्मयप्रकार अजूनही दुर्लक्षित आहेत. ललितगद्यात व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, ललितनिबंध, आठवणी, पत्रे यांचा समावेश केला जातो. यांपैकी व्यक्तिचित्रे या वाङ्मयप्रकारात

मराठीत विपुल लेखन झालेले असूनही त्याचा संशोधनात्मक अभ्यास फारसा झालेला दिसत नाही. ‘मराठीतील व्यक्तिचित्रां’चा समावेश आजपर्यंत कथा, चरित्र, निबंध अशा वाङ्मयप्रकारचा उपप्रकार किंवा ललितगद्याचा एक भाग म्हणूनच होत आहे. त्यामुळे त्यास स्वतंत्र वाङ्मयप्रकार असे कुणी संबोधलेले नाही. त्याची तात्त्विक चर्चाही केली गेलेली नाही. व्यक्तिचित्रे या वाङ्मयप्रकाराचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला गेला नाही. सन १९४० ते १९९० या कालखंडात बरेच व्यक्तिचित्रसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांपैकी महत्त्वाच्या व्यक्तिचित्रसंग्रहांचा विचार प्रस्तुत ग्रंथात केलेला आहे. एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून व्यक्तिचित्राला मान्यता मिळावी इतकी पात्रता त्यास निश्चित आहे. त्याप्रमाणे व्यक्तिचित्राचा विकासही पद्धतशीरपणे व दर्जेदार रीतीने होत आहे हे जाणवू लागले. प्रवासवर्णनापेक्षा जास्त लेखन व्यक्तिचित्रात झाले आहे. तरीही मराठीमध्ये या वाङ्मयप्रकाराविषयी अजूनही अधिक प्रमाणात संशोधन व अभ्यास झालेला नाही. व्यक्तिचित्रे विपुलतेने लिहिली गेली असली तरी ‘व्यक्तिचित्रा’ची समीक्षा झालेली नाही.

मराठीत ‘व्यक्तिचित्रे’ या लेखनाचा स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून विचार झालेला नाही. म्हणून या एका वाङ्मयप्रकाराची सैद्धान्तिक मांडणी करून १९४० ते १९९० या कालखंडात मराठीत निर्माण झालेल्या व्यक्तिचित्रात्मक वाङ्मयाचा इतिहास मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न अंशतः तात्त्विक व अंशतः वाङ्मयेतिहास मांडणारा आहे. मराठीमध्ये विविध प्रकारचे संशोधन झालेले आहे. त्यामध्ये एका लेखकाचा अभ्यास, दोन कवी-लेखकांचा तुलनात्मक अभ्यास, लोकसाहित्याचा अभ्यास, वाङ्मयप्रकाराचा अभ्यास इत्यादी प्रकारचा अभ्यास ‘प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार’ हा वसंत सावंत यांचा झालेला आहे. तर व्यक्तिचित्र या विषयावर पूर्वअभ्यास वसंत कुबेर यांनी केलेला आहे. थोडक्यात, एक वाङ्मयप्रकार या अनुषंगाने विषयाचे विवेचन प्रस्तुत ग्रंथात केलेले आहे.

### वाङ्मयप्रकार का निर्माण होतात?

कोणतीही साहित्यकृती ही आशयाची, अनुभवाची एकसंध बांधणी असते. तिचे विविध घटक एकमेकांशी जोडलेले असतात. एखाद्या वृक्षाचे अगर प्राण्याचे घटक ज्या प्रकारे एकत्र जोडलेले असतात, त्याप्रकारे साहित्यकृतीचे घटकही जोडलेले असतात. म्हणजेच ते परस्परांशी एकजीव झालेले असतात. साहित्यकृती ही एक कलाकृती असल्यामुळे तिची रचना ही कलात्मक आवश्यकतेनुसार झालेली असते. भावकाव्य, महाकाव्य, कथा, कादंबरी, नाटक, लघुनिबंध इत्यादी भिन्न भिन्न वाङ्मयप्रकार मानले जातात. वाङ्मयकृतीत जो आशय वा अनुभव विशिष्ट रचनेत बांधला जातो, त्या

आशयाचे स्वरूपही भिन्न वाङमयप्रकारात भिन्न असते. याचे कारण प्रत्येक अनुभव हा एक विशिष्ट आकार घेऊन जन्माला येतो. काही विशिष्ट प्रकारचा अनुभव हा फक्त काव्यातच स्वाभाविकरीत्या व्यक्त होऊ शकतो. काही अनुभवांतून कथाच घडवली जाऊ शकते, तर कादंबरीतील अनुभव हा वेगळ्या प्रकारचा असतो, हे जाणवते. म्हणजेच प्रत्येक अनुभवाला विशिष्ट स्वभावधर्म असतो व त्यानुसार त्याची रचना व पर्यायाने आकार निश्चित होतो.

कथा व कादंबरी हे दोन्ही निवेदनात्मक वाङ्मयप्रकार ज्यांचे घटकही सारखे असतात. कथेतील अनुभव हा एकविध, एकपिंडी व एककेंद्री असतो. कथेत येणारे अनुभवपुंज हे स्वायत्त नसल्यामुळे कथेची बांधणी घट्ट व बांधेसूद असते. कथेत एकात्मता असल्यामुळे तिच्यातीत अनुभव तीव्र स्वरूपाचा असतो. एक संस्कारित्व हे कथेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. अशा घाटातून कथा निर्माण होतात. तसेच कादंबरीतील अनुभव हा बहुविध व अनेककेंद्री असतो. कादंबरीमध्ये अनेक स्वायत्त अनुभव-संघटनामुळे त्यांचा संबंध विस्कळीत असतो. त्यामुळे कादंबरीची रचना एकात्म व बांधेसूद असू शकत नाही. कादंबरीतील अनेकपेडी, बहुविध व संमिश्र अनुभवांमुळे कादंबरीचा परिणामही बहुविध होतो. कादंबरीतील आशय हा अधिक व्यापक, बहुविध व अधिक संपन्न असतो. नाटकातील अनुभव हा नाट्यात्मक पातळीवर उभा करावा लागतो. नाट्यात्मक कथानकात पात्र हे घटना व प्रसंग घडविते आणि त्या घटनांची प्रतिक्रिया पुन्हा इतर पात्रांवर, घटनांवर होते. नाटकात ठळक, मोजक्या व सूचक फटकाऱ्यांनी नियोजित परिणाम साधावा लागतो. भावकाव्यात कलावंत एक अर्थपूर्ण, भावनात्मक अनुभव व्यक्त करीत असतो. भावकाव्यात प्रकट झालेला अनुभव एकेरी, एकात्म, एकपिंडी असतो. भावकाव्यात एकच प्रसंग, भावना, विचार वेगवानपणे व लघुतेने प्रकट केला जातो. भावकाव्य संपूर्ण भावनात्मक पातळीवर राहू शकते. लेखकाला जो अनुभव आलेला असतो त्याला साजेशा अशा कथा, कादंबरी, नाटक, भावकविता अशा वाङ्मयप्रकारांतून तो अभिव्यक्त करीत असतो. तसेच ज्या अनुभवात व्यक्ती हीच केंद्रस्थानी असते त्या अनुभवानुसार व्यक्तिचित्र लिहिले जाते.

प्रत्येक अनुभवाला स्वत:चा म्हणून काही स्वभाव असतो व त्यामुळे तो अनुभव काही एका विशिष्ट रूपातच स्वाभाविकरीत्या व सौंदर्यपूर्णतेने व्यक्त होऊ शकतो. म्हणजे वाङ्मयप्रकारचा संबंध हा अनुभवाच्या स्वभावधर्माशी निगडित असतो. भिन्न वाङ्मयप्रकार म्हणजे मूळ अनुभवाने आपल्या स्वभावधर्मानुसार घेतलेले रूप आहे असे आपल्याला दिसेल. यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की, वाङ्मयप्रकार हे कृत्रिम, तांत्रिक व अपुरे नाहीत. ते वाङ्मयातील जीवनानुभवाशी निगडित आहेत. मानवाच्या

मूलभूत प्रवृत्तीशीही त्यांचा संबंध असतो. अनुभवाच्या मूलभूत गुणधर्मानुसार हे प्रकार अभिव्यक्त होत असतात व त्यानुसार त्यांच्यात अभिव्यक्तिभेद व रचनाभेद निश्चित होतात. भावानुभूतीच्या मूलभूत गुणधर्मानुसार त्यांच्या विशुद्ध स्वरूपात कमी-जास्त प्रमाणाने वा मिश्रणामुळे भावानुभूतीचे वेगवेगळे घाट बनतात व वाङ्मयप्रकार अस्तित्वात येतात.

कुठलाही वाङ्मयप्रकार हा भोवतालची सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती, त्या काळाची वाङ्मयीन गरज वा कलाप्रेरणा यांतून जन्मास येतो. त्यामुळे कुठलाही वाङ्मयप्रकार हा साचेबंद (Fixed) नसतो, तसाच अविनाशीही नसतो. वेगवेगळ्या काळात, बदलत्या परिस्थितीनुसार या प्रकारात कमी-अधिक गुणांची वा गुणधर्मांची भर पडत जाते. त्याचे विषय बदलतात व विकास होत जातो. अशा बदलत्या विषयाच्या गरजेतून नवे उपप्रकार जन्माला येतात. जीवशास्त्रीय नैसर्गिक निर्मिती वेगळी व माणसाने काही हेतू मनात धरून केलेली निर्मिती वेगळी. आधी साहित्य निर्माण होते, मग समीक्षा लिहिली जाते. आधी लेखन; मग वाङ्मयप्रकारची संकल्पना झाली. एखादा समृद्ध वाङ्मयप्रकार एखाद्या प्रतिभावंताने निर्माण केल्यावर त्याच्या अनुकरणाने साहित्य बराच काळ निर्माण होत राहते. त्याचीही मग चाकोरी निर्माण होते. साचलेपणा निर्माण होतो. मग एखादा प्रतिभावंत ही कोंडी फोडतो. नवीन लेखनप्रकार किंवा विशिष्ट वाङ्मयप्रकाराचा विकसित प्रकार निर्माण करतो. आस्वादकाची रसिकता आणि नावीन्याची हौस किंवा ओढ लेखकाला प्रेरणा देत राहते.

प्राचीन काळात आपल्याकडे महाकाव्य, खंडकाव्य, नाटक, ओवी, अभंग, लावणी, पोवाडे, स्तोत्रे असे वाङ्मयप्रकार दिसतात. हे सर्व प्रकार पद्यानुसार असल्याचे दिसते. यातले काही वाङ्मयप्रकार आज कालबाह्य झाल्याचे दिसते. काहींमध्ये नव्या संकल्पना आलेल्या दिसतात. महाकाव्याच्या ऐवजी कादंबरीसारखा वाङ्मयप्रकार विकसित होताना दिसतो आहे. आधुनिक काळात आपल्याकडे कथा, कादंबरी, काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललितनिबंध, प्रवासवर्णन असे वाङ्मयप्रकार दिसतात. यातही पुन्हा उपप्रकार आहेत. काव्यातही भावगीत, सुनीत, गझल, रुबाया, कणिका, दशपदी असे उपप्रकार दिसतात.

या प्रत्येक वाङ्मयप्रकाराला स्वत:चे असे काही निकष असतात. त्यातून संकेत निर्माण होतात. यातूनच त्या-त्या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये निर्माण होतात. या वैशिष्ट्यातूनच त्या-त्या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप स्पष्ट होते. या स्वरूपातून त्या-त्या वाङ्मयप्रकाराचे सामर्थ्य आणि मर्यादा दिसून येतात. प्रत्येक वाङ्मयप्रकारची वैशिष्ट्ये किंवा लक्षणे सांगितली जातात. प्रत्येक वाङ्मयप्रकारचे काही घटक सांगितले जातात.

उदा. कथानक, स्वभावरेखाटन, मनोविश्लेषण, वातावरण, शैली इत्यादी. म्हणजे विशिष्ट वाङ्मयप्रकाराचे म्हणून जे घटक सांगितले जातात ते इतर वाङ्मयप्रकारांनाही लागू पडतात. म्हणजेच वाङ्मयप्रकारची व्यवच्छेदकता नमूद करणे अवघड जाते. असे असूनही वाङ्मयप्रकाराचे घटक काही ठिकाणी समान वाटत असले तरी त्याचे व्यवस्थापन प्रत्येक प्रकारात भिन्न असते. नाटकातला संवाद आणि कादंबरी किंवा कथेतला संवाद यामध्ये मूलभूत फरक असतो. त्याचे संदर्भ वेगळे असतात. म्हणजेच प्रत्येक वाङ्मयप्रकाराचा पोत वेगळा असतो. त्याची वीण वेगळी असते. त्या-त्या वाङ्मयप्रकाराला त्याचे स्वत:चे असे सामर्थ्य आणि मर्यादा असतात, एक स्वत:चा आकार असतो. स्वत:चे असे एक रूप असते, आकृतिबंध असतो.

**विकासाच्या अवस्थेतील लेखनप्रकार - व्यक्तिचित्रे :**

मराठी वाङ्मयामध्ये आज अनेक प्रकार प्रचलित झालेले आहेत. काही लेखनप्रकार विकासाच्या मार्गावर आहेत, तर काही जवळजवळ विकसित अवस्थेत आहेत. इंग्रजी वाङ्मय व इंग्रजी साहित्यिक यांच्या अभ्यासामुळे मराठी वाङ्मय एका नव्या मार्गाने जाऊ लागले आणि त्यात काही नव्या लेखनप्रकारांची भर पडली. अशा विकासावस्थेत व्यक्तिचित्रे हा लेखनप्रकार उदयाला आला.

**व्यक्तिचित्राला वापरण्यात आलेले पर्यायी शब्द :**

व्यक्तिचित्र हा लेखनप्रकार आजतागायत स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून कुणी विचारात घेतला नाही. ललित गद्य या व्यापक प्रकारात ‘व्यक्तिचित्रा‘चा समावेश आजपर्यंत केला जातो आहे. या लेखनप्रकाराचा स्वतंत्र अभ्यास न झाल्यामुळे त्याची परिभाषाही निश्चित झालेली नाही. परिणामी हा लेखनप्रकार अनेक शब्दांनी ओळखला जातो. हा गोंधळ केवळ सामान्य वाचकांमधेच नाही, तर व्यक्तिचित्रे लिहिणारे लेखक आणि त्याचे समीक्षण करणारे समीक्षक यांच्यातही आहे.

ज्या ए.जी. गार्डिनर या इंग्रजी लेखकाच्या लेखनावरून मराठीतील लेखकांना व्यक्तिचित्रलेखनाची प्रेरणा मिळाली त्या गार्डिनरने या लेखनप्रकाराला‘ज्ञशींलहअसे संबोधिले आहे.‘स्केच’ संबंधी व्याख्या करताना इंग्रजी शब्दकोशामध्ये ज्या चार्लस डिकन्सचा उदाहरणादाखल उल्लेख केला आहे, त्या डिकन्सनेही आपल्या व्यक्तिचित्रांना ‘स्केचेस‘ असेच म्हटले आहे. परंतु डिकन्सच्या ‘स्केचेस’ या सदरात लिहिलेल्या लेखनामध्ये स्थळचित्रे, प्रसंगचित्रे, व्यक्तिचित्रे या सर्वांचा समावेश झाला आहे. म्हणजेच ‘स्केच’ हा शब्द डिकन्सने शब्दचित्र या व्यापक अर्थाने वापरला असावा.

व्यक्तिचित्रांचा संग्रह काढण्याचा प्रथम मान ज्या कुमार रघुवीर (रघुवीर सामंत) यांच्याकडे जातो त्यांनी आपल्या ‘हृदय’ (१९३२) या संग्रहातील सर्व लेखनाला

'शब्दचित्रे' असेच म्हटले आहे व शब्दचित्रातच व्यक्तिचित्राचा समावेश केला आहे. दिनकर वासुदेव दिवेकर यांनी ए.जी. गार्डिनरच्या लेखनावरून स्फूर्ती घेऊन व्यक्तिचित्रलेखनाचा प्रकार मराठीत सुरू केला. त्या दिवेकरांनी आपल्या पहिल्या व्यक्तिचित्रांना 'स्वभावचित्रे' असे नाव दिले आहे. परंतु इ.स. १९६० ला निघालेल्या व्यक्तिचित्रसंग्रहास त्यांनी 'अविस्मरणीय व्यक्तिचित्रे' असे नाव दिले आहे. अर्थात 'व्यक्तिचित्रे' व 'स्वभावचित्रे' हे शब्द ते एकाच अर्थाने वापरत असावेत असे वाटते. कारण दोन्ही पुस्तकांच्या प्रस्तावनेत या शब्दाच्या अर्थात काही फरक आहे किंवा नाही याबद्दल दिवेकरांनी काहीच मत प्रदर्शित केलेले नाही.

वि.द. घाटे यांचे 'काही म्हातारे व एक म्हातारी' हे पुस्तक १९३९ मध्ये प्रथम प्रकाशित झाले. या पुस्तकाच्या तृतीय आवृत्तीमध्ये (१९८८) सु.रा. चुनेकर यांनी आपल्या संपादकीय प्रास्ताविकात दोन समीक्षकांच्या परीक्षणाचा उल्लेख केला आहे. त्यात ना.ग. जोशी यांनी 'काही म्हातारे व एक म्हातारी' यातील लेखांना 'शब्दचित्रे' म्हटले आहे, तर भि.अ. परब यांनी या लेखांना 'व्यक्तिचित्रे' म्हटले आहे.

'ऋणानुबंधी'कार प्र.श्री. कोल्हटकर यांनी 'स्वभावचित्रे' हा शब्द व्यक्तिचित्रासाठी वापरला असून त्याची चर्चा केली आहे. वि.ह. कुलकर्णी यांनी आपल्या व्यक्तिचित्र संग्रहाचे नावच 'व्यक्तिचित्रे' असे ठेवले आहे, तर न.शे. पोहनेरकर यांनी 'विरलेल्या गारा' या आपल्या व्यक्तिचित्रसंग्रहाच्या अर्पणपत्रिकेत, 'ज्यांच्या जीवनाचे जवळून दर्शन झाल्यामुळे ही 'व्यक्तिचित्रे' लिहिण्याची प्रेरणा झाली त्या मराठवाड्यातील विविध महनीयांना', असे लिहून या संग्रहातील लेखनाला 'व्यक्तिचित्रे' म्हटले आहे.

एक जुने व्यक्तिचित्रकार धनंजय (वसंत शांताराम देसाई) यांनी 'व्यक्तिचित्र' शब्द वापरला आहे. आपल्या 'कलेचे कटाक्ष' या व्यक्तिचित्रसंग्रहाच्या प्रस्तावनेमध्ये- 'कलावंतांच्या सहवासात'च्या प्रसिद्धीनंतर मागे लिहिलेल्या सर्व व्यक्तिचित्रांचा समावेश या संग्रहात केलेला आहे' असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. मुलाखतींचा समावेश व्यक्तिचित्रात करणारे त्र्यं.वि.पर्वते यांनी 'व्यक्तिदर्शन' हा शब्द व्यक्तिचित्राच्या संदर्भात संग्रहाच्या शीर्षकातच वापरला आहे.(मी घेतलेल्या मुलाखती किंवा वादसंवादातील व्यक्तिदर्शने) सौ. कमलाबाई देशपांडे यानी 'हसरा निर्माल्य आणि चिमण्या'च्या प्रस्तावनेत 'शब्दचित्रे' हा शब्द वापरतात, तर उमाकांत भेंडे 'भटक्याची कमाई' च्या अनुक्रमणिकेत व्यक्तिचित्रांना 'व्यक्तिरेखा' हा शब्द वापरतात. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या 'माणदेशी माणसं' संग्रहाला 'शब्दचित्रे' हा शब्द वापरला आहे. पु.ल.देशपांडे यांना 'व्यक्तिचित्रे' हा शब्द मान्य दिसतो. सुप्रसिद्ध समीक्षक व लेखक कै.वि.स. खांडेकर यांनी त्यांच्या 'ते दिवस, ती माणसे' च्या प्रस्तावनेमध्ये 'व्यक्तिचित्र' हाच शब्द वापरला आहे.

भा.ल. रानडे यांनी मात्र आपल्या व्यक्तिचित्रांचे 'रेखाचित्र' असे नामाभिधान केले आहे, तर 'ग्रामीण चित्रे' चे कर्ते गो.ना. आपटे यांनी आपली व्यक्तिचित्रे ही 'व्यक्तिपरिचय' म्हणून लिहिली आहेत. (प्रस्तावना) न.वि. गाडगीळ यांनी 'माझे समकालीन' या ग्रंथातील 'व्यक्तिचित्रे' ही व्यक्तींबद्दलचे लेख म्हणून समाविष्ट केले आहेत (प्रस्तावना). तर आपण या पुस्तकात 'व्यक्तिदर्शने' लिहिली आहेत असे म.श्री. दीक्षित यांनी 'साहित्यिकांच्या सहवासात' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. 'माझे शिल्पकार' मधील व्यक्तिपर लेख दिनकर द. पाटलांनी लिहिले असून त्यांचा समावेश व्यक्तिचित्रात होऊ शकतो, तर कृ.द. दीक्षित यांनी आपल्या 'षड्ज-गांधार' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आणि ग.त्र्यं. माडखोलकर यांनी 'व्यक्ती तितक्या प्रकृती' च्या प्रस्तावनेत आपल्या व्यक्तिचित्रांना व्यक्तिविषयक लेख असे म्हटले आहे. 'अनोखे मित्र' च्या 'मित्रभेटीची पूर्वपीठिका' या प्रस्तावनेत ग्रंथलेखक अ.ह. लिमये यांनी व्यक्तिचित्रांचा हा माझा तिसरा संग्रह असे म्हणून 'अनोखे मित्र' सहित पूर्वीचे दोन्ही व्यक्तिचित्रसंग्रह व्यक्तिचित्र या सदरात धरले आहेत. रवींद्र पिंगे हे आधुनिक लेखक मात्र आपल्या 'देवाघरचा पाऊस' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आपल्या व्यक्तिचित्रांना 'व्यक्तिशोध' असे म्हणतात. भाई माधवराव बागल यांनी 'माझा परिवार' या व्यक्तिचित्रसंग्रहातील व्यक्तिचित्रांना 'रॅपिड स्केच' किंवा 'स्नॅप शॉट' अशी नावे या संग्रहाच्या प्रस्तावनेत दिली आहेत. श्री.के. क्षीरसागरांच्या 'सागरमंथन' च्या प्रस्तावनेमध्ये गोपीनाथ तळवळकर 'व्यक्तिचित्र वा स्वभावचित्र' असे म्हणून दोन्हीही एकच मानतात. तर याच पुस्तकाच्या दुसऱ्या प्रस्तावनेत स्वत: श्री.के. क्षीरसागर या लेखनाला 'व्यक्तिपरीक्षण' म्हणतात. वेगवेगळ्या लेखकांनी व्यक्तिचित्रासाठी वेगवेगळे शब्दप्रयोग केलेले आहेत. पण त्या शब्दांच्या वापरामागील अर्थच्छटांबद्दलचा काटेकोरपणा दिसून येत नाही.

**शब्दवापरातील गोंधळ :**

शब्दचित्र, व्यक्तिचित्र, स्वभावचित्र या शब्दांच्या वापराबाबत व त्यांच्या अर्थांबाबत मराठी लेखकांची व समीक्षकांची बरीच गडबड झालेली दिसते. हे सारे शब्द व त्यामागील अर्थच्छटा यांचा विचार न करता या शब्दाचा अतिशय ढिलेपणाने वापर केला गेल्याने हा गुंता बिकट झालेला आहे. डॉ. अ.ना. देशपांडे यांनी या लेखनप्रकाराची चर्चा करताना 'शब्दचित्र वा व्यक्तिचित्र' आणि 'व्यक्तिचित्रे वा स्वभावचित्रे' असे उल्लेख केलेले आहेत. म्हणजेच हे तीनही शब्द ते एकाच अर्थाने व पर्यायी म्हणून वापरतात हे स्पष्ट होते. प्रा. म.ना. अदवंत या लेखनप्रकाराची चर्चा करताना 'शब्दचित्रे' वा 'व्यक्तिचित्रे' असा उल्लेख करतात. म्हणजेच म.ना. अदवंत दोन्ही शब्दांचा अर्थ एकच समजतात. कुमार रघुवीर यांच्या 'हृदय' या संग्रहाचे परीक्षण करताना श्री. दौंडकर हे 'शब्दचित्र' हाच शब्द

वापरतात. कारण कुमार रघुवीरांनी हे लेखन शब्दचित्रे म्हणूनच केले होते. 'माणदेशी माणसं' या व्यंकटेश माडगूळकरांच्या संग्रहाला प्रस्तावना लिहिताना सौ. मालतीबाई बेडेकर यांनी ही 'शब्दचित्रे' च आहेत असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे.

प्रा. रा.श्री. जोग यांनी 'अविस्मरणीय व्यक्तिचित्रे' या दि.वा. दिवेकर यांच्या व्यक्तिचित्रसंग्रहाच्या प्रस्तावनेत एके ठिकाणी 'व्यक्तिचित्रे' तर दुसरीकडे 'शब्दचित्रे' असे शब्द वापरले आहेत. प्रा. रा.श्री. जोग यांनी हे दोन्ही शब्द समानार्थी वापरले आहेत. डॉ. वा.भा. पाठक यांनी 'टीका आणि टिकाकार' मध्ये 'शब्दचित्र' आणि 'स्वभावचित्र' या दोन्ही शब्दांचा वापर एकाच अर्थाने केला आहे. दा.वि. कुलकर्णी यांनी मात्र लघुकथेसंबंधी लिहिताना 'शब्दचित्र' हाच शब्द वापरला असून लघुकथा व शब्दचित्राची तुलना केली आहे. वा.ल. कुलकर्णी यांनी मराठी लघुकथेचा उत्क्रांतीमार्ग सांगताना एकदा 'शब्दचित्र' तर दुसरीकडे 'व्यक्तिचित्र' असा शब्दप्रयोग केला आहे. एकाच लेखात शब्दचित्र व व्यक्तिचित्र हे शब्द ते एकाच अर्थाने वापरतात. इंदुमती शेवडे यांनी लघुकथेचा विकास सांगता सांगता व्यक्तिविषयक चर्चा केली असून 'शब्दचित्रे व व्यक्तिचित्रे' असे म्हटले आहे, म्हणजे त्या हे दोन्ही शब्द समानार्थीच मानतात असे दिसते. तर सदा कऱ्हाडे 'व्यक्तिचित्र किंवा स्वभावचित्र' असे म्हणतात यावरून ते हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे मानतात हे लक्षात येते. 'स्वभावचित्रे' या दिवेकरांच्या संग्रहाला प्रस्तावना लिहिताना कै.वा.म. जोशी यांनी आणि 'चरित्र-आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास' या ग्रंथात (पृ.८३-८७) अ.म.जोशी यांनी 'स्वभावचित्र' हा शब्द वापरला आहे. मात्र अ.म. जोशींनी याच ग्रंथात 'व्यक्तिचित्रे' हा शब्दही (पृ. १६९) वापरला आहे. म्हणजेच व्यक्तिचित्रे व स्वभावचित्रे हे शब्द अ.म. जोशी एकाच अर्थाने वापरतात असे दिसते. शं.गो.तुळपुळे यांनी मात्र 'Gazetter of India' मध्ये मराठी वाङ्मयाची ओळख करून देताना 'Word Picture (पृ.२३२)'Pen Picture,(पृ.२१४)'Character Picture,'(पृ.३४४)असे तीन इंग्रजी शब्द निरनिराळ्या ठिकाणी वापरले आहेत. या तीनही ठिकाणी उदाहरणांसाठी ज्या भिन्न भिन्न रचनांचा उल्लेख आहे, त्या वास्तविक एकाच प्रकारात समाविष्ट होणाऱ्या आहेत. या ठिकाणचे विवेचन अतिशय त्रोटक असल्याने या शब्दाच्या वापरामागील व लेखकाच्या मनातील त्यांच्या अर्थाबद्दल असणाऱ्या भूमिकेसंबंधी काही समजू शकत नाही.

थोडक्यात, मराठी भाषेत 'व्यक्तिचित्रे' हा अर्थ स्पष्ट करणारे, परंतु निरनिराळ्या सूक्ष्म अर्थच्छटा असणारे शब्दचित्र, व्यक्तिचित्र, स्वभावचित्र, व्यक्तिरेखा, व्यक्तिपरिचय, व्यक्तिपर लेख, व्यक्तिशोध, व्यक्तिपरीक्षण, व्यक्तिदर्शन, स्वभावचित्रण, रेखाचित्र असे शब्द आहेतच. याखेरीज स्केच, रॅपिड स्केच, स्नॅपशॉट, वर्डपिक्चर, पेनपिक्चर,

कॅरेक्टर स्केच असे शब्द इंग्रजीत वापरतात. परंतु यापैकी शब्दचित्र, व्यक्तिचित्र, स्वभावचित्र हे शब्द अधिक प्रमाणात प्रचारात आहेत, तर इंग्रजी मध्ये स्केच आणि हिंदीमध्ये रेखाचित्र हे शब्द जास्त प्रचारात आहेत. माझ्या मतानुसार त्यामध्ये असणाऱ्या अर्थच्छटा आणि परंपरागत घेण्यात येणारे अर्थ याचा विचार करणे अधिक योग्य ठरेल.

**प्रचलित शब्दांचे अर्थ व अर्थच्छटा :**

**शब्दचित्र - रेखाचित्र :**

शब्दचित्र हा शब्द चित्रकलेतील 'स्केच' या शब्दाचा साहित्यातील सर्वसामान्य वापरातील पर्यायी शब्द होय. चित्रकलेतील 'स्केच' ला विषयाचे बंधन नाही. आपण आपल्या समोरील कोणतेही दृश्य, वस्तू, व्यक्ती पाहताना आपल्या मनावर त्याचे जे चित्र उमटते ते आपल्या मनातील स्केच आणि तेच कागदावर जसेच्या तसे रंग-कुंचला इत्यादींच्या साहाय्याने रेखाटले गेले की चित्रकलेतील स्केच बनते. तसेच मनातील चित्राचे कागदावरील 'स्केच' प्रमाणे शब्दांत वर्णन केले गेले की साहित्यातले शब्दचित्र बनते. 'स्केच' या शब्दातील खरा अर्थ जो बाह्य रेखांच्या साहाय्याने काढलेले चित्र हा केवळ रेखाटन या शब्दात येतो. या स्केचसाठी किंवा रेखाटनासाठी चित्रकलेत कोणतेही साधन चालू शकते. स्केच हे पूर्ण कधीच नसते, तर तो केवळ थोडी कल्पना देणारा आराखडावजा एक ठसठशीत भाग असतो. साहित्यातील रेखाटनाचे शब्द हे माध्यम ठरते. त्यामुळे त्याला शब्दरेखाटन किंवा शब्दचित्र म्हणावे.

प्र.न. जोशी कृत 'आदर्श मराठी शब्दकोश' मध्ये 'शब्दचित्र' या शब्दाबाबत 'शब्दांनी केलेले वर्णन, काढलेले चित्र' असे विवरण आहे. य.रा. दाते संपादित 'महाराष्ट्र शब्दकोश' मधील स्पष्टीकरण फारच अपुरे आहे, तर श्री.ना. बनहट्टी व भाऊ धर्माधिकारी संपादित 'सुगम मराठी शब्दकोश' यामध्ये 'शब्दांनी उभे केलेले चित्र' असे म्हटले आहे. हा अर्थ मोघम आहे हे उघड आहे. ज्या कुमार रघुवीरांनी शब्दचित्रांचा संग्रह प्रथम प्रकाशित केला, त्यांनीच शब्दचित्राविषयी प्रथम चर्चा केली. शब्दचित्राची व्याख्या करताना ते म्हणतात, 'एखादी व्यक्ती, एखादा प्रसंग किंवा एखादे दृश्य व त्यामुळे उद्भूत झालेले मनोविकार याचे सूचक शब्दात परिणामकारक व थोडक्यात काढलेले चित्र तेच शब्दचित्र'. हीच व्याख्या सरोजिनी बाबर व वि.म.कुलकर्णी यांनी 'साहित्यदर्शन' या पुस्तकात दिली आहे. कुमार रघुवीरांच्या वरील व्याख्येत विषयाची व्याप्ती जाणवते, तसेच शब्दांची सूचकता, परिणामकारकता, थोडकेपणा याला त्यांनी महत्त्व दिलेले दिसते. याच व्याख्येला जवळ, परंतु विषयाच्या यादीत थोडा फरक असणारी श्यामसुंदरदास यांची हिंदी भाषेतील शब्दचित्राची व्याख्या पुढीलप्रमाणे -

'शब्दों के माध्यम से किसी स्थान, घटना आदि का ऐसा वर्णन प्रस्तुत करता,

जिसको उसका रूपचित्र आसित हो उठे।' या व्याख्येत श्यामसुंदरदास यांनी शब्दचित्राच्या विषयात स्थळवर्णनही दिले आहे. मराठीतील शब्दचित्र व हिंदीतील रेखाचित्र या मागील संकल्पनेमध्ये विशेष फरक दिसत नाही. व्यक्तिचित्र, स्थळचित्र, प्रसंगचित्र इत्यादी प्रकारांना हिंदीमध्ये सरसकट 'रेखाचित्र' असेच म्हणतात. 'रेखाचित्र' या शब्दाचा कोशागत अर्थ देताना श्यामसुंदरदास यांनी 'साहित्य मे शब्दचित्र थोडे शब्दों मे प्रस्तुत वह वर्णन है, जिसमे वर्ण्यसंबंधी समग्र विशेषताएँ सुस्पष्ट हो ।' असा दिला आहे.

राजनाथ शर्मा यांनी दिलेली व्याख्या अशी - 'रेखाचित्र उस साहित्यिक रूप को कहा जा सकता है, जिसमें किसी व्यक्ती के मर्मस्पर्शी चरित्र की बाह्य विशेषताओंको विभिन्न, संक्षिप्त घटनाओं के माध्यम से एक प्रभावशाली ढंग से अभिव्यक्त किया जाय, तथा जिसमें घटनाओंको उतार-चढाव न होकर तथ्य कथन मात्र हो ।'

रेखाचित्रासंबंधी व्याख्या करताना डॉ. हरदयाळ म्हणतात -'साहित्य मे कम से कम शब्दो में कलात्मक ढंग से किसी वस्तू, व्यक्ती या दृश्य का अंकन 'रेखाचित्र' कहलाता है ।'

दुर्गाशंकर मिश्र यांनी सांगितलेली पुढील व्याख्या रेखाचित्राची कल्पना अधिक स्पष्ट करते - 'साहित्य का वह रूप, जिसमे किसी वस्तु या व्यक्ति विशेष के भीतरी-बाहरी रूप का इस प्रकार वर्णन किया जाता है की उस वस्तु का एक चित्र सा निर्मित हो जाता है, वह रेखाचित्र कहलाता है ।' या व्याख्येमध्ये वस्तू किंवा व्यक्तीच्या आंतर-बाह्य वर्णनाचा एक नवा पैलू दाखविला आहे.

वरील दोन्ही व्याख्यांपेक्षा हरवंशलाल शर्मा यांची व्याख्या अधिक विस्तृत स्पष्टीकरण देणारी आहे - 'रेखाचित्र किसी एक व्यक्ती, स्थान, घटना, दृश्य या उपादान का ऐसा वस्तुगत वर्णन होता है जो संक्षेप मे उसकी बाह्य विशेषताओं को प्रस्तुत करता है । बाह्य विशेषताओंके भीतरही उसका आंतरिक विशेषताओं का समाहार हो जाता है । उसके स्वरूप से निबंध, कहानी, नाटक, संस्मरण या रिपोर्ताज से भ्रान्ति हो सकती है । रेखाचित्र सरल, सुगठित, लघु तथा वर्णन-प्रधान होना चाहिये तभी वह प्रभावशाली बनता है ।' या व्याख्येमध्ये रेखाचित्राचा विषय, त्याची मांडणी, स्वरूप, आकार आणि संभ्रमित करणारे बहिरंग या सार्‍यांचे वर्णन आले आहे.

### स्वभावचित्र :

व्यक्तिचित्रांना बर्‍याच वेळा 'स्वभावचित्र' असेही म्हटले गेले आहे. गार्डिनरच्या साहित्यावरून स्फूर्ती घेऊन हा प्रकार मराठीत आणण्याचे श्रेय दि.वा. दिवेकरांना दिले

जाते. त्यांनीही आपली काही व्यक्तिचित्रे 'स्वभावचित्रे' म्हणून लिहिली असल्यामुळे प्रथम स्वभावचित्रासंबंधीच्या संकल्पना पाहू.

मराठी कोशामध्ये स्वभावचित्राचे निरनिराळे अर्थ दिले आहेत. कृ.पा. कुलकर्णी यांच्या मते स्वभावचित्र म्हणजे - 'स्वभावांचे वर्णन, एखाद्याचे वर्णन' होय. प्रा. कुलकर्णी यांनी स्वभावचित्राचा वाङ्मयप्रकार म्हणून येथे निर्देश केलेला नाही. तसेच त्यांनी ज्या त्रोटकपणे हा अर्थ दिलेला आहे त्यावरून व्यंगार्थाने कोणतेही, कुठेही, कसेही केलेले स्वभावाचे वर्णन किंवा एखाद्याचे वर्णन म्हणजे स्वभावचित्र होऊ शकेल.

य.रा. दाते यांनी केलेली व्याख्या अशी -'एखाद्या व्यक्तीची मनात भरण्याजोगी अशी थोडक्यात वर्णन केलेली माहिती म्हणजे स्वभाववर्णन' या व्याख्येत 'थोडक्यात वर्णन करणे' हे जे दात्यांनी सांगितलेले वैशिष्ट्य आहे त्यातून या वाङ्मयप्रकाराबाबतचे वेगळेपण थोडेफार सूचित होऊ शकेल.

वा.गो. आपटे यांनी केलेली व्याख्या महत्त्वाची वाटते. 'थोडक्यात केलेले व्यक्तिवर्णन'. (एक वाङ्मयप्रकार) या ठिकाणी त्यांनी स्वभावचित्राचा एक वाङ्मयप्रकार म्हणून जो उल्लेख केला आहे तो नि:संशय महत्त्वाचा आहे! एस.एस. भोसले यांनी केलेली व्याख्या - 'काही घटनांच्या साहाय्याने मोजक्या शब्दसंगतीच्या आधाराने माणसाच्या स्वभावाचे दर्शन देणे ही स्वभावचित्राची स्थूल पद्धती आहे.' भोसले यांच्या या संकल्पनेत व्यक्तिचित्राच्या दृष्टीने काही प्रमाणात ग्राह्यांश निश्चित आहे. 'स्वभावचित्र' या शब्दातून जे प्रकट होते ते डॉ. एस.एस. भोसले यांनी अचूक सांगितले आहे.

या सर्व मतमतांतरावरून असे दिसून येते की, 'स्वभावचित्र' या शब्दाचा जो बाळबोध अर्थ निघतो तोच अर्थ प्रामुख्याने सर्वांना मान्य आहे, आणि आजपर्यंत लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, स्वभावचित्राचा जो मर्यादित अर्थ व्यक्त होतो किंवा करण्यात येतो, तो व्यक्तिचित्र या लेखनप्रकारास पूर्णपणे न्याय देऊ शकणारा नाही. व्यक्तिचित्राचे बरेचसे गुणधर्म स्वभावचित्रात येत असले तरी व्यक्तिचित्राचे संपूर्ण दर्शन 'स्वभावचित्र' या संज्ञेमुळे घडत नाही. व्यक्तिचित्राची संकल्पना पाहण्यापूर्वी एक गोष्ट आधीच स्पष्ट करावीशी वाटते व ती म्हणजे या लेखनप्रकाराला बऱ्याच जणांनी व्यक्तिचित्र असे म्हटले असले तरी व्यक्तिचित्र म्हणून या लेखनप्रकाराची चर्चा फारशी कुणी केलेली नाही. ना.सी. फडके कालखंडात व्यक्तिचित्र व स्वभावचित्र हे शब्द समानार्थी व पर्यायी मानले जात.

**व्यक्तिचित्र संकल्पना :**

व्यक्तिचित्राची संकल्पना स्पष्ट करताना ख्यातनाम व्यक्तिचित्रकार पु.ल. देशपांडे म्हणतात, 'व्यक्तिचित्राचे लेखन हे पोर्ट्रेट पेंटिंगसारखे असते. तो पोर्ट्रेट ज्याचा आहे

त्याची आणि त्याबरोबरच तो काढणाऱ्या चित्रकाराचीही त्यातून ओळख पटावी लागते आणि हे दर्शन नकळत घडावे लागते.' या छोट्या अवतरणातून पु.ल. देशपांडे यांनी बरेच काही स्पष्ट केले आहे. ज्याचा पोर्ट्रेट आहे त्याची ओळख पटावी असे पु.ल. देशपांडे म्हणतात. ही ओळख दोन प्रकारे पाहावी लागते १.अंतरंग २.बहिरंग. या दोन्हीचेही वर्णन पु.ल. देशपांडे यांना अभिप्रेत असावे. तसेच या वर्णनावर त्या लेखकाचा ठसा असावा म्हणजे त्यातून लेखकाच्या मनाचाही तळ दिसेल. तसेच या वर्णनात चित्राचे सारे गुणधर्म असावेत, हे पोट्रेट पेंटिंग म्हटल्याने उघड होते.

व्यक्तिचित्राची संकल्पना अतिशय स्पष्टपणे मांडताना डॉ. गो.मा. पवार म्हणतात, 'आपल्याकडे व्यक्तिचित्राचा एक साचा ठरून गेला आहे. व्यक्तीच्या शरीराचे, तिच्या बोलण्या-चालण्याच्या लकबीचे प्रत्ययकारी वर्णन करावयाचे, त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा एखाद्या विशेषाचे ठसठशीतपणे अनेक प्रसंगचित्रणांच्याद्वारे वर्णन करावयाचे, त्या व्यक्तीचा दिनक्रम अथवा आयुष्यक्रम उलगडून दाखवायचा व शेवटी सगळ्या प्रसंगांचा कळस ठरेल असा शेलका प्रसंग चित्रित करावयाचा व ते व्यक्तिचित्र परिणामकारक करावयाचे! व्यक्तिचित्राच्या रूपविशिष्टतेची जाणीव चांगल्या चांगल्या लेखकाच्या कलात्मक अभिव्यक्तीत अडथळ्यासारखी ठरते.' व्यक्तिचित्रलेखनाची बहुतेक पद्धत गो.मा. पवारांनी उलगडून दाखविली आहे.

पु.ल. देशपांडे व गो.मा. पवार यांच्या अवतरणाच्या एकीकरणातून व्यक्तिचित्राची संकल्पना बरीचशी स्पष्ट होईल असे मला वाटते. मात्र गो.मा. पवार व्यक्तीचा दिनक्रम अथवा आयुष्यक्रम उलगडून दाखवायचा जे म्हणतात, हे मात्र योग्य वाटत नाही. व्यक्तिचित्रात व्यक्तिमत्वाच्या ज्या भागावर प्रकाश टाकला जातो तेवढाच मर्यादित स्वरूपात घटनांच्याद्वारे उलगडला जातो. संपूर्ण दिनक्रम व आयुष्यक्रम उलगडावयाचा म्हटले तर ते व्यक्तिचित्र चरित्राच्या वळणावर जाईल आणि महत्त्वाची गोष्ट अशी की, व्यक्तिचित्र म्हणजे व्यक्तिचरित्र नाही.

आतापर्यंत शब्दचित्र, स्वभावचित्र, व्यक्तिचित्र या तीन शब्दांमागील संकल्पनांचा विचार केला. तसेच इंग्रजीतील 'स्केच' व हिंदीतील 'रेखाचित्र' या संकल्पनाही पाहिल्या. या संकल्पनांचा वापर अधिक असल्याने त्याचा विचार अधिक केला. हिंदी व इंग्रजी शब्दांचा मराठीमध्ये तसा काही फारसा वापर केला जात नाही. त्यामुळे मराठीतच जे तीन शब्द प्रामुख्याने वापरले जातात, त्यातील एक शब्दाची विचारपूर्वक निश्चिती करणे आवश्यक ठरेल.

'शब्दचित्रा'चा विचार करता असे दिसते की, शब्दांच्या माध्यमातून थोडक्यात केलेले वर्णन येथे अभिप्रेत असते. ही संकल्पना अतिव्याप्त आहे. 'स्वभावचित्र' हा

शब्द व ही संकल्पना ‘व्यक्तिचित्र’ या लेखनप्रकारातील अर्थ संपूर्णपणे व्यक्त करू शकत नाही. त्यामुळे तो स्वीकारता येत नाही. ‘व्यक्तिचित्र’ हा शब्द मात्र या लेखनप्रकाराचे गुणविशेष समर्पक रीतीने स्पष्ट करतो. त्यामुळे या लेखनप्रकाराला ‘व्यक्तिचित्र’ या नावाने संबोधणे योग्य ठरते. येथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे ती म्हणजे ‘व्यक्तिचित्र’ खेरीज इतर नावाने लिहिले गेलेले लेखन व्यक्तिचित्रात समाविष्ट नाही किंवा त्यांचा समावेश स्वतंत्र लेखनप्रकारात करावा असे मात्र नाही. ज्या अनेक संज्ञा वापरून व्यक्तिचित्र लेखन झाले असेल ती व्यक्तिचित्रेच होत. फक्त व्यक्तिचित्राचे जे निकष ठरतील त्या अन्वये त्यांची कमी-अधिक दर्जाची प्रतवारी ठरू शकेल. ज्या शब्दचित्रात व्यक्तीला प्राधान्य आहे त्याचा समावेश व्यक्तिचित्रात होईल.

**व्यक्तिचित्र आणि इतर वाङ्मयप्रकार यांचा संबंध आणि तुलना :**

व्यक्तिचित्र आणि इतर वाङ्मयप्रकार यांचा काही संबंध असतो असे वाटणे साहजिक असते. कारण ‘व्यक्तिचित्र’ या लेखनप्रकारासंबंधी, त्याच्या उगमासंबंधी निश्चितता नाही. व्यक्तिचित्राचा ललित गद्यामध्येच समावेश केला जातो. ‘व्यक्तिचित्र’ हा कथेचा प्रकार आहे किंवा तो ‘चरित्रवाङ्मयाचाच’ एक उपप्रकार आहे किंवा त्याला ‘व्यक्तिपर निबंध’ असेही समजतात.

सर्व वाङ्मयप्रकारांचा आंतरिक संबंध असतोच. त्यामुळे असे घोटाळे होत असावेत. हे वाङ्मयप्रकाराचे नमुने निरनिराळे दिसले तरी त्यांना जोडणारा धागा एकच असतो. या कारणामुळे सर्वच वाङ्मयप्रकारात आत्माविष्कार, भाषेचे कार्य, नाट्य, काव्यात्मकता, संवाद, वातावरणनिर्मिती, लेखकाचा दृष्टिकोन इत्यादी अनेक घटक संख्येने कमी-अधिक प्रमाणात पाहावयास मिळतात. अशा तऱ्हेने सारखेपणा जर सर्व वाङ्मयप्रकारांत आढळतो व असे असूनही ते वाङ्मयप्रकार स्वतंत्र समजले जातात तर इतर वाङ्मयप्रकाराशी तुलना करून व्यक्तिचित्रे या लेखनप्रकाराचे अनन्यसाधारणत्व, वाङ्मयाचे वेगळेपण या तुलनेतून काही दिसून आले तर त्याचा उपयोग ‘व्यक्तिचित्र’ या लेखनप्रकाराला स्वतंत्र वाङ्यप्रकाराचा दर्जा मिळविण्यासाठी निश्चित होईल. याखेरीज रूढ असणारे स्वतंत्र वाङ्मयप्रकार आणि व्यक्तिचित्र यांच्यात दर्जात्मकदृष्ट्या काय फरक आहे हे समजून येईल. ललित गद्य या व्यापक कप्प्यात व्यक्तिचित्र हा लेखनप्रकार सध्या समाविष्ट करतात. तेव्हा ललित गद्यांतर्गत अन्य लेखनप्रकारांशी व्यक्तिचित्राच्या होणाऱ्या तुलनेतून व्यक्तिचित्राचे वेगळेपण आणि स्वतंत्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने काही मोठेपण पाहता येईल.

कथा, चरित्र आणि निबंध या तीनही वाङ्मयप्रकाराची व्यक्तिचित्राशी तपशीलवार तुलना करावी लागेल, कारण या तीनही वाङ्मयप्रकारांतून ‘व्यक्तिचित्र’ हा लेखनप्रकार उदयाला आला आहे असे मानणारे लेखक, समीक्षक आहेत.

## व्यक्तिचित्र आणि कथा :

व्यक्तिचित्र आकाराला येण्याचा कालखंड आणि मराठी कथेच्या स्वरूपातील बदलांचा व विस्ताराचा कालखंड हा समांतरपणाने चालत असल्याने या वाङ्मयप्रकाराचा संबंध येणे अपरिहार्य होते. शिवाय कथाप्रांतातील काही लेखकांनी व्यक्तिचित्र लेखनप्रांतात प्रवेश केल्यामुळे हा संबंध अधिक दृढ झाला. एका वाङ्मयप्रकाराची छाप जाणता-अजाणता दुसऱ्यावर पडू लागली आणि या प्रकारात काही भागापुरतीही छाप इतकी गहिऱ्या प्रमाणात पडली की त्यांचा त्या भागापुरता वेगळ्या स्वरूपात अभ्यास करणे कठीण झाले व त्यामुळे लेखक-समीक्षकांत गोंधळ उडाला.

कथेचा व्यक्तिचित्रापर्यंतचा विकास कसा झाला या संबंधी, इंदुमती शेवडे यांनी आपल्या 'मराठी कथा : उगम आणि विकास' या ग्रंथात विवेचन केले आहे. त्यांच्या मते- '१९३० ते १९३५ च्या दरम्यान लघुकथेचे लक्ष्य व्यक्तीकडे अधिक जाऊ लागले. कथेतील कथानकापेक्षा (Plot) पात्रचित्रणावर (Characterization) अधिक भर देण्यात येऊ लागला आणि व्यक्तिचित्रे ही त्याची पुढची पायरी होय. 'दीपमाळ' या कुसुमावती देशपांडे यांच्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेमध्ये वि.स. खांडेकरांनी 'लघुकथेचा एक प्रवाह भावकथेकडे वळला आणि दुसरा प्रवाह शब्दचित्राकडे वळला' असे म्हटले आहे. परंतु यापेक्षा निश्चित विधान कुमार रघुवीरांनी केले आहे. ते म्हणतात, 'शब्दचित्र हा बऱ्याच वेळा लघुकथेचा एक प्रकार असतो.' कुमार रघुवीरांचे हे विधान शब्दचित्राचे जनकत्व बहुतांशी कथेकडे देणारे असले तरी संपूर्णपणे शब्दचित्र हा कथेचा प्रकार मानण्यात ते त्या काळात तयार नसावेत असे दिसते.

व्यक्तिचित्र हा शब्दचित्राचा एक भाग आहे. वा.ल. कुलकर्णी यांच्या मते, 'शब्दचित्रे हे वस्तू-निरूपण असते, त्यात कलात्मक वस्तूदर्शन असते तर लघुकथा ही प्रत्यक्ष वस्तुनिर्मिती असते. तसेच कथेला माल-मसाला शब्दचित्राद्वारे होत असल्याने कथेत शब्दचित्र महत्त्वाचे असते.' कथा आणि व्यक्तिचित्र यांतील साम्य हे आकार आणि आशय या दोन्ही घटकांत दिसते. याला काही कारणे आहेत. यांतील मुख्य कारण म्हणजे प्रकृतीने कथाकार असणाऱ्या लेखकांनी व्यक्तिचित्र लेखनाचा प्रयत्न केला किंवा तसा तो त्यांच्या हातून झाला. या कारणामुळे कथा म्हणून लेखन केले असले तरी व्यक्तिदर्शनातील सूक्ष्मतेकडे अधिक लक्ष दिले गेल्याने ती कथा व्यक्तिचित्रणाच्या वळणावर जाते किंवा या उलट घडणाऱ्या प्रकारात व्यक्तिचित्र म्हणून केलेले लेखन त्यांच्या मूळ लेखनप्रवृत्तीमुळे कथेच्या वळणावर जाते. उदा. कुसुमावती देशपांडे यांच्या 'दमडी', 'जाईबाई' या कथा, शंकरराव खरातांचे 'बारा बलुतेदार' ही उदाहरणे कथा म्हणून झालेले लेखन व्यक्तिचित्राच्या वळणावर कसे जाते याची आहेत. याउलट

व्यक्तिचित्र म्हणून लिहिली गेलेली परंतु कथेच्या वळणावर जाणारी अशीही उदाहरणे भरपूर सापडतात. उदा. मधु मंगेश कर्णिक यांचा 'कोकणी ग वस्ती' हा संग्रह, इंदुमती शेवडे यांच्या 'असा प्रदेश अशी माणसे' या व्यक्तिचित्रसंग्रहातील 'आजोबा चुकले' हे व्यक्तिचित्र किंवा कमलाबाई देशपांडे यांच्या 'हसरा निर्माल्य आणि चिमण्या' मधील 'आई', 'देवकीताई', 'कमासाहेब', 'पारूबाई', 'कृष्णाबाई' ही व्यक्तिचित्रे कथेच्या वळणावर जातात.

दुर्गा भागवतांच्या 'रूपरंग' या व्यक्तिचित्रसंग्रहातही दोलायनमान स्थिती अधिक जाणवते. या संग्रहातील व्यक्तिचित्रे काही वेळा कथेकडे झुकतात तर काही वेळा त्यांची अवस्था धड व्यक्तिचित्र नाही आणि धड कथाही नाही अशी होते. काही वेळा लेखनाचे शीर्षक कथेसारखे असते. पण ते व्यक्तिचित्र असते. उदा. 'मंतरलेले दिवस' या संग्रहातील ग.दि. माडगूळकर लिखित 'वेडा पारिजात', 'लुळा रस्ता' ही व्यक्तिचित्रे. या उलटही परिस्थिती असू शकते. लेखनाचे नाव व्यक्तिचित्रासारखे पण प्रत्यक्षात ती कथा म्हणून लिहिलेली असते. उदा. व्यंकटेश माडगूळकरांची 'सीताराम एकनाथ' ही कथा, ग.दि. माडगूळकर यांच्या 'रामा बॅरिस्टर', 'कृष्णा दौंडकर' या कथा.

कथा आणि व्यक्तिचित्रे हे जवळचे लेखनप्रकार वाटण्याचे आणखी एक कारण म्हणजे काल्पनिक नावाने लिहिलेली व्यक्तिचित्रे. वास्तव जीवनात लेखक अनेक व्यक्ती पाहतो, त्यातील काही लेखकांच्या मनाला स्पर्श करून जातात, त्यांचे चित्त वेधून घेतात, त्याच्या अंत:करणात ठसतात. परंतु सर्वच व्यक्तींचे चित्रण काही ऋणानुबंधामुळे, व्यावहारिक परिस्थितीमुळे किंवा अन्य काही कारणांनी जसेच्या तसे नाव कायम ठेवून करणे शक्य नसते. तसेच काही वेळा लेखक दोन-तीन व्यक्तींमधील निरनिराळ्या विशेषांचे एकत्र चित्रण करून नवे काल्पनिक व्यक्तिचित्र बनवितो. उदा. 'माणदेशी माणसं' मधील व्यंकटेश माडगूळकरकृत-'रघू कारकून', 'शिवा माळी', 'मुलाण्याचा बकस' ही व्यक्तिचित्रे. अशा व्यक्तिचित्रांमुळे कथा-व्यक्तिचित्रं यांची जवळीक वाटते. परंतु ती असतेच असे मात्र नाही. तरी त्याचा विचार चुकीच्या मार्गाने केला जातो. दोन्ही लेखनप्रकारांचे सूक्ष्म अवलोकन न केल्यामुळे हे घडू शकते. हा धोका टाळण्यासाठी लेखक आणि समीक्षक दोघेही जागरूक असावे लागतात. कथा आणि काल्पनिक व्यक्तिचित्रे यांतील भेद त्यांनी समजावून घ्यावा लागतो. या दोन्ही प्रकारांतील सीमारेषा त्यांनी समजावून घ्यावी लागते.

कथा आणि व्यक्तिचित्र यांच्यातील साम्य पुढीलप्रमाणे - कथा आणि व्यक्तिचित्र या दोन्ही लेखनासाठी अनुभूती आवश्यक असते. फक्त कथेतील अनुभूतीला कल्पनेची जोड अधिक मिळते व ती प्रसंगचित्रणाच्या वाटेने अवतरते, कथेत कथानकता असते.

व्यक्तिचित्रात सर्वत्र महत्त्व अनुभूतीलाच असून ती व्यक्तिनिष्ठतेच्या वाटेने अवतरते. कथेतही पात्रे असतात. व्यक्तिचित्रणातही व्यक्तीच प्रधान असते. या दोन्ही लेखनप्रकारांत व्यक्तिदर्शनाबाबत काही सारखेपणा आढळून येतो. व्यक्तीचे चित्रण करताना तिचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यासारखे वाटावे ही अपेक्षा दोन्ही लेखनप्रकारांत असते.

आधुनिक कथेत घटनेचे महत्त्व कमी झाले, घटनांचे चढ-उतार कमी होऊन चरित्र किंवा व्यक्तिप्रधानता वाढली, व्यक्तीच्या मानसिक आंदोलनास महत्त्व आले, त्यामुळे कथा, व्यक्तिचित्रणाच्या अधिक जवळ येऊ लागली. आतापर्यंत व्यक्तिचित्र आणि कथा या लेखनप्रकाराची चर्चा केली. हे पाहता १) कथा आणि व्यक्तिचित्र यांची प्रकृती भिन्न आहे. २) व्यक्तिचित्रातील काल्पनिक व्यक्तिचित्रांच्या प्रकाराच्या उदयाला कथेचा उपयोग काही प्रमाणात झाला असावा, परंतु तरी देखील कथेतूनच व्यक्तिचित्र या लेखनप्रकाराचा उदय झाला किंवा तो सर्वच कथेचा उपप्रकार आहे असे म्हणता येण्यासारखी परिस्थिती नाही. कारण कथेशी तुलना करताना सुप्रसिद्ध व्यक्तीची व्यक्तिचित्रे ही संपूर्णपणे बाजूस पडतात.

**व्यक्तिचित्र आणि कादंबरी, नाटक :**

कथा या प्रमुख वाङ्मयप्रकारानंतर कादंबरी आणि नाटक हे दोन प्रमुख वाङ्मयप्रकारांची तुलना करता, अगदी वरवर जरी पाहिले तरी व्यक्तिचित्र आणि कादंबरी, व्यक्तिचित्र व नाटक यांचा काहीही संबंध दिसत नाही. प्रकृती, स्वरूप, आकार, दर्शन या सर्वच बाबतीत कादंबरी व नाटक हे दोन्हीही वाङ्मयप्रकार व्यक्तिचित्राहून सर्वस्वी भिन्न आहेत. तरी देखील सर्वच वाङ्मयप्रकाराचे कुठे ना कुठे तरी आंतरिक नाते असते. त्याप्रमाणे कादंबरी-व्यक्तिचित्र-नाटक यांच्यातील आंतरिक नात्याचा संबंध याप्रमाणे कादंबरी किंवा नाटक यांचा विषय मानवी जीवन हा असतो. त्यामुळे 'व्यक्ती' हा घटक दोन्ही वाङ्मयप्रकारात महत्त्वाचा असतो. परंतु व्यक्तिचित्राप्रमाणे केवळ 'व्यक्ती' हा घटक कादंबरी-नाटकात संपूर्णपणे महत्त्वाचा मानला जात नाही, कारण त्यात व्यक्तीच्या जोडीला व्यक्तीइतकेच महत्त्व कथानकास असते. कादंबरीत किंवा नाटकात येते ते व्यक्तिचित्रण. कादंबरीतील पात्रउभारणीत पाल्हाळ चालतो. पण नाटकातील पात्र उभारणीस मोजके प्रसंग लागतात. व्यक्तिचित्राप्रमाणे नाटकातील पात्राचे चित्रण हे काही गुणांपुरते मर्यादित असते. व्यक्तिचित्रात महत्त्व विशिष्ट अशा वर्ण्य व्यक्तीला असते तर कादंबरीत व्यक्ती येतात. ज्याप्रमाणे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा व्यक्तिचित्रावर उमटतो तसाच तो कादंबरीवर असतो. मात्र नाटकात लेखकाला स्वत:चे व्यक्तिमत्त्व बऱ्याच वेळा लपवावे लागते. कादंबरी ही बहुरंगी, अनेक परिमाणे लाभलेली असते. तशी अनेक परिमाणे व्यक्तिचित्राला लागलेली नसतात. त्यामुळे कादंबरी ही अनेकांगी संस्कार करते,

व्यक्तिचित्रांप्रमाणे ती एकसंस्कारी नाही. कादंबरीचा आस्वाद, व्यक्तिचित्राप्रमाणे एकट्याला केव्हाही, कुठेही घेता येतो, पण नाटकाचे यश व त्याचा आस्वाद प्रयोगावर अवलंबून आहे. व्यक्तिचित्राचा बांधेसूदपणा कादंबरीत नाही, कारण कादंबरी तंत्रदृष्ट्या विस्तृत वाङ्मयप्रकार आहे. नाटकात अनेक कलांचे मिश्रण असल्याने नाटक हा संमिश्र कलाप्रकार मानतात.

**व्यक्तिचित्र आणि चरित्र :**

व्यक्तिचित्र आणि चरित्र यांच्यातील संबंधाचा विचार करण्यापूर्वी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे चरित्राचे जीवनचरित्र आणि व्यक्तिचित्र असे दोन भाग पडतात. यापैकी जीवनचरित्र हे इतिहासाला जवळचे असते. उलट व्यक्तिचित्र हे ललित वाङ्मयाला अधिक जवळचे असते त्यात व्यक्तीच्या भावजीवनाला स्थान असते. व्यक्तिचित्रात देखील व्यक्तिनिष्ठा महत्त्वाची असते. यामुळे व्यक्तिचित्राचा चरित्राशी संबंध पाहताना जीवनचरित्राचा विचार करण्याचे कारण उरत नाही. म्हणून 'चरित्र म्हणजे व्यक्तिचरित्र' हा दृष्टिकोन ठेवूनच व्यक्तिचित्र-चरित्र तुलना करणे योग्य ठरेल.

व्यक्तिचित्र आणि चरित्र यांत जे काही थोडेफार साम्य आढळते त्याने व्यक्तिचित्र हा चरित्राचाच प्रकार आहे ह्या समजाला पुष्टी मिळत असली तरी चरित्राचे दोन प्रकार दिसतात- (अ) व्यक्तिचित्र (ब) चरित्रचित्र

व्यक्तिचित्रात व्यक्ती ही केंद्रस्थानी असते. एखाद्या व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन स्वतंत्रपणे करून तिचा गुणगौरव यथार्थ रीतीने करणे हा व्यक्तिचित्राचा हेतू असतो. परंतु एखादे व्यक्तिमत्त्व एवढे मोठे असते की, समाजात आपल्या कार्याने प्रसिद्ध व परिचित झालेले असते. उदा. बाबा आमटे, गाडगे महाराज, धोंडो केशव कर्वे, व्ही. शांताराम इत्यादी. एखादा लेखक, कलावंत त्यांच्या कार्याने प्रभावित होतो, त्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा गुणगौरव करावा या दृष्टीने कार्याच्या दोन-तीन प्रसंगांतून व्यक्तिचित्र साकार करण्याचा प्रयत्न करतो. परंतु या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा आवाकाच एवढा मोठा असतो की, त्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र हे चरित्रचित्रणाच्या जवळ जायला लागते, त्यावेळी आपणास ते व्यक्तिचित्र आहे की चरित्रचित्र असे वाटायला लागते. पण लेखकाने ते लेखन व्यक्तिचित्र रेखाटण्याच्या उद्देशानेच केलेले असते. अशा स्वरूपाचे लेखन आपणांस प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीच्या संदर्भात दिसून येते. व्यक्तिचित्र आणि चरित्र यातील साम्यभेद पाहिल्यावर याची आपणांस स्पष्ट कल्पना येईल असे वाटते.

दोन्ही लेखनप्रकारांत एकच व्यक्ती प्रमुख असते. हीच व्यक्ती संपूर्ण लेखनाच्या केंद्रस्थानी असते. विवक्षित व्यक्तीच्या गुणदोषांचे चित्रण चरित्राप्रमाणे व्यक्तिचित्रातही असते. चरित्र आणि व्यक्तिचित्र दोन्हींमध्ये व्यक्तीच्या जीवनातील सत्य नाकारता येत

नाही. चरित्रात वस्तुनिष्ठतेबरोबरच काही कारणाने का होईना आत्मपरता येऊ शकते. चरित्रात ज्याप्रमाणे व्यक्तीची कृती, उक्ती व त्यातून व्यक्त होणारे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व एवढ्याच गोष्टी अभिप्रेत असतात त्याप्रमाणे व्यक्तिचित्रात देखील या गोष्टी अभिप्रेत असतात. संपूर्ण चरित्र हे व्यक्तीचे दर्शन असते. त्यामुळे व्यक्तिचित्रणाचा वेगळा विचार चरित्रात करावा लागत नाही. व्यक्तिचित्रात देखील व्यक्तिचित्र हेच संपूर्ण व्यक्तिमय असल्यामुळे स्वतंत्रपणे 'व्यक्तिचित्रण कसे केले' याचा विचार कथा, कादंबरी, नाटक या वाङ्मयप्रकारात ज्या तऱ्हेने करावा लागतो त्या तऱ्हेने करावा लागत नाही. कथा, कादंबरी, नाटक यामध्ये व्यक्तिचित्रण हा अनेक घटकांपैकी एक घटक असतो. इतकेच नव्हे तर या वाङ्मयप्रकारामध्ये व्यक्ती या साधनरूप असतात, पण चरित्र-व्यक्तिचित्रात व्यक्ती हेच साध्य असल्यामुळे बाकीचे घटक गौण ठरतात. चरित्राप्रमाणे व्यक्तिचित्रात वर्णित व्यक्तीच्या खाजगी जीवनाची माहिती येऊ शकते. ज्याप्रमाणे व्यक्तिचित्राचे हेतू मर्यादित असतात तसेच काही चरित्रे देखील मर्यादित हेतूंनी लिहिली जात असतात. प्रौढ, विद्वज्जड भाषा चरित्राप्रमाणे व्यक्तिचित्रात नसावी तर ती सहज, डौलदार, ओघवती असावी.

व्यक्तिचित्र आणि चरित्र यांच्यात काही भेदही आहे. या दोन्ही लेखनांचा हेतू भिन्न आहे. प्र.न. जोशी म्हणतात, 'जन्मापासून मृत्यूपर्यंतचा तपशील बिनचूकपणे देऊन क्रमवार हकिगती रंगविणे ही चरित्रलेखनाची भूमिका, तर एखाद्या व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन स्वतंत्रपणे करून तिचा गुणगौरव यथार्थ रीतीने करणे हा हेतू व्यक्तिचित्राचा असतो.' यातून चरित्र आणि व्यक्तिचित्र यांच्या हेतूंत फरक आहे. हे स्पष्ट होते. तसेच व्यक्तिचित्र आणि चरित्र यात मुख्य फरक आकाराचा. या दोन्ही प्रकारांच्या तंत्रातदेखील फरक आहे. दोन्ही प्रकारांत व्यक्तीचेच चित्रण असते. तरी चरित्राचा पट मोठा असतो. ज्या व्यक्तीचे चरित्र सांगण्यासाठी तीन-चारशे पाने खर्च होतात, त्याच व्यक्तीचे व्यक्तिचित्र मात्र तीन-चार पानांत रेखाटता येते. याचे कारण म्हणजे चरित्रात संपूर्ण व्यक्तिमत्त्व रंगवावे लागते, पण व्यक्तिचित्रात केवळ व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या काही बाजू दिग्दर्शित केल्या जातात. किंवा एखादा स्वभावविशेष दाखविणे, प्रमुख कार्यावर प्रकाश पाडणे हे कार्य मुख्यत: केले जाते. व्यक्तिचित्र निर्माण करताना मोजक्या शब्दांत सलग, भरीव, जिवंत अशी चालतीबोलती व्यक्ती रंजक पद्धतीने निर्माण करावी लागते. त्यामुळे व्यक्तिचित्रात साधारते पेक्षा जिवंतपणा अधिक असतो, तर चरित्रात जिवंतपणापेक्षा साधारता जास्त असते. चरित्रात तार्किक सत्य प्रतीत व्हावे लागते व त्यास जोडीला पुरावा लागतो. तर व्यक्तिचित्रात तार्किक सत्य प्रतीत व्हावे लागत असले तरी पुरावा सोयीनुसार असतो किंवा नसतो. चरित्रात व्यक्तीची जीवनकथा सर्व बाजूंनी सांगितली जाते व ते आवश्यक असते. परंतु व्यक्तिचित्रात संपूर्ण

व्यक्तिदर्शन आवश्यक नसल्याने, अपेक्षित नसल्याने व्यक्तीच्या आकर्षक अशा विशिष्ट गुणांचा उल्लेख येतो. चरित्रात व्यक्तिचित्र काढता येणे शक्य असते पण व्यक्तिचित्रात संपूर्ण चरित्र येऊ शकत नाही.

व्यक्तिचित्रांर्गत व्यक्ती व चरित्रांतर्गत नायक यांत एक महत्त्वाचा फरक आहे तो असा की चरित्रकाराच्या दृष्टीने चरित्रनायक हा माननीय असतो. व्यक्तिचित्रातील व्यक्ती मात्र व्यक्तिचित्रकारापेक्षा माननीय असतेच असे नाही. कोणत्याही वयाच्या, दर्जाच्या माणसाचे व्यक्तिचित्र लेखक लिहू शकतो. व्यक्तिचित्र आणि चरित्र दोहोंतही घटनाप्रसंग असतात. परंतु चरित्रात घटनांचे संकलन क्रमवार केलेले असते. व्यक्तिचित्रात मात्र मोजक्याच घटना असतात. त्या घटना-प्रसंगाचे व्यक्तिचित्रांतर्गत स्वरूपही अतिसंक्षिप्त असते, त्यात कालक्रम नसतो. कलात्मकतेसंबंधी विचार करता व्यक्तिचित्रात चरित्रापेक्षा अधिक कलात्मकता आढळते. चरित्रात कलात्मकतेपेक्षा खरेपणा महत्त्वाचा असतो तर व्यक्तिचित्रात व्यक्तीचे यथार्थ चित्रण करताना कलात्मकता आवश्यक असते. चरित्रात बुद्धीच्या आणि भावनेच्या मानाने कल्पनेचा वापर कमी होतो. मात्र व्यक्तिचित्रात बुद्धी, भावना, कल्पना या तिन्हीचे मिश्रण होते.

१) साम्यापेक्षाही चरित्र आणि व्यक्तिचित्र यांचे हेतू आणि त्यांचे स्वरूप यांच्यात फरक अधिक आहे. व्यक्तीपर लेख, व्यक्ती आकलन यांसारखे प्रकार सीमेवरील असले तरी ते स्वतंत्रपणे ओळखू येतात.

२) आत्मचरित्र हा चरित्राचा स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालेला प्रकार तर व्यक्तिचित्राहून संपूर्णपणे भिन्न मानावा असा आहे.

३) थोडक्यात, चरित्र म्हणजे व्यक्तिचित्र नसून ऐतिहासिक सत्याच्या आधारे घडविलेले विश्वसनीय व अस्सल व्यक्तिचित्रण असते आणि व्यक्तिचित्र यापेक्षाही वेगळे असते म्हणून 'चरित्राचा उपप्रकार व्यक्तिचित्र' हा दृष्टिकोन स्वीकारून व्यक्तिचित्राचा अभ्यास करता येणे शक्य नाही.

**व्यक्तिचित्र आणि निबंध :**

व्यक्तिचित्रास ज्याप्रमाणे कथा, चरित्र यांचा उपप्रकार मानण्यात येते त्याप्रमाणे निबंधाच्या अनेक प्रकारांपैकी एक प्रकार म्हणजे 'व्यक्तिचित्र' असेही म्हटले जाते. निबंधासंबंधी लिहिताना मात्र निबंधाच्या अभ्यासकांमध्ये व्यक्तिचित्र हा निबंधाचा प्रकार आहे किंवा नाही यामध्ये मतभेद दिसतात. यामध्ये काही वेळा समीक्षकांचा स्वत: केलेल्या विधानाबाबत देखील निश्चित विचाराअभावी गोंधळ उडाला आहे. प्रा. गो.म. कुलकर्णी व प्रा. श्री.र. भिडे म्हणतात, 'प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रे, शब्दचित्रे वगैरे गद्यप्रकार निबंधाच्याच उपशाखा होत.' असे स्पष्ट सांगूनही याच पुस्तकात ते असेही

विधान करतात की, 'टीकालेख, व्यक्तिचित्रे, कला, क्रीडा व नाट्याची रसग्रहणेसुद्धा निबंध म्हणूनच मानली जातात. हे सर्व गद्याचे विविध प्रकार असले तरी निबंधाचे आहेत असे मात्र म्हणता येणार नाही.' या मतप्रदर्शनामागील कोणतीही कारणमीमांसा प्रस्तुत लेखकांनी दिलेली नाही. प्रा.म.वि.फाटक यांनी 'मराठी निबंध' या पुस्तकात 'व्यक्तिचित्र निबंध' असे म्हणून व्यक्तिचित्र हा निबंधाचा प्रकार स्पष्टपणे मानला आहे. प्रा. म.मा. आळतेकर मात्र व्यक्तिचित्राला निबंधाचा प्रकार मानण्यास संपूर्णपणे तयार नाहीत. म्हणून 'मराठी निबंध' या आपल्या पुस्तकात प्रा. आळतेकर 'निबंधाचे निकटचे आप्त' या शीर्षकाखाली व्यक्तिचित्राचा विचार करतात. व्यक्तिचित्राला निबंधाचा प्रकार मानावा किंवा नाही याबाबत आपले विचार व्यक्त करताना ते म्हणतात, 'निबंध ह्या वाङ्मयप्रकाराचा विचार करताना स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या व्यक्तिचित्रादी वाङ्मयप्रकारांना पाहुणे म्हणून चार दोन दिवस घरात घेण्यास हरकत नसली तरी कायम राहू देण्याचे मुळीच कारण नाही.' म्हणजेच श्री. आळतेकर व्यक्तिचित्र हा लेखनप्रकार निबंधाला जवळचा मानत असले तरी त्यांच्या मते व्यक्तिचित्र हा पूर्णपणे स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे.

ज्या प्रमाणे व्यक्तिचित्र-कथा, व्यक्तिचित्र-चरित्र, यांच्यात काही साम्य आढळते त्याप्रमाणे निबंध आणि व्यक्तिचित्र यांच्यात देखील साम्य आढळते. ललित निबंध आणि व्यक्तिचित्र यांच्यात सहजगत्या दिसणारे साम्य म्हणजे दोन्ही लेखनप्रकार आकाराने लहान असतात. निबंध काय किंवा व्यक्तिचित्र काय, दोन्हींमध्ये 'थोडक्यात खूप काही सांगावयाचे असते' ज्याप्रमाणे निबंधाचे माध्यम गद्य असते तसेच व्यक्तिचित्र हा प्रामुख्याने गद्य लेखनप्रकार आहे. निबंध आणि व्यक्तिचित्र दोहोत विषयाच्या अनुरोधाने लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रगट होते ते महत्त्वाचे असते. लेखक जो अनुभव घेतो त्या आधारे तो वाङ्मयनिर्मिती करतो. या आत्मानुभवाचे महत्त्व निबंधात आणि व्यक्तिचित्रात असते. व्यक्तिचित्रात ज्याप्रमाणे निवेदक असतो तसाच तो निबंधात देखील असतो. कलात्मकता दोन्ही लेखनप्रकारात आवश्यक असते. निबंधात विचारांच्या पुष्ट्यर्थ उदाहरणे येतात तर व्यक्तिचित्रात व्यक्तीच्या यथार्थ चित्रणासाठी काही प्रसंगांचे चित्रण केले जाते. निबंधाद्वारे आपले विचार लोकांना पटवायचे असतात. तसे व्यक्तिचित्राद्वारे वर्णित व्यक्ती ही लोकमानसावर बिंबवायची असते. त्यामुळे लोकांच्या मनाला स्पर्श करेल असा जिव्हाळा भाषेत असावा लागतो.

व्यक्तिचित्र आणि निबंध यात साम्याप्रमाणे भेदही अधिक दिसतो. निबंधाची दिशा निवेदक ठरवतो, तर व्यक्तिचित्राची दिशा वर्णन करावयाच्या व्यक्तिप्रमाणे ठरते. किंबहुना व्यक्तीचे वर्णन हीच व्यक्तिचित्राची एकमेव दिशा असते. त्यामुळे निबंधातील निवेदक

हा स्वतंत्र असतो, तर व्यक्तिचित्रातील निवेदकावर संबंधित व्यक्तीचे म्हणजेच मुख्य विषयाचे बंधन असते. असे असल्याकारणाने निबंधात विषयांतर चालू शकते. पण व्यक्तिचित्रात विषयांतर चालू शकत नाही. निबंधात कल्पनेच्या अनुरोधाने लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रकट होत असते. त्याप्रमाणे त्यातील विचारावर निबंधकाराचा खास ठसा असतो. त्यामुळे निबंधात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला जवळजवळ संपूर्ण पट मिळतो. व्यक्तिचित्रात मात्र केवळ त्या व्यक्तीच्या प्रभावानुरोधाने लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रकट होत असते. निबंधात विषयानुरोधाने येणारे भाव व विचार महत्त्वाचे असतात. विचाराचे सलग रूप निबंधात अपेक्षित असते. परंतु व्यक्तिचित्रात मात्र विचारापेक्षा व्यक्तीची कृती आणि उक्ती अधिक महत्त्वाची असते. तसेच व्यक्तीला केंद्र मानून तिचा मनावर होणारा किंवा झालेला प्रभाव महत्त्वाचा असतो. निबंध हा विचार आणि विद्वत्ता इत्यादी दृष्टीने सधन असतो किंवा असावा अशी अपेक्षा असते तर व्यक्तिचित्र हे बोलके असते. निबंधापेक्षा व्यक्तिचित्रात भावात्मकता व हृदयस्पर्शीत्व अधिक असते. निबंध हा लेखकाच्या लेखन सामर्थ्याचे वैभव दाखवितो तर यथार्थचित्रण, सरळपणा, अभिव्यक्तीचा साधेपणा हे व्यक्तिचित्राचे विशेष असतात. निबंधात विषयप्रतिपादन केले जाते तर व्यक्तिचित्रात व्यक्तीचे प्रतिपादन न करता तिचे वास्तवचित्रण केले जाते. त्यामुळे निबंध वणनात्मक, निवेदनात्मक बनतो तर व्यक्तिचित्रात चित्रात्मकता, लालित्य येते.

व्यक्तिचित्र आणि निबंध यांत भेदच अधिक आहेत. त्यामुळे व्यक्तिचित्र आणि निबंध एकमेकापासून दूर जातात. केवळ वरवर दिसणाऱ्या साम्यामुळे न फसता निबंध आणि व्यक्तिचित्र यांचे स्वतंत्र वर्गीकरण होणे आवश्यक आहे.

### ललित गद्य आणि त्याअंतर्गत लेखनप्रकार आणि व्यक्तिचित्र :

व्यक्तिचित्र आणि लघुनिबंध : मराठी वाङ्मयात एक वाङ्मयप्रकार लघुनिबंधाचे अस्तित्व आहे. आनंद यादव यांच्या मते, 'व्यक्तिचित्र' हा लघुनिबंधाला तसा जवळचा प्रकार आहे.

व्यक्तिचित्र आणि लघुनिबंध यांमध्ये साम्य आढळून येण्याची कारणे - १) लघुनिबंधाचा आकार व काही वेळा त्याचे दिसणारे कथासदृश रूप २) काही वेळा लघुनिबंधातून एखाद्या काल्पनिक पात्राचे, मानसपुत्रांचे वर्णन येते. या दोन्ही लेखनप्रकारांत लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रकट होते. तुलनेने त्याचे प्रमाण कमी-अधिक असते इतकेच. त्यामुळे व्यक्तिगत अनुकरणाला महत्त्व येते. लघुनिबंधातील 'मी' हा तर अनुभवाचा शोध घेणारा असतो. परंतु व्यक्तिचित्रात देखील वर्णिल्या व्यक्तीचे लेखकाला प्रतीत होणारे व्यक्तिमत्त्व महत्त्वाचे असते.

व्यक्तिचित्र आणि लघुनिबंध यांत काही साम्य असले तरी दोन्ही लेखनप्रकार एकमेकापासून संपूर्णपणे भिन्न आहेत. कारण दोन्हीचे हेतू भिन्न आहेत. लघुनिबंधात 'मी' चे अनुभव आत्मनिवेदनात्मक पद्धतीने मांडले जातात व त्या अनेक अनुभवांतून एका हलक्या फुलक्या

विचारसूत्राचा शोध घेतला जातो. परंतु व्यक्तिचित्रातील 'मी' हा अनुभवात गुंतून न राहता संबंधित व्यक्तीचा आलेला अनुभव कलात्मक अलिप्ततेने परंतु जिव्हाळा कायम ठेवून चित्रमय पद्धतीने वर्णन करतो. लघुनिबंधात निवेदनाला महत्त्व येते, तर व्यक्तिचित्रात वर्णनाला. लघुनिबंधात, अनेकदा वाचकाला बरोबर घेऊन त्याच्याशी संवाद साधण्याचा लेखकाचा प्रयत्न असतो. लघुनिबंधाचे हे स्वरूप व्यक्तिचित्राहून संपूर्ण भिन्न आहे. केवळ व्यक्ती हाच व्यक्तिचित्राचा विषय असतो. व्यक्तिचित्राची विषयासंबंधी असणारी ही काटेकोर मर्यादा लघुनिबंध कधीच पाळत नाही.

**व्यक्तिचित्र आणि प्रवासवर्णन :**

ललितगद्यातील लघुनिबंधानंतरचा महत्त्वाचा वाङ्मयप्रकार म्हणजे प्रवासवर्णन हा होय. 'प्रवासवर्णन हा काही ललितनिबंध नव्हे' असे प्रवासवर्णनावर संशोधन करणारे प्रा. वर्तक यांचे स्पष्ट मत आहे. प्रा. वसंत सावंत यांनी 'प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार' या आपल्या ग्रंथात प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराचा अभ्यासपूर्ण विचार केला आहे. लघुनिबंध व प्रवासवर्णन याची चर्चा करताना ते म्हणतात, 'लघुनिबंध व प्रवासवर्णन हे दोन्ही वाङ्मयप्रकार व्यक्तिनिष्ठ वाङ्मयप्रकार आहेत. दुसरी गोष्ट दोन्ही वाङ्मयप्रकार कलात्मक व ललित वाङ्मयप्रकार. तिसरी बाब, या वाङ्मयप्रकाराची भाषा ललितपूर्ण असते आणि चौथी बाब, या वाङ्मयप्रकाराचे काही छोटे आकार एकमेकांना जवळ आणू शकतात.' या दोन्ही वाङ्मयप्रकाराबाबतचे साम्य हे वरवर भासणारे साम्य मानावे लागेल. कारण मूलत: हे 'वाङ्मयप्रकार' वाङ्मयप्रकार म्हणून वेगवेगळेच आहेत असेच वसंत सावंतानी म्हटले आहे.

व्यक्तिचित्र आणि प्रवासवर्णन एक नव्हेत हे अगदी सहज ध्यानात येण्यासारखे आहे. संबंधच जोडावयाचा म्हटले तर प्रवासवर्णनात काही व्यक्तींची हुबेहूब वर्णने येणे शक्य असते. परंतु ही व्यक्तिवर्णने साधनरूप असल्याने ती स्वतंत्र व्यक्तिचित्रे होऊ शकणार नाहीत. असे असूनही प्रवासवर्णन व व्यक्तिचित्रे यांत काही साम्य आढळते, ते पुढीलप्रमाणे- प्रवासवर्णन लिहिण्यासाठी प्रवासाची वस्तुनिष्ठ पार्श्वभूमी असणे आवश्यक असते तर व्यक्तिचित्रलेखनासाठी डोळ्यासमोर एखादी व्यक्ती असणे आवश्यक असते. प्रवासवर्णनाप्रमाणेच व्यक्तिचित्रात देखील लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार मूळ विषयवर्णनाच्या कलाकलाने होतो. ज्याप्रमाणे व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रात्मक कथा यांच्यातील सीमारेषा पुसट होते त्याप्रमाणे प्रवासवर्णनही काही वेळा कथेच्या पातळीवर जाऊ शकते, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रवासवर्णन आणि व्यक्तिचित्र हे दोन्ही लेखनप्रकार प्रत्यक्षावर आधारित असतात. काव्यात्मकता, भाषाशैली या दृष्टीने थोडे साम्य आले तरी ते गाभ्याशी जाणारे नसून वरवरचे ठरते.

त्यामुळे या दोन प्रकारांतील भेद स्पष्ट आहे.

व्यक्तिचित्र आणि आठवणी : ललित गद्यातील आणखी एक प्रकार म्हणजे 'आठवणी'. याला हिंदीत 'संस्मरण' असे म्हणतात. वास्तविक आठवणी हा शब्दचित्राचा प्रकार मानावयास हरकत नसावी. ते एकाअर्थी 'कालचित्र' असल्यासारखे भासत असते. या आठवणी निरनिराळ्या विषयांबद्दल असतात. अशा व्यक्तीच्या आठवणी या व्यक्तिचित्राजवळ येतात व या दोन प्रकारांबद्दल संभ्रम उत्पन्न होतो. परंतु व्यक्तिचित्र आणि आठवणी एक नाहीत. कारण आठवणीमध्ये भावात्मकता जास्त असते, त्यामुळे त्यात लेखक अलिप्त राहू शकत नसल्याने आठवणींमध्ये विवरण लांबत जाते. संस्मरण किंवा आठवणी यात अनेकदा प्रसंग, छोटे कथानक यांचा वापर केला जातो. व्यक्तिचित्रलेखनात मात्र कलात्मकता आवश्यक असते. नेमकेपणा आणण्यासाठी पाल्हाळ टाळावा लागतो. कमीत कमी प्रसंग व्यक्तिचित्रात आला तरी त्याचे स्वतंत्र महत्त्व नसते. व्यक्तिचित्र रंगविताना जरी एखाद्या प्रसंगात छोटी कथा अंतर्भूत असली तरी तिला महत्त्व नसते. याखेरीज आठवणीत येणारे व्यक्तीचे वर्णन हे व्यक्तिचित्राचा हेतू बाळगून आलेले असते, असे नाही. आणि जर व्यक्तिवर्णन हा हेतू असेल तर ते संस्मरण किंवा आठवणी राहणार नाही. त्याला व्यक्तिचित्राचे निकष लागू होतील.

**व्यक्तिचित्र आणि मुलाखत :**

'मुलाखत' हा प्रकार मात्र वरील सर्व ललित गद्यांतर्गत प्रकारांपेक्षा व्यक्तिचित्राजवळ जातो. मुलाखतीच्या विषयानुरूप ही जवळीक ठरते हे खरे असले तरी मुलाखतकार हा मुलाखतीतून मुलाखत देणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व रेखाटत असतो. हे रेखाटन मुलाखतीत येणाऱ्या उत्तरांवर अवलंबून असते. अर्थात मुलाखत ज्या वेळी वैयक्तिक गुणदोषांपुरती मर्यादित असते तेव्हाच हे शक्य असते. म्हणूनच मुलाखत जर वैयक्तिक स्वरूपाची असेल तरच ती व्यक्तिचित्रणाचा एक प्रकार ठरू शकते. असे असूनही मुलाखतीत व्यक्तिचित्रातील गोडवा येईलच याची खात्री देता येत नाही. कारण मुलाखतवाला हा बऱ्याच वेळा पहारेदारासारखा मध्ये येत असतो. मुलाखत देणारा-घेणारा यांच्या कौशल्यावर व मोकळेपणावर, भावनाप्रकटीकरणावर मुलाखतीचे यश अवलंबून असते. अन्यथा मुलाखत देणारा-घेणारा, मुलाखतकार-वाचक यांची एकरूपता न होऊ शकल्यामुळे जिव्हाळा उत्पन्न होत नाही. काही मुलाखती केवळ तात्त्विक चर्चेच्या स्वरूपाच्या असू शकतात. अशा वेळी त्यांच्यातून व्यक्तिचित्रण येणे शक्य नसते. त्यामुळे मुलाखत हा प्रकार पूर्णपणे व्यक्तिचित्राजवळ येत नाही.

व्यक्तिचित्राशी अन्य वाङ्मयप्रकाराची तुलना करताना असे दिसते की, जवळजवळ सर्वच वाङ्मयप्रकारात व्यक्ती आहेत. व्यक्तीचे वर्णन आहे. व्यक्तिचित्र हा लेखनप्रकार

तर व्यक्तीच्या वर्णनावर, चित्रणावर, दर्शनावर आधारित आहे. व्यक्तिचित्राखेरीज अन्य वाङ्मयप्रकारातील व्यक्तीच्या वर्णनासाठी 'पात्रचित्रण' हा शब्द प्रामुख्याने वापरला जातो. त्यालाच पर्याय म्हणून स्वभावचित्रण, स्वभावलेखन, व्यक्तिदर्शन इत्यादी शब्द वापरतात. तर हे व्यक्तिचित्रण म्हणजे काय आणि अन्य वाङ्मयातील व्यक्तीचे वर्णन, ज्याला व्यक्तिचित्रण म्हणणे योग्य वाटते, ते व्यक्तिचित्रण व व्यक्तिचित्र यांतील फरक कोणता, संबंध काय याची सविस्तर चर्चा करणे आवश्यक ठरते. यावरून व्यक्तिचित्रणापासून व्यक्तिचित्र भिन्न आहे काय हे देखील कळू शकते.

**व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण :**

व्यक्तिचित्रण हा अनेक वाङ्मयप्रकारांतील एक महत्त्वाचा घटक आहे. तसाच तो ललित वाङ्मयाचा महत्त्वाचा भाग आहे. व्यक्तिचित्रण किंवा व्यक्तिदर्शनाचा अर्थ देताना असे म्हटले गेले आहे की, व्यक्तिदर्शन म्हणजे - 'शब्दांनी उभे केलेले विशिष्ट व्यक्तीचे चित्र'. व्यक्तिदर्शनाचा हा अर्थ सकृतदर्शनी योग्य वाटत असला तरी तो व्यक्तिचित्राचे वरवरचे स्वरूप सांगतो, त्यामागील हेतू किंवा वाङ्मयातील त्याचे महत्त्व यांविषयी विचार हा अर्थ सांगत नाही. व्यक्तिचित्राखेरीज अन्य वाङ्मयप्रकारांत येणारे व्यक्तीचे वर्णन किंवा दर्शन हे व्यक्तिचित्र नसून व्यक्तिचित्रण असते. व्यक्तिचित्रातील हेतूपूर्वक केलेले व्यक्तीचे वर्णन आणि अन्य वाङ्मयप्रकारांतील दुय्यम स्थानी येणारे व्यक्तिचित्रण यांच्यातील फरक समजण्यासाठी व्यक्तिचित्र व व्यक्तिचित्रण हे दोन भिन्न शब्द संदर्भानुसार भिन्न भिन्न अर्थाने वापरणे अत्यंत जरुरीचे आहे.

व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांच्यात गल्लत केली जाण्याची शक्यता असते. कारण त्यात काही साम्य भासते. व्यक्तिरेखा काढताना वर्णन करावयाच्या व्यक्तीची मनोरचना, भाषा, शरीराची हालचाल यांचा उपयोग होतो. व्यक्तिचित्र रेखाटतानादेखील या बाबी येतात. व्यक्तिचित्रण आणि व्यक्तिचित्र दोन्हींतही व्यक्तिरेखाटन करताना व्यक्तीच्या कृती-उक्तीला महत्त्व येते. यांमधून व्यक्तीचे प्रत्यक्ष दर्शन घडावे ही अपेक्षा व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यात असते. व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यामध्ये साम्य हे आहे की, व्यक्तीच्या बाह्यांगाची ओळख करून दिल्यानंतर लेखक त्यांच्या अंतरंगाकडे वळतो. दोन्हीतही संबंधित व्यक्तीचे गुणदोष वर्णिलेले असतात. तसेच परिणामकारकतेसाठी दोन्हींतही पाल्हाळ चालत नाही.

व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांच्यात साम्यापेक्षा भेदच अधिक दिसतो. सर्वसाधारण विचार केला तरी असे दिसून येते की, व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांचे स्वरूप भिन्न आहे. व्यक्तिचित्रण हे वाङ्मयात साधनरूपाने अवतरते तर व्यक्तिचित्र हे स्वतंत्रपणे साध्यरूपाने अवतरते. व्यक्तिचित्र हा वेगळा लेखनप्रकार आहे. तर व्यक्तिचित्रण अनेक

वाङ्मयप्रकारांतर्गत आढळून येणारा एक घटक आहे. व्यक्तिचित्राप्रमाणे व्यक्तिचित्रणाला स्वतंत्र अस्तित्व नाही. व्यक्तिचित्रण हे वाङ्मयातंर्गत घटक असल्याने ती खऱ्या अर्थाने नवनिर्मिती नसते. इतकेच नव्हे, तर ह्या बऱ्याच व्यक्ती नसून व्यक्तीचे काल्पनिक नमुने असतात. व्यक्तिचित्रात नवनिर्मिती होऊ शकते. अर्थात प्रत्यक्ष व्यक्तिचित्र हा नवनिर्मितीचा नमुना असेलच असे नाही. कारण या ठिकाणी निर्मितीसाठी व्यक्तीचा आधार घ्यावा लागतो. व्यक्तिचित्र काढताना अलिप्तपणे केलेले रेखाटन व्यक्तिचित्राची परिणामकारकता वाढविते.

व्यक्तिचित्रण हे संपूर्ण कलाकृतीचा एक भाग असल्याने, व्यक्तिचित्रणात, प्रमुख व्यक्तीखेरीज इतरही व्यक्तिरेखा असतात. मनोरंजनासाठी व्यक्तिचित्रण आवश्यक ठरते, तसेच कथानक पुढे सरकण्यासाठी किंवा लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोनाचे साधन म्हणूनही व्यक्तिचित्रण केले जाते. व्यक्तिचित्र मात्र 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्र' या एकाच नेमक्या मर्यादित हेतूसाठी अवतरते. व्यक्तिचित्रण करताना लेखक आपल्या मनाशी काही कल्पना निश्चित करतो आणि त्यानुसार व्यक्तिचित्रण करतो. यामुळे व्यक्तिचित्रण केलेल्या व्यक्तीवर लेखनाच्या मनोवृत्तीची बंधने पडतात. व्यक्तिचित्रात मात्र हा प्रकार घडत नाही. किमान निर्दोष व्यक्तिचित्रात असे घडू नये ही अपेक्षा असते. व्यक्तिचित्रणातील व्यक्तीचे विचार लेखक बदलू शकतो, त्यावर स्वतःच्या मताची जबरदस्ती करू शकतो पण व्यक्तिचित्रातील व्यक्ती लेखकाला जशी भावली तशी ती तो गुणदोषांसह रेखाटत असतो.

व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण या दोन संकल्पना व त्याचे स्वरूप असे भिन्न आहे. त्यातील सारखेपणा हा दोन्हीही संकल्पना एकमेकांत मिसळून टाकाव्यात इतका मूलगामी आणि व्यापक स्वरूपाचा नाही. त्यामुळे व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांतील फरक, संदर्भ नीट ध्यानात घेऊनच त्या शब्दाचा वापर करावा. 'व्यक्तिचित्रांना व्यक्तिचित्रणे' किंवा 'व्यक्तिचित्रणाला व्यक्तिचित्र' म्हणू नये.

**व्यक्तिचित्र - एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार :**

अन्य प्रचलित वाङ्मयप्रकार किंवा ललित गद्यांतर्गत लेखनप्रकारांपेक्षा व्यक्तिचित्र हा वेगळा लेखनप्रकार आहे. परंतु त्याला स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानले जात नाही. व्यक्तिचित्राला स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानता येईल का? हा मुख्य विषय आहे. त्या दृष्टीने एखाद्या लेखनप्रकाराला स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून कोणत्या निकषांवर मान्यता दिली जाते, यासंबंधी विचार करणे महत्त्वाचे ठरते. अर्थात एखाद्या लेखनप्रकाराला स्वतंत्र वाङ्मयप्रकार ठरविण्याचे निश्चित असे निकष किंवा नियम प्रचारात नाहीत, परंतु जे प्रचलित वाङ्मयप्रकार आहेत त्यांच्यावरून सर्वसाधारणपणे स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून अस्तित्व

मिळण्यासाठी जे साधारण निकष आढळतात त्यांच्या आधारे व्यक्तिचित्रासंबंधी विचार करता येईल.

कोणत्याही वाङ्मयप्रकारातील कलाकृतीचा विचार करताना तिचे दोन भाग डोळ्यासमोर येतात. एक - त्या कलाकृतीद्वारा लेखक व्यक्त करीत असलेली त्याची अनुभूती आणि त्या अनुभूतीची प्रकट होताना होणारी अभिव्यक्ती. लेखक जीवनात निरनिराळे अनुभव घेत असतो व या अनुभवांचे प्रकटीकरण आपल्या साहित्यात करीत असतो. काही अनुभव हे नाटकासाठी योग्य ठरतात तर काही काव्यातून प्रभावी ठरतात. काही अनुभवांचे कथेद्वारे योग्य प्रकटीकरण होते तर काहींच्या दृष्टीने कादंबरी हे माध्यम योग्य ठरते. म्हणजेच सर्व अनुभव एकाच मानवी जीवनातील असले तरी अनुभवाचे प्रकार वेगळे असतात. अभिव्यक्ती निरनिराळ्या प्रकारे होते. कारण वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारातून अभिव्यक्त होत असताना एकाच मानवी जीवनातील अनुभूतीचे वेगवेगळे पैलू पडत असतात. म्हणजेच प्रत्येक वाङ्मयप्रकारातील अनूभूतीचे वेगवेगळे स्तर असतात. प्रत्येक वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने त्यातीत अनुभूती भिन्न असते. किंबहुना नवा वाङ्मयप्रकार म्हणजे नवीन अनुभूती असते. या नव्या अनुभूतीची अभिव्यक्तीसुद्धा नव्या वाङ्मयप्रकारातून होत असते. नव्या वाङ्मयप्रकाराची अनुभूती वेगळी असून भागत नाही, तर ज्या वाङ्मयप्रकाराचे माध्यम त्या अनुभूतीचे निवडले असेल ती माध्यमाची निवड अपरिहार्यपणे केलेली असावी लागते. म्हणजेच जो अनुभव नव्या वाङ्मयाप्रकारातून व्यक्त झालेला असेल तो अन्य प्रचलित वाङ्मयप्रकारातूनही व्यक्त होऊ शकणारा नसावा. अन्य प्रचलित वाङमयप्रकार प्रस्तुतचा अनुभव व्यक्त करण्यात पूर्णपणे असमर्थ ठरत असावेत. अशा प्रकारे अनूभूती व अभिव्यक्ती ही नवीन, एकरूप होणारी आणि अपरिहार्यपणे माध्यम निवडलेली असेल तर तो स्वतंत्र वाङ्मयप्रकार ठरू शकतो.

अशाप्रकारे नव्या वाङ्मयप्रकारातील अनुभूती व अभिव्यक्ती यांत नवीनता असावी लागतेच शिवाय या वाङ्मयप्रकारातून संबंधित अनुभूतीचा येणार प्रत्यय सुद्धा अर्थपूर्ण, नवा ठरावा लागतो. या वाङ्मयप्रकारापासून होणारा आनंद स्वतंत्र, नवा तसेच अन्य वाङ्मयप्रकारांपासून न मिळू शकणारा असावा. म्हणजे प्रयोजन, प्रकटीकरण व परिणाम यांबाबत नव्या वाङ्मयप्रकाराची कलाकृती ही सर्वस्वी वेगळी नवीन असावी. अनुभूती, अभिव्यक्ती, माध्यम यांखेरीज नव्या वाङ्मयप्रकाराचा निकष हे त्याच्या सर्वसाधारण स्वरूपाशी निगडित आहेत. त्यांतील एक निकष म्हणजे वाङ्मयप्रकाराचा हेतू. ललित वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने विचार करता त्यातील प्रत्येक नव्या वाङ्मयप्रकाराचा हेतू वाङ्मयीन असला पाहिजे. कोणत्याही वाङ्मयप्रकारात कलाकृतीचा बांधेसूदपणा, रूपबंध महत्त्वाचा ठरतो. नवीन वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने हा आवश्यक व महत्त्वाचा विशेष

ठरतो. कोणताही नवा वाङ्मयप्रकार हा ललित वाङ्मयाचा एक भाग असल्याने त्यात लालित्य हवेच. लालित्याखेरीज वाङ्मयकृती ही निरस, रुक्ष बनेल. या आवश्यक असणाऱ्या लालित्यासाठी वाङ्मयप्रकार जितका लवचिक असेल तितके अधिक चांगले. जर वाङ्मयप्रकार लवचिक नसेल तर तो एकसुरी, कंटाळवाणा होण्याची शक्यता जशी वाढते तशीच त्याच्या विकासाच्या मार्गात देखील अडचणी येण्याची शक्यता वाढते आणि जर विकास झाला नाही तर स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून त्या लेखनप्रकाराला मान्यता मिळणे कठीण होणार हे उघड आहे.

नवीन वाङ्मयप्रकाराचा विचार करताना त्याचा स्वतंत्र विकास झाला आहे की नाही हे पाहावे लागते. परंतु केवळ स्वतंत्र विकास झाला म्हणूनही एखादा लेखनप्रकार स्वतंत्र वाङ्मयप्रकार ठरू शकत नाही. कारण संख्यात्मक वाढ ही गुणात्मक असतेच असे नाही. ज्यावेळी स्वतंत्र विकासासोबत संबंधित वाङ्मयप्रकारात 'दर्जेदार निर्मिती' होईल त्याच वेळेस त्या वाढीला काही महत्त्व येईल. अर्थात असे म्हणता येणार नाही की सर्वच किंवा बहुसंख्य लेखन हे दर्जेदार असावे. पण स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून मान्यता मिळण्यासाठी थोड्या प्रमाणात का होईना पण दर्जेदार निर्मिती आवश्यक आहे. कारण ही थोडी दर्जेदार निर्मितीच त्या वाङ्मयप्रकाराचे भविष्य घडवित असते. अर्थात हे निकषही वाङ्मयप्रकाराची अंतिम कसोटी नाही. परंतु सर्वसाधारण निरीक्षणांच्या आधारे वरील निकष सांगितले आहेत.

व्यक्तिचित्रामध्ये, व्यक्तिचित्रातली 'व्यक्ती साक्षात उभी करणे', 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्रे', 'साध्यरूप लेखन' हे हेतू अन्य माध्यमांद्वारे किंवा अन्य वाङ्मयप्रकारांतून सिद्ध होऊ शकत नाहीत. व्यक्तिचित्राचा येणारा प्रत्यय, त्यापासून होणारा आनंद हा अन्य वाङ्मयप्रकारांहून निश्चितच वेगळा, स्वतंत्र आहे. अन्य वाङ्मयप्रकारांत साधनरूपाने वावरणारी व्यक्ती येथे साध्यरूपाने अवतरल्याने ते शक्य होते. लालित्य, लवचिकता या दोन्ही बाबतींत 'व्यक्तिचित्र' स्वतंत्र वाङ्मयप्रकाराच्या कसोटीवर उतरू शकते. व्यक्तिचित्राच्या बांधेसूदपणाबद्दल तर प्रश्नच येऊ नये, कारण अन्य कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा विशिष्ट रचनेची किंवा विशिष्ट घटकांची अपरिहार्यता यांचे महत्त्व व्यक्तिचित्रात विशेषत्वे असते. तसेच विशिष्ट आकारबद्धता हा त्याचा एक पैलू असल्यामुळे व्यक्तिचित्राचे स्वरूप हे अनेकदा बांधेसूद असते. तसेच त्यांच्या घटकांची आंतररचना देखील बांधेसूद असते.

कोणत्याही वाङ्मयप्रकारातील दर्जेदार लेखनाचा विचार केला तर ते संख्येने कमीच असते. व्यक्तिचित्राचा जन्म व त्याची वाढ तर सुमारे गेल्या साठ-सत्तर वर्षांतील. त्यातून हा लेखनप्रकार काहीसा दुर्लक्षित. हे ध्यानात घेतल्यास अन्य वाङ्मयप्रकारांच्या

तुलनेने दर्जेदार व्यक्तिचित्रांची संख्या काही कमी नाही. उपलब्ध दर्जेदार लेखन या लेखनप्रकाराची गुणवत्ता निश्चितपणे वाढविणारे आहे. हे दाखविणारे काही श्रेष्ठ व्यक्तिचित्रकार आपणांस पुढीलप्रमाणे सांगता येतील - वि. द. घाटे, प्र.के. अत्रे, व्यंकटेश माडगूळकर, विद्याधर पुंडलिक, पु.ल. देशपांडे, रवींद्र पिंगे, शिवाजी सावंत, ग.दि. माडगूळकर, शिरीष पै, विजया राज्याध्यक्ष, आनंद यादव, जयवंत दळवी, प्रभाकर पाध्ये, रा.भि. जोशी, गंगाधर गाडगीळ, वि.भा. देशपांडे, विजय तेंडुलकर, यू.म.पठाण या व इतर काही लेखकांनी निश्चितच दर्जेदार व्यक्तिचित्रलेखन केले आहे. त्यामुळे स्वतंत्र वाङ्मयप्रकार या दृष्टीने किंवा व्यक्तिचित्राचा स्वतंत्र विकास व्हावा या दृष्टीने नवीन लेखकांचे किंवा समीक्षकांचे लक्ष व्यक्तिचित्राकडे आकर्षित होण्यास मदत झाली आहे.

एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार या दृष्टीने जे प्रचलित निकष, तत्त्वे सर्वसाधारणपणे उपलब्ध आहेत त्या आधारे विचार करता, कोणत्याही बाबतीत एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून मान्यता देण्यासाठी 'व्यक्तिचित्रा'मध्ये काहीही कमतरता दिसून येत नाही. त्यामुळे एकंदर विचार करता 'व्यक्तिचित्र' हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार ठरू शकतो किंवा स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून मानण्यात यावा असे म्हणावेसे वाटते.

***

## प्रकरण दुसरे

# व्यक्तिचित्रे - प्रेरणा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये

**प्रास्ताविक :**

'व्यक्तिचित्र - एक वाङ्मयप्रकार' याविषयी विचार करताना मागील प्रकरणामध्ये वाङ्मयप्रकार का निर्माण होतात, विकासाच्या अवस्थेतील लेखनप्रकार व्यक्तिचित्रे, व्यक्तिचित्राला वापरण्यात आलेले पर्यायी शब्द, शब्दवापरातील गोंधळ, प्रचलित शब्द आणि त्यांच्या अर्थच्छटा, व्यक्तिचित्र आणि इतर वाङ्मयप्रकार यांचा संबंध आणि तुलना इत्यादींचा विचार केला आणि 'व्यक्तिचित्र' हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार कसा ठरू शकतो याचे विश्लेषण केले. या प्रकरणामध्ये आपण व्यक्तिचित्राचे प्रेरणा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये याचा तात्त्विक विचार करणार आहोत.

'व्यक्तिचित्र' हा ललित गद्याचा एक उपप्रकार आहे. व्यक्तिचित्रातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व साकार होते. मराठी साहित्यात निसर्गसाहित्य आणि प्राणिसाहित्य सोडून बाकी सर्व साहित्यात 'माणूस' हा केंद्रस्थानी असतो, मग तो कुठलाही वाङ्मयप्रकार असो. व्यक्तिचित्राचा हेतू व्यक्तीला साकार करणे हा असल्याने कमीत कमी शब्दांत प्रसंग, आठवणी व व्यक्तीचे कार्य यातून हे केले जाते. त्यामुळे माणूस समजण्यास व्यक्तिचित्र वाङ्मययाचा उपयोग होतो. कधी ज्ञात तर कधी अज्ञात व्यक्तीला समजून घेण्यासाठी त्याच्या मनोभूमिकेला, वृत्तीप्रवृत्तीला, स्वभावाला तसेच त्याचे माणूसपण, देवपण, संतत्व इत्यादी. गुणवैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी व्यक्तिचित्राची निर्मिती झाली. एकूणच माणूस समजून घेण्यास व्यक्तिचित्राचा उपयोग होतो. व्यक्तीचे व्यक्तित्व म्हणजे संचित अनुभव. व्यक्तीचे आनुवांशिक गुण व आजूबाजूच्या समाजातील अनुभवाचे जे संस्कार होतात त्यांनी तिचे व्यक्तित्व तयार होते. ती व्यक्ती तिचे रंगरूप, जीवनप्रवास, वर्तनविशेष, स्वभाववैशिष्ट्ये, मानसिक जडणघडण, कार्यकर्तृत्व यांच्यासह व्यक्तिचित्रातून साकार होते. व्यक्तिस्वभावविषयी ज्येष्ठ लेखिका दुर्गा भागवत लिहितात, 'सामान्यत: व्यक्तिस्वभाव फारसा न्यारा नसतोच. न्यारे असते व्यक्तिमात्राचे अनुभवविश्व, अनुभवांच्या क्रिया, प्रक्रिया व प्रतिक्रियांनी व्यक्तिजीवन सकस किंवा निकस बनते. त्यांना रूपरंग

प्राप्त होते.' माणूस कधीही एकटा नसतो. त्याच्या आजूबाजूची असंख्य माणसे त्याला सतत भेटत असतात. त्यातली काही नात्यातली असतात. काही मित्र म्हणून जवळ आलेली असतात. काही शेजारी म्हणून लाभलेली असतात. कधी कोणी प्रवासात भेटते. काहींची ओळख नोकरी-व्यवसायातील असते. गल्लीतला, गावातला, देशातला, परदेशातला असेही काही जवळ येतात. काहीचे फक्त दुरून आकर्षण असते. काहींशी मनाच्या तारा जुळतात. काहींसा दुरावा निर्माण होतो. कधी पहिल्या भेटीत आवडलेली माणसे दुसऱ्या भेटीत निराळीच वाटतात. काही आपल्या कलेतून, सुरातून, ग्रंथातून, गीतातून, नाट्यातून किंवा व्यक्तिमत्त्वाच्या एखाद्या देखण्या पैलूतून इतरांना आकर्षित करतात. अशी ही माणसे अनेकांना भेटतात पण त्यांना शब्दांतून जिवंत करण्याचे काम एखादाच लेखक करीत असतो. एखादा चित्रकार जसा रेषांच्या साहाय्याने माणसाचे हुबेहूब चित्र निर्माण करतो, तसा लेखक शब्दांच्या साहाय्याने व्यक्तीचे व्यक्तिचित्र साकारतो. येथे रेषांच्या जागा शब्द घेतात आणि माणसांची जाणवलेली वैशिष्ट्ये शब्दांकित होतात.

एखाद्या व्यक्तीचे बाह्यस्वरूप आणि तिचे अंतरंग म्हणजेच स्वभाव, सवयी, लकबी, आचार-विचार, भावना, कृती, जगणे, जीवनपट, जीवनाची समज आणि दृष्टिकोन, अनुभवविश्व, सुखदुःखे, मानसिकता, सामाजिक स्थान, जीवनातील यश-अपयश, चढ-उतार, कार्यकर्तृत्व, नातेसंबंध, सांस्कृतिक पर्यावरण या सर्वांचा आलेख म्हणजे व्यक्तिचित्र होय. व्यक्तिचित्राचा लेखक निवेदक असतो तर वर्णन केलेली व्यक्ती केंद्रस्थानी असते. व्यक्तिचित्र लिहिताना लेखकाजवळ जिव्हाळा, अलिप्तपणा आणि प्रांजळपणा हे गुण असावे लागतात. ज्याचे चित्र रेखाटायचे त्याच्याबद्दल जिव्हाळा हवाच, त्याशिवाय त्या व्यक्तीबद्दल उत्सुकता वाटणार नाही. उत्सुकता असल्याशिवाय लिहिता येणार नाही. तसेच ज्या व्यक्तीचे चित्र रेखाटायचे त्याच्याकडे थोडे लांबून पाहता आले पाहिजे. त्यासाठी अलिप्तता आवश्यक आहे. तसे नसेल तर त्या व्यक्तीच्या स्वभावाचे, कर्तृत्वाचे खरे दर्शन होणार नाही. केवळ कौतुकाचे, गौरवाचे रंगच त्यात भरले जातील. अलिप्तपणातून प्रांजळपणा येतो. आपल्याला आदर असणाऱ्या व्यक्तीचे एक माणूस म्हणून, तिच्या अंगी असणाऱ्या गुणांबरोबरच तिच्या उणीवांचेही दर्शन या प्रांजळपणातून घडू शकते. तसे दर्शन वाचकांना घडले तरच ते व्यक्तिचित्र वास्तव ठरू शकते.

**व्यक्तिचित्र लेखनाच्या प्रेरणा :**

आधुनिक मराठीतील व्यक्तिचित्रे या वाङ्मयप्रकाराची वाटचाल प्रत्यक्ष पाहण्यापूर्वी व्यक्तिचित्राच्या वाङ्मयीन निर्मितीमागील प्रमुख प्रेरणांचा विचार करणे आवश्यक वाटते. एकंदर मराठीतील या वाङ्मयप्रकाराची वाटचाल पाहिल्यास अनेक ठळक गोष्टी

नजरेत भरतात. त्यांपैकी पहिली अशी की, व्यक्तिचित्रे हा वाङ्मयप्रकार या आधुनिक कालखंडात एक वाङ्मयप्रकार म्हणून वाढीला लागला आहे, असे स्पष्ट दिसते. व्यक्तिचित्रे लेखनाची दृष्टी ही आधुनिक दृष्टी आहे. इ.स. १९४० ते १९९० या कालखंडात व्यक्तिचित्रे वाङ्मयप्रकाराची झपाट्याने वाढ होत गेली आहे. आधुनिक मराठीचाच व्यक्तिचित्रे हा एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार आहे. आणि त्यातील व्यक्तिचित्रे संख्येच्या दृष्टीने काही कमी नाहीत. गुणाच्या दृष्टीनेही मोलाची आहेत. आधुनिक मराठीत व्यक्तिचित्रे या वाङ्मयप्रकाराची झपाट्याने वाढ होण्याचे प्रमुख कारण म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावाद होय. पाश्चात्य संस्कृतीत माणूस म्हणून स्वातंत्र्यमूल्य प्राप्त झाल्यामुळे व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. व्यक्तीला केंद्र करून वाङ्मयनिर्मिती झाली.

मराठीत लिहिलेल्या व्यक्तिचित्राचा अभ्यास केला असता वेगवेगळ्या प्रेरणा निदर्शनास येतात. आधुनिक कालखंडात पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाने जी नवी मूल्य भारतीय जीवनात आली त्यात व्यक्तिस्वातंत्र्य हे एक प्रभावी मूल्य होते. माणूस म्हणून व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व आहे आणि जगण्याचा हक्क आहे. हा विचार प्रभावी ठरल्यामुळे माणसाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि व्यक्तीला केंद्र ठेवून साहित्याची निर्मिती होऊ लागली. प्रेरणा म्हणजे कोणतीही कृती करण्यासाठी प्रवृत्त करणारी प्रेरक शक्ती. मग ती एखादी व्यक्ती, विचार, घटना, भावना, परिस्थिती असेल. लेखन ही वाङ्मयीन कृती असते. लेखक लिहिण्यासाठी का प्रवृत्त होतो या कारणांचा शोध घेणे म्हणजे प्रेरणांचा शोध घेणे होय. व्यक्तिचित्र लिहिण्यासाठी लेखकाच्या प्रेरणा काय आहेत याचा शोध घेतला पाहिजे.

**वर्ण्य व्यक्तीचा प्रभाव :**

एखादा लेखक व्यक्तिचित्र रेखाटन करीत असतो तेव्हा तो ते रेखाटन करीत असताना त्याच्या मनामध्ये त्या व्यक्तीचे एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तित्व साकार झालेले असते. त्या व्यक्तीच्या जीवनातील, इतरांवर प्रभाव पाडणारे असे काही वेगळेपण जाणवत असते. त्याने तो भारावून जातो आणि त्याच्या लेखणीतून ती व्यक्ती साकार होते. ती व्यक्ती इतरांनाही प्रभावित करते. अशी अनेक व्यक्तिचित्रे मराठीत साकार झालेली आहेत. उदा. पु.ल. देशपांडे यांनी रेखाटलेले 'नारायण' हे व्यक्तिचित्र अशाच स्वरूपाचे आहे. 'नारायण' ही लग्नातील अतिमहत्त्वाची पण दुर्लक्षित अशी व्यक्ती, विनोदी शैलीने पु.ल. देशपांडे यांनी प्रभावीपणे रेखाटली आहे. पु.ल. लिहितात, 'नारायण' हा सार्वजनिक नमुना आहे. हा नमुना प्रत्येक कुटुंबात असतो. कुठल्याही मंगल कार्यात ''नारायण नावाचा स्वयंसेवक, प्रत्येकाशी कुठले ना कुठले तरी नाते सांगणारा नातलग असतो. घरात कार्य निघाले की वेळेवर टपकतो.' हा नारायण म्हणजे स्वयंसेवकगिरी करणाऱ्याचे

प्रातिनिधिक चित्रण आहे. मुलगी पाहण्याच्या कार्यक्रमापासून ते लग्न लागेपर्यंत नारायणला महत्त्व असते. या सर्व 'नारायण' लोकांचा एक विशिष्ट पोशाख असतो. तेवढ्या लोकांमध्ये 'हाच तो नारायण..!' म्हणून ठळकपणे ओळखता येतो. एखाद्याच्या अंगात खून चढतो तसे नारायणाच्या अंगात लग्न चढते. नारायण हा खाकी शर्ट, धोतर, ब्राऊन टोपी घातलेली चालती-बोलती जंत्री आहे. लग्नाच्या दिवशी त्याला अतिशय महत्त्व असते. नारायण त्यादिवशी डोके गमावलेल्या मुरारबाजीसारखा मांडवात थैमान घालीत असतो. प्रत्येकजण नारायणाचा सल्ला घेत असतो. अशा नारायणाचा शेवट लेखकाने अतिशय मार्मिक केला आहे. त्यातून 'नारायण' हे व्यक्तिचित्र आणखी गडद होते.

व्ही.शांताराम यांचे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिचित्र धनंजय तथा वसंत शांताराम देसाई यांनी रेखाटले आहे. अभिनयाची जाण व आवड, अखंड प्रयत्नशीलता, नवीन ते आत्मसात करण्याची वृत्ती, कामात झोकून देणारे मन यामुळे शांताराम यांना मिळालेली लोकप्रियता या साऱ्यांचे संयमित चित्रण लेखकाने केले आहे. शांतारामबापू शिस्तप्रिय, विनयी, उद्योगी, आतिथ्यशील आहेत. प्रभात म्हणजे उद्योग हे व्ही. शांतारामाचे सूत्र लेखक दाखवितो. खंबीर मनाने निर्णय घेण्याची वृत्ती हा त्यांचा मुख्य गुण असल्याने लेखकाने त्याचे "A man of quick judgement and strong comon sense' असे यथार्थ वर्णन केले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे, मिळालेल्या यशापेक्षा पुढील जबाबदारीची जाणीव अधिक असणे हे लेखक आवर्जून सांगतो. एका यशस्वी जीवनाचा मूलगामी शोध घेण्याचा प्रयत्न धनंजय यांनी या व्यक्तिचित्रातून केला आहे. त्यामुळे हे व्यक्तिचित्र प्रभावी आणि वैशिष्ट्यपूर्ण झाले आहे.

अशा प्रकारची अनेक व्यक्तिचित्रे मराठीतील अनेक मान्यवर लेखकांनी लिहिली आहेत. वर्ण्य व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या गुणवैशिष्ट्यांनी लेखक प्रभावी होतो. त्या प्रभावातून लेखक व्यक्तिचित्र साकार करतो.

**वर्ण्य व्यक्तीबद्दल सांगण्याची उर्मी :**

लेखक हा एक कलावंत असतो. तो कलावंताच्या नजरेतून समाजाकडे पाहात असतो. तो जे काही पाहतो ते समाजासमोर ठेवण्याचा तो प्रयत्न करीत असतो. तो ज्या व्यक्तीच्या सहवासात आला किंवा ज्या व्यक्ती त्याने पाहिल्या, त्यांच्यामध्ये लेखकाला जे अलौकिक गुण किंवा कर्तृत्व किंवा त्या व्यक्तीची वागण्याची-जगण्याची पद्धती, शैली त्याला जाणवली आणि ती समाजासमोर ठेवावी या उर्मीतून व्यक्तिचित्रे लिहिली गेली आहेत. ती व्यक्तिचित्रे समाजासमोर आल्यास समाज त्यापासून प्रेरणा घेऊ शकेल या हेतूने ही व्यक्तिचित्रे लिहिली गेली असावीत. उदा. : 'काही म्हातारे व एक म्हातारी' या व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये वि.द.घाटे नी रेखाटलेले 'एक प्रार्थनासमाजिष्ट' हे व्यक्तिचित्र

अशाच प्रकारचे आहे. एक अदम्य आशावाद घेऊन जगण्याऱ्या ऐंशी वर्षाच्या म्हाताऱ्याचे चित्रण लेखक करतो. वरवर पाहता कुणाचेही लक्ष वेधून न घेणारा पण आपल्या समाजकार्यात खंड पडू न देणारा, नियमित प्रार्थना करणारा आणि करायला सांगणारा हा माणूस. या व्यक्तीची खोली पाहून लेखक लिहितो, 'माझ्या डोळ्यासमोरून त्या घाणेरड्या खोलीतला तो घाणेरडा म्हातारा नाहीसा झाला. हिमालय ओलांडून येणाऱ्या पहिल्या आर्याचे सूर्याचे मंत्रोच्चारपूर्वक आवाहन मला ऐकू येऊ लागले. नैमिषारण्यात गायिलेला सामवेद माझ्या कानी पडला.' यातून जीवन जगण्याचे एक वेगळेपण त्या म्हाताऱ्याच्या व्यक्तिमत्त्वातून लेखकाने साकार केले आहे.

गेल्या शतकात या महाराष्ट्रात त्यागी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांची जी एक तेजस्वी मालिका होऊन गेली, तिची आठवण म्हणून आचार्य प्र.के.अत्रे यांनी 'मराठी माणसे, मराठी मने' या व्यक्तिचित्रसंग्रहामधून बारा व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. या बारा व्यक्ती म्हणजे बारा रत्ने आहेत. त्या व्यक्तींबद्दल काही सांगण्याची उर्मी लेखकाला आहे. त्यांपैकी 'महिलांचे उद्धारकर्ते महर्षी धोंडो केशव कर्वे' हे व्यक्तिचित्र चांगले रेखाटले आहे. स्त्रियांच्या उद्धारासाठी रात्रंदिवस चंदनाप्रमाणे झिजणारी महर्षी कर्व्यांची ऋषितुल्य मूर्ती प्र.के.अत्रे रेखाटतात. महर्षी कर्वे हे एक लोकोत्तर सेवामूर्ती आहेत, मानवतेचा उद्धार करण्यासाठीच त्यांचा जन्म झाला आहे हे सांगताना प्र.के.अत्रे म्हणतात, 'त्या व्यक्ती बोलत नाहीत, त्या लिहित नाहीत, त्या गात नाहीत, त्या नुसत्या सेवा करतात. सेवा हीच त्यांची प्रतिभा, सेवा हेच त्यांचे काव्य आणि सेवा हेच त्यांचे साहित्य.' मानवतेच्या सेवेचे व्रत स्वीकारणे हे एक कठोर अग्निदिव्य आहे. हेच सेवेचे व्रत धों.के. कर्वे यांनी स्वीकारले. कर्वे यांच्या कार्याचा प्रारंभ विधवाविवाहापासून झाला असला तरी त्याचे पर्यवसान स्त्रियांचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात झाले. पुरुषांच्या गुलामगिरीतून आणि सामाजिक परावलंबीपणातून स्वाभिमानाने सुटका करून घेण्याचा मार्ग महर्षी धों.के. कर्वे यांनी स्त्रियांना दाखविला आणि भारतातल्या नव्या स्त्रीला जन्म दिला. अशा त्यांच्या महत्त्वाच्या पण थोडक्या कार्याचा उल्लेख व गौरव करून प्र.के. अत्रे यांनी धों.के. कर्वे यांचे व्यक्तिचित्र प्रभावीपणे रेखाटले आहे. लेखकाला जाणवलेल्या व्यक्तीचे; मग ती व्यक्ती असामान्य असो की सामान्य, त्या व्यक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याचा, जगण्याचा आलेख तो मांडत असतो. वर्ण्य व्यक्तीबद्दल सांगण्याच्या उर्मीतून वरील व्यक्तिचित्रे रेखाटली गेली आहेत. अशी अनेक व्यक्तिचित्रे मराठीत लिहिली गेली आहेत.

**लेखक व वर्ण्य व्यक्ती यांचा परस्परसंबंध :**

लेखक जेव्हा एखादे व्यक्तिचित्र साकार करीत असतो तेव्हा वर्ण्य व्यक्ती आणि लेखक यांचं काही एक नातं असतं, जिव्हाळा असतो. त्या जिव्हाळ्यातून परस्परसंबंध

निर्माण होतो. मग ती व्यक्ती नात्यातील असो की कुठल्याही जातिधर्माची असो. एक व्यक्ती म्हणून परस्परसंबंधातून त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा उलगडा लेखक आपल्या लेखनातून साकार करतो. त्या व्यक्तीचे वेगळेपण, त्यांच्याविषयीचा प्रेमभाव, त्यांची विचारसरणी, त्यांची जगण्याची पद्धत लेखकाला आकर्षित करते. त्यातून त्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र लेखक रेखाटतो. मराठीत अशी अनेक व्यक्तिचित्रे निर्माण झाली आहेत. उदा.: 'आक्का' हे व्यक्तिचित्र वि.स. खांडेकरांनी रेखाटले आहे. काही कारणांनी ज्या प्रसंगाची अथवा व्यक्तीची स्मृती लेखकाच्या मनात तीव्रतेने जागी झाली त्या प्रसंगाचे अथवा व्यक्तीचे हे भावचित्र आहे. 'आक्का' हे व्यक्तिचित्र या दृष्टीने चांगले झाले आहे.

लेखकाला बहीण नसल्याने तो बहिणीच्या प्रेमापासून पारखा असतो. आपल्याला बहीण असावी अशी लेखकाची इच्छा असते. अशात त्यांच्या चुलत चुलत्यांना दत्तक द्यायचे लेखकांच्या मामांनी ठरविले असते. तिथे लेखकाची आणि 'आक्का'ची भेट होते. ही आक्का वयाच्या अकरा-बाराव्या वर्षी लग्न होऊन एक-दोन वर्षांत वैधव्य प्राप्त झालेली, आईबापाच्या छायेत आपलं दैनंदिन जीवन कसेबसे घालवित होती. ही आक्का लेखकाला भाऊ म्हणून जीव लावयाची. प्रसंगी घरातील विरोध झुगारून मदत करायची. लेखकाने शिरोड्याला शिक्षक म्हणून जावे यासाठी तीच पाठपुरावा करते. शिरोडे हे गाव अतिशय खेडे. कुठलीही सोयसुविधा नाही. भावाची आबाळ होईल म्हणून ती वडिलांचा विरोध झुगारून शिरोड्याला येऊन राहते. आहे त्या परिस्थितीत समाधान मानते. लेखक आजारी असता काळजी घेते. या आक्काच्या वागण्यातून, माणसाचे मन मायेमुळे किती विशाल होऊ शकते याचे प्रत्यंतर लेखकाला येते. संस्कृती आणि सुधारणा या केवळ पुस्तकी ज्ञानान साध्य होणाऱ्या गोष्टी नाहीत, त्याचा उगम अंतरीच्या उमाळ्यातून झाला पाहिजे याची स्पष्ट कल्पना, आक्काच्या दृष्टिकोनातून लेखकाला येते. अनेक अडचणीच्या आणि निराशेच्या क्षणी आक्कानी दिलेला धीर अशा अनेक आठवणी. विविध प्रसंगांतून लेखकाने हे व्यक्तिचित्र साकार केले आहे. यातून आंतरिक प्रेमभाव प्रकट झाला आहे.

'नाना न्हावी' हे वि.द. घाटे यांनी लिहिलेले व्यक्तिचित्र अशाच स्वरूपाचे आहे. नाना न्हावी आणि लेखक यांच्या परस्परसंबंधातून हे व्यक्तिचित्र साकार झाले आहे. नाना हा न्हाव्याचा व्यवसाय करीत असे. आपल्या गावी कोणी सरकारी अंमलदार आला असे त्याला कळले की तो कोणालाही न सांगता आपली हजामतीची पेटी घेऊन तयार असे. कुणी सरकारी अंमलदार हजामत न करता गेलेला नानाला खपायचा नाही. नानाची ही जुनीच पद्धत होती. तो कुण्या सरकारी अंमलदाराकडून हजामतीचे पैसेही घेत नसे. अनेकांना बोलून नरम करीत असे आणि त्यांची हजामत करून पाठवित असे.

अशा या नानाचे डोळे प्रभावी, निश्चयी, रहस्यमय होते. नानामध्ये आत्मविश्वास आणि रुबाब असूनही मार्दव होते. नाना फटिंग होता, ना मूल ना बाळ. कारभारणीला जाऊन दहा-पंधरा वर्षे झाली होती. अशा नानाची जीवन जगण्याची एक पद्धत होती. तो नास्तिक होता. गेल्या चाळीस वर्षांत तो गावच्या देवळाकडे कधी वळला नव्हता. नाना म्हणायचा, मी एवढा म्हातारा झालो पण देवावाचून माझे काही अडले नाही. पावसावाचून अडते, पीक मिळत नाही. नदीनाल्यावाचून अडते, पाणी मिळत नाही. नानाचा देव वेगळा होता. तो म्हणजे इमान. इमान हाच खरा देव. 'इमान देवाच्या बापाला ऐकत नाही.' इमानाने वागले पाहिजे म्हणजे मनाला समाधान होते. मन मोठे ओढाळ गुरू आहे. त्याचे समाधान होणे कठिण असते. त्याला फसविणे फार कठीण. त्याला ताब्यात ठेवले पाहिजे ही नानाची विचारशक्ती लेखकाला सारखी धक्के देत होती. त्याचा इमानवाद फार व्यापक होता. नानाने आपल्या आयुष्याची अनुभवाप्रमाणे नीटनेटकी गोठवण केली होती. नाना गावच्या लहान मुलांत देव पाहत होता. महारा-चांभारांची, वाण्याबामणाची, कुणब्यामाळ्याची सगळी मुले यांना खारीक-खोबरे दिल्यावाचून नानाचा दिवस जात नसे. नानाच्या घरी मुलांचे राज्य असे. त्यातच त्याला आनंद वाटत असे. असा हा नाना लेखकाच्या सहवासात आला. त्यातून लेखकाला जाणवलेले नाना न्हाव्याचे जीवनाचे तत्त्वज्ञान आणि विचारांची वेगळी ठेवण यातून हे व्यक्तिचित्र लेखकाने चांगले रेखाटले आहे.

लेखक वि.स. खांडेकर आणि 'अक्का' यांचे बहीण भावाचं मानलेलं नातं सख्ख्या बहिणीपेक्षाही किती जिव्हाळ्याचं होतं, घरातील विरोध पत्करून भावाच्या पाठीशी ती कशी उभी राहिली, या अक्काच्या आंतरिक भावनेतूनच लेखकाला हे व्यक्तिचित्र लिहावेसे वाटले. तसेच वि.द. घाटे सरकारी अंमलदार म्हणून नोकरी करीत असताना त्यांचा नाना न्हाव्याशी संबंध आला. त्यांची भेट होत राहिली. नानाच्या सहवासातून लेखकाला नाना न्हाव्याचे वेगळेपण जाणवले, ते लेखकाने 'नाना न्हावी' या व्यक्तिचित्रात रेखाटले आहे.

मराठीत अनेक मान्यवर व मोठ्या व्यक्तींची व्यक्तिचित्रे जशी लिहिली गेली तशीच सामान्य, समाजातील दुर्लक्षित अशा व्यक्तींची व्यक्तिचित्रेही लिहिली गेली आहेत. त्यातून त्या व्यक्तीची जगण्याची वेगळी शैली आपल्या लक्षात येते.

प्रादेशिक जीवनाचे दर्शन घडविण्यासाठी व्यक्तिचित्र : महाराष्ट्र राज्याचा भूभाग विविधतेने व्यापलेला आहे. माणदेश, खानदेश, कोकण, विदर्भ, मराठवाडा इत्यादी त्या-त्या प्रादेशिक वैशिष्ट्यांनी तो-तो प्रदेश समृद्ध आहे. त्या-त्या भागातील माणसांची जीवनशैली, भाषाशैली, रुढी, परंपरा, प्रादेशिक जाणिवा वेगवेगळ्या आहेत. प्रत्येक

व्यक्ती आपापल्या प्रादेशिक मुशीतून तयार झालेला असते. महाराष्ट्रात, साहित्यक्षेत्रातील लेखक मंडळीही अशा विस्तीर्ण प्रदेशात विभागलेली आहे. लेखक आपल्या भागातील व्यक्तीचे, माणसाचे जीवन जवळून न्याहाळत असतो. त्याच्या बोलण्यातून, वागण्यातून, विचारातून, आचारपद्धतीतून लेखकाला त्या माणसामध्ये काही एक गुणवैशिष्ट्ये जाणवत असतात किंवा काही गोष्टीनी लेखक प्रभावित होत असतो. ती व्यक्ती समाजासमोर लेखनरूपाने मांडावी असे कलावंत म्हणून लेखकाला वाटत असते. त्या उर्मीतून तो ती माणसं, त्यांच्या प्रादेशिक जाणिवा, जीवनवैशिष्ट्ये त्यांच्या त्यांच्या प्रादेशिक भाषेतून व्यक्त करीत असतो. त्यातून त्या प्रादेशिक जीवनाचे, भागाचे, व्यक्तीचे दर्शन आपणास घडते. अशी अनेक व्यक्तिचित्रे मान्यवर लेखकांनी प्रादेशिक जीवनदर्शन घडविण्याच्या प्रेरणेने लिहिली आहेत. उदा. : 'धर्मा रामोशी' हे अशाच प्रकारचे व्यक्तिचित्र आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशी माणसं' या व्यक्तिचित्रसंग्रहामधून 'माणदेश' भागातील प्रादेशिक व्यक्तिजीवनाचे दर्शन घडविले आहे. गावाकडील रामोशी 'धर्मा' याचे प्रामाणिक जगणे आणि त्याची गरीब परिस्थिती लेखकाला आकर्षित करते. त्यातून हे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. कधीकाळी खणखणीत, ठणठणीत असलेला धर्मा आता भलताच थकला होता. त्याचे शरीर विरलेल्या वस्त्राप्रमाणे जीर्ण झाले आहे. चालताना, उठताना, बसताना त्याला आता घडीघडीला काठीचा आधार घ्यावा लागतो. अशा धर्माकडे लेखक गेला. सारी चौकशी केली. धर्मा मोकळ्या मनाने सारे सांगू लागला. तो म्हणला, 'दोन सालं झाली. पाऊस नाही, पाणी नाही, दुष्काळ पडलाय आपल्या मुलकात. पाच चिपट्याची धारण झालीया, का घ्याचं आन का खायचं ? त्यात बजीला दाल्ल्यानं टाकलीया, ती बी घरी बसलीया. भागवतो कसं तरी कळणाकोंडा करून. कधी रताळं, कधी गाजरं उकडतो, आन् खातो बापलेक. कालच्याला तुम्ही आला तवा पोरीनं तांदळीची भाजी आणली हुती रानातनं वटाभर. ती उकडून, मीठ घालून खाल्ली कोरकोर भाकरीसंगं. बकऱ्यावाणी पालापाचोळा खाऊन जगायचं आलं कपाळी. वंगाळ! वंगाळ!' यातून धर्माची आत्यंतिक गरिबी दिसून येते. असे असले तरी तो इमानी रामोशी आहे. 'माणदेश' हा भाग दुष्काळग्रस्त असा आहे. सांगोला भागात पाऊस कमी पडतो. त्या प्रदेशातील लोकांचे जीवन लेखक त्या भागातील बोली भाषेतून व्यक्त करतो आणि ते व्यक्तिचित्र परिणामकारक होते.

प्रादेशिक जीवनाचे दर्शन घडविणारे असेच एक व्यक्तिचित्र म्हणजे 'सावळाराम म्हाडेश्वर'. मधु मंगेश कर्णिक यांनी या व्यक्तिचित्रातून कोकणी वस्तीचे दर्शन घडविले आहे. हा सावळाराम कोकणी आहे. कर्णिक यांनी कोकणातील माणसे तिथल्या संस्कारांसह उभी केली आहेत. ही कोकणी माणसे अंत:करणाला हूरहूर लावून जातात.

'सावळाराम म्हाडेश्वर' ही सावकारी करणारा व्यक्ती आहे. पाच फूट उंचीचा, पायाने अधू असणारा सावळराम मोठा हिकमती आणि बेरकी आहे. पण त्याचा चेहरा दिसायला भोळा आहे. सहासातशे वस्तीच्या खेड्यातला तो तालेवार सावकार आहे. पारशी शेठचा सावळारामवर भारी विश्वास होता. सावळारामने त्याच्या आश्रयाला राहून भरपूर माया कमविली. खेड्यातील अडचणीत असलेल्या व्यक्तीला तो हेरायचा आणि व्याजाने पैसे द्यायचा. पैसे व्याजाने देण्याची आणि घेण्याची त्याची एक पद्धती होती. पैसे वसुलीसाठी खोटेही बोलायचा. एखाद्या लबाड बोक्यासारखा मिशीतल्या मिशीत हसत असे. सावळारामचा सावकारीचा धंदा चांगला चालत होता. पुढे सावळारामचे पैसे लोक बुडवू लागले. त्या काळजीने तो अंथरुणावर पडला. त्या धनलोभी म्हाताऱ्याने शेवटी धास्ती घेतली आणि त्यातच प्राण सोडला. या व्यक्तिचित्रातून लेखकाने कोकणी भागातील माणसांची जीवन जगण्याची रीत सांगितली आहे. कोकणी बोली भाषेचा वापर करून प्रादेशिक जीवनाचे दर्शन या व्यक्तिचित्रातून लेखकाने घडविले आहे. मराठीमध्ये माणदेश, खानदेश, कोकण, मराठवाडा, प.महाराष्ट्र, विदर्भ इत्यादी त्या-त्या प्रादेशिक भागातील लेखकांनी त्या भागातील वैशिष्ट्यांसह अनेक व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. त्यामध्ये व्यंकटेश माडगूळकर, मधू मंगेश कर्णिक, शंकरराव खरात, आनंद यादव, शिवाजी सावंत अशा अनेक मान्यवर लेखकांची नावे घेता येतील.

**महान व्यक्तीला साकार करण्यासाठी व्यक्तिचित्राचे लेखन :**

महाराष्ट्र ही साधुसंतांची व समाजसेवकांची भूमी आहे. या मराठी मातीत अनेक समाजसेवक आपल्या कार्यातून भूमीला आणि माणसाला समृद्ध करीत आहेत. अनेक समाजसेवकांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजकार्यासाठी, देशासाठी वाहून घेतले आहे. जीवन जगण्याचा आदर्श त्यांनी आपल्या आचरणातून दिला आहे. त्याने प्रभावित होऊन मराठीतील मान्यवर लेखक व प्रतिभावंत साहित्यिक यांना समाजातील आदर्शवत व्यक्ती, तिचे जगणे, तिचे झपाटलेपण, तिचे कार्य समाजासमोर मांडणे निकडीचे वाटते. त्या व्यक्तीच्या जीवनशैलीने लेखक प्रभावित होतो. त्यातून व्यक्तिचित्र साकार करतो. उदा. बाबा आमटे, गाडगे महाराज, धों.के. कर्वे, म. जोतिराव फुले, स्वा. सावरकर, विनोबा भावे, जे.आर.डी. टाटा इत्यादी कितीतरी नावे देता येतील. आपापल्या क्षेत्रात आदर्शवत कार्य करणाऱ्या अशा अनेकांची व्यक्तिचित्रे लिहिली गेली आहेत. उदा.: पु.ल. देशपांडे यांनी प्रत्यक्ष किंवा असामान्य कर्तृत्वाच्या रूपाने भेटलेली माणसे शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. 'माझ्या मनाने लावलेल्या निकडीतून ही शब्दचित्रे तयार झाली आहेत', असे 'गुण गाईन आवडी' च्या प्रस्तावनेत पु.ल. देशपांडे यांनी म्हटले आहे. 'बाबा आमटे : एक विज्ञानयोगी', हे एक उत्कृष्ट व्यक्तिचित्र पु.ल.

देशपांडे यांनी रेखाटले आहे. या व्यक्तिचित्रातून बाबा आमटे यांची वैज्ञानिक दृष्टी त्यांनी आपल्यासमोर ठेवली आहे. बाबा आमटे यांनी आनंदवनात कुष्ठरोग्यांचे विवाह घडवून आणले. महारोगातून मुक्त झालेली ही आठ जोडपी होती. हे सारे प्रेमविवाह होते. बाबा आमटे नावाचा त्यांचा धर्मपिता नि साधना आमटे नावाची धर्ममाता ह्या पोरींचे कन्यादान करीत होते. मनुष्यप्राण्यातील 'मनुष्या' त मंगल घडावे आणि घडवावे ही त्यांची ओढ होती. बाबा आमटे ह्या माणसाने एक अलौकिक प्रयोग सुरू केला होता. रस्त्याकाठी सडलेला कचरा होऊन पडलेल्या जिवंत प्रेतांना जवळ घेणारा हा क्रांतिकारक होता. ह्या माणसाला भीतीचा स्पर्शच नाही. ह्या माणसाने आयुष्यात नरभक्षक वाघापासून ते नरराक्षस गुंडांपर्यंत अनेकांबरोबर मुकाबला केला. खरे तर या माणसासमोर सारी सुखे हात जोडून उभी होती. ही सारी सुखे त्याने सोडली आणि वनवासाला निघाले. आजतागायत त्या वनवासाची धुंदी उतरत नाही. झपाटल्यासारखा वावरतो आहे. उपेक्षितांच्या जीवनात अपेक्षा निर्माण करतो आहे. या विज्ञानवादी माणसाला निराशा ठाऊक नाही. इथल्या प्रत्येक उभारणीमागे विचारांचे आणि परिश्रमांचे पहाड उभे राहिले आहेत.

ज्ञान आणि प्रेम ह्यांना साहसाने भिडणाऱ्या विज्ञाननिष्ठ आणि ज्याला देश गहाण टाकायचा नाही असल्या राष्ट्रनिष्ठ तारुण्याला सोमनाथाची हाक आहे. पु.लं. लिहितात, ''शारीरिक, मानसिक, आणि वैचारिक दारिद्र्यातून सुटका करून घेण्याचे मार्ग शोधण्याच्या महान प्रयोगशाळेच्या उभारणीसाठी, हजारो तरुणांचे दहा ते पंचवीस मे पर्यंत शिबिर भरत आहे. इथे कवींनी जावे, लोहारांनीही जावे, विदुषींनी जावे, पाककुशल गृहिणींनी जावे, खेळाडूंनी जावे, शास्त्रज्ञांनी जावे; इंजिनिअरिंग, मेडिकल, आर्टस, कॉमर्स, ॲग्रिकल्चर, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र या सगळ्या क्षेत्रांतील तरुणांना आमंत्रण आहे. विद्यार्थ्यांनी जावे आणि त्यांच्या तरुण मनाच्या पालकांनी जावे. 'ज्वालांना फुले' मानायच्या जिद्दीने जावे.'' जीवनातील प्रत्येक चांगल्या गोष्टीवर अपरिमित प्रेम करणारा हा माणूस आहे. शरीराहूनही भयंकर असा मनाचा महारोग घालविणारा हा महामानव पाहून लेखक नतमस्तक होतो.

असेच व्यक्तिचित्र प्र.के. अत्रे यांनीही रेखाटले आहे. महाराष्ट्रात आधुनिक राजकीय व सांस्कृतिक इतिहासात घेऊन गेलेल्या बारा महापुरुषांची व्यक्तिचित्रे 'मराठी माणसे, मराठी मने' यामध्ये प्र.के. अत्रे यांनी रेखाटली आहेत. समाजाला या महापुरुषांच्या कार्याची, कर्तृत्वाची ओळख व्हावी या दृष्टिकोनातून, आत्मप्रकटीकरणातून लेखन केले आहे. त्यापैकी 'महाराष्ट्राचे समाजवादी संत-गाडगे महाराज' हे व्यक्तिचित्र चांगले रेखाटले आहे. गाडगे महाराजांचे कीर्तन प्रसिद्ध आहे. गुळाचा खडा रस्त्यावर पडल्यावर

मुंग्या जशा जमा होतात. तसे गाडगेबाबांच्या कीर्तनाला समाजातली कष्टकरी माणसे हजारोच्या संख्येने जमा होतात. गेली पन्नास वर्षे गाडगेबाबा महाराष्ट्राच्या सर्व भागांतून अहोरात्र संचार करीत आहेत. गरिबांची आणि दु:खितांची नाना परीने सेवा करीत आहेत. 'झाडूचे तंत्र' देशाला गाडगेबाबांनी दिले. डोक्यावर खापर आणि हातात खराटा घेऊन बाबा पन्नास वर्षे हिंडत राहिले. ते खराट्याचे बादशहा आहेत. कोणत्याही गावात त्यांनी पाऊल टाकले की, ते सकाळी गावातली घाण झाडूने साफ करीत आणि संध्याकाळी लोकांच्या डोक्यातील घाण आपल्या कीर्तनातून साफ करतात. डोक्यावर खापराच्या तुकड्याचे शिरस्त्राण, अंगावर रंगीबेरंगी चिंध्या, एका कानात एक कवडी लोंबत आहे. दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच डुलते आहे, असा बाबाचा अवतार. देशातल्या दारिद्र्याचे ते मूर्तिमंत प्रतिनिधी आहेत.

गाडगेबाबा एरवी कुणाशी बोलत नाहीत. त्यांचे सामर्थ्य आपणांस त्यांच्या कीर्तनांतूनच कळते. सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, तसे गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात. बाबांचे कीर्तन ऐकताना श्रोत्यांचे देहभान हरपते. बाबांच्या कीर्तनाचे सामर्थ्य त्यांच्या संवादात आहे. श्रोत्यांच्या टाळ्या आणि घोष हेच त्यांच्या कीर्तनाचे सारे भांडवल आहे. बाबा कीर्तनात साधी, बाळबोध, ओघवती आणि जनतेची भाषा बोलतात. सर्व रसांची मेजवानी त्यांच्या भाषेत भरलेली आहे. विनोदाची मधुर आणि मंजुळ घुंगरे एकसारखी खुळखुळत असतात. बाबांच्या कीर्तनाबाबत प्र.के. अत्रे लिहितात, ''बाबांची कीर्तने अज्ञान्यांसाठी आहेत. ते गरिबांसाठी आहे, दलितांसाठी आहे, दु:खितांसाठी आहे. त्यात योग नाही, अध्यात्म नाही, पुराण नाही, देवाची वर्णने नाहीत. पूजा-यात्रा यांचा उपदेश नाही. त्यात शुद्ध जीवन आहे. हजारो वर्षे समाजाच्या आर्थिक सत्तेखाली आणि धार्मिक रुढींखाली भरडून निघाल्यामुळे दुधखुळ्या, देवभोळ्या अन् आंधळ्यापांगळ्या झालेल्या हीनदीन समाजाच्या उद्धाराचा झगझगीत प्रकाशझोत म्हणजे गाडगेबाबांचे कीर्तन होय.''

गाडगेबाबा हे महाराष्ट्रातले समाजवादाचे एक प्रचंड व्यासपीठ आहे. तुडुंब भूतदया ही त्यांच्या अंत:करणात भरलेली आहे. सर्वांच्या प्रेमावर आधारलेल्या समतावादी तत्त्वज्ञानाचा प्रचार कसा करावा हे बाबांच्या कीर्तनातून पाहावयास मिळते. बाबाच्या कीर्तनाचे तंत्र विलक्षण आहे. सर्व श्रोत्यांना दोन्ही हात वर करून 'गोपाळा गोपाळा देवकीनंदन गोपाळा' हे भजन करायला सांगतात. त्यांची मने तयार झाली असे वाटले की कीर्तनाला सुरुवात करतात. त्यांच्या कीर्तनात शेकडो प्रश्न आणि मुद्दे येतात. एकेक मुद्याचा ते एकेक टप्पा करतात आणि तो टप्पा लाटेसारखा वाढवीत असा काही वर नेतात की तो उपदेश श्रोत्यांच्या हृदयात शिरतोच. श्रोते तल्लीन होऊन डोलू लागतात.

अशा या कीर्तनाच्या नमुन्यातून गाडगेबाबा आपल्यासमोर साकार होतात.

लेखक जेव्हा महान व्यक्तीचे कर्तृत्व पाहतो तेव्हा तो चिंतन करू लागतो. त्या व्यक्तीबद्दल आणि त्याच्या कार्याबद्दल लेखकाच्या मनात आदरभाव निर्माण होतो. अशा प्रकारच्या व्यक्ती समाजात निर्माण होणे गरजेचे आहे असे त्याला वाटते. अशा आत्मप्रकटीकरणातून वरील प्रकारची व्यक्तिचित्रे निर्माण झालेली आहेत.

सामान्य व्यक्तीतील असामान्यत्व :दैनंदिन जीवनामध्ये लेखकाला भेटलेल्या, त्याच्या सहवासात आलेल्या, त्याच्या परिसरात, भोवताली जीवन जगणाऱ्या अशा काही व्यक्ती असतात की, ज्या तशा सामान्यच असतात परंतु त्यांच्यात असामान्य असे काही गुण दडलेले असतात. पण त्याची थोडीशीही जाणीव समाजाला नसते. अशा दुर्लक्षित, पण इतरांपेक्षा वेगळे जीवन जगणाऱ्या या व्यक्ती लेखकाला आकर्षित करतात. त्याच्या मनात घर करून राहतात. तेव्हा ती व्यक्ती लेखकाच्या साहित्याचा विषय बनते. ती व्यक्तिचित्राच्या रूपाने साकार होते. हे व्यक्तिचित्र वाचल्यानंतर आपणास आपल्या अवती-भोवती असणाऱ्या अशाच काही व्यक्तींची आठवण होते. सामान्य व्यक्तीतील असामान्यत्व दाखविणारी अशी अनेक व्यक्तिचित्रे मराठीत लिहिली गेलेली आहेत. उदा.: 'आप्पा नाबर' हे असेच व्यक्तिचित्र वि.स. खांडेकर यांनी रेखाटले आहे.

अल्पशिक्षित आणि सामान्य बुद्धीच्या 'आप्पा नाबर' ची उत्कृष्ट देशभक्ती अंगावर रोमांच उभी करणारी आहे. भोळेभाबडे वात्सल्यच आप्पाच्या रूपाने शिरोड्यात अवतरले आहे. इतरांच्या सुखाकरिता आणि समाजाच्या हिताकरिता काही तरी करावे ही आप्पांची तळमळ होती. त्यासाठी त्यांनी शाळेस देणगी म्हणून जमीन दिली होती. त्यावरच शाळा उभी होती. सार्वजनिक काम म्हटले की, ऊनपाऊस नाही, भूकतहान नाही, दिवसरात्र नाही. आप्पा ते करायला नेहमी एका पायावर तयार असे 'अशक्य' हा शब्दच आप्पाच्या कोशात नव्हता. आप्पा नाबर असा देशभक्तीने भारावलेला होता. म. गांधींविषयी त्याला विलक्षण आत्मीयता होती. देशभक्ती म्हटले की तिथे खर्चाकडे तो पाहत नसे. आप्पा दान करताना उत्पन्नाकडे कधी लक्ष द्यायचा नाही. सढळ हाताने मदत करायचा. सर्व देशभक्तांबद्दल त्याच्या मनात आदराची भावना होती. आप्पा स्वत:साठी जगलाच नाही तो इतरांसाठीच जगला. उत्कट भावना हाच त्याच्या आयुष्याचा आत्मा होता. अशा आप्पा नाबरचा उल्लेख 'व्यवहारशून्य माणूस' या विशेषणाने गावातील लोक करीत. सामान्य पण देशभक्तीने झपाटून गेलेला 'आप्पा नाबर' याला गावासाठी, समाजासाठी काहीतरी करण्याची विलक्षण तळमळ आहे. त्यासाठी तो सतत धडपडताना दिसतो. असा आप्पा वि.स. खांडेकरांच्या मनात घर करून राहिला आणि व्यक्तिचित्राच्या रूपाने तो साकार झाला.

समाजामध्ये अशा काही व्यक्ती असतात की त्या आपल्या विचाराने, ध्येयाने जगत असतात. व्यक्ती सामान्यच असते. परंतू एखाद्या विचाराने भारावलेली असते किंवा एखादा सद्‌गुण घेऊन जगत असते. ती परिस्थितीने गरीब असेल. काबाडकष्ट करणारी असेल. पण स्वत:च्या मूल्यापासून ती जराही ढळत नाही. ती त्या विचाराशी एकरूप होऊन जगत असते. मात्र अशा सामान्य माणसाच्या जगण्याकडे कुणाचे लक्ष जात नाही. एखाद्या लेखकाला त्याच्या जीवनातील चांगुलपणा दिसतो. तो त्याच्या जीवनाकडे किंवा त्यांच्या चांगुलपणाकडे आकर्षित होतो. त्यातून तो ते व्यक्तिचित्र रेखाटतो. असामान्य पैलू घेऊन जीवन जगणारा हा सामान्य माणूस पाहिला की आपण अस्वस्थ होतो आणि जगणे अधिक गडद होते. अशी सामान्य व्यक्तीतील असामान्यत्वाची जाणीव करून देणारी अनेक व्यक्तिचित्रे मराठीत लिहिली गेली आहेत.

**प्रासंगिक प्रेरणा :**

मराठीमध्ये व्यक्तिचित्रलेखन प्रासंगिक प्रेरणेमधून देखील झालेले आहे. या प्रासंगिक प्रेरणा म्हणजे त्या व्यक्तीचा वाढदिवस, स्मृतिदिन, मृत्यू, एकसष्टी, पासष्टी इत्यादी. आपल्या कार्याने एखाद्या क्षेत्रात जिने ठसा उमटवला आहे अशा व्यक्तींची (उदा. गायक, संशोधक, कलाकार, विचारवंत, उद्योजक इत्यादी) व्यक्तिचित्रे या प्रकारात प्रामुख्याने रेखाटलेली दिसतात. प्रासंगिक प्रेरणेतून का होईना त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची, कार्याची ओळख लेखकाने व्यक्तिचित्रातून करून दिलेली असते.

'एक वडीलधारी माणूस' हे पु.ल. देशपांडे यांनी लिहिलेले व्यक्तिचित्र अशाच प्रासंगिक प्रेरणेतून साकार झालेले आहे. म.म. दत्तो वामन पोतदार यांच्या मृत्यूची बातमी समजल्यावर कुणीतरी घरातीलच वडीलधारे माणूस गेल्याची हळहळ लेखकाला वाटली त्यातून हे व्यक्तिचित्र रेखाटले गेले आहे. द.वा. पोतदार हे इतिहाससंशोधक होते. मोठे विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. सावली देणे हे मुळी वृक्षाचे कर्तृत्व आहे अशा भावनेने लोक द.वा. पोतदारांकडे (दादा) येत असत. दादांची भेट झाली आणि बैठक रंगली नाही असे कधीच होत नसे. ती बैठक कुणाच्या निंदानालस्तीवर किंवा कुणाच्या खाजगी जीवनातल्या वैगुण्यावर रंगली असे कधीही झालेले नाही. ती बैठक म्हणजे विविध विषयांवरची ज्ञानधारा अखंडपणाने वाहती ठेवणारी पाणपोई होय. जाणाऱ्याला दादांनी आपला वेळ किती खाल्ला यापेक्षा आपला वेळ सत्कारणी लागला याचीच कृतज्ञता मोठी असायची. वेळ आणि विषय यांची बंधने दादांनीही पाळली नाही. विषयांची विविधता हे तर त्या बैठकीचे वैशिष्ट्य असे. त्यांच्या साऱ्या सांगण्यामागे ऐकणाऱ्यांनी शहाणे व्हावे हा समर्थप्रणीत भाव होता. त्यांच्यातील विनोदबुद्धीमुळे त्यांचे विचार श्रोत्यांच्या अंत:करणापर्यंत पोहोचत. त्यांच्या बोलण्यातील 'सहजता' हे एक

विलोभनीय वैशिष्ट्य होते. याविषयी पु.ल. देशपांडे लिहितात, ''आचार्य प्र.के. अत्रे यांनी दादांना 'पुण्यातील तेजस्वी ब्राह्मण' म्हटले होते. त्यांची ती पगडी, कपाळावरचे ते आडवे गंध, उपरणे, तो शेरवाणीसारखा डगला, सडसडीत देहयष्टी आणि उत्तम आरोग्याची साक्ष पटवणारा चेहरा यामुळे ते तेजस्वी भासत असत.'' असे दादा आयुष्यभर सदैव प्रसन्न मनाने वावरले. दादा अविवाहित होते. द.वा. पोतदार म्हणजे महाराष्ट्राचा भूतकाळ नेमकेपणाने जाणणारा, वर्तमानात ह्या मराठीभूमीत चैतन्याचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून सतत लहानथोरांत समवयस्क होऊन कार्य करणारा आणि भविष्याची चिंता वाहणारा एक मराठी कुटुंबकर्ता पुरुषच वाटत असे. दादा सतत आपल्याबरोबर पाहिजेत असे वाटायचे मुख्य कारण म्हणजे समाजातल्या व्यक्ती, कार्य आणि संस्था ह्यांच्या दोषांपेक्षा गुणांकडे आणि उपयुक्ततेकडे लोकांचे लक्ष खेचायची त्यांची क्रियाशील वृत्ती. यामुळेच गेली पन्नास-साठ वर्षे महाराष्ट्रातल्या सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनात ते मनाला प्रसन्न करणाऱ्या सुगंधासारखे दरवळत राहिले. असे दादांचे व्यक्तिमत्त्व आपणासमोर उभे राहते.

अशाच प्रकारचे व्यक्तिचित्र 'एकसष्टीच्या उंबरठ्यावर : बेगम शोभा गुर्टू' हे ज्योती दाते यांनी रेखाटले आहे. शोभाताई या प्रसिद्ध गायिका आहेत. त्यांची एकसष्टी असल्याचे लेखिकेला समजले आणि लेखिकेने शोभाताईंच्या सहवासातील आठवणींना उजाळा देत त्यांचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. शोभाताईंचे बालपण बेळगाव, कोल्हापूर, मुंबईमध्ये गेले. त्यांचे विवाहापूर्वीचे नाव भानुमती शिरोडकर. प्रख्यात नर्तिका मेनका शिरोडकर या शोभाताईंच्या मातोश्री. शोभाताईंचा खरा सांभाळ त्यांच्या आजी कृष्णाबाई यांनी केला. त्या पट्टीच्या गायिका होत्या. आजीच्या सहवासातून शोभाताई सूर लावायला शिकल्या. शोभाताईंचा सूर म्हणजे मूर्तिमंत नजाकत. त्यांच्या सुरांना वार्धक्य कधी स्पर्श करू शकले नाही. त्यांची गानप्रतिभा नवीनवी रूपे धारण करून रसिकाला भुलवीत राहिली. त्यांच्या गाण्याविषयी शोभा दाते लिहितात, 'शोभाताईंच्या गाण्याप्रमाणे त्यांच्या साध्या साध्या बोलण्यातही नजाकत भरली आहे. त्यांचा स्वर जसा एका जागी ठरत नाही तशी वाणीदेखील कधी एका भाषेवर स्थिरावत नाही. कधी उर्दूमिश्रित हिंदी, कधी लडिवाळू मराठी तर कधी गोव्याच्या लाघवी कोकणी भाषेत त्या सांधे बदलत राहतात. त्यांचा चेहरा विलक्षण बोलका आहे. नृत्य हाडीमासी खिळलं आहे. छोटे छोटे किस्से सांगतानासुद्धा त्यांच्या चेहऱ्यावरील बदलत्या भावछटा व नेत्रविभ्रम बघणे व त्यातला सारखा डोकावणारा मिस्किलपणा अनुभवणे म्हणजे अदा करून म्हटलेली ठुमरी ऐकण्यासारखाच अलौकिक आनंदानुभव.' यातून त्यांचे वेगळे व्यक्तिमत्त्व आपणांस दिसते. शोभाताई प्रेमळ स्वभावाच्या होत्या. अखंड आणि अमर्याद प्रेम हाच त्यांना

मोलाचा ठेवा वाटतो.

शोभाताई दुसऱ्यांच्या नकला करण्यात वाकबगार आहेत. त्यांच्या आवाजावर, गाण्यावर, त्यांच्या सर्व मुसलमानी गुरूंच्या ढंगांचा खूपच गहिरा प्रभाव पडला. बेगम अख्तरनंतर सर्वोत्तम ठुमरी गाणाऱ्यांमध्ये शोभाताईंचे नाव घेतले जाते. त्यांच्या आवाजात वेगळेच पहाडी सौंदर्य आहे. लता मंगेशकर, सुधीर फडके, राम कदम, वसंत देसाई, सोनिक ओमी, जयदेव व शंकर जयकिशन इत्यादी अनेक संगीत दिग्दर्शकांची गाणी त्यांनी गायीली आहेत. सिनेमा कसाही असो व संगीत दिग्दर्शक कोणताही असो शोभाताईंचे गाणे त्यांचेच राहीले आहे. आपला वेगळा ढंग त्यांनी नेहमीच जोपासला आहे. एक श्रेष्ठ गायिका म्हणून याप्रकारे त्यांचे व्यक्तिचित्र आपल्या समोर येते.

प्रासंगिक प्रेरणेतून लेखक त्या व्यक्तीच्या जीवनातील काही घटना, प्रसंग, कला, त्यांचे कार्य यांना उजाळा देत असतो. चांगल्या गोष्टी समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा प्रासंगिक प्रेरणेतून निर्माण झालेली अनेक व्यक्तिचित्रे मराठीत अनेक मान्यवर लेखकांनी रेखाटलेली आहेत.

व्यक्तिचित्राचे स्वरूप :

साहित्यसृष्टीमधील कोणत्याही वाङ्मयप्रकाराचा 'एक वाङ्मयप्रकार' म्हणून अभ्यास करताना विहंगमावलोकन अनेक दृष्टीने आवश्यक ठरते. साहित्याचा इतिहास हा प्रतिभाशाली लेखकांच्या नवनिर्माणक्षम प्रतिभाधर्माने निर्मिलेल्या साहित्यकृतीचा इतिहास असतो. तसेच त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाने साकारलेल्या कलाकृतीतून जाणविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचाही तो अभ्यास असतो. प्रत्येक लेखकाचे व्यक्तिमत्त्व वेगवेगळे असते. म्हणून प्रत्येकांची लेखनकृती वेगळी वाटते. एक माणूस दुसऱ्या माणसासारखा नसतो. तसेच एका लेखकाची प्रतिभा दुसऱ्यासारखी क्वचितच असते. मानवी मनाची, माणसातल्या 'स्व' चा ही वेगळेपणा असतो, तो वेगळेपणा लेखकातही असतो. त्यामुळे त्याचे लेखन दुसऱ्या लेखकाहून वेगळे वाटत असावे. या वेगळेपणाच्या मागे त्याच्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचा सिंहाचा वाटा असतो. त्याच्या कलाकृतीचे हे वेगळेपण अभ्यासकांच्या किंवा रसिकांच्या लक्षात आणून देण्याचे महत्त्वाचे कार्य विहंगमावलोकनामूळे शक्य होत असते. कोणत्याही वाङ्मयप्रकाराची विशिष्टकाळी, एका विशिष्ट दिशेने, विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट प्रेरणेने जी वाढ होत असते त्या प्रत्येक वाङ्मयप्रकाराचे स्वरूप वेगळे असते. त्यातील अनुभव, मांडणी, अभिव्यक्ती यामध्ये वेगळेपण असते. म्हणून प्रत्येक वाङ्मयप्रकाराचे काही वेगळेपण असते. मराठीत कथा, कादंबरी, कविता, नाटक, निबंध इत्यादी वाङ्मयप्रकार प्रसिद्ध आहेतच. इथे मराठीतील 'व्यक्तिचित्रे - एक वाङ्मयप्रकार' यादृष्टीने अभ्यास अभिप्रेत आहे. या अभ्यासासाठी इ.स. १९४० ते

१९९० हा विशेष कालखंड म्हणून निवडला आहे. या कालखंडातील व्यक्तिचित्रांचे स्वरूप कसे आहे हे पाहण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.

व्यक्तिचित्राचे स्वरूप हे विविधांगी आहे. व्यक्तीचे बाह्यवर्णन, स्वभावदर्शन, व्यक्तीचे घर, कौटुंबिक तपशील आणि कार्यकर्तृत्व यांचा जो ठसा लेखकावर उमटतो त्यातून व्यक्तिचित्र साकार होते. हे व्यक्तिलेख लेखकसापेक्ष असतात. ती व्यक्ती त्या लेखकाला जशी दिसली तसे तो लिहितो. ती व्यक्ती इतरांनी पाहिली असेल तर त्यांना ती वेगळी दिसणे स्वाभाविक आहे. प्रत्येकाचे अनुभवविश्व वेगळे असते आणि व्यक्तिगणिक ते बदलत जाते.

**बाह्यवर्णन :**

व्यक्तिचित्रात व्यक्तीचा बाह्यरूपाचे दर्शन होते. त्या व्यक्तीचे रंगरूप, वय, बांधा, शारीरिक ठेवण, सवयी, लकबी, प्रकृती, पोषाख, बोलण्याची पद्धत, आवाज, राहणीमान यांच्या वर्णनातून व्यक्तीच्या बाह्यरूपाचे दर्शन होते. या शरीराचीही एक भाषा असते. प्रत्येकाचे शरीरही बोलत असते. त्यातून काही भावना व्यक्त होत असतात. याला देहबोली असेही म्हणतात. उदा. पु.ल. देशपांडे यांनी कल्पित व्यक्तींची आणि वास्तव व्यक्तींची बाह्यरूपे अगदी हुबेहूब रेखाटली आहेत. प्रसिद्ध प्रकाशक रा.ज. देशमुख यांचे वर्णन करताना पु.ल. देशपांडे लिहितात, ''अस्सल मराठी वर्ण, साऱ्या देहावर दिंडीतल्या अबीर बुक्क्यासारखा रांगडेपणा उधळलेला, डोक्यावर बारीक कापलेल्या ताठ केसांचे- चहाच्या भुकटीत साखर मिसळल्यावर दिसते त्या रंगाचे आणि झोपडीवर किंचित पुढे येते, तसे कपाळाच्या पट्टीवर आलेले छत, तिरकस पाहण्याची पद्धत, एखाद्याला आपण ठेवून देतो तसे ठेवून दिलेले नाक, अंगावर लोडाच्या अभ्र्यासारखा सदरा, खाली रदट पायजमा, अवघड वाटा तुडवल्याची साक्ष देणारे पाय, त्या निराकार चपला, हातात वर्गणी मागायला येणाऱ्या माणसाच्या हातात असते तसली पिशवी... अशा थाटात हा गृहस्थ पुढे येऊन उभा राहिला की, जत्रेतल्या कुस्त्यांच्या दंगलीचे कंत्राट ठरवून किंवा मोडून येणाऱ्या माणसाची आठवण होते.'' या वर्णनातून रा.ज. देशमुख यांचे चित्र प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्या समोर उभे राहते.

पु.लं. नी रा.ज. देशमुखांचे बाह्यवर्णन चांगले रेखाटले आहे. 'अचूकता' हे पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिवर्णनाचे वैशिष्ट्य सांगता येईल. एखाद्या व्यक्तीचे व्यंग दर्शवतानाही कुरूपतेचे प्रदर्शन होणार नाही ही काळजी पु.ल. देशपांडे यांनी घेतली आहे. रंगाच्या एक-दोन फटकाऱ्यांत जसे एखादे चित्र रंगवावे तसे अल्प अक्षरात रवींद्र पिंगे यांनी व्यक्तीचे शरीरवर्णन केले आहे. डॉ. भिमराव कुलकर्णी यांचे वर्णन करताना ते लिहितात, ''ठेंगणं, ठुसकं, गोटीबंद शरीर, काळा वर्ण, लख्ख स्मरणधुंद झपाटा, अखंड उल्हास,

जिभेचा पट्टा, परोपकारी बुद्धी नि स्वच्छ हात हे भीमरावाचं ह्या इहलोकीचं भांडवल होतं.'' यातून भिमराव कुलकर्णी यांचे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर साकार होते. रवींद्र पिंगे यांनी साध्या सरळ, मोजक्या शब्दांत व्यक्तीचे शरीरवर्णन केले आहे. मोजक्याच शब्दांतून व्यक्तीचे स्वभाववर्णनही येते. व्यक्तीचे कार्यकर्तृत्व दिसून येते.

व्यंकटेश माडगूळकर 'शिदा चांभार' या व्यक्तिचित्रात शिदाचे वर्णन करताना लिहितात, ''शिदा उंचीनं बुटका, पण हाडापेरानं थोराड आहे. रंगानं काळाभोर आणि स्वभावानं मोठा बेरकी आहे. त्याच्या तोंडावरूनच हा माणूस धूर्त आणि लुच्चा असावा असं वाटतं. शिदा गरीब पण माजोरी आहे. गरीब पैशाअडक्याच्या दृष्टीनं, वागणुकीनं नव्हे. डोक्यावर कसंबसं गुंडाळलेलं मुंडासं, अंगात मळकट सदरा, त्याच्यावर ढगळ असा एक लोकरी कोट; निळ्या रंगाचा आणि जागजागी पांढऱ्या दोऱ्यानं रप्पू केलेला. खाली तांबड्या काठाचं जाड धोतर, एखाद्या देशमुखासारखं झोकात नेसलेलं. त्याचं टोक एका हातात धरून आणि दुसऱ्या हातात एखादा नवाजुना चप्पलजोड घेऊन घाईघाईनं रस्त्यातून जाता-येताना तो नेहमी नजरेस पडतो.'' या वर्णनातून गरीब, धूर्त पण माजोरी शिदा आपल्या देशमुखी ऐटीत जीवन जगताना दिसतो. व्यंकटेश माडगूळकरांनी शिदा चांभाराच्या बाह्यवर्णनातून त्याचे वेगळे व्यक्तिमत्त्व साकार केले आहे. माडगूळकर हे सिद्धहस्त लेखक असल्याने कमीत कमी शब्दांत शिदाच्या गुणदोषांसह त्याचे व्यक्तिचित्र त्यांनी रेखाटले आहे. एकूणच ही व्यक्तीची बाह्यवर्णने विलोभनीय आहेत.

**स्वभावदर्शन :**

'व्यक्ती तितक्या प्रकृती' असे म्हटले जाते. व्यक्तिगणिक स्वभाव बदलत जातो. राग, लोभ, माया, ममता, मोह, मत्सर, असूया या सगळ्या भाव-भावना प्रत्येक व्यक्तीच्या ठायी कमीअधिक प्रमाणात असतात. एखादी व्यक्ती एखादे वेळेस चांगली वागली तरी दुसऱ्या वेळेस ती तशी वागेलच याची खात्री देता येत नाही. तिची एखाद्या विशिष्ट व्यक्तीशी जशी वर्तणूक असेल तशीच दुसऱ्याशी असेलच असे सांगता येत नाही. प्रत्येकाचे व्यक्तिगणिक, परिस्थितीनुसार वागण्याचे पवित्रे बदललेले असतात. माणूस असे का वागतो याची उत्तरे मानसशास्त्राचे निकष लावूनच ठरवावी लागतील. तरीही माणूस हे एक अजब रसायन आहे. त्याच्या बाबतीत सगळीच उत्तरे शंभर टक्के बरोबर येतील की नाही, हे सांगता येत नाही. व्यक्तिस्वभाव शोधताना लेखकाला ती व्यक्ती जशी भावली, जसा अनुभव आला तशी त्याने रेखाटलेली असतात. उदा.: नाना पाटेकर हे एक कलंदर व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या स्वभावातला विक्षिप्तपणा, वांडपणा वि.भा. देशपांडे यांनी दर्शविलेला आहे. एखाद्याशी केलेली सलगी किंवा एखाद्याशी केलेले शत्रुत्व या दोन्ही टोकाच्या भावना ते व्यक्त करतात. मधला पर्याय नाना पाटेकर

कधी स्वीकारत नाहीत. अशा नानाबाबत लेखक लिहितो, ''प्रयोगासाठी तो थिएटरमध्ये आला तर तो जाता जाता ओळखीच्या कुणाला टप्पल मारेल, कुणाला मिठी मारेल, तर कुणारा मिठी मारता-मारता उचलूनही घेईल. त्यात स्त्री-पुरुष असा फरक करणार नाही. लहान-मोठा असाही फरक करणार नाही. आसपास कोण आहे याचाही विचार तो करणार नाही.'' नाना पाटेकर यांच्यातील 'खोडकर मूल' यातून दिसून येते. रंगभूमीवर आणि चित्रपटातून खलनायकाची भूमिका करणाऱ्या या व्यक्तीच्या मुखवट्यामागचा चेहरा असाही असू शकतो याचा प्रत्यय येथे येतो. वि.भा. देशपांडे हे प्रसिद्ध नाट्यसमीक्षक आहेत. अभिनेता आणि अभिनेत्री यांच्या जगण्यातून आणि अभिनयातून त्यांची वेगळी वैशिष्ट्ये ते मार्मिकपणे रेखाटताना दिसतात.

पु.ल. देशपांडे हे सिद्धहस्त आणि विनोदी लेखक आहेत. त्यांची एक वेगळी शैली आहे. त्यांनी 'परोपकारी गंपू' हे व्यक्तिचित्र विनोदी शैलीत लिहिले आहे. परोपकारी वृत्ती गंपूमध्ये बालपणापासून मुरलेली होता. तो कुणाचेही काम असो, परोपकार ह्या भावनेतूनच करीत असे. त्याच्या या वृत्तीचे, स्वभावाचे वर्णन करताना लेखक लिहितो, ''गंपू जन्माला आला तो हितचिंतक म्हणूनच. मला खात्री आहे की, जन्माला येणारा प्रत्येक जीव भोकाड पसरून येतो. पण गंपूने जन्मल्याबरोबर आईला नसले तरी सुइणीला तरी नक्की विचारले असेल, 'कसं काय गोपिकाबाई, तब्येत ठीक आहे ना ?' तुकाराम धंद्याबिंद्याचं पार वाटोळं झाल्यावर 'तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता' म्हणाला असेल, पण गंपू जन्माला आला तोच उपकारापुरता. केवळ आईची वात्सल्यभावना तृप्त करणे आणि वडिलांना वारसाची सोय करणे यापलीकडे गंपूचा जन्माला येण्यात देखील दुसरा कोणता हेतू नसावा. इतका उपकारी पुरुष भूतलावर दुसरा कुणी नांदला असेल की नाही, देव जाणे! गंपू कपडे शिवून घालतो ते केवळ बाबूराव शिंप्याचा धंदा चालावा म्हणून, जेवतो तो किराणा भुसार दुकानदारांवर उपकार म्हणून, सरकारी कचेरीत नोकरी करतो तो पंचवार्षिक योजना यशस्वी व्हावी म्हणून, शाळा-कॉलेजात देखील मास्तर-प्रोफेसरांची चूल पेटावी म्हणून गंपूने इतरांपेक्षा चांगला भक्कम तळ दिला होता आणि शेवटी लग्न केले ते देखील सासऱ्याचा एक नवमांश भार उतरावा म्हणून!'' पु.ल. देशपांडे यांनी गंपूच्या आत्यंतिक परोपकारी स्वभावाचे वर्णन मार्मिक पण विनोदी शैलीतून करून गंपूच्या स्वभावाच्या वेगळेपणाचे दर्शन घडविले आहे. पु.ल. देशपांडे यांच्या लेखनाचा आरंभ आणि शेवट मार्मिकपणे केलेला असतो. सूक्ष्म निरीक्षणातून त्यांचे लेखन झाले असल्याने त्या व्यक्तीच्या स्वभावाचे दर्शन गुणदोषांसह होते. विनोदी लेखन असेल तर वाचक हसत हसत त्या व्यक्तिचित्राचा आस्वाद घेतो.

'गणा भपट्या' हे असेच एक व्यक्तिचित्र व्यंकटेश माडगूळकरांनी रेखाटले आहे.

त्याचे नाव गणा पाटील. हा एक आडमाप माणूस. ताकदीने आणि मनानेही. गणाला पाच भाऊ. गणा मात्र काहीही काम करीत नसे. दोन-चार वेळाभाकरी खाऊन गावात हिंडत असे किंवा झाडाच्या सावलीला बसून राही. अशा गणूच्या स्वभावाचे वर्णन करताना लेखक लिहितो, ''गणा मनाने खुनशी नव्हता, तावीटही नव्हता. उलट तो नेहमी हसरा असायचा. कुणी एखाद्या कुत्र्याला धोंडा हाणला आणि ते केकाटत पळाले की, वाटेत थांबून तो खो-खो हसायचा. कुणाशी सहज बोलताना तो हसायचा, खरं तर यात हसण्यासारखं काय आहे? पण या गड्याला हसू यायचे, सारखे हसू यायचे. लोक गंमतीने म्हणायचे, 'त्याला सटवाई हसवते'. म्हणजे गणा वेडा होता असे नव्हे, पण साधारण माणसापाशी असते ती सावधगिरी, व्यवहारज्ञान, हुषारी त्याच्यापाशी नव्हती. त्याचे आपले वागणे सरळसोट असे. म्हणून लोक त्याला आडमाप म्हणत. भोळसट म्हणत, कुणी वेडसरही म्हणत. भपट्या हे काही त्याचे आडनाव नव्हते. पण लोकांनी हे नाव त्याला दिले होते.'' लेखकाने यातून साध्या, सरळ मार्गाने जगणारा आणि स्वत:च्या विचाराने जगणारा गणा भापट्या रेखाटला आहे. व्यंकटेश माडगूळकर हे ग्रामीण कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. सामान्य पण प्रादेशिक गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध असलेल्या जीवनाचे चित्रण त्यांच्या व्यक्तिचित्रातून येताना दिसते. एकूणच ही स्वभाववर्णने व्यक्तीची स्वभाववैशिष्ट्ये कळण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

**माणूस म्हणून वेगळेपण:**

लेखक हा कलावंत असतो. तो सार्वजनिक जीवनात हिंडत-फिरत असताना, त्याच्या सहवासात आलेल्या, आजूबाजूच्या परिसरातील माणसाकडे तो डोळसपणे पाहत असतो. जी माणसे इतरांपेक्षा वेगळी जगताना दिसतात, ज्यांची जीवनावर निस्सीम श्रद्धा आहे, ते कसल्यातरी कल्पनेच्या मागे, ध्येयाच्या मागे, लागलेले असतात. त्यांचे संपूर्ण आयुष्य त्या कल्पनेला, ध्येयाला वाहिलेले आहे, ती माणसं लेखकाच्या मनात घर करून राहिलेली असतात. अशा वेगळेपणाने जीवन जगणाऱ्या माणासांना समाजासमोर आणावे, त्यांच्या कार्याचे दर्शन घडवावे ह्या हेतूंनी अशी व्यक्तिचित्रे लिहिली जातात. मराठीमध्ये अशी अनेक व्यक्तींची व्यक्तिचित्रे लिहिली गेली आहेत. उदा. 'उपेक्षितांचे पहिले पुढारी-महात्मा जोतीराव फुले' हे व्यक्तिचित्र प्र.के. अत्रे यांनी लिहिले आहे. महाराष्ट्रात अनेक मोठी माणसे होऊन गेली त्यांपैकी म. फुले एक होत. म.फुले हे कर्ते सुधारक होते. क्रांतिवादी होते. भ्रामक समजुती आणि अर्थशून्य समाजविघातक धर्मकल्पना यांवर टीका करून समाजास जागृत करण्याचे काम त्यांनी केले. सामाजिक विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य यांची साधकबाधक चर्चा केली. त्यांच्या कार्याचे महत्त्व ओळखून लोकांनी त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली. या पदवीबाबत प्र.के. अत्रे

लिहितात, ''महात्मा ही पदवी फुले यांच्या चार-दोन मित्रांनी दिली नव्हती. मुंबईस फुले यांच्या कार्याचे महत्त्व ओळखणारे लोखंडे, सुतराम लाड इत्यादी मंडळींनी कोळीवाड्यात प्रचंड सभा भरविली व त्या वेळी जनतेने स्वयंस्फूर्तीने 'महात्मा' ही पदवी फुले यांना देऊन त्यांचा गौरव केला. महात्मा गांधींनी सत्य आणि अहिंसा या तत्त्वांच्या आधारावर बहुजन समाजाला एकत्र आणून स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग दाखविला. जोतीबा फुले यांनी सत्य आणि समता या तत्त्वाचा सक्रिय संदेश देऊन टिकाऊ सामाजिक स्वास्थ्याचा आणि उन्नतीचा मार्ग जनतेला मोकळा करून दिला. महात्मा फुले यांची कामगिरी केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानला मार्गदर्शक ठरणारी अशी आहे.'' या वरील वर्णनातून म. फुले यांच्या कार्याची उदात्तता आपल्या लक्षात येते. त्यांना वेगळ्या समाजव्यवस्थेची जाणीव झालेली होती. ती जाणीव म. फुले आपल्या कार्यातून देताना दिसतात. प्र.के. अत्र्यांनी त्यांच्या थोडक्या पण महत्त्वपूर्ण कार्याची ओळख करून देऊन म.फुले यांचे प्रभावी व्यक्तिचित्र शब्दबद्ध केले आहे. प्र.के. अत्रे यांनी म. फुले यांच्या कार्याचा गौरव केला आहे. एक द्रष्टे समाजसेवक आणि क्रांतिकारक विचारवंत म्हणून जोतिबांचे व्यक्तिचित्र अत्रे रेखाटतात तसेच 'माणूस' म्हणून त्यांचे वेगळेपण दाखवितात.

'राहुल बजाज-स्वप्न पहिल्या क्रमांकाचे' हे यशस्वी उद्योगपतीचे व्यक्तिचित्र भा.र. साबडे यांनी रेखाटले आहे. राहुल बजाज यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण आहे. परखडपणा आणि स्वतंत्रपणे विचार करण्याची कुवत असलेला हा माणूस आहे. राहुल बजाज यांच्यावर गांधीवादी विचारसरणीचा प्रभाव आहे. त्यांचे प्रगतिशील धोरण, आधुनिक दृष्टिकोन, उत्तम व्यवस्थापन यामुळे त्यांनी आपल्या उद्योगक्षेत्रात यशस्वी भरारी घेतली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल भा.र. साबडे लिहितात,''मोठ्या माणसांबद्दल आदर, घरच्या माणसांवर प्रेम, असंख्य मित्रांचा स्नेह, बरोबरच्या सहकार्यांना दिला जाणारा योग्य सन्मान, समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींबद्दल कृतज्ञता अशा एक ना अनेक भावनांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न झालेले आहे. पण महत्त्वाकांक्षी उद्योजक ही त्यांची खरी ओळख म्हणता येईल. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर कोठल्याही उद्योजकात एक आत उसळणारी आग असावी लागते. ती त्यांच्यात भरपूर आहे. त्यामुळे ते सदैव कंपनीच्या विस्ताराच्या योजनेत नवे तंत्रज्ञान, नवी उत्पादने, नवी मार्केट यांच्या शोधात असतात. त्यांच्या अंतस्थ असलेली ही उसळणारी आग बहुधा त्यांना स्वस्थ बसू देत नसावी.'' या वर्णनातून आपल्यासमोर वात्सल्यपूर्ण, महत्त्वाकांक्षी, आधुनिक दृष्टिकोन असणारे, कर्तृत्वदक्ष उद्योगपती म्हणून राहुल बजाज समोर येतात.

भा.र. साबडे यांनी 'चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिज' अशा संस्थेचे सचिव म्हणून

काम केलेले आहे. त्यावेळी उद्योग जगतातील आपल्या कार्याने, उद्योगाने यशस्वी झालेल्या अनेक उद्योगपतींचा सहवास त्यांना लाभला. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आणि 'माणूस' म्हणून असलेल्या त्यांच्या वेगळेपणाची जाणीव समाजाला व्हावी म्हणून त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांसह ते व्यक्तिचित्र साकारताना दिसतात.

**व्यक्तीवैशिष्ट्ये :**

समाजामध्ये अशा कितीतरी व्यक्ती असतात, ज्या आपापल्या गुणवैशिष्ट्यांनी जगत असतात. अशा अनेक व्यक्तीचा सहवास लेखकास घडतो. तो लेखकाला आकर्षित करतो. माणूस म्हणून लेखक त्या व्यक्तीकडे पाहात असताना त्याची स्वत:ची अशी जीवन जगण्याची कल्पना, वेगळा गुण लेखकाला जाणवतो. त्यांच्या गुणाच्या वेगळेपणातून त्याची जीवनजाणीव वेगळी वाटायला लागते. तीच त्याची गुणवैशिष्ट्ये ठरतात. अशा त्याच्या गुणवैशिष्ट्यांतून लेखक व्यक्तिचित्र रेखाटतो. अशी अनेक व्यक्तिचित्रे कृ.द. दीक्षित, पु.ल. देशपांडे, प्र.के. अत्रे, व्यंकटेश माडगूळकर, वि.द. घाटे, रवींद्र पिंगे, विजय तेंडुलकर अशा लेखकांनी लिहिली आहेत. उदा. 'सखाराम गटणे' हे पु.ल. देशपांडे यांनी रेखाटलेले व्यक्तिचित्र अशाच स्वरूपाचे आहे. प्रत्येक साहित्यिकाच्या लिखाणातून एक-एक वाक्य निवडून त्याखाली त्या साहित्यिकाची सही घेण्याची आवड सखारामला असते. तो सतत साहित्यिक भाषेत विलक्षण छापील बोलतो. पण भाषेचा छापीलपणा कमालीचा खरा वाटतो. त्याचे बोलणे ससंदर्भ असते. त्याला वाचनाची भयंकर आवड. तो पुस्तक नुसता वाचतो असे नव्हे तर प्रत्येक पुस्तकाचे समालोचन तो लिहितो. ती वही सखारामने लेखकाला दाखविली होती. याबाबत पु.ल. देशपांडे लिहितात, ''गटण्याने प्रत्येक पानावर समालोचन लिहिले होते. पुस्तकाच्या वाचनाला लागलेला समय-साडेआठ ते एक वाजून पस्तीस मिनिटे. पृष्ठसंख्या दोनशे बत्तीस पाने. पुढे लेखकाचे संपूर्ण नाव, प्रकाशकाचे नाव, पत्ता, किंमत अशी माहिती होती. आणि मग खाली समालोचन होते. 'कथावस्तू आकर्षक आहे. पात्रनिर्मिती विलोभनीय आहे. कथा मुंबई, नागपूर व लखनौ ह्या तीन स्थलात घडते - असा प्रत्येक पुस्तकाचा सुंदर अक्षरात पंचनामा केला होता. गटण्याचा हा 'व्यासंग' पाहून थक्क झालो. शब्द तर डबक्यात शेवाळ माजावे तसे माजले होते. नेत्रदीपक काय, आल्हादक काय, मनाची प्रगाढ खोली काय - छे ! पोट साफ करायच्या औषधासारखे, तोंडातले ते शब्द साफ करणारे एखादे औषध का नाही निघत, ह्या विचारात मी पडलो.'' सखारामची साहित्याबद्दल आणि साहित्यिकाबद्दल असणारी निष्ठा, त्याची वाचनाची व मूल्यमापनाची पद्धत, त्याची विनयशीलता यांतून सखाराम गटणेचे प्रभावी व्यक्तिचित्र पुलंनी रेखाटले आहे. सतत साहित्यिक भाषेत बोलणारा गटणे लेखकाला कसा अस्वस्थ

आणि आकर्षित करीत होता याचे ते चित्रण आहे.

काका कालेलकरांचे प्रभावी व्यक्तिचित्र 'काकांची सोनेरी सायंकाळ' या लेखातून रवींद्र पिंगे यांनी रेखाटले आहे. कमीत कमी शब्दांत पिंगे यांनी काकांची गुणवैशिष्ट्ये सांगितली आहेत. यातून एक उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे राहते. काका कालेलकर हे शिक्षक होते. त्यांचा स्वाध्याय अविरत चालू होता. त्यांचे वाचन अफाट होते. काका नेहमी सूत्रमय आणि मर्माचे बोलतात. बोलत असताना अगोदर ते तुम्हाला विश्वासात घेतात आणि काय सांगावयाचे असेल ते सांगतात. काका सदा प्रसन्न असतात. त्यांची प्रसन्न प्रज्ञा आणि प्रसन्न मन कधीच कोमेजत नाही. काकांबद्दल रवींद्र पिंगे लिहितात, ''नव्वदीच्या उंबरठ्यावरच्या काकांचं साधं बोलणं सुद्धा असं बंदरावरल्या वाऱ्यासारखं भुळूभुळू वाहात असतं. तुम्ही नुसतं पुढं होऊन ते झेलायचं असत. हा ताठ माणूस केवढ्या प्रचंड अनुभवाचा धनी झाला. प्रत्येक ठिकाणी चित्तात समर्पणबुद्धी वागवून विद्यार्थी झाला; मास्तर झाला; हिमालयातला साधक झाला; राजबंदी झाला; हिंदी प्रचारक झाला; कोकणी प्रचारक झाला; लोकसाहित्याचा संकलक झाला. आश्रमीय स्वयंसेवक झाला; पन्नास पुस्तकं गाठीशी असलेला गुजरातीतला श्रेष्ठ शैलीकार झाला; वेदान्ती झाला; अर्धी पृथ्वी पायाखाली घालणारा अट्टल पदयात्री झाला; मूलोद्योगातला मर्मज्ञ झाला; संपादक झाला; कोशकार झाला आणि आता मधुरपणे निर्मम होत चालला आहे.'' या वर्णनातून काका कालेलकरांचे एक भव्य व्यक्तिमत्त्व आपणासमोर साकार होते. काका व्यासंगी अभ्यासक होते. काकांच्या कार्याचा पसारा दांडगा होता. सतत उद्योगी आणि प्रसन्न असणारे काका आनंदयात्री होते. त्यांची नव्वदी ही तर त्यांच्या जिंदगीची सोनेरी सायंकाळ होती. लिहिणे, वाचने, चिंतन करणे, शुभाशीर्वाद देणे हा तर त्यांचा दिनक्रम असतो. रवींद्र पिंगे यांनी काका कालेलकरांची जीवनशैली अतिशय तटस्थपणे रेखाटली आहे. काकांच्या व्यक्तिचित्रातून आपणांस, लाभलेल्या जीवनामध्ये 'आनंदयात्री' म्हणून कसे जगावे याचा बोध होतो. त्यांच्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख आपणांस होते.

**अवलिया स्वभाव व लकबी :**

समाजामध्ये जितक्या व्यक्ती तितके त्यांचे वेगवेगळे स्वभावगुण असतात. त्याच्या सारखा माणूस तोच असतो. दुसरा नाही. पण समाजाने ठरविलेल्या काही पारंपरिक जीवनरेषेच्या बाहेर जाऊन एखादी व्यक्ती जगायला लागली की ती चर्चेचा विषय ठरते. त्या व्यक्तीच्या जगण्याकडे, जीवनाकडे समाज लक्ष ठेवतो, टवकारून पाहतो. पण अशा चाकोरीबाहेर जाऊन जगण्याऱ्या व्यक्तीचे, तिचे तिचे असे काही जीवनाचे निकष असतात, तत्त्वज्ञान असते. ती ते तत्त्वज्ञान आपल्या जीवनात उतरवून आत्मसात करते

तेव्हा ती व्यक्ती आपणांस 'अवलिया' वाटायला लागते. अवलिया म्हणजे साधू, विदेही पुरुष, लहरी व्यक्तिमत्त्व किंवा छंदिष्ट मनुष्य असा साधारण अर्थ आपणांस घेता येईल. अशा अनेक व्यक्तींवरती मराठीमध्ये व्यक्तिचित्रे लिहिली गेली आहेत. तसेच विशिष्ट 'लकबी' असणाऱ्या अनेक व्यक्ती व्यक्तिचित्राचा विषय झाल्या आहेत. लकब म्हणजे खोड किंवा व्यक्तीच्या ठिकाणी असलेला दुर्गुण. व्यक्तीच्या ठिकाणी असलेली खोड ही पूर्णपणे दुर्गुणच असते असे नाही, पण प्रामुख्याने ती लकब, दुर्गुणाचा भाग बनलेली असते. ते दुर्गुण किंवा त्या व्यक्तीची खोड यामुळे ती व्यक्ती नजरेत भरते, इतरांपेक्षा वेगळी वाटायला लागते. पु.ल. देशपांडे यांच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास त्या व्यक्ती 'वल्ली' असतात. अशा व्यक्ती जशा असामान्य असू शकतात तशा सामान्यही असतात किंवा अतिसामान्यही असतात. इथे फक्त व्यक्तीच्या जीवन जगण्याला महत्त्व आहे. ते कोण जगतो त्याला महत्त्व नाही.

लेखकाला समाजजीवनामध्ये अशा अवलिया स्वभावाची आणि वेगवेगळ्या लकबीची माणसं, व्यक्ती आकर्षित करतात. अशा व्यक्तींचे आचार-विचार, जगण्याची रीत, वेशभूषा, तिचे बोलणे, चालणे, विक्षिप्तपणा, तिचे जीवनविषयक तत्त्वज्ञान लेखक व्यक्तिचित्राच्या रूपाने समाजासमोर मांडत असतो. उदा. 'गाडगे महाराज' या प्र.के. अत्र्यांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रातून गाडगे महाराजांच्या अवलिया स्वभावाची कल्पना येते. डोक्यावर खापर आणि हातात खराटा घेऊन ते आपल्या जीवनातून स्वच्छतेचा संदेश देत राहिले. म्हणून त्यांना 'गाडगे महाराज' अशी पदवी लोकांनी दिली. 'झाडूचे तंत्र' त्यांनी आणले. ते खराट्याचे बादशहा आहेत. बाबा महान समाजसेवक होते. कर्ते सुधारक होते. कीर्तनाखेरीज त्यांच्याजवळ जनतेला देण्यासाठी दुसरे काहीही नाही. त्यांची वेशभूषाही एखाद्या अवलिया व्यक्तीसारखी होती. त्यांच्या वर्तणुकीविषयी प्र.के. अत्रे लिहितात, ''कोणत्याही एका गावात दोन दिवसांपेक्षा अधिक ते राहत नाहीत. वाऱ्यासारखे ते रात्रंदिवस वाहत असतात. कोणाच्याही घरात ते मुक्कामाला जात नाहीत. रात्री रस्त्याच्या कडेला एखाद्या झाडाखाली झोपतात. सतरंजीवर किंवा घोंगडीवर बसत नाहीत. घरात आलेच तुमच्या, तर ते जोड्यासारखे कुठे तरी बाजूला बसतील. तुम्ही त्यांना फुले, हार दिलेत तर ते पुन्हा तुमचे तुम्हालाच परत देतील. वाटेत जाता-जाता भाकरीचा एखादा शिळापाका तुकडा कोणाकडे तरी मागावयाचा, तेवढा खायचा आणि पराळातून पाणी प्यायचे'' या वर्णनातून गाडगेबाबांचा अवलिया स्वभाव लक्षात येतो. 'साधी राहणी उच्च विचारसरणी' या विचारांचे तंतोतंत उदाहरण म्हणजे गाडगेबाबा होय. कुठल्याही गोष्टीची कसलीही अपेक्षा न ठेवता निरपेक्ष वृत्तीने जीवन जगणारा हा थोर समाजसेवक होता. 'समाजसेवा हीच ईश्वरपूजा' हा मंत्र जोपासणारा तो क्रांतिकारक

होता. 'तुडुंब भूतदया' हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होते. स्वच्छता, शिक्षण आणि स्वावलंबन याशिवाय सामान्य जनतेचा उद्धार होणार नाही हा उपदेश त्यांनी दिला. प्र.के. अत्रे यांनी गाडगेबाबा यांच्या व्यक्तिचित्रातून या साधू पुरुषाचे चित्र रेखाटून त्याने आपल्या कार्यातून समाजप्रबोधनाचे काम कसे केले आहे आणि त्या कार्याचा आदर्श सर्वांनी कसा घेतला पाहिजे हे सांगितले आहे.

'अंतू बर्वा' हे व्यक्तिचित्र अशाच स्वरूपाचे आहे. अंतू बर्वाच्या व्यक्तिचित्रातून कोकणी माणसाची खास वैशिष्ट्ये लक्षात येतात. कोकणातील मंडळी एकूणच एकवचनी म्हणजे एकेरी बोलण्याची खोड असलेली. कोकणी माणसाला सतत तिरके बोलण्याची सवय. अंतू बर्वा तसाच होता. तो बोलत असताना अशा काही शब्दांचा वापर करावयाचा की त्याचा अर्थ थोड्या वेळानंतर लक्षात यायचा किंवा त्याने केलेल्या स्पष्टीकरणातून लक्षात यायचा आणि हसू यायचे. हे सांगताना पु.ल. देशपांडे लिहितात, ''ह्या अंतूशेटनी माझ्या हातात कप दिला आणि त्या चहावाल्या पोराला, 'रत्नांग्रीच्या समस्त म्हयशी तूर्तास गाभण काय रे झंप्या?' असे म्हणून जाता-जाता चहाच्या रंगावर शेरा मारला आणि बशीत चहा ओतून फुर्र फुर्र फुंकायला सुरुवात केली. वास्तविक त्या पोऱ्याला 'चहात दूध कमी आहे' हे त्यांना सरळ सांगता आले असते. पण अंतूशेटचं काय, त्यांच्या आळीचे बोलणेच तिरके.'' या वर्णनातून अंतूच्या बोलण्याच्या लकबीची कल्पना येते. निसर्गसंपन्न अशा परिसरात राहणाऱ्या या माणसाचे वागणे आणि बोलणे मात्र कोकणातील नागमोडी रस्त्यासारखे आहे. यांच्या बोलण्याचा रस्ता कधी कुठे वळेल हे सांगता येत नाही. पु.ल. देशपांडे यांनी कोकणी माणसाचा प्रतिनिधी असणारा हा अंतू बर्वा, याची जीवनशैली, बोलण्याची लकब, जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन मार्मिकपणे मांडून वेगळा अंतूशेट आपल्यासमोर साकार केला आहे. विशिष्ट लकबी असणाऱ्या किंवा अवलिया असणाऱ्या अशा अनेक व्यक्ती मराठी साहित्यात व्यक्तिचित्रांतून आपल्यासमोर येतात .

**कलावंत म्हणून भावलेल्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र :**

महाराष्ट्र ही कलाकार व कलावंतांची भूमी आहे. इथे संगीतकार, गायक, वादक, चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक, नृत्यकलाकार इत्यादी कला क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपल्या कलेच्या आधारे आपला एक स्वतंत्र ठसा उमटविला आहे. साऱ्या संगीतप्रेमी, कलाप्रेमी मराठी माणसाला या कलाकारांनी आपल्या अभिनयाच्या, गायकीच्या माध्यमातून वेड लावले आहे. या क्षेत्रातील काही मनामध्ये ठसणाऱ्या, कलेच्या क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या व्यक्ती लेखकाला आकर्षित करतात. हे सांगण्याच्या उर्मीतून लेखक कलाकार व कलावंताचे व्यक्तिचित्र रेखाटत असतो. उदा. 'अपूर्व सूर : सोनाली

वाजपेयी' हे व्यक्तिचित्र अशाच स्वरूपाचे आहे. ज्योती दाते यांनी कौतुकाच्या भावनेतून हे व्यक्तिचित्र लिहिले आहे. दहा वर्षाची चिमुरडी गायिका सूरमणी सोनाली वाजपेयी हिचे हे व्यक्तिचित्र आहे. सोनाली म्हणजे एक चमत्कार आहे. तिच्या आवाजात विलक्षण गोडवा आहे. लहान मुलगी गाणे गाते असे वाटतच नाही. सोनाली सर्व प्रकारची गाणी म्हणते. शास्त्रीय संगीतातील राग, ठुमरी, गझल, सिनेमातील गाणी इ. अनेक आठवणी व तिचा सहवास यातून भावलेली सोनाली वाजपेयी लेखिकेने चित्रित केली आहे. ज्योती दाते यांनी सूरमणी सोनाली वाजपेयी ह्या वयाने छोट्या पण श्रेष्ठ गायिकेचे वर्णन करून तिच्यातील गायकीची कला चित्रित केली आहे.

'शांतारामबापू : एक भिन्न स्वर' हे एक उत्कृष्ट व्यक्तिचित्र आहे. एक कलाकार व चित्रपटनिर्माते म्हणून शांतारामबापू यांच्या सहवासात जाण्याचा योग रवींद्र पिंगे यांना आला. शांतारामबापूंच्या यशाचे रहस्य शोधण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. एकसूत्री, एकहाती, तडाखेबंद कारभार यांमध्ये त्यांच्या यशाचे मर्म आहे. शांतारामबापूंची दृष्टी आधुनिक होती. 'राजकमल' हा स्टुडिओ त्यांनी अद्ययावत केला. बापू हे निर्व्यसनी होते. परिश्रम, काम करण्याची सूत्रबद्ध पद्धत, शिस्त, वेळेचे बंधन, यामुळे त्यांनी यश आपल्याकडे खेचून आणले. वयाच्या ऐंशीव्या वर्षी सुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह होता. 'काम हीच माझी एकमेव विश्रांती' असे शांतारामबापू म्हणत. त्यामुळेच बापूच्या राजकमल स्टुडिओला जगभर प्रसिद्धी मिळाली. शांतारामबापूंच्या आठवणी व संवाद याद्वारे एका श्रेष्ठ कलावंताचे प्रभावी व्यक्तिचित्र रवींद्र पिंगे यांनी साकारले आहे. रवींद्र पिंगे हे एक चांगले व्यक्तिचित्रकार आहे. 'तुषार आणि तारे' या ग्रंथामध्ये त्यांनी अनेक कलाकारांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. यशस्वी चित्रपटनिर्माते म्हणून शांतारामबापू याचे व्यक्तिमत्त्व त्यांनी रेखाटले आहे. एक यशस्वी कलावंत म्हणून लेखकाला शांतारामबापू कसे भावले याचे चित्रण ते या व्यक्तिचित्रातून करताना दिसतात. अशा अनेक कलावंत आणि कलाकार यांची व्यक्तिचित्रे मराठीमध्ये लिहिली गेली आहेत. अशा प्रकारे व्यक्तिचित्राचे स्वरूप आपणांस दिसून येते.

**व्यक्तिचित्राची अभिव्यक्ती :**

व्यक्तिचित्राचे स्वरूप पाहिल्यानंतर व्यक्तिचित्र कसे साकार केले जाते याचा विचार करणे आवश्यक वाटते. व्यक्तिचित्रलेखनाचा विचार करताना लक्षात येते की, मराठीमध्ये अनेक लेखकांनी आपल्या व्यक्तिचित्रसंग्रहांमधून अनेक व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्या व्यक्तिचित्रांचा विचार करता आपल्या ध्यानात येते की, लेखकाने व्यक्तिचित्र साकार करताना व्यक्तीचे वर्णन, अनुभवकथन, प्रसंगचित्रण, आठवणी, माणसाच्या मनाचा, स्वभावाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून लेखकाला जाणवलेल्या

व्यक्ती, भावलेली माणसं तो व्यक्त करतो.

**वर्णनात्मकता :**

व्यक्तिचित्रलेखन करीत असताना लेखक व्यक्तीचे वर्णन करीत असतो. व्यक्तीचे वर्णन व्यक्तिचित्रलेखनात महत्त्वाचे आहे, मग ते बाह्यवर्णन असो किंवा अंतरंगाचे. त्यातून लेखकाला आपल्या लेखनातून जी व्यक्ती उभी करावयाची आहे, ती परिणामकारकपणे उभी करता येते. लेखक व्यक्तीचे वर्णन शब्दांतून करीत असतो. तिची वेशभूषा, केशभूषा, स्वभाव, लकब, बोलणे, चालणे, शरीराचे वर्णन, तिचा वेगळेपणा यातून ती व्यक्ती साकार करीत असतो. ती इतकी प्रभावीपणे तो साकार करतो की, त्या व्यक्तीचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष चित्रच आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. चित्रमयता हे श्रेष्ठ व्यक्तिचित्राचे ठळक वैशिष्ट्य आहे. ती व्यक्ती एखादा कलाकार, समाजसेवक, खेळाडू, उद्योगपती, साहित्यिक असेल तर त्या व्यक्तीच्या कार्याच्या वर्णनातून लेखक समाजासमोर आदर्श मांडत असतो. सर्वसामान्य व्यक्ती असेल तर तिच्या वेगळ्या जीवनाकडे लक्ष वेधत असतो. अशी व्यक्तिचित्रे मराठीमध्ये अनेक लेखकांनी रेखाटली आहेत.

व्यक्तिचित्रामध्ये 'व्यक्ती' हा महत्त्वाचा घटक असतो. लेखकाने जी व्यक्ती पाहिलेली असते, अनुभवलेली असते तिची म्हणून एक शारीरिक यष्टी असते, ठेवण असते. तीतून व्यक्तीची काही गुणवैशिष्ट्ये साकार होत असतात. उदा. वि.द. घाटे, 'एक प्रार्थनासमाजिष्ट' या व्यक्तिचित्रात विठ्ठलरावांचे वर्णन करताना लिहितात, ''माझ्यासमोर ऐंशी वर्षाचा म्हातारा उभा होता. डोकीला भांडारकरी पद्धतीचे पांढरे मळकट पागोटे, अंगात नुसताच कोट, खिशात अंग पुसावयाचे खादीचे एक लहानसे फडके, हातात भला जाडा उंच सोटा, काना-नाकातून केसांचे पुजक्यांचे पुंजके! डोळ्याच्या कोपऱ्यातून व नाकातून पाणी गळत होते. डोळे? डोळ्यात तेज नव्हते, जीव नव्हता, भावना नव्हत्या, दोन निर्जीव काचेच्या तुकड्याप्रमाणे ते मजकडे पाहात होते. पण ओठ मात्र हसत होते-सजीव होते.'' या वर्णनातून आपल्यासमोर जुन्या पद्धतीचा पोषाख करणारी, शरीराकडे फारसे लक्ष न देणारी, पारंपरिक पद्धतीने जीवन जगणारी, प्रफुल्लित नसलेली पण कोणत्या तरी कामात गुंतून राहणारी व्यक्ती समोर येते.

'सखाराम गटणे' याचे वर्णनही अशा प्रकारचे आहे. पु.ल. देशपांडे लिहितात, ''सखाराम गटण्याच्या चेहऱ्यावर हवा गेलेल्या फुटबॉलचा भाव आहे. त्याचे प्रथम दर्शन झाले ते देखील त्याच भावात. हा त्यावेळी मॅट्रिकच्या वर्गात होता. अर्ध्या विजारीत पांढरा सदरा खोचलेला, नाकासमोर गांधी टोपी घातलेला, लहानसे भावशून्य डोळे, काळा रंग, वेडेवाकडे दात अशा थाटात हा मुलगा त्या हॉलच्या दारात उभा राहिला होता.'' या सखारामच्या वर्णनातून आपल्यासमोर अतिशय नम्रपणे वागणारा

आणि मोठ्या लेखकांबद्दल आदरभाव बाळगणारा, एखादी गोष्ट मनात घेतली की प्रामाणिकपणे शेवटपर्यंत करीत राहणारा साधा पोरगा आपल्या पुढे उभा राहतो.

थोडक्यात, व्यक्तिचित्र साकार करताना व्यक्तिवर्णन महत्त्वाचे असते. ते काही प्रमाणात का होईना करावे लागते. त्याशिवाय व्यक्तीचे वेगळेपण व त्याचे व्यक्तिमत्त्व परिणामकारक होऊ शकत नाही.

**अनुभवकथन :**

लेखक जेव्हा साहित्यनिर्मिती करीत असतो तेव्हा अनुभवकथन हे फार महत्त्वाचे असते. अनुभवाशिवाय तो आत्मविश्वासपूर्ण लेखन करू शकत नाही. लेखकाला आलेले वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव तो साहित्यातून कथन करीत असतो. व्यक्तिचित्राच्या संदर्भात बोलायचे झाल्यास लेखकाने अनुभवलेल्या, त्याच्या सहवासात आलेल्या, आजूबाजूच्या परिसरातील त्याने पाहिलेल्या व्यक्ती काही वेगळेपणामुळे लेखकाच्या लक्षात राहतात. त्या व्यक्तीच्या सहवासात काही कडूगोड, चांगले व वाईट अनुभव आलेले असतात. त्या आलेल्या अनुभवांतून जाणवलेली व्यक्ती समाजासमोर मांडावी या हेतूने लेखक व्यक्तिचित्र रेखाटतो. काही घटना व प्रसंग यांच्या माध्यमातून लेखक अनुभवकथन करीत असतो. त्यामुळे त्या व्यक्तिचित्राला एक प्रकारचे वजन प्राप्त होते. त्यातून त्या व्यक्तीची जीवन जगण्याची पद्धत, परिस्थिती, त्याची जीवनाबद्दलची कल्पना, विचार करण्याची पद्धत व इतर अनेक अंगे उलगडत जातात. ती व्यक्ती वेगळ्याप्रकारे आपल्यासमोर साकार होते. लेखकाचा अनुभव जेवढा संपन्न किंवा समृद्ध असतो तितकी त्याची कलाकृती किंवा त्याचे व्यक्तिचित्र जिवंत आणि वास्तव स्वरूपात साकार होते.

'आमच्या सुंदराबाई' हे व्यक्तिचित्र अशाच प्रकारचे आहे. कृ.द. दीक्षितांनी काही प्रसंगांच्या आधारे हे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. सुंदराबाई या प्रसिद्ध गायिका आहेत. मोठ्या कलावंत आहेत. त्यांच्या वागण्यात आणि बोलण्यात विलक्षण मार्दव आहे. सुंदराबाईंचे आकाशवाणी केंद्रात कार्यक्रम होत असत. तसेच बालगंधर्वांचेही कार्यक्रम आकाशवाणीमध्ये होत असत. एके दिवशी अचानक या दोन्ही मोठ्या कलावंतांची भेट झाली. त्या भेटीच्या प्रसंगाचे वर्णन करताना कृ.द. दीक्षित लिहितात,''दोघांनी एकमेकांना पाहिले आणि 'दादा' म्हणून बाईंनी आणि 'ताई' म्हणून बालगंधर्वांनी एकमेकांकडे झेप घेतली आणि कडकडून भेटले. बाई सुंदराबाई अस्पष्ट हुंदके देत आनंदाश्रू गाळीत होत्या आणि बालगंधर्व त्यांच्या मृदुरम्य स्वरात 'ताई' म्हणून हाक मारीत होते. फार वर्षांनंतर ही दोन कलाहृदये एकत्र येत होती. फार वर्षांनंतर वैभवाच्या शिखरावरून उतरलेल्या या दोन भावाबहिणीची माया एकरूप झाली होती. फार दिवसांनी कलावंताला कलावंत

भेटल्याची श्रावणसर झडली होती आणि क्वचितच येणारा हा कपिलाषष्ठीचा योग साधायला आम्ही भाग्यवंत ठरलो होतो. टप्टप् वाहणाऱ्या अश्रूंनी एकमेकांच्या काय काय व्यथा, काय काय गुपिते, काय काय सुंदर स्मरणधन मोकळे केले असेल ते त्या दोन अद्वितीय कलावंतांनाच ठाऊक!'' लेखकाने या दोन मोठ्या कलावंतांच्या भेटीचे वर्णन चांगले केले आहे. दोन्ही कलावंतांच्या ठिकाणी असणारा एकमेकांबद्दलाचा स्नेहभाव, भाऊबहिणीचे प्रेम, जिव्हाळा त्यातून व्यक्त होतो. लेखकाने प्रत्यक्षात घेतलेल्या अनुभवातून हे व्यक्तिचित्र रेखाटल्याने ते चांगले झाले आहे. दोघेही प्रसिद्ध कलावंत असून त्यांच्या ठिकाणी असणारी नम्रता आपल्याला विचार करायला लावते. मराठीमध्ये अनेक लेखकांनी आपल्या अनुभवकथनाच्या आधारे व्यक्तिचित्रे जिवंत आणि परिणामकारक केली आहेत.

**भूतकालीन कथन :**

लेखक आपल्या जीवनामध्ये पाहिलेल्या, अनुभवलेल्या घटना, प्रसंग, व्यक्तीची नोंद ठेवत असतो. एखादी साहित्यकृती निर्माण करताना तो भूतकाळातील घटना, प्रसंग यांचे वर्णन करून साहित्यकृती निर्माण करीत असतो. लेखकाची जी कृती नवनिर्मितीची, तीच व्यक्तिचित्रलेखनाची असते. लेखकाला जाणवलेल्या, भावलेल्या पण इतरांपेक्षा गुणवैशिष्ट्यांनी वेगळे असलेल्या किंवा व्यक्ती सामान्य असूनही आपल्या जीवनाकडे लक्ष वेधून घेणारे व्यक्तिमत्त्व जिच्याकडे आहे अशा व्यक्तीविषयी भूतकालीन जीवनाच्या आधारे सांगण्याचा लेखक प्रयत्न करतो. 'मराठी माणसे, मराठी मने' या पुस्तकात प्र.के. अत्र्यांनी मोठ्या व्यक्तीने केलेल्या कार्याच्या आधारे त्यांचा कार्याचा गौरव करून व्यक्तिचित्रे साकार केली आहेत. उदा. म. जोतिराव फुले, धों.के. कर्वे, गाडगेबाबा,लो. टिळक इत्यादी.

'माणिकबाई दाते' यांचे व्यक्तिचित्र ज्योती दाते यांनी रेखाटले आहे. माणिकबाई या ज्योती दाते यांच्या सासूबाई आहेत. माणिकबाईंचे घर एकत्र कुटुंबपद्धतीचे त्यामुळे घरात सतत वीस-पंचवीस माणसे असायची. माणिकबाई प्रेमळ आणि मनाने उदार असल्याने त्यांच्या जवळ दूरची, सासरची, आजोळची मुले राहायची. त्यांना त्या सांभाळायच्या. त्यांच्या गुणाचे कौतुक करताना लेखिका लिहिते, ''बाईच्या हातचं पिठलं म्हणजे अमृत. त्याची चव ज्यांनी ज्यांनी चाखली, तो ती जन्मभर विसरणार नाही, मग ते पन्नास माणसांसाठी केलेलं असो की पाच माणसांसाठी. खरं तर कोणताही पदार्थ चार-पाच माणसांसाठी करणं त्यांना कधी जमलं नाही. अगदी फार झालं तर दहा-पंधरा माणसांना पुरेल एवढा तरी पदार्थ हवाच. त्यापेक्षा लहान माप त्यांच्या हिशेबात नव्हतं.'' या वर्णनातून माणिकबाई दाते या सुगरण होत्या आणि त्या मोठ्या

मनाच्या होत्या हे लक्षात येते. त्यांनी आपल्या जीवनात माणसांना फक्त प्रेम दिले हे समजते.

वि.स. खांडेकर, पु.ल. देशपांडे, कृ.द. दीक्षित, वि.द. घाटे, भा.र. साबडे, वि.ह. कुलकर्णी, शं.के. पेंडसे, य.दि. फडके, इरावती कर्वे, रामकृष्ण बाक्रे, गंगाधर गाडगीळ, रवींद्र पिंगे अशा अनेक लेखकांनी भूतकालीन घटना प्रसंगावरून व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. भूतकालीन कथनशैलीच्या आधारे लेखकाने संबंधित व्यक्ती जिवंत केल्या आहेत. काही व्यक्तिचित्रे आदर्शवत व्यक्तींची आहेत तर काही संबंधितांच्या कार्याचा परिचय घडवित विचारांना प्रेरणा देणारी आहेत.

**आठवणी :**

व्यक्तिचित्रलेखनात 'आठवणीं' ना फार महत्त्व आहे. लेखक एकंदर जीवनामध्ये पर्यटन करताना आपल्याला भेटलेल्या व्यक्तीच्या उदा. कलाकार, कलावंत, साहित्यिक, खेळाडू, मित्रमंडळी, नातेवाईक इत्यादींच्या सहवासातील अनेक आठवणी टिपून ठेवत असतो. त्या आठवणींतून त्याला भावलेली एखादी वल्ली तो व्यक्तिचित्राच्या माध्यमातून साकार करीत असतो. त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा देत असतो. तिच्या सहवासात झालेला आनंद लेखक अनुभवत असतो. त्या व्यक्तीचा घडलेला सहवास, घटना-प्रसंग यांतून आपल्या आठवणींना उजाळा देत असतो आणि व्यक्तिचित्र रेखाटत असतो. केवळ आठवणीनेच व्यक्तिचित्र साकार होते असे नाही तर व्यक्तिवर्णन, अनुभवकथन, प्रसंगचित्रण याप्रमाणेच त्या व्यक्तीच्या आठवणींना महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे त्या व्यक्तीचे चौफेर व्यक्तिमत्त्व कळण्यास मदत होते. लोकोत्तर व्यक्तीच्या कार्यातून, आठवणीतून व्यक्तिचित्रे साकार झालेली आहेत. व्यक्तीच्या आठवणीतून मानवी मनाला एक प्रकारचा आनंद मिळतो. मराठीतील अनेक लेखकांनी अशा प्रकारची व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. उदा. ज्योती दाते यांनी 'बेगम शोभा गुर्टु' यांचे असेच व्यक्तिचित्र रेखाटले आहे. शोभाताई प्रसिद्ध गायिका आहेत. त्यांच्या सुराला चिरंतन तारुण्याचं वरदान लाभलेल आहे. संगीताचा खजिना शोभाताईंनी रसिकांवर भरभरून उधळला. त्यांची गानप्रतिभा सतत नवी नवी रूप धारण करून रसिकाला भुलवीत राहिली. ज्योती दाते व शोभाताई यांच्या सतत भेटी होत असत. या भेटींतील काही आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. त्या लिहितात, ''शोभाताई भेटल्यावर, त्यांच्या जरा जवळ गेल्यावर, प्रकर्षाने जाणावणारा त्यांचा गुण म्हणजे त्यांचा कमालीचा प्रेमळ स्वभाव. गोव्याच्या मातीतच प्रेमळपणाचं खत मिसळलेलं असावं बहुधा. शोभाताईंच्या हृदयात अपरंपार माया, वात्सल्य भरलं आहे व जवळ येणाऱ्यावर त्या मायेचा अक्षरशः वर्षाव करीत असतात. त्यांच्या शिष्या म्हणजे तर त्यांना आपल्या

मुलीसारख्या वाटतात. शिष्यांनी कधीही यावं, घरच्यासारखं घरात त्यांच्यात मिसळून जावं, तृप्ती होईपर्यंत संगीत आत्मसात करावं. शोभाताई कधीच रागवायच्या नाहीत. कंटाळायच्या नाहीत. पुन्हा पुन्हा समजावून सांगतील. तरीही जमलं नाही तर, 'काही हरकत नाही, उद्या बघू' असं म्हणून धीर देतील. असं अखंड आणि अमर्याद प्रेम हाच त्यांना आपला मोलाचा ठेवा वाटतो. आठवणीच्या महासागरात डुबक्या मारताना हाती लागली ती सगळी प्रेमाची, मायेची अन वात्सल्याचीच रत्नं!''

ज्योती दाते यांनी सांगितलेल्या आठवणीतून शोभाताईचे व्यक्तिमत्त्व असे उलगडत जाते. त्यांच्या ठिकाणी असणारा मायेचा पाझर दिसून येतो. गुरू आणि शिष्य यांच्यात अंतर त्यांना मान्य नाही. शिष्यांना प्रेमानेच आपलेसे करायचे असते आणि त्यांना घडवायचे असते हा संदेश त्यांच्या या व्यक्तिचित्रातून मिळतो.

भा.र. साबडे यांनी आठवणीतून उद्योग क्षेत्रातील 'मोठी माणसं' उभी केली आहेत. या व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योजकांची व्यक्तिचित्रे आहेत. पुण्याची 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज' ही जिद्दी उद्योगाची संघटना. या संस्थेत भा.र. साबडे यांनी पस्तीस वर्षे सचिव म्हणून काम केले आहे. या प्रदीर्घ काळात त्यांना अनेक मान्यवर उद्योजकांचा सहवास लाभला. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या उद्योजकांबरोबर जवळून काम करता आले. त्यांच्याशी वैयक्तिक जवळीक, आपुलकीचे व अनौपचारिक संबंध ठेवता आले. हा लेखकाचा आयुष्यातला आनंदाचा ठेवा आहे. हा ठेवा त्यांनी व्यक्तिचित्राच्या माध्यमातून साकार केला आहे. जे.आर.डी. टाटा, शंतनुराव किर्लोस्कर, आबासाहेब गरवारे, दामुअण्णा पोतदार, नीलकंठ कल्याणी, राहुल बजाज, नवलभाऊ फिरोदिया, चंद्रकांत किर्लोस्कर, वि.म. देवल अशा मान्यवर उद्योजकांच्या व्यक्तिचित्रांचा समावेश 'मोठी माणसं' या संग्रहात आहे. या प्रत्येकाची कौटुंबिक माहिती, त्यांच्या उद्योगांची माहिती, कारखानदारीची भरभराट, त्यांचे व्यवस्थापन, त्यांच्या कामगारांविषयीचा आदरभाव, त्यांची प्रखर बुध्दिमता, प्रबळ इच्छा, सततची कार्यमग्नता, देशाबद्दलचा अभिमान, नवनवीन उत्पादने करण्याची धडपड इत्यादी अनेक गोष्टींच्या वर्णनातून साबडे यांनी ही 'मोठी माणसं' उभी केली आहेत. या व्यक्तिचित्रांतून देशातील तरुणासमोर त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवण्याचा लेखकाचा प्रयत्न उल्लेखनीय आहे. याप्रमाणे आठवणींच्या आधारे व्यक्तिचित्रे लिहिली गेली आहेत. त्यातून संबंधिताचे जीवन आणि कार्य यांचे दर्शन आपणांस घडते.

**प्रसंगचित्रण :**

व्यक्तिचित्र लिहीत असताना लेखकाला ती व्यक्ती आपल्या कोणत्या ना कोणत्या कलागुणाने, गुणवैशिष्ट्याने, स्वभावाने किंवा इतर कारणांनी आकर्षित करीत असते. लेखक त्या व्यक्तीच्या जीवनाबद्दल विचार करीत असतो. त्या व्यक्तीच्या जीवनात

आलेल्या प्रसंगांतून तो व्यक्तिचित्र चित्रित करीत असतो. त्या प्रसंगांतून ती व्यक्ती, तिचे अंतरंग उलगडत जाते. काही प्रसंग असे असतात की ते शब्दांतून सांगता येत नाहीत. पण त्या व्यक्तीच्या जगण्यातून मात्र आपल्या लक्षात येतात. उदा. व्यक्तीचे कारुण्य, दारिद्र्य परिस्थिती इ. 'प्रसंगचित्रण' हे व्यक्तिचित्राचे फार महत्त्वाचे अंग आहे. व्यक्तीच्या वर्णनातून व्यक्ती जितकी साकार होते त्यापेक्षा अधिक परिणामकारक ती त्या व्यक्तीच्या प्रसंगचित्रणांतून साकारते. मराठीमध्ये अनेक लेखकांनी व्यक्तीच्या वर्णनापेक्षा त्या व्यक्तीच्या जीवनातील मोजक्या पण परिणामकारक प्रसंगांतून ती व्यक्ती साकार केली आहे. प्रसंगचित्रणातून रेखाटलेली व्यक्ती माणसाला अंतर्मुख करते. विचार करायला लावते.

असाच एक प्रसंग व्यंकटेश माडगूळकरांनी 'धर्मा रामोशी' या व्यक्तिचित्रणांत रेखाटला आहे. धर्मा हा परिस्थितीने गरीब, पण प्रामाणिक काम करणारा रामोशी. लेखकाच्या घरची लहान-मोठी कामे तो करीत असे. धर्मा आता भलताच थकला होता. त्याची पोरगी बजा हिला तिच्या नवऱ्याने सोडून दिल्याने ती धर्माकडेच राहात होती. काम करून धर्माला हातभार लावीत होती. अन्न, वस्त्र, निवारा ह्या प्राथमिक गरजा त्यांच्या जवळ नव्हत्या. धर्माच्या जीवनातील प्रसंग सांगताना लेखक लिहितो, ''मला पाहताच तिनं पदर ओढला आणि तोंड बाजूला केलं. मी बोलणार होतो की, 'काय गं बजे, इतके दिवस त्या म्हाताऱ्याला का दिलास त्रास?' पण तसे न बोलता म्हणालो, 'आज तू आलीस दळण न्यायला? धर्मा बरा आहे ना?' तिनं मान हलवली आणि म्हणाली, 'जी, बरा हाय' आणि इतके दिवस बजा दळण नेण्यासाठी का येत नव्हती, आंबेचा शिसा देताना ती बाहेर का आली नाही, याचं कारण मला कळलं! बजाच्या अंगावर मी धर्माला दिलेलं धोतर होतं ! लुगड्यासारखा तिनं त्याचा उपयोग केला होता''. या चित्रणातून धर्मा रामोशाचे आत्यंतिक दारिद्र्य डोळ्यासमोर येते. जे दुःख शब्दांतून सांगता येत नाही ते लेखकाने या प्रसंगातून आपणास दाखवून दिले आहे. धर्माचे वास्तव जीवन तर आपल्या लक्षात येतेच पण ते पाहून मन अस्वस्थ होते. व्यंकटेश माडगूळकरांची सर्वच व्यक्तिचित्रे जिवंत आणि चालती-बोलती आहेत. दारिद्र्य हे त्यांच्या व्यक्तिचित्राच्या पाचवीला पूजले आहे. लेखकाने 'धर्मा रामोशी' या व्यक्तिचित्राच्या शेवटी सांगितलेला प्रसंग मनाला चटका लावणारा आहे. या प्रसंगचित्रणातून धर्माचे व्यक्तिचित्र विलक्षण परिणामकारक झाले आहे.

'प्रचंड' या व्यक्तिचित्रामधून विजय तेंडुलकरांनी प्र.के. अत्रे यांचे चित्रण केले आहे. तेंडुलकर 'मराठा' मध्ये नोकरीला होते. त्यामुळे लेखकाला हा जंगी माणूस पाहायला मिळाला. सतत माणसांच्या वर्दळीत राहणारा हा माणूस. १९६२ च्या लोकसभेच्या

निवडणुकीत पुणे मतदारसंघातून नानासाहेब गोरे यांनी प्र.के. अत्रे यांचा पराभव केला. त्यामुळे अत्र्यांच्या राजकारणी अवसानाला मोठा तडा गेला. प्र.के. अत्रे यांना हा पराभव वर्मी लागला. त्याचे वर्णन करताना विजय तेंडुलकर लिहितात, ''स्वर जड होता, मूड वाईट होता. कचेरीत वृत्तखात्याचा एक उपसंपादक आणि दुसरा मी एवढेच त्यावेळी हजर होतो. मी वर गेलो. ते केव्हापासून कोण जाणे, पीत होते. हातवाऱ्यानेच त्यांनी मला बसवून घेतलं, 'खलास! सगळे खलास!' एवढे एकच पालुपद अतिशय विषण्णतेने ते घोळवीत होते. पीत होते आणि तडफडत होते. 'आता कशाला काम करता? मराठा कशाला? काय उरले आहे?' असे ते पुन:पुन्हा विचारत होते. नजरेत घायाळ भाव होता. मुद्रेवरही वेदना होती. एरवी वजनदार वाटणाऱ्या देहाचे पोते बनले होते. मध्येच ते टेबलावर डोके टेकून पडत. मग म्हणत, 'काही तरी सांगा. गप्प काय बसलात? आता करायला काय राहिले? काही नाही. पेपर बंद करू या आता. सगळे घरी जा, व्हॉटस् देअर? व्हॉटस देअर टु फाईट फॉर? काही नाही...नथिंग'' या वरील प्रसंगचित्रणातून पराभवाने खचून गेलेले, हताश, निराश झालेले प्र.के. अत्रे दिसतात. साऱ्या महाराष्ट्राला आपल्या वक्तृत्वाने हलविणारे हे 'प्रचंड' व्यक्तिमत्त्व प्रसंगी किती हातबल होऊ शकते याची जाणीव होते. विजय तेंडुलकरांनी प्र.के. अत्रे यांची हातबल अवस्था कशी झाली होती याचे वस्तुनिष्ठ वर्णन केलेले आहे. त्यातून अत्रे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळे अंग उलगडले आहे. विजय तेंडुलकर हे परखडपणे लेखन करणारे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी प्र.के. अत्रे यांचे व्यक्तिचित्र वस्तुनिष्ठ भूमिकेतून चितारले आहे. लोक काय म्हणतात यापेक्षा आपण खरे काय अभिव्यक्त करतो याला तेंडुलकर महत्त्व देतात. त्यामुळेच 'प्रचंड' मधून प्र.के. अत्रे यांचे वेगळे व्यक्तिमत्त्व उलगडले आहे. प्रसंगचित्रणांतून अशी अनेक व्यक्तिचित्रे रेखाटली गेली आहेत.

**संवादात्मकता :**

व्यक्तिचित्राचे लेखन करताना अनेक लेखकांनी संवादाचा वापर करून ते व्यक्तिचित्र परिणामकारक केले आहे. व्यक्तिचित्रात आकर्षकता येण्यासाठी संवाद वापरले जातात. संवादामुळे एखादा प्रसंग दृश्य स्वरूपात साकारतो. नाटकातील संवादाला मागे रंगमंचाची पार्श्वभूमी असते त्यामुळे ते उठावदार होतात. व्यक्तिचित्राची निर्मिती करताना वातावरणाची निर्मिती शब्दांनी करावयाची असते. व्यक्तीचा परिचय व घटनांचे निवेदन रेखीव व समर्पक शब्दांनी करून ते चित्र वाचकापुढे जिवंत करावयाचे असते. अशा प्रकारचे व्यक्तिचित्रलेखन मराठीमध्ये झालेले आहे. अनेक लेखकांनी संवादात्मकतेचा वापर करून परिणामकारक व्यक्तिचित्रांची निर्मिती केली आहे. संवादातून व्यक्तिचित्रलेखन करण्याचा प्रयत्न रवींद्र पिंगे यांनी 'देवाघरचा पाऊस' मध्ये विजय तेंडुलकर यांच्याबाबत

केला आहे. तेंडुलकरांच्या एका मुलाखतीत त्यांना पिंग्यांनी काही प्रश्न विचारले.

'तुमचं ठळकपणे प्रसिद्ध झालेलं पहिलं लेखन कोणतं?'

'नवभारत' दैनिकाच्या पन्नास सालच्या दिवाळी अंकात 'आमच्यावर कोण प्रेम करणार?' ही माझी कथा प्रसिद्ध झाली, ती माझी पहिली प्रसिद्ध झालेली कथा. 'द्वंद्व' ह्या माझ्या संग्रहात ती समाविष्ट आहे.'

'तुमच्या घरच्या, त्या वेळच्या वातावरणाची, वडिलांची माहिती सांगाल?'

'माझ्या वडिलांचं सारं आयुष्य पुस्तकाच्या जगात गेलं. ते 'लाँगमन्स ग्रीन' ह्या प्रकाशन कंपनीत नोकरीला होते. तसे ते स्वतः हौशी लेखक होते. ते कथा-कादंबऱ्या लिहायचे, नाटकही लिहायचे. 'डी. रघुनाथ' हे त्यांनी धारण केलेल्या अनेक टोपणनावांपैकी एक नाव. नोकरी सुटल्यावर त्यांनी पुण्याला एक लायब्ररी आणि पुस्तकाचं दुकान काढलं. दुकानाचा व्यवहार त्यांना जमला नाही. बंद करावं लागलं! माझी त्यांनी तोंडावर स्तुती केल्याचं आठवत नाही किंवा मला जाणवेल, कळेल असा इंटरेस्ट त्यांनी माझ्या लेखनात घेतला नाही. पण माझ्यावर कधी बुद्धिपुरस्सर दबावही आणला नाही. माझा मोठा भाऊ कै. रघुनाथ हा घरापासून दूर झाला होता. तोही लेखक होता. 'धनुर्धारी', 'ज्योत्स्ना', 'ज्योती' वगैरेत त्यानं एकेकाळी लिहिलेलं होतं. माझ्या लेखनावर तो चांगली उपयुक्त, मार्गदर्शक टीका करायचा.'

'तुमचे त्या काळातले आवडते लेखक कोण होते?'

'दत्तु बांदेकर, बोकील सर आम्हांला शाळेत शिक्षक होते. साने गुरुजींचं वेड त्या काळात विद्यार्थ्यांमध्ये खूप असायचं. मला मात्र ते फारसे प्रभावित करू शकले नाहीत. दि.बा. मोकाशींचं लेखन मला फार आवडायचं.'

'आपण लेखकच व्हावं असं तुम्हाला प्रथम केव्हा वाटलं?'

'तसं कधीच वाटलं नाही. आपली आपण काही करीयर करायची आहे असा विचार कधीही डोक्यात नव्हता. शिक्षण सुटून मी घरापासून दूर झालो होतो. मुंबईत आलो होतो. इथे पोटापाण्याचा एक सोईस्कर धंदा म्हणून मी सहसंपादक झालो. पुण्यात मी निरनिराळ्या छापखान्यात मुद्रिते तपासण्याचं काम केलेलं होतं. तो अनुभव गाठीशी होताच...'

या संवादातून आपल्याला विजय तेंडुलकरांचे स्पष्ट आणि सडेतोड व्यक्तिमत्त्व जाणवते. विजय तेंडुलकर हे मितभाषी, आवश्यक ते आणि तितकेच बोलणारे लेखक आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व जाणून घ्यावयाचे असेल तर त्यांच्याशी केलेल्या संवादातूनच त्यांचे अंतरंग जाणून घ्यावे लागते, हे रवींद्र पिंगे जाणून आहेत. म्हणून त्यांनी 'तेंडुलकरांचे विजयदर्शन' हे व्यक्तिचित्र पूर्ण संवादातून साकार केले आहे. वादळी व्यक्तिमत्त्व, प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर यांचे व्यक्तिचित्र अलगदपणे त्यांच्या

विचारांसह साकार झालेले दिसते.

प्र.के. अत्रे यांनी गाडगे बाबांचे कीर्तनातील समुहसंवाद पद्धतीचे वर्णन करून व्यक्तिचित्र साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. ते लिहितात, ''कीर्तनामध्ये देवापुढे होणाऱ्या पशुहत्येबद्दल बाबा बोलत होते. त्यांनी विचारले, 'श्रीखंड चांगले की बकरे चांगले?' (श्रोते : श्रीखंड) 'बासुंदी चांगले की बकरे चांगले?' (श्रोते : बासुंदी) 'दूध चांगले की बकरे?' (श्रोते : दूध) 'असे इथे बोलता अन् घरी जाऊन बकऱ्याचे मांस खाता, काय म्हणावं तुम्हाला?' (हशा) 'गुजराथी अन् मारवाडी देवाला जातात. ते कधी त्याला बकरे देतात का?' (श्रोते : नाही) 'मग त्यांना देव कसा पावतो अन् तुम्हांला का पावत नाही?' एकेका गुजरात्याच्या दहा दहा मजली इमारती इथे मुंबईत आहेत.. अन् तुम्ही फुटपाथवर झोपता. (हशा) तुमचे धंदे म्हणजे (नक्कल करीत) मीठ! कल्हई! कांदे! बटाटे! नाही तर (दांडा हलविण्याचा अभिनय करीत) उसाचा चरक (हशाच हशा) शेठाणीचे पाच फुटी पातळ पाचशे रुपयांचे. त्याच्यातला परकर तीनशे रुपयांचा अन् तुमच्या बायकोच्या नऊवारी पातळाची किंमत किती? पाच रूपये, अन् पावली! (हशा) देवाला बकरे द्यायचे, तर ते त्यांच्या देवळात सोडून द्या. त्याच्या पोटात सुरी कशाला खुपसता (अन् अभिनय करीत) मसाला वाटता? (हशा) तुम्ही इकडे त्याचा मसाला वाटता आणि यम तिकडे तुमचा मसाला वाटतो! (प्रचंड हशा) बोला, 'गोपाळा.. गोपाळा, देवकीनंदन गोपाळा!' अशी संवादाच्या रूपाने कीर्तन करण्याची पद्धती गाडगेबाबांची होती.

या कीर्तनातून ते प्रत्येक श्रोत्याच्याच तोंडून तो करीत असलेली पशुहत्या आणि अंधश्रद्धा कबूल करायला लावतात. विनोदी शैलीतून आणि सर्वसामान्य श्रोत्यांच्या भाषेतून हलक्या-फुलक्या विनोदातून गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजाचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. गाडगेबाबा फार मोठी विभूती आहे. त्यांचे चरित्रच त्यांची समाजसेवा आहे. प्र.के. अत्र्यांनी संवादात्मक शैलीतून गाडगेबाबांचे कार्य, त्यांची कीर्तन करण्याची पद्धती रेखाटली असून त्यामुळे त्यांचे व्यक्तिचित्र परिणामकारक झाले आहे. अशा प्रकारे कमी-जास्त प्रमाणात संवादांतून व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न झालेला आहे. संवादांतून व्यक्तीचे माहिती नसलेले जीवन उलगडण्याचा प्रयत्न होताना दिसतो. संवादाचा प्रभावी वापर करून अनेक लेखकांनी अशा प्रकारे व्यक्तिचित्रे प्रभावी आणि परिणामकारकपणे लिहिलेली आहेत.

**मनोविश्लेषण :**

एखाद्या व्यक्तिचित्राचे लेखन लेखक करीत असतो, तेव्हा तो त्या व्यक्तीच्या बाह्य

वर्णनाबरोबरच त्याच्या अंतर्मनाचा, स्वभावाचा विचार करीत असतो. कोणतीही व्यक्ती ही तिच्या वेगळ्या स्वभावामुळे किंवा त्या व्यक्तीच्या स्वत:च्या मनाप्रमाणे जगण्याच्या प्रवृत्तीमुळे इतरांपेक्षा वेगळी ठरते किंवा 'वल्ली' ठरते. त्यांच्यातील ती वल्ली लेखकाला आकर्षित करते. कधी कधी त्या व्यक्तीचे जीवनविषयक तत्त्वज्ञान वेगळे असते. हे तत्त्वज्ञान पारंपरिक जीवन जगणाऱ्या समाजाला रुचत नाही, पचत नाही. पण त्याचे त्या व्यक्तीला देणे घेणे नसते. ती समाजासाठी नाही तर स्वत:साठी जगत असते. जीवन जगण्याचा आनंद घेत असते. हे तिचे वागणे, बोलणे, चालणे याचा शोध घेण्यासाठी लेखक त्या व्यक्तीच्या मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. त्यात तो यशस्वी होतोच असे नाही. पण त्यामधून त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व लेखक उलगडून दाखवितो. त्या व्यक्तीच्या स्वभावाचे दर्शन घडवितो.

व्यक्तीच्या मनाचा किंवा स्वभावाचा शोध घेणे तसे फार कठीण काम आहे. जो लेखक त्यामध्ये यशस्वी होतो त्याचे व्यक्तिचित्र अंतर्मुख करते. वाचक त्या व्यक्तिचित्राशी एकरूप होतो. अशी विविध स्वभावांच्या व्यक्तींची व्यक्तिचित्रे मराठीत अनेक लेखकांनी लिहिलेली आहेत. उदा. : 'नाथा कामत' नावाची एक वल्ली पु.ल. देशपांडे यांनी रेखाटली आहे. नाथा कामत लेखकाच्या जीवनात आला आणि दातात काहीतरी अडकावे तसे अडकून राहिला. नाथाचे जग निराळे, लेखकाचे जग निराळे. पण तरीही तो लेखकाला आपल्या स्वभावाने आकर्षित करतो. नाथाच्या स्वभावातील दोन वाईट खोडी म्हणजे खाण्याचा पदार्थ निरखून पाहात खाणे आणि 'बाबा रे' हा त्याचा नित्याचा तिरस्करणीय शब्द. अशा नाथा कामतला वळून वळून मुली पाहण्याची सवय. याचे वर्णन करताना लेखक लिहितो, ''कुठल्याही शहर वस्तीतल्या रस्त्यातून नाथा कामतबरोबर चालत जाण्यापेक्षा गोबीच्या वाळवंटातून भर दुपारी अनवाणी धावत जाणे अधिक सुखावह ! पातळ, लुगडे किंवा स्कर्ट गुंडाळून दृष्टिपथातून काहीही सरकल्यासारखे झाले की नाथा कामतचे पंचप्राण डोळ्यात येऊन गोठतात, गळ्यातले आदामचे सफरचंद, सुतार लोकांकडे लेव्हल मोजायचे यंत्र असते त्यातल्या बुडबुड्यासारखे खालीवर व्हायला लागते, मानेचा कोन उलटा फिरत तीनशे साठ अंशाचा प्रवास करून येतो आणि वस्त्रान्वित वस्तु जरा देखण्यातली निघाली की नाथाच्या बुटाला चाके लावल्यासारखा तो अधांतरी तरंगू लागतो. ह्या तुर्यावस्थेतून सहजभावात यायला काही मिनिटे जावी लागतात. मग आपल्या त्या 'टाय'ने आवळलेल्या गळ्यातून 'गट्ळ्ळगर्रगम्' अशासारख्या अक्षरांनी वर्णन करता येण्यासारखा आवाज काढून तो भानावर येतो.'' या वर्णनातून नाथाच्या स्वभावाची कल्पना येते. नाथा कामत हा स्त्रीलंपट आहे, त्याला स्त्रीसौंदर्याचे आकर्षण आहे. रस्त्यावरच्या कुठल्याही सुंदर व तरुण स्त्रीला निरखून

पाहण्यात त्याला आनंद वाटतो. लेखकाने त्याच्या या स्वभावाचे मार्मिक चित्रण करीत त्याच्या चेहऱ्यावरचे भाव व हावभाव टिपले आहेत.

शिवाजी सावंतांनी आपल्या गावाकडील अशी मने आणि नमुने यांचे रेखाटन केले आहे. या नमुनेदार स्वभावाच्या संगतीत लेखकाला जीवनाचे खरेपण मिळाले आहे. मधमाशाच्या पोळ्यातील मध टिच्चून भरलेला असावा तशी ही मने माणुसकीने शिगोशिग भरलेली आहेत. ही लाल मातीत वाढलेली घाटोळी मनं आहेत. कोणत्याच अमुक एका जीवनवादावर ती दावा सांगू इच्छित नाहीत. ती अशी जगली एवढेच त्यांचे म्हणणे आहे. शिवाजी सावंतांनी पुस्तकाच्या नावाप्रमाणे 'अशी मने असे नमुने' शोधण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याला भेटलेली, भावलेली, पाहिलेली माणसं त्यांनी त्यांच्या जगण्यातून, वागण्यातून, बोलण्यातून साकार केली आहेत. ही सर्व माणसं सर्वसामान्य आहेत. त्यामध्ये कांत्या, गणपा, संतू, तुकारामबापू, तोतरा दत्तू, शंकऱ्या, खडकावरची म्हातारी, मामू, तातू अशी माणसे आहेत. ती शिवाजी सावंतांच्या समृद्ध लेखणीतून साकार झाली आहेत.

शिवाजी सावंत आणि पु.ल. देशपांडे या दोन्ही लेखकांनी व्यक्तिचित्राचे लेखन करताना माणसाच्या मनाला महत्त्व दिले आहे. त्या व्यक्तीच्या बाह्यांगदर्शनाबरोबरच अंतरंगाचा शोध ते घेतात आणि त्या व्यक्तीचे मनोविश्लेषण करताना दिसतात.

**चित्रमयता :**

मराठीमध्ये व्यक्तिचित्राचे लेखन भरपूर प्रमाणात झालेले आहे. विविध कालखंडांतील आणि त्या त्या प्रादेशिक भागातील लेखकांनी आपल्याला भावलेल्या व्यक्तीचे चित्रण केलेले आहे. पण सर्वच व्यक्तिचित्रे सकस निर्माण झाली आहेत असे मात्र म्हणता येत नाही. अनेक लेखकांनी आपल्या लेखनीने अशी काही शब्दचित्रे रेखाटली आहेत की, त्या व्यक्ती प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्या डोळ्यासमोर उभी राहतात. म्हणजेच त्या व्यक्तिचित्रात चित्रमयता येते. चित्रमयता हे गुण चांगल्या व्यक्तिचित्राचे लक्षण आहे. पु.ल. देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, प्र.के. अत्रे, ग.दि. माडगूळकर, रवींद्र पिंगे, आनंद यादव, मधुकर केचे अशा अनेक लेखकांच्या लेखणीमध्ये चित्रमयता आहे. उदा. 'चितळे मास्तर' हे व्यक्तिचित्र अशा स्वरूपाचे आहे. चितळे मास्तर हे पु.ल.देशपांडे यांचे गुरुजी. त्यांचा मुख्य विषय इंग्रजी, पण ते ड्रॉईंग आणि ड्रिल सोडून कुठलाही विषय शिकवीत असत. तासाची घंटा आणि वेळापत्रक या दोन गोष्टींशी त्यांचे कधीच जमले नाही. त्यांनी छडी कधी वापरली नाही कारण त्यांच्या जिभेचे वळणच इतके तिरके होते की, तो मार पुष्कळ लागत असे. चितळे मास्तरांनी आपल्या साऱ्या आयुष्यात कुणालाही शिस्त लावली नाही; ना स्वत:ला ना मुलांना. त्यांच्यापुढे

आलेल्या सर्वांवर फक्त प्रेम केले. प्रेमळ शब्द न वापरता प्रेम केले. त्यामुळे शाळेला कोणीही 'गोखले हायस्कूल' म्हणत नाहीत, तर 'चितळे मास्तरांची शाळा' म्हणूनच ती प्रसिद्ध आहे. अशा चितळे मास्तरांचे वर्णन करताना पु.ल. देशपांडे लिहितात, ''डाव्या हातात धोतर, एकेकाळी निळ्या रंगाचा असावा अशी शंका उत्पन्न करणारा खादीचा डगला, डोक्याला ईशान्य-नैऋत्य दाखविणारी काळी टोपी, टोपीबाहेर टकलाच्या आसपास टिकून राहिलेले केस आले आहेत, नाक आणि मिश्यांची ठेवण राम गणेश गडकऱ्यांसारखी, पायातल्या वहाणा; आदल्या दिवशी शाळेत विसरून गेले नसले तर पायात आहेत, डावा हात धोतराचा सोगा पकडण्यात गुंतलेला असल्यामुळे उजव्या हातातली पुस्तके उजव्या खांद्यावर धरलेली आणि हातात पुस्तके नसल्यास उजव्या हाताची तर्जनी खांद्याच्या बाजूस आपण एक हा आकडा दाखविताना नाचवतो तशी नाचवीत चितळे मास्तरांनी स्वत:च्या घरापासून शाळेपर्यंतचा तो लांबसडक रस्ता गेली तीस वर्षे तुडविला.'' या वर्णनातून आपल्यासमोर मागील पिढीतील विद्यार्थ्यांचा ध्यास असणारा, विद्यार्थ्यांवर मनापासून प्रेम करणारा, आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मानून नित्यनियमाने कार्यमग्न असणारा शिक्षक चितळे मास्तरांच्या रूपाने डोळ्यासमोर येतो. पु.ल. देशपांडे यांनी एखाद्या चित्रकाराने चारपाच रेषांत कुंचल्याने अप्रतिम चित्र काढावे तसे पुलं कमीत-कमी शब्दांत पण संबंधिताच्या साऱ्या स्वभाववैशिष्ट्यांसह व्यक्तिचित्र साकारतात. त्यांच्या विनोदी शैलीने वर्णन खुमासदार होते.

'रामा मैलकुली' हे व्यंकटेश माडगूळकर यांनी लिहिलेले एक छान व्यक्तिचित्र. रामा रस्त्याच्या कडेच्या मैलाच्या दगडावरती आकडे टाकायचे, नाव घालायचे काम करीत असे. लेखक याच विभागात काम करीत असल्याने रामाची भेट झाली. अशा रामाची परिस्थिती अतिशय गरिबीची होती. गरिबीमुळे बायको सोडून गेलेली, विधवा बहिण, तिचा मुलगा आणि तो कसाबसा हाता-तोंडाची गाठ घालीत होता. अशा या रामाचे वर्णन करताना व्यंकटेश माडगूळकर लिहितात, ''रामा दिसायला चारचौघांसारखा नव्हता. रूपाच्या बाबतीत दैवानं त्याच्यावर गैरमर्जी केली होती. अंगापिंडानं थोराड असून त्याचा रंग अगदी ठार काळा होता. नाक डाव्या बाजूला वाकडं होतं आणि एक डोळा अधू होता. त्याच्या तोंडावरच्या कलेकडे पाहून कुणालाही असं वाटलं असतं की, दिलानं भला असणारा माणूस रूपाने गेला आहे. खाण्यापिण्याच्या बाबतीत याची भलती आबाळ झाली आहे. कसल्या तरी रंगाचं एक विटकं फडकं त्यानं केवळ सवयीनं डोक्याला गुंडाळलं होतं. जागोजागी चिंध्या झालेली एक पैरण अंगात अडकवली होती. आणि खालचं धोतर तर त्याला अगदीच तोटकं होतं. पिंढऱ्यावर बोटाएवढ्या शिरा उमटून दिसत होत्या. पायाच्या टाचा भेगाळल्या होत्या. वयाने तो फारसा दिसत

नव्हता.'' या वर्णनातून रामा आपल्यासमोर उभा राहतो. यातून रामाचे बाह्यांगदर्शन तर घडतेच, पण त्यातून त्याचे अंतरंगही जाणवते. त्याची अनेक दिवसांपासूनच्या गरिबीची आणि दारिद्र्याची कल्पना येते. काळाशार, काबाडकष्ट करणारा रामा डोळ्यांसमोरून सरकत जातो. चित्रमयता हा माडगूळकरांच्या लेखनाचा विशेष आहे. 'माणदेशी माणसं' ह्या व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये प्रत्येक व्यक्तिचित्राच्या सुरुवातीला त्या व्यक्तीचे चित्र (Sketch) काढलेले आहे. ते चित्र, लेखकाने जी व्यक्ती शब्दांतून साकार केली आहे तिचे आहे. माडगूळकरांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचे बारकाईने वाचन केल्यावर त्या स्केचकडे पाहिल्यावर हे काढलेले चित्र आपल्याला सजीव भासू लागते. एवढेच नव्हे तर त्या चित्राकडे पाहताना ते व्यक्तिचित्र गुणवैशिष्ट्यांसह आपल्यासमोर साकार होते. यातच व्यंकटेश माडगूळकरांच्या लेखनाचे यश आहे.

व्यंकटेश माडगूळकर आणि पु.ल. देशपांडे हे दोघे सिद्धहस्त लेखक आहेत. 'चित्रमयता' ही वैशिष्ट्य या दोन्ही लेखकांच्या लेखनातून आपणास जाणवते. माडगूळकरांच्या लेखनातून प्रादेशिक जीवनाचे जिवंत असे चित्रमय दर्शन पाहावयास मिळते, तर पु.ल. देशपांडे यांच्या लेखनातून मध्यमवर्गीय जीवनाचे सूक्ष्म आणि मार्मिक चित्रण येते. त्यांच्या विनोदी शैलीने ते सहज सुंदर होते.

**निवेदकाची वैशिष्ट्ये :**

'व्यक्तिचित्र' लेखनामध्ये 'निवेदक' हा फार महत्त्वाचा असतो. लेखक हाच निवेदकाची भूमिका करीत असतो. हा निवेदक एखाद्या व्यक्तीचे, माणसाचे निवेदन करीत असताना अतिशय तटस्थ भूमिकेतून तो ते निवेदन करीत असतो किंवा त्या व्यक्तीकडे तटस्थतेने पाहात असतो. निवेदन पूर्वग्रहदूषित नसेल आणि जेवढे तटस्थपणे केले गेले असेल तेवढे ते व्यक्तिचित्र चांगले उतरते. आहे त्या रूपात व्यक्ती वाचकांसमोर येते. व्यक्तिचित्राचे लेखन करीत असताना निवेदकाचीही काही गुणवैशिष्ट्ये त्या व्यक्तिचित्रात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे उतरलेली दिसतात. निवेदक हा माणूस आहे. त्यांच्या काही भाव-भावना, आचार-विचार, इच्छा-आकांक्षा, काही जीवनविषयक तत्त्वज्ञान असते. लेखक एखादी निर्मिती करतो तेव्हा तो आपली विचारसरणी मांडीत असतो. त्यावेळी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अंग प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्या नवनिर्मितीमध्ये सामावून गेलेले असते. लेखक ते नाकारू शकत नाही. त्याला ती व्यक्ती कशी जाणवली, भावली ते तो स्वत:च्या दृष्टिकोनातून सादर करीत असतो. त्याला त्या व्यक्तीमधून काय मांडावयाचे, सांगावयाचे आहे ते तो सांगत असतो. म्हणूनच एकाच व्यक्तीवरती अनेक लेखकांनी लिहिलेली 'व्यक्तिचित्रे' एकसारखी असत नाहीत. ती व्यक्ती एकच असली तरी त्या व्यक्तीचे भिन्न-भिन्न अंग दिसते किंवा दर्शन आपणास घडते. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या न्यायाने व्यक्तिचित्राचे

व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर साकार होत असते.

निवेदकाची काही वैशिष्ट्ये असतात. त्याची म्हणून एक निवेदनाची शैली असते. ती भाषेची शैली व्यक्तिचित्र साकारीत असते. संवाद, प्रसंगनिर्मिती, तपशीलवार्ता, वर्णन, भावनात्मकता, ग्रामीण बोलीचा ढंग, भाषा, पौराणिक संदर्भ, अलंकारिक भाषाशैली, लालित्यपूर्ण निवेदन इत्यादी त्या लेखकाच्या किंवा निवेदकाच्या प्रकृतीधर्मानुसार तो आपली निवेदनशैली वापरत असतो आणि व्यक्तिचित्र कसे परिणामकारक होईल या दृष्टीने तो विचार करीत असतो. काही लेखकांनी ग्रामीण जीवनातील, प्रादेशिक भागातील व्यक्तींचे चित्रण करताना त्या-त्या प्रादेशिक बोलीचा वापर केलेला आहे. त्या प्रादेशिक बोली भाषेतून साकारलेली व्यक्तिचित्रे आपल्या स्वभाव वैशिष्ट्यांसह, गुणधर्मांसह व्यक्त झालेली आहेत. उदाहरण घ्यावयाचे झाल्यास व्यंकटेश माडगूळकरांची 'माणदेशी माणसं', मधु मंगेश कर्णिक यांचे 'कोकणी गं वस्ती', आनंद यादव यांचे 'मातीखालची माती' इत्यादीमधील व्यक्तिचित्रे पुरेशी बोलकी आहेत. मध्यमवर्गीय समाजातील व मोठ्या विभूतींची व्यक्तिचित्रे पु.ल. देशपांडे आणि प्र.के. अत्रे यांनी आपल्या वेगळ्या शैलीने रेखाटली आहेत. थोडक्यात, मराठीमध्ये अनेक लेखकांनी आपापल्या प्रकृतिधर्मानुसार भाषेचा वापर केला आहे. निवेदनाची शैली वापरली आहे. त्यातून त्यांना भावलेल्या, जाणवलेल्या व्यक्तींच्या रेखाटनाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

**भाषाशैली :**

भावना आणि विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. प्रत्येक कलावंताचा जसा एक पिंड असतो, तशीच त्याची निर्मितीची एक शैली असते. व्यक्तिचित्राची भाषा हेच तिचे यश असते. व्यक्तिचित्राची भाषा ही तत्कालीन समाज व व्यक्तिमत्त्वमिश्रित एक रसायन असते. ती व्यक्ती जिवंत व्हावी म्हणून अनुभवाची, स्वभाववैशिष्ट्यांची मांडणी व्यावहारिक भाषेत करावी लागते. व्यक्तिचित्रलेखन करणारा लेखक जे जीवनानुभव घेतो, त्यातून संवेदनशील मनात निर्माण झालेल्या विविध जाणिवा, अनुभव, व्यक्तिमत्त्व तो अचूक मांडतो. या अनुभवाच्या जिवंतपणावर त्या व्यक्तिचित्राचे यश अवलंबून असते. याबाबत अचला जोशी म्हणतात, ''अपरिहार्यतेने आवश्यक वाटाव्या अशा घटना व प्रसंग, सहज जिवंत व्यक्तिचित्रण, अकृत्रिम संवाद आणि नेमकी सरळ भाषा यांतून त्याला कथावस्तू तिच्या जीवनासह प्रभावीपणे उभा करता आली पाहिजे.'' हे कार्य बव्हंशी भाषाशैलीने शक्य होते. कारण ती दुहेरी कार्य करते. एकीकडे ती अर्थाचा संस्कार वाचकांच्या सुप्त मनावर करते, तर दुसरीकडे ध्वनीचा संस्कार करते. लेखकाच्या भाषाशैलीवर देश, काल व परिस्थिती यांचा परिणाम होतो. लेखक ज्या प्रादेशिक

भागात राहात असतो त्या प्रादेशिक भाषेचा वापर करून तो व्यक्तिचित्र जिवंत करीत असतो. त्या प्रादेशिक भाषेद्वारे त्या व्यक्तीच्या भाव-भावना, सुखदु:खे, आचार-विचार तो प्रभावीपणे रेखाटत असतो. लेखकाची स्वत:ची अशी एक स्वतंत्र भाषाशैली असते. काही वेळा लेखक प्रतिमांच्या भाषेतून बोलत असतो. संवादांतून काही व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो. एकंदरीत लेखक म्हणून त्याची जी एक भाषाशैली असते त्यातून तो व्यक्त होत असतो.

**व्यक्तिचित्राची वैशिष्ट्ये :**

माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. मानवी जीवनाला त्याच्या अनेक अंगांनी साकार करण्याचा प्रयत्न साहित्यिक करीत असतात. मानवी जीवनाचा अनुभव ज्या प्रकारचा असतो त्या प्रकाराने वाङ्मयप्रकार पडतात. एखादा अनुभव लहान असेल तर त्याची कथा होते. जीवनानुभव व्यापक व गुंतागुंतीचा असेल तर कादंबरी होते. स्वत:च्या जीवनाचा सत्याच्या पातळीवरील घेतलेला वेध म्हणून आत्मचरित्र निर्माण होते. एखाद्या श्रेष्ठ व्यक्तीच्या जीवनकार्याचा, कालक्रमाचा सत्य, वास्तव परामर्श घेतल्यास चरित्र होते. या सर्व वाङ्मयप्रकारातून माणूस व त्याच्या जीवनाला साकार करण्याचा प्रयत्न असतो.

'व्यक्तिचित्र' या वाङ्मयप्रकारात लेखकाला भेटलेल्या, त्याच्या अंत:करणात घर करून राहिलेल्या, त्याला भावलेल्या व्यक्तीला साकार करण्याचा प्रयत्न केलेला असतो. व्यक्तिचित्रे या वाङ्मयप्रकारात, कमीत कमी प्रसंग, आठवणी, वर्णन व माहिती यांच्या आधारे व्यक्तीला शब्दांच्या माध्यमातून उभे करण्याचा प्रयत्न लेखकाचा असतो. व्यक्तिचित्रात वर्ण्यव्यक्ती ही केंद्रस्थानी ठेवून तिला कलात्मक दृष्ट्या उभे करणे हे लेखकाचे मुख्य उद्दिष्ट असते. त्यासाठी तो त्या व्यक्तीचे अंतर्बाह्य वर्णन करतो. त्या व्यक्तीच्या जीवनातील प्रसंगांच्या आधारे, तिच्या स्वभाववैशिष्ट्यांवर प्रकाश टाकतो. माणूस म्हणून असलेल्या तिच्या वेगळेपणाला साकार करतो. काही वेळा आठवणीचा वापर करतो. अनेकदा लेखक आणि ती व्यक्ती यांच्या परस्परसंबंधातून व्यक्तिचित्र साकार होते. त्यातून लेखकाच्या स्वभावधर्मानुसार तो ते व्यक्तिचित्र उभे करीत असतो. पण मुख्य केंद्र संबंधित व्यक्ती हेच असते. व्यक्तीला भावनिक पातळीवर साकार केल्यामुळे रसात्मकता निर्माण होते.

व्यक्तिचित्राचा अभ्यास करताना काही वैशिष्ट्ये आपल्याला जाणवतात. व्यक्तिचित्रांमध्ये व्यक्तीला अंतर्बाह्य स्वरूपात साकार करणे हा मुख्य हेतू असतो. त्यासाठी लेखक घटना, प्रसंग, आठवणी, माहिती, अनुभव, वर्णन यांचा आधार घेतो. लेखकाला जितकी आणि जशा स्वरुपात व्यक्ती भावते तितकेच तिचे चित्रण केले जाते. व्यक्तिच्या संपूर्ण

जीवनाचा परामर्श घेणे हा हेतू नसतो.

लेखक आणि संबंधित व्यक्ती यांच्या भावसंबंधाचे चित्रण व्यक्तिचित्रात येते. लेखक गौण असतो. ती व्यक्ती केंद्रस्थानी असते. लेखकाच्या प्रतिभा सामर्थ्याने व्यक्तिचित्र उभे राहात असल्यामुळे त्यात जिवंतपणा येतो. 'चित्रमयता' हे व्यक्तिचित्राचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'जिव्हाळा' हा चांगल्या व्यक्तिचित्राचे महत्त्वाचे अंग आहे. ललित साहित्याची अनेक वैशिष्ट्य व्यक्तिचित्रात आढळतात आणि व्यक्तिचित्राची भाषाही लालित्यपूर्ण असते. मराठीमध्ये मान्यवर लेखकांनी व्यक्तिचित्र हा वाङ्मयप्रकार हाताळल्याने हा एक प्रवाह म्हणून दाखवून देता येतो.

**व्यक्तिचित्राचे प्रकार :**

व्यक्तिचित्राचे ढोबळ मानाने दोन प्रकार पडतात. १. काल्पनिक व्यक्तिचित्रे २. चरित्रात्मक व्यक्तिचित्रे

मराठीतील व्यक्तिचित्रात काल्पनिक व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. लेखकाने अनेक व्यक्ती पाहिलेल्या असतात. त्या व्यक्तितील एखादे गुण वैशिष्ट्ये किंवा गुणदोष घेऊन लेखक काल्पनिक व्यक्तिचित्रे लिहित असतो. या व्यक्ती लेखकाला ज्ञात असतात पण इतरांच्या दृष्टीने त्या अज्ञात असतात. तसेच समाजामध्ये हयात असलेल्या अनेक व्यक्तिवर व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. पण या व्यक्तिच्या कार्याची व्याप्ती मोठी असल्यामुळे त्यांच्या दोन-तीन घटनाप्रसंगातून रेखाटलेले व्यक्तिचित्र चरित्राच्या वळणावर गेल्यासारखे वाटते. तर काही व्यक्तिचित्रे चरित्रचित्रणाच्या दृष्टीनेही लिहिलेली दिसतात. पुढे याचा एकत्रित विचार केला आहे.

**व्यक्तिचित्र - वेगळा वाङ्मयप्रकार मानणे आवश्यक**

अन्य प्रचलित वाङ्मयप्रकार किंवा ललित गद्यांतर्गत लेखनप्रकारांपेक्षा 'व्यक्तिचित्रे' हा वेगळा प्रकार आहे. व्यक्तिचित्राच्या प्रेरणा इतर वाङ्मयप्रकारापेक्षा निश्चित वेगळ्या आहेत. त्यामध्ये वर्ण्य व्यक्तीचा प्रभाव, वर्ण्य व्यक्तीबद्दल सांगण्याची उर्मी, लेखक व वर्ण्य व्यक्ती यांचा परस्परसंबंध, प्रादेशिक जीवनाचे दर्शन घडविण्यासाठी केलेले व्यक्तिचित्र लेखन, महान व्यक्तीला साकार करण्यासाठी केलेले व्यक्तिचित्र लेखन, सामान्य व्यक्तीतील असामान्यत्व दाखविण्यासाठी तसेच प्रासंगिक प्रेरणेतून केलेले व्यक्तिचित्र लेखन इत्यादी अनेक प्रेरणांनी व्यक्तिचित्राचे लेखन होताना दिसते. त्याचबरोबर व्यक्तिचित्राचे स्वरूपही इतर वाङ्मयप्रकारापेक्षा निश्चित वेगळे आहे असे दिसते. व्यक्तिचित्राचे बाह्यवर्णन, स्वभावदर्शन, माणूस म्हणून वेगळेपणा, त्याची गुणवैशिष्ट्ये, व्यक्तीचा अवलिया स्वभाव व लकबी, कलावंत म्हणून लेखकाला भावलेल्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र असे विविधांगी स्वरूप दिसते.

व्यक्तिचित्राच्या लेखनअभिव्यक्तीचा विचार करता व्यक्तीची वर्णनात्मकता, अनुभवकथन, भूतकाळातील कथन, त्याच्या आठवणी, प्रसंगचित्रण, संवादात्मकता, मनोविश्लेषण, चित्रमयता, भाषाशैली, व्यक्तिचित्रलेखन करताना निवेदकाची म्हणून काही वैशिष्ट्ये, व्यक्तिचित्राची वैशिष्ट्ये हे सर्व पाहता इतर वाङ्मयप्रकारापेक्षा या भिन्न आहेत. म्हणून व्यक्तिचित्राला वेगळा वाङ्मयप्रकार मानणे आवश्यक आहे असेच म्हणावे लागते. व्यक्तिचित्रामध्ये 'व्यक्ती साक्षात उभी करणे', 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्र', 'साध्यरूप लेखन' हे हेतू अन्य माध्यमांद्वारे किंवा अन्य वाङ्मयप्रकारांतून सिद्ध होऊ शकत नाहीत. व्यक्तिचित्रापासून येणारा प्रत्यय, त्या पासून होणारा आनंद हा अन्य वाङ्मयप्रकाराहून निश्चितच वेगळा, स्वतंत्र आहे. अन्य वाङ्मयप्रकारात साधनरूपाने वावरणारी व्यक्ती येथे साध्यरूपाने अवतरल्याने ते शक्य होते. लालित्य, लवचिकता या दोन्ही बाबतीत 'व्यक्तिचित्र' स्वतंत्र वाङ्मयप्रकाराच्या कसोटीवर उतरू शकते. व्यक्तिचित्राच्या बांधेसूदपणाबद्दल तर प्रश्नच येऊ नये कारण अन्य कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा विशिष्ट रचना किंवा विशिष्ट घटकांची अपरीहार्यता याचे महत्त्व व्यक्तिचित्रात विशेष असते. तसेच विशिष्ट आकारबद्धता हा त्याचा एक विशेष असल्यामुळे व्यक्तिचित्राचे स्वरूप हे अनेकदा बांधेसूद असते. तसेच त्याच्या घटकांची आंतररचना देखील बांधेसूद असते. व्यक्तिचित्राचे दर्जेदार लेखन मराठीमध्ये झालेले आहे. उपलब्ध दर्जेदार लेखन हे या लेखनप्रकाराची गुणवत्ता निश्चितपणे वाढविणारे आहे. हे दाखविणारे काही श्रेष्ठ व्यक्तिचित्रकार आपणांस पुढीलप्रमाणे सांगता येतात, वि.द. घाटे, प्र.के. अत्रे, व्यंकटेश माडगूळकर, विद्याधर पुंडलिक, पु.ल. देशपांडे, रवींद्र पिंगे, शिवाजी सावंत, ग.दि. माडगूळकर, वि.स. खांडेकर, आनंद यादव, विजया राज्याध्यक्ष, जयवंत दळवी, प्रभाकर पाध्ये, गंगाधर गाडगीळ, वि.भा. देशपांडे, विजय तेंडुलकर, यू.म. पठाण, शिरीष पै इत्यादी. या व इतर अनेक लेखकांनी निश्चितपणे दर्जेदार व्यक्तिचित्र लेखन केले आहे. त्यामुळे स्वतंत्र वाङ्मयप्रकार या दृष्टीने किंवा व्यक्तिचित्राचा स्वतंत्र विकास व्हावा या दृष्टीने समीक्षकांचे लक्ष व्यक्तिचित्राकडे आकर्षित होण्यास मदत झालेली आहे.

थोडक्यात, व्यक्तिचित्राला वेगळा वाङ्मयप्रकार म्हणून मान्यता देण्यासाठी व्यक्तिचित्रामध्ये काहीही कमतरता दिसून येत नाही. त्यामुळे एकंदरीत विचार करता, व्यक्तिचित्र हा वेगळा वाङ्मयप्रकार मानणे आवश्यक आहे. किंवा तो मानावा असे म्हणावेसे वाटते.

* * *

# प्रकरण तिसरे

# मराठीतील व्यक्तिचित्रे - भाग - १
# (१९४० - १९६०)

**प्रास्ताविक -**

व्यक्तिचित्राच्या उगमापासून इ.स. १९९० पर्यंतचा विकास पाहता त्याची पुढील दोन भागात विभागणी केली आहे. -

मराठीतील व्यक्तिचित्रे - भाग - १ ( सन १९४० - १९६० )

मराठीतील व्यक्तिचित्रे - भाग - २ ( सन १९६० - १९९० )

१९४०-१९६० या कालखंडातील व्यक्तिचित्रांचा विकास पाहण्यापूर्वी व्यक्तिचित्राची प्रारंभकालीन स्थिती पार्श्वभूमीदाखल थोडक्यात पाहून व्यक्तिचित्राचा उगम ते इ.स. १९६० पर्यंतचा आढावा घेऊ.

व्यक्तिचित्राचा प्रारंभ इ.स. १९२७ पासून; म्हणजे दि.वा. दिवेकरांनी स्फुटलेखन स्वरूपात व्यक्तिचित्रे लिहिण्यास सुरुवात केली तेव्हापासून धरला, तर त्यावेळी व्यक्तिचित्रांची स्थिती व पूर्वस्थिती व्यक्तिचित्रसदृश पद्य स्वरूपातील परंपरा संतवाङ्मयात दिसून येते. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम या प्रमुख संतांच्या अभंगांतून पांडुरंगाच्या सगुण स्वरूपाचे प्रत्यक्ष दर्शनच आपणांस होते. थोडक्यात, आपणांस संतांच्या अभंगात भावचित्रे पाहावयास मिळतात. तसेच गद्य स्वरूपात व्यक्तिचित्रसदृश स्वरूपातील परंपरा लीळाचरित्रामध्ये चक्रधरस्वामींच्या आठवणी व लिळेतून विविध प्रसंगांची शब्दचित्रे काढली आहेत. गोविंदप्रभूंच्या चरित्रामध्ये त्यांच्या अनेक लीळा वर्णन करून मुलांबरोबर खेळत असलेल्या गोविंदप्रभूंचे शब्दचित्र आलेले दिसते. बखरगद्य मध्ये आलेले वर्णन चरित्रपर असून व्यक्तिदर्शन या गोष्टीकडे या काळातील बखरकारांनी विशेष लक्ष दिलेले आहे.

गद्य स्वरूपात व्यक्तिचित्र किंवा त्याला वापरात असणारे नाव शब्दचित्र, स्वभावचित्र या शब्दांची जाण किंवा लेखनाची कल्पना मात्र विसाव्या शतकात आलेली दिसते. व्यक्तिचित्रसदृश लेखन किंवा व्यक्तिचित्रास जवळचे मृत्युलेखसारखे लेखनप्रकार किंवा इतर वाङ्मयप्रकाराच्या संदर्भात येणारे (चरित्र, निबंध) व्यक्तीचे चित्रण अशी परिस्थिती

या काळात दिसते. इ.स. १८५४ मधील 'अशिक्षित वैद्य या विषयी' हा ज्ञानप्रसारकातील लेख, नंतर मासिक 'मनोरंजन', 'केसरी', 'रत्नाकर', इत्यादी मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, दैनिके यांतून व्यक्तिचित्रसदृश लेखन प्रसिद्ध होत असे. या प्रकारचे लेखन करणाऱ्या लेखकांत लो. टिळक, न.चिं. केळकर, ग.त्र्यं. माडखोलकर, दि.ना. देव इत्यादी लेखक दिसतात. 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्र' या शुद्ध हेतूने लिहिलेल्या निखळ व्यक्तिचित्राचे लेखन दि.वा. दिवेकरांनी सुरू केले. दि.वा. दिवेकरांचा लेखसंग्रह इ.स. १९३४ साली निघाला. त्यापूर्वी १९२९ सालापासून प्रसिद्ध होणारी कुमार रघुवीर (रघुनाथ जगन्नाथ सामंत) यांची शब्दचित्रे (तदंतर्गत व्यक्तिचित्रांसह) 'हृदय' या शीर्षकाखाली एकत्रित करून इ.स. १९३२ मध्ये संग्रह प्रसिद्ध झाला. आधुनिक मराठीतील व्यक्तिचित्रे वाङ्मयनिर्मिताचा आलेख काढून पाहिल्यास आपल्याला तो चढत्या क्रमाचा दिसून येतो. प्रामुख्याने आधुनिक मराठीतील 'व्यक्तिचित्रे' या वाङ्मयप्रकाराची वाटचाल कशी झाली, त्याच्या रंगरूपात एक वाङ्मयप्रकार म्हणून भर टाकणारे कोणते ग्रंथकार व ग्रंथ आहेत हे कालानुक्रमे पाहणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे सर्वच ग्रंथांचे विहंगमावलोकन करणे इष्टही ठरणार नाही. 'व्यक्तिचित्रे-एक वाङ्मयप्रकार' या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या मोजक्या ग्रंथांचा परामर्श येथे घेतला आहे.

१९४० या कालखंडापासून व्यक्तिचित्रलेखनाला सुरुवात झाली. अनेक ललित लेखक लिहावयास लागले. स्वातंत्र्यचळवळीला गती मिळाली. व्यक्तिचित्रांचा विकास होऊ लागला. एक प्रवाह निर्माण झाला. श्री.म. माटेंसारखे लेखक या कालखंडात लेखन करू लागले. कुमार रघुवीर, दि.वा. दिवेकर, वसंत शांताराम देसाई, ग.त्र्यं. माडखोलकर, वि.द. घाटे, प्रभाकर पाध्ये, वि.स. खांडेकर, सरोजिनी बाबर, प्र.के. अत्रे, व्यंकटेश माडगूळकर हे लेखक या सुमारास व्यक्तिचित्र लेखन करू लागले. 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्र' या दृष्टिकोनातून व्यक्तिचित्रलेखनाला १९४० पासून सुरुवात झाली. १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन नव्या युगाची सुरुवात झाली. १९६० नंतर मराठीत विविध वाङ्मयप्रकार समृद्ध होऊ लागले. विविध प्रवाह निर्माण झाले. नारायण सुर्वे, भालचंद्र नेमाडे, विजय तेंडुलकर यांसारखे लेखक नवनवीन जाणिवांनी मराठी वाङ्मय समद्ध करू लागले. म्हणून १९४०-१९६० या पहिल्या कालखंडातील व्यक्तिचित्राचा परामर्श घेऊ.

**इ.स. १९४० ते १९६० या कालखंडातील व्यक्तिचित्रे :**

मराठीतील व्यक्तिचित्रांचा अभ्यास करीत असताना आपण आपल्या अभ्यासाच्या सोयीसाठी इ.स. १९४० ते १९९० या कालखंडांत व्यक्तिचित्रांचा विकास कसा झाला याचा विचार करणार आहोत. या पहिल्या कालखंडात पुढील लेखक व त्यांच्या

व्यक्तिचित्रसंग्रहांचा समावेश होतो.

**कुमार रघुवीर (रघुवीर जगन्नाथ सामंत):**

कुमार रघुवीर यांनी शब्दचित्रे, कथा, कादंबरी, गीते इत्यादी विविध लेखनप्रकार हाताळलेले आहेत. त्याचप्रमाणे कोशकार, अनुवाद, संपादक अशा विविध भूमिका सांभाळल्या आहेत. त्यांचा कालखंड १९०९ ते १९८५ असा आहे. १९३४ साली ते झेवियर या कॉलेज मधून बी.ए. झाले. महाविद्यालयीन काळातच त्यांनी लेखनास प्रारंभ केला. १९२९ साली 'सुभान्या' हे व्यक्तिचित्र 'प्रगति' साप्ताहिकातून संपादक त्र्यं.श. शेजवळकरांनी प्रसिद्ध केले. त्यांच्या प्रोत्साहनाने कुमार रघुवीरांनी भरपूर लेखन करावयास सुरुवात केली. 'हृदय' हा त्यांचा शब्दचित्रांचा संग्रह 'कुमार रघुवीर' या टोपणनावाने १९३२ साली प्रकाशित झाला. त्यात एकूण ३४ शब्दचित्रे आहेत. या लेखनाने त्या काळात रसिकांचे लक्ष वेधून घेतले. सामंतांच्या इतर लेखनावरही 'शब्दचित्र' या वाङ्मयप्रकाराचा प्रभाव पडलेला दिसून येतो. 'वाळूतील पावले' (१९३४, कथा शब्दचित्रे) 'उपकारी माणसे' (खंड १ ते ४, १९३८-४०, कादंबरी) 'मसालेवाईक प्राणी' (१९४०, स्वभावचित्रे), 'तारांगण' (१९४०, अभिनव चित्रबंध) 'तांडा' (१९४६, कथासंग्रह), 'जीवनगंगा' (१९४७), 'आम्ही खेडवळ माणसं' (१९४८) 'आम्हाला जगायचंय' (१९५४) या कादंबऱ्या अशी एकूण तीस पुस्तके सामंतांनी लिहिली. 'टॉम सॉयरची साहसे' (१९५७), 'अमरविश्वसाहित्य' (१९६२), 'मॉबी डिकचा राक्षस' (१९६२) अशी त्यांची अनुवादित पुस्तके ही प्रकाशित आहेत. 'मडक्यातील न्याय', 'जलदेवतेचा न्याय' अशी त्यांची संपादित बालवाङ्मयाची पुस्तके आहेत. ती १९४३-१९४४ साली प्रकाशित झाली. १९३५ ते १९५५ या काळातील त्यांच्या लेखनावर त्यांच्या अध्यापन व्यवसायाचा प्रभाव आहे. आदर्शवादी, बोधवादी, कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या या कथा वास्तववादी व सोज्वळ आहेत. 'आजची गाणी' (१९३९), 'गीतज्योती' (१९४४), 'रक्त आणि शाई' (१९४७) हे त्यांचे गीतसंग्रह प्रसिद्ध आहेत.

रघुवीर सामंतांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे 'पारिजात' या मासिकाचे संपादन होय. हे मासिक त्यांनी १९३४ साली जानेवारी महिन्यात सुरू केले. त्या काळातल्या महत्त्वाच्या व प्रसिद्ध साहित्यिकांचे लेखन 'पारिजात'मध्ये प्रसिद्ध होत असे. वर्षभरात म्हणजे १९३५ च्या फेब्रुवारीत 'पारिजात' बंद पडले. त्यानंतर १९४० साली सामंतांनी 'ज्योती' हे मासिक सुरू केले. तेही १९४१ ला बंद पडले. थोडक्यात, विविध प्रकारचे लेखन, अनुवादित वाङ्मय, 'पारिजात' सारख्या मासिकाचे संपादन अशा अनेकविध निर्मितींमुळे रघुवीर सामंतांची वाङ्मयीन कामगिरी वैशिष्ट्यपूर्ण ठरते. शब्दचित्र या वाङ्मयप्रकाराची त्यांनी मराठीत घातलेली भर हे त्यांचे मोठे योगदान होय.

'हृदय' हा कुमार रघुवीरांचा सन १९३२ साली प्रसिद्ध झालेल्या व्यक्तिचित्रांचा समावेश असणारा मराठीतील पहिला संग्रह होय. त्यावेळी हा शब्दचित्रसंग्रह म्हणून प्रसिद्ध झाला आणि व्यक्तिचित्राला 'शब्दचित्र ही संज्ञा वापरात आल्याने यातील व्यक्तिचित्राचा 'शब्दचित्र' म्हणून विचार करण्यात आला. हा शब्दचित्रसंग्रह असला तरी ही सर्व व्यक्तिचित्रे नाहीत. व्यक्तिप्रधान कथा, व्यक्तिचित्रात्मक आभास निर्माण करणारे लेखनही या संग्रहात आले असून यातील सर्वात प्रसिद्ध झालेले व्यक्तिचित्र सन १९२९ मधील 'सुभान्या' हे आहे.

प्रस्तुत संग्रहात चार विभाग असून बहुतेक वेळा प्रत्येक भागाच्या सुरुवातीला जी वचने किंवा ज्या ओळी नमूद केल्या आहेत, त्याला अनुसरून त्या विभागातील शब्दचित्रे लिहिली आहेत. महंमद, धाकूचे आयुष्य, गणपत शिपाई, केशवमामा, माईचा रमेश या व्यक्तिचित्रांपैकी 'माईचा रमेश' हे वास्तववादी व्यक्तिचित्र आहे असे या संग्रहात छापलेल्या रमेशच्या छायाचित्रावरून सांगता येते. अन्य व्यक्तिचित्रे काल्पनिक स्वरूपाची आहेत. व्यक्तींना नाव न देता भंगीण, अंध, भिकारी, पाटीवाला, मासळी विकी, व्हिक्टोरियावाला, ट्राम ड्रायव्हर अशी प्रातिनिधिक स्वरूपाची व्यक्तिचित्रे या संग्रहात आहेत. पुस्तकाच्या एकूण चार भागांपैकी पाहिल्या तीन भागात १२ व्यक्तिचित्रे आहेत. चौथ्या भागात व्यक्तिचित्रे नाहीत.

रघुवीर सामंतांनी व्यक्तिचित्रांसाठी निवडलेल्या व्यक्ती या खालच्या वर्गातील, श्रमजीवी समाजातील, उपेक्षित अशा आहेत. ज्या काळात हा संग्रह प्रसिद्ध झाला त्या काळात हे लेखन वेगळ्या स्वरूपाचे होते. व्यक्तिचित्रे रंगविताना लेखकाने व्यक्तीच्या लकबी, पोषाख, रूपाचे चित्रण केले असून त्या व्यक्तीचे जीवन, त्यांचा स्वभाव यांचेही वर्णन केले आहे. बहुतेक व्यक्तिचित्राची भाषा साधी, सोपी, निरलंकृत व पाल्हाळरहित आहे. 'माईचा रमेश' सारखी काही व्यक्तिचित्रे कथेशी जवळीक साधणारी असली तरी व्यक्तिचित्राचा पहिला संग्रह म्हणून हे लेखन चांगलेच आहे.

**दि.वा. दिवेकर:**

दिनकर वासुदेव दिवेकर हे ललित लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा कालखंड १८९८ ते १९५७ असा आहे. दि.वा. दिवेकरांनी ए.जी. गार्डिनरपासून प्रेरणा घेऊन व्यक्तिचित्रात्मक लेखनाला सुरुवात केली. 'स्वभावचित्रे' (१९३४) 'अविस्मरणीय व्यक्तिचित्रे' (१९६०) ही त्यांची दोन व्यक्तिचित्रणपर पुस्तके प्रसिद्ध आहेत. यथार्थ मूल्यमापनापेक्षा गुणवर्णनावर भर आणि आलंकारिक भाषाशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. 'राष्ट्रीय शिक्षण' (१९३२) व 'आजचा रशिया' (१९३२, अनुवाद) ही त्यांची इतर पुस्तके प्रकाशित आहेत. कालक्रमाने संग्रहरूपात नंतर प्रसिद्ध झाले

असले तरी रघुवीरापूर्वीचे लेखन सामाविष्ट असणारा आणि प्रसिद्ध व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटलेला असा मराठीतील पहिला व्यक्तिचित्रसंग्रह म्हणजे 'स्वभावचित्रे' (१९३४) हा होय. दिवेकरांनी व्यक्तिचित्रांना स्वभावचित्रे म्हटले आहे. या संग्रहात ऑगस्ट १९२७ पासूनचे लेखन समाविष्ट असून यातील बरीचशी व्यक्तिचित्रे 'रत्नाकर' मासिकातून लोकप्रिय ठरली होती. २ ऑगस्ट, १९२७ साली 'केसरी'तून प्रसिद्ध झालेले लो. टिळकांवरील लेखन हे कालदृष्ट्या अगोदरचे असले तरी हे हेतूतः लिहिलेले व्यक्तिचित्र नसून टिळकांवरील लेखांचा निवडक भाग या संग्रहात घेतल्याचे लेखकाने प्रस्तावनेत म्हटले आहे. त्यामुळे 'मोतीलाल नेहरू' वरील १९२८ साली प्रसिद्ध झालेले व हेतूपूर्वक लिहिलेले व्यक्तिचित्र हे मराठीतील आद्य व्यक्तिचित्र मानावे लागेल. अर्थात या लेखात व्यक्तिचित्र या वाङ्मयप्रकाराची सर्वांगीण जाण लेखकाला आली आहे असे वाटत नसले तरी इ.स. १९३० मधील म. गांधींवर लिहिलेल्या व्यक्तिचित्रात ही जाण प्रथम आल्याचे दिसते. 'राजकीय क्षेत्रातील विविध बारा व्यक्तींवरील व्यक्तिचित्रे' या संग्रहात आली असून त्यामध्ये लो. टिळक, म. गांधी, मोतीलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, विठ्ठलभाई पटेल, न.चिं. केळकर, मुकुंदराव जयकर, शि.म.परांजपे, कृ.प्र. खाडिलकर, मा.श्री. आणे, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस यांचा समावेश झाला आहे.'

व्यक्तिचित्राची सुरुवात एखाद्या इंग्रजी किंवा संस्कृत अवतरणाने दिवेकर करतात. बऱ्याच व्यक्तिचित्रांत व्यक्तीचे अंतर्बाह्य वर्णन पोषाख, लकबी यासह आले असून म.गांधी, लो.टिळक, वल्लभभाई पटेल, न.चिं. केळकर, मुकुंदराव जयकर, शि.म.परांजपे, कृ.प्र. खाडिलकर, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस इत्यादी व्यक्तींचे कर्तृत्वदर्शन लेखकाने घडविले आहे. मात्र लेखकाने लोकादरास पात्र अशा प्रसिद्ध व्यक्ती निवडल्याने गुणवर्णनावरच भर आहे. वर्ण्यव्यक्ती राजकीय क्षेत्रातील असल्याने त्यांच्या कर्तृत्वविकासाच्या ओघात खाजगी व्यक्तिमत्त्वाकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे.

व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराचे जनक दि.वा.दिवेकर यांचा 'अविस्मरणीय व्यक्तिचित्रे' (१९६०) हा दुसरा व्यक्तिचित्रसंग्रह होय. या संग्रहात एकूण ११ व्यक्तिचित्रे संग्रहित आहेत. त्यांतील महत्त्वाची पाच व्यक्तिचित्रे पुढीलप्रमाणे -'अहो गंगामाई', 'आमचा नाना बामण', 'याचे नाव डॉक्टर', 'अशा आहेत सुर्वतामावशी', 'भाऊदास'. स्वभावाचित्रातील व्यक्ती राजकीय क्षेत्रात प्रसिद्ध अशा होत्या. मात्र या संग्रहातील व्यक्ती खाजगी जीवनातील, अप्रसिद्ध आहेत. गंगामाई व नाना बामन यांची व्यक्तिचित्रे सूक्ष्म व सविस्तर स्वभाववर्णनाने नटलेली आहेत. तर 'याचे नाव डॉक्टर' मध्ये रमाकुमार नामक डॉक्टरांचे गुणवर्णन आहे. एका परोपकारी स्त्रीचे चित्रण 'सुर्वता मावशी' मध्ये आहे. तसेच 'भाऊदास' मध्ये एका परोपकारी व पुण्यशील व्यक्तीचे चित्रण आले आहे. कोणत्याही व्यक्तिचित्रात बाह्यरूप वर्णन नाही.

आधुनिक महाराष्ट्र-साहित्यात स्वभावचित्रलेखनाचा धडा पहिल्यांदाच गिरविण्याचे श्रेय ‘स्वभावचित्रे’ (१९३४) लिहिणाऱ्या दि.वा. दिवेकरांना अ.ना. देशपांडे यांनी दिलेले आहे; आणि त्यांना हा धडा गिरविण्याची प्रेरणा ए.जी. गार्डिनरनी लिहिलेली स्वभावचित्रे वाचून झालेली आहे. सहानुभूती, सत्यप्रीती, कल्पनाशक्ती व मर्मग्राह्य दृष्टी हे स्वभावचित्रलेखकाच्या अंगी आवश्यक असलेले गुण दिवेकरांच्या ठिकाणी असल्यामुळे संबंधित बारा व्यक्तींची त्यांनी रेखाटलेली स्वभावचित्रे सरस, आकर्षक आणि परिणामकारक उतरलेली आहेत. शिवाय ही स्वभावचित्रे रेखाटताना लेखकाने प्रत्यक्ष अनुभवाच्या काही गोष्टी सांगितलेल्या आहेत. मात्र ही स्वभावचित्रे रंगविताना लेखकाचा कल वस्तुनिष्ठ मूल्यमापनापेक्षा भक्तिभावपूर्ण विभूतिपूजेकडेच जास्त आहे. जवळीकतेतून आलेल्या जिव्हाला जाणवत नाही. त्यामुळे वाचक आणि संबंधित व्यक्ती यांच्यामधील अंतर कायम राहते. तसेच व्यक्तीच्या एखाद्याच विशेष गुणावर प्रकाशझोत काही प्रसंगांतून केंद्रित करण्याऐवजी, लेखकाने काही वेळा व्यक्तीची सर्वांगीण गुणसंपदा किंवा व्यक्तिविकास दाखविण्याचा प्रयत्न केल्याने लेखनातील निव्वळ व्यक्तिचित्राचा बाज बदलतो. चित्रमयता व कलात्मकतेच्या अभावी, लेखन वस्तुनिष्ठ असूनही बव्हंशी रुक्ष झाल्याने व्यक्तिचित्राशी वाचक समरस होत नाही. असे असूनही प्रसिद्ध व्यक्तीवरील व्यक्तिचित्रांचा प्रथम संग्रह काढण्याचा मान दि.वा. दिवेकरांचा आहे. म्हणूनही या लेखनाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे असे म्हणावे लागते.

**वि.ह. कुलकर्णी :**

विठ्ठल हरी कुलकर्णी हे समीक्षक, चरित्रकार म्हणून परिचित आहेत. ते कोकण येथे बी.ए. (१९२४) व मुंबई येथे एम.ए. (१९३१) झाले. काही काळ ते शिक्षक होते. त्यानंतर इस्माईल युसुफ व रुइया कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. वि.ह. कुलकर्णी यांनी चंद्रहास, रत्नपारखी, शरदचंद्र, सुहास या टोपण नावांनीही लेखन केले आहे. त्यांचा कालखंड १९०२ ते १९८२ असा आहे. विविधवृत्त, अरुण, तुतारी, प्रतिभा, ज्योत्स्ना या नियतकालिकामधून त्यांनी सदर लेखन केले आहे. इंग्रजी साहित्याचा साक्षेपी अभ्यास व त्या अनुषंगाने केलेले विपुल वाचन यामुळे प्रतिभामधील ‘हास-परिहास-उपहास’ या मधील ‘सुहास’ टोपणनावाने केलेले आणि ‘चांदण्यातील गप्पा’ या ज्योत्स्नाच्या सदरात ‘चंद्रहास’ या टोपणनावाने केलेले लेखन विशेष लोकप्रिय झाले. शिवाय अनेक पाश्चात्त्य लेखक व विविध क्षेत्रांतील काही सुप्रसिद्ध व्यक्ती यांच्यावरील चरित्रपर लेखनही गाजले. हे लेखन ‘व्यक्तिचित्रे’ (१९३६) या नावाने प्रकाशित झाले.

निबंधस्वरूपाचे अभ्यासपूर्ण लेखनही कुलकर्णी यांनी विपुल केले. उदा. गोपाळ

गणेश आगरकर, अच्युत बळवंत कोल्हटकर (अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवकः खंड-१, १९३१), मराठीतील निबंधवाङ्मय (प्रदक्षिणा, १९४१), मराठी कादंबरी - १८७५ ते १९३५ (अर्वाचीन मराठी साहित्य, १९३५), केळकर यांच्या वाङ्मयातील विशेष (केळकर षष्ट्यब्दिपूर्ती ग्रंथ, १९३२) इत्यादी. सर्वच लेखनात त्यांची लेखनाबद्दलची आस्था, त्यांचा चौफेर नि सूक्ष्म अभ्यास, मूल्यमापनाची विवेचक दृष्टी स्पष्ट होते.

वृत्तपत्रे, नियतकालिके यांमधून वि.ह. कुलकर्णी यांनी केलेले लेखन संख्येने प्रचंड असले तरी 'व्यक्तिरेखा (१९८६)' व 'वि.ह. कुलकर्णीः निवडक लेख' (१९८८) ही दोनच पुस्तके त्यांच्या निधनानंतर प्रकाशित झाली. आयुष्याच्या अखेरच्या काळात 'जॉर्ज बनॉर्ड शॉ' (१९८०) व 'अच्युत बळवंत कोल्हटकर : व्यक्ती आणि वाङ्मय' (१९८२) हे त्यांचे दोन मोठे चरित्रग्रंथ प्रकाशित झाले. या दोन्ही ग्रंथांमधून त्यांची मेहनती व अभ्यासू वृत्ती दिसून येते.

'व्यक्तिचित्रे' हा वि.ह. कुलकर्णी यांचा सन १९३६ साली प्रसिद्ध झालेल्या व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या व्यक्तिचित्रसंग्रहात साहित्य, क्रीडा, कला, या क्षेत्रातील सुप्रसिद्ध परकीय व्यक्तींवरील लेखन आले असून त्यात जी.के. वेस्टर्टन, ऑर्नोल्ड बेनेट, क्रांतिकारक कलावंत मॅक्झिम गॉर्की, सर ऑर्थर कॉनन डायल, ग्रेटा गार्बो, चार्ली चप्लीन, डॉन ब्रॅडमन, फिलिप स्नोडन, लॉर्ड बॅर्कनहेड ही नऊ व्यक्तिचित्रे आहेत.

'व्यक्तिचित्र' या दृष्टीने या पुस्तकाचा विचार करता बहुतेक लेखन हे व्यक्तीपर लेख, चरित्रात्मक लेख, परिचय लेख, अशाच स्वरूपाचे दिसतात. याला काही अपवाद आहेत. ते म्हणजे जी.के. वेस्टर्टन, आर्नॉन्ड बेनेट, ग्रेटा गार्बो, चार्ली चॅप्लीन इत्यादी व्यक्तींवरील लेख. कारण वेस्टर्टन वरील लेखनाचा विस्तार (४६ पृष्ठे) हा व्यक्तिचित्राला योग्य नाही. तर इतर लेखनात व्यक्तिचित्राचे काही गुण येताच लेखक वर्ण्यव्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा दूर जाऊन त्याच्या कर्तृत्वावर भर देऊ लागतो. कलेची समीक्षा करू लागतो. उपलब्ध माहिती जास्तीत जास्त देण्याचा मोह लेखक आवरू शकत नाही. त्यामुळे 'व्यक्तिचित्रे' म्हणून या लेखनाचा दर्जा यथातथाच आहे. वि.ह. कुलकर्णी यांनी व्यक्तिचित्रलेखन करीत असताना एक वाङ्मयप्रकार म्हणून काही पथ्ये पाळण्याची आवश्यकता होती, ती दक्षता घेतलेली दिसत नाही.

**मारुती अनंत पै :**

मारुती पै यांच्या सन १९३७ साली प्रसिद्ध झालेल्या 'वाङ्मय, लेखन व जीवित'. या बहुविषयी पुस्तकामध्ये प्रो. दत्तो वामन पोतदार यांचे व्यक्तिचित्र आहे. त्यांचे ओझरते स्वभावदर्शन यात आले आहे. या लेखात विशेष चित्रमयता नसली तरी प्रो. द.वा. पोतदारांच्या मनाचा निर्मळ मोकळेपणा, विद्वत्ता, बहिर्मुखी वृत्ती, उत्साही-

चळवळ्या-आनंदी स्वभाव, त्यांचा मातृभाषेविषयीचा अभिमान, पैसा व प्रसिद्धी यांबद्दलची पराङ्मुखता अशा विविध गुणांच्याद्वारे त्यांचे व्यक्तिचित्र साकार केले आहे. तसेच त्यांच्या वृत्तीतील लेखनाचा आळस हा त्यांचा दोषही दाखविला आहे. एकंदरीत, या लेखात लेखकाचा उद्देश सफल झाला आहे.

**वसंत शांताराम देसाई (धनंजय):**

वसंत शां. देसाई हे नाटककार, नाट्यसमीक्षक, चरित्रकार, आत्मचरित्रलेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी एलएल.बी. ची पदवी घेऊन पुण्यात वकीलीस सुरुवात केली. त्यांचा कालखंड १९०४ ते १९९४ असा आहे. १९२७ च्या मे महिन्यात खुद्द बालगंधर्वांनी वसंत देसाई यांना नाटक मागितले. त्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी त्यांनी 'विधिलिखित' (१९२८) हे नाटक लिहिले. त्यांचे हे पहिलेच नाटक. ४ एप्रिल, १९२८ रोजी बालगंधर्वांनी ते रंगभूमीवर आणले. 'अमृतासिद्धि' (१९३३) हे त्यांचे दुसरे नाटक बालगंधर्वांसाठीच लिहिलेले वसंत देसाई यांची 'कुलीन स्त्रिया आणि रंगभूमी' (१९३४), 'कलेचे कटाक्ष' (१९४५), 'मखमलीचा पडदा' (१९४७), 'नट नाटक आणि नाटककार' (१९५६) ही पुस्तके, 'विद्याहरणाचे अंतरंग' (१९४९), 'खाडिलकरांची नाट्यसृष्टी' (१९७२), 'किर्लोस्कर आणि देवल' (१९७५), 'गडकऱ्यांची नाट्यसृष्टी' (१९८२) ही नाट्यसमीक्षा, 'कलावंतांच्या सहवासात' (१९३९), 'बालगंधर्व : व्यक्ती आणि कला' (१९५९), 'रागरंग' (१९६०) अशी अनेक पुस्तके प्रकाशित आहेत.

विष्णुदास भाव्यांपासून अण्णासाहेब किर्लोस्कर, गो.ब. देवल, कृ.प्र. खाडिलकर, केशवराव भोसले, भास्करबुवा बखले, गणपतराव बोडस, गोविंदराव टेंबे, केशवराव दाते, दीनानाथ मंगेशकर, बाबूराव पेंढारकर, हिराबाई बडोदेकर, ज्योत्स्ना भोळे अशा अनेक नाटककार, नट, गायक, कलावंतांविषयी अतिशय भक्तिभावाने आठवणी लिहिणारे देसाई हे मराठी रंगभूमीचा चालता-बोलता कोशच मानले जात. 'अशीच एकाची गोष्ट' (१९७१) हे आत्मचरित्रही त्यांनी लिहिले आहे.

'कलावंताच्या सहवासात' हा वसंत शा. देसाई यांचा सन १९३९ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. यामध्ये त्यांनी संगीत, चित्र, चित्रपट, नाटक या क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. या संग्रहात दहा व्यक्तिचित्रे असून त्यामध्ये हिराबाई बडोदेकर, गोविंद सदाशिव टेंबे, बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, तिरखवाँ व कादरबक्ष ही संगीत क्षेत्रातील मंडळी, गणेश गोविंद बोडस, केशव त्र्यंबक दाते, व्यंकटेश बळवंत पेंढारकर हे नाट्यक्षेत्रातील कलावंत, तर व्ही. शांताराम आणि बाबूराव पेंटर हे चित्रपटक्षेत्रातले कलावंत अशा व्यक्तींचा समावेश झाला आहे. ही व्यक्तिचित्रे परिचयवजा लेखांना बरीच जवळची आहेत. कारण कित्येक ठिकाणी मूळ

व्यक्तीपासून लेखन भरकटत जाते व व्यक्तीचे अंतर्बाह्य नेमके वर्णन करण्याचा प्रयत्न लेखक फारसा करताना दिसत नाही. लेखकांच्या वर्णिलेली व्यक्ती परिचयातील असल्यामुळे, सर्व व्यक्तिचित्रांमागे कौतुकाची व आदराची भावना आहे. तसेच मित्रत्वातून निर्माण होणाऱ्या केवळ गुण टिपण्याच्या वृत्तीमुळे व्यक्तीमधील दोषांचे दिग्दर्शन लेखकाने फारसे केलेले नाही.

व्ही. शांताराम यांच्यावरील लेख मात्र एक उत्तम व्यक्तिचित्र झाले आहे. या लेखनात खास वेगळेपण नसूनही, व्ही. शांताराम यांचे केवळ दिग्दर्शक म्हणूनच चित्रण नसून उत्तम दिग्दर्शक हा त्यांच्या कलागुणांचा एक पैलू मानून इतर वैशिष्ट्यांचा समतोल साधला आहे. मोजक्या प्रसंगांच्या आधारे ही वैशिष्ट्ये उठावदार केली आहेत. व्ही. शांताराम यांच्यामध्ये लहाणपणापासूनच असलेली अभिनयाची जाण व आवड, तसेच त्यांची अखंड प्रयत्नशीलता, नवीन ते आत्मसात करण्याची आणि कामात झोकून देण्याची वृत्ती, यामुळे शांताराम यांना मिळालेली लोकप्रियता यांचे संयमित चित्रण लेखकाने केले आहे. 'शिकायचं कसं ते शांतारामबापूंजवळ शिकावं' असे बाबूराव पेंटरांचे प्रशस्तिपत्रक मिळविणारे व्ही. शांताराम अभिनयाचे उत्तम शिक्षक आहेत, हे उत्तम कलावंताच्या कबुलीवरून लेखकाने दाखविले आहे.

व्ही. शांताराम शिस्तप्रिय, विनयी, उद्योगी, आतिथ्यशील आहेत. 'प्रभात' आणि व्ही. शांताराम हे वेगळे नाहीतच. प्रभात म्हणजे उद्योग हे शांतारामबापूंचे सूत्र लेखक दाखवतो. तसेच व्ही. शांतारामाच्या दिग्दर्शनाचे यश 'नट निर्माण करणारा दिग्दर्शक म्हणून आहे' असे लेखकाने अचूकपणे सांगितले आहे. संगीताचे तज्ज्ञ नसूनही पार्श्वसंगीत वापरातील त्यांची जाणकारी लेखक दाखवितो. व्ही. शांताराम यांचा मुख्य गुण म्हणजे खंबीर मनाने निर्णय घेण्याची वृत्ती! लेखकाने त्यांचे 'a man of quick judgement and strong common sense' असे यथार्थ वर्णन केले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा महत्त्वाचा गुण म्हणजे मिळालेल्या यशापेक्षा पुढील जबाबदारीची जाणीव अधिक असणे, हे लेखक आवर्जून सांगतो. बाह्यरूप, सवयी, लकबी यांचे चित्रण न करताही एका यशस्वी जीवनाचा मूलगामी शोध घेण्याचा प्रयत्न वसंत देसाई यांनी या व्यक्तिचित्रातून केला आहे. त्यामुळे हे एक उत्तम व्यक्तिचित्र झाले आहे.

बालगंधर्व आणि बाबूराव पेंटर याची व्यक्तिचित्रे बऱ्यापैकी वठली आहेत. बाकीचे लेखन साधारण दर्जाचे झाले आहे. थोडक्यात, 'कलावंतांच्या सहवासात' या पुस्तकातील रंगविलेली कलावंतांची व्यक्तिगुणचित्रे चांगली सरस उतरलेली आहेत.

'कलेचे कटाक्ष' हा धनंजय उर्फ वसंत देसाई यांचा, सन १९४५ साली प्रसिद्ध झालेला दुसरा व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये विविध क्षेत्रांतील

सुप्रसिद्ध चौदा व्यक्तींवरील लेखन समाविष्ट असून त्यांपैकी पुढील लेखन व्यक्तिचित्र म्हणून मानता येईल. 'न्यायमंदिरातील हिरा' (धीरजलाल दायाभाई नानावटी), 'कवी कृष्णमाला घाली' (कृ.प्र. खाडिलकर), 'शंभर टक्के विनोदी' (प्र.के. अत्रे), 'शेवटचा शिलेदार' (गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे), 'साहित्यकार आणि शिल्पकार' (फडके), 'माझं नाव धनश्याम'(चिंतामणराव कोल्हटकर), 'एक शालीन साहित्यिक' (वि.सी. गुर्जर), 'कथानकांचे कारागीर'(विष्णूपंत औंधकर), 'कला आणि गणित' (दादासाहेब काटदरे) इत्यादी.

'कलेचे कटाक्ष' या संग्रहाच्या शीर्षकावरून लेखकाचा दृष्टिकोन समजून येतो. व्यक्तिचित्राच्या रूढ पद्धतीचा वापर लेखकाने केला असून काही ठिकाणी स्वभावचित्रण, काही वेळा गुणवर्णन, काही वेळा स्वरूपवर्णन व काही ठिकाणी या साऱ्यांचे मिश्रण अशा प्रकारे हे लेखन झाले आहे. परंतु लेखनात चित्रमयतेचा अभाव जाणवतो. अनावश्यक माहिती, विवेचनातील पाल्हाळ व मूळ व्यक्तीच्या वर्णनापासून लांब जाणे असे काही दोष जाणवत असले तरी त्या त्या क्षेत्रातील व्यक्तीचे कार्य त्यांनी या व्यक्तिचित्रांतून दाखवून दिले आहे.

'रागरंग' हा वसंत देसाई यांचा सन १९६० साली प्रसिद्ध झालेला तिसरा व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या लेखनासाठी लेखकाने 'धनंजय' हे टोपणनाव वापरले नाही. व्यक्तिचित्रलेखन ह्याच हेतूने हे लेखन केल्याचे प्रस्तावनेत लेखकाने स्पष्ट केले आहे. बाबूराव पेंटर, व्ही. शांताराम, हिराबाई बडोदेकर, केशवराव दाते, गोविंदराव टेंबे ही व्यक्तिचित्रे 'कलावंताच्या सहवासात' मधून पुनरुक्त केली आहेत. याखेरीज इतर व्यक्तिचित्रांमध्ये अल्लादियाखाँ, भास्करबुवा बखले, केशवराव भोसले, सवाई गंधर्व, विनायकबुवा पटवर्धन, दिनकर कामण्णा, फैय्याजखाँ इत्यादींचा समावेश होतो. संगीत आणि नाट्य क्षेत्रातील या व्यक्ती आहेत. अल्लादियाखाँ, फैय्याजखाँ, विनायकबुवा पटवर्धन या व्यक्तिचित्रात त्यांच्या क्षेत्रातील वैशिष्ट्ये दिसतात. यात चित्रमयता नसली तरी ढोबळ बाह्यवर्णनाखेरीज व्यक्तीचे स्वभावचित्रण व लेखकाला त्यांच्याबद्दल वाटणारा जिव्हाळा याचे दर्शन मात्र घडते. भास्करबुवा बखले यांच्यावरील लेखनात भास्करबुवांच्या संगीतमय जीवनाची माहिती दिली आहे तर केशवराव भोसले यांच्यावरील लेखात त्यांच्या नाट्यविकासाचा इतिहास सांगितला आहे. सवाई गंधर्वांवरील लेखनात त्यांच्या नाट्यभूमिकेसंबंधी लिहिले आहे. थोडक्यात, कलाक्षेत्रातील कलावंतांचा रसिला परिचय लेखकाने करून दिला आहे. धनंजय यांनी तीन व्यक्तिचित्रसंग्रहांचे लेखन करून एका अर्थाने व्यक्तिचित्राचे महत्त्व पटवून दिले आहे आणि व्यक्तिचित्रे या वाङ्मयप्रकारामध्ये मोलाची भर घातली आहे असेच म्हणावे लागेल.

**ग.त्र्यं. माडखोलकर**

ग.त्र्यं. माडखोलकर हे कादंबरीकार, वृत्तसंपादक, समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा कालखंड १८९९ ते १९७६ असा आहे. माडखोलकरांनी वाङ्‌मयक्षेत्रात प्रवेश काव्यलेखनाने केला. रामदास आणि रामदासी नवयुग, विविध ज्ञानविस्तार अशा मासिकांतून त्यांचे आरंभीचे काव्यलेखन प्रसिद्ध झाले. परंतु त्यांना एकदम प्रसिद्धी लाभली ती नवयुगमध्ये त्यांनी लिहिलेल्या 'केशवसुतांचा संप्रदाय' या टीकालेखामुळे. सन १९२१ साली माडखोलकरांचे 'आधुनिक कविपंचक' हे रे. टिळक, केशवसुत, विनायक, गोविंदाग्रज व बालकवी यांच्या काव्याचे समालोचन करणारे पुस्तक प्रकाशित झाले.

१९३३ नंतर माडखोलकरांच्या कादंबरीलेखनाला वेग आला. भंगलेले देऊळ (१९३४), शाप (१९३६), कांता (१९३९), दुहेरी जीवन(१९३९), मुखवटे (१९४०),नवे संसार (१९४१), अरुंधती (१९५६), रुक्मिणी (१९५९), उर्मिला (१९६३), सत्यभामा (१९६८), जन्मदुर्दैवी (१९७२), रेणुका (१९७५), अकेला (१९७५) इत्यादी कादंबऱ्या; शुक्राची चांदणी (१९३८), रातराणीची फुले (१९४०) हे कथासंग्रह. ऊर्वशी आणि देवयानी (१९६४) ही नाटके. मी व माझे साहित्य (१९६८), मी आणि माझे वाचक (१९७२) असे आत्मप्रकटीकरण करणारे लेखसंग्रह, महाराष्ट्राचे विचारधन (१९७३), आणि समग्र कोल्हटकर (१९७३) ही संपादने; माझे आवडते लेखक (१९६५), माझे आवडते कवी (१९६५), माझे लेखनगुरू (१९६५), व्यक्ती तितक्या प्रकृती (१९७०), श्री.कृ. कोल्हटकर : व्यक्तिदर्शन (१९७०), श्रद्धांजली (१९७४) असे विपुल आणि विविधतापूर्ण लेखनही माडखोलकरांनी केले आहे.

समकालीन लोकप्रिय कादंबरीकार ना.सी. फडके आणि वि.स. खांडेकर यांच्याप्रमाणेच माडखोलकरांनीही कादंबरीकार या नात्याने मराठी साहित्यविश्वात लौकिक प्राप्त केला. 'राजकीय' कांदबऱ्या लिहून त्यांनी कांदबरीच्या क्षेत्रात आपले वेगळेपण दाखवून दिले. तसेच त्यांनी व्यक्तिचित्रलेखनात महत्त्वाची भर घातली आहे. 'माझे आवडते लेखक' हा ग.त्र्यं. माडखोलकरांचा सन १९३९ साली प्रसिद्ध झालेला ग्रंथ होय. यातील बरेच लेख स्वभावचित्रांच्या सदरात समाविष्ट करता येण्यासारखे आहेत. या लेखांतून माडखोलकरांच्या मार्मिक रसिकतेचा मनोज्ञ विलास पाहावयास मिळतो. माडखोलकरांची ही रसिकता मार्मिक असली तरी त्या वर्ण्यव्यक्तीबद्दल मात्र तिला जिव्हाळा बेताचाच आहे. प्रत्यक्ष गुरूवरील म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांवरील लेखाच्या बाबतही जिव्हाळ्याचा हा अभाव जाणवण्यासारखा आहे. या संग्रहातील बहुतेक लेखन हे माडखोलकरांनी त्यांच्या आवडत्या लेखकांच्या लेखनाचे परीक्षण करणारे किंवा लेखकाचा

परिचय देणारे असेच केले आहे. यांपैकी व्यक्तिचित्राच्या जवळ येणारे लेखन म्हणजे बापूजी मार्तण्ड आंबेकर, विष्णू सखाराम खांडेकर, नाट्यछटाकार दिवाकर व कवी यशवंत इत्यादी होय. या लेखनात व्यक्तीचे बाह्यदर्शन, स्वभावदर्शन, बोलणे, चालणे, व्यक्तीचे गुणदर्शन यातून व्यक्तिचित्र साकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'अवशेष' हा सन १९४० साली प्रसिद्ध झालेला ग.त्र्यं. माडखोलकरांचा विविध विषयांवरील लेखसंग्रह होय. या लेखसंग्रहात 'अविस्मरणीय व्यक्ती' आणि 'गोपाळ अनंत गोखले' ही दोन व्यक्तिचित्रे आढळतात. या व्यक्ती प्रसिद्ध आहेत. यापैकी 'अविस्मरणीय व्यक्ती' यामध्ये ज्योतिर्भूषण सेन यांचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. यामध्ये सेन यांची मूर्ती व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हुबेहूब चित्र लेखकाने उभे केले आहे. तसेच गोपाळ अनंत गोखले यांच्यावरील लेखनाचे दोन भाग आहेत. त्यांपैकी १९३३ साली प्रसिद्ध झालेला जो पहिला भाग आहे यामध्ये परिचयवजा लेखन असून १९४० साली लिहिलेल्या दुसऱ्या भागात व्यक्तिचित्र म्हणता येईल असे लेखन झालेले आहे. त्यामध्ये गोपाळ गोखले यांची साधी राहणी, अनेक गुणांनी युक्त असे विविधांगी व्यक्तिमत्त्व असे सुंदर दर्शन लेखकाने घडविले आहे आणि गोखले यांचे व्यक्तिचित्र साकार केले आहे.

'व्यक्तिरेखा' हा ग.त्र्यं. माडखोलकरांचा सन १९६६ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. राजकारण, पत्रकारिता, साहित्यिक क्षेत्र इत्यादी विविध नात्यांनी ग.त्र्यं. माडखोलकरांचे संबंध विविध व्यक्तींशी आले. काहींच्या आठवणी, काहींचे वाढदिवस समारंभ व काहींचे मृत्यूलेख यांचा समावेश त्यांच्या व्यक्तिरेखा (१९६६) या संग्रहात झालेला आहे. डॉ. खरे, डॉ. राघवेंद्र राव, झगलूल पाशा, दयानंद सरस्वती, धों.के. कर्वे, गो.कृ. देवधर, शेठ जमनालाल बजाज, महादेव गोविंद रानडे, बालगंधर्व, नटसम्राट, काकासाहेब खाडिलकर, नटवर्य (केशवराव दाते), पु.रा. लेले, गणपतराव बोडस, दादा धर्माधिकारी, श्री.अ. डांगे, वि.सी.गुर्जर, उमाकांत भेंडे, चिरयात्री (काका कालेलकर), हिराबाई पेडणेकर यांची रेखीव व समर्पक व्यक्तिचित्रे ग.त्र्यं. माडखोलकरांनी रंगविली आहेत. या व्यक्तिचित्रांतून ग.त्र्यं. माडखोलकरांच्या मार्मिक रसिकतेचा मनोज्ञ विलास पाहवयास मिळतो. माडखोलकरांची रसिकता मार्मिक असली तरी व वर्णिलेल्या व्यक्तीचे खास विशेष नेमके टिपून घेणारी असली, तरी त्या व्यक्तीबद्दलचा जिव्हाळा पाहिजे तितका दिसत नाही.

'श्रद्धांजली' हा ग.त्र्यं. माडखोलकरांचा सन १९७४ साली प्रसिद्ध झालेला लेखसंग्रह होय. या संग्रहामध्ये व्यक्तिचित्र म्हणावे असे दोनच लेख दिसतात, ते म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि आदर्श गृहस्थ कवी (गिरीश). या संग्रहातील अन्य लेखन व्यक्तीपर लेखाच्या स्वरूपाचे आहे. संग्रहाच्या नावावरूनच लेखकाची या ग्रंथाच्या

संदर्भातील भूमिका स्पष्ट होते. यामध्ये श्री.कृ. कोल्हटकर यांची व्यक्तिरेखा चांगली रेखाटली आहे. कोल्हटकरांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचा कोटीबाजपणा, गंभीरपणा, त्याची सद्‌भिरुची, प्रखर बुद्धिवाद या सर्वांचे जुन्या आठवणी आणि प्रसंग यांतून चित्रण केले आहे. तसेच श्री.कृ.कोल्हटकर यांची व्यक्ती, साहित्यिक आणि संप्रदाय या तीनही बाबतीत चर्चा करून कोल्हटकरांचे वेगळेपण दाखविले आहे. यातून कोल्हटकरांचे वेगळे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर येते. तसेच कवी गिरीश उर्फ शं.के. कानेटकर यांच्यावरील लेखातून गिरीशांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. त्यांचा स्वभाव, वागणे, बोलणे असे त्यांचे अंतर्बाह्य व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे काव्य, त्यांचे महत्त्व असा परिचय करून दिला आहे. थोडक्यात, या दोन्ही लेखकांच्या कार्याचा परिचय करुन देत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा दिला आहे. त्यातून त्यांची व्यक्तिरेखा आपल्यासमोर उभी राहते.

ग.त्र्यं. माडखोलकरांनी, वरील चर्चा केल्याप्रमाणे चार लेखसंग्रहांमधून भरपूर प्रमाणात व्यक्तिचित्ररेखाटन केलेले आहे. याचा विचार करता त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनाप्रमाणेच या व्यक्तिचित्रलेखनामध्येही स्पष्टवक्तेपणा, निर्भीडपणा आणि स्वतंत्र विचारांचे प्रकटीकरण हे त्यांच्या व्यक्तित्वाचेच विशेष आपणांस जाणवतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिचित्रात जिव्हाळ्याचा अभाव जाणवतो. प्रसिद्ध व्यक्तिवरील त्यांचे लेखन चरित्रचित्रणाकडे जाताना दिसतात. असे असले तरी ग.त्र्यं. माडखोलकरांनी आपल्या साहित्यिक कार्यात व्यक्तिचित्रलेखन करून व्यक्तिचित्राचे महत्त्व पटवून दिले आहे. हे त्यांचे व्यक्तिचित्रलेखन वाङ्‌मयप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**वि.द. घाटे :**

विठ्ठल दत्तात्रय घाटे हे कवी, ललित लेखक, शब्दचित्रकार, शिक्षणतज्ज्ञ म्हणून परिचित आहेत. त्यांचा कालखंड १८९५ ते १९७८ असा आहे. कवी दत्त उर्फ दत्तात्रय कोंडो घाटे यांचे ते चिरंजीव. ते इंदूर येथून एम.ए. झाले. रत्नागिरीला डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर म्हणून काम करीत असताना बी.टी. ही पदवी मिळाली. या काळात त्यांचा आचार्य प्र.के. अत्रे आणि कृ.पां. कुलकर्णी यांच्याशी स्नेह जमला. ‘मधुकर’ या टोपणनावाने ते कविता लिहीत असत. माधव ज्यूलियन आणि मधुकर यांच्या कवितांचा एकत्रित संग्रह ‘मधु-माधव’(१९२४) या नावाने प्रकाशित झाला.

वि.द. घाटे यांच्या वाङ्‌मयीन कारकिर्दीची सुरुवात ‘दत्तांची कविता’ (१९२०) या संपादनाने झाली. वि.द. घाटे यांनी अप्रतिम अशी शब्दचित्रे, व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. ‘नाना देशातील नानालोक’ (१९३३), ‘काही म्हातारे एक म्हातारी’ (१९३९), पांढरे केस हिरवी मने (१९५९) हे त्यांचे व्यक्तिचित्रांचे संग्रह. ‘यशवंतराव होळकर’

(१९६४) हे नाटक. 'बाजी' (१९६४), आणि 'डॅडी' (१९६४) या नाटिका. 'मनोगते' (१९६६) हा ललित निबंधांचा संग्रह आणि 'दिवस असे होते' (१९६१) हे आत्मचरित्र; अशी त्यांची मोजकीच पण वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती आहे. वि.द. घाटे यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य मोलाचे आहे. 'घाटे-परुळेकर' समितीने शिक्षकांची वेतनश्रेणी ठरवून दिली, वेगवेगळ्या योजना आखल्या, शिक्षकांची परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले. विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरतील अशी क्रमिक पुस्तके तयार केली.

'काही म्हातारे व एक म्हातारी' हा वि.द. घाटे यांचा सन १९३९ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या व्यक्तिचित्रसंग्रहाने एक काळ गाजवून व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. यामुळे या व्यक्तिचित्रसंग्रहाचे महत्त्व विशेष आहे. कुमार रघुवीरांच्या 'हृदय' या संग्रहापासून सुरू झालेल्या व्यक्तिचित्रलेखनाच्या वाटचालीतील, हा नाव घेण्याजोगा पहिला दर्जेदार व्यक्तिचित्रसंग्रह आहे. संग्रहाच्या नावावरूनच यामधील व्यक्तींची निवड स्पष्ट होते. या व्यक्तिचित्रसंग्रहातील म्हातारे कसे आहेत यासंबधी लेखक लिहितो, 'माझे हे म्हातारे थोडे चमत्कारिक आहेत. आपण म्हातारे झालो आहोत हे अजून त्यांना माहीत नाही. दुसऱ्या कोणी, 'तुम्ही म्हातारे झाला आहात' हे त्यांना सांगण्याची सोय नाही. मृत्यू जवळ येऊन ठेपला आहे, पण त्याची यांना फिकीर नाही. ते सर्व कामात गुंतले आहेत. त्यांना स्वत:च्या स्वार्थाचा, सुखसोयींचा अगर दुसऱ्यांच्या कल्याणाचा विचार करण्यास फुरसत नाही. त्यांचा जीवनावर निस्सीम विश्वास आहे. हे सर्व कसल्या तरी कल्पनेच्या, ध्येयाच्या मागे लागलेले आहेत. त्यांचे सर्व आयुष्य त्या कल्पनेला-ध्येयाला वाहिलेले आहे. ते ध्येयलक्षी, कल्पनालक्षी आहेत.' या अवतरणावरून या व्यक्तिचित्रसंग्रहातील व्यक्तींची जीवनशैली आपल्या लक्षात येते.

या व्यक्तिचित्रसंग्रहामधील चौदा शब्दचित्रांपैकी तेरा व्यक्तिचित्रे असून ती पुढीलप्रमाणे एक प्रार्थनासमाजिस्ट, आबासाहेब जहागीरदार, शंकरभैय्या बिनीवाले, एक कारकून, श्रीमंत सयाजीराव महाराज, इंग्रजी मुत्सद्दी-आर्थर बाल्फर, एक इंग्रजी व्यापारी, एक जर्मन म्हातारा, एक इतिहाससंशोधक, नाना न्हावी, आमचे प्रोफेसर, कविराज चंद्रशेखर, आईचे मरण. या व्यक्तिचित्रसंग्रहात विविध क्षेत्रांतील म्हाताऱ्यांचे चित्रण करताना त्यांचे अंतर्बाह्य सूक्ष्म वर्णन केले असून व्यक्तिचित्राच्या ओघात येणारी प्रासंगिक शब्दचित्रे उठावदार झाली आहेत. सर्वच व्यक्तींबद्दल लेखकाला आदर, प्रेम व जिव्हाळा आहे. जीवनसत्यावर आधारित या विक्षिप्त म्हाताऱ्यांची व्यक्तिचित्रे लेखकाने काढल्याने ती आकर्षक, सरस व रम्य झाली आहेत. चित्रमय बहिरंगाबरोबरच विविध मानवी प्रवृत्तींचे दर्शन घडविताना आकर्षक आरंभ, चटका लावणारा शेवट, सूत्रबद्ध निवेदन आणि

संवाद व विनोदांचा योग्य वापर, रसानुकूल भाषा आणि चित्राची पूर्णता यामुळे हे लेखन यशस्वी ठरले आणि मराठी वाङ्मयात एका उत्कृष्ट व्यक्तिचित्रसंग्रहाची भर पडली.

या व्यक्तिचित्रसंग्रहाचे महत्त्व सांगताना सु.रा.चुनेकर लिहितात, ''वि.द. घाटेंना साहित्यिक म्हणून पहिली विशेष मान्यता मिळाली ती 'काही म्हातारे व एक म्हातारी' या पुस्तकानेच. 'व्यक्तिचित्र' या वेगळ्या वाङ्मयप्रकाराला स्वतंत्र रूप व प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या प्रारंभीच्या पुस्तकांपैकी 'काही म्हातारे व एक म्हातारी' हे एक. अशा मराठी साहित्यात नवे वळण सुरू करणाऱ्या पुस्तकाचा इतिहास वस्तुनिष्ठपणाने नोंदवून ठेवावा इतके हे महत्त्वाचे आहे.'' या अवतरणावरूनच आपणास वि.द. घाटे यांचे व्यक्तिचित्रलेखनातील योगदान किती मोठे आहे याची कल्पना येते. वर्ण्यविषयांची योग्य निवड, त्यातील व्यक्तीच्या जीवनातील तादात्म्य, सहृदयता, सहानुभूती, सूक्ष्म अवलोकनशक्ती, रसाळ ओघवती भाषाशैली या विविध गुणांमुळे या व्यक्तिचित्रसंग्रहाने मराठी वाङ्मयात उत्कृष्ट भर घातली आहे. सु.रा. चुनेकरांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत साहित्यात एक नवा वाङ्मयप्रकार कसा जन्माला येतो याची कल्पना येण्यासाठीही या टिपणाचा उपयोग होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

'पांढरे केस हिरवी मने' हा वि.द. घाटे यांचा सन १९५९ साली प्रसिद्ध झालेला दुसरा व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या संग्रहातील मॉड, कर्नल मार्शल, हर्लिंगॅहमचा वीरपुरुष, फुलवेड्या माई, डुंगलीचोर, अवघे पाऊणशे वयोमान, आबा गेले, गुजरातचे 'महाराज', श्रीपत मामा ही व्यक्तिचित्रे आहेत. यांपैकी हर्लिंगॅहमचा वीरपुरुष आणि गुजरातचे 'महाराज' यात व्यक्तिचित्र व व्यक्तिपर लेख यांचे मिश्रण झालेले आहे. तर बाकीची सर्व व्यक्तिचित्रेही उठावदार झाली आहेत. या सर्व व्यक्तींबद्दल लेखकाला आदर, प्रेम व जिव्हाळा आहे. ही व्यक्तिचित्रे रेखाटताना केलेले सूक्ष्म वर्णन, सहज ओघवती भाषा हे गुण या लेखनात दिसतात. पण या व्यक्तिचित्रसंग्रहाचा विचार करता 'काही म्हातारे व एक म्हातारी' मधील दर्जेदारपणाचा विकास या संग्रहात दिसून येत नाही.

वि.द. घाटे यांच्या एकूणच व्यक्तिचित्रांचा विचार करता, त्यांची काहीशी मिस्कील, रसाळ लेखनशैली, जीवनाकडे पाहण्याचा व्यापक व उदार दृष्टिकोन, त्यांचे अंतर्मुख, प्रसन्न, चिंतनात रमणारे व्यासंगी वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व ही वैशिष्ट्ये जाणवतात. व्यक्तिचित्र या वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने वि.द. घाटे यांची ही वाङ्मयीन कामगिरी फार महत्त्वाची आहे.

**त्र्यं.वि. पर्वते :**

त्र्यंबक विष्णू पर्वते हे चरित्रकार, कवी, पत्रकार म्हणून परिचित आहेत. त्यांचे शिक्षण पुणे व मुंबई येथे झाले. असहाकाराच्या चळवळीच्या वेळी मुंबई विद्यापीठाच्या पदवी परीक्षेवर बहिष्कार घालून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची 'वाङ्मय विशारद' ही

पदवी घेतली. (१९२०) त्र्यं.वि. पर्वते यांनी मुंबईच्या इंदुप्रकाश या दैनिकाचे उपसंपादक म्हणून पत्रकारितेला सुरुवात केली. त्यांनी 'भारतसेवक', 'प्रगति', 'ज्योत्स्ना', 'प्रतिभा' या नियतकालिकांतून लेखनही केले. १९३३ ते ३५ या काळात 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक म्हणूनही काम केले. 'लोकमान्य टिळक' (१९५९) हे त्यांनी लिहिलेले महत्त्वपूर्ण चरित्र होय. 'अर्घ्यप्रदान' (१९४२), 'नरसिंह चिंतामण : एक महनीय व्यक्तिमत्त्व' (१९७२) या चरित्रात्मक पुस्तकाखेरीज पर्वते यांनी 'मोहरा इरेला पडला' (१९६५) हे चिमाजी अप्पावर नाटक लिहिले. तसेच 'स्वातंत्र्याचा सेतू' हे जेम्स मिचनर यांच्या कादंबरीचे त्यांनी केलेले भाषांतरही प्रसिद्ध आहे.

'वादसंवादातील व्यक्तिदर्शने' किंवा 'मी घेतलेल्या मुलाखती' हा त्र्यं.वि. पर्वते यांचा संग्रह सन १९४० साली प्रसिद्ध झाला. या संग्रहाच्या नावावरूनच ही रूढ अर्थाने व्यक्तिचित्रे नसून मुलाखती आहेत हे स्पष्ट होते. परंतु काही मुलाखती जर व्यक्तित्व स्पष्ट करणाऱ्या असतील तर त्यांना व्यक्तिचित्राचा प्रकार मानता येतो. या दृष्टीने या संग्रहाचा विचार करण्यात आलेला आहे. या संग्रहातील काही प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती व्यक्तिचित्र प्रकार म्हणून मानता येतील. नेक नामदार मुकुंदराव जयकर, श्रीमती देविकाराणी, प्रसिद्ध क्रिकेटर - विजय मर्चन्ट, व्ही. शांताराम, रेडिओ स्टेशनचे डायरेक्टर बोखारी इत्यादी व्यक्तिमत्त्वे वाद-संवादातून साकार करण्याचा प्रयत्न त्र्यं.वि. पर्वते यांनी केला आहे. त्या व्यक्तींचे स्वभाव, आवड-निवड, त्यांचे कार्यक्षेत्र, चालणे, बोलणे, जीवन जगण्याची शैली, त्यांच्या बद्दलचा जिव्हाळा या सर्व बाबींतून ते ते व्यक्तिमत्त्व आपणासमोर उभे राहाते. तसेच मुलाखती घेताना लेखकाचे लक्ष प्रामुख्याने, या सर्व व्यक्तींच्या खाजगी जीवनातून व्यक्तिमत्त्व उभे करण्याकडे आहे. त्यांचे बाह्यवर्णन करणे, त्यांच्या गुण-दोषांचे दर्शन घडविणे, प्रमुख कर्तृत्व थोडक्यात सांगणे या पद्धतीचा वापर केल्यामुळे या मुलाखती व्यक्तिचित्राजवळ जातात आणि त्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. वाद-संवादातून निर्माण झालेले व्यक्तिमत्त्व वास्तव विचारांसह आपणासमोर येते.

**प्रभाकर पाध्ये :**

प्रभाकर पाध्ये हे श्रेष्ठ समीक्षक आहेत. त्यांनी कथा, निबंध, लघुनिबंध, ललितलेखन, प्रवासवर्णन वैचारिक लेखन, साहित्य समीक्षा इ. वाङ्मयप्रकारांतून लेखन केले आहे. त्यांचा 'मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा व सौंदर्यानुभव'(१९७९) हा प्रसिद्ध समीक्षात्मक ग्रंथ आहे. ते वास्तववादी लेखक म्हणून परिचित आहेत. त्यांचे 'प्रकाशातील व्यक्ती' (१९४१), 'व्यक्तिवेध' (१९७३) हे व्यक्तिचित्रांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी विविध नियतकालिकांतून लेखन केलेले आहे.

'प्रकाशातील व्यक्ती' हा प्रभाकर पाध्ये यांचा सन १९४१ मध्ये प्रकाशित झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. हा हेतुपूर्वक लिहिलेला वास्तव व्यक्तिचित्रांचा संग्रह आहे. या संग्रहात बारा व्यक्तिचित्रे आहेत. त्यांपैकी तीन व्यक्तिचित्रे उठावदार पद्धतीने रेखाटली आहेत. झेड.ए. बुखारी, प्रो. वामन मल्हार जोशी, प्रा. नारायण सीताराम फडके. यांपैकी बुखारी यांचे व्यक्तिचित्र अत्यंत सुंदर रेखाटले आहे. बुखारींचे बाह्यवर्णन व अंतरंग वर्णन इतके सूक्ष्मपणे रेखाटले आहे की त्यांच्या व्यक्तिचित्राला एक प्रकारची चित्रमयता येते. बुखारींचे व्यक्तिचित्र हा एक चांगल्या व्यक्तिचित्राचा नमुना आहे असे आपणास म्हणता येईल. प्रभाकर पाध्ये काही कामानिमित्त आकाशवाणीवर गेले असता बुखारींचे त्यांना घडलेले दर्शन या लेखातून चित्रित केले असून त्यातून बुखारींची कामसू वृत्ती, त्यांचा करडेपणा, मिस्कीलता यांचे सुरेख चित्र पाध्येनी घडविले आहे. राहणीमानाची शिस्त, कडक स्वभाव, कामाच्या बाबतीत तडजोड नाही, उंचीपुरी देहयष्टी, पण बोलण्यात मिस्कीलपणा अशा एका अधिकाऱ्यांचे दर्शन बुखारींच्या व्यक्तिचित्रातून होते.

वा.म. जोशी व ना.सी. फडके यांचीही चांगली व्यक्तिचित्रे लेखकाने रेखाटली आहेत. या दोघांचेही स्वभावगुण, त्यांच्या मनोवृत्तीचे दर्शन, त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा परिचय, स्वभावदर्शन, चालणे, बोलणे, जीवन जगण्याची पद्धती इत्यादींचे दर्शन त्यांच्या व्यक्तिचित्रातून घडविले आहे. पण या लेखनात पाहिजे तितका जिव्हाळा आल्याचे जाणवत नाही. त्यांच्या या संग्रहातील इतर व्यक्तिचित्रेही याच पद्धतीची उतरली आहेत. प्रभाकर पाध्ये यांच्या व्यक्तिमत्त्वाचे 'वैचारिकता' हे वैशिष्ट्य आहे. हे त्यांचे वैशिष्ट्यच व्यक्तिचित्रलेखनाला मारक ठरले असावे असे वाटते. त्यांची इतिहासलक्षी दृष्टी, धडाडीने सांगण्याची वृत्ती, आणि एखादा प्रसंग आत्यंतिकपणे सांगण्याची पद्धत यांचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून येतो.

'व्यक्तिवेध' हा प्रभाकर पाध्ये यांचा सन १९७३ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. संग्रहाच्या नावावरूनच आपणास त्याची कल्पना येते. या संग्रहामध्ये चोवीस लेख आहेत. यातील बहुतांशी लेखन हे व्यक्तीपर लेख किंवा आठवणीसारखे आहे. यामधील काही लेखांमध्ये मात्र व्यक्तिचित्रलेखनाचे गुणधर्म आहेत. त्यामध्ये 'जवाहरलाल नेहरू', 'जयप्रकाश नारायण', 'नाथ पै', 'अल्लाबक्षी ब्रोही', व 'लुई फिशर' इत्यादींचा समावेश आहे.

'जवाहरलाल नेहरू' चे व्यक्तिचित्र लेखकाने चांगले रेखाटले आहे. नेहरूंचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व व चैतन्यमय हालचाली, त्याचबरोबर त्याचे ऋजू अंत:करण, त्यांचा संताप, त्यांना असलेली सत्याची चाड या गुणांचा परिचय करून देता त्यांच्या राजेशाही

सात्त्विक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविले आहे. 'जयप्रकाश नारायण' यांचेही व्यक्तिचित्र चांगले उतरले आहे. या व्यक्तिचित्रात एक सुंदर, सोज्वळ, त्यागमय जीवनाचा अंतर्बाह्य परिचय घडविला आहे. त्यांचे कार्यकर्तृत्व, समाजाबद्दल त्यांना वाटणारी आत्मीयता, त्यांची साधी जीवनसरणी, त्यांचे गुणदर्शन यांमधून एक वेगळे व्यक्तिचित्र साकारले आहे. 'नाथ पै' हे या व्यक्तिचित्रसंग्रहातील, लेखन व शैलीच्या दृष्टीने उत्कृष्ट व्यक्तिचित्र म्हणावे लागेल. आंतरिक जिव्हाळ्याने झालेल्या या लेखनात विलक्षण जिवंतपणा आला आहे. 'नाथ पै' यांचे संसदेतील रूप, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचा व्यासंग, त्यांचे वक्तृत्व, चारित्र्य, त्यांचा मधुर आवाज, रसिकता, सभ्यता, ऋजू नि स्नेहलवृत्ती या सर्वांचा परिचय सुंदर रीतीने घडविला आहे. त्यामुळे हे व्यक्तिचित्र जिवंत आणि रसरशीत वाटते.

'अल्लाबक्षी ब्रोही' व 'लुई फिशर' ह्या परकीय व्यक्तींची व्यक्तिचित्रे लेखकाने रेखाटली आहेत. 'ब्रोही' हे पाकिस्तानचे कायदामंत्री तर लुई हा लेखकाचा मित्र. लुईंना असलेला युगोस्लाव्हियाचा अभिमान इथे दिसतो. या दोघांच्या स्वभावगुणांचे दर्शन लेखकाने घडविले आहे.

प्रभाकर पाध्ये यांच्या या दोन्ही व्यक्तिचित्रसंग्रहांचा विचार करता, त्यातून लेखकाची बुद्धिमत्ता, व्यासंग, जीवनाच्या विशिष्ट भूमिकेतून बनलेली दृष्टी, तसेच समाजवादी विचारांच्या व्यक्तींबद्दल (उदा. जयप्रकाश नारायण, नाथ पै) त्यांना वाटणारा खास आपलेपणा याचा प्रत्यय येतो. पाध्यांच्या लेखनाचा भर बाह्यांगापेक्षा अंतरंगावर आहे आणि स्वभावगुणापेक्षा वर्ण्य व्यक्तींच्या विचारावर अधिक आहे. त्यामुळे वैचारिकता हे या लेखनाचे वैशिष्ट्य ठरले आहे. असे असले तरी वैचारिकतेच्या अंगाने व्यक्तिचित्र लिहिणारे प्रभाकर पाध्ये हे व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे लेखक आहेत. विविधांगी लेखन हे व्यक्तिचित्राला वाङ्मयीन दृष्ट्या श्रीमंत करणारे आहे.

**प्र.श्री. कोल्हटकर :**

प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर हे कथालेखक, विनोदी लेखक, नियतकालिकाचे संपादक व ग्रंथप्रकाशक म्हणून परिचित आहेत. श्री.कृ. कोल्हटकरांचे ते चिरंजीव आहेत. अलाहाबाद विद्यापीठात त्यांनी बी.ए. (१९१७) केले. कोल्हटकरांची 'संजीवनी' नावाने एक पाक्षिक काही वर्षे चालविले (१९३३-३७). लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' त्यातूनच पहिल्यांदा क्रमशः प्रसिद्ध झाली. पुढे ती चार भागांत पुस्तकरूपात कोल्हटकरांनी छापली (१९३४-३६). सौंदर्यदृष्टी असलेला मार्मिक अभिरुचीचा प्रकाशक म्हणून त्यांना लौकिक मिळाला. 'वायुपुत्र' या टोपण नावाने ते लेखन करीत असत. 'संजीवनी', 'नवयुग', 'धनुर्धारी' या पत्रांतून कोल्हटकरांनी जे स्फुट लेखन केले आहे त्यातील काही

निवडक भाग 'आकाशवाणी' (१९३५), व 'मोड आणि खुर्दा' (१९४०) या पुस्तकांत संग्रहित झाला आहे. त्यांनी काही रसरशीत, रोचक, लालित्यपूर्ण अशी स्वभावचित्रे लिहिली. 'ऋणानुबंधी' (१९४२) या नावाखाली ती प्रकाशित झाली आहेत. 'बातमीदार', 'अलका टॉकीज' (१९५१), 'वृद्धाश्रम' (१९५७), 'सेवा' (१९५९) इत्यादी नाटके त्यांनी लिहिली.

'ऋणानुबंधी' हा प्र.श्री. कोल्हटकरांचा सन १९४२ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. इ.स. १९३९ ते १९४२ पर्यंत निरनिराळ्या ठिकाणी प्रसिद्ध झालेली वास्तव पद्धतीची चौदा व्यक्तिचित्रे या संग्रहात एकत्र केली आहेत. त्यांपैकी दोन व्यक्तिचित्रे ही एकाच वेळी दोन व्यक्तींचे वर्णन करणारी आहेत. त्यामुळे या संग्रहातील अन्य बारा व्यक्तिचित्रे याप्रमाणे- अत्रे, शिल्पकार करमरकर, संजीवनी मराठे, र.कृ. जोशी, सुधा, य.गो. जोशी, दुर्गा खोटे, डॉ. भालेराव, गोपीनाथ तळवळकर, कृष्णराव मराठे, अनंत हरि गद्रे, अण्णा जोशी. या व्यक्तिसंग्रहाच्या नावावरूनच वर्ण्य व्यक्तिविषयीचा लेखकाचा दृष्टिकोन व त्यांचे असणारे संबंध स्पष्ट होतात.

अत्रे व संजीवनी मराठे ही या संग्रहातील उत्तम व्यक्तिचित्रे आहेत. प्र.श्री. कोल्हटकरांनी अत्र्यांचे स्वभावचित्र रेखाटताना ''अत्रे म्हणजे पर्वताच्या कड्यावरून धडाडीने धावणारा प्रचंड गंगौघ'' असे जे वर्णन केले आहे ते अगदी यथार्थ आहे. या ओघात काय वाहून येईल हे सांगणे कठीण आहे. कधी कधी औचित्याच्या अपेक्षेचे आसन घालून बसलेल्या रसिकाला, त्या ओघाच्या एखाद्या धडकीत, आपले ते आसन टिकवून धरणे जरा जडच जायचे. एरवी वाचकाला प्रसन्नतेत मनसोक्त डुंबू देणारा हा ओघ वाचकाच्या दृष्टीने कधी कधी बेफाम व्हावयाचा. आपलया उमद्या आणि बेफाम लेखणीने अत्र्यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे ही त्यांच्या ठळक वैशिष्ट्यांची ठसठशीत ओळख करून देण्यास निस्संशय समर्थ आहेत. मात्र अत्र्यांच्या ठिकाणी आढळणाऱ्या लेखनगुणाचे अधिक सौम्य, अधिक मार्मिक, आणि म्हणून अधिक आल्हाददायक स्वरूप कोल्हटकरांनी 'ऋणानुबंधी'मध्ये प्रकट केले आहे. उत्तम स्वभाववर्णन, व्यक्तिमत्त्वानुसार लेखनशैली, लेखनातील जिव्हाळा यांचा प्रत्यय या संग्रहातील व्यक्तिचित्रांमध्ये दिसून येतो. 'कृष्णराव मराठे' व 'सुधा' ही व्यक्तिचित्रे बाह्यवर्णनाच्या दृष्टीने चांगली झाली आहेत. दुर्गा खोटे, डॉ. भालेराव, य.गो. जोशी, संजीवनी मराठे, अनंत हरि गद्रे, शिल्पकार करमरकर, र.कृ. जोशी, य.गो. जोशी, गोपीनाथ तळवळकर ही आपल्या ऋणानुबंधींची चित्रे रेखाटताना कोल्हटकरांनी 'गुणैकदृष्टी' म्हणजे त्याचे गुण घेण्याची दृष्टी स्वीकारलेली आहे. ही सर्व व्यक्तिचित्रे त्यांच्या अपेक्षेप्रमाणे खरोखरच चटकदार उतरली आहेत. या

चटकदारपणाला त्यांची विनोदी दृष्टीच आधारभूत आहे.

स्वभावचित्रलेखनाचा उपक्रम मराठीत नव्यानेच सुरू करणाऱ्या दि.वा. दिवेकर यांचे लक्ष मुख्यत: राजकीय क्षेत्रातील थोर व्यक्तीकडे होते; पण 'समाजाला आणि राष्ट्राला प्रगतिपथावर प्रवास करण्यास मदत करणाऱ्या' सामान्य व्यक्तीसुद्धा सरस स्वभावचित्रांचा विषय होऊ शकतात हे प्र.श्री. कोल्हटकरांनी दाखवून दिले आहे.

प्र.श्री. कोल्हटकरांच्या व्यक्तिचित्रलेखनावरून प्रामुख्याने जाणवतो तो त्यांचा मनमोकळेपणा आणि आत्मनिष्ठेतून आलेला जिव्हाळा. जिव्हाळ्याबरोबरच येणारा जागरूक विवेक हे या लेखनाचे एक वैशिष्ट्य आहे. याशिवाय वर्ण्य व्यक्तीबद्दलचा आदर, आपुलकी, त्यांच्याविषयी कळकळ याचेही दर्शन त्यातून घडते. थोडक्यात, प्र.श्री. कोल्हटकर हे एक चांगले व्यक्तिचित्र लेखन करणारे लेखक आहेत. त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या जीवनामध्ये आलेल्या, त्यांना भावलेल्या, त्यांच्या ऋणानुबंधींचे ऋण 'व्यक्तिचित्र' रेखाटन करून फेडण्याचा प्रयत्न केला आहे. 'ऋणानुंबधी'सारखा एखादाच व्यक्तिचित्रसंग्रह जरी कोल्हटकरांचा असला तरी व्यक्तिचित्र या वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने तो फार महत्त्वाचा आहे.

**कमलाबाई देशपांडे :**

कमलाबाई देशपांडे या साहित्यसम्राट न.चिं. केळकर यांच्या कन्या होत. त्यांचा कालखंड १८९८ ते १९६५ असा आहे. विवाहानंतर दोन-अडीच वर्षांतच कमलाबाईंना वैधव्य आले. १५ व्या वर्षी विधवा झालेल्या कमलाबाईंना त्यांच्या सुधारणावादी सासऱ्यांनी शिक्षण द्यायचे ठरवले. त्या हिंगण्याच्या कर्वे यांनी चालविलेल्या विद्यापीठातून पदवीधर झाल्या. पीएच्. डी.पर्यंत त्यांनी शिक्षण घेतले. शिकलेल्या कमलाबाईंनी तात्यासाहेब केळकरांसारख्या विद्वान साहित्यिकाची कन्या म्हणून वेगळेच जग अनुभवले होते. त्यांना त्या काळाच्या मानाने बरेच स्वातंत्र्य लाभले होते. येथवरचा सारा जीवनप्रवास त्यांनी 'स्मरणसाखळी' (१९४३) या आत्मचरित्रात गुंफला आहे. मुलीची शाळा चालविताना तसेच 'भारत सेविका समाज' ही विधवासाठी असणारी संस्था चालवताना घेतलेल्या अनुभवातून त्यांची 'चिमण्या' (१९४२) तसेच 'हसरा निर्माल्य आणि चिमण्या' (१९४४) ही व्यक्तिचित्रांची पुस्तके तयार झाली. त्यातील लेख प्रथम 'सह्याद्री' मासिकातून प्रकाशित झाले होते. नात्यातल्या आणि परिचयातल्या वृद्ध स्त्रिया, भाजीवाली, माळीण तसेच त्यात बाया कर्वे यांची हृद्य व्यक्तिचित्रे व मुलांची व्यक्तिचित्रे तसेच वसतिगृहातल्या लहान मुलींची चित्रणे आहेत. कमलाबाईंनी मुंबई मराठी साहित्य संघात दिलेल्या व्याख्यानांचे 'अपौरुषेय वाङ्मय अर्थात स्त्रीगीते' (१९४८) हे पुस्तक प्रकाशित आहे. त्यांच्या कायदेविषयक अभ्यासातून 'स्त्रियांच्या

कायद्याची वाटचाल' (१९६०) हा महत्त्वपूर्ण ग्रंथ सिद्ध झाला आहे.

'हसरा निर्माल्य आणि चिमण्या' हा कमलाबाई देशपांडे यांचा सन १९४४ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. हा संग्रह दोन संग्रहांचे एकत्रीकरण करून तयार करण्यात आलेला आहे. या व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये मोठ्या व्यक्ती आणि बालमनाचे एकत्र चित्रण करण्याचा प्रयत्न आहे. यापैकी 'हसरा निर्माल्य' या भागात भीमकाका, माळीणबाई, आई, बाया तसेच नात्यातल्या आणि परिचयातल्या वृद्ध स्त्रिया, भाजीवाली इत्यादींची हृद्य व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. आहे त्या परिस्थितीमध्ये सुखी होण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही अप्रसिद्ध व्यक्तींचे चित्रण कमलाबाईंनी केले असून ते चित्रण डोळ्यात भरण्यासारखे झाले आहे. जीवन जगण्याची त्यांची काही वेगळी वैशिष्ट्येही कमलाबाईंनी चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. 'चिमण्या' या दुसऱ्या भागात पाच ते पंधरा वर्षाच्या मुलींच्या शालेय काळातील स्वभावविशेषांचे चित्रण करण्याचा प्रयत्न आहे. वसतिगृहातल्या लहान मुलींची चित्रणे त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांसह रेखाटली आहेत. त्यामध्ये वारुवती, मैनाराणी, सोनू, श्रीधर, बाबली इत्यादी अप्रसिद्ध बालके आहेत. अशा चिमण्या मुला-मुलींची निरागसता, त्यांचे बागडणे, गरीब परिस्थिती, त्यांची जाण इत्यादींतून ही व्यक्तिचित्रे साकारली आहेत.

या व्यक्तिचित्र संग्रहाचा विचार करता, कमलाबाई देशपांडे यांचा वत्सल स्वभाव, सूक्ष्म निरीक्षणे, प्रेमळ स्वभाव या पुस्तकात प्रतिबिंबित झाल्याचे दिसते. या संग्रहातील काही व्यक्तिचित्रे कथासदृश झाली आहेत. बहुतेक व्यक्ती गरीब परिस्थितीतील किंवा गरीब स्वभावाची असल्याने ही व्यक्तिचित्रे कधी-कधी एकसुरी झालेली आहेत असे वाटते. मुलांचे स्वभाव मात्र भिन्न-भिन्न आहेत. असे जरी असले तरी एका स्त्री लेखिकेने लहान मुलांची व्यक्तिचित्रे लिहिल्याने आणि स्त्री हृदयीचा जिव्हाळा त्या चिमण्या बालकांमध्ये उतरल्याने ती व्यक्तिचित्रे चांगली झाली आहेत. ती निश्चितच दुर्लक्ष करण्यासारखी नाहीत. कमलाबाई यांचे हे लेखन व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**वि.स. खांडेकर :**

वि.स. खांडेकर हे कादंबरीकार, कथाकार, लघुनिबंधकार, समीक्षक, पटकथालेखक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांचा कालखंड १८९८ ते १९७६ असा आहे. ते शिरोड्याला शिक्षक होते. खांडेकरांचा १९२० ते १९३८ हा शिरोड्यातल्या काळ लेखक म्हणून उमेदीचा काळ होता. लेख, विनोदी साहित्य, कविता, पुस्तकपरीक्षणे असे लेखन ते आरंभीच्या काळात करीत. 'हृदयाची हाक' ही त्यांची पहिली कादंबरी सन १९३० साली प्रसिद्ध झाली. यानंतर 'कांचनमृग' (१९३१), 'दोन ध्रुव' (१९३४),

‘उल्का’ (१९३४), ‘दोन मने’ (१९३८), ‘पांढरे ढग’ (१९३९), ‘रिकामा देव्हारा’ (१९३९), ‘पहिले प्रेम’ (१९४०), ‘क्रौंचवध’ (१९४२), ‘अश्रु’ (१९५४), ‘ययाति’ (१९५९), ‘अमृतवेल’ (१९६७) इत्यादी कादंबऱ्या; ‘वायुलहरी’ (१९३६), ‘सायंकाळ’ (१९३९), ‘अविनाश’(१९४१) इत्यादी दहा लघुनिबंधसंग्रह; तसेच त्यांचे ३४ ते ३५ कथासंग्रह प्रकाशित आहेत. ‘वनभोजन’ (१९३५), ‘धुंधुर्मास’ (१९४०), ‘गोकर्णीची फुले’ (१९४४) हे लेखसंग्रह; ‘आगरकर:चरित्र, व्यक्ती आणि कार्य’ (१९३२), ‘गडकरी : व्यक्ती व वाङ्मय’(१९३२) इत्यादी समीक्षालेखन; तसेच चित्रपटकथा, संवाद व गीते त्यांनी लिहिली.

वि.स. खांडेकरांनी कादंबरी व कथा हे दोन साहित्यप्रकार मोठ्या प्रमाणावर हाताळले. खांडेकरांचे लेखन भावना आणि कर्तव्य, चांगले आणि वाईट, कला आणि जीवन अशा पद्धतीचे आहे. कल्पनाचमत्कृती, उपमा-उत्प्रेक्षा-रूपके यांचा वापर, जीवनमूल्ये बिंबवणारी सुभाषितबहुल भाषा ही त्यांच्या लेखनाची पद्धत मात्र बदललेली नाही. खांडेकरांच्या लेखनातून दिसणारी विनोदबुद्धी कोल्हटकर-गडकऱ्यांच्या प्रभावातून निर्माण झालेली होती. ‘रूपककथा’ ही खांडेकरांची मराठी कथेला देणगी आहे. आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि आदर्श मूल्ये यांची मांडणी खांडेकरांनी रूपककथांतून केली आहे. खलिल जिब्रानच्या रूपककथांचे त्यांनी अनुवाद केले. ‘वेचलेली फुले’ (१९४८) यात या रूपककथा समाविष्ट आहेत. स्वतंत्र अशा रूपककथा खांडेकरांनी जवळजवळ दीडशेहून अधिक लिहिलेल्या आहेत.

खांडेकरांचे लेखन आरंभापासून अखेरपर्यंत, काही एका जीवितहेतूने प्रभावित झाले आहे. शिरोड्यासारख्या लहानशा खेड्यात आदर्श शाळा चालवून त्यांनी ते ध्येय प्रत्यक्षात आणले. लेखन हे याच ध्येयाची पूर्ती करण्यासाठी त्यांनी स्वीकारलेले दुसरे साधन होते. त्यामुळे ध्येयवाद, आदर्शवाद, मूल्यांची शिकवण, गरिबांविषयी तळमळ आणि सहानुभूती, माणसातल्या चांगुलपणाला घातलेली हाक आणि त्याच्या विवेकाला सद्भावाची टोचणी लावणे या सर्व गोष्टी त्यांच्या लेखनात अविभाज्यपणे येत राहिल्या. खांडेकरांची समीक्षादृष्टी अत्यंत प्रगल्भ होती. स्वत:च्या कादंबऱ्यांना आणि इतर समकालीन लेखकांच्या लेखनाला त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना, तसेच त्यांनी लिहिलेले समीक्षात्मक लेखन हे त्यांच्या वाङ्मयीन मर्मदृष्टीचे द्योतक आहे. खांडेकराचे विनोदी लेख, प्रस्तावना, समीक्षात्मक लेखन, इतर ग्रंथांमध्ये समाविष्ट झालेले लेख, भाषणे, अप्रकाशित लेखन यांची संख्या देखील चकित करणारी आहे. खांडेकराच्या ‘दोन ध्रुव’ आणि ‘क्रौंचवध’ या कादंबऱ्या कन्नड, गुजराती, तमिळ, हिंदी, बंगाली या भाषांत अनुवादित झाल्या आहेत. हे त्यांचे वाङ्मयीन कार्य पाहून त्यांना सन १९७४ साली

ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित केले आहे. असे हे वाङ्मयीन क्षेत्रातील मोठे आणि महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी व्यक्तिचित्रलेखनही केलेले आहे. त्यामध्ये 'गोकर्णीची फुले' (१९४४) आणि 'ते दिवस ती माणसे' (१९६१) या संग्रहांचा समावेश होतो.

'गोकर्णीची फुले' हा वि.स. खांडेकरांचा, सन १९४४ साली प्रसिद्ध झालेला लेखांचा संग्रह होय. या संग्रहामध्ये 'व्यक्तिरेखा' हा वेगळा विभाग केला असून त्यामध्ये पाच व्यक्तिचित्रे आहेत आप्पा नाबर, प्रो. ना.सी. फडके, बाळकृष्ण कुडाळकर, आमचे गजाननराव, आई. यांपैकी ना.सी. फडके व ग.त्र्यं. माडखोलकर या प्रसिद्ध व्यक्ती आहेत; तर अन्य तीन अप्रसिद्ध व्यक्ती आहेत. ना.सी. फडके यांच्या व्यक्तिचित्रात दिसण्याचे वर्णन सोडता बाकी भाग त्यांच्याबरोबरची वाङ्मयीन चर्चा व त्यांच्या भेटीची आठवण सांगणारा असा आहे. 'कुलाब्याची दांडी', 'जादूगार', 'दौलत' इत्यादी कादंबऱ्या लिहिणाऱ्या फडक्यांची तात्यासाहेब कोल्हटकरांबरोबर अचानक भेट होते. ते फडके यांना खांडेकरांशी ओळख करून देतात. खांडेकरांना ना.सी. फडक्यांचे वाङ्मयीन कार्य आठवायला लागते. फडक्यांच्या काही आठवणींनी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे दिग्दर्शन ते करतात. ना.सी. फडके हे विलक्षण लोकप्रिय लेखक होते हे सांगताना वि.स. खांडेकर लिहितात- ''फडक्यांच्या या विलक्षण लोकप्रियतेचे रहस्य हे त्यांच्या शैलीत आहे. 'The style is the man' ही उक्ती त्यांच्या इतकी फारच थोड्या लेखकांना लागू पडेल. हरिभाऊ आपट्यांच्या भाषेचा साधेपणा, गुर्जरांच्या बंगाली कथांच्या अनुवादांनी प्रचलित केलेल्या भाषेतील नादमाधुर्य आणि केळकरांच्या शैलीतील कुठलाही विचार अगदी सहज रीतीने व्यक्त करण्याचा घरगुतीपणा या तिन्हीचा मधुर संगम फडक्यांनी आपल्या लेखन-संसारात आरंभीच साधला. 'चित्रपटांची चांडाळ चैन' यासारख्या लेखात त्यांच्यावर पडलेली गडकऱ्यांची छाप स्पष्टपणे दिसून येते. पण चांदण्याचे सौंदर्य अभ्रांनी लोपून जाते, हे चटकन ओळखून त्यांनी शब्दालंकारांनी भारावलेल्या त्या शैलीचा त्याग केला व आपली नवीन मधुर भाषाशैली निर्माण केली. सध्याच्या उदयोन्मुख लेखकांच्या भाषेत अनेकदा माधुर्य आणि प्रसाद यांचा जो सुंदर संगम दिसतो, त्याचे निम्मे श्रेय फडक्यांना द्यावे लागेल.'' या अवतरणावरून वि.स. खांडेकरांनी फडक्यांचे वाङ्मयीन महत्त्व सांगितले असून त्यांचे वाङ्मयातील योगदान स्पष्ट केले आहे. ना.सी. फडके यांच्या इतका कलासंस्कार असलेला लेखक मराठीत विरळच आहे. त्यांची वर्णने सूक्ष्म, जिवंत व रेखीव आहेत. त्यांच्या भाषेला मोहक नादमाधुर्य आहे. त्यामुळे मराठी समाजाबाहेरल्या कितीतरी स्वभावचित्रांना त्यांनी मराठी वाङ्मयाच्या जगात आणून सोडले आहे असे त्यांच्या वाङ्मयीन परिचयातून

सांगत खांडेकरांनी त्यांचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे.

'आमचे गजाननराव' ही व्यक्तिरेखा खांडेकरांनी गजाननराव माडखोलकर यांच्या अनेक आठवणींतून उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या वाङ्मयीन कार्याची चर्चाही केली आहे. ग.त्र्यं. माडखोलकर हे टीकाकार म्हणून प्रसिद्ध होते. ते सांगताना लेखक लिहितो- ''गजाननरावांनी प्रेमळ पती, जिवलग मित्र, रसाळ कथालेखक, कुशल संपादक इत्यादी अनेक भूमिका यशस्वी रीतीने पार पाडल्या असल्या तरी ज्या शक्तीने त्यांचे लेखन इतके प्रभावी आणि परिणामकारक केले आहे, आणि जिने आजच्या मराठी वाङ्मयाच्या प्रमुख नेत्यांत त्यांना मानाचे स्थान मिळवून दिले आहे ती शक्ती टीकाकाराची आहे.'' माडखोलकर हे टीकाकार म्हणून श्रेष्ठ होते हे सांगण्याचा यातून प्रयत्न केला आहे. त्यांचा सहवास आणि वाङ्मयीन कार्य यांतून हे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. 'आप्पा नाबर' ही शिरोड्यातील एक व्यक्ती. आप्पांना आपल्या गावात सुधारणा व्हाव्यात असे वाटे. तसे देशाबद्दलचे प्रेम त्यांच्या बोलण्यातून सतत जाणवत असे. भोळेभाबडे वात्सल्यच आप्पांच्या रूपाने शिरोड्यात अवतरले होते. इतरांच्या सुखाकरता नि समाजाच्या हिताकरता काही तरी करावे ही तळमळ त्यांच्या हृदयात अखंड असे. म्हणून त्यांनी देणगी म्हणून शाळेस जमीन दिली होती. शाळा त्यांच्याच जागेवर उभी होती. नेपोलियनप्रमाणे त्यांच्याही कोशात 'अशक्य' हा शब्द नव्हता. उत्कट भावना हाच त्यांचा आयुष्याचा आत्मा होता. अशा आप्पांच्या सहवासातून व आठवणींतून लेखकाने त्यांचे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. 'बाळकृष्ण कुडाळकर' हा अशिक्षित पण पंगू, रुग्ण मनुष्य होता. भीषण प्रकारच्या संधिवाताने त्याच्या शरीराचा ताबा घेतला होता. पण त्याचे मन, त्या मनाची चळवळ, त्या मनाच्या हालचाली, त्या मनाचे सामाजिक भान आणि त्या मनाचा दुर्दम्य आशावाद-सारे काही विलक्षण होते. त्या लुळ्यापांगळ्या शरीराशी त्याच्या मनाचा जणू मुळी संबंधच नव्हता. त्याला वाचनाची आवड होती. अशा कुडाळकरांच्या जीवनाचे चित्रण करून एक वेगळे व्यक्तिमत्त्व लेखक आपणासमोर साकार करतो. 'आई' मधून आईच्या जीवनातील प्रसंग आणि आठवणी लेखकाने सांगितल्या आहेत. तसे हे व्यक्तिचित्र साधारण स्वरूपाचेच आहे.

'ते दिवस, ती माणसे' हा वि.स. खांडेकर यांचा सन १९६१ ला प्रसिद्ध झालेला सतरा प्रकरणांचा संग्रह आहे. या पुस्तकामध्ये सहा लेख आणि अकरा व्यक्तिरेखा आहेत. या व्यक्तिरेखांविषयी लेखक लिहितो, ''काही कारणांनी ज्या प्रसंगाची अथवा व्यक्तीची स्मृती मनात तीव्रतेने जागृत झाली, त्या प्रसंगाचे अथवा व्यक्तीचे हे भावचित्रण आहे. व्यक्तिरेखातही व्यक्तिचित्राच्या पूर्णतेपेक्षा त्या त्या व्यक्तीशी आलेला माझा संबंध आणि तिचा माझ्यावर झालेला संस्कार यांनाच प्राधान्य आहे.'' यातून लेखकाचा

व्यक्तिचित्र लेखनाचा हेतू स्पष्ट होतो. प्रस्तुत संग्रहातील अकरा व्यक्तिचित्रांपैकी 'गोकर्णीची फुले' मधील तीन व्यक्तिचित्रे त्यात पुनरुक्त केली आहेत. दादा, बाबाकाका, धोंडू, डॉ. देव, मुद्‌गल मास्तर, गडकरी मास्तर, बयावयनी, आक्का इत्यादी व्यक्तिरेखा पुनरुक्त व्यक्तिचित्रांखेरीज इतर व्यक्तिरेखा. स्मृतीतून येणारे काही व्यक्तींचे हे भावचित्रण असून पूर्णतेपेक्षा त्या व्यक्तीशी लेखकाचा असणारा संबंध, त्या व्यक्तीचा, संबंधाचा लेखकावर झालेला संस्कार, त्या व्यक्तीचे गुण, स्वभाव, आठवणी यांतून व्यक्तिरेखा रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. तशा या व्यक्तिरेखा साधारण स्वरूपाच्याच आहेत. 'व्यक्तिचित्रलेखन' म्हणून जी पथ्ये पाळावयास पाहिजे होती, ती लेखकाने पाळलेली दिसत नाहीत. असे असले तरी व्यक्तिचित्र लिहिण्याचा प्रयत्न एका प्रसिद्ध लेखकाकडून झालेला आहे. हे व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**मालतीबाई दांडेकर :**

मालतीबाई दांडेकर यांचे शिक्षण इंग्रजी चौथीपर्यंत झाले होते. त्यांचा कालखंड १९११ ते १९८६ असा आहे. १९३० च्या सुमारास त्यांनी लेखनास प्रारंभ केला. मालतीबाईंनी भरपूर साहित्यनिर्मिती केली आहे. त्यांचा पहिला कथासंग्रह १९३५ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर १९८० पर्यंत त्यांचे १७-१८ कथासंग्रह प्रकाशित झाले. याशिवाय 'मातृमंदिर' (१९४१), 'तेजस्विनी' (१९४३), 'वज्रलेख' (१९४६), 'कृष्णरजनी' (१९४७), 'काटेरी मार्ग'(१९४८), 'दुभंगलेले जग' (१९६३), 'वास्तू' (१९६५), 'तपश्चर्या' (१९६९), 'भिंगरी' (१९७०), 'जिद्द' (१९७६), 'अमरप्रीती' (१९८०), 'चक्रवर्ती' (१९८१), 'मावळचा कान्हा' (१९८३) या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. मालतीबाईंच्या प्रारंभीच्या लेखनावर वि.स. खांडेकरांचा प्रभाव दिसतो. गरीब-श्रीमंत, सुष्ट-दुष्ट अशी द्वंद्वे घेऊन साधारणपणे सुखान्त योगायोगावर आधारलेल्या, प्रणयप्रधान कथा त्यांनी लिहिल्या. कादंबऱ्यांमधून त्यांनी समाजसुधारणेला अनुकूल असणाऱ्या नायिका रंगविल्या. वैवाहिक जीवनातील वैफल्य, स्त्रियांची फसवणूक इत्यादी विषय तसेच 'हिरा आणि गारगोटी' (१९५०) मध्ये बालसंगोपनाचा प्रश्न असे समकालीन विषय त्यांनी हाताळले. तसेच 'ज्योती' (१९५५), 'संगीत संस्कार' (१९६४), 'पर्वकाळ ये नवा' (१९६८) ही नाटके; त्याशिवाय 'भावी गृहिणी अर्थात उदयाची कन्या' (१९४७), 'आकर्षक संसार' (१९४७), 'कन्येस सप्रेम भेट' (१९५०), 'मराठी कादंबरीतील अष्टनायिका' (१९६१) ही त्यांची इतर पुस्तके. मालतीबाईंनी बालसाहित्य खूप लिहिले. त्यांच्या बालसाहित्याच्या पुस्तकांची संख्या ११५ एवढी आहे. 'विद्युत्‌रेखा' (१९४४) ही शब्दचित्रे मालतीबाईनी लिहिली आहेत.

विद्युतरेखा हा मालतीबाई दांडेकरांचा सन १९४४ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह

होय. या संग्रहामध्ये आपल्या सभोवतालच्या जीवनातील परिचित अशा व काही कारणाने लेखिकेच्या मनावर परिणाम करणाऱ्या २५ स्त्रियांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. ही व्यक्तिचित्रे अप्रसिद्ध स्त्रियांची आहेत. या व्यक्तिचित्रांमधून सोशीक, चंचल, बुद्धिमान, अंतर्मुख, सुस्वरूप व कुरूप, संसारी, नखरेल, श्रद्धाळू, गृहिणी, नोकरदार, भोळ्या, विलासी, मितभाषी, अल्लड अशा विविध स्वभावाच्या, रूपाच्या स्त्रिया लेखिकेने रंगविल्या आहेत. बाह्य व्यक्तिमत्त्व आणि स्वभावछटांचे वर्णन बऱ्याच व्यक्तिचित्रांमध्ये केलेले असले तरी, व्यक्तिचित्राचे नेमके चेहरे न वर्णिता बऱ्याच ठिकाणी स्त्रियांची व्यक्तिचित्रे प्रातिनिधिक वाटावीत अशा पद्धतीने रंगविली आहेत. या व्यक्तिचित्रलेखनात लेखिकेची भूमिका अलिप्त निवेदिकेची असल्याने ही व्यक्तिचित्रे वेगवेगळ्या स्वभावाची व रूपाची झालेली आहेत. या चित्रणात बऱ्याच ठिकाणी सांकेतिकता आल्याने ही व्यक्तिचित्रे पूर्ण वाटत नाही. त्यामुळे हे लेखन थोडे कृत्रिम आणि कंटाळवाणे झाल्यासारखे वाटते. असे असून देखील सूक्ष्म निरीक्षणशक्तीच्या आधारे मालतीबाईंनी विविध स्त्रियांचे नमुने प्रकट केलेले आहेत; हे मात्र येथे उल्लेखनीय आहे. इतर साहित्यप्रकारात विपुल लेखन करणाऱ्या मालतीबाई दांडेकराचे लक्ष 'व्यक्तिचित्र' लेखनाकडे गेले हे काही कमी महत्त्वाचे नाही.

**सरोजिनी बाबर :**

सरोजिनी बाबर या स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महत्त्वाच्या लोकसाहित्य संकलक व लेखिका आहेत. लोकसाहित्याचे संकलक, संपादक व संशोधक म्हणून बाबर यांचे योगदान मोठे आहे. याबरोबरच कादंबरी, कथा, कविता, आत्मचरित्र व ललितनिबंध यासारख्या वाङ्मयप्रकारातून त्यांनी विपुल लेखन केले आहे. बाबर यांनी अकरा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यामध्ये 'कमळाचं जाळं', 'अजिता', 'हिरवा चुडा', 'आठवतंय तेवढं सांगते', आणि 'इथे गोष्ट संपली', 'यशोधरा' इ. कादंबऱ्या प्रमुख होत. त्यांनी कथालेखनही केले आहे, त्यामध्ये 'नव्याची पुनव', 'डोंगरची मैना', 'चिंचेची पत्रावळी', 'माहेरचा चंद्र', 'झालं गेलं सांगते' असे दहा कथासंग्रह आहेत. 'झोळणार' आणि 'चाफेकळी' हे दोन कवितासंग्रह तसेच बालवाङ्मय व प्रबंधलेखन इ. लेखन त्यांच्या नावावर आहे. त्यांनी 'वडीलधारी माणसं' (१९४८) हे व्यक्तिचित्रसंग्रहाचे पुस्तक लिहिले आहे.

'वडीलधारी माणसं' हा सरोजिनी बाबर यांचा, सन १९४८ साली प्रकाशित झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. यामध्ये, या संग्रहाच्या नावाप्रमाणे नऊ अप्रसिद्ध वडीलधारी म्हातारी माणसे यांची चित्रे रेखाटली आहेत. त्यामध्ये सखू मावशी, गिरजा, कृष्णाआई, पार्वती, चंदीकाकू, जिजी, कमळामामी, मंजूळा, दादा इत्यादींचा समावेश आहे. या

व्यक्तिचित्रसंग्रहाला ग.ल. ठोकळ यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्या प्रस्तावनेमध्ये ते म्हणतात, ''ही माणसे म्हातारी असली तरी सुंदर आहेत. जीवनरस त्यांच्या नसानसातून वाहतो आहे.'' यातून आपणास असे लक्षात येते की या व्यक्तिचित्रातल्या व्यक्ती जीवनावर प्रेम करणाऱ्या आहेत. त्या सामान्य आहेत. त्यांचे जगणे सामान्य आहे पण त्या जगण्यावर त्या प्रेम करणाऱ्या आहेत. वयाने म्हाताऱ्या असल्या तरी मनाने तरुण व प्रसन्न आहेत. त्यामुळे त्या सुंदर वाटतात. त्या व्यक्ती आपले जीवन समरसून जगतात. त्यांचे हे जगणे त्यांच्या हालचालींतून, जगण्यांतून नजरेत भरते. काही व्यक्तिचित्रांमध्ये चित्रणाच्या ओघात बाह्यवर्णन केलेले आहे. लेखिकेचा भर प्रामुख्याने स्वभाववर्णनावर अधिक आहे. त्यामुळे या व्यक्तिचित्रांतून स्वभावाचे विविध नमुने आपणास जाणवतात. गिरजा, कृष्णाबाई, पार्वती, मंजुळा ही व्यक्तिचित्रे काहीशी कथेच्या धाटणीची झाल्यासारखी वाटतात. इतर व्यक्तिचित्रे मात्र लेखिकेने चांगली रेखाटली आहेत.

या व्यक्तिचित्रसंग्रहातील बहुतेक व्यक्ती सरोजिनी बाबरांच्या नात्यातील किंवा निकट परिवारातील असाव्यात असे वाटते. ही व्यक्तिचित्रे रेखाटताना लेखिकेने निवेदनापेक्षा संवादात्मक प्रसंगांवर भर दिल्याचे जाणवते. व्यक्तीच्या लकबींचे वर्णन मात्र फारशा प्रमाणात येताना दिसत नाही. या सर्व व्यक्ती एकाच वयोगटातील असल्याने त्यांचे स्वभावही बरेचसे सारखे असल्यासारखे वाटतात. या सर्व व्यक्तिचित्रांना लेखिकेने 'शब्दचित्र' म्हटले आहे. सरोजिनी बाबरांनी आपल्या सहवासातील, परिवारातील, भोवतालची त्यांना भावलेली वडीलधारी माणसे चित्रित करून व्यक्तिचित्रामध्ये मोलाची भर घातली आहे.

**कुसुमावती देशपांडे :**

कुसुमावती देशपांडे या समीक्षक, कथाकार म्हणून परिचित आहेत. त्यांनी विविध विषयांवर लेखन केले आहे. त्यांचा 'मराठी कादंबरी : पहिले शतक' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. तसेच मोळी (१९४६), दीपमाळ (१९५८) व इतर कथासंग्रह त्यांनी लिहिलेले आहेत. 'मोळी' हा कुसुमावती देशपांडे यांचा सन १९४६ साली प्रसिद्ध झालेला कथासंग्रह होय. परंतु या कथासंग्रहामध्ये ज्याला व्यक्तिचित्रे म्हणता येईल असे 'दमडी', 'जाईबाई', 'लहानी', 'इंद्रा' या व्यक्तिचित्रांचा समावेश आहे. या संग्रहामध्ये दलित किंवा सामान्यपणे उपेक्षित अशा व्यक्तींची चित्रे मोठ्या जिव्हाळ्याने व सहानुभूतीने रंगविली असून या व्यक्तीच्या सुखदु:खाशी लेखिका एकरूप झाली आहे. या संग्रहातील 'दमडी', 'जाईबाई' ही व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय अशी आहेत. या व्यक्तींचे स्वभाव, बोलणे-चालणे, जीवन जगण्याची पद्धत, लकबी, बाह्यांगवर्णन इत्यादी गोष्टी अत्यंत सूक्ष्मपणे वर्णन केल्याने लेखनात चित्रमयता आली आहे; नव्हे चित्रमय वर्णन

हे या व्यक्तिचित्राचे वैशिष्ट्य आहे. या संग्रहातील सजीव व्यक्तिचित्रांतून लेखिकेने वर्णिलेल्या व्यक्तींच्या जीवनातील विविध प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. कुसुमावती देशपांडे यांनी या कथासंग्रहामध्ये व्यक्तिचित्रांचे लेखन काही प्रमाणातच केलेले असले तरी ती व्यक्तिचित्रे उल्लेखनीय अशीच आहेत.

'दीपमाळ' हा कुसुमावती देशपांडे यांचा सन १९५८ साली प्रसिद्ध झालेला कथासंग्रह होय. या कथासंग्रहामध्ये 'मोळी' तील बरेचसे लेखन पुनर्मुद्रित केलेले आहे. या संग्रहामधील लेखनात 'व्यक्तिचित्र' म्हणून ज्यांचा विचार करावा लागतो, त्यामध्ये 'भैय्या', 'कला धोबिणीचे वैधव्य' यांचा समावेश होतो. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत वि.स. खांडेकर लिहितात, ''यामधील सर्वच लेखन कथा नसून त्यातील काहींचे स्वरूप शब्दचित्राशी मिळते जुळते आहे.'' या संग्रहामध्ये लेखिकेने कथा म्हणून काही व्यक्तींचे चित्रण केलेले असले तरी व्यक्तिचित्राची काही वैशिष्ट्ये त्यामध्ये आल्याने ती व्यक्तिचित्राला जवळची वाटतात. 'भैय्या' या व्यक्तिचित्रात घरी स्वयंपाक करणाऱ्या रामचरण ह्या व्यक्तीचे चित्रण आहे. 'भैय्या' हे टोपणनाव आहे. या भैय्याचे सूक्ष्म वर्णन व बाह्यांगवर्णन लेखिका करते. हसरा चेहरा आणि कामातील टापटीप ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. गाणे गात तो स्वतःला आलेला शीण नाहीसा करीत असे. माणसाशी आपुलकीने वागायचे पण त्यात गुंतायचे नाही, येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जायचे ही त्याची वागणूक होती. या साऱ्याचे दर्शन लेखिकेने 'भैय्या' मधून घडविले आहे. 'कला धोबिणीचे वैधव्य' हे व्यक्तिचित्र चांगले झाले आहे. बाह्यवर्णनातील सूक्ष्मता हे लेखिकेचे वैशिष्ट्य म्हणजे हे व्यक्तिचित्र होय. सूक्ष्म बाह्यचित्रणासोबत कला धोबिणीची नम्रता, अबोलपणा, नवऱ्याबद्दल तिच्या मनात असणारा आदरयुक्त धाक, प्रेम व वात्सल्य, वक्तशीरपणा व कामावरील तिची निष्ठा यांचे चित्रण करून लेखिकेने एक सुंदर व्यक्तिचित्र साकार केले आहे.

कुसुमावती देशपांडे यांनी आपल्या कथासंग्रहामधून जी व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत ती संख्येने कमी असली तरी गुणाने श्रेष्ठ आहेत. त्यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रांमध्ये एक प्रकारचा जिवंतपणा आहे. सर्वसामान्य व्यक्तीचे रेखाटन करून ते व्यक्तिमत्त्व समाजासमोर ठेवले आहे. कुसुमावती देशपांडे यांच्यासारख्या प्रसिद्ध समीक्षक 'व्यक्तिचित्र' लेखन करतात हे वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे.

**प्र.के. अत्रे :**

आचार्य प्र.के. अत्रे हे कवी, नाटककार, चित्रपटकथालेखक, वृत्तपत्रकार, वक्ता, वादविवादपटू, शिक्षणतज्ज्ञ, अस्सल मराठी वळणाचे सुंदर, सुबोध, खुमासदार लेखन करणारे लेखक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. प्र.के. अत्रे यांनी आपल्या असामान्य

कर्तृत्वाने वाङ्मयाच्या व इतर क्षेत्रात मानदंड निर्माण केले. अत्रे यांना अध्यापनशास्त्रातील बी.टी. (मुंबई) व टी.डी. (लंडन) या पदव्या सन्मानपूर्वक प्राप्त झाल्या आहेत. शाळांसाठी 'नवयुग वाचनमाला' व माध्यमिक शाळांसाठी 'अरुण वाचनमाला' अत्र्यांनी सुरू केली. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी मराठीतील अद्ययावत् व जिवंत वाङ्मयाचा व विचारांचा परिचय करून देण्याचा हा प्रयोग राबविणे हे अत्र्यांनी केलेले फार महत्त्वाचे शैक्षणिक कार्य आहे. १९१६ पासून ते कविता लिहू लागले. १९२०-२१ नंतर त्यांनी वेगळ्या धर्तीची रचना करण्यास सुरुवात केली. 'केशवकुमार' या टोपणनावाने त्यांचा 'गीतगंगा' कवितासंग्रह (१९३५) प्रकाशित झाला. रविकिरण मंडळातील कवींच्या काव्यवृत्तीचा उपहास करणारी ही विडंबने विलक्षण गाजली. 'झेंडूची फुले' (१९२५) हा या विडबंनपर कवितांचा संग्रह.

प्र.के. अत्रे नाटककार म्हणून प्रसिद्ध आहेत. 'साष्टांग नमस्कार' (१९३३), 'घराबाहेर' (१९३४), 'उद्याचा संसार' (१९३६), 'वंदे मातरम्' (१९३७), 'पराचा कावळा' (१९३८), 'मी उभा आहे' (१९३९), 'जग काय म्हणेल' (१९४०), 'पाणिग्रहण' (१९४६), 'कवडीचुंबक' (१९५०), 'मोरुची मावशी', 'तो मी नव्हेच' (१९६२), 'बुवा तेथे बाया', 'मी मंत्री झालो', 'ब्रह्मचारी' ही त्यांची नाटके रंगभूमीवर आली व लोकप्रिय ठरली. नाटकाच्या बरोबरीने त्यांचे चित्रपटलेखन सुरू झाले होते. 'श्यामची आई', 'महात्मा फुले' असे दर्जेदार चित्रपट त्यांनी काढले. 'श्यामची आई' या सानेगुरुजींच्या कांदबरीवर आधारित चित्रपटाला १९५५ साली पहिले राष्ट्रपतिपदक देऊन गौरविण्यात आले.

वृत्तपत्रकारिता हे अत्र्यांनी गाजवून सोडलेले आणखी एक कर्तृत्वक्षेत्र आहे. १९५५ साली त्यांनी 'दै. मराठा' ची स्थापना केली. 'नवयुग' व 'दै. मराठा' तून त्यांनी प्रखर व जहाल असे विपुल, वैविध्यपूर्ण लेखन केले. त्यातील काही भाग पुढे पुस्तकरूपाने प्रकाशित झाले. 'मी कसा झालो' (१९५३), 'मुद्दे आणि गुद्दे' (१९५६), 'सिंहगर्जना' (१९५७), 'कऱ्हेचे पाणी - खंड १ ते ५' (१९६३-६८), 'सूर्यास्त' (१९६४), 'आषाढस्य प्रथम दिवसे' (१९६९), 'अध्यापक अत्रे' (१९८५) इत्यादी. अत्र्यांनी विनोदी लेखनही केले आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या आशा-आकांक्षा, सुखदुःखे, भावभावना, जीवनविषयक समस्या ते सहानुभूतीने समजावून घेऊन समाजातील दोषांवर घणाघाती हल्ला चढवणारा लेखक, वक्ता व पत्रकार म्हणून अत्रे ओळखले जातात. पण ते खरे गाजले ते झुंजार पत्रकार आणि लेखक म्हणूनच. प्र.के. अत्रे यांचे 'दुर्वा आणि फुले' (१९४९), 'मराठी माणसे, मराठी मने' (१९५६), 'पंचामृत' (१९५६), 'आषाढस्य प्रथम दिवसे' (१९६९) इत्यादी व्यक्तिचित्रसंग्रह प्रसिद्ध आहे. 'व्यक्तिचित्रलेखन'

करणारे प्र.के. अत्रे हे महत्त्वाचे लेखक आहेत.

'दुर्वा आणि फुले' हा प्र.के. अत्र्यांचा सन १९४९ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. हा एक उत्तम व्यक्तिचित्रसंग्रह आहे. या व्यक्तिचित्रसंग्रहाच्या शीर्षकाप्रमाणेच सुगंधी फुले आणि अणकुचीदार दुर्वा यांचा प्रत्यय हा संग्रह वाचताना आपणास येतो. या संग्रहामध्ये सुप्रसिद्ध व्यक्तींवरील एकूण दहा व्यक्तिचित्रे आहेत. मात्र सातच व्यक्तिचित्रे चांगली म्हणण्यासारखी आहेत; ती अशी - माझे गुरु गडकरी, महाराष्ट्राला स्वातंत्र्याचा संदेश देणारा लढवय्या पत्रकार, पुण्याचा तेजस्वी ब्राह्मण - प्रो. दत्तो वामन पोतदार, मराठी वृत्तपत्राचे काका, महाराष्ट्राचे शैलीदार साहित्यिक - माटे, अनंत हरि गद्रे - एक लाख माणूस, आमचे सनातनी दोस्त - कृष्णराव मराठे.

या व्यक्तिचित्रसंग्रहाचा विचार करताना लक्षात येते की, समोरची व्यक्ती कुणीही असो; तिचे गुण किंवा दोष कमालीच्या एकरूपतेने दाखवायचे हे अत्र्यांचे वैशिष्ट्य आहे. संग्रहातील व्यक्तींबद्दल लेखकाच्या मनात असलेला आदर, प्रेम, जिव्हाळा त्यांच्या लेखनातून प्रत्ययास येतो. राम गणेश गडकरी हे अत्र्यांचे साहित्यिक गुरू असल्याने त्यांचे वर्णन विलक्षण भक्तिभावाने, मोहक शब्दांत, मोकळ्या व चटकदार भाषेत केले आहे. अत्र्यांनी गडकऱ्यांचे वर्णन बाह्यांग आणि अंतरंग या दोन्ही दृष्टीने केल्याने गडकरी यांचे व्यक्तिचित्र चांगले झाले आहे. त्याचप्रमाणे प्र.के. अत्र्यांनी आपले वृत्तपत्रीय गुरू अच्युतराव ब. कोल्हटकर यांचे व्यक्तिचित्र लिहिले आहे. उत्कटतेची व अतिशयोक्तीची मुळातच अत्र्यांच्या लेखणीस आवड आणि त्यात अच्युतरावांसारखी व्यक्ती लेखनविषय झाल्यामुळे अत्र्यांची लेखणी येथे बहरून येते. अच्युतरावांचे व्यक्तिचित्र रेखाटताना अनेकवेळा अत्रे भाववश होताना दिसतात. कोल्हटकरांचे व्यक्तित्व व कर्तृत्व यांच्या दर्शनाचा सुरेख समन्वय साधताना प्र.के. अत्रे यांचे स्वत:चे व्यक्तिमत्त्वही त्यात सहज व सुरेख मिसळले आहे. अच्युतरावांचे बाह्य दृष्टीने वर्णन न करता त्यांचे व्यक्तिमत्त्व गुणदोषांसह उभे राहावे ही किमया हा या व्यक्तिचित्राचा विशेष आहे. अतिशय उत्कृष्ट आणि आंतरिक लय साधलेल्या लेखनशैलीचा आदर्श नमुना या व्यक्तिचित्रातून अत्र्यांनी सादर केल्याने हे एक दुर्मिळ स्वरूपाचे उत्कृष्ट व्यक्तिचित्र झाले आहे.

अत्र्यांनी लिहिलेले 'दत्तो वामन पोतदार - पुण्याचा एक तेजस्वी ब्राह्मण' हे व्यक्तिचित्र अतिशय चांगले रेखाटले आहे. या व्यक्तिचित्रात द.वा. पोतदार यांचे व्यक्तिमत्त्व, कर्तृत्व यांचे नेमक्या स्वभाववैशिष्ट्यांसह वर्णन केलेले असून त्याला द.वा. पोतदारांच्या स्वभावानुसार शांत, संयमी, नितळ शैलीची लाभलेली साथ हे या व्यक्तिचित्रांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सूक्ष्म निरीक्षणशक्तीतून हे व्यक्तिचित्र रेखाटले असल्याने त्यात चित्रमयता आली आहे. अत्र्यांसारखे लेखक आणि द.वा. पोतदारांसारखे

विद्वान व्यक्तिमत्त्व त्यांच्या लेखणीचा विषय झाल्याने हे व्यक्तिचित्र बहारदार असेच झाले आहे. तसेच काकासाहेब लिमये, श्री.म. माटे, अ.ह. गद्रे, कृष्णराव मराठे यांच्यावरील व्यक्तिचित्रेही चांगली उतरली आहेत. त्या त्या व्यक्तीचे कार्यकर्तृत्व, जीवनशैली, स्वभाववर्णन, वाङ्मयीन शैली, त्यांचे बाह्यवर्णन तसेच अंतरंग उलगडून दाखविल्याने संबंधित व्यक्तींना योग्य तो न्याय देणारे आणि वाचकांना त्यांचे समर्पक दर्शन घडविणारे असे हे लेखन झाले आहे.

या व्यक्तिचित्रसंग्रहाचा साकल्याने विचार केला असता असे दिसते की, अत्र्यांच्या लेखनात वृत्तपत्रीय लेखनाचा ढंग असून त्यामुळे व्यक्तीचे बाह्यचित्र उभे करण्यापेक्षा नेमके स्वभावचित्र उभे करण्याकडे त्यांचा कल अधिक आहे. सर्वच व्यक्ती लेखकाच्या जिव्हाळ्याच्या असल्या तरी त्यांच्या अंतर्मनातील खास अशा व्यक्तीचे चित्र काही वेगळे रंग घेऊन येते. वर्ण्य व्यक्तीच्या स्वभावानुसार व्यक्तिचित्रात लेखन शैलीचा वापर यशस्वीपणे करण्याची किमया करण्यात आचार्य अत्रे यशस्वी झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यातील उच्च दर्जाच्या लेखकाचा आणि लेखणीचा प्रत्येय आपणास येतो.

'मराठी माणसे, मराठी मने' हा प्र.के. अत्रे यांचा, सन १९५६ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. हा संग्रह महाराष्ट्राच्या आधुनिक, राजकीय व सांस्कृतिक इतिहासात होऊन गेलेल्या व हयात असणाऱ्या बारा महापुरुषांची ओळख करून देणारा असून त्यामध्ये नाना शंकरशेट, बाळशास्त्री जांभेकर, महात्मा जोतिराव फुले, लो. बाळ गंगाधर टिळक, धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, गाडगे महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, नाट्यछटाकार दिवाकर, आचार्य विनोबा भावे, डॉ. भीमराव आंबेडकर, साने गुरुजी यांचा समावेश आहे.

या संग्रहातील सर्व व्यक्तिचित्रांचे लेखन करीत असताना अत्र्यांनी शीर्षकापुढे त्या त्या व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा विचार करून एक विशेषण लिहिलेले आहे. त्यातून आपणास त्या व्यक्तीचे कार्यकर्तृत्व चटकन् लक्षात येते. उदा. 'राष्ट्रजागृतीचे अग्रदूत - बाळशास्त्री जांभेकर', 'उपेक्षितांचा पहिला पुढारी - म. जोतिराव फुले', 'गीतेचे कर्मयोगी भाष्यकार - लो. बाळ गंगाधर टिळक', 'महिलांचे उद्धारकर्ते - महर्षी धोंडो केशव कर्वे', 'महाराष्ट्राचे समाजवादी संत - गाडगे महाराज', 'भारतीय क्रांतिकारकांचे कुळपुरुष - स्वा.वि.दा. सावरकर', 'भारताचा द्रष्टा महापुरुष - आचार्य विनोबा भावे', 'महाराष्ट्राचा तेजस्वी ज्ञानयोगी - डॉ. भीमराव आंबेडकर', 'महाराष्ट्राचे बालविकासी फूल - साने गुरुजी' इत्यादी.

या संग्रहातील बरेचसे लेखन स्वभावचित्रात्मक आहे. दिवाकर व गाडगे महाराज यांची व्यक्तिचित्रे वगळता कोणत्याच व्यक्तीचे बाह्यरूप दर्शन घडविलेले नसले तरी

उत्तम दर्जाची, निखळ व्यक्तिचित्रे म्हणून ही उल्लेखनीय आहेत. बऱ्याच व्यक्तिचित्रांतून व्यक्तीचे कर्तृत्व व स्वभाव यांच्या साहाय्याने व्यक्ती उभी केली आहे. या लेखनातून, १९ व्या शतकातील अखेरच्या व २० व्या शतकातील प्रांरभीच्या काळातील मराठी मासणांच्या सांस्कृतिक, राजकीय, परंपरेच्या विकासाचा आलेख अत्र्यांनी काढला आहे. या संग्रहामध्ये भव्य-दिव्याच्या चरणी सर्व मतभेद विसरून, लीन होऊन आदरांजली वाहणारे अत्र्यांचे मोकळे मन दिसते. प्रत्येक व्यक्तीसाठी मार्मिक विशेषणाचा समावेश व्यक्तिचित्राच्या नावातच करुन लेखकाने आपल्या लेखनाची व्याप्ती स्पष्ट केली असून या मर्यादेबाहेर लेखक कुठेही जात नाही.

'धोंडो केशव कर्वे' व 'साने गुरुजी' ही व्यक्तिचित्रे अत्र्यांच्या उत्कृष्ट शैलीचे नमुने आहेत. धोंडो केशव कर्वे यांच्याबद्दल लिहिताना, प्र.के. अत्रे लिहितात, ''महर्षी कर्वे हे एक लोकोत्तर सेवामूर्ती आहेत. मानवतेचा उद्धार करण्यासाठी प्रत्येक शतकात अशा अद्वितीय मूर्ती जन्माला येत असतात. त्या बोलत नाहीत, त्या लिहीत नाहीत, त्या गात नाहीत, त्या नुसती सेवा करतात. सेवा ही त्यांची प्रतिभा, सेवा हेच त्यांचे काव्य आणि सेवा हेच त्यांचे साहित्य. मानवतेच्या सेवेचे व्रत स्वीकारणे हे एक कठोर अग्निदिव्य आहे. या अग्निदिव्यामधून धैर्याने जाण्यास जी माणसे सिद्ध होतात ती काही सामान्य बुद्धीची आणि साधारण पराक्रमाची माणसे नव्हेत. ज्ञान आणि स्फूर्ती देऊन मानवतेला जागृत करणारे बुद्धिमान बृहस्पती जेवढे थोर तेवढेच मानवतेची सेवा करून तिचा उद्धार करणारे त्यागी नि सहनशील सेवकही श्रेष्ठ होत.'' या लेखनातून अत्र्यांची लेखनशैली आपणास पाहावयास मिळते. त्यातून त्यांनी महर्षी कर्वे यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला आहे आणि त्यांचे मोठेपण दाखवून दिले आहे. या लेखनातून महर्षी कर्व्यांचे वेगळे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर नेमकेपणाने साकार होते. साने गुरुजींच्या व्यक्तिचित्रामध्ये त्यांच्या भाषणाबाबत अत्रे लिहितात, ''अलीकडे अलीकडे देशातील परिस्थिती बघून ते इतके कावून अन् चिडून गेले होते की त्यांच्या संतापाच्या ज्वाला त्यांच्या व्याख्यानातून वारंवार भडकून उठत. त्यांच्या सर्वांगाचा दाह झाल्यासारखा वाटे. पायापासून डोक्यापर्यंत त्यांचे शरीर थरथर कापत असे, अन् त्यामुळे कित्येकदा तर सारे व्यासपीठ गदगदा हालू लागे. शेवटी शेवटी मी ऐकलेली त्यांची बहुतेक सर्व व्याख्याने अनावर संतापाच्या उद्रेकाने अशा तऱ्हेने धगधगलेलीच असायची. भाषा, भावना, विचार आणि वक्तृत्व यांचा एवढा कोमल अन् प्रखर संगम पुन्हा महाराष्ट्रात पाहावयास सापडावयाचा नाही.' यातून साने गुरुजींचे कोमलहृदयी व्यक्तिमत्त्व लक्षात येते, साने गुरुजींनी असणारी वाईटाबद्दलची चीड आणि चांगुलपणाची आस आपणास दिसते.

या व्यक्तिचित्रसंग्रहाचा विचार करता आपल्या नजरेत भरती ती अतिशयोक्ती. पण

ही अतिशयोक्ती एरवीच्या भाषणबाजीतील नाही. प्रत्येक व्यक्तिमत्त्व इतरापेक्षा मोठे आहे हे दाखविताना त्या व्यक्तिमत्त्वाला जे अनन्यत्व दिले जाते त्यावेळी ही अतिशयोक्ती येते. शैलीचा दुसरा गुण म्हणजे प्रवाहीपणा. या संग्रहातील प्रत्येक व्यक्तिचित्राला ओघवती भाषा लाभली असून त्यातच संबंधित व्यक्तीच्या स्वभावानुसार राग, लोभ, गांभीर्य, विनोद, ओज यांचे प्रवाह मिसळले जातात. या व्यक्तिचित्रसंग्रहातील प्रसिद्ध व्यक्तींची व्यक्तिचित्रे त्या व्यक्तीच्या कार्यव्याप्तीमुळे चरित्रचित्रणाच्या अंगाने जाताना दिसतात. प्र.के. अत्र्यांची विद्वत्ता, व्यासंग आणि भाषाप्रभुत्व उभ्या महाराष्ट्राला परिचित आहे. त्या गुणांचा प्रत्यय हा संग्रह वाचताना येतो.

'पंचामृत' हा अत्र्यांचा सन १९५६ साली प्रसिद्ध झालेला लेखसंग्रह होय. या संग्रहामध्ये ज्याला व्यक्तिचित्रे म्हणता येतील ते लेख म्हणजे 'असा झाला नाही', 'असा होणार नाही', आणि 'पुण्याचे झकास बाबुराव' हे आहेत. 'असा झाला नाही' मध्ये चर्चिलचे बहुरंगी, बहुढंगी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व चित्रित केले आहे. 'पुण्याचा झकास बाबूराव' ह्यामध्ये बाबूराव ठाकूरनामक पुणेरी वल्लीचे निखळ व्यक्तिचित्र रेखाटले असून या व्यक्तीचा 'झकास' हा शब्द लाडका असल्याने अत्र्यांनी त्याचे नामकरण 'झकास बाबूराव' असे केले आहे. या बाबूरावचे बोलणे, चालणे, दिसणे, तसेच आनंदी, खेळकर, मोकळा, स्पष्ट स्वभाव यांचे विविध घटना-प्रसंगाच्या साहाय्याने सुरेख चित्रण करून व्यक्तिचित्र रेखाटले आहे. या व्यक्तिचित्रातून एका वेगळ्या वल्लीचे दर्शन आपणास घडते.

'आषाढस्य प्रथम दिवसे' हा प्र.के. अत्र्यांचा सन १९६९ साली प्रकाशित झालेला लेखसंग्रह होय. या संग्रहामध्ये आचार्य अत्रे यांचे दै. 'मराठा'तील काही अग्रलेख संकलित केले आहेत. यांपैकी व्यक्तीवरील अग्रलेखात काही व्यक्तिचित्रे आहेत तर काही व्यक्तीपर लेख आहेत. या लेखनामागे व्यक्तिचित्रलेखन करण्याचा हेतू असेलच असे म्हणता येत नसले तरी व्यक्तिचित्राचे गुण आढळणारे, व्यक्तिचित्राजवळ येणारे काही लेख पुढीलप्रमाणे - 'महाराष्ट्राचा सुधारक संत', 'चर्चिल', 'मावळते श्रीप्रकाश', 'श्रीपाद अमृत डांगे', 'आठवतात तेवढे गडकरी', 'केळकर उदात्त आणि धीरगंभीर विभूती', 'महाराष्ट्राचा साम्यवादी लेखक', 'नव्वदबाद', 'महाराष्ट्र रत्न-बाबूराव जगताप', 'द.वा. पोतदार' इत्यादी.

'महाराष्ट्राचा सुधारक संत' यामध्ये महर्षी धों.के. कर्वे याचे विलक्षण व वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व, त्यांची शिस्तप्रियता, वैराग्य, पराकोटीची अनासक्ती, निरागस व निर्व्याज स्वभाव या गुणांसह वर्णन करून त्यांचे 'वैराग्यशाली कर्मयोगी' असे मूल्यमापन करण्यात आले आहे. 'चर्चिल'वर लिहिताना मुत्सद्दी सेनापती, बहादूर झुंजार पुरुष,

उत्तम विनोदबुद्धी असणारा थोर साहित्यिक या गुणांसह वर्णन करून त्यांचे व्यक्तिचित्र लिहिले आहे. 'मावळते श्रीप्रकाश' यामध्ये कार्यकर्तृत्वाचा गौरव करून विनोदी, हजरजबावी, वक्तृत्व हे त्यांचे मुख्य पैलू आहेत असे सांगितले आहे. 'श्रीपाद अमृत डांगे' यामध्ये त्यांचे चतुरस्र कर्तृत्व, तल्लख विनोदबुद्धी, नेटकेपणा, उद्योगीपणा, व्यासंग यांचा परिचय करून देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून एक वेगळे व्यक्तिचित्र उभे राहते. रा.ग. गडकरी यांच्या पहिल्या भेटीच्या प्रसंगातून व त्यांच्या वर्णनाच्या शब्दचित्रातून गडकऱ्याचे व्यक्तिमत्त्व 'आठवतात तेवढे गडकरी' मधून केले आहे. 'केळकर उदात्त आणि धीरगंभीर विभूती' यामध्ये न.चिं. केळकर यांच्या गुणांचे वर्णन करून उदात्त, विद्वान, त्यांची धीरगंभीर वृत्ती, त्यांचा स्वभाव, कामाचा काटेकोरपणा इत्यादींतून त्याचे व्यक्तिचित्र साकार केले आहे. अनंत काणेकरांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या साहित्यिक गुणांचा, विचारांचा, जीवनशैलीचा, 'व्यक्तिमत्त्वाचा' परिचय 'महाराष्ट्राचा साम्यवादी लेखक', यातून करून दिला आहे. 'नव्वदबाद' मधून रँग्लर परांजपे याचे बाह्यदर्शन आणि असामान्य बुद्धिमत्ता याचे चित्रण केले आहे. तर बाबूराव जगतापांचे दिसणे, बोलणे, वागणे आणि त्यांचे अन्य गुण 'महाराष्ट्र रत्न-बाबूराव जगताप' मधून वर्णिले आहेत. दत्तो वामन पोतदार यांच्यावरील लेखनात त्यांच्या शांत व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा तसेच प्रखर तत्त्वनिष्ठा, निरपवाद चरित्र, विद्वत्ता इ. विविध गुणांचा परिचय करून दिला आहे. परंतु 'दुर्वा आणि फुले' मधील द.वा. पोतदारांवरील जे प्रभावी उत्कृष्ट व्यक्तिचित्र प्र.के. अत्र्यांनी रेखाटले आहे त्याची सर या लेखनाला येत नाही.

थोडक्यात, या व्यक्तिचित्रांचे लेखन अग्रलेख स्वरूपात झाल्याने त्याची धाटणी भिन्न वाटते. तसेच व्यक्तीच्या बाह्यवर्णनात ढोबळपणा अधिक जाणवतो. बरेचसे लेखन नैमित्तिक असल्यामुळे लेखनात मर्यादा जाणवतात. त्यामुळे प्र.के. अत्रे यांच्या लेखनातल्या या व्यक्ती मोठ्या व कार्याने प्रभावी असूनही परिणामकारकपणे साकार होताना दिसत नाहीत. पण आचार्य प्र.के. अत्र्यांसारख्या प्रभावी लेखकाने मराठी वाङ्मयात व्यक्तिचित्रलेखन करून मोलाची भर घातली आहे. उत्कृष्ट अशी व्यक्तिचित्रे त्यांनी लिहिली आहेत. मराठी माणसाची मराठी मने अतिशय प्रभावीपणे त्यांनी उलगडून दाखविली आहेत. आपल्या लेखणीने मराठीतील व्यक्तिचित्रांची उंची त्यांनी वाढविली आहे. ओघवती भाषा व प्रभावी व्यक्तिमत्त्व प्रकट करणारी त्यांची शैली यामुळे या व्यक्तिचित्रात चित्रमयता आली आहे. त्यांची व्यक्तिचित्रे आवर्जून वाचावीशी वाटतात. हे त्यांचे कार्य व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने फार मोलाचे आहे.

**बा.वा. फाटक :**

हे कादंबरीकार, बालसाहित्यकार, चरित्रकार, ललित लेखक म्हणून परिचित आहेत. तत्कालीन स्त्रियांच्या समस्यांच्या अनुषंगाने ज्या काही कादंबरीकारांनी लेखन केले आहे त्यांपैकी बाळकृष्ण फाटक हे एक होत. याचा प्रत्यय 'महिला शाळेच्या मुली' (१९४६), 'कालिंदीचे दिव्य' (१९५०), 'विचारी चारू' (१९५०) इत्यादी कादंबऱ्यांतून येतो. 'चतुर बिरबल भाग - १ ते ६' (१९४५-४८), 'दशमुखी रावण' (१९५०), 'चलाख पोर' (१९६४), 'खट्याळ ख्वाजा' (१९६५), 'मनोरंजक गोष्टी' (१९९८) हे फाटकांचे बालसाहित्य प्रकाशित आहे. 'महारथी कर्ण' (१९४४), 'द्रौपदी' (१९४४), 'पितामह भीष्म' ही चरित्रे त्यांनी लिहिली. याशिवाय 'चातुर्यशंभरी : भाग - १' (कथा संग्रह, १९६५), 'मुंबईचे मानकरी' (व्यक्तिचित्रे, १९४९), 'अण्णा' (१९४४), 'कारकुनाचे धंदे' (१९४६) 'चाळीतील चालू' (१९४२) यासारखे विनोदी लेखन त्यांच्या नावावर आहे.

'मुंबईचे मानकरी' हा बाळकृष्ण फाटक यांचा सन १९४९ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या संग्रहातील व्यक्ती या सामान्य असून आपल्या असलेल्या व्यवसायात, कामात मन लावून काम करणाऱ्या आहेत. मुंबईतील कष्टकरी वर्गाच्या दैनंदिन जीवनातील व्यक्तींची निवड लेखकाने आपल्या लेखणीचा विषय म्हणून केली आहे. या संग्रहात एकूण बारा व्यक्तिचित्रे आहेत, पण त्यातील सहांचे लेखन, ज्यांना व्यक्तिचित्रे म्हणता येईल असे झाले आहे तर बाकीचे लेखन शब्दचित्रात्मक आहे. यातील व्यक्तिचित्रे अशी - रामा, कोपऱ्यातील कारागीर, ऑफिसातील भट, पाटीवाला, पेपरवाला, दूधवाला इत्यादी. ही सारी माणसे व्यवसायिक आहेत. हातावर पोट घेऊन जगणारी आहेत. दैनंदिन काम केल्याशिवाय त्यांचे पोट भरत नाही. त्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या, त्यांचे जीवन, त्यांचे जगणे हे त्या-त्या प्रत्येकाच्या दृष्टीने वेगवेगळे आहे. पण प्रामाणिकपणे कष्ट करून जगणारी ही माणसे आहेत. व्यवसायातील त्यांचे कष्ट, हातोटी यांसोबत त्यांची परिस्थिती, दुःखे आणि त्यांचे स्वभाव यांचे वर्णन लेखकाने केले आहे. या संग्रहातील बहुतेक व्यक्तींना नाव न देता लेखकाने त्यांचे चित्रण प्रातिनिधिक स्वरूपात केले आहे. अशी कष्ट करणारी ही माणसे मुंबईचे मानकरी आहेत. कारण त्यांच्या कष्टावरतीच मुंबईतील लोकांचे जीवन अवलंबून आहे. लेखकाने व्यक्तिचित्रसंग्रहास समर्पक शीर्षक दिले असून सामान्य व्यक्तीचे जीवन आणि कष्ट किती महत्त्वाचे आहेत हेच सूचित केले आहे. सर्वसामान्य, कष्टकरी माणसाचे जीवन चित्रित करून बाळकृष्ण फाटकांनी व्यक्तिचित्रलेखनात मोलाची भर घातली आहे.

**व्यंकटेश माडगूळकर :**

व्यंकटेश माडगूळकर हे कथाकार, कादंबरीकार, नाटककार, पटकथाकार, व्यक्तिचित्रकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा कालखंड १९२७ ते २००१ असा आहे. माडगूळ, ता. आटपाडी, जि. सांगली येथे जन्म. वयाची अठरा वर्षे लहानशा खेड्यात घालविणाऱ्या माडगूळकरांचे भावविश्व भोवतीचा निसर्ग आणि अठरापगड जातीतले शाळूसोबती यांच्या सहवासाने समृद्ध होत गेले. माडगूळकरांच्या लेखनात हरतऱ्हेची माणसे, कुणबी, रामोशी, महार, न्हावी, सुतार, मुसलमान आपापल्या स्वभावविशेषांसह, धंद्याच्या बारकाव्यांसह येतात. इतरांच्या लेखनात सहसा न आढळणारे निसर्गाचे तपशील माडगूळकरांच्या लेखनात जिवंत होतात. १९४६ साली त्यांची पहिली कथा 'काळ्यातोंडाची', अभिरुची मासिकात प्रकाशित झाली. 'मौज' साप्ताहिकातून आठवड्याला एक अशी प्रकाशित झालेली 'माणदेशी माणसे' (१९४९), भारतातल्या सर्व भाषांत तसेच इंग्रजी, जर्मनी, डॅनिश भाषांत अनुवादित झाली. 'बनगरवाडी' (१९५५) या कृतीने माडगूळकरांना उदंड कीर्ती मिळवून दिली. 'सीताराम एकनाथ' (१९५१), 'उंबरठा' (१९६०), 'जांभळाचे दिवस' (१९६१), 'काळी आई' (१९६२), 'गावाकडील गोष्टी' (१९६५), 'वारी' (१९८१), 'हस्ताचा पाऊस' (दु.आ. १९८३) असे अनेक कथासंग्रह प्रकाशित. 'वावटळ' (१९८५), 'करुणाष्टक' (१९८६), 'कोवळे दिवस' (१९९०) या त्यांच्या काही प्रसिद्ध कादंबऱ्या. त्यांच्या 'सत्तांतर' (१९८२) या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार लाभला. माडगूळकरांनी 'सती' (१९६८), 'कुणाचा कुणास मेळ नाही' (१९६८), 'पति गेले ग काठेवाडी' (१९७०), 'बिकट वाट वहिवाट' (१९७८), 'तू वेडा कुंभार' (१९८६) इत्यादी एकूण दहा नाटकेही लिहिली. कांगारूचे दिवस, जंगलातील दिवस, डोहातील सावल्या, नागझिरा, चित्रे आणि चरित्र, रानमेवा, पांढरी मेंढरे हिरवी कुरणे, परवचा असे बहुविध स्वरूपाचे ललितगद्यही त्यांनी लिहिले. 'प्रवास एका लेखकाचा' हे त्यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू दाखवते. चित्रदर्शी प्रसंगचित्रणे, जिवंत व्यक्तिचित्रणे, आठवणी, लोककला, लोकसंस्कृती, झाडे, पशुपक्षी-माणसे या साऱ्यांनी माडगूळकरांचे लेखन समृद्ध आहे. त्यांची भाषा व्यक्ती-प्रसंगानुसार बदलणारी, लवचिक, बोलीतील शब्द वाक्यप्रयोग यांनी नटलेली आहे; त्यांच्या साहित्यातून सदैव डोकवणारा व्यापक सांस्कृतिक अवकाश सहजतेने उलगडणारी आहे.

'माणदेशी माणसं' हा व्यंकटेश माडगूळकरांचा सन १९४९ साली प्रकाशित झालेला व्यक्तिचित्राचा संग्रह होय. हा त्यांचा प्रसिद्ध असा व्यक्तिचित्रसंग्रह आहे. मराठीतील मानदंड म्हणावा किंवा मराठी व्यक्तिचित्राच्या इतिहासात एक उत्कृष्ट

व्यक्तिचित्रसंग्रह म्हणजे 'माणदेशी माणसं' होय. वास्तविक या संग्रहाचे लेखन शब्दचित्र (व्यक्तिचित्र) म्हणून झाले तरी मराठी साहित्यात याचा विचार ग्रामीण कथा म्हणून झाला व त्या प्रांतात या संग्रहाने इतिहास निर्माण करून व्यंकटेश माडगूळकरांना अव्वल दर्जाचे ग्रामीण कथालेखक म्हणून मानाचे स्थान प्राप्त करून दिले. किंबहुना एक साहित्यिक म्हणून मराठी वाचकांना माडगूळकरांची ओळख या संग्रहानेच झाली. व्यंकटेश माडगूळकरांनी बालपणापासून खेड्यात पाहिलेल्या, त्यांच्या जीवनात आलेल्या विविध सामान्य व्यक्तींचे चित्रण या संग्रहात केले आहे. या व्यक्ती लेखकाच्या दृष्टीने प्रत्यक्ष असल्या तरी वाचकाच्या दृष्टीने अप्रसिद्ध आहेत. या संग्रहात सोळा व्यक्तिचित्रे असून ती अशी - धर्मा रामोशी, झेल्या, रामा मैलकुली, नामा मास्तर, मुलाण्याचा बकस, बन्याबापू, कोंडिबा गायकवाड, शिदा चांभार, शिवा माळी, तांबोळ्याची खाला, रघू कारकून, बाबाखान दरवेशी, गणा महार, माझा बाप, बिटाकाका, गणा भपट्या.

या व्यक्तिचित्रांमध्ये स्त्री, पुरुष, मुले, वृद्ध अशी विविध वयाची, विविध थरातील व व्यवसायातील व्यक्ती समाविष्ट आहेत. या व्यक्तिचित्रांत काही समानता आहे. माणदेशाच्या मरुभूमीची, दुष्काळाची, दारिद्र्याची पार्श्वभूमी या माणसांना लाभली आहे. तरी त्यांची जगण्यावरील वासना कायम आहे. या व्यक्तींच्या जीवनपद्धती, स्वभाव, रूपरंग यांचा अभ्यास लेखकाने केला आहे. लहानपणापासूनचे अनुभव, घडलेले दर्शन आणि केलेले चिंतन यांतून या माणदेशी माणसांचा जन्म झाला आहे. जे पाहिले, जाणवले ते लेखकाने अत्यंत प्रामाणिकपणे, सहानुभूतीने व आपलेपणाने, सडेतोडपणे व मुख्यत: कलात्मकतेने वाचकांच्या समोर ठेवले असून या लेखनात विलक्षण जिव्हाळा आहे. पण त्यात कुठेही दुबळेपणा नाही. ग्रामीण जीवन व व्यक्ती यांच्या दर्शनाने हे पुस्तक म्हणजे शंभर नंबरी सोने झाले आहे.

या संग्रहातील धर्मा रामोशी, बन्याबापू, तांबोळ्याची खाला, रामा मैलकुली, कोंडिबा गायकवाड, रघू कारकून, बिटाकाका इत्यादी व्यक्ती लेखकाला प्रत्यक्ष भेटल्या आहेत. या व्यक्तींच्या जीवनातील प्रसंगचित्रणे फार परिणामकारक उतरली आहेत. उदा. धर्मा रामोशीच्या व्यक्तिचित्राचा शेवट करीत असताना लेखक लिहितो, 'मला पाहताच तिनं पदर ओढला आणि तोंड बाजूला केलं. मी बोलणार होतो की, काय गं बजा, इतके दिवस त्या म्हाताऱ्याला का दिलास त्रास? पण तसे न बोलता म्हणालो, 'आज तू आलीस दळण न्यायला? धर्मा बरा आहे ना?' तिनं मान हालवली आणि म्हणाली, 'जी बरा हाय' आणि इतके दिवस बजा दळण नेण्यासाठी का येत नव्हती, आंबेचा शिसा देताना ती बाहेर का आली नाही, याचं कारण मला कळ्ळं! बजाच्या अंगावर

मी धर्माला दिलेलं धोतर होतं! लुगड्यासारखा तिनं त्याचा उपयोग केला होता.' या वर्णनातून आपणास धर्मा रामोशी याचे द्रारिद्र्य लक्षात येते. अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या प्राथमिक गोष्टींपासून दूर असलेल्या समाजाचे दर्शन या व्यक्तिचित्रातून होते आणि तो विषय व्यंकटेश माडगूळकरांच्या लेखणीचा होतो. शिवा माळी, मुलाण्याचा बकस यांचे स्वभाव व्यक्त करणाऱ्या वेगवेगळ्या प्रसंगांचे मिश्रण लेखकाने केले आहे. गणा भापट्या मात्र लेखकाच्या जीवनात आला नाही. छांदिष्ट माणसाच्या माहितीवरून हे काल्पनिक व्यक्तिचित्र तयार केल्याचे लेखकाने प्रस्तावनेत म्हटले आहे. संपूर्ण काल्पनिक, तरीही वास्तवाचे भान न सोडणारे हे दुर्मिळ व्यक्तिचित्र आहे.

बहुतेक व्यक्तिचित्रांमध्ये व्यक्तीचे बाह्यवर्णन, पोषाख, लकबी याचे वर्णन आहेच. परंतु झेल्या, मुलाण्याचा बकस, रामा मैलकुली, विटाकाका अशा काही व्यक्तिचित्रांतून उत्कृष्ट स्वभावदर्शन घडविताना मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. 'रामा मैलकुली' या व्यक्तिचित्रात रामा मैलकुलीची बायको परिस्थितीमुळे त्याला सोडून गेलेली आहे हे सांगताना लेखक लिहितो, 'लगीन झालं त्याला पाच सालं झाली, पण धड महिनासुदीक अस्तुरी ऱ्हायली न्हाई, बेपत्ता झाली!' 'म्हणजे'? 'आपलं करम दादा'! ती हुती लडकली सांगलीच्या बाजूची. रुपानं धा जनीत उठून दिसावी अशी. माज्या खोपटात कसं ऱ्हावं तिनं? मी ह्यो असला येडाबागडा माणूस. संसारही आपला नाचरगती, तेल हाय तर मीठ न्हाई, मीठ हाय तर मिरची न्हाई असं. सदुनीक त्या नेसाया चांगली कापडं न्हाईती का खायाला गोड धोड न्हाई. तिच्या काय येईना त्या गोष्टी. धड सबूद बोलायची न्हाई. रुसून-फुगून बसायची. दादा, मलाबी कळायचं समदं. पण का करायचं! ढोरागत राबलं तरी काय मिळकत करनार आपण?' रामा अगदी तळमळून बोलत होता. त्याच्या मनाची कवाडं खोलली गेली होती. मी ही द्रवल्या मनाने ऐकत होतो.'यातून आपणास रामाचे अठराविश्वे दारिद्र्य आणि त्यातून निर्माण होणारे नवनवीन प्रश्न, तरीही माणसाची जीवन जगण्याची धडपड कशी असते, यांचे मार्मिक दर्शन लेखकाने घडविले आहे. हे चित्र पाहून आपण अस्वस्थ होतो. विचार करायला लागतो.

व्यक्तिचित्र उठावदार होण्यासाठी संबंधित व्यक्तीच्या आयुष्यातील वेचक घटना, प्रसंग यांचा मोठ्या खुबीने वापर करण्यात आला असून प्रत्येक व्यक्तीच्या स्वभावातील गुणदोषांच्या छटा बारकाईने चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. या साऱ्या लेखनाला सहजसुंदर ग्रामीण भाषेचा, चित्रमय वर्णनशैलीचा, जिव्हाळ्याचा, कलात्मक अलिप्तता राखून स्पर्श लाभलेला आहे. 'तांबोळ्याची खाला' सारख्या एखाद्या व्यक्तिचित्रात लेखक क्वचित भावनावश झाला आहे. सर्वच व्यक्तिचित्रे अतिशय परिणामकारक

झालेली आहेत. धर्मा रामोशी, शिवामाळी, माझा बाप ही व्यक्तिचित्रे त्यातील घटनांच्या प्रभावामुळे व्यक्तिप्रधान कथेकडे झुकतात, तर झेल्या, शिदा चांभार, गणा भपट्या, रामा मैलकुली ही व्यक्तिचित्रे प्रातिनिधिक रूप धारण करतात. झेल्या व बिटाकाका ही या संग्रहातील उत्कृष्ट व्यक्तिचित्रे आहेत. त्यापैकी बिटाकाका हे लेखकाचे चुलते आहेत, तर झेल्या त्यांचा विद्यार्थी आहे. अशाप्रकारे लेखकाने माणदेशाची माती लागलेली माणसे, तेथील प्रादेशिक जीवनासह व बोलीभाषेसह आपल्यासमोर जिवंत केली आहेत. या संग्रहातील व्यक्तिचित्रे वाचली की 'माणदेश' चा भाग व तेथील माणसे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपणासमोर उभे राहतात.

'चित्रमयता' हे या व्यक्तिचित्रसंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. 'माणदेशी माणसं' हे पुस्तक व्यक्तिचित्रलेखनातील मैलाचा दगड आहे. अभ्यास करताना आपण त्याच्याशिवाय विचार करू शकत नाही. तो एक मानदंड आहे. अस्सल लेखकाने आपल्या प्रभावी लेखनशैलीतून 'माणदेशी माणसं' ची भर व्यक्तिचित्रलेखनात घातली आहे. त्यामुळे व्यक्तिचित्रलेखनाची उंची वाढण्यास मदत झाली आहे.

'सीताराम एकनाथ' हा व्यंकटेश माडगूळकरांचा सन १९५१ साली प्रसिद्ध झालेला कथासंग्रह होय. या संग्रहात प्रामुख्याने कथा असल्या तरी 'दादा' व 'तात्या' ही दोन व्यक्तिचित्रे आहेत. यापैकी 'दादा' हे माडगूळकरांचे वडील तर 'तात्या' हे त्यांचे धाकटे चुलते आहेत. दोन्ही व्यक्ती जवळच्या नात्यातील असल्यामुळे त्यांच्याबद्दल आपुलकी, आदर स्वाभाविकपणे दिसतो. 'दादा' च्या चित्रणात बाह्यवर्णन आले आहे पण त्यामध्ये सूक्ष्मता दिसत नाही. पण त्यांचे स्वभावविशेष चांगल्याप्रकारे चित्रित केले आहेत. 'तात्या' चे वर्णन मात्र 'माणदेशी माणसं' च्या परंपरेतील आहे. सूक्ष्म बाह्यवर्णन, त्यांचे चालणे, बोलणे, पोषाख यांबरोबरच तात्यांच्या विक्षिप्त स्वभावाचे चित्रण आहे. एकंदरीत दादाच्या व्यक्तिचित्रापेक्षा 'तात्यांचे' व्यक्तिचित्र सूक्ष्मतेमूळे चांगले झाले आहे. उत्कृष्ट व्यक्तिचित्रे लिहिणाऱ्या व्यंकटेश माडगूळकरांना आपल्या नात्यातील, जवळच्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र रेखाटावे असे वाटले असावे असे हे व्यक्तिचित्र वाचताना वाटते.

'वाघाच्या मागावर' हा माडगूळकरांचा सन १९९७ साली प्रकाशित झालेला कथासंग्रह होय. या संग्रहामध्ये 'गंगाराम' व 'गोविंद कातकरी' ही दोन व्यक्तिचित्रे आहेत. गंगाराम हा माकडवाला असून त्याचे रूप, पोषाख, दारिद्र्य, कष्ट करण्याची वृत्ती, प्रामाणिकपणा यांचे चित्रण केले आहे. 'गोंविद कातकरी' हा शिकारीचा नाद असणारा येडाबागडा कातकरी आहे. त्याला भोवतलच्या जगाचे ज्ञान नाही व त्यांची त्याला गरजही नाही. असा आदिमानवाच्या काळात वावरणारा, विलक्षण धीट, निर्मळ

मनाचा हा कातकरी माडगूळकरांनी रंगविला आहे.

एकंदरीत, व्यंकटेश माडगूळकरांच्या व्यक्तिचित्रसंग्रहाचा आणि व्यक्तिचित्रांचा विचार करता ते एक सिद्धहस्त लेखक आहेत हे जाणवते. व्यक्तिचित्रे लिहिणारी त्यांची भाषा व्यक्ती-प्रसंगानुसार बदलणारी, लवचिक, बोलीतील शब्द-वाक्यप्रयोग यांनी नटलेली असल्याने त्यांची सर्वच व्यक्तिचित्रे जिवंत व बोलकी झाली आहेत. त्यांच्या व्यक्तिचित्रात 'जिव्हाळा' हा महत्त्वाचा गुण जाणवतो. ते व्यक्तीच्या अंत:करणाला स्पर्श करतात. त्या स्पर्शातून त्या व्यक्तीचे अंत:करण उलगडत जाते. तो बोलू लागतो. प्रवाही निवेदन आणि प्रसन्न विनोद यांनी डौलदार झालेले, देशी मातीतून उगवलेले आणि तिच्या सत्त्वाने घमघमणारे त्यांचे लेखन मराठी वाङ्मयविश्वात आपल्या वेगळेपणाने उठून दिसते. व्यक्तिचित्रलेखनात व्यंकटेश माडगूळकरांना लेखक म्हणून फार महत्त्वाचे स्थान असून त्यांचे व्यक्तिचित्रलेखन वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे झाले आहे.

**न.शे. पोहनेरकर :**

हे ललित लेखक व कथाकार म्हणून परिचित आहेत. त्यांनी इतर क्षेत्रांतही विविध प्रकारचे लेखन केले आहे. त्यांचा 'विरलेल्या गारा' (१९५२) हा व्यक्तिचित्रसंग्रह प्रकाशित आहे. मराठवाड्याच्या परिसरातील गेल्या पिढीतल्या सकस, जोमदार, बालेघाटी व्यक्तींची ओळख करून द्यावी हा या लेखनामागचा हेतू आहे. यात शहाणे, वेडे, भोळेभाबडे, विविध जातीजमातीचे लोक आहेत. प्रेमळ, निरागस, विशुद्ध जीवन जगलेले चिवट आणि जिवट परंपरेचे हे मराठवाड्याचे प्रतिनिधी आहेत. लेखकाच्या मते या व्यक्तींचे खरे-खोटेपण महत्त्वाचे नसून त्या व्यक्तीचे जीवन व त्यात त्यांनी टिकवलेले असामान्यत्व महत्त्वाचे आहे. या व्यक्तिचित्र संग्रहामध्ये एकूण पंधरा व्यक्तिचित्रे असून त्यातील व्यक्तिचित्र म्हणता येण्याजोगी अकरा व्यक्तिचित्रे पुढीलप्रमाणे-खराखुरा देशमुख, भाग्यनगरचे गानगंधर्व, गुरुलिंग स्वामी, नागोबा पाठक, वेडी भागूबाई, मारुती गंगाधर, आमचे देसाई, कट्टे यलप्पा, मरी मुकादम, गोलंदाजाची अवलाद, तुळशीराम.

या व्यक्ती प्रसिद्ध नाहीत. सर्वसामान्य जीवन जगणारी अशीच आहेत. परंतु त्यांच्यात काही वेगळेपण आहे, हे लेखक निश्चिपणे दाखवितो. नागोबा पाठक, कट्टे यलप्पा, मरी मुकादम ही यांपैकी उल्लेखनीय व्यक्तिचित्रे आहेत. लेखकाने व्यक्तीचे अंतर्बाह्य वर्णन, उत्तम व्यक्तिनिवड, परिणामकारक चित्रण केले आहे. ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. कट्टे यलप्पा या व्यक्तिचित्रात सूक्ष्म बाह्यवर्णन करून ती व्यक्ती साक्षात साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हे व्यक्तिचित्र चांगले झाले आहे. अन्य व्यक्तिचित्रांमध्ये व्यक्तीचा स्वभाव, बोलणे, चालणे, तिचे काम, कामातील प्रामाणिकपणा, तिची जीवन जगण्याची शैली इत्यादींचे चित्रण करून व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. एकूण लेखनात

लेखकाची एकरूपता कमी आढळते. त्यामुळे परिणामकारकतेचा अभाव जाणवतो. वरील अकरा व्यक्तिचित्रांखेरीज इतर लेखन 'व्यक्तिचित्र' म्हणून समावेश केले असले तरी त्या कथा बनल्या आहेत. असे जरी असले तरी न.शे. पोहनेरकरांच्या 'विरलेल्या गारा' या व्यक्तिचित्रसंग्रहाने मराठी व्यक्तिचित्रात महत्त्वाची भर घातली आहे.

**द्वा.भ. कर्णिक :**

कर्णिक हे बुद्धीप्रामाण्यवादी, नवमानवतावादी, पत्रकार, अनुवादक, चरित्रलेखक म्हणून परिचित आहेत. ते मुंबई विद्यापीठाचे बी.ए., एल.एल.बी. आहेत. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे बुद्धिप्रामाण्यवादी क्रांतिकारक व राजकारणी विचारवंत मानवेंद्रनाथ रॉय यांचा निकटचा सहवास कर्णिक यांना, ते महाविद्यालयीन विद्यार्थी असल्यापासून लाभला. त्यांच्या राजकीय, सामाजिक व जीवनविषयक दृष्टीवर रॉय यांच्या शिकवणुकीचा सर्वाधिक प्रभाव पडला. कर्णिक यांच्या जीवनाचा बराच मोठा काळ पत्रकारितेत खर्ची पडला. 'संग्राम', 'महाराष्ट्र टाईम्स', 'गोमंतक' इ. पत्रांचे ते मुख्य संपादक होते. समाजजीवनाशी अखंड सुसंवाद राखून समाजाची सुखदुःखे, त्याच्या आशा-आकांक्षा, लौकिक जीवनातील नाना संघर्ष आत्मीयतेने स्वतः समजून घेऊन इतरांना समजावून देणारे, सत्यशोधन हे संपादकीय ब्रीद व समाजप्रबोधन हे उद्दिष्ट मानणारे समाजसन्मुख वृत्तीचे संपादक असा लौकिक त्यांनी मिळविला आहे.

'संपादकाचे जीवनस्वप्न' (१९५२), 'असे काही अनुवाद' (१९५० ते ५७), 'मातीच्या मूर्ती' (१९५७), 'पश्चिमेची क्षणचित्रे' (१९६७), 'हिंदुस्थानचे भवितव्य', 'वृत्तसाधना' (१९७१), 'गांधीवादाचे समर्थन', 'तुरुंगातील पत्रे' (१९७३), 'मानवेंद्रनाथ रॉय : व्यक्ती आणि विचार' (१९८१), 'व्ही.बी. कर्णिक चरित्र' (१९८६) इत्यादी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'मातीच्या मूर्ती' हा त्यांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचा सन १९५७ साली प्रकाशित झालेला संग्रह आहे. हा संग्रह म्हणजे रामवृक्ष बेनीपूरी यांच्या मूळ 'माटींकी मूरते' या हिंदी संग्रहाचा द्वा.भ. कर्णिक यांनी केलेला हा अनुवाद आहे. या संग्रहात एकूण बारा व्यक्तिचित्रे आहेत. त्या काल्पनिक व्यक्तिलेखा आहेत. त्यामध्ये - रुझिया, बलदेवसिंह, सूरजभैय्या, भंगर, रूपाची आजी, देव, बाळ गोबिन भगत, वहिनी, परमेश्वर, बैजू मामा, सुभाखाँ, बुधिया इत्यादींचा समावेश आहे. लेखकाने हे लेखन व्यक्तिचित्रे केले असले तरी त्यातील रुझिया, बलदेवसिंह, सूरजभैय्या, भंगर, बाळ गोबिन भगत ह्या लेखनालाच व्यक्तिचित्रे म्हणता येईल. अन्य लेखन ललित लेख, व्यक्तिप्रधान कथा अशा प्रकारात समाविष्ट होणारे आहे. व्यक्तिचित्र लेखनात लेखकाने व्यक्तीचे अंतर्बाह्य वर्णन, स्वभावछटा, भोवतालची परिस्थिती यांचे सर्वसाधारण वर्णन करून व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. तसे हे लेखन सामान्य प्रतीचेच आहे;

अनुवादित आहे. परंतु द्वा.भ. कर्णिक यांनी व्यक्तिचित्रलेखन करून लेखकांचे, समाजाचे लक्ष व्यक्तिचित्रलेखनाकडे वळविले आहे ही बाब व्यक्तिचित्रलेखनाच्या दृष्टीने महत्त्वाची वाटते.

**मधु मंगेश कर्णिक :**

कर्णिक हे कथाकार, कादंबरीकार म्हणून परिचित आहेत. कोकण मराठी साहित्य परिषदेची स्थापना त्यांनी केली. याद्वारे ते साहित्यविषयक उपक्रम राबवून, कोकण भागात साहित्यचळवळ सर्वत्र पोहोचविण्याचे उल्लेखनीय कार्य आपल्या सहकाऱ्यांसोबत करीत आहेत. सरकारी नोकरीचा व्याप सांभाळून कथा, कादंबरी, ललितगद्य, व्यक्तिचित्रे, नाटक, चित्रपटकथा, दूरदर्शनमालिका, बालवाङ्मय, वृत्तपत्रीय स्तंभलेखन यांसारखे विविध वाङ्मयप्रकार कर्णिकांनी हाताळले आहे. 'कोकणी ग वस्ती' (१९५८) हा त्यांचा पहिला प्रकाशित कथासंग्रह. आजपर्यंत त्यांचे पंचवीसहून अधिक कथासंग्रह व अनेक कादंबऱ्या, नाटकं, ललितलेखसंग्रह इत्यादी साहित्य प्रसिद्ध झाले आहे. कोकणच्या ग्रामीण पार्श्वभूमीवरील तसेच मुंबई महानगरीच्या पार्श्वभूमीवरील त्यांचे कथालेखन असून सामाजिक दृष्टी ठेवून त्यांनी कादंबरीलेखन केले आहे. स्त्री-पुरुष संबधातील गहनगूढता, कार्पोरेट संस्थांतील गुतागुंत, राजकारण, दलितांचे प्रश्न, विविध क्षेत्रांतील स्त्रिया, वृद्ध, बालके यांसारख्या विविध विषयांवर लिहिताना त्यांनी 'माणूस आणि त्यांचे जगणे' याचे संदर्भ दृष्टिआड होऊ दिले नाहीत. त्यांच्या काही कथासंग्रहांना राज्य सरकारची पारितोषिकेही प्राप्त झाली आहेत. कर्णिक यांच्या 'देवकी' (१९६२) व 'माहिमची खाडी' (१९६९) या पहिला दोन कांदबऱ्या उल्लेखनीय आहेत. १९६० नंतरचे एक महत्त्वाचे प्रतिभाशाली साहित्यिक म्हणून कर्णिकांचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो.

'कोकणी ग वस्ती' हा मधु मंगेश कर्णिक यांचा, सन १९५८ साली प्रसिद्ध झालेला कथासंग्रह होय. हे त्यांचे पहिले पुस्तक असून या संग्रहामध्ये मालवणी मुलखातील माणसे त्यांनी रंगविली आहेत. या संग्रहामध्ये व्यक्तिचित्रे म्हणण्यासारखी सहाच व्यक्तिचित्रे असून त्यामध्ये कस्तुरी, सावळाराम, म्हाडेश्वर, राघो जिवाजी, नरु भटजी, लहू कसा जगतो?, म्हावरेवाली यांचा समावेश होतो.

'कस्तुरी' या व्यक्तिचित्रात, ती भाविणीची मुलगी म्हणून सुंदर असूनही तिला कसा त्रास सहन करावा लागतो ते लेखकाने दाखविले आहे. तिचे बाह्य वर्णन, सुंदरता, हुशारी, भाविणीची मुलगी म्हणून तिची होणारी मानसिक कुचंबणा, इत्यादी वर्णनातून 'कस्तुरी आचरेकर' साकारण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. असेच स्वरूप राघो जिवाजी, म्हावरेवाली या व्यक्तिचित्रांचे आहे. या व्यक्तीपर कथाच वाटतात. सावळाराम

म्हाडेश्वर हा खेड्यात सावकारी करणारा माणूस. त्याच्या वागण्यातली बेफिकिरी, हिकमतीपणा, यांचे वर्णन त्याच्या रूपासह लेखकाने केले आहे सावळारामच्या स्वभावाचे आणि हिशेबीपणाचे वर्णन करताना कर्णिक लिहितात, ''सावळाराम रोज सकाळ संध्याकाळ हॉटेलात येऊन घटका बसायचा तो उगीच नाही. त्याला तेथे हजार बातम्या समजत. कोणाची किती रुपयांची मनिऑर्डर आली? कोणी आपला बैल किती रुपयाला विकला? कोणाचा मुंबयवाला चाकरमानी कधी गावाला येणार आहे? कोणाची गिरणीतली नोकरी सुटली आणि गावाहून गेलेल्या कोणाला कसली नोकरी गावली, या साऱ्या त्याच्या हिशेबी महत्त्वाच्या बातम्या होत्या, आणि त्या त्याला कळायला हव्या असत...'' या वर्णनातून सावळारामच्या धूर्त स्वभावाचे दर्शन होते. अडीअडचणीचा फायदा घेऊन गोरगरिबाला व्याजाने पैसे द्यायचे व दुप्पट दराने ते वसूल करायचे या त्याच्या सावकारी प्रवृत्तीचे दर्शन आपणास होते. असे अनेक सावकार प्रत्येक ग्रामीण भागात आपणास दिसतात.

'नरु भटजी' या व्यक्तिचित्रामध्ये, दुसऱ्याच्या उपयोगी पडणे हे ध्येय उराशी बाळगून जगणारा माणूस रेखाटला आहे. नरु परिस्थितीने गरीबच आहे. पण गावातील अडलेल्या माणसांना तो मदत करण्यासाठी धावून जातो, मदत करतो प्रसंगी त्यासाठी तो इतरांच्या शिव्या खातो; हे सांगताना लेखक लिहितो, ''नरुभटजींच्या अशा किती गोष्टी सांगायच्या! ते म्हणजे एक कोडे होते. संकटात असलेल्या कुणासाठीही जिवाचे रान करतील. स्वत:च्या घरात परिस्थिती यथातथाच. दोघे नवराबायको खाणारी. द्रोणपत्रावळी लावून वाडीला नेऊन विकायच्या नि गुजराण करायची. पुण्याच्या दूरच्या पुतण्याकडून गणपतीला नि शिमग्याला पाच पाच रुपये येत, तेवढीच बाहेरची मदत. अशा परिस्थितीतही या माणसाची नित्य नवी धडपड चाललेली असायची. गावात कुणी मातला असला तर त्याचीही खोड मोडायची तयारी. त्यासाठी नाना युक्त्या. प्रसंगी शिव्याही खाण्याची तयारी, नरुभटजीच्या हातून या अशा गोष्टी नित्य घडायच्या. कुणासाठीही धावून जायचे हा नरुभटजीचा स्वभाव.'' या वर्णनातून नरु भटजीचा परोपकारी स्वभाव आणि त्याचे प्राजंळपण आपणास दिसते. गरीब परिस्थितीतही परोपकारी जीवन जगणाऱ्या नरु भटजीचे चित्रण लेखकाने चांगले केले आहे. तसेच 'लहू कसा जगतो?' यामध्येही खेड्यातील लबाड, इरसाल चांभाराचे चित्र लेखकाने रेखाटले आहे.

कर्णिकांच्या या संग्रहाचा विचार करता, त्यांच्या व्यक्तिचित्रणात जिव्हाळा असल्याचे जाणवते. मालवण भागातील व्यक्तींचे चित्रण ते काही प्रसंग-घटनांच्या आधारे करतात. माणसे गुणदोषांसह आपणासमोर उभी करतात. पण त्यांची ही व्यक्तिचित्रे व्यक्तिकथेकडे

अधिकच सरकताना दिसतात, तरीही मधु मंगेश कर्णिक यांनी व्यक्तिचित्ररेखाटन करून मराठी व्यक्तिचित्रांत भर घातली आहे हे महत्त्वाचे आहे.

**सुलभा पाणंदीकर :**

पाणंदीकर या शिक्षणशास्त्रज्ञ, निबंधकार म्हणून परिचित आहेत. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या त्या नात आहेत. त्यांनी केंब्रिजला एम.लिट् व टी.डी. (लंडन) या पदव्या मिळविल्या आहेत. १९३२ पासून शिक्षणखात्यात व्याख्यात्या म्हणून काम चालू केले. पुढे त्या प्राचार्य आणि शिक्षण संचालक झाल्या आहेत. 'व्हायटलायझिंग ऑफ द टीचिंग इन प्रायमरी स्कूल' हे शैक्षणिक पाहणीवर आधारित असे पुस्तक त्यांनी लिहिले. 'व्यक्ती तितक्या प्रकृती'(१९५८) हे अनेक प्रकारच्या व्यक्ती-प्राणी-वृक्ष यांची व्यक्तिचित्रे रेखाटणारे पुस्तक त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकते.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' हा सुलभा पाणंदीकरांचा सन १९५८ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. सतरा वर्षांच्या दीर्घ काळात सवडीनुसार लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचा समावेश या संग्रहात केला आहे. ही व्यक्तिचित्रे हेतूपूर्वक लिहिलेली असून संग्रहापूर्वी ती स्फुटरूपात प्रसिद्ध झालेली आहेत. हे लेखन चार विभागांत संकलित केले आहे. पण व्यक्तिचित्रे या दृष्टीने बारकाईने विचार करता यातील सर्वच लेखांना व्यक्तिचित्रे म्हणता येणार नाही. काही लेखन कथा, लेख, व्यक्तीपर लेख, शब्दचित्र या स्वरूपाचे असल्याचे दिसते. यावरून लेखिकेने व्यक्तिचित्राची विशिष्ट संकल्पना समोर ठेवून हे लेखन केलेले नसावे असे वाटते. यामध्ये जी व्यक्तिचित्रे आहेत त्यामध्ये राधाबाई, भीमाबाई, शांताराम, गोखले मास्तर, मामा, रघू यांचा समावेश आहे. या व्यक्ती सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या आहेत. त्या अप्रसिद्ध आहेत. यापैकी 'राधाबाई', 'भीमाबाई' आणि 'शांताराम' या व्यक्ती लेखिकेचे घरकाम करणाऱ्या आहेत. लेखिकेने त्यांचे स्वभाव, त्यांची शिस्त, समयसूचकता, त्यांचे काम, प्रामाणिकपणा, विश्वास आदींचे बाह्यरूपासह वर्णन करून त्यांच्या स्वभावाचे पदर सूक्ष्मपणे उलगडले आहेत. 'गोखले मास्तर' हे लेखिकेचे शिक्षक आहेत. गोखले गुरुजींविषयी आदरभाव, त्यांची शिस्त, काम करण्याची हातोटी आणि त्यांचा स्वभाव, त्यांचे बाह्यवर्णन यांतून हे व्यक्तिचित्र लेखिकेने साकार केले आहे. 'मामा' ही लेखिकेची परिचित व्यक्ती आहे. त्या मामांचा सहवास, स्वभाव, त्यांचे बोलणे-चालणे आणि बाह्यवर्णन यांतून हे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. तर 'रघू' हा लेखिकेच्या गाडीच्या ड्रायव्हरचा तीन वर्षाचा मुलगा आहे. रघूच्या बाललीला, त्याचे बोलणे, निरागसता, खेळणे हे त्याच्याच भाषेत वर्णन करून बालव्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे.

एकदंरीत, सुलभा पाणंदीकरांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचा विचार करता, लेखनाचा

एकूण दर्जा बऱ्यापैकी असून सूक्ष्म निरीक्षण, वास्तव दर्शन, संबंधित व्यक्तीबद्दलचा जिव्हाळा यांमधून लेखिकेने व्यक्तिचित्र चांगले रेखाटले असल्याचे जाणवते. संग्रहाच्या नावाप्रमाणे व्यक्तीच्या विविध प्रवृत्ती दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न मराठी व्यक्तिचित्रलेखनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

**शंकरराव खरात :**

खरात हे कथाकार, कादंबरीकार म्हणून परिचित आहेत. त्यांचा कालखंड १९२१ ते २००१ असा आहे. त्यांचे बालपण खडतर परिस्थितीत गेले. परिस्थितीशी झुंज देत बी.ए., एल.एल.बी. पर्यंत शिक्षण त्यांनी घेतले. डॉ. आंबेडकरांच्या सहवासात आल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी काम केले. दलित चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. बँक ऑफ इंडियाचे संचालक, ऑफिसर्स सिलेक्शन कमिटीचे चेअरमन आणि मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू अशी अनेक सन्मानाची पदे खरातांनी भूषविली. भटक्या आणि विमुक्त जाती-जमातींसाठी काम करताना आलेले त्यांच्या जगण्याचे विदारक अनुभव 'बारा बलुतेदार' (१९५९), 'तडीपार' (१९६१), 'सांगावा' (१९६२), 'गावशीव' (१९७०) इत्यादी कथासंग्रहांतील कथांतून, 'पारधी' कादंबरीतून तसेच 'आज इथं तर उद्या तिथं' (१९८३) या ललितलेखसंग्रहातून आले आहे. 'टिटवीचा फेरा' (१९६३), 'सुटका' (१९६४), 'दौण्डी' (१९६५), 'आडगावचे पाणी' (१९७०) हे इतर कथासंग्रह. 'हातभट्टी' (१९७०), 'गावचा टिनोपाल गुरुजी' (१९७१), 'झोपडपट्टी' (१९७३), 'फूटपाथ नं. १' (१९८०), 'माझं नाव' (१९८७) इत्यादी अनेक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. समाजातील खालच्या स्तराचे दैन्य, दारिद्र्य, वेदना, अवहेलना पारदर्शकपणे व्यक्त करणारे त्यांचे लेखन आहे. दलित व भटक्या जमातीच्या विकास योजनासंदर्भातील मागण्या, त्यांना स्वावलंबी, स्वतंत्र जीवन जगण्याची संधी मिळण्याची आवश्यकता यासंबंधीचे खरातांचे विचार या लेखनातून व्यक्त होतात. 'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती' (१९७८), 'डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर' (१९६६), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आत्मकथा' (१९९०) ही त्यांची पुस्तके उल्लेखनीय आहेत. 'तराळ-अंतराळ' (१९८१) हे त्यांचे आत्मचरित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. शंकरराव खरातांनी पाहिलेल्या, अनुभवलेल्या त्या व्यक्तींची चित्रे 'बारा बलुतेदार' मध्ये आपल्या लेखणीने रेखाटली आहेत.

'बारा बलुतेदार' हा शंकरराव खरात यांचा, सन १९५९ साली प्रसिद्ध झालेला कथासंग्रह होय. या संग्रहामध्ये लेखकाने खेड्यातून काम करणाऱ्या बारा बलुतेदारांचे जीवनचित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वत: खरातांनी या लेखनाचा वाङ्मयप्रकार स्पष्ट केलेला नाही. परंतु माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' प्रमाणे याचाही समावेश ग्रामीण कथेत केला जातो. कारण या लेखनात दिसणारी छाप ही कथाकाराची आहे.

असे असूनही काही ठिकाणी व्यक्तिचित्र लेखनप्रकाराची गुणवैशिष्ट्ये आपणास आढळतात. या संग्रहात रामा महार, बंडा मांग, आबा रामोशी, कोंडीबा कुंभार, केरु चांभार, मालेगावचा माळी, दादू परीट, धनवडीचा न्हावी, तात्या सुतार, पांडु लोहार, आढळगावचा सोनार, दामू गुरव या बारा बलुतेदाराची चित्रे आली आहेत.

या लेखनातून शंकरराव खरातांच्या सामाजिक दृष्टिकोनाची जाणीव स्पष्ट होते. खरातांच्या या व्यक्ती आपापली कामे, व्यवसाय प्रामाणिकपणे करतात. जीवन जगत असताना वाट्याला आलेल्या अपमानांची सल या व्यक्तींना कायम असून, ही माणसे प्रतिकूल परिस्थितीत झुंजणारी आहेत. बलुतेदारांची दु:खे, त्यामागील कारणे, बलुतेदारांची जीवन जगण्याची धडपड आदींचे चित्रण करताना खरातांनी कुठेही भडकपणा, प्रचारकी अभिनिवेश आणलेला नाही. उलट त्यांनी संयमी शैलीत व्यक्तीच्या अंतरंगाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. खेड्यामध्ये जगणारा हा बारा बलुतेदार म्हणून जो वर्ग आहे तो कशाप्रकारे जीवन जगतो आहे, त्याचे जगण्याचे वास्तव काय आहे, त्याचे गावाशी व गावकऱ्यांशी संबध कसे आहेत याचे वास्तव चित्रण खरातांनी प्रस्तुत संग्रहात केले आहे. विविध वृत्तिप्रवृत्ती आणि वेगळे व्यक्तिमत्त्व, स्वभाव यांचे दर्शन या संग्रहातून होते. त्यामुळे ते बलुतेदार व्यक्तिचित्राच्या जवळचे वाटतात.

**न.वि. गाडगीळ :**

गाडगीळ हे वैचारिक लेखक, ललित लेखक म्हणून परिचित आहेत. त्यांचा कालखंड १८९६ ते १९६६ असा आहे. त्यांचे शिक्षण बी.ए. एल.एल.बी पर्यंत झाले. राजकारण व सामाजिक कार्यांत सहभाग, अनेक चळवळींत सहभाग, आठ वेळा तुरुंगवास हे त्यांचे जीवनविशेष. १९३५ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळावर नियुक्ती. १९५८-६२ मध्ये पंजाबचे राज्यपालपद भूषविले. राजकीय जीवनात विविध भूमिका करीत असताना गाडगीळांनी विविध स्वरूपाचे लेखन केलेले आहे. 'ग्यानबाचे अर्थशास्त्र' (१९४३), 'राज्यशास्त्र विचार' (१९४५), 'सालगुदस्त' (१९४७), 'घटनाप्रबोधिनी' (१९४८), 'माझे समकालीन' (१९५९), 'माझा थळकोट' (१९६१), 'आधुनिक राज्य आणि स्वातंत्र्य' (१९६२) इत्यादी ३५ पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. 'चॉकलेटची वडी' (१९६७) सारखे ललित लेखन केले आहे. 'पथिक' हे त्यांचे आत्मचरित्र तीन भागांत लिहिलेले आहे. खुसखुशीत व खुमासदार शैलीमुळे त्यांचे लेखन लोकप्रिय झाले आहे. पुणे विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषविले. गाडगीळांचे समग्र लेखन ११ खंडांत प्रकाशित करण्यात आले आहे. अशा न.वि. गाडगीळांनी 'माझे समकालीन' मध्ये व्यक्तिचित्रे लिहिलेली आहेत.

'माझे समकालीन' हा न.वि. गाडगीळ यांचा सन १९५९ साली प्रसिद्ध झालेला

व्यक्तिचित्रसंग्रह होय. या संग्रहामध्ये त्यांनी आपल्या राजकीय जीवनात आलेल्या व्यक्तींचे चित्रण केलेले आहे. या व्यक्तिचित्रणलेखनामागे लेखकाचा दृष्टिकोन सहानुभूतीपूर्वक मूल्यमापन करून व्यक्तीचे नि:पक्षपाती स्वभावचित्र काढण्याचा आहे. या संग्रहामध्ये- युगकर्ते टिळक, सरदार वल्लभभाई पटेल, जेव्हा मी गांधी पाहिले, राजाजी, तात्यासाहेब केळकर, बाबू राजेंद्रप्रसाद, बॅ. विनायकराव सावरकर, विनोबा, मौलाना आझाद, जवाहरलाल नेहरू अशा दहा स्वभावचित्रांचा समावेश आहे.

लेखकाचा भर व्यक्तीपेक्षा भोवतालच्या परिस्थितीवर आहे. किंबहुना राजकीय, सामाजिक जीवनातील घटनांची उकल करताना किंवा राजकीय समज-गैरसमजांचे निराकरण करताना संबंधित व्यक्ती बाजूला पडते, याचे भान न राहिल्याने लेखन काही प्रमाणात विस्कळीत झाले आहे. त्यात रंजकतेचा अभाव दिसतो. या लेखनाची पद्धत लेखासारखी झाली आहे. काही व्यक्तिचित्रांत हृद्य आठवणी, स्वानुभव आले असून स्वत:च्या पक्षीय दृष्टिकोनाशी जवळीक असणाऱ्या चित्रणात गाडगीळ विशेष रमतात, हे लक्षात येते. उदा. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल इ. स्वा. सावरकरांच्या लेखनात पाहिजे तितका जिव्हाळा जाणवत नाही. एकूणच या संग्रहातील लेखन हे त्या त्या व्यक्तीची सामाजिक, राजकीय घटनांचीच उकल सांगण्यासाठी केलेले आहे असे वाटते. व्यक्तीची सूक्ष्मवर्णने फारशी नाहीत. म्हणून ही व्यक्तिचित्रे साधारण स्वरूपाची झाली आहेत.

'सत्तरीतील काका' हा न.वि. गाडगीळांचा, सन १९६५ साली प्रसिद्ध झालेला लेखसंग्रह होय. या संग्रहामध्ये व्यक्तिचित्रे म्हणावे असे दोन लेख आहेत. त्यामध्ये असे होते आसाराम पाटील आणि नेहरूंचे थोर व्यक्तिमत्त्व. आसाराम पाटील हे गाडगीळांचे आजोळ सिद्धटेकचे पाटील. आसाराम पाटील यांचे दिसणे, वागणे, त्यांचा प्रेमळ स्वभाव यांचे जिव्हाळापूर्ण चित्रण केल्यामुळे हे लेखन हृदयंगम झाले आहे. हे व्यक्तिचित्र म्हणजे आसाराम यांच्या निधनाच्या वार्तेने लेखकाच्या मनात येणाऱ्या विचारांचे शब्दरूप आहे. यातून आसारामांचे व्यक्तिचित्र चांगले उतरले आहे. 'नेहरूंचे थोर व्यक्तिमत्त्व' हे व्यक्तिचित्र नेहरूंच्या मृत्यूनंतर लिहिलेले असून वर्ण्यव्यक्तीशी लेखकाचे असणारे संबध, मैत्री व त्यातून लेखनात आलेले प्रेम, जिव्हाळा याचे दर्शन प्रामुख्याने होते. त्यातून पं.जवाहरलाल नेहरू यांचे व्यक्तिचित्र साकार झाले आहे.

न.वि. गाडगीळांनी लिहिलेली व्यक्तिचित्रे ही साधारण स्वरूपाची जरी असली तरी गाडगीळांसारख्या प्रसिद्ध लेखकाने 'व्यक्तिचित्र'लेखन करून साहित्यिकांचे आणि समाजाचे लक्ष व्यक्तिचित्रप्रकाराकडे वळविले आहे, ही व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

**श्री.के. क्षीरसागर :**

श्री.के. क्षीरसागर हे एक समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी १९४५ मध्ये महाविद्यालयीन अध्यापनास सुरुवात केली. त्यांचा कालखंड १९०१ ते १९८० असा आहे. रूढ विवाहपद्धतीचे दोष दाखविणारी 'राक्षसविवाह' (१९४०) ही त्यांची कादंबरी गाजली. क्षीरसागरांच्या टीकात्मक लेखनाची सुरुवात आधीच झाली होती. 'व्यक्ती आणि वाङ्मय' (१९३७), 'उमरखैय्यामची फिर्याद' (१९६१), 'टीकाविवेक' (१९६५), 'आधुनिक राष्ट्रवादी -रवींद्रनाथ ठाकूर' (१९७०) या त्यांच्या पुस्तकातून त्यांची सौंदर्यलक्षी समीक्षादृष्टी प्रकट झाली आहे. 'तसबीर आणि तकदीर' हे त्यांचे आत्मचरित्र आहे आणि 'सागरमंथन' (१९५९) हा लेखसंग्रह.

'सागरमंथन' हा श्री.के. क्षीरसागर यांचा सन १९५९ साली प्रसिद्ध झालेला विभूती परिचयात्मक लेखसंग्रह. या पुस्तकात 'अहिताग्नी' हा वि.का. राजवाड्यांवरील एकमेव लेख व्यक्तिचित्र म्हणण्यास योग्य आहे. या संग्रहातील हे व्यक्तिचित्र अपवाद म्हणून वगळता, बाकी विभूती परिचय हे संपूर्णपणे लेखस्वरूप असून ते व्यक्तिचित्र वा स्वभावचित्राच्या जवळ येणारे नाहीत. 'राजवाडे' यांच्यावरील लेखात मात्र त्यांचे उग्र भासणारे भव्य व्यक्तिमत्त्व, त्यांचे बोलणे, मनमोकळा स्वभाव, त्यांची विद्वत्ता, व्यासंग, घरची परिस्थिती यांचा छान परिचय करून दिला आहे. त्यामुळे वि.का. राजवाडे यांचे व्यक्तिचित्र साकार झाले आहे. श्री.के. क्षीरसागर यांचा पिंडच वैचारिकतेचा असल्याने, त्याचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो. पण एका मोठ्या समीक्षकाचे लक्ष व्यक्तिचित्रलेखनाकडे जाते, हे व्यक्तिचित्रलेखनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

**समारोप-**

या प्रकरणाचा कालखंड आपण १९४० ते १९६० असा निवडला आहे. व्यक्तिचित्राच्या उगमापासून म्हणजे इ.स. १९२७ पासून दि.वा. दिवेकरांनी स्फुट लेखन स्वरूपात व्यक्तिचित्रे लिहिण्यास सुरुवात केली. 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्रे' या शुद्ध हेतूने लिहिलेल्या निखळ व्यक्तिचित्रांचे लेखन दि.वा. दिवेकरांनी सुरू केले. दि.वा. दिवेकरांचा व्यक्तिचित्रसंग्रह इ.स. १९३४ साली प्रसिद्ध झाला. परंतु त्यापूर्वी १९२९ सालापासून प्रसिद्ध होणारी कुमार रघुवीर यांची व्यक्तिचित्रे 'हृदय' या शीर्षकाखाली एकत्रित करून इ.स. १९३२ मध्ये संग्रह प्रसिद्ध झाला. अशा प्रकारे इ.स. १९३२ पासून व्यक्तिचित्राचा संग्रहरूपात विकास सुरु झाला.

१९४० ते १९६० हा कालखंड अभ्यासाच्या दृष्टिकोनातून सुलभ व्हावे म्हणून निवडला असला तरी या कालखंडास रोमँटिक (सौंदर्यवादी) कालखंड म्हणूनही संबोधले जाते. कथा, कविता, कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये जरी रोमँटिक प्रवृत्ती

दिसत असली तरी व्यक्तिचित्रलेखनप्रकारात मात्र लालित्यपूर्ण भाषा याशिवाय फारसा प्रभाव या कालखंडातील प्रवृत्तीचा पडलेला दिसत नाही. 'व्यक्ती' हा व्यक्तिचित्रलेखनाचा केंद्रबिंदू असल्याने पात्रांच्या व्यक्तिमत्त्वानुसार आणि लेखकाच्या जाणीव व प्रवृत्ती यानुसार व्यक्तिचित्राचे लेखन झालेले आहे. सौंदर्यनिर्मिती हे कलेचे ध्येय आहे आणि सुसंवाद हा सौंदर्याचा आत्मा आहे. जी वस्तू, जी कलाकृती, जी कथा, जे व्यक्तिचित्र वाचकांच्या अंत:करणातील सद्विचारांशी, सद्भावनेशी, उच्च व उदात्त स्वरूपाच्या मानवी जीवनविषयक मूल्यांशी ज्या पद्धतीने, ज्या प्रमाणात सुसंवाद साधत असेल त्यावर त्या वाङ्मयलेखनाची योग्यता ठरणार आहे आणि तशी योग्यता या कालखंडातील व्यक्तिचित्रलेखन पाहता मान्य करावी लागते.

व्यक्तिचित्राच्या उगमाच्या वेळचे किंवा थोडे त्यापूर्वीचे व्यक्तिचित्राची पूर्वपरंपरा सांगणारे लेखन हे प्रत्यक्ष व्यक्तीवर आधारित असून त्याचे स्वरूप जंत्रीवजा, चरित्रलेखन, व्यक्तीपर लेखाप्रमाणे असून ते गंभीर स्वरूपाचे वाटते. त्यातील व्यक्तिचित्र पाहिजे तेवढे सजीव वाटत नाहीत. 'हृदय' या कुमार रघुवीरांच्या व्यक्तिचित्रसंग्रहापासून सामान्यातील अप्रसिद्ध व्यक्तीचा व्यक्तिचित्रविषय म्हणून अंतर्भाव झाला. तसेच प्रातिनिधिक व्यक्तिचित्रलेखनास सुरुवात झाली. व्यक्तिचित्राच्या विकासाला सुरुवात झाल्यानंतर या वाङ्मयप्रकारासंबंधी कोणतीही तात्त्विक चर्चा उपलब्ध नसल्याने स्वैर लेखन झालेले दिसते. त्यामुळे व्यक्तिचित्राचा विकास पाहताना काटेकोर कालखंड पाडणे कठीण जाते. पण अभ्यासाच्या दृष्टीने उगमापासून ते १९६० पर्यंतचा व्यक्तिचित्राचा विकास व विचार या प्रकरणात केला आहे. प्रारंभीच्या काळात काही वेळा गरज म्हणून इतर वाङ्मयप्रकाराची 'व्यक्तिचित्रा'त भेसळ झालेली दिसते. व्यक्तिचित्राच्या विकासात एकाच लेखकाच्या लेखनात दर्जेदारपणा व दर्जाहीनता यांचे मिश्रणही आढळून येते. तसेच एखाद्या टप्प्यात विकसित झालेला दर्जा पुन्हा खालावला गेला, तसेच उंचावलाही गेला आहे.

व्यक्तिचित्राला आजपर्यंत दुय्यम स्थान दिले गेले आहे. त्यामुळे हा प्रकार दुर्लक्षित राहिला आहे. परंतु व्यक्तिचित्राचा विकास होत असताना देखील त्यावर म्हणावी अशी महत्त्वपूर्ण चर्चा झाली नाही. तरीही या कालखंडात चांगल्या प्रकारचे व्यक्तिचित्रलेखन झालेले आहे. उदा. दि.वा. दिवेकर (स्वभावचित्रे), धनंजय (कलावंताच्या सहवासात), वि.द. घाटे (काही म्हातारे व एक म्हातारी), प्र.के. अत्रे (दुर्वा आणि फुले, मराठी माणसे मराठी मने), व्यंकटेश माडगूळकर (माणदेशी माणसं), न.शे. पोहनेरकर (विरलेल्या गारा), मधु मंगेश कर्णिक (कोकणी गं वस्ती ), न.वि. गाडगीळ (माझे समकालीन) इत्यादी. कादंबरी, नाटक, कथा, चरित्र, निबंध या वाङ्मयप्रकाराच्या तुलनेत व्यक्तिचित्राचा विकास मर्यादित असला तरी ललितगद्यांतर्गत येणाऱ्या लेखनप्रकाराच्या तुलनेने

व्यक्तिचित्राचा विकास निश्चितपणे गौरवास्पद आहे. वि.द. घाटे, प्र.के. अत्रे आणि व्यंकटेश माडगूळकर यांनी केलेले व्यक्तिचित्रलेखन या कालखंडामध्ये झालेला विकास दर्शविण्यास पुरेसे आहेत. या कालखंडातील व्यक्तिचित्रांचा विचार व विकास पाहताना ज्या लेखकांनी व्यक्तिचित्रलेखन केले त्या लेखकांच्या वाङ्मयीन पार्श्वभूमीतून त्या लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व लक्षात यावे आणि अशा लेखकाचे लक्ष 'व्यक्तिचित्र' या लेखनप्रकाराकडे गेले, त्यातून त्यांनी केलेला व्यक्तिचित्रलेखनाचा विकास याचे विवेचन करून व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारचे स्थान निश्चित करणे हा येथे मुख्य हेतू आहे.

या कालखंडातील व्यक्तिचित्रांत विविध क्षेत्रांतील व विविधांगी व्यक्तींची व्यक्तिचित्रे लेखक रेखाटताना दिसतात. उदा. सामान्य वर्गातील कष्टकरी व्यक्तीचे चित्रण रघुवीर सामंत यांनी 'अंध भिकारी', 'मासळीविकी' मध्ये केले आहे. वा.बा फाटक यांनी 'पेपरवाला', 'दूधवाला'; व्यंकटेश माडगूळकरांनी 'रामा मैलकुली', 'शिंदा चांभार'; शंकरराव खरातांनी 'दादू परीट', 'तात्या सुतार'; अशा कष्टकरी व व्यावसायिक जनांच्या व्यक्तिचित्रांतून त्यांचे वास्तव व भावजीवन रेखाटले आहे. अप्रसिद्ध व्यक्ती म्हणजे ज्यांच्या दैनंदिन जीवनाकडे समाजाचे फारसे लक्ष जाणार नाही अशा व्यक्ती. वि.द. घाटे यांनी 'एक प्रार्थनासमाजिष्ट', 'एक कारकून'; वि.स. खांडेकरांनी 'आक्का', 'धोंडू'; व्यंकटेश माडगूळकरांनी 'मुलाण्याचा बकस', 'झेल्या'; मधु मंगेश कर्णिक यांनी 'कस्तुरी', 'नरु भटजी' यांची व्यक्तिचित्रे रेखाटून त्यांच्या जगण्यातील वेगळेपणा दाखवून दिला आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाने प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींची व्यक्तिचित्रे प्र.के. अत्रे यांनी 'गाडगे महाराज', 'विनोबा भावे', 'डॉ. भीमराव आंबेडकर'; न.वि. गाडगीळ यांनी 'लो. टिळक', 'सरदार वल्लभभाई पटेल', 'बॅ. विनायकराव सावरकर' अशा त्यांच्या त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्यामधून काही घटनांच्या व प्रसंगांच्या आधारे व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. पण हे व्यक्तिचित्र वाचताना त्यांच्या कार्यव्याप्तीमुळे ते व्यक्तिचित्र आपणास चरित्रचित्रणाकडे जात आहे असे वाटते. वि.ह. कुलकर्णी यांनी साहित्य, क्रीडा, कलाक्षेत्रातील सुप्रसिद्ध परदेशी व्यक्ती 'डॉन ब्रॅडमन', 'चार्ली चॅप्लीन', 'जी.के. वेस्टर्टन', 'ऑर्नोल्ड बेनेट','मॅक्झिम गॉर्की' यांची व्यक्तिचित्रे रेखाटून त्यांचे कार्य समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. वसंत शांताराम देसाई यांनी संगीत व नाट्यक्षेत्रातील व्यक्तींचे चित्रण केले आहे. 'हिराबाई बडोदेकर', 'बालगंधर्व', 'केशवराव दाते', 'व्ही. शांताराम', 'बाबूराव पेंटर', यांच्या व्यक्तिचित्रांतून यशस्वी जीवनाचा मूलगामी शोध घेण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

मराठी साहित्यक्षेत्रामध्ये प्रसिद्ध असणाऱ्या लेखकांची व्यक्तिचित्रेही लिहिली गेली आहेत. ग.त्र्यं. माडखोलकर यांनी 'श्री.कृ. कोल्हटकर', 'वि.स. खांडेकर', 'नाट्यछटाकार

दिवाकर'; प्रभाकर पाध्ये यांनी 'वा.म. जोशी', 'ना.सी. फडके' अशा साहित्यिकांच्या वाङ्मयीन कार्याचे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविले आहे. दि.वा. दिवेकर यांनी 'म. गांधी', 'जवाहरलाल नेहरू', 'सुभाषचंद्र बोस', 'लो. टिळक'; प्रभाकर पाध्ये यांनी 'जयप्रकाश नारायण', 'जवाहरलाल नेहरु' अशा प्रसिद्ध राजकीय व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटून त्यांचा व्यासंग, विचारसरणी, त्यांची जीवनविषयक दृष्टी समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

कमलाबाई देशपांडे यांनी बालमनाचे चित्रण केले आहे. 'मैनाराणी', 'सोनू', 'श्रीधर', 'बाबली' अशी चिमणी मुले-मुली, त्यांची निरागसता, त्यांचे बागडणे यांतून त्यांचे बालमन उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. मालतीबाई दांडेकर व सरोजिनी बाबर यांनी 'गिरजा', 'पार्वती', 'कमळामामी', 'मंजुळा', अशा अप्रसिद्ध स्त्रियांची व्यक्तिचित्रे रेखाटली असून त्यातून सोशीक, चंचल, सुरूप व कुरूप, श्रद्धाळू गृहिणी, भोळ्या स्त्रिया अशा विविध स्वभावाच्या व व्यक्तिमत्त्वाच्या आणि जीवनावर प्रेम करणाऱ्या स्त्रियांचे जीवन रेखाटले आहे. या सर्व व्यक्तिचित्रांचे लेखन करताना वर्णनशैली, सूक्ष्मता, अंतरंग व मनोविश्लेषण, त्या व्यक्तीचे कार्यकर्तृत्व, सामाजिक जाण व भान इत्यादी दृष्टिकोनातून ते रेखाटण्याचा प्रयत्न लेखकांनी केलेला आहे. त्यातून ती व्यक्ती तिच्या गुणधर्मासह साकार होताना दिसते.

एकूणच, या कालखंडातील व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारामध्ये बदल होत गेलेला आहे. मराठी लेखकांची व्यक्तिचित्रलेखनाची समज, व्यक्तीचे आकलन, प्रगल्भता, शैली या दृष्टीने विकास होत गेला आहे. त्यामुळे श्रेष्ठ दर्जाची व्यक्तिचित्रे साकार झालेली आहेत. भाषाशैलीच्या अंगाने विचार करता लालित्यपूर्ण भाषा, विनोद, बाह्य व अंतरंगाचे वर्णन, प्रादेशिक बोलीभाषा इत्यादींतून परिणामकारक व्यक्तिचित्रे साकार झालेली आहेत. व्यक्तिचित्रांचा एकूण विकास पाहता त्यात कधी पसरटपणा व विस्कळीतपणा हा दोष दिसत असला तरी गुणही भरपूर आहेत. व्यक्तिचित्राचा टप्प्याटप्प्याने गुणात्मकदृष्ट्या लक्षणीय विकास झालेला असून त्यामध्ये अभिजात प्रकारचे मानदंडात्मक लेखन निर्माण झाले आहे. कोणत्याही वाङ्मयप्रकारात श्रेष्ठ दर्जाचे लेखन जसे थोडे असते तसेच नित्कृष्ट लेखन देखील चालू असते. व्यक्तिचित्राबाबत हीच परिस्थिती असून व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारात काही श्रेष्ठ दर्जाचे लेखन निश्चितपणे झाले आहे. यावरून असे म्हणता येईल की, स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणण्याइतकी गुणात्मकता या विकासात निश्चित असल्यामुळे केवळ संख्यात्मक वाढीचा विचार न करता गुणांच्या वाढीचा विचार करून 'व्यक्तिचित्र' हा विकासाच्या मुद्दयावर स्वतंत्र वाङ्मयप्रकार ठरू शकतो.

***

## प्रकरण चौथे

# मराठीतील व्यक्तिचित्रे - भाग - २
## (१९६०-१९९०)

**प्रास्ताविक :**

इ.स. १९६० ते १९९० या कालखंडातील व्यक्तिचित्राचा विचार करण्यापूर्वी या कालखंडामध्ये झालेली सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन परिवर्तने यांचा थोडक्यात आढावा घेऊ. अनेकविध साहित्यप्रकारांतील व विभिन्न रूचीच्या वाचकांना आवडणारा विनोद हे स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी वाङ्मयाचे एक जमेचे अंग आहे. मराठीतील सौंदर्यशास्त्र हे या काळातील एक अभिमानास्पद दालन आहे. या काळात मराठी कथासाहित्य अनेक अंगांनी संपन्न झाले. साठोत्तर काळातील दलित साहित्याने तर मराठी वाङ्मयाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळ्यांवर प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. चरित्रात्मक वाङ्मयाच्या सर्जनशील वाटा आत्मचरित्रे, चरित्रात्मक कादंबऱ्या आणि व्यक्तिविमर्शपर स्फुटलेखन यांद्वारे संपन्न करण्याचे कार्य या कालखंडात चालू होते. बा.सी. मर्ढेकरांसारखा कवी मराठीला लाभला. नाट्यसंहिता व नाट्यप्रयोग यांत नावीन्याची व प्रयोगशीलतेची प्रवृत्तीही या काळात कार्यक्षम ठरली. भारतीय संस्कृतिकोश, समाजविज्ञानकोश, तत्त्वज्ञान महाकोश, मराठी विश्वकोश यांमध्यही उल्लेखनीय प्रगती झाली. फुले-आंबेडकरवादी अभ्यासकांनी उपेक्षित समांतर परंपरेचा नव्याने वेध घेण्याचा प्रयत्न सुरू केला. नवसाहित्याने कलात्मक अभिरुचीचा विकास घडवून आणला व नंतर दलित-ग्रामीण साहित्यप्रवाहांनी सांस्कृतिक जाणिवांचा परिघ विस्तृत केला. आधुनिकतेच्या विविधांगी जाणिवांना, मूल्यांना स्वातंत्र्योत्तर मराठी वाङ्मयाने विकसित केले. मराठीतील प्रादेशिक साहित्याने मात्र कळत-नकळत महाराष्ट्रातील प्रदेशविशिष्ट मराठी समाजाची ओळख व्यापकपणे करून देत विविधतेमध्ये एकतेची जाणीव निर्माण केली. साठोत्तरी कालखंडातील दलित, ग्रामीण, जनवादी, आदिवासी, मुस्लिम, ख्रिस्ती, जैन यांसारख्या साहित्यप्रवाहांनी देखील आपापल्या परीने विशाल मराठी समाज व संस्कृती याबद्दलचे आपले आकलन वाढविण्याचा प्रयत्न केला. अशा या परिवर्तनवादी कालखंडामध्ये व्यक्तिचित्र लेखकांनी व्यक्तिचित्र- वाङ्मयप्रकारामध्ये महत्त्वाची भर घातली.

या कालखंडामध्ये य.गो. जोशी, म.श्री. दीक्षित, दिनकर द. पाटील, पु.ल. देशपांडे, अ.ह. लिमये, शं.के.पेंडसे, आनंद यादव, माधवराव बागल, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, कृ.द. दीक्षित, ग.दि. माडगूळकर, वि.वा. शिरवाडकर, इंदुमती शेवडे, विजय तेंडुलकर, रवींद्र पिंगे, उद्धव शेळके, शिवाजी सावंत, विद्याधर पुंडलिक, रामकृष्ण बाक्रे, भा.र. साबडे, य.दि. फडके, गंगाधर गाडगीळ इ. मान्यवर लेखक व्यक्तिचित्रलेखन करू लागले. 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्र' या दृष्टिकोनातून लेखन होऊ लागले. त्यामुळे व्यक्तिचित्रलेखनाचा प्रवाह निर्माण झाला. या स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये इतर वाङ्मयप्रकारांतील लेखनाप्रमाणे व्यक्तिचित्रामध्ये जाणीवपूर्वक लेखन होऊ लागले. त्यामुळे या कालखंडात विपुल प्रमाणात लेखन झालेले आहे.

मराठीतील व्यक्तिचित्रांचा अभ्यास करीत असताना आपण या प्रकरणामध्ये इ.स. १९६० ते १९९० या कालखंडातील व्यक्तिचित्रांचा विकास कसा झाला याचा विचार करणार आहोत. या कालखंडाचा विचार करता, यामध्ये पुढील लेखक व त्यांच्या व्यक्तिचित्रसंग्रहांचा समावेश होतो.

**य.गो. जोशी :**

यांचा कालखंड १९०१ ते १९६३ असा आहे. बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना पाचवीनंतर शिक्षण घेता आले नाही. पुढे काही वर्षे त्यांनी लहान-सहान नोकऱ्या केल्या. 'दोन आणे'(१९२९) ही कथा 'यशवंत' मासिकात प्रसिद्ध झाली. सन १९३२ ते १९४३ या काळात लिहिलेल्या कथांचे 'पुनर्भेट' हे सात खंड, याशिवाय 'तुळशीपत्रे आणि इतर लघुकथा' (१९३७), 'रेघोट्याचे दैवत' (१९४७), 'मायेच्या सावल्या' (१९४७), 'जाईजुई' (१९४९), 'तरंग' (१९५०) इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध. 'होमकुंड' (१९३६), 'श्रीकांत' (१९३७), 'त्रिदोष' (१९३७), 'पडसाद' (१९३८) इत्यादी कादंबऱ्या. 'शेवग्याच्या शेंगा', 'वहिनीच्या बांगड्या', 'दुधावरची साय', 'निकामी घोड्याचे काय करतात' या त्यांच्या कथा खूप गाजल्या. जोशी यांच्या कथांतून कौटुंबिक नात्याचे हृद्य चित्रण येते. 'जिव्हाळा असेल तर तंत्र सांभाळण्याची जरुरी नाही' या भूमिकेतून सहज, प्रवाही निवेदनातून बोलणारी, जिव्हाळ्याने अंतःकरणाचा ठाव घेणारी कथा त्यांनी लिहिली. त्यांच्या कथांचे विषय, पात्रे, भाषा या साऱ्यांतून भारतीय संस्कृतीचा झरा झुळझुळताना दिसतो. 'दुधाची घागर' (१९७२) हे आईच्या आठवणी सांगणारे पुस्तक उल्लेखनीय आहे. य.गो. जोशी यांची 'प्रकाशक' म्हणूनही कारकीर्द लक्षणीय आहे. १९३८ ते १९४१ या काळात त्यांनी 'वादविवेचनमाला' या मालेतर्फे १३ पुस्तके प्रकाशित केली. य.गो. जोशींनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचा

'लक्षात राहिलेली माणसं' (१९६१) हा संग्रह प्रसिध्द आहे. यात जोशींना भेटलेल्या, त्यांच्या आठवणीत राहिलेल्या व्यक्तींची चित्रे या संग्रहात त्यांनी रेखाटली आहेत. 'लेखकाने या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे त्यांची मूळ नावे बदललेली आहेत. त्यामुळे हा काल्पनिक व्यक्तिचित्रसंग्रह ठरतो. लेखकाने व्यक्तिचित्रांना नावे न देता क्रमांक दिले असले तरी त्यातून स्पष्ट होणाऱ्या व्यक्ती याप्रमाणे- विनायक, चंद्राआत्या, बाळकोबा, भीमाताई, अण्णासाहेब, मामा पिंपुटकर, नारायणराव, बापू पुरंदरे, दत्तोपंत, सीतारामपंत, श्रीवास्तव, यांत्रिक माणूस, एक वृद्ध गृहस्थ, बुवा, अनोळखी वृद्ध इत्यादी.

विनायक, बाळकोबा, अण्णासाहेब, मामा पिंपुटकर, बापू पुरंदरे, दत्तोपंत, बुवा ही व्यक्तिचित्रे चांगली आणि निखळ झाली आहेत. या व्यक्तिचित्रांमध्ये स्वभाव, बोलणे, चालणे, वागणे, जीवनशैली, जीवन जगण्याचा दृष्टिकोन, इत्यादींतून त्यांचे अंतर्बाह्य चित्रण लेखकाने केले आहे. त्यामुळे या संग्रहातील ही व्यक्तिचित्रे चांगली झाली आहेत. इतर काही व्यक्तिचित्रे मात्र थोड्याफार प्रमाणात कथेच्या वळणावर जाणारी आहेत. काही चरित्राच्याजवळ जाणारी आहेत तर काही शब्दचित्रात्मक स्वरूपाची. या व्यक्तिचित्रसंग्रहातील बहुतेक व्यक्तिचित्रलेखनाचा साचा ठरावीक आहे. प्रथम व्यक्तीचे बाह्यवर्णन करावयाचे व नंतर फ्लॅशबॅक पद्धतीने त्या व्यक्तीचा जीवनपरिचय करून द्यावयाचा ही लेखनाची पद्धत आहे. य.गो. जोशी हे भावनिक पातळीवर हळुवार लेखन करणारे लेखक असल्याने त्यांचा प्रभाव या व्यक्तिचित्रांवर पडला आहे. एका चांगल्या कथाकाराने व्यक्तिचित्रलेखन करून मराठी व्यक्तिचित्रांत महत्त्वाची भर घातलेली आहे.

**द.वा. पोतदार :**

दत्तो वामन पोतदार हे प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ, संशोधक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांचा कालखंड १८९० ते १९७९ असा आहे. पुणे कॉलेजमध्ये त्यांनी मराठी व इतिहास विषयांचे प्राध्यापक म्हणून सेवा केली. मराठ्याच्या इतिहासाचे संशोधन केले. पोतदार हे भारत इतिहास संशोधन मंडळांचे अध्यक्ष होते. १९४६ साली केंद्र सरकारने त्यांना 'महामहोपाध्याय' ही पदवी देऊन गौरविले तर पुणे विद्यापीठाने डी.लिट देऊन सन्मानित केले. १९६७ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' हा किताब मिळाला. 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' (१९२२), 'मराठी इतिहास आणि इतिहास संशोधन' (१९३५), (हे शास्त्रीय इतिहासलेखन पद्धतीचा आढावा घेणारे ग्रंथ.) 'मराठी साहित्य परिषद आणि साहित्य संमेलन' (१९४३), 'सुमनसप्तक' (१९५०), 'श्रोते हो ऽऽ ' (१९५९) (हा त्यांच्या भाषणांचा संग्रह.) 'भारतीय भाषासमस्या' (१९६२), 'लोकमान्य टिळक सांगती' (१९७५) ही पोतदारांची महत्त्वाची निर्मिती आहे. त्यांचा 'ओळख' (१९६१)

हा व्यक्तिचित्रांचा संग्रह प्रकाशित आहे.

'ओळख' हा म. दत्तो वामन पोतदार यांचा सन १९६१ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. यामध्ये न.चिं. केळकर, कृ.पा. कुलकर्णी, नाट्यछटाकार दिवाकर, प्र.के.अत्रे, यदुनाथ सरकार, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, कोशकार कर्वे, इतिहासाचार्य राजवाडे इत्यादी व्यक्तींवरचे लेखन समाविष्ट आहे. यातील कृ.पा. कुलकर्णी आणि इतिहासाचार्य राजवाडे ही दोन व्यक्तिचित्रे चांगली झाली आहेत. बाकीची व्यक्तिचित्रे व्यक्तीपर लेखाकडे झुकताना दिसतात. कुलकर्णी व राजवाडे या दोघांच्या व्यक्तित्वाचे, कर्तृत्वाचे, स्वभावाचे वर्णन पोतदारांनी केले आहे. त्यातही वि.का. राजवाडे यांच्यावरील लेखन 'व्यक्तिचित्रा'स अधिक जवळचे आहे. परंतु या दोन व्यक्तिचित्रांखेरीज इतर लेखनात, परिच्छेदांना शीर्षके देण्याची पद्धत, चरित्रात्मक माहिती व कार्याच्या तपशीलावर दिलेला भर इत्यादींमुळे ते लेखन चरित्रात्मक स्वरूपाचे व व्यक्तीपर लेखाचे झाले आहे. तसेच चित्रमयतेचा अभाव असल्यामुळे ती साधारण स्वरूपाची व्यक्तिचित्रे झालेली वाटतात. संग्रहाच्या नावाप्रमाणे त्यांनी वरील सर्व व्यक्तींची 'ओळख' करून दिली आहे. असे जरी असले तरी 'ओळख' हा व्यक्तिचित्रसंग्रह लिहून म.द.वा. पोतदार यांच्यासारख्या प्रसिद्ध इतिहास संशोधकाने 'व्यक्तिचित्र' लेखनाकडे संशोधकांचे, साहित्यिकांचे लक्ष वेधले आहे हे व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य आहे.

**म.श्री. दीक्षित :**

चरित्रकार व संपादक म्हणून म.श्री. दीक्षित हे परिचित आहेत. त्यांनी अनेक वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके यांतून लेख लिहिले आहेत. अनेक ग्रंथपरीक्षणे त्यांनी केली आहेत. 'भारतरत्न नेहरू' (१९६६), 'पंतप्रधान शास्त्री' (१९६६), 'झुंजार सेनानी' (१९८२), 'नेपोलियन' (१९८४), 'सत्तावनचे सप्तर्षी' (१९८५), 'तात्या टोपे' (१९८६), 'तेजस्वी तारका' (१९८६), असे त्यांचे चरित्रपर लेखन आहे. याशिवाय 'एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र' (१९८५), 'साहित्यिक सांगाती' (१९९०), 'महाराष्ट्र साहित्य परिषद' (१९९७), 'मुळामुठेच्या तीरावर' (१९९७), 'पुणे नगरवाचन मंदिर : दीडशे वर्षाचा इतिहास' (१९९८), अशी इतर मिळून त्यांची बावीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'साहित्यिकांच्या सहवासात' (१९६२) हा त्यांचा व्यक्तिचित्रसंग्रह आहे.

'साहित्यिकांच्या सहवासात' हा म.श्री. दीक्षित यांचा, सन १९६२ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. या संग्रहाच्या नावावरून यातील व्यक्तिचित्रे साहित्यिकांची आहेत हे स्पष्ट होते. 'लेखकाच्या निवेदनानुसार हे लेखन प्रासंगिक आहे, तरी त्यामागे वाङ्मयाचा व व्यक्तित्वाचा अभ्यास करणे हा हेतू आहे.' या संग्रहाचे स्वरूप कविपरिचय

व वाङ्मयीन व्यक्तिदर्शने असे आहे. सुरुवातीचे पाच लेख कवी व काव्य परिचयात्मक असून सहावा लेख प्रो. फडक्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वावरील आहे. लेख ७ ते १४ यापैकी चार लेख व्यक्तिचित्रे म्हणता येतील असे आहेत. त्यांमध्ये, माझ्या माहितीचे माटे, 'भाला'कार भोपटकर, कृष्णराव मराठे, 'लोकशिक्षण'कार जांभेकर यांचा समावेश होतो. तर इतर लेख व्यक्तीपर आहेत.

श्री. म. माटे यांच्याशी असणाऱ्या दीर्घकाल संबंधामुळे 'माझ्या माहितीचे माटे' हे व्यक्तिचित्र विशेष जिव्हाळ्याने लिहिले गेले आहे. त्यात माट्यांचे स्वभाव, त्यांचे वाङ्मयीन कार्य, त्यांचे गुण-दोष, त्यांचे अंतर्बाह्य वर्णन आहे. त्यामुळे हे व्यक्तिचित्र चांगले झाले आहे. 'भाला'कार भोपटकर या व्यक्तिचित्रात भोपटकरांचा स्वभाव, निर्भीडपणा, आक्रमकता, त्यांचे कार्य, त्यांचा शिवराळपणा इ.चा परिचय करून दिला आहे. तर 'कृष्णराव मराठे' या व्यक्तिचित्रात कृष्णरावांचा ध्येयवेडेपणा, जिद्द, स्वभाव, त्यांचे कार्य, विनोदी स्वभाव इत्यादी गुणांचे वर्णन करीत त्यांचे व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न आहे. 'लोकशिक्षण'कार जांभेकर या व्यक्तिचित्रात जांभेकरांचा स्वभाव, त्यांचे वागणे, बोलणे, गोड स्वभाव, विद्वत्ता, बहुअंगी व्यक्तिमत्त्व, दांडगी स्मरणशक्ती, साहित्य परिषदेबद्दलचे प्रेम, त्यांची तिखट लेखणी, वाङ्मयीन कार्य इत्यादीचा सूक्ष्म परिचय करून दिल्याने हे व्यक्तिचित्र चांगले झाले आहे. म.श्री. दीक्षित हे चरित्रकार असल्याने त्यांची लेखणी चरित्राकडे झुकताना दिसते. असे असले तरी दीक्षितांनी रेखाटलेली साहित्यिकांची व्यक्तिचित्रे ही 'व्यक्तिचित्र' लेखनप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत असेच म्हणावे लागते.

**दिनकर द. पाटील :**

दिनकर पाटील हे ललित लेखक म्हणून परिचित आहेत. त्यांचा 'माझे शिल्पकार' हा सन १९६२ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह असून त्यात त्यांच्या परिचयातील चित्रपट व पत्रकारिता क्षेत्रांतील व्यक्तींचे चित्रण संग्रहित केलेले आहे. त्यामध्ये मा. विनायक, 'पुढारी'कार जाधव, भालजी पेंढारकर, लता मंगेशकर, आ. विश्वनाथ पाटील, माधवराव बागल, शांतीभाई, आई-अण्णा इत्यादींचा समावेश आहे.

पाटील यांनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रांचा महत्त्वाचा गुण म्हणजे वर्णिलेल्या व्यक्तींबद्दल त्यांच्या मनात असणारा जिव्हाळा व आदर होय. या सर्वच व्यक्तींशी लेखकाचा घनिष्ट संबंध असून लेखकाच्या घडणीत या व्यक्तींचा वाटा आहे. काही ठळक प्रसंगांच्या आधारे त्या-त्या व्यक्तीची ओळख पाटील करून देतात. त्यात मा. विनायक, 'पुढारी'कार जाधव, भालजी पेंढारकर, लता मंगेशकर, आ. विश्वनाथ पाटील यांचा उल्लेख करता येईल. त्यांचे स्वभाव, बाह्यवर्णन, त्यांचे कार्य व कला यांचे वर्णन जिव्हाळ्याने केल्याने

व्यक्तिचित्रे चांगली झाली आहेत. तर माधवराव बागल, शांतीभाई, आई-अण्णा ही व्यक्तिचित्रे व्यक्तीपर लेखांसारखी झाली आहेत. पाटील यांची व्यक्तिचित्राची भाषा ओघवती, मनमोकळी असून लेखनामागील भावनेमुळे व्यक्तिचित्राचे रूप मोहक झाले आहे. लेखकाचे या लेखनातून जाणवत राहणारे व्यक्तिमत्त्व हे या संग्रहाचे एक वैशिष्ट्य आहे. दिनकर द. पाटील यांनी या व्यक्तिचित्रसंग्रहाच्या नावाप्रमाणे, आपल्या जीवनात ज्यांचे संस्कार झाले, ज्यांच्यामुळे आपण घडलो त्यांचे आदरपूर्वक व जिव्हाळ्याने वर्णन केले आहे. या व्यक्तिचित्रलेखनामुळे मराठी व्यक्तिचित्रवाङ्मयप्रकारात महत्त्वाची भर पडली आहे हे निश्चित.

**पु.ल. देशपांडे :**

पु.ल. देशपांडे हे नावाजलेले लेखक. संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे पु.ल. होय. पुलंचा कालखंड १९१९ ते २००० असा आहे. मुंबईच्या कीर्ती महाविद्यालयात त्यांनी अध्यापनाचे काम केले. या काळात नाट्य, संगीत, चित्रपट आदी क्षेत्रांत त्यांची उमदेवारी सुरू होती. 'कुबेर', 'भाग्यरेखा', 'वंदेमातरम्', 'पुढचं पाऊल', 'संत चोखामेळा', 'गुळाचा गणपती' इत्यादी चित्रपटांतून त्यांनी भूमिका केल्या. अशा या हरहुन्नरी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या साहित्यिकाने विनोदी लेखन करून अजोड लोकप्रियता मिळविली. श्रोत्यांना खदखदून हसविणारा वक्ता म्हणून ते प्रख्यात झाले. 'बटाट्याची चाळ', 'खोगीरभरती' यांसारख्या एकपात्री प्रयोगांचे बहुरूपी खेळ करून त्यांनी श्रोत्यांना रिझवले आणि विनोदाचा कधी अवखळ तर कधी शस्त्रासारखा वापर करून श्रोत्यांना-वाचकांना अंतर्मुख केले. 'समाजाच्या समग्र संस्कृतीला व्यापून उरणारा कलावंत' या शब्दांत कुसुमाग्रजांनी पुलंचे मोठेपण विशद केले आहे.

पु.ल. देशपांडे यांनी १९४३ च्या सुमारास लेखन सुरू केले. 'तुका म्हणे आता' (१९४८) हे त्यांचे पहिले नाटक. 'खोगीरभरती' (१९४९) या संग्रहात त्यांचे विनोदी लेख संग्रहित झाले. 'भाग्यवान' (१९५३), 'अंमलदार' (१९५७), 'तुझे आहे तुजपाशी' (१९५७), 'सुंदर मी होणार' (१९५८) ही नाटके. 'गांधीजी' (१९७०) हे चरित्रही पुलंची उल्लेखनीय वाङ्मयनिर्मिती. परंतु पु.ल. देशपांडे यांना मराठी माणसाच्या मनात अढळ स्थान मिळाले ते त्यांच्या 'नसती उठाठेव' (१९५२), 'बटाट्याची चाळ' (१९५८), 'गोळाबेरीज' (१९६०), 'असा मी असामी' (१९६४), 'हसवणूक' (१९६८) या संग्रहातील विनोदी लेखांमुळे. 'व्यक्ती आणि वल्ली' (१९६२), 'गणगोत' (१९६६), 'गुण गाईन आवडी' (१९७५) इत्यादी व्यक्तिचित्रसंग्रह व 'अपूर्वाई' (१९६०), 'पूर्वरंग' (१९६३) हे प्रवासवर्णन इ. त्यांचे हे लेखन मध्यमवर्गीय माणसाने उचलून धरले. कारण मध्यमवर्गीय माणसाची सुखदुःखे, बदलत्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीने

त्याच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, त्याच्यावागण्यातील अंतर्विरोध आणि विचारातील विसंगती पुलंच्या विनोदी लेखणीने टिपली. पुलंच्या विनोदात उपरोध वा उपहास नाही. त्यांचा विनोद मिस्कील, अवखळ, निरामय आहे. कोट्या, श्लेष, अतिशयोक्ती, विलक्षण कल्पकता हे त्यांच्या विनोदाचे विशेष आहेत. त्यांची रसिकता, अभिजात सौंदर्यदृष्टी, गुणग्राहकता, इतरांच्या कलागुणांनी वेडावून जाणारी वृत्ती आणि जीवनाकडे पाहायचा निर्मळ, प्रसन्न दृष्टिकोन हे सारे त्यांच्या लेखनातून प्रतिबिंबित झाले. त्याने वाचक अभिमंत्रित होतो, जगण्यातले सारे प्रश्न, समस्या विसरून निर्मळ वाङ्मयानंदात बुडून जातो. पु.ल. देशपांडे यांना १९६६ साली 'पद्मश्री' व १९९० साली 'पद्मविभूषण' किताब देऊन गौरविण्यात आले. त्यांनी दर्जेदार असे 'व्यक्तिचित्र' लेखन केलेले आहे.

'व्यक्ती आणि वल्ली' हा पु.ल. देशपांडे यांचा सन १९६२ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. एक दर्जेदार व लोकप्रिय 'व्यक्तिचित्रसंग्रह' म्हणून या पुस्तकाकडे पाहिले जाते. या उत्कृष्ट व्यक्तिचित्रसंग्रहाने व्यक्तिचित्राला प्रथमच निखळ विनोदाचे परिमाण मिळवून दिले. या व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये नारायण, हरितात्या, नामू परीट, सखाराम गटणे, नंदा प्रधान, बोलट, भय्या नागपूरकर, नाथा कामत, दोन वस्ताद, गजा खोत, अण्णा वडगावकर, परोपकारी गंपू, चितळे मास्तर, लखू रिसबूड, बापू काणे, ते चौकोनी कुटुंब, तो, हंड्रेड पर्सेंट पेस्तनकाका, बबडू, अंतू बर्वा इत्यादी काल्पनिक व्यक्तिलेखांचा समावेश आहे. मध्यमवर्गीय, समाजकार्याची आवड असणारे, इतिहासात रमणारे, गरीब-श्रीमंत, शिक्षक-विद्यार्थी, प्राध्यापक, पत्रकार, कलाकार, रसिक, प्रेमिक अशा निरनिराळ्या व्यक्ती या संग्रहात आल्या असून त्या माणुसकीच्या समान धाग्याने गुंफल्या गेल्या आहेत.

नारायण, नाथा कामत, चितळे मास्तर, अंतू बर्वा ही या संग्रहातील अविस्मरणीय ठरलेली व्यक्तिचित्रे. यापैकी नाथा कामत आणि अंतू बर्वा या वल्ली विशेष भावतात. 'नारायण' ह्या व्यक्तिचित्रात नारायणाविषयी लेखक लिहितो, 'हे सर्व नारायण लोक दोन खिशांचा खाकी सदरा घालतात. खाली मळकट पण काचा मारलेले धोतर नेसतात. मागल्या बाजूने मुलाण्याच्या कोंबड्या ठेवायच्या पेटाऱ्यासारख्या ह्यांच्या धोतराचा सायकलच्या सीटमध्ये अडकून-निसटून बोंगा झालेला असतो. धोतराची कमाल मर्यादा गुडघ्याखाली चारपाच बोटे गेलेली असते. डोक्याला ब्राऊन टोपी असते. खाकी, ब्राऊन वगैरे मळखाऊ रंग नारायण लोकांना फार आवडतात. वहाण घेताना कशी होती हे सांगणे मुश्कील असते. कारण तिचा अंगठा, वादी, पट्टा, हील - सगळे काही बदलत बदलत कायापालट होत आलेला असतो. खाकी सदऱ्याच्या मात्र दोन्ही खिशात डायऱ्या, रेल्वेचे टाईमटेबल, प्रसंगी छोटेसे पंचांगदेखील असते. मुलगी पसंत झाली,

हुंडा, करणी, मानपानाचे बसल्या बैठकीला जमले की मुहूर्ताची बोलणी सुरू होतात आणि नेमके गाडे पंचांगावर अडते, आणि इथे नारायण पुढे सरसावतो. या अवतरणावरून आपणास नारायणाची वेशभूषा आणि त्याचे काम याची कल्पना येते. 'नारायण' नावाचे एक वेगळे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे राहते. तसेच अंतू बर्वा मध्ये पु.ल. देशपांडे लिहितात, ''पाच फुटांच्या आतबाहेरची उंची, तांबूस गोरा वर्ण, तोंडावर बारीक वांगाचे ठिपके, घारे मिचमिचे डोळे, वयोमानाप्रमाणे वाढत चाललेल्या सुरकुत्या, डोक्यावर तेलाच्या कडा उमटलेली टोपी, अंगात अंगरखा, कमरेला गुडघाभर पंचा, पायात कोकणी वहाणा, दातांची अर्धी पंगत उठून गेलेली, त्यामुळे मोकळ्या हिरड्यांना जीभ लावीत बोलायची खोड आणि ह्या साऱ्या साजासकट वजन सुमारे शंभर पौंड.... अंतूशेटच नव्हे, तर त्या आळीतले त्या वयाचे सारेच नमुने कमी-अधिक फरकाने एकाच वळणाचे किंवा एकाच आडवळणाचे. भाषेला फुरशासारखी पायात गिरकी घेऊन चावायची सवय झालेली. कुणाचे बरे झाल्याचे सुख नाही; वाईट झाल्याचे दुःख नाही. जन्माचे सोयर नाही; मरणाचे सुतक नाही. गाण्याची रुची नाही, तिटकाराही नाही; खाण्यात चवीपेक्षा उदरभरण हाच स्वच्छ हेतू! आयुष्याची सारवट गाडी वंगण नाही म्हणून कुरकुरली नाही, आहे म्हणून वेगाने पळाली नाही. चाल मात्र कोकणी वाटेसारखी सदा नागमोडीची. नशिबात अश्वत्थाम्याघरच्या पिठाच्या दुधाची वाटी. त्यांच्या घरी पिठाचे दूध झाले. इथे देवाने नारळीचा कल्पवृक्ष दिलेला. पण त्यातल्या खोबऱ्याहून करवंटीची सलगी अधिक!'' या वर्णनावरून अंतू बर्वा आपणासमोर प्रत्यक्ष उभा राहतो. एवढेच नव्हे तर अंतू बर्वाच नव्हे तर एकूण या वयातील अनेक अंतूशेटचे स्वभावदर्शन, त्यांची वृत्तिप्रवृत्ती, त्यांचे आडवळणी जगणे आणि त्यांची जीवन जगण्याची शैली इत्यादींचे दर्शन आपणास होते. पु.ल. देशपांडे यांची लेखणी त्या व्यक्तीचे वर्णन अत्यंत मार्मिक व सूक्ष्मपणे असे काही करते की, ते व्यक्तिचित्र वाचकाला वाचत राहावेसे वाटते. नुसती व्यक्तीच नाही तर त्या व्यक्तीबरोबर तेथील परिसर, त्या परिसराच्या संवेदना आपणास जाणवायला लागतात. संपूर्ण संग्रहातून पु.ल. देशपांडे या व्यक्तीचे, तिच्या नाट्य-चित्र-संगीतातील रसिकत्वाचे अप्रत्यक्ष दर्शन घडते. असे असूनही संग्रहातील व्यक्ती स्वतंत्र आहेत. त्यांच्यावर लेखकाचे बंधन नाही.

'व्यक्ती आणि वल्ली' या संग्रहाचे ठळक विशेष म्हणजे व्यक्तीचे व क्षेत्राचे, भोवतालच्या परिस्थितीचे, पुलंनी केलेले अत्यंत सूक्ष्म निरीक्षण व चित्रण होय. या संग्रहातील प्रत्येक व्यक्तिचित्र या विशेषाचा प्रत्यय देणारा आहे. या संग्रहाच्या नावाप्रमाणे यातील व्यक्तीमध्ये एक वल्ली दडली आहे. कोणत्याही व्यक्तिचित्रात पु.ल. देशपांडे व्यक्तीच्या चेहऱ्याचे वर्णन न करता तिचा पोषाख, बोलणे-चालणे, लकबी, सवयी

यांचे वर्णन करतात आणि व्यक्तीच्या अंतर्मनाचा वेध घेतात. कारण त्यांना व्यक्तीपेक्षा तीमधील प्रवृत्ती दाखवयाची आहे. त्यामुळे बहुतेक व्यक्तिचित्रे हे प्रातिनिधिक स्वरूपाचे नमुने सादर करतात. व्यक्तिचित्रलेखनातील आत्यंतिक सहजता हे या संग्रहाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. विनोद, कारुण्य, एखादे मतप्रदर्शन काहीही असले तरी त्यात कुठेही कृत्रिमता, ओढाताण नाही. पात्र, वातावरण, काळ-वेळ यानुसार बदलणारी व अत्यंत परिणाम साधणारी भाषाही 'व्यक्ती आणि वल्ली' ने मराठी वाङ्मयाला दिलेली देणगी आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. व्यक्तिचित्राच्या संदर्भात छोट्या घटना-प्रसंगांची येणारी शब्दचित्रे हा या संग्रहाचा विशेष होय. उदा. 'नारायण' मधील लगीनघाई, 'सखाराम गटणे' मधील चहापान, 'नंदा प्रधान' मधील इंदूचे सनातनी घर व पुणेरी संस्कृती इ. तसेच खास पु.ल. देशपांडे यांच्या ढंगाची विनोदी स्थळे या व्यक्तिचित्रसंग्रहात बरीच आहेत.

थोडक्यात, पु.ल. देशपांडे यांचा 'व्यक्ती आणि वल्ली' हा व्यक्तिचित्रसंग्रह मराठी 'व्यक्तिचित्र' लेखनामध्ये 'अलंकार' आहे तो सर्वात उठून दिसणारा आणि मौल्यवान आहे.

पु.ल. देशपांडे यांचा 'गणगोत' हा व्यक्तिचित्रसंग्रह सन १९६६ साली प्रसिद्ध झाला. या संग्रहातील व्यक्ती वास्तव आहेत, पुलंच्या सहवासातील आहेत. सन १९५२ ते १९६५ या काळात लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचे संकलन या पुस्तकात करण्यात आले आहे. लेखकाच्या जीवनातील व्यक्तींचे सहवासचित्रे 'गणगोत' मध्ये आल्याचे संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. माणूस आणि माणुसकी यांचे आकर्षण लेखकाला असल्याने विविध क्षेत्रांतील, विविध वयांच्या व्यक्तींची चित्रे लेखकाने रेखाटली आहेत. यामध्ये- ऋग्वेदी (वामन मंगेश दुभाषी), दिनेश (लेखकाचा भाचा), बाय (लेखकाची आजी), आप्पा (लेखकाचे सासरे) या कौटुंबिक व्यक्ती; फणसळकर मास्तर व रावसाहेब या लेखकाशी घरोबा असणाऱ्या व्यक्ती; इंटरनॅशनल दीक्षित, रा.ज. देशमुख, ब.मो. पुरंदरे ही लेखनक्षेत्राशी संबधित मंडळी; कलाक्षेत्रातील चोभे, चिंतामणराव कोल्हटकर, हिराबाई, केशवराव भोळे, रामूभय्या दाते, बालगंधर्व, आदरणीय व्यक्ती विनोबा भावे इत्यादींचा समावेश होतो. यात काही व्यक्ती अप्रसिद्ध आहेत.

आदर, श्रद्धा, कौतुक, मैत्री अशा विविध दृष्टिकोनातून ही निखळ व्यक्तिचित्रे लिहिली गेली असून या व्यक्ती पूर्णपणे वास्तव स्वरूपात रंगविण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. ही व्यक्तिचित्रे रंगविताना बऱ्याच वेळा पोषाख, रंगरूप आदी वर्णन करून त्यास व्यक्तींच्या खास सवयी-लकबींचे वर्णन तंतोतंत दिले आहे. निरनिराळ्या वेचक प्रसंगांतून संबंधितांचे अंतरंगदर्शन घडविताना व्यक्तीनुसार खास शैलीची जोड दिल्यामुळे ही चित्रे

जिवंत वाटतात. अधून-मधून होणारा विनोदाचा शिडकावा लेखनात प्रसन्नता आणतो. 'रावसाहेब' हे या संग्रहातील उत्कृष्ट व्यक्तिचित्र. कोणत्याही वाक्याची सुरुवात शिवीने करणाऱ्या रावसाहेबाच्या व्यक्तिमत्त्वातील परस्परविरोधी पैलूंचे तसेच त्यांच्या ओबडधोबड व्यक्तिमत्त्वामधील माणुसकीच्या, सौदार्हाच्या नितळ झऱ्याचे दर्शन घडते. रावसाहेबांचा रसिकपणा, राग व प्रेम टोकाला जाऊन व्यक्त करणारी कृती, मनमोकळेपणा, भल्यांना लंगोटी व नाठाळांना काठी देणारा स्वभाव याचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण लेखकाने केल्याने हे व्यक्तिचित्र वाचकाच्या मनात घर करते. याशिवाय दिनेश, चोंभे, ब.मो. पुरंदरे, इंटरनॅशनल दीक्षित ही व्यक्तिचित्रे उल्लेखनीय आहेत. 'दिनेश' या सव्वादोन वर्षाच्या बाळाचे चित्रण, बालकांच्या संदर्भातही लेखकाची निरीक्षणशक्ती किती सूक्ष्म आहे हे जाणवून देते. चोंभे हे फिल्म स्टुडिओतील श्रमिकांच्या प्रतिनिधीचे दर्शन घडवितात. हे व्यक्तिचित्र वाचताना आपणास 'व्यक्ती आणि वल्ली' तील 'नारायण' या व्यक्तिचित्राची आठवण येते. त्याच जातकुळीचे हे चित्रण झाले आहे. ब.मो. पुरंदरे यांच्या चित्रणातून लेखकाला वर्ण्यव्यक्तीविषयी वाटणारे आदरभाव प्रकट होतात. तर इंटरनॅशनल दीक्षितांच्या चित्रणात संवादांच्या समर्पक वापरातून संबंधित व्यक्तीचे चित्र उभे करण्याचे पु.ल. देशपांडे याचे कौशल्य दिसून येते.

'गणागोत' मध्ये पुलंची शैली खास त्यांची असून व्यक्तीनुसार वर्णनाची क्षमता ती बाळगते. दिनेशच्या वर्णनात ती खास बाळरूप धारण करते, तर दीक्षितांच्या वर्णनात प्रेमळ विनोदी सूर येतो. ब.मो. पुरंदरे रंगविताना तीमध्ये ऐतिहासिक थाट येतो तर विनोबांचे चित्रण करताना ती उदात्त, गंभीर होते. हिराबाई, रामूभय्या रेखाटताना ती रसिक भाषा बोलते तर रावसाहेबाच्या वेळी ती अस्सल शिवराळ बाज घेते. ऋग्वेदी, बाय, फणसळकर मास्तर, बालगंधर्व, चिमणराव कोल्हटकर यांच्या चित्रणात ती आदराने नम्र होते.

ही व्यक्तिचित्रे काही निमित्ताने लिहिली गेली असली तरी त्यात नैमित्तिक कामचलाऊपणा तर नाहीच; परंतु उत्तम साहित्याचा दर्जा आहे. या व्यक्तिचित्रांतून लेखकाची बहुश्रुतता, व्यासंग, रसिकता यांचा प्रत्यय येतो. काही प्रसंगात सामाजिक व्यंगांवर केलेली टीका आढळते. अशा समतोल लेखनपद्धतीमुळे ही व्यक्तिचित्रे सरस ठरली आहेत.

'गुण गाईन आवडी' हा पु.ल. देशपांडे यांचा सन १९७५ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. या संग्रहातील लेखकाची भूमिका या संग्रहाच्या नावावरून स्पष्ट होते. याबाबत पु.ल. देशपांडे लिहितात, ''माझ्या लेखी मात्र ही सारी माणसे जिवंत आहेत. त्यातल्या एखाद्याच्या कलेतून, नि:स्वार्थ जगण्यातून, निरपेक्ष स्नेहातून, सुरातून, ग्रंथातून, गीतातून किंवा व्यक्तिमत्त्वाचा एखाद्या देखण्या पैलूतून मला लाभलेला आनंद

जिवंत आहे. त्या अरूप आनंदाला मी रूप देण्याचा प्रयत्न केला आहे.'' कर्तृत्वाच्या रूपाने प्रत्यक्षाप्रत्यक्ष भेटलेल्या काही व्यक्तींचे गुणगान काही प्रसंगानिमित्ताने लेखकाने केले आहे. मात्र या लेखनाचे स्थान लेखकास केवळ प्रासंगिक वाटत नाही. कारण त्या वर्णित व्यक्ती त्यांच्या कला-जीवन-स्नेह-कर्तृत्व यातून जिवंत आहेत. या व्यक्तींनी लेखकाला अपार आनंद दिला असून त्या अरूप आनंदाला रूप देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

विविध क्षेत्रांतील व्यक्तींवर लिहिलेली या संग्रहातील व्यक्तिचित्रे याप्रमाणे- केशवराव दाते, माझे दत्तक आजोबा, भास्करबुवा बखले, हे देवाघरचे लेणे (रा.ग. गडकरी), बाबा आमटे : एक विज्ञानयोगी, एक गाण्यात राहणारा माणूस (पं. मल्लिकार्जून मन्सूर), एका जुन्या सैन्याचा सेनापती (सेनापती बापट), आनंदयात्री बाकीबाबा (बा.भ. बोरकर), स्वरूपसुंदर बापू माने, मुली, औक्षवंत हो ! (लता मंगेशकर), डॉ. लोहिया : एक रसिक तापस, वसंत पवार, पं. वसंतखाँ देशपांडे, इरावतीबाई : एक दीपमाळ, मंगल दिन आज (कुमार गंधर्व) इत्यादी.

पु.ल. देशपांडे यांच्या यापूर्वीच्या संग्रहांपेक्षा या संग्रहाचे स्वरूप वेगळे आहे. या संग्रहात पुलंची लेखणी चिंतनशीलतेकडे झुकलेली दिसते. प्रस्तुत संग्रहामध्ये व्यक्तीच्या रूढ अंतर्बाह्य चित्रणापेक्षा व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याकडे, व्यक्तीच्या कर्तृत्वासंबंधी चिंतनात्मक विचार प्रकट करण्याकडे अधिक कल दिसतो. यावरून पुलंमधील व्यक्तीचित्रकार अधिक विकसित, परिपक्व झाला आहे असे आपणास म्हणता येईल. शिल्पकार फडके, बा.भ. बोरकर, वसंतराव देशपांडे, इरावती कर्वे यांच्या व्यक्तिचित्रांत लेखकाने बाह्यरूपाचे किंवा पोषाखाचे वर्णन केले आहे. संग्रहातील बहुतेक व्यक्तिचित्रात वर्ण्यव्यक्तीचे व्यक्तिगत किंवा खाजगी पैलू लेखकाने वर्णिले असले तरी त्यांना महत्त्व नाही. कारण या व्यक्तीचे गुणदर्शन म्हणजे लेखकाच्या दृष्टीने त्या व्यक्तीच्या कलेचे किंवा कर्तृत्वाचे दर्शन आहे. त्यामुळे कलाकार म्हणून, कर्तृत्ववान व्यक्ती म्हणून, वर्ण्य व्यक्ती किती महान आहे याचे चित्रण लेखकाने केले आहे.

बहुतेक व्यक्तिचित्रे दर्जेदार झालेली आहेत पण तरी पं. वसंतराव देशपांडे व वसंत पवार ही या संग्रहातील उत्कृष्ट व्यक्तिचित्रे म्हणून सांगता येतील, त्यातल्या त्यात वसंतराव देशपांडे यांचे व्यक्तिचित्र तर व्यक्ती म्हणून व गायकीच्या दृष्टीने अतिशय बहारीचे झाले आहे. वसंत पवारांविषयी लिहिताना लेखक लिहितो, ''वसंताच्या गुणांचा मी लोभी होतो. त्याच्या गळ्याला मजेदार लटक होती. साधा ठेका धरला, तर कसा बुलंद धरत असे. हसण्यात बारीक मिष्कीलपणा असायचा. वाजवताना कधी लक्ष उडाले आणि संगीतदिग्दर्शकाने चमकून पाहिले की शाळकरी खट्याळ पोराप्रमाणे

नुसत्या डोळ्यांनी हसून मान सतारीमागे दडवीत असे. एखादा किस्सा सांगताना कसबी सोंगड्यासारखे हावभाव करीत असे. जादू तर नामवंत जादुगारासारखी करत होता. टाकावे तिथे चमकणारा हा माणूस. आयुष्यात भांडलाही असेल, वाईटही वागला असेल. पण मैफिलीचा चांद होता. बडबड्या नव्हता, पण बोलका होता. बेफिकीर होता, पण काम आले की तिथे जीव ओवाळणारा होता. देह मळलेला असायचा; मन मळलेले नव्हते.'' या वसंत पवारांच्या वर्णनातून जिवंत वसंता आपणासमोर उभा राहतो. सूक्ष्म वर्णन, त्यांच्या हालचाली, हावभाव, त्यांचा स्वभाव इत्यादींतून पुलंनी वसंताचे सुंदर आणि उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व आपणासमोर साकार केले आहे.

वसंतराव देशपांडे व पुलं अनेक वर्षांचे स्नेही, तर वसंत पवार हे निकटवर्ती. दोघेही संगीतातील वसंत. पुलं स्वतः उत्तम संगीतकार. त्यामुळे दोन्ही व्यक्तिचित्रे मित्रप्रेम, कौतुक, जिव्हाळा व सहृदय कलादर्शन यानी नटलेली आहेत. वसंतराव देशपांड्यांच्या दिसण्या-बोलण्यापासून ढंगदार वागण्यापर्यंतच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व छटा पुलंनी सूक्ष्मपणे वर्णन केल्या आहेत. वसंतरावांच्या वादळी आणि कलंदर, बहुढंगी व्यक्तिमत्त्वासाठी नागपुरी हिंदीचा आणि खेळकर मराठी शैलीचा सुरेख, संमिश्र वापर केल्यामुळे व्यक्तिचित्राची आस्वादकता वाढली आहे. वसंत पवारांच्या अनेक गुणावगुणांची भावपूर्ण ओळख करून देताना, त्यांच्या अकाली निधनामुळे लेखकाला वाटणारी हळहळ लेखनातून स्पष्टपणे जाणवते. वर्ण्य व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाशी लेखकाचे भावनिक तादात्म्य झाल्याने लेखनात जिवंतपणा आला आहे.

याखेरीज बापूराव माने, लता मंगेशकर, केशवराव दाते, बा.भ. बोरकर, कुमार गंधर्व यांचीही व्यक्तिचित्रे शैलीच्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. एक दर्जेदार व्यक्तिचित्रसंग्रह म्हणून 'गुण गाईन आवडी' चा उल्लेख व्यक्तिचित्राच्या इतिहासात करावा लागेल.

सन १९८९ साली पुलंचा 'मैत्र' हा व्यक्तिचित्रसंग्रह प्रकाशित झाला. या संग्रहात विविध क्षेत्रांतील व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्यामध्ये केसरबाई : एका तेज:पुंज स्वराचा अस्त, नानासाहेब गोरे : प्रफुल्ल होवोनि सुपुष्प ठेले, पंडित विष्णु दिगंबर, खानोलकरांचे देणे, गौरकिशोर घोष, शाहू महाराज : एक धिप्पाड माणूस, माटे मास्तर, हमीद : एक श्रेष्ठ प्रबोधनकार, जीवन त्यांना कळले हो, दादा धर्माधिकारी, शरदाचे चांदणे, ज्योत्स्ना भोळे नावाची माझी एक बालमैत्रीण, रामकिंकरदा, सखे-सोबती गेले पुढती, मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष, स्नेहधर्मी वसंत सबनीस, स्थानबद्ध वुडहाऊस, जाने क्यूं आज तेरे नाम पे रोना आया इत्यादींचा समावेश होतो. केसरबाई केरकर या एक प्रसिद्ध गायिका. त्यांचा डौलदारपणा, भारदस्तपणा त्यांच्या वागण्यातूनही दिसत असे. त्याचे वर्णन करताना लेखक लिहितो, ''मध्यम उंची, गौरवर्ण, विलक्षण

तेजस्वी डोळे, करारी जिवणी, ओठांच्या कडा पानाने किंचित अधिक आरक्त झालेल्या, कानांत हिऱ्यांची कुडी, हातांत हिऱ्यांच्या बांगड्या, बोटात हिऱ्याची आंगठी, गळ्यात फक्त मोत्याची माळ, राजघराण्यातल्या स्त्रीसारखी उंची, शुभ्र किंवा मोतिया रंगाची साडी - डोकीवरून पदर घेतलेला, चालण्या-पाहण्यात त्या वेषाला साजेल असाच डौल, मैफिलीतल्या एखाद्या परिचिताला ओळख दाखविली तर त्यातून मेहेरबानीच दिसावी अशा ढंगाची खानदानी लकब - एकूण 'दबदबा' हाच त्या साऱ्यातून साधला जाणारा परिणाम.'' या वर्णनातून केसरबाईचे एक तेज:पुंज व्यक्तिमत्त्व आपणासमोर उभे राहते. त्यांचा गायकीबद्दलचा आत्मविश्वास आपणास जाणवतो. 'केसरबाईचे गाणे' ही त्या काळी श्रीमंतघरच्या लग्नास एक अट होती. अशा काही प्रसंगांच्या व मैफिलींच्या वर्णनातून त्यांचे चांगले व्यक्तिचित्र साकार केले आहे. असेच या संग्रहातल्या इतर व्यक्तिचित्रांबाबतही सांगता येईल. त्यांचे संगीत, कला क्षेत्रातील योगदान, त्याचे वाङ्मयीन कार्य, सामाजिक कार्य, त्यांची जीवनविषयक दृष्टी, त्यांच्या चळवळी, प्रतिभासंपन्न लेखक, समीक्षक, गायक इत्यादी वर्णनातून आणि घटना-प्रसंगांतून त्या त्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचे चित्रण अंतर्बाह्य स्वरूपात पुलंनी केले आहे. त्यातून त्या त्या व्यक्तीचे योगदान आणि त्या क्षेत्रातील महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगितले आहे. पण हे दाखविताना त्यातील 'माणूस' मात्र पुलं विसरत नाहीत. त्यामुळे प्रत्येक व्यक्तिचित्रात जिव्हाळा, चित्रमयता आली आहे. त्यामुळे व्यक्तिचित्रे परिणामकारक झाली आहेत. एक दर्जेदार व्यक्तिचित्रसंग्रह म्हणून 'मैत्र'चा उल्लेख आपणास करावा लागतो.

'आपुलकी' हा पुलंचा आणखी एक व्यक्तिचित्रसंग्रह सन १९९८ साली प्रसिद्ध झाला आहे. यामध्ये पंधरा व्यक्तिचित्रांचा समावेश आहे. त्यामध्ये साहित्यिक, लेखक, गायक, नट, कवी, समाजसेवक, अग्रलेखक, विनोदवीर इत्यादींचा समावेश आहे. या संग्रहामध्ये - एक वडीलधारा माणूस, बालगंधर्व : एक अटळ स्मरण, दादा, मुशाफिर टिकेकर, 'किमया' कार माधव आचवल, नाट्यरंगी रंगलेला शरद तळवळकर, आमची आवाबेन, अब्द अब्द मनी येते, अनंत काणेकर, शिक्षकांचे शिक्षक, शंकर घाणेकर : एक हसवणारा फकीर, शुक्ल कवी, माधवराव, अग्रलेखक गोविंदराव तळवलकर, कोल्हापूरचे नाट्यप्रेमी लोहिया इत्यादी आहेत.

पुलं स्वत: बहुगुणसंपन्न. लेखक, नाटककार, संगीतकार, कलाकार, नट, विनोदवीर, गायक म्हणून विविध क्षेत्रांवर त्यांनी आपला ठसा उमटविलेला. त्या त्या क्षेत्रातील मातब्बर मंडळीचा निकटचा सहवास त्यांना लाभला. विविध क्षेत्रांतील अनेक मंडळी त्यांना भेटली, परिचित झाली. त्यांतून त्यांना भावलेला, जाणवलेला माणूस त्यांनी आपणासमोर उत्कटतेने ठेवला आहे. पु.ल. देशपांडे यांचा महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांना

अनेक व्यक्तींबद्दल वाटणारा जिव्हाळा. या जिव्हाळ्यातून त्यांनी त्या त्या व्यक्तीचे आंतर्बाह्य वर्णन केले आहे. काही घटना-प्रसंगांतून, त्यांचे जीवन चित्रमय रूपामध्ये साकार केले आहे. त्यामुळे ती व्यक्ती आपणासमोर प्रत्यक्ष उभी राहते. दीर्घकाळ लक्षात राहते. उदा. 'एक वडीलधारी माणूस' या व्यक्तिचित्रात द.वा. पोतदारांविषयी पु.ल. देशपांडे लिहितात, ''त्यांच्या मुक्तद्वार निवासस्थानी बैठक कुणाच्या निंदानालस्तीने रंगली आहे असे कधीही झाले नाही. कुणाच्या खाजगी जीवनातल्या वैगुण्यावर बोलून दादांनी गप्पांना रंग भरला नाही. तो आब नव्हता. ती विविध विषयांवरची ज्ञानधारा अखंडपणे वाहत ठेवणारी पाणपोई होती. जाणाऱ्याला आपण दादांचा वेळ किती खाल्ला यापेक्षा आपला वेळ सत्कारणी लागला याचीच कृतज्ञता मोठी असायची. वेळ आणि विषय यांचे बंधन दादांनी पाळले नाही. किंबहुना विषयांची विविधता हे तर त्या बैठकीचे वैशिष्ट्य होते.'' यातून आपणास द.वा. पोतदार, यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची विद्वत्ता आणि सर्वांना प्रवाहामध्ये सामील करून घेण्याची प्रवृत्ती यांचा परिचय होतो. या व इतर अनेक पैलूंतून पुलंनी पोतदारांचे व्यक्तिचित्र उत्तम साकार केले आहे.

थोडक्यात, पु.ल. देशपांडे हे मराठी वाङ्मयातील एक महत्त्वाचे 'व्यक्तिचित्र' लेखक आहेत. त्यांनी पाच व्यक्तिचित्रसंग्रहांची मौलिक भर मराठी व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारात घातली आहे. हे पाच व्यक्तिचित्रसंग्रह अतिशय उत्कृष्ट आहेत. त्यातही व्यक्तिचित्र वाङ्मयवैशिष्ट्यांच्या दृष्टीने 'व्यक्ती आणि वल्ली' आणि 'गुण गाईन आवडी' या संग्रहाला तरी तोड नाही, इतकी ती सुंदर आणि उत्कृष्ट झाली आहेत. सूक्ष्म अंतर्बाह्य वर्णन, प्रसंग-घटनांमध्ये येणारी चित्रमयता, संबंधित व्यक्तीबद्दलचा जिव्हाळा, प्रेम; पुलंची लेखनशैली, विनोदाचा शिडकावा, तटस्थपणे पाहण्याची वृत्ती, आणि महत्त्वाचे म्हणजे व्यक्तीमधील 'माणूस' शोधण्याची वृत्ती इत्यादी वैशिष्ट्यांमुळे त्यांनी लिहिलेली सर्वच व्यक्तिचित्रे परिणामकारक झाली आहेत. ही व्यक्तिचित्रे साहित्य, संगीत, कला, चित्रपट, नाट्य अशा विविध क्षेत्रातल्या व्यक्तींची जशी आहेत तसेच वडीलधाऱ्यांची, सामान्यांची देखील आहेत. पण ती वाचत असताना संगीताची आपणास आवड नाही तर ती व्यक्तिचित्रे वाचू नये असे वाचकाला कधीच वाटत नाही इतकी ती सुबोध, सहजसुंदर रेखाटली आहेत. यातच पुलंच्या व्यक्तिचित्रांचे यश आहे असे मला वाटते. पु.ल. देशपांडे यांच्यासारख्या महाराष्ट्राच्या लाडक्या व्यक्तिमत्त्वाने फार मोठी मोलाची भर मराठी व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारामध्ये घातल्याने निश्चितच या प्रकाराला पुष्टी मिळाली आहे; ती या अभ्यासाच्या दृष्टीने अतिशय मोलाची आहे असे मला म्हणावेसे वाटते.

**अ.ह. लिमये :**

लिमये हे ललितलेखक तसेच बालवाङ्मय लेखक व पत्रकार म्हणून परिचित आहेत.

त्यांचा कालखंड १९११ ते १९७४ असा आहे. लिमये १९३६ साली बी.ए. झाले. त्यांनी काही काळ 'सकाळ' मध्ये उपसंपादकाचे काम केले. १९३९ ते १९४३ मध्ये न्यू इंग्लीश स्कूलमध्ये शिक्षक होते. बालवाङ्मय व ललित स्वरूपाची सुमारे ३० पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. 'मराठी प्रकाशानाचे स्वरूप, प्रेरणा व परंपरा : पहिले शतक' (१९७२) हा महत्त्वपूर्ण प्रबंध लिहिला आहे. 'सह्याद्रीची शिखरे' (१९६३), 'अनोखे मित्र' (१९७१) हे त्यांचे दोन व्यक्तिचित्रसंग्रह प्रसिद्ध आहेत.

'सह्याद्रीची शिखरे' हा अ.ह. लिमये यांचा, सन १९६३ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. यामध्ये विविध प्रसिद्ध व्यक्तींची व्यक्तिचित्रे समाविष्ट आहेत. राजकारण, साहित्य, पत्रकारिता, संशोधन, प्रकाशन, शिक्षण अशा निरनिराळ्या क्षेत्रांतील या व्यक्ती आहेत. त्यामध्ये डॉ. अप्पासाहेब परांजपे, म.द.वा. पोतदार, काकासाहेब गाडगीळ, कुलगुरू - डॉ. आ.ग. पवार, डॉ. ना.भि. परळेकर, ग.रा. भटकळ, अण्णा परचुरे, रा.ज. देशमुख, पं. महादेवशास्त्री जोशी, वि.द. घाटे, रा.चिं. ढेरे  इत्यादींचा समावेश आहे.

अ.ह. लिमये यांनी बहुतेक व्यक्तिचित्रांची सुरुवात एखाद्या प्रसंगाच्या उल्लेखातून केलेली आहे. लिमये व्यक्तीच्या चेहऱ्याचे वर्णन क्वचित करतात. तसेच वेशभूषेचे वर्णन काही वेळा करतात. लेखकाचा भर स्वभावदर्शनावर अधिक असून त्यासाठी संवाद व प्रसंग यांचा वापर केलेला आहे. काही वेळा लेखकाने व्यक्तीची नुसतीच त्रोटकपणे स्वभाववैशिष्ट्ये दिली आहेत. लेखकाच्या लेखनाची शैली निरलंकृत, साधी आहे. व्यक्तिचित्रसंग्रहाचे शीर्षक अर्थपूर्ण आहे.

'अनोखे मित्र' हा अ.ह. लिमये यांचा दुसरा व्यक्तिचित्रसंग्रह सन १९७१ साली प्रसिद्ध झाला. या संग्रहात परदेशी मित्रांची व्यक्तिचित्रे लेखकांनी रेखाटली आहेत. 'परदेशी मित्रांचा परिचय करून देण्यासाठी, त्यांचे जीवन समजून घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नाचे मिळालेले फळ म्हणून 'अनोखे मित्र' मधील तेरा व्यक्तिचित्रांचे लेखन झाले असे लेखकाने म्हटले आहे. यातील जीवनदर्शने विविध प्रकारची आहेत. या संग्रहातील व्यक्तिचित्रे याप्रमाणे फ्रेड टॉमलीन, एक सैनिक मित्र, डॉ. लेदर्ले, आधुनिक कांट, रुडॉल्फ शॉक, भारतीय शिक्षणशास्त्रज्ञ, जिम लेदरर, आधुनिक ह्यू अेनत्संग, सायोनारा, एक हिप्पी जोडपे, डॉ. रिचर्ड टकर, आधुनिक चित्रकार, अेमिल आणि जॉर्ज, भारतीय संगीतप्रेमी, डॉ. डलरी, पंढरीचा वारकरी, अझांगा आल्बर्ट, एक निर्मळ व्यक्तिमत्त्व, अपर्ण वृक्षश्री, थायलंडचा भाषाकोविद, सूरसुगंध : भिक्षू विद्यार्थी, अेलिअस पेरिझ मुडिले, कोलंबियाचा नाट्यवेडा, जी हुशंग, इराणी फिरस्ता इत्यादी.

लेखकाने वरील लेखन हे व्यक्तिचित्र म्हणून केलेले आहे. पण ती व्यक्तिचित्रे पाहता

सर्वच लेखन व्यक्तिचित्रे आहेत असे आपणास म्हणता येत नाही. त्यातील बरेच लेखन व्यक्तीपर लेख या स्वरूपाचे झाले आहे. ठरावीक साच्याच्या व निरनिराळ्या देशांची माहिती देणाऱ्या मुलाखतींचा समावेश केला आहे. तरी काही प्रमाणात बाह्यवर्णन आणि व्यक्तींचे स्वभाव, त्यांची जीवनशैली, त्यांच्या आवडी-निवडीचे वर्णन आले आहे. 'जिम लेदरर' या व्यक्तिचित्रात मात्र अपंगाचे चित्र रेखाटताना विकल शरीर व त्याचे खंबीर मन याचे दर्शन घडविले आहे. त्यामध्ये काही प्रमाणात जिव्हाळा जाणवतो. अ.ह. लिमये यांनी मराठी 'व्यक्तिचित्र' लेखनात परदेशी व्यक्तीचे चित्रण करून व्यक्तिचित्र लेखनाची व्याप्ती वाढविली आहे; हेही महत्त्वाचेच आहे.

**गोपाळकृष्ण भोबे:**

भोबे हे संगीतविषयक ललितलेखन करणारे लेखक. त्यांचा कालखंड १९२० ते १९६८ असा आहे. आकाशवाणी, दै. महाराष्ट्र टाईम्समध्ये संगीतचित्रकला समीक्षक म्हणून त्यांनी काम केले - चित्रकार दलाल यांच्या प्रोत्साहनाने 'दीपावली' मासिकात कलावंतांची व्यक्तिचित्रे लिहिली. 'चतुरंग रेखा' (१९६४) हे कलावंतांच्या कलासाधनेची ओळख करून देणारे व्यक्तिचित्रात्मक पुस्तक त्यांनी लिहिले. त्यानंतर 'आलाप' (१९६३), 'नाद' (१९६६), 'सात स्वरश्री' (१९७२) ही त्यांची पुस्तके प्रकाशित. संगीताच्या चिरस्मरणीय मैफिली, कलावंताच्या स्मृती, संगीताची परंपरा, घराणी, त्यांतील गायकीचे बारकावे हे लेखकाचे आवडीचे विषय. 'सात स्वरश्री' या पुस्तकात त्यांनी सात संगीततज्ज्ञ गायकांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. भोबे यांचे 'धन्य ते गायनी कला' (१९६९) हे नाटक तानसेनाच्या जीवनावर आधारित आहे. 'असा आहे माझा गोमतंक' (१९६४), 'माझे आणि मी' (१९६६) हे त्यांचे व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे ललित लेखन आहे.

'चतुरंग रेखा' हा गोपाळकृष्ण भोबे यांचा सन १९६४ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. या संग्रहात कलावंताच्या सहवासातील क्षण टिपून त्या त्या कलावंताचे दर्शन घडविण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. स्वत: गोपाळकृष्ण भोबे हे रसिक, बहुश्रुत व व्यासंगी असल्याने विविध क्षेत्रांतील व्यक्तींची चित्रे लेखकाने शब्दबद्ध केली आहेत. लेखकाने 'हे लेखन भाबड्या भक्तिभावाने केल्याचे' म्हटले आहे. या संग्रहामध्ये तेरा व्यक्तिचित्रांचा समावेश आहे. तो याप्रमाणे-हठयोगी, गानतपस्विनी -मोगुबाई कुर्डीकर, स्वरेल रसिला गायक -खाँसाहेब बडे गुलाम अलिखाँ, लयभास्कर-खाप्रूजी पर्वतकर, प्रतिभावंत चित्रकार-दीनानाथ दामोदर दलाल, महापुरुष उस्ताद अमीरखाँ, शिल्पसंजीवक कामत, मणिपुरी नृत्य आणि नृत्यांगना जव्हेरी भगिनी, अवनट रागांचा ज्ञानकोश-मोहनराव पालेकर, कला दिग्दर्शक-मुरलीधर रामचंद्र आचरेकर,

श्रद्धाळू संगीत निर्देशक-वसंत देसाई, तबलानवाज-खलिया अमीर हुसेन खाँ, मेहेर घराण्याचा आधारस्तंभ-उस्ताद अली अकबर खाँ, व्यासंगी कलावंत-दत्तात्रय गणेश गोडसे इत्यादी.

वरील व्यक्तिचित्रांमध्ये काही 'व्यक्तिचित्रे' म्हणण्यासारखे लेखन आहे तर काही व्यक्तीपर लेख झालेले आहेत, तर काहींमध्ये वर्ण्यव्यक्तीखेरीज अन्य व्यक्तीलाच प्राधान्य मिळाले आहे. काही ठिकाणी कलेसंबंधी माहिती आली आहे. ज्या लेखांना व्यक्तिचित्र म्हणता येईल त्यांमध्ये लेखकाने बहुतेक व्यक्तींचे बाह्यचित्रण, रूपवर्णन, पोषाखासह केले आहे. या महान कलाकारांची कलाक्षेत्रातील तपस्या व कलेवरील हुकमत याचे लेखकाने प्रामुख्याने चित्रण केले असून त्याबरोबरच त्या त्या व्यक्तीच्या स्वभावगुणांचे वर्णन केले आहे. लेखकाला या सर्व व्यक्तींबद्दल वाटणारा आदर, जिव्हाळा व भक्तिभाव लेखनातून जाणवतो. तसेच लेखक स्वतः संगीत - कला क्षेत्रातील असल्याने लेखकाचेही रसिक व्यक्तिमत्त्व आपणास जाणवते. गोपाळकृष्ण भोबे यांनी 'चतुरंग रेखा' लिहून मराठीमध्ये प्रसिद्ध कलाकारांची, त्यांच्या कलाक्षेत्रातील कार्याची ओळख करून देऊन व्यक्तिचित्रलेखनात महत्त्वाची भर घातली आहे.

**शं.के. पेंडसेः**

पेंडसे हे महाभारताचे व्यक्तिदर्शनकार म्हणून परिचित आहेत. त्यांचे शिक्षण एम.ए. एल.एल.बी. पर्यंत झाले. 'ज्ञानप्रकाश'चे बातमीदार म्हणून काही काळ काम केल्यानंतर इतिहास, मराठी, संस्कृत, इंग्रजी अशा विविध विषयांचे अध्यापनही त्यांनी केले. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यातील माहिती-केंद्रात ते मराठी वृत्तविभागाचे मुख्य संपादक होते. 'लोकमान्य'चे उपसंपादक व 'राष्ट्रमत'चे संपादक म्हणूनही त्यांनी काम केले. 'महाभारतातील व्यक्तिदर्शने' ही त्यांची लेखमाला 'वीणा' मासिकामधून प्रसिद्ध झाली. त्यानंतर ही लेखमाला सन १९६४ मध्ये पुस्तकरूपाने प्रकाशित झाली. शं.के. पेंडसे हे अत्यंत व्यासंगी. त्यांचे विविध विषयांचे अध्ययन व ज्ञानार्जन सतत चालू असे. महाराष्ट्रातील व्यक्तिदर्शने हा ग्रंथ त्यांच्या दीर्घ व्यासंगाचे, अविरत उद्योगशीलतेचे व गाढ तपश्चर्येचे फळ आहे.

'महाभारतातील व्यक्तिदर्शने' हा शंकर केशव पेंडसे यांचा, सन १९६४ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या संग्रहामध्ये सत्यवती, कृष्णद्वैपायन व्यास, शन्तनु, भीष्माचार्य, द्रोणाचार्य, परशुराम, कुंती, द्रौपती, युधिष्ठिर, भीम, अर्जुन, गांधारी, धृतराष्ट्र, विदुर, दुर्योधन, कर्ण, शकुनी, दुःशासन, विकर्ण, श्रीकृष्ण इत्यादी व्यक्तिदर्शने आहेत. या व्यक्तिचित्रांबाबत शं.के. पेंडसे लिहितात, ''महाभारतातील व्यक्ती थोर आहेत, उदात्त आहेत, पण तरीही प्रमादशील आहेत. नैष्ठिक ब्रह्मचर्य आणि

अनावर विषयलोलुपता, संयम आणि स्वैराचार, पातिव्रत्य आणि व्यभिचार, अढळ

शांती आणि शीघ्रकोपीपणा, नि:स्वार्थीपणा आणि स्वार्थीपणा, धैर्य आणि हळवेपणा, शौर्य आणि भेकडपणा, क्षमाशीलता आणि सूडबुद्धी, दयाळूपणा आणि निर्दयता, नि:स्पृहता आणि लाचारी, सरळपणा आणि कपटीपणा, योग्य अभिमान आणि खोटा अहंकार, सत्यप्रियता आणि खोटेपणा, औदार्य आणि कद्रुपणा असे परस्परविरोधी स्वभावविशेष महाभारतातील व्यक्तींमध्ये दिसून येतात.'' मानवाच्या अंतरंगात ईश्वराचा अंश असतो, तसाच सैतानाचाही असतो. महाभारतकारांनी या दोन्ही अंशांच्या संघर्षावर प्रकाश टाकला आहे आणि सत्याचा विजय होण्यातच मानवाचे कल्याण आहे असे दाखविले आहे. पेडसें यांनी महाभारतातील या व्यक्तिदर्शनात त्या त्या व्यक्तीचे गुण तसेच दोषही दाखविले आहेत. काही बाह्यवर्णनातून तर काही अंतरंगातून, घटना-प्रसंगांच्या माध्यमातून ही व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. महाभारतातील प्रत्येक व्यक्तीचा त्याच्या गुणवैशिष्ट्यांद्वारे आणि त्यांच्या इतर अंगांचाही विचार घटनाप्रसंगांच्या आधारे लेखकाने केलेला आहे. या सर्व व्यक्ती ऐतिहासिक आहेत, ती सर्व माणसे आहेत, ते ईश्वरी अवतार नव्हेत या भूमिकेतून लेखकाने ही व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. मराठी 'व्यक्तिचित्र' लेखनात ऐतिहासिक व्यक्तिचित्र लेखन करून व्यक्तिचित्राची व्याप्ती लेखकाने वाढविली आहे. ही व्यक्तिचित्रे थोडीशी चरित्राच्या अंगाने जात असली तरी हे एक अतिशय व्यासंगपूर्ण लेखन असून पेंडसे यांनी मराठी व्यक्तिचित्रात मोलाची भर घातली आहे असे म्हणावे लागेल.

**आनंद यादव:**

हे कवी, कथाकार, कादंबरीकार, समीक्षक, ललितलेखक म्हणून परिचित आहेत. पुणे विद्यापीठाचे मराठी विभागाचे प्रमुख म्हणून ते निवृत्त झाले. लेखनाचे आकर्षण व सुरुवात शालेय जीवनापासूनच. ग्रामीण बोलीतील जानपदगीते वाचून त्या प्रकारच्या लेखनाची सुरुवात केली. संपूर्ण ग्रामीण बोलीतून अस्सल ग्रामीण जीवन रेखाटण्याच्या ईर्षेने काव्यलेखन, ललितनिबंध अशी सुरुवात केली. 'हिरवे जग' (१९५९), 'मातीखालची माती'(१९६५), 'खळाळ'(१९८४) यासारख्या लेखनातून आनंद यादवांनी आपल्या जीवनानुभवाच्या वेगळेपणाचे दर्शन घडविले असले तरी त्यांच्या लेखनाचे सामर्थ्य कळले ते 'गोतावळा'(१९७१) या कांदबरीमधून. ग्रामीण साहित्याचे विवेचन करणारे लेखन यादवांनी भरपूर केले. 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव' (१९८१), 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती'(१९८५) इत्यादी. 'झोंबी'(१९८७), 'नांगरणी'(१९९०),

'घरभिंती'(१९९२) ही त्यांची आत्मचरित्रात्मक पुस्तके. 'मातीखालची माती' या पुस्तकात त्यांचे व्यक्तिचित्रलेखन संग्रहित आहे.

'मातीखालची माती' हा आनंद यादव यांचा, सन १९६५ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. लहान-थोर, स्त्री-पुरुष आणि हिजडा सुद्धा या संग्रहाच्या व्यक्ती विषयात आला आहे. कोल्हापूर, कागल भागातील ग्रामीण माणसे दरिद्र्याच्या पार्श्वभूमीवर लेखकाने रेखाटली असून ती याप्रमाणे: हाताबुडी आलेला शिवा, चव्हाणाचा आबामा, बापू, आक्कूमावशी, गडी, सखाराम, बावजी बल्लाळ, फुलाआत्ती, भाडेकरू दत्तू, पोरका दिन्या, तपस्विनी, धोंडबा खादाड्या, खुळा इठू, लंगडा गोपा इत्यादी.

'बापू आणि सखाराम' ही या व्यक्तिसंग्रहातील उत्कृष्ट व्यक्तिचित्रे आहेत. बापू हे एक इरसाल बेरकी व्यक्तिमत्त्व असून अशा प्रकारच्या व्यक्ती खेड्यात हमखास आढळत असल्याने त्या अर्थाने हे प्रातिनिधिक चित्रण म्हणता येईल. बापूचा पोषाख, त्याचा स्वभाव, लकब यांचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन ग्रामीण भाषेचा वापर करून सहजतेने रेखाटले आहे तसेच संवादातून नाट्यात्मकतेचा प्रत्यय आणून देणारे हे व्यक्तिचित्र आहे. 'सखाराम' हे व्यक्तिचित्र थोडे वेगळे आहे. त्याचे वैशिष्ट्य आहे ते व्यक्ती निवडीत. जन्माने पुरुष असून स्त्रीभावाने पछाडलेला व त्याप्रमाणे वागताना येणाऱ्या अडचणीमुळे दु:खी झालेल्या स्वभावाचे अनेकांगी पदर यादवांनी उत्कृष्टपणे उकलले आहे. बहुतांशी दुर्लक्षिल्या जाणाऱ्या तृतीयपंथी व्यक्तीस यादवांनी आपल्या लेखणीचा विषय केले आहे. अशा प्रकारचे हे मराठीतील एकमेव व्यक्तिचित्र आहे. अन्य व्यक्तिचित्रांमध्ये शिवा गडी, लंगडा गोपा हे कष्टकरी शेतकरी आहेत. तर आबामा हे रंगेल व्यक्तिमत्त्व आहे. आक्कूमावशी ही दारिद्री वृद्ध स्त्री आहे तर फुलाआत्ती बोलभांड, चिडखोर म्हातारी आहे. 'तपस्विनी' मधून एका भाविक स्त्रीचे तर बाळजी बल्लाळ मधून एका शिस्तप्रेमी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. भाडेकरू दत्तू हे पापभीरू व्यक्तिमत्त्व तर दिन्या ही निराधार व्यक्ती आहे. धोंडबा हा खादाड तर इठू हा वेडसर, गरीब आहे. या सर्व व्यक्ती सामान्य जीवन जगणाऱ्या आहेत. कष्टकरी आहेत. लेखकाने त्यांचे स्वभाव, त्यांची राहणी, बोलणे, त्यांचे गुण, अवगुण इत्यादींचे वर्णन करून त्यांच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आनंद यादव हे अस्सल ग्रामीण लेखक आहेत. कथाकार आहेत. त्यांनी प्रसंगी बोलीभाषेचा वापर केला आहे. त्यामुळे त्यांची व्यक्तिचित्रे परिणामकारक झाली आहेत. त्यांच्या काही व्यक्तिचित्रांवर व्यंकटेश माडगूळकरांची छाप जाणवते. उदा. बापू (शिदा चांभार), भाडेकरू दत्तू (रघू कारकून) इत्यादी परंतु असे असूनही आनंद यादवांची

व्यक्तिचित्रे खास त्यांची अशी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कारण व्यक्तिचित्र रेखाटताना रूढ साचा वापरून ते आपल्या लेखनात एकसुरीपणा येऊ देत नाहीत. कधी त्यांचे व्यक्तिचित्र कथेकडे झुकते तर कधी बाह्यागांचे वर्णन न करता ते प्रभावीपणे रेखाटले जाते. कधी कपड्यांचे व रूपाचे वर्णन यादव बारकाईने करतात; तर कधी संपूर्ण बाह्यांग व अंतरंग मिलाफ केला जातो. 'पोरका दिन्या' या व्यक्तिचित्रात तर कमीत कमी शब्दांत व्यक्तीचे स्पष्ट, साक्षात वर्णन करण्याचे यादवांचे सामर्थ्य लक्षात येते. सूक्ष्म निरीक्षण आणि वर्णन हा आनंद यादवांचा विशेष या संग्रहातून जाणवतो. संग्रहातील व्यक्तिचित्रांचे निवेदन कधी प्रथमपुरुषी तर कधी तृतीयपुरुषी असून बहुतेक संवाद बोली भाषेत आहेत. तर निवेदन प्रमाण भाषेत आहे. व्यक्तिचित्रलेखन करताना आनंद यादव स्वत:मधील कथाकारास विसरू शकत नाहीत. मात्र असे असूनही संग्रहातील कलानुभव व्यापक आहे. समाजाच्या एका स्तराचे भेदक दर्शन घडविणारे, मनात अस्वस्थता निर्माण करणारे हे लेखन आहे. म्हणून आनंद यादवांचे स्थान व्यक्तिचित्र लेखन वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**माधवराव बागल:**

हे वृत्तपत्रकार, कादंबरीकार म्हणून परिचित आहेत. त्यांचा कालखंड १८९५ ते १९८६ असा आहे. वडिलांकडून त्यांनी समाजसुधारणेचा वसा घेतला. ब्राह्मणेतर चळवळीचे व कामगारांचे ते नेते होते. सत्यशोधकांनी जातीची भाषा सोडून सामाजिक व आर्थिक समता पुरस्कारली पाहिजे अशी त्यांची समाजवादी भूमिका होती, धर्मभोळेपणा सोडून विज्ञानाची व मानवतावादाची कास धरावी असे त्यांचे म्हणणे होते. त्यांनी 'हंटर' मधून तर्कशुद्ध मानवतावादी विचारसरणी असलेले अनेक लेख लिहिले. माधवरावांची सुमारे ५० पुस्तके प्रसिद्ध आहेत. 'जिव्हाळा'(१९३५), 'जुलूम'(१९३६), 'संस्थानी राजवट'(१९३८), 'संसार'(१९३८) हे त्यांचे कथासंग्रह होत. 'कला आणि कलावंत' (१९३६) या ग्रंथात जगातील प्रख्यात चित्रकारांची शब्दचित्रे असून 'कोल्हापूरचे कलावंत'(१९६२) या पुस्तकात कोल्हापूरच्या २१ कलावंतांची शब्दचित्रे आणि पोट्रेट्स, पेटिंग्ज्, लँडस्केप्स, कॉम्पोझिशन या चार विषयांवरील निबंध आहेत. माधवराव स्वत: चित्रकार व मूर्तिकार होते. 'सत्याग्रहातून सहकार्याकडे' (१९६१) हे त्यांचे आठवणींचे पुस्तक आहे. 'लग्नबंधन की तुरुंगवास?'(१९३२), 'समाजसत्ता की भांडवलशाही' (१९३८), 'संस्थानिक, संस्थानी प्रजा व फेडरेशन'(१९४५), 'सुलभ समाजवाद' (१९५१) अशी विचारप्रवर्तक पुस्तके त्यांनी लिहिली. 'माझ्या आवडत्या पाच व्यक्ती' (१९६४), 'माझे यशवंतराव'(१९६५), 'माझा परिवार-भाग १ व २'(१९६७) अशी चरित्रात्मक व आत्मपर पुस्तके त्यांनी लिहिली. 'जीवनप्रवाह भाग १ व २' (१९५४) व भाग - ३ (१९५८) हे त्यांचे

आत्मचरित्र. त्यांच्या समाजसेवेबद्दल त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांनी 'बहुजनाचे शिल्पकार' (१९६६) हे पुस्तक लिहिले आहे.

'बहुजन समाजाचे शिल्पकार' हा माधवराव बागल यांचा सन १९६६ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. बहुजन समाजातील पुढारी तसेच परिवारातील आवडत्या आदरणीय व्यक्तींची व्यक्तिचित्रे या संग्रहात आहेत. माधवराव स्वत: चित्रकार असल्याने 'चित्रकारांच्या दृष्टीने आपण ही चित्रे काढली असून ही 'चरित्रे' नसून चित्रे आहेत' असे लेखकाने आवर्जून सांगितले आहे. या संग्रहातील व्यक्तिचित्रे पुढीलप्रमाणे- राजर्षी शाहू महाराज, खंडेराव गोपाळराव बागल, भास्करराव जाधव, श्रीपतराव शिंदे, दासराम, बाबूराव यादव, दे.भ. जवळकर, केशराव विचारे, राष्ट्रवीरकार शामराव देसाई, खा. शंकरराव मोरे, म. फुले, अण्णासाहेब लठ्ठे, दे.भ. जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील, वि.रा. शिंदे, डॉ. आंबेडकर, केशवराव ठाकरे, मुकुंदराव पाटील, पंजाबराव देशमुख, नाना पाटील इत्यादी. यातील सुरुवातीचे दहा लेख ज्यांना 'व्यक्तिचित्र' म्हणता येईल असे झाले आहेत तर नंतरचे लेख व्यक्तीपर झाले आहेत. म. फुले वगळता इतर सर्व व्यक्ती लेखकाच्या ओळखीच्या व परिवारातील आहेत. व्यक्तिचित्रात लेखकाने व्यक्तीचे बाह्यवर्णन घडविले असले तरी लेखकाचा कल काही घटना-प्रसंगांच्या मधून वर्ण्य व्यक्तीचे स्वभावगुण चित्रित करण्याकडे अधिक आहे. स्वत: लेखक बहुजन समाजाच्या चळवळीचे नेते असल्यामुळे त्याच चळवळीतील पुढाऱ्यांची चित्रे रंगविताना वर्ण्य व्यक्तीबद्दलची आपुलकी, जिव्हाळा प्रकटला आहे. तसेच त्या व्यक्तीच्या विचारांबद्दलचे, कार्याबद्दलचे लेखकाचे प्रेम व्यक्त झाले आहे. पण लेखकाने प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे प्रत्यक्ष लेखनात चित्रमयता किंवा चित्रकाराची दृष्टी जाणवत नाही त्यामुळे व्यक्तिचित्रे परिणामकारक झालेली नाहीत किंवा व्यक्तिचित्राला अपेक्षित उंची लाभत नाही.

'माझा परिवार-भाग १' हा माधवराव बागलांचा, सन १९६६ साली प्रकाशित झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. प्रत्येक व्यक्तीमध्ये गुणदोष असतात. परंतु दोष आहेत म्हणून आपण माणूस टाकत नाही किंवा त्याची बदनामी करीत नाही. अशा गुणदोषांसह स्वीकारलेल्या व्यक्तीचे आभासात्मक रॅपिड स्केच किंवा स्नॅपशॉट रेखाटावे हा हेतू 'माझा परिवार' च्या प्रस्तावनेत लेखकाने स्पष्ट केला आहे. या संग्रहामध्ये आचार्य जावडेकर, जे.पी. नाईक, तुळशीदास जाधव, 'विद्याविकास'कार गोखले, दे.भ. शंकरराव देव, र.के. खाडिलकर, पी.बी. साळुंखे, मदनमोहन लोहिया, ना.बाळासाहेब देसाई, दादा हळदणकर, भाऊसाहेब खांडेकर, तर्कतीर्थ जोशी, आचार्य अत्रे इत्यादींचा समावेश आहे. यांपैकी जावडेकर, गोखले, देव, हळदणकर, खांडेकर यांच्यावरील लेख हे व्यक्तीपर लेखासारखे झाले आहेत. जे.पी. नाईक यांचे बाह्यदर्शन चित्रमय पद्धतीने

रेखाटले आहे. तसेच त्यांचे कोवळे अंत:करण, औदार्य, तळमळ, प्रामाणिकपणा यांचेही दर्शन घडविले आहे. तुळशीदास जाधव, र.के. खाडिलकर, पी.बी. साळुंखे, बाळासाहेब देसाई यांचे स्वभावदर्शन लेखकाने यथायोग्य प्रकारे रेखाटले आहे. तसेच त्यांच्या कार्याचे, गुणांचे दर्शनही घडविले आहे. मदनमोहन लोहियांवरील लेखात मात्र, लोहियांचे गुण व स्वभावाचे पैलू रेखाटताना दोन पानभर स्वत:चे करून घेतलेले कौतुक खटकते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे थोडे बाह्यदर्शन घडविल्यानंतर त्यांचा स्पष्टवक्तेपणा, प्रांजळपणा, मोकळेपणा विविध प्रसंगांतून दाखविला आहे. या संग्रहातील आचार्य प्र.के. अत्रे यांचे व्यक्तिचित्र चांगले झाले आहे. अत्र्यांच्या बहुरंगी, बहुढंगी, विशाल व दिलदार व्यक्तिमत्त्वाचे गतिमान चित्रण केले आहे. या चित्रातून अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू स्पष्ट करून ते अपूर्ण असल्याची चुटपुट लेखकाने व्यक्त केली आहे.

'माझा परिवार-भाग २' हा माधवराव बागलांचा, सन १९६७ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. या संग्रहामध्ये सोळा व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. यशवंतराव चव्हाण, कर्मवीर भाऊराव, डॉ.अप्पासाहेब पवार, व्ही.टी. पाटील, एम.आर. देसाई, बापूजी साळुंखे, आचार्य भागवत, पुढारीकार जाधव, ज्ञानप्रकाशकार लिमये, सत्यवादीकार पाटील, सदाशिवराव शिंदे, पा.वा. गाडगीळ, दत्ता, डॉ. कांटे, डॉ. जेमिनीस, अप्पासाहेब पटवर्धन, रत्नाप्पा कुंभार इत्यादी.

यापूर्वीच्या दोन्ही संग्रहातील काही व्यक्ती या संग्रहात पुनरुक्त झाल्या आहेत. कर्मवीर भाऊराव, व्ही.टी. पाटील, जाधव, लिमये, सत्यवादीकार पाटील, गाडगीळ, कांटे, जेमनीस, रत्नाप्पा कुंभार यांच्यावरील लेखन व्यक्तीपर लेखांसारखे झाले आहे. यशवंतराव चव्हाणांच्या अनेक गुणांचा परिचय करून दिला असला तरी चव्हाणांनी लेखकाची केलेली स्तुती ठळकपणे मांडण्याचा मोह लेखकाला आवरलेला नाही. बहुतेक व्यक्तिचित्रांमध्ये बाह्यवर्णन नाही. वर्ण्य व्यक्तीचे गुणदर्शन आहे पण ते प्रसंगातून येण्याऐवजी अनेकदा जंत्रीप्रमाणे येते. चित्रमय शैलीचा अभाव या व्यक्तिचित्रांत जाणवतो. त्यामुळे व्यक्ती सजीवपणे उभी राहत नाही. 'माझा परिवार - भाग १ व २' यातील लेखनाचा विचार करता, आपल्याच परिवारातील व जवळच्या व्यक्तींचे व्यक्तिचित्रे लेखकाने रेखाटल्याने गुणाचे वर्णन केल्याचे जाणवते. बाह्यवर्णनातून व्यक्ती फारशी साकार होताना दिसत नाही. व्यक्तीबद्दलचा 'जिव्हाळा' जाणवत असला तरी व्यक्तिचित्र परिणामकारक वाटत नाही. लेखक चित्रकार असूनही शब्दांच्या माध्यमातून पाहिजे तसे व्यक्तिचित्र साकार होत नाही. 'बहुजन समाजाचे शिल्पकार' मधील व्यक्तिचित्रे चांगली रेखाटली गेली आहेत, मात्र 'माझा परिवार भाग १ व २' मधील व्यक्तिचित्रे साधारण दर्जाची वाटतात. तरीही माधवराव बागलांचे व्यक्तिचित्रलेखन प्रस्तुत अभ्यासाच्या

दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**दुर्गा भागवतः**

लोकसाहित्य, समाजशास्त्र, बौद्धवाङ्मय यांच्या अभ्यासक तसेच ललित लेखक म्हणून दुर्गा भागवत परिचित आहेत. त्यांचा कालखंड १९१० ते २००२ असा आहे. इंग्रजी, मराठी, संस्कृत, पाली, बंगाली, गुजराती अशा अनेक भाषा अवगत असणाऱ्या दुर्गाबाईंनी आपले लेखन मुख्यतः मराठीमधून व इंग्रजीमधून केले. त्यांच्या प्रकाशित पुस्तकांची संख्या १०० च्या घरात जाणारी आहे. त्यांनी स्फुट लेखनही पुष्कळ केले. 'ऋतुचक्र' (१९५६), 'भावमुद्रा' (१९६०), 'व्यासपर्व' (१९६२), 'डुब' (१९७५) इत्यादी दहा संग्रहांत त्यांचे ललितलेखन समाविष्ट आहे. मराठी लघुनिबंधाचे १९५० पूर्वीचे साचेबंद रूप बदलून तो अधिकाधिक चैतन्यपूर्ण, वास्तव, अनुभवनिष्ठ आणि चिंतनात्मक करण्यात दुर्गाबाईंचे मोठे योगदान आहे. अनुभवसमृद्ध व्यक्तिमत्त्व आणि जबरदस्त ज्ञानलालसा यामुळे त्यांचे लेखन लोकसाहित्य, संस्कृत वाङ्मय, बौद्धधर्म अशा अनेक क्षेत्रांतील संदर्भांनी समृद्ध झालेले आहे. 'लोकसाहित्य' हे त्यांचे एक अभ्यासक्षेत्र. 'लोकसाहित्याची रूपरेखा' हा त्यांचा ग्रंथ या विषयावरील महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो. तामीळ, पंजाबी, गुजराती, बंगाली, आसामी, काश्मिरी अशा अनेक प्रदेशांतील लोककथा त्यांनी मराठीत आणल्या. 'राजारामशास्त्री भागवत : व्यक्ति आणि वाङ्मय' (१९४७), 'बॉल्डनकाठी विचार विहार' (१९६५), 'केतकरी कांदबरी' (१९६७), 'सिद्धार्थजातकाच्या सात खंडांचे अनुवाद' हे दुर्गाबाईंचे बहुमोल कार्य आहे. दुर्गाबाईंचे सामाजिक भान लक्षणीय आहे. १९७५ च्या आणीबाणीच्या काळात त्यांनी जनमतजागृती केली. तुरुंगवास भोगला. 'मुक्ता' (१९७७), 'जनतेचा सवाल' (१९७९), 'शासन, साहित्यिक आणि बांधिलकी' (१९८८) ही त्यांची वैचारिक निबंधांची पुस्तके. जीवनाच्या अनेक अंगांमध्ये व ज्ञानविषयांमध्ये मनःपूर्वक रस असणाऱ्या दुर्गाबाईंनी भरतकाम, विणकाम, पाककाम, लोकसंस्कृती, वन्यप्राणीजीवन, वनस्पती अशा विषयांतही भरपूर लेखन केले. त्यांनी 'रूपरंग' हे व्यक्तिचित्रलेखन केले आहे.

'व्यासपर्व' हा दुर्गा भागवत यांचा, सन १९६२ साली प्रकाशित व्यक्तिचित्रसंग्रह. यामध्ये पौराणिक काळातील तसेच इतिहासातील व्यक्तींची व्यक्तिचित्रे आहेत. महाभारताच्या अवलोकनानंतर लेखिकेच्या मनात ज्या प्रतिक्रिया उमटल्या त्या प्रतिक्रियांची लालित्यपूर्ण मांडणी त्यांनी या व्यक्तिचित्रांद्वारे 'व्यासपर्व' मध्ये केली आहे. महाभारत या ग्रंथाविषयी शं.के.पेंडसे लिहितात, ''महाभारत हे अक्षरवाङ्मय आहे. वरवर दिसणाऱ्या विविधतेतही एकरूपता असू शकते हे महाभारताने दाखविले आहे. हा एक ज्ञानकोश

आहे, धर्मकोश आहे, नीतिकोश आहे. या ग्रंथाचे स्वरूप रम्य नि उदात्त आहेच, पण यात असे आणखी एक वैशिष्ट्य आहे की, ज्यामुळे कोणत्याही देशात कोणत्याही काळात हा ग्रंथ अवीट गोडीने वाचला जाईल. हे वैशिष्ट्य म्हणजे मानवी स्वभावाचे अचूक पण सहृदय विश्लेषण!'' महाभारतामध्ये मानवी स्वभावाचे जे अचूक व सहृदय विश्लेषण जाणवते, त्याने दुर्गा भागवत यांना आकर्षित केले आहे. दुर्गा भागवत या समाजशास्त्रज्ञ आहेत. समाजशास्त्राच्या अंगानेही लालित्यपूर्ण भाषेत त्यांनी महाभारतातील व्यक्तींची व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. महाभारतातील व्यक्तिरेखांकडे वेगळ्या दृष्टीने त्या पाहतात. त्याचीच परिणती व्यासपर्वात आहे.

'व्यासपर्व' मध्ये दुर्गा भागवतांनी महाभारतातील कृष्ण, द्रोण, अश्वत्थामा, दुर्योधन, कर्ण, अर्जुन, द्रौपदी, विदुर, भीष्म इत्यादी व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला आहे. या सर्वच व्यक्तिदर्शनांतून दुर्गा भागवत सूचित करतात की, प्रत्येकजण आपला देहस्वभाव सोडायला तयार नाही. भीष्म कायमचा अविवाहित व अधिकारत्यागाची प्रतिज्ञा घेतलेला, द्रौपदी स्वत:च्या रूपाभिमानाने भारलेली. एकदा घेतलेला त्रागा ती अखेरपर्यंत सोडत नाही. भीम कौरवांवर जळायचे सोडत नाही. अर्जुन लढायचे सोडत नाही. युधिष्ठिर चिंतन करायचे सोडत नाही. विदुर दुसऱ्यात स्वत:ला पाहण्याचे सोडत नाही. दुर्योधन द्वेष सोडत नाही. कर्ण पीळ सोडत नाही. कुंती खंत सोडत नाही. कृष्ण निर्घृण व्यावहारिकपटुता सोडत नाही. एखाद्या हट्टी मुलाप्रमाणे कुणीही स्वत:चा स्वभावधर्म सोडत नाही. पण तरी या व्यक्तिदर्शनांतून दिसून येते की, महाभारतात या व्यक्तिरूपांतून व्यासांनी नीती, तत्त्वबोध, विविध तऱ्हेचे ज्ञान दिलेले आहे. जीवनाच्या सर्व अवस्थांना व्यक्तिचित्रांच्या घटना-प्रसंगांतून, व्यक्तीच्या जीवनशैलीतून, संघर्षातून, संयमातून, स्वैराचारातून, शौर्यातून, व्यासांनी अनुभवाने समरूप बनवले आहे. विशाल जीवनाचे दर्शन घडविले आहे. दुर्गा भागवतांनी 'व्यासपर्व' मधील व्यक्तिचित्रांतून हेच टिपले आहे. त्यामुळे 'व्यक्तिचित्र'लेखनाची व्याप्ती वाढली आहे.

'रूपरंग' हा दुर्गा भागवतांचा सन १९६७ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. आपल्या जीवनातील अनेक परिचितांच्या सहवासातून, क्रियांतून येणाऱ्या अनुभवांचे, व्यक्तिजीवनाचे चित्र 'रूपरंग' मधून रंगविले आहे. या संग्रहात एकुण १५ व्यक्तिचित्रे आहेत. पण यातील 'मास्तर' आणि 'रिता' हे दोन लेखच व्यक्तिचित्र प्रकारात चपखल बसणारे आहेत. प्रस्तुत ग्रंथातील इतर लेखन संपूर्णपणे कथास्वरूपाचे झाले आहे, किंवा काही लेखन व्यक्तीपर लेख या स्वरूपाचे झाले आहे. 'मास्तर' या व्यक्तिचित्रात लेखिकेने आपल्या संस्कृतच्या शिक्षकाचे चित्र रेखाटले आहे. मास्तरांचा उंच, कृश, काळा देह; करडा अप्रशस्त चेहरा, सावकाश वागणे, दात आवळून धीमेपणाने टोमणे

देत कडक बोलणे आदींचे चित्रण करीत मास्तरांची विद्वत्ता, विद्यार्थ्यांविषयीची तळमळ यांचा परिचय करून दिला आहे. तसेच, 'रिता' या व्यक्तिचित्रावर कथेची छाप असली तरी भारतीय संस्कृती व संस्कृताभिमानी गृहस्थाचे हे चित्र व्यक्तिचित्राजवळ जाते. त्याचा स्वभाव, वागणे, संस्कृतीबद्दलचा अभिमान, त्याचे जगणे इत्यादी गोष्टी काही प्रसंगांतून रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

दुर्गाबाई भागवत या प्रसिद्ध लेखिका, विदुषी आहेत. त्यांनी व्यक्तिचित्रलेखनाची भूमिका बाळगून लेखन केलेले आहे, पण त्यांचे लेखन कथेकडे सरकत गेल्याने व्यक्तिचित्र पाहिजे तितके परिणामकारक झाले नाही. पण महाभारतातील व्यक्तिरेखांवर 'व्यासपर्व' लिहून त्यांनी मोलाची भर घातली आहे. त्यातून त्यांचा दांडगा व्यासंग आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोन आपणास दिसतो. हे व्यक्तिचित्र लेखन वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

**उमाकांत भेंडे:**

हे एक ललितलेखक म्हणून परिचित आहेत. त्यांनी 'भटक्याची कमाई' (१९४३), 'पडछाया' इत्यादी पुस्तके लिहिली.'पडछाया' हा उमाकांत भेंडे यांचा सन १९६७ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या संग्रहात विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या व्यक्तिचित्रांचा समावेश आहे. त्यामध्ये 'भटक्याची कमाई' या संग्रहातील काही लेखन पुनर्मुद्रित केले आहे. काही नवीन व्यक्तिचित्रलेखनही आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत किंजवडेकर शास्त्री यांनी म्हटल्याप्रमाणे, ''बहुविध क्षेत्रांतील यशस्वी, नामवंत व्यक्तींच्या जीवनाची ओळख करून दिल्याने हा संग्रह म्हणजे वर्णित व्यक्तीच्या कालखंडाचा इतिहास आहे.'' उमाकांत भेंडे यांच्या या संग्रहात ३३ व्यक्तिचित्रे आहेत. पण यांपैकी बहुतेक लेखन व्यक्तीपर लेखाच्या स्वरूपाचे झाल्याचे दिसते. ज्यांच्याविषयीच्या लेखनाला 'व्यक्तिचित्र' म्हणता येईल त्या व्यक्ती पुढीलप्रमाणे -ना.ह. आपटे, प्रा. अनंत काणेकर, पु.रा. लेले, नाना कुंटे, उमादेवी व मॉरिस फ्रीडमन, युसुफ मेहरअल्ली, चिमणलाल सेटलवाड, व्यं.न. कुलकर्णी, मीराबेन, कामराज नाडर, पंढरीनाथ पाटील आणि सरहद्द गांधी इत्यादी.

उमाकांत भेंडे यांनी व्यक्तिचित्र रेखाटताना व्यक्तींचे दिसणे, त्यांचे वागणे, त्यांचे खाणे, बोलणे, त्यांचा स्वभावगुण इत्यादींचे दर्शन बारकाईने घडविले आहे. लेखकाने बाह्यवर्णन केले आहे. लेखकाने वर्णित व्यक्तीचे गुण-दोष नेमकेपणाने हेरले असून खाजगी जीवनातील प्रसंगांची जोड या व्यक्तिचित्रांना दिल्यामुळे लेखनात रसाळपणा आला आहे. पण शरीरवर्णनात मात्र चित्रमयतेपेक्षा ढोबळपणा अधिक वाटतो. एकूणच लेखनात लेखकाचा वर्णित व्यक्तीबद्दलचा आदरभाव, जिव्हाळा व्यक्त होतो. त्यामुळे काही व्यक्तिचित्रे चांगली

झाली आहेत. तसेच लेखनातील अकृत्रिमपणा वाचकांना सुखावून जातो. लेखकाच्या संबंधात, सहवासात, आलेल्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींवरून लेखकाच्या बहुश्रुतेचा व रसिकतेचा प्रत्यय येतो. म्हणूनच इथे उमाकांत भेंडे यांच्या व्यक्तिचित्रलेखनाचा प्रयत्न महत्त्वाचा आहे.

**इरावती कर्वे:**

मानववंशशास्त्र व समाजशास्त्र या विषयांतील संशोधक तसेच ललित निबंधकार म्हणून इरावती कर्वे परिचित आहेत. त्यांचा कालखंड १९०५ ते १९७० असा आहे. त्यांनी मानववंशशास्त्रात डॉक्टरेट मिळविली. ना.दा. ठाकरसी महिला विद्यापीठात कुलसचिव म्हणून काम केल्यानंतर १९३९ साली पुण्याच्या डेक्कन कॉलेजात संशोधक प्राध्यापक व संशोधन लेखनादि कार्य केले. संशोधन कार्याच्या निमित्ताने सैद्धांतिक स्वरूपाचे विपुल लेखन इंग्रजीतून केले. याशिवाय या अभ्याससंशोधनावर आधारित संशोधनाची शास्त्रीय बैठक असलेले, वैचारिक आणि डोळसपणे समाजाचे निरीक्षण करीत असताना जाणवणारे, साद-प्रतिसाद व्यक्त करणारे असे मोजकेच पण वैशिष्ट्यपूर्ण लेखन मराठीत केले.

भारतीय संस्कृती, महाराष्ट्र समाज व संस्कृती, महाभारत-रामायण ग्रंथांचा समाजशास्त्रीय अभ्यास या विषयांशी निगडित असे लेखन इरावती कर्वे यांनी प्रामुख्याने केले आहे. 'मराठी लोकांची संस्कृती' (१९५१), 'आमची संस्कृती' (१९६०), 'युगान्त' (१९६७), 'धर्म' (१९७१), 'संस्कृती' (१९७२), 'महाराष्ट्र एक अभ्यास' (१९७३) हे त्यांचे या संदर्भातील महत्त्वाचे ग्रंथ. लेखिकेची चिंतनशील वृत्ती व मानवसमाजाच्या खोलवरच्या दर्शनाने लेखिकेच्या मनात निर्माण झालेले समाजविषयक व मानव जीवनविषयक भान यांचे दर्शन सदर ललितनिबंधांतून घडते. 'परिपूर्ती'(१९४९), 'भोवरा'(१९६०), 'गंगाजळ' (१९६०) हे त्यांचे ललितलेखनसंग्रह आहेत. त्यांची भाषा प्रसन्न, हलकासा विनोदाचा फुलोरा असलेली आणि निरीक्षणे मार्मिक आहेत. विद्वत्ता आणि संवेदनक्षम यांतून आलेली भावोत्कटता हा त्यांच्या ललित लेखनाचा विशेष होय. मराठी लघुनिबंधाच्या विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा त्यांच्या टवटवीत व तरल ललित गद्यांतून दिसतो.

'युगान्त' हा इरावती कर्वे यांचा सन १९६७ साली प्रसिद्ध झालेला लेखसंग्रह होय. या ग्रंथात त्यांनी महाभारतातील व्यक्तिचित्रांचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केला आहे. यामध्ये महाभारतातील भीष्म, कर्ण, द्रोण, कृष्ण, विदुर, गांधारी, कुंती आणि द्रौपदी या व्यक्तिरेखांचा परामर्ष घेतला आहे. युगान्तविषयी इरावती कर्वे लिहितात, ''बोलण्या-लिहिण्यामागे माझ्या मते एकच हेतू, आपल्याला काहीतरी उत्कटतेने वाटत असते, ते इतरांना सांगावे हा. ही एक दबून न राहणारी प्राथमिक प्रवृत्ती

आहे. ह्यापेक्षा जास्त काही हे लेख लिहिताना माझ्या मनात होते, असे मला आढळत नाही.'' महाभारताचा अभ्यास करताना इरावती कर्वे यांना महाभारतातील व्यक्तिरेखा कशा जाणवल्या यांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण त्यांनी केले आहे. व्यक्तिचित्रलेखन करावे ह्या हेतूने हे लिहिलेले नाही तर अभ्यास करताना त्या त्या प्रसंग-घटनांमधून त्यांना त्या व्यक्तिरेखांबद्दल जे वाटले ते उत्कटतेने सांगितले आहे. त्यामुळे व्यक्तिचित्र रेखाटताना तपशील आला आहे. महाभारतातील गांधारी, कुंती आणि द्रौपदी यांच्या आयुष्यातील दुःखाचा त्यांनी शोध घेतला आहे. इरावती कर्वे या समाजशास्त्रज्ञ होत्या. त्यामुळे या व्यक्तिरेखांचा शोध घेताना त्यांनी तत्कालीन समाजस्थितीबाबतचे आपले निष्कर्ष मांडलेले आहेत. एकूणच, इरावती कर्वे यांनी महाभारतावरील व्यक्तींवर लिहिताना, त्या विशिष्ट कुटुंबातील व्यक्ती-व्यक्तीचे संबंध, त्यांचे राग-लोभ, मोह-मत्सर, त्यांचे जीवन आणि जीवनसंघर्ष, त्यांचे विचार यांचा शोध घेता तत्कालीन समाजाच्या स्थितिगतीचाही वेध घेतलेला आहे. या संग्रहातील व्यक्तिचित्रे तशी साधारण स्वरूपाची आहेत कारण ती व्यक्तिचित्रलेखन म्हणून लिहिलेली नाहीत. पण महाभारतातील महत्त्वाच्या व्यक्तींचा अभ्यास इरावती कर्वे यांनी लालित्यपूर्ण भाषेमध्ये केला आहे. त्याची विद्वत्ता, संवेदनक्षमता आणि भावोत्कटता यामुळे हे व्यक्तिरेखाटन परिणामकारक झाले आहे. आणि ते त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. इरावती कर्वे यांच्या सारख्या समाजशास्त्रज्ञ आणि ललित लेखिकेने 'व्यक्तिचित्र'लेखन करून समीक्षकांचे लक्ष वेधले हे या लेखनप्रकाराच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे.

**कृ.द. दीक्षित :**

हे इंग्रजी आणि संस्कृत वाङ्मयाचे निस्सीम उपासक. त्यांनी एल.एल.बी. करून वकिली केली. पण ते त्यात फार काळ रमले नाहीत. पुढे ते आकाशवाणी केंद्रात अधिकारी म्हणून कार्यरत राहिले. त्यांनी ललित व व्यक्तिचित्र लेखन केले. 'षड्ज-गांधार'(१९६७), 'सहवास'(१९७५) हे त्यांचे व्यक्तिचित्रसंग्रह.

'षड्ज-गांधार' हा कृ.द. दीक्षितांचा सन १९६७ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या संग्रहात त्यांनी गायक-वादक व संगीतकलेच्या क्षेत्रातील व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. यामध्ये - ये हो रंग भर दे, (मास्तर कृष्णराव), मंजीखाँ यावेळी असते तर, रविशंकराचा वाद्यविलास, रसिकाग्रणी, गोविंदराव टेंबे, आमच्या सुंदराबाई, रंगीले फैयाजखाँ, उपवनिं गान कोकिळा (हिराबाई बडोदेकर), ये म्हारो राज (खाँसाहेब विलायत हुसेनखाँ), अवघाचि संसार (बालगंधर्व) इत्यादींचा समावेश आहे. या सर्वांशी आवड आणि व्यवसाय म्हणून कृ.द. दीक्षितांचा संबंध आला. गायक-वादकांशी संबंध आला, त्यांच्या कलेचा आस्वाद घेता आला. या कलाकारांच्या

आठवणींतून काही व्यक्तिचित्रे जन्माला आली. याविषयी लेखक लिहितो, ''जे गायक-वादक मी ऐकले आणि ज्यांच्या संगीतकलेच्या सावलीत मी सुखावलो त्यांच्या आठवणी मी लिहिल्या आहेत. त्यांनी दिलेल्या आनंदाची अगदी अल्पस्वल्प पावती असे हे लेख; गाण्याची टीका-टिप्पणी वा कलासमीक्षा नाही.'' लेखकाने आपल्या लेखनाचा हेतू सांगितला आहे. या लेखनामागे कोणतीही ठरावीक भूमिका नाही. निखळ मनाने कला व कलाकारांचा आस्वाद लेखक घेतो व वाचकासमोर मांडतो.

सर्वच व्यक्तिचित्रांत त्या त्या व्यक्तीचे रसिकपणाने चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. सुंदराबाई, फैयाजखाँ, हिराबाई, विलायत हुसेनखाँ, यांच्यावरील व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत. फैयाजखाँचे भारदस्त दर्शन, गंभीर आवाज, कसदार गाणे, मनमोकळा स्वभाव, तरुण मन, त्यांचे आदरातिथ्य, व्यवहारातील बेफिकिरपणा यांचे बारकाईने वर्णन केले आहे. तसेच हिराबाई बडोदेकर यांचे चित्रण एक व्यक्ती तसेच एक गायिका असे दुहेरी नात्याने आले आहे. त्यांचे वर्णन करताना लेखक लिहितो, ''पांढरे जरीचे, किमती पण सोज्वळ दिसणारे असे पातळ त्या नेसल्या होत्या. त्यांच्या दिसण्यात जी शालीनता होती ती आम्हां मुलांच्या सुद्धा लक्षात राहण्यासारखी होती. गळ्यात सोन्याचा चमचमणारा चपलाहार होता. पदर सावरून त्या बसल्या आणि श्रोत्यांना नमस्कार केला. तेव्हा सर्वात जर काही अजूनपर्यंत लक्षात असेल तर ते म्हणजे त्यांचे बोलके डोळे. त्यांच्या गाण्यातले आर्जव, त्यांच्या सुरातली अतुलनीय माधुरी, त्यांच्या बोलण्या-चालण्यातली आदब, त्यांची घरादाराच्या, कुटुंबीयांच्या काळजीची आणि आस्थेची अपूर्वाई ही सारी अलौकिक लक्षणे मला त्यांच्या करुणगम्य नेत्रात दिसली-अजूनही दिसतात. या वर्णनातून हिराबाईचे व्यक्तिमत्त्व आपणासमोर उभे राहते. हिराबाईचे रूप व गायन दोन्हीही शालीन, शांत. त्यांची कलेवरील व गुरुवरील अनन्य निष्ठा, त्यांची गायनपद्धती इत्यादींचे चित्र लेखकाने नेमकेपणाने रेखाटले आहे. विलायत हुसेनखाँ व सुंदाराबाईवरील लेखन परिपूर्ण व्यक्तिचित्र म्हणावे असे झाले आहे. ही दोन्ही उत्कृष्ट व्यक्तिचित्रे दर्जेदार आणि संपूर्णपणे व्यक्तिकेंद्र मानून नेमकेपणाने व चित्रमय पद्धतीने लिहिली गेली असून सुंदराबाईंच्या व्यक्तिचित्रांत जिवंतपणा व जिव्हाळा यांचा येणारा अनुभव अपूर्व आहे. उदा. सुंदराबाईंविषयी लेखक लिहितो, ''माझ्यापुढे एक सोज्वळ साधी, पाचवारी एकरंगी पातळ नेसलेली, चारचौघींसारखी बाई उभी होती. त्यांच्या वागण्यात, बोलण्यात, वावरण्यात एक विलक्षण मार्दव होते. विलक्षण आदब होती. 'साहेब' अशा मृदू आवाजात त्यांनी मला हाक मारली. 'आपण नवीनच आलात! पुण्याचेच का आपण?' अशा एकदोन वाक्यांत सराईतपणाने त्यांनी माझा कोंडमारा पार नाहीसा केला. आणि मी अगदी जवळचा स्नेही असल्यासारखा बोलू

लागलो.'' यातून सुंदराबाईंचा स्वभाव आणि आपलेपणाची जाणीव आपणास दिसते. रेडिओ अधिकारी व रेडिओ कलावंत हे संबंध ओलांडून लेखक व सुंदराबाईचे नाते औपचारिकतेच्या बंधनापलीकडे गेले होते. अभिजात संगीत व लावण्या यांचा जबरदस्त अभ्यास, सूर-तालावरील असामान्य प्रभुत्व, समोरच्या व्यक्तीच्या मनाचा तळ गाठण्याची हातोटी, अत्यंत हळुवार, स्नेहार्द, मायाळू मन, दुसऱ्याला त्रास होऊ न देण्याची वृत्ती, या साऱ्यांचे बारकाईने व जिवंत वर्णन दीक्षितांनी केल्याने हे एक दर्जेदार व्यक्तिचित्र झाले आहे. तसेच या संग्रहातील इतरही व्यक्तिचित्रे चांगली झाली आहेत. सर्वच व्यक्तिचित्रात जिव्हाळा व काही घटना-प्रसंगातून, मैफिलीतून चित्रमयता आल्याने ही व्यक्तिचित्रे परिणामकारक झाली आहेत. या संग्रहातून प्रकटणारे लेखकाचे सौम्य, लोभस आणि रसिक व्यक्तिमत्त्व, लेखकाच्या आवडी यांचे आढळणारे प्रतिबिंब, मनोज्ञ आहे. एक प्रौढ, अभिरुचिसंपन्न लेखन आणि एक चांगला व्यक्तिचित्रसंग्रह म्हणून 'षड्ज-गांधार'चा उल्लेख करावा लागतो.

'सहवास' हा कृ.द. दीक्षितांचा सन १९७५ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. आकाशवाणीवर नोकरी करताना ज्या व्यक्ती सहवासात आल्या त्यांपैकी काही व्यक्तींचे चित्रण यामध्ये केले आहे. ते असे - व्हिक्टर परंज्योती, मंडळी राम राम (नानासाहेब बापेकर), केवलं ज्ञानमूर्तिम् (प्रा.रा.कृ. लागू), बाँबेखाँ, झुल्फिकार बुखारी, पुलकित (पु.ल. देशपांडे) इत्यादी. यापैकी व्हिक्टर परंज्योती व बुखारी हे आकाशवाणीवरील कर्तबगार, प्रेमळ अधिकारी. दोघांची आपल्या कार्यावर जबरदस्त पकड. कामातील शिस्त, काटेकोरपणाही सारखाच. या दोघा अधिकाऱ्यांचे बाह्यवर्णन व स्वभावगुणवर्णन लेखकाने बारकाईने केले आहे. नानासाहेब बापेकरांच्या चित्रणात शांता आपटेविषयीच्या भागामुळे थोडे विषयांतर झाले आहे. हाच प्रकार प्रा.रा.कृ. लागू यांच्या चित्रणात वुडहाऊसच्या वर्णनामुळे झाला आहे. पु.ल. देशपांडे यांच्यावरील लेखन तरुण पुलंचे दर्शन घडविणारे आहे. सर्वच व्यक्तिचित्रात बाह्यवर्णन, स्वभाव, त्यांची काम करण्याची पद्धत, शिस्त, त्यांची जीवनशैली यांचे चित्रण करून व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. पण 'षड्ज-गांधार' या संग्रहातील रसिकपणा, जिव्हाळा आणि जिवंतपणा या संग्रहात जाणवत नाही. म्हणजेच षड्ज-गांधार मधील व्यक्तिचित्रांपेक्षा 'सहवास' मधील व्यक्तिचित्रे साधारण अशीच आहेत. असे असले तरी 'षड्ज-गांधार' हा व्यक्तिचित्रसंग्रहाचे लेखन करून कृ.द. दीक्षितांनी मराठी व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारात मोलाची भर घातली आहे. उत्कृष्ट व्यक्तिचित्रलेखन त्यामध्ये त्यांनी केले आहे.

**मधुकर केचे :**

हे ललित लेखक म्हणून तसेच कवी म्हणून परिचित आहेत. त्यांनी 'आखरआंगण'

(१९६७) व 'चेहरे-मोहरे' (१९६९) इ. लेखसंग्रह लिहिले. 'आखरआंगण' हा १९६२ ते ६४ या काळात नियतकालिकांतून प्रकाशित तेरा लेखांचा संग्रह आहे. लेखकाचे बालपण ज्या वर्धा-मोर्शी-अमरावती या विदर्भातील परिसरात गेले त्या परिसराशी हे लेखन निगडित आहे. त्या परिसरातील निसर्ग, माणसे, लोकजीवन आणि लोकसंस्कृती यासंबधीचा लेखकास वाटणारा जिव्हाळा, त्याचे सूक्ष्म निरीक्षण, माणसांच्या वर्णनाकडे, यांच्यातल्या विसंगतीकडे मिश्कील वृत्तीने पाहण्याची खास तऱ्हा या वैशिष्ट्यांमुळे केचे यांचे ललितलेखन वेगळे ठरते. विदर्भातल्या बोलीतील अनेक शब्द आणि ते उच्चारण्याची ढब यांचा उत्कृष्ट वापर करीत केचे संवाद आणि बोलणारी माणसे जिवंत करतात. त्यांचे ललित लेखन प्रसन्न विनोदाने ओलावले आहे.

'चेहरे-मोहरे' हा मधुकर केचे यांचा सन १९६९ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह. त्यांनी आपल्या भोवतालच्या परिवारातील काही व्यक्तींवर व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. यामध्ये अपंगशाहीचे पंतप्रधान (बाबा आमटे), बालकवी सोटे (देवीदास गंगाराम सोटे), पांढरे केस हिरवी मने (वि.द. घाटे), शेवाळकर - एक फक्त (राम शेवाळकर), जांबुवंतरावांचा दिवस (जांबुवंतराव धोटे), ग्रेस (कवी माणिक गोडघाटे), तो आज कवी (सोपानदेव चौधरी), बाजीराव (शंभर टक्के), पाटील, दोस्त : शायरी आणि शेरकार (भाऊसाहेब पाटणकर) इत्यादींचा समावेश आहे.

सर्वच व्यक्तिचित्रे वास्तवातील प्रसिद्ध व्यक्ती आहेत. बहुतेक व्यक्तिचित्रणात बाह्यरूपवर्णन, व्यक्तींच्या लकबी, त्यांची वेशभूषा यांचे वर्णन येते. केचे यांचे लेखन व्यक्तीच्या बाह्यदर्शनापेक्षा अंतरिक दर्शनाकडे अधिक वळते. वर्णनविषय व्यक्तीच्या स्वभावातील गमती-जमती निरनिराळ्या प्रसंगांतून लेखकाने सांगितल्या आहेत. व्यक्तीच्या अंतरंगाच्या वेध घेण्याचा प्रयत्न सर्वच व्यक्तिचित्रांत केलेला असला तरी बाबा आमटे व जांबुवंतराव धोटे ही व्यक्तिचित्रे अधिक उठावदार वाटतात. त्यातही 'बाबा आमटे' यांचे व्यक्तिचित्र एक उत्कृष्ट व्यक्तिचित्र झाले आहे. बाबा आमटे यांची आजारपणातील मिश्कीलता, मातीशी नाते जोडून उभारलेले त्यांचे कर्तृत्व, बाबांचे व्रतस्थ जीवन, साधेपणा, कृतीपरायणता, स्व-विचाराने संशोधन करणारी वृत्ती, जीवनातील संकटांशी झगडणारा परंतु विनयी स्वभाव यांचे अतिशय सुंदर चित्र 'अपंगशाहीचे पंतप्रधान' यामध्ये रेखाटले आहे. 'जांबुवंतरावांचा दिवस' मध्ये धोट्यांचा रोखठोक, मनमोकळा, तापट स्वभाव, धारदार वक्तृत्व, लोकासाठी स्वत:ला विसरण्याची वृत्ती व प्रामुख्याने धोट्यांची लोकप्रियता यांचे चित्रण आहे. इतर व्यक्तिचित्रांमध्ये संबंधित व्यक्तीचे स्वभावगुण, त्याचे कलागुण, त्याची विद्वत्ता, जीवनशैली इत्यादींचे

चित्रण जिव्हाळ्याने व नेमकेपणाने केले आहे.

**शिरीष पै :**

या कथाकार, कवयित्री, संपादक, व्यक्तिचित्रलेखिका म्हणून परिचित आहेत. आचार्य अत्रे यांच्या या कन्या. मुंबईत एल.एल.बी. केले. 'नवयुग' मध्ये लिखाणास सुरुवात करून त्यांनी कथालेखिका म्हणून ख्याती मिळविली. त्यांचे 'चैत्रपालवी'(१९५२), 'सुखस्वप्न'(१९५७), 'मंगलसूत्र'(१९६२), 'कांचनबहार'(१९६४), 'खडकचाफा' (१९६४), 'जुनून'(१९८२) इत्यादी १० संग्रह प्रकाशित आहेत. 'हृदयरंग'(१९७१), 'कमळपत्र'(१९८८), 'कांचनगंगा'(१९९६), 'रानपाखरे'(१९९८), 'प्रेमरोग' हे निवडक कथांचे संग्रह होत. शिरीष पै यांनी उत्कृष्ट, भावपूर्ण अशा कविता लिहिल्या आहेत. 'कस्तुरी'(१९६५), 'एका पावसाळ्यात'(१९६९), 'विराग'(१९८२), 'चंद्र मावळताना' (१९९१) असे महत्त्वाचे काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. 'हायकू'(१९८६), 'चारच ओळी'(१९९८) असे काव्यविषयक प्रयोगही त्यांनी केले. आचार्य अत्रे यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे-'पपा'(१९७१), 'वडिलांच्या सेवेशी'(१९८८), 'पपा-'तुम्ही म्हणजे तुम्हीच' असे ललित व्यक्तिचित्रणात्मक लेखन त्यांनी भरपूर केले. शिरीष पै यांचा अत्र्यांच्या 'नवयुग' साप्ताहिकाच्या संपादनात महत्त्वपूर्ण सहभाग होता. अनेक नवोदितांना त्यांनी प्रोत्साहन दिले. काही नाटके त्यांनी लिहिली. 'प्रियजन'(१९६९) हा त्यांचा व्यक्तिचित्रसंग्रह प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, चित्रलेखा यांमधून त्यांनी सदरलेखन केले.

'प्रियजन' हा शिरीष पै यांचा सन १९६९ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. या व्यक्तिचित्रलेखनाचा हेतू प्रस्तावनेत लेखिकेने स्पष्ट केला आहे. या संग्रहातील व्यक्ती बऱ्याचशा प्रसिद्ध व काही अप्रसिद्ध आहेत, पण लेखिकेच्या खाजगी परिचयातील आहेत. या संग्रहात एकूण १४ व्यक्तिचित्रे समाविष्ट केली असली तरी 'पपांना न दिलेले पत्र' हे लेखन लेखिकेचे व्यक्तिगत विचार व्यक्त करणारे आहे. तर 'माझी वरपरीक्षा' हा लेखिकेचा विवाहासमयीची माहिती देणारा ललित लेख आहे. हे दोन्ही लेख 'व्यक्तिचित्रे' नाहीत. संग्रहातील व्यक्तिचित्रे पुढीलप्रमाणे - आमचे पपा, पपा लंडनहून येतात, आई, गोकर्णीची आक्का, अम्मा, उमाकाकू, शामराव भोळे, वत्सलाक्का, मीना पेठे, दत्तू बांदेकर, मिसेस सदरलंड, मालती लागू इत्यादी.

यांपैकी बऱ्याच व्यक्ती अत्रे परिवारातील किंवा परिवाराशी संबंधित दिसतात. 'आमचे पपा' व 'पपा लंडनहून येतात' ही अत्र्यांवरील व्यक्तिचित्रे लेखिकेच्या आठवणीतून अत्र्यांचा स्वभाव व्यक्त करणारी आहेत. शिरीष पै यांनी 'आई' मधून स्वतःच्या आईचे, 'गोकर्णीची अक्का' मधून एका नातेवाईकांचे व 'अम्मा' मधून स्वतःच्या सासूचे,

‘वत्सलाक्का’तून मोठ्या नणंदेचे चित्र रेखाटताना संबंधित व्यक्तीच्या स्वभावाचा परिचय घडविला आहे. मीना पेठे व मालती लागू या लेखिकेच्या मैत्रिणींची चित्रे मोठ्या प्रेमाने लेखाटली आहेत. प्र.के. अत्रे हे ज्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले होते त्यांचे चित्रण म्हणजे ‘शामराव भोळे’ व ‘दत्तू बांदेकर’ ही व्यक्तिचित्रे. शिरीष पैं यांनी त्यांचा स्वभाव, सहवास, इत्यादीतून ही व्यक्तिचित्रे चांगली रेखाटली आहेत. या सर्व व्यक्ती परिवारातील आणि व्यक्तिचित्रसंग्रहाच्या शीर्षकाप्रमाणे ‘प्रियजन’ असल्यामुळे या चित्रांमध्ये सर्वत्र जिव्हाळा आढळतो. बहुतेक व्यक्तिचित्रे ही व्यक्तीच्या गुणांना महत्त्व देणारी असून क्वचित येणारे व्यक्तीचे बाह्यवर्णन वरवरचे आहे. सूक्ष्मत्व व चित्रमयतेचा अभाव यांमुळे व्यक्तिचित्रे पाहिजे तितकी परिणामकारक झाली नाहीत. लेखनशैली मात्र प्रवाही आहे. शिरीष पै यांनी व्यक्तिचित्रलेखन करून मराठी व्यक्तिचित्रलेखनामध्ये महत्त्वाची भर घातली आहे.

**ग.दि. माडगूळकर :**

ग.दि. माडगूळकर कवी, ‘गीतरामायण’कार, पटकथालेखक, कादंबरीकार, आत्मचरित्रलेखक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. माडगूळकरांनी अनेक चित्रपटकथा लिहिल्या. ‘रामजोशी’ या चित्रपटाची कथा, संवाद, गीते लिहिली. अभिनेते म्हणूनही तत्कालीन मराठी चित्रपटसृष्टीत त्यांचा सहभाग आहे. येथूनच पुढे पटकथालेखक व गीतकार म्हणून ते मराठी चित्रपटसृष्टीचा भक्कम आधार बनले. नोटेशनसह लिहिलेल्या गीतांचा संग्रह ‘सुगंधी वीणा’(१९४९), ‘जोगिया’(काव्य), ‘चार संगीतिका’(१९५६), रामायणावर आधारित ५६ गीतांची मालिका ‘गीतरामायण’ (१९५७), ‘काव्यकथा’(१९६२), ‘चैत्रबन’(१९६२) (चित्रपटगीते), ‘गीतगोपाळ’ (१९६७), ‘गीतसौभद्र’ ही माडगूळकरांची विविधांगी काव्यनिर्मिती.

कथा, चित्रकथा, नाटक, कादंबरी असे इतर लेखन असले तरी माडगूळकर जनमानसात रुजले ते त्यांच्या गीतलेखनामुळे. गीतकार म्हणून तांब्यानंतर माडगूळकरांचे नाव येते. प्राचीन मराठी गीतपरंपरेचा, संत-पंडित-शाहिरांच्या गीतगुणांचा समृद्ध वारसा घेऊन माडगूळकरांनी आपली गीतरचना केली आहे. चित्रपटातील पात्राच्या भावनांनुसार, कथाविषयाला खुलावट आणणारी गीते लिहिण्यात त्यांचा हातखंडा होता. गेयता, नादमधुरता आणि लयकारी तसेच मराठी भाषेतील गोडवा ही त्यांच्या गीतांची वैशिष्ट्ये. ‘उद्धवा अजब तुझे सरकार’, ‘एक धागा सुखाचा’, ‘थकले रे नंदलाला’, ‘बाई मी विकत घेतला श्याम’, ‘विठ्ठला तू वेडा कुंभार’ यांसारखी शेकडो सुंदर, सुबोध गाणी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य अंग ठरली. अध्यात्माचा उत्कट स्पर्श असलेली, मराठी मातीतील उपमा-रूपके असलेली गीते, भक्तिगीते, सवालजवाबासारख्या

ठसकेदार रचना, निर्भर शृंगाराच्या लावणीरचना, निर्व्याज भावनांनी नटलेली बालगीते 'गंगाकाठी', 'कन्याकुमारी' यांसारखी कथाकाव्ये आणि 'गीतरामायणा'सारखी प्रासादिक, भावसंपन्न, मराठी मनास निरंतर मोहिनी घालणारी रचना यामुळे 'महाराष्ट्र वाल्मीकी' हे बिरुद महाराष्ट्रातील जनतेने त्यांना मोठ्या आदाराने बहाल केले. 'मंतरलेले दिवस', 'वाटेवरल्या सावल्या', 'तीळ-तांदूळ' हे त्यांचे आत्मकथानात्मक लेखन. या लेखनात काही व्यक्तिचित्रेही येतात.

'मंतरलेले दिवस' हा ग.दि. माडगूळकरांचा सन १९६९ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. ग.दि. माडगूळकर हे मराठीतील सिद्धहस्त लेखक व कवी. अनेक साहित्यप्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले. चित्रमय वर्णनशैलीचे जन्मजात वैशिष्ट्य लाभलेल्या या लेखकाने सुंदर व्यक्तिचित्रे लिहिली नसती तरच नवल. 'दीपावली' मासिकातून माडगूळकरांनी 'जत्रेतील चित्रे' या शीर्षकाखाली काही व्यक्तिचित्रे लिहिली होती. या व्यक्तिचित्रांसह अन्य व्यक्तिचित्रांचा समावेश 'मंतरलेले दिवस' या ललित लेखसंग्रहात केला आहे. यामध्ये 'माझा यवन मित्र', 'वेडा पारिजात', 'औंधाचा राजा', 'लुळा रस्ता', 'नेम्या' इत्यादींचा समावेश आहे.

'माझा यवन मित्र' या व्यक्तिचित्रांमध्ये चित्रपट व्यवसायातील नजम नकवीनामक एका रसिक मित्राचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. नकवीची स्थूल मूर्ती, आदब करण्याची त्याची विशिष्ट पद्धत, हिंदू संस्कृतीबद्दलचा आदर, समंजस वृत्ती यांचे दर्शन या लेखात घडते. नकवीबद्दल सांगतांना लेखक लिहितो, ''थोड्या स्थूल शरीराचा, सावळ्या रंगाचा, पानाने रंगलेल्या दातांचा, डोक्यावर चष्मा लावणारा माझा यवन मित्र माझ्या डोळ्यासमोर येरझारा घालू लागला. एखादी रसाळ गोष्ट ऐकली की चष्मा काढून डोळे पुसण्याची त्याची लकब मला पुन:पुन्हा आठवू लागली. त्याचे दिलखुलास हसणे माझ्या कानांना भासू लागले. त्याने प्रेमाने मारलेल्या थापांची आठवण माझ्या पाठीला स्मरू लागली. त्याने म्हटलेले शेर माझ्या कानात पुन्हा झरू लागले.'' या वर्णनातून नजम नकवीचे व्यक्तिमत्त्व आपल्या लक्षात येते. एक मुस्लिम धर्माचा आणि एक हिंदू धर्माचा असे मित्र अंत:करणापासून जवळ आलेले होते. ते दोघेही धर्मातीत झालेले होते. माणूस म्हणून त्यांना वाटणारा एकमेकाबद्दलचा जिव्हाळा आपणास जाणवतो. नकवीचे व्यक्तिचित्र भावते. 'नेम्या' म्हणजे नेमिनाथ उपाध्ये हा लेखकाचा बालमित्र. परंतु लेखकाची निरपेक्ष भावनेने सेवा करण्यात आनंद मानणारा माणूस. नेमिनाथ थोडा विक्षिप्त, परंतु त्याची माणुसकी व प्रामाणिकपणा वाखाणण्याजोगा असा. त्याचा स्वभाव मऊ, कनवाळू. लेखकावर इतकी निष्ठा की, दोघांचे नाते एकरूप स्वरूपाचे झालेले. लेखक लिहितो, ''तो आपले घर विसरला, गाव विसरला, भाऊ विसरला,

बहीण विसरला. लग्न होऊन सासरी आलेल्या मुलीने माहेरचे पाश कटाक्षाने तोडून टाकावेत, तसे त्याने साऱ्या आप्तस्वकीयांचे पाश तोडून टाकले. जे माझे आहे त्याला तो आपले म्हणू लागला. माझ्या आई-वडिलांची चिंता करायला शिकला. माझ्या भावडांची काळजी वाहू लागला. माझ्याशी पूर्णपणे समरस झाला.'' यातून नेमिनाथच्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख आपणास होते.

'वेडा पारिजात' आणि 'लुळा रस्ता' या नावावरून कथा वाटत असल्या तरी वस्तुतः ही व्यक्तिचित्रे आहेत. 'वेडा पारिजात' मध्ये लेखकाने जनावरे व झाडेझुडपे यांच्याशी नाते जोडलेल्या आपल्या विक्षिप्त चुलत्याचे, कोडींबाचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. तर 'लुळा रस्ता' हे पुणे-मुंबई रस्त्यावर भाजी विकणाऱ्या सखू धायगुडे नावाच्या वृद्धेचे व्यक्तिचित्र आहे. अडल्या-नडल्याला मदत करणारी, समंजस, प्रामाणिक, कष्टाळू, अशिक्षित अशी ही स्त्री लेखकाने अतिशय सहजतेने व चित्रमय रीतीने रेखाटली आहे.

'औंधाचा राजा' हे या संग्रहातील औंध संस्थानचे राजे भवानराव पंडित प्रतिनिधी यांचे गाजलेले व्यक्तिचित्र होय. व्यक्तिचित्रइतिहासात उत्कृष्ट व्यक्तिचित्र म्हणून याची गणना करावी या दर्जाचे हे लेखन आहे. राजाचा चेहरा, पोषाख, शरीर, त्याचे चालणे-बोलणे, वागणे, त्याचे विचार याचे निरनिराळ्या प्रसंगांतून दर्शन घडविले असून हे चित्रण केवळ अंतर्बाह्य वर्णनावर न थांबता राजाच्या मनातील सुखदुःखे, ध्येय, प्रजेबद्दलची आपुलकी व काळजी यांचाही यशस्वी वेध घेते. उदा. लेखक लिहितो, ''राजाचा आवाज मोठा होता. त्याचे शब्द पोटात उसळत आणि मग ओठातून बाहेर पडत. त्यामुळे त्याचे बोलणे नेहमीच घसा खरवडून बोलल्यासारखे वाटे. त्यांच्या भाषणात हुकमत असे आणि आर्जवही असे. वाणीसारखीच त्याची नजरही दबदबा उत्पन्न करी आणि स्नेहाचाही वर्षाव करी. सरकारी अधिकारी त्यांचा उल्लेख 'पंतसाहेब' म्हणून करीत. त्याचे अडाणी प्रजानन त्याला म्हणत : 'पंतबाबा'. पंतबाबाचा मुक्काम तालुक्याला आला की खेड्यापाड्याच्या उत्साहालाही उधाण येई. राजाही कुणाचा उत्साहभंग करीत नसे. तो माळ्याच्या मळ्यात डाळिंबे खाण्यासाठी सहकुटुंब जाई व एखाद्या नगरशेट्याच्या हवेलीत मेजवानी घेई. मात्र, श्रीखंड चाखताचाखता जरबभरल्या आवाजात त्या शेट्याला सांगे, 'रुपयावर दोन आणे मिळवणे हा व्यापार; पण रुपयाचे दोन रुपये करणे हा अनाचार.'' या वर्णनातून पंतसाहेबाचे पारदर्शक व्यक्तिमत्त्व आपणासमोर उभे राहते. हा राजा होता, पण तो जनतेचा राजा होता. जनतेचा कैवारी होता. जनतेबद्दल आपुलकी, प्रेम असणारा, मनाने श्रीमंत असणारा हा राजा होता. तो आपल्या संस्थानातील अडाणी जनांचा 'बाबा' होता. कर्तव्य, जनतेबद्दल आदर, विद्यार्थ्यांबद्दल प्रेम आणि संस्थानाच्या मातीशी इमान राखणारा राजा ग.दि. माडगूळकरांनी अत्यंत परिणामकारकपणे

रेखाटला आहे. आदराने, जिव्हाळ्याने केलेले नेमके आणि चित्रमय वर्णन विलक्षण परिणामकारकता साधणारी कलात्मकता हे या व्यक्तिचित्राचे विशेष होत.

ग.दि. माडगूळकरांनी केवळ पाच ते सहा व्यक्तिचित्रे लिहिली आहेत, पण माडगूळकरांचे 'व्यक्तिचित्रकार' म्हणून बरेच विशेष सांगता येतील. माणसावर प्रेम करण्याची शक्ती लेखकाजवळ असल्याने प्रत्येक व्यक्तिचित्र जिवंत वाटते. प्रत्येक व्यक्तिचित्राचा घाट हा कलात्मक असून त्यात बांधेसूदपणा, नेमकेपणा आहे. ग.दि. माडगूळकरांचे निरीक्षण सूक्ष्म असून शैली साधी, सोपी, संस्कारक्षम आणि वर्णनात्मक आहे. त्यांची भाषा विलक्षण वेधक, चित्रमयी, कॅमेऱ्याने दृश्य टिपावे अशी आहे. व्यक्तीचे वर्णन करताना ते छोटी वाक्ये वापरतात, चित्रकार जसा मोजक्या रेषा वापरून चित्र साकार करतो तसे ग.दि. माडगूळकर आपल्या वर्णनविषयक व्यक्तीचे चित्र शब्दांतून रेखाटतात. त्यांच्या प्रत्येक व्यक्तिचित्रामागे काही तरी तात्त्विक सूत्र गोवलेले आढळते. या साऱ्या विशेषांचा परिपाक म्हणून त्या अनोळखी व्यक्तीदेखील वाचकाला आपल्याशा वाटू लागतात, त्यांच्याविषयी ओढ वाटू लागते आणि हेच त्या व्यक्तिचित्राचे यश आहे.

ग.दि. माडगूळकरांचे उत्कृष्ट व्यक्तिचित्रलेखन मराठी व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आणि या प्रकारास उंची देणारे आहे.

**वि.वा. शिरवाडकरः**

मराठीतील प्रसिद्ध कवी आणि नाटककार म्हणून वि.वा. शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांचा कालखंड १९१२ ते १९९९ असा आहे. त्यांनी सुरुवातीला चित्रपटाची पटकथाही लिहिली. 'स्वराज्य', 'सारथी', 'प्रभात', 'धनुर्धारी', 'नवयुग' अशा तत्कालीन वृत्तपत्रांत १९३८ ते १९४६ या काळात त्यांनी काम केले. वृत्तपत्र व्यवसायात असताना कुसुमाग्रजांचे लेखन सातत्याने सुरू होते. 'प्रतिभा', 'समीक्षा', 'साहित्य', 'ज्योत्स्ना' इत्यादी त्या काळातल्या दर्जेदार नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध होत. १९४२ साली त्यांचा 'विशाखा' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. 'समिधा'(१९४६), 'किनारा'(१९५२), 'मराठी माती' (१९६०), 'स्वगत' (१९६२), 'हिमरेषा' (१९६४), 'वादळवेल' (१९६९), 'छंदोमयी' (१९८२), 'मारवा' (१९९९) हे कवितासंग्रह. 'रसयात्रा'(१९५९) व 'प्रवासी पक्षी' (१९८९) हे त्यांच्या निवडक कवितांचे संग्रह; 'वीज म्हणाली धरतीला'(१९६६), 'नटसम्राट' (१९७१) ही त्यांची नाटके प्रसिद्ध. 'नटसम्राट' साठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आणि १९८८ साली 'ज्ञानपीठ' पारितोषिक देऊन त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला. कल्पनावैभव, उत्कटता, चिंतनशीलता,

समाजाभिमुखता आणि राष्ट्रीयता ही कुसुमाग्रजांच्या सर्वच लेखनाची वैशिष्ट्ये होत. अभिजात, प्रासादिक, चैतन्याने रसरसलेल्या त्यांच्या कवितेने मराठी मनाला बळ दिले, आधार दिला. अशा कवीचा 'विरामचिन्हे'(१९७०) हा ललितलेखसंग्रह प्रसिद्ध आहे. त्यात काही व्यक्तिचित्रे संग्रहित आहेत.

'विरामचिन्हे' हा कवी कुसुमाग्रजांचा, सन १९७० साली प्रसिद्ध झालेला ललितलेखसंग्रह होय. कुसुमाग्रज उर्फ वि.वा. शिरवाडकर यांनी स्वत:च्या जीवनातील व्यक्ती, घटना यांचे चित्रण या संग्रहात केले आहे. यामध्ये एकूण १५ लेख आहेत. त्यांपैकी 'हरवलेला', 'बादशहा', 'आदिशक्तीची एक देदीप्यमान मिरवणूक' ही तीन व्यक्तिचित्रे आहेत. 'हरवलेला' मध्ये लेखकाच्या नाना नावाच्या नातेवाईकाचे सूक्ष्म स्वभावचित्र आहे. स्वभावचित्र अशासाठी म्हटले की, लेखकाने बाह्यांगापेक्षा सूक्ष्म स्वभाववर्णनावर भर दिला आहे. नानाचे स्वभावगुण व वागणे यांचे वर्णन करताना नमुनेदार, बोलक्या प्रतिमा वापरल्याने हे लेखन बहारदार झाले आहे. 'बादशहा' हे वेळदे नावाच्या मित्राचे सूक्ष्म स्वभावचित्र आहे. वेळदे यांना कुबड असल्याने त्या व्यंगाचे चित्रण करताना या लेखनाला हृदयस्पर्शी कारुण्य लाभले आहे. त्यांचा स्वभाव, वागणे, बोलणे, त्यांचा मिस्कीलपणा वर्णिताना नर्म विनोदाची झालर लाभली आहे. 'आदिशक्तीची एक देदीप्यमान मिरवणूक' मध्ये आचार्य प्र.के. अत्रे यांचे प्रचंड कर्तृत्व व व्यक्तिमत्त्व यांचे चित्रण अत्र्यांच्या मृत्यूनंतर आलेल्या आठवणीतून उमलले आहे.

वि.वा शिरवाडकरांची या संग्रहातील व्यक्तिचित्रे थोडीच असली तरी त्यावरून शिरवाडकरांचे व्यक्तिचित्रकाराचे सामर्थ्य कळून येते. बाह्यवर्णन न करता केवळ वर्णनविषयक व्यक्तीच्या अंत:करणाचे व स्वभावाचे सूक्ष्म दर्शन घडविण्यातील त्यांची कुशलता श्रेष्ठ दर्जाची आहे. हे शिरवाडकरांचे व्यक्तिचित्रलेखन 'व्यक्तिचित्रा'च्या दृष्टीने मौलिक आहे.

**इंदुमती शेवडे :**

कथाकार, कादंबरीकार, पत्रकार, प्रवासवर्णनकार म्हणून शेवडे परिचित आहेत. यांचा कालखंड १९१७ ते १९९२ असा आहे. १९५७ ते १९६८ या काळात नागपूर आकाशवाणीत निर्मात्या म्हणून त्या कार्यरत होत्या. त्यांनी १९६८-१९७५ या काळात लोकसेवा आयोगात मराठी विभागप्रमुखपद भूषविले. मराठी लघुकथा या विषयावर पीच्.डी. 'मराठी कथा : उगम आणि विकास' या त्यांच्या मराठी लघुकथेचा संपूर्ण व सांगोपांग अभ्यास मांडणाऱ्या प्रबंधामुळे त्यांना विशेष ख्याती मिळाली. 'मिर्झा गालिब'(१९८०), 'आम्ही तो बदनाम'(१९८८), 'बाबा नावाचा झंझावात'(१९९१)

इत्यादी चरित्रात्मक कादंबऱ्या त्यांच्या नावावर जमा आहेत. पु.य. देशपांडे हा परिचयपर दीर्घ लेख असे विविध लेख प्रकाशित. तसेच 'असा प्रदेश अशी माणसे'(१९७०) हा त्यांचा कथासंग्रह होय. यामध्ये काही व्यक्तिचित्रांचा समावेश आहे.

'असा प्रदेश अशी माणसे' हा इंदुमती शेवडे यांचा, सन १९७० साली प्रसिद्ध झालेला कथासंग्रह होय. परंतु संग्रहाच्या मुखपृष्ठाच्या आतील बाजूस लेखिकेच्या साहित्याची यादी देताना या संग्रहाचा समावेश 'व्यक्तिचित्रा'त केला आहे. या संग्रहात 'वारु आत्या', 'आजोबा चुकले', 'असे होते दा', 'नकोशी' ही व्यक्तिचित्रे आहेत. 'नकोशी' हे या संग्रहातील एक चांगले व्यक्तिचित्र आहे. भिकू या उपेक्षित, एकाकी, सुखदुःखाचा विधिनिषेध नसणाऱ्या स्त्रीचे चित्रण, तिचा स्वभाव, वागणे, बोलणे इत्यादींचे चित्रण चित्रमयतेने केल्यामुळे ते लक्षणीय झाले आहे. त्यामुळे भिकूचे व्यक्तिमत्त्व आपणासमोर साकारते. 'वारुआत्या', 'आजोबा चुकले', 'असे होते दा' ही व्यक्तिचित्रे व्यक्तीपर लेखनाजवळ जाताना दिसतात. व्यक्तिचित्र म्हणून यांचे लेखन केल्याचे दिसत नाही. पण व्यक्तिकेंद्रित असल्याने ते व्यक्तिचित्राच्या जवळचे वाटते. स्वभाववर्णन, कार्य, जीवनशैली इत्यादी तपशीलाने ते रेखाटले आहे. त्यामुळे या व्यक्तिप्रधान कथा वाटतात. तरीही  इंदुमती शेवडे यांनी या पुस्तकाच्या रूपाने लेखकांचे, समीक्षकांचे लक्ष 'व्यक्तिचित्र' प्रकाराकडे वेधले आहे हे महत्त्वाचेच म्हणावे लागेल.

**विजय तेंडुलकर :**

भारतीय पातळीवरील प्रसिद्ध नाटककार, पटकथाकार व चतुरस्र लेखक, संपादक म्हणून विजय तेंडुलकर परिचित आहेत. एकांकिका, ललितनिबंध, कादंबरी इत्यादी विविध वाङ्मयप्रकारांत विपुल लेखन. साहित्य, वृत्तपत्र, आकाशवाणी, दूरदर्शन, नाटक, चित्रपट इत्यादी विविध माध्यमांचा समर्थ उपयोग त्यांनी केला. त्यांनी केलेली इंग्लिश नाटकांची भाषांतरे महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी बालनाट्येही लिहिली. भारत सरकारने सन १९८४ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' हा किताब देऊन गौरविले. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांना महत्त्वाचे भारतीय नाटककार म्हणून ख्याती लाभली. तेंडुलकरांचे सर्वाधिक भरीव व अमूल्य कार्य आहे ते रंगभूमी व नाट्यलेखनाच्या क्षेत्रातले. प्रारंभीपासूनच ते प्रयोगधर्मी नाटककार राहिले असून त्यांनी आशय व तंत्रदृष्ट्या मराठी रंगभूमीचा चेहराच बदलून टाकला. त्यांची 'श्रीमंत' (१९५५), 'माणूस नावाचे बेट' (१९५६), 'मधल्या भिंती' (१९५८), 'सरी गं सरी' (१९६४), 'एक हट्टी मुलगी' (१९६७) इत्यादी नाटके रंगभूमीवर आली. पण तेंडुलकर सर्वाधिक वादग्रस्त व सर्वख्यात ठरले ते 'शांतता! कोर्ट चालू आहे' (१९५८) या नाटकामुळे तंत्रदृष्ट्या हे नाटक लक्षणीय ठरले. त्या पाठोपाठ, 'अशी पाखरे येती' (१९७०), 'गिधाडे'

(१९७१), 'सखाराम बाईंडर' (१९७२), 'घाशीराम कोतवाल' (१९७३) ही नाटके रूढ सामाजिक संकेतांना व नाट्यसंकेताना हादरा देणारी व म्हणून वादग्रस्त ठरली. आशय व तंत्र यांच्या दृष्टीने सर्वांमध्ये विलक्षण विविधता आढळते. मानवी मनाचे व त्यातही कुरूपतेचे चित्रण करून अशा व्यक्तिरेखांना समजून घेण्यात, त्यांचे उघडे-नागडे जीवन मांडताना माणसाचे घडते-बदलते संबंध, त्यातले ताण व त्या अनुषंगाने व्यवस्थांचे बंदिस्तपण टिपण्यात तेंडुकरांना रस दिसतो. विविध विषय, विविध व्यक्तिरेखा आणि नाट्यलेखनातील प्रयोगशीलता यामुळे त्यांची आघाडीच्या भारतीय नाटककारात गणना केली जाते. त्यांनी 'रातराणी' (१९७२), 'हे सर्व कोठून येते?'(१९९२) हे ललितलेखन केले आहे. या लेखांमध्ये काही व्यक्तिचित्रांचाही समावेश आहे.

'रातराणी' हा विजय तेंडुलकर यांचा सन १९७२ साली प्रसिद्ध झालेला ललितलेखसंग्रह होय. या संग्रहामध्ये 'एका खलपुरुषाचा अंत' आणि 'चेहरा(भारतीय स्त्रीचा)' ही दोनच व्यक्तिचित्रे आहेत. या संग्रहातील लेखनाबाबत लेखक म्हणतो, ''त्या त्या घटनेसंबंधातील वा व्यक्तिसंबंधातील अथवा कलाकृतीसंबंधातील माझी मते नव्हेत, तर तिच्या संबंधातील माझी विशिष्ट वेळेची एकूण मानसिक अवस्थाच वाचकापर्यंत पोचविण्याचे हे धावते व प्रासंगिक प्रयत्न आहेत.'' या त्यांच्या मनोगताप्रमाणे त्यांच्या काही लेखनात व्यक्तिचित्रे साकार झाली आहेत. 'एका खलपुरुषाचा अंत' या लेखामध्ये किंगकाँग म्हणजे एमिल झायाचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. हा एक मशहूर पैलवान आहे. त्याची जंगी कुस्ती प्रसिद्ध असते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे तपशीलवार वर्णन लेखक करतो आणि लिहितो, ''बिनकेसांचे घट्ट लहान डोके, नक्षीदार सैल रंगीत झबल्यातून उठणारी लोंबती केसाळ छाती, भले गरगरीत पोट, भक्कम बाहू, निमुळते तरी वरचे चारशे पौंडाचे वजन लीलया पेलणारे जरा आखूड विजारीतील घट्ट पाय आणि या साऱ्याचा विचार करून कोणी चिकटवावी तशी हनुवटीशी एक आखूड काळी दाढी. चौकोनी बेढब वाटणारा एकूण बांधा मनात एक प्रकारची घृणा जागी करणारे रिंगणातले अनाकर्षक व्यक्तिमत्त्व.''' या वर्णनातून एमिल झायाचे एक अगडबंब चित्र आपणासमोर येते. तसेच त्याच्या ठिकाणी असणारा रुबाब आणि मस्ती याची जाणीव होते. किंगकाँग नावाचा हंगेरी देशाचा, देशोधडी लागून कुस्त्या खेळत फिरणारा, धंदेवाईक नरराक्षस याचे चित्रण लेखकाने केले आहे.

'चेहरा (भारतीय स्त्रीचा)' या लेखामध्ये लेखकाने 'सुलोचना' या लोकप्रिय अभिनेत्रीचे वर्णन केले आहे. त्यांच्या अभिनयाची काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्यात सुलोचनाबाईचा 'चेहरा' कसा टवटवीत, वेधक, वात्सल्य-कारुण्यादी भावनांनी ओथंबलेला आहे. शब्द ही मुळी पडद्यावरची भाषा नव्हतीच, तर त्यांचे व्यक्तिमत्त्व

खरोखरी उमटत होते, बोलत होते ते मुख्यत: त्यांच्या चेहऱ्याद्वारे असे त्यांच्या चेहऱ्याचे सामर्थ्य सांगितले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल लेखक लिहितो, ''या चेहऱ्याचे डोळे स्त्रीसुलभ मर्यादा आणि वात्सल्य बोलतात. यांचे ओठ कारुण्यातल्या दबल्या, सुप्त वेदना अतिशय संवेदनाक्षमपणे व्यक्त करतात. यांच्या गालावरची प्रसंगोपात उमटणारी खळी क्षणिक लडिवाळ प्रसन्नता देऊन जाते. यांचे नाक आणि जिवणी मूर्तिमंत कोमलतेचा प्रत्यय देतात. डोक्यावरून भरड लुगड्याचा ठिगळलेला पदर आला की हा चेहरा श्रमजीवी आणि भाबडा होतो. भरजरी शालूचा झगमगता पदर घेतला की हाच चेहरा पिढीजात राजबिंडा होतो. वृद्धपणाच्या रंगभूषेत हा अंतर्बाह्य तपस्वी वाटतो. कुशीत तान्हे अर्भक दिले की हा जगण्याविषयीच्या उत्साहाने नुसता बहरून उठतो.'' यातून सुलोचनाबाईंच्या चेहऱ्याचे सामर्थ्य आणि विविधांगी पदर आपणासमोर साकार होतात. केवळ त्यांचा चेहराच नाही तर त्यांचेसंपूर्ण व्यक्तिचित्र आपणासमोर येते. रुपेरी पडद्यावरच्या सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचे चित्रण लेखकाने 'चेहरा'मध्ये केले आहे.

'हे सर्व कोठून येते?' हा विजय तेंडुलकरांचा सन १९९२ साली प्रसिद्ध झालेला ललितलेखसंग्रह होय. या संग्रहामध्ये मुख्यमंत्री, राजकारणी, भाबडा, स्वच्छ माणूस, प्रचंड इत्यादी व्यक्तिचित्रांचा समावेश आहे. तेंडुलकर लिहितात, ''इतकी वर्षे माणसे पाहिल्यावर माणसांना लेबल चिकटवणे निरर्थक वाटते. माणसे त्याहून गुंतागुंतीची आहेत आणि ती बहुधा आपल्याला अंशत:च कळतात. आपल्याला न भेटलेले त्यांचे एक आयुष्य असते आणि म्हणून त्यांच्याविषयी निष्कर्ष शक्यतो काढू नयेत. काढलेच तर ते आपल्यापुरते समजावेत. या पुस्तकातल्या माणसांविषयी माझ्या मनात म्हणूनच आज उत्सुकतेशिवाय आणि कृतज्ञतेशिवाय दुसरे काहीहि नाही.'' तेंडुलकरांच्या दृष्टीने 'माणूस' हा महत्त्वाचा आहे. नाटकामध्ये सुद्धा तेंडुलकरांनी माणसाच्या व्यक्तिरेखेला समजून घेण्याचा, त्याचे वास्तव चित्रण, माणसाचे बदलते-घडते संबध, त्यांतील ताण टिपण्याचा प्रयत्न केला आहे. या संग्रहातील मुख्यमंत्री, राजकारणी, भाबडा, स्वच्छ माणूस ही व्यक्तिचित्रे त्यांच्या कार्यातून, स्वभावातून, वागण्यातून, बोलण्यातून तपशीलवार रेखाटली आहेत. ही व्यक्तिचित्रे कथेकडे झुकताना दिसतात. त्यांना जाणवलेल्या काही प्रसंगांतून ती व्यक्ती व्यक्त करण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे.

'प्रचंड' हे व्यक्तिचित्र उत्तम साकारले गेले आहे. यामध्ये आचार्य प्र.के. अत्रे यांच्या बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला आहे. बाह्यवर्णन न करता निरनिराळ्या प्रसंगांतून लेखकाला जाणवलेले अत्र्यांचे स्वभावविशेष चित्रित केले आहेत. उदा. लेखक लिहितो, ''मधूनच दिवसाकाठी केव्हातरी खालच्या कचेरीतल्या इंटरकॉमच्या यंत्रातून ती परिचयाची गर्जना एकदम धोधो ऐकू येऊ लागे. बैठकीपेक्षा हा शब्द, सूर

पार वेगळाच असे. त्यात थरकाप उडविणारा करडेपणा आणि उग्रपणा असे. ऐकून काही समजण्याआत प्रथम वाटे ते भय; मग इतर सर्व. बैठकीतला तो रसाळ माणूस आता कुठे भासेनासाच झाला होता. त्याऐवजी दिसे तो त्याच्याच धिप्पाड रूपाचा, चिडचिडा, रागीट 'बॉस'. कधी चिकण्या रंगीबेरंगी बुशशर्ट आणि छाकट्या स्ट्रॉ हॅटमध्ये, तर कधी पूर्ण सूट-बूट टायसह डोक्यावर कलती फेल्ट भारदस्तपणे ठेवून साहेबी चष्कीत पोट सांभाळीत चालताना.'' या वर्णनातून अत्र्यांचे करडे व्यक्तिमत्त्व आपणासमोर येते. त्यांच्याबद्दल असणारी वचक जाणवते. लेखकाने या स्वभावचित्रणातून अत्र्यांचे निर्मळ मन, संवेदनक्षम स्वभाव, अन्यायाची चीड, राजकारणावरील प्रेम, अतिशयोक्तीची आवड, अप्रतिम वक्तृत्व, मनस्वीपणा, वाचनाचे वेड अशा बहुविध पैलूंचा उत्तम परिचय होत असल्यामुळे हे एक उत्कृष्ट व्यक्तिचित्र झाले आहे.

विजय तेंडुलकरांसारख्या प्रसिद्ध नाटककाराने व्यक्तिचित्रलेखन केले आहे. ते 'माणूस' शोधणारे मोठे लेखक आहेत. त्यामुळे त्यांचे व्यक्तिचित्रलेखन मराठी व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**अनंत काणेकर :**

काणेकर हे नाटककार, एकांकिकाकार म्हणून परिचित आहेत. त्यांनी ललितलेखन केले आहे. 'निळ्या ठिणग्या' (१९७२) या त्यांचा विविध विषयांवरील लेखसंग्रहात, व्यक्तीपर लेखांचा एक भाग आहे. या भागामध्ये त्यांनी लिहिलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लक्ष्मीबाई टिळक, दत्तू बांदेकर, रा.भि. जोशी यांची व्यक्तिचित्रे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध आठवणींतून त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार केले आहे. त्यांचा स्वभाव, त्यांची राहणी, त्यांचे कार्य, स्पृश्यअस्पृश्या विषयीचे विचार, विद्वत्ता इत्यादींचे ते चित्रण आहे. लक्ष्मीबाई टिळक या लेखात लक्ष्मीबाईंच्या जन्मशताब्दी निमित्त लेखन केले आहे. या लेखनात लक्ष्मीबाईंच्या उताऱ्यांच्या वापरातून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकट केले आहे. रा.भि. जोशी यांच्यावरील लेखनात त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अभिजातपणा स्पष्ट केला आहे. दत्तू बांदेकरांवरील लेखात त्यांचा स्वभाव, दिसणे, अलिप्त वागणे, बोलणे, गरिबीतील जीवन यांचे थोडक्यात वर्णन करून व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न आहे.

अनंत काणेकर यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे साधारण स्वरूपाचीच आहेत. वर्णनातून वर्णनविषयक व्यक्तीच्या कार्याचा परिचय करून दिला आहे. असे असले तरी त्यांनी व्यक्तिचित्र रेखाटनाचा प्रयत्न केला हे महत्त्वाचे आहे.

**चि.त्र्यं. खानोलकर :**

कादंबरीकार, कवी, नाटककार म्हणून खानोलकर परिचित आहेत. प्रतीके-प्रतिमा वापरून त्यांनी आपल्या कादंबऱ्यांचा आशय समृद्ध केला आहे. 'रात्र काळी घागर

काळी', 'कोंडुरा', 'चानी', 'पाषाणपालवी', 'अजगर', 'असाही एक अश्वत्थामा' इत्यादी कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. स्वभावरेखाटन, काव्यात्मकता, गतिमान कथानक, वेगळा विषय इत्यादी त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. 'दीपमाळ' (१९७४) हा त्यांचा व्यक्तिचित्रांचा संग्रह होय.

'दीपमाळ' हा चि.त्र्यं. खानोलकरांचा सन १९७४ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. यामध्ये ४० व्यक्तिचित्रे आहेत. काही मुलखावेगळ्या माणसांचे नमुने खानोलकरांनी यात साकारले आहेत. 'कायदेशीर आबा', 'अशीच एक कमली', 'जनार्दन मुंगी', 'एक सूर्यफूल', 'एका कुत्र्याचे चरित्र', 'एक सरळ रेघ' अशी वेधक व रंजक चित्रे त्यांनी रेखाटली आहेत. बहुतेक लेखन आकाराने अतिशय छोटे आहे. आपल्या परिसरातील विक्षित व्यक्ती हुडकून विक्षिप्तपणाचाच भाग संक्षेपाने टिपला आहे. त्यामुळे कोणतेच व्यक्तिचित्र मनावर छाप उमटवीत नाही. व्यक्तिचित्रात चित्रमयतेपेक्षा स्वभावावर व तदनुरूप एक-दोन प्रसंग सांगण्यावर भर असून त्या व्यक्तीच्या विक्षिप्तपणाबाबत कोणतीही मीमांसा नाही. विविध थरांतील पण एकाच साच्यातील हे लेखन असल्यामुळे संग्रहाचे स्वरूप एकसुरी बनले आहे. चि.त्र्यं. खानोलकरांनी अफाट व गूढ वाङ्मयविश्वातील काही पात्रांचे उगम शोधण्याचा किंवा गूढ उकलण्याचा प्रयत्न यात केल्याचे जाणवते. खानविलकरांचे हे लेखन 'व्यक्तिचित्र' म्हणून साधारण स्वरूपाचेच आहे. असे असले तरी त्यांचे लेखन व्यक्तिचित्राच्या जवळ जाणारे आहे; माणसाचे विविध नमुने दाखविणारे आहे आणि म्हणून महत्त्वाचे आहे.

**रवींद्र पिंगे :**

रवींद्र पिंगे हे कथाकार, कादंबरीकार, ललित निबंधकार तसेच प्रवासवर्णन लिहिणारे म्हणून परिचित आहेत. त्यांनी भरपूर व्यक्तिचित्रलेखन केले आहे. 'परशुरामाची सावली' (१९७०) ही कादंबरी, 'आनंदाच्या दाही दिशा' (१९७८), 'आनंदव्रत' (१९९३), 'दुसरी पौर्णिमा' (१९९६) ही प्रवासवर्णने; 'शतपावली' (१९७४), 'देवाघरचा पाऊस' (१९७५), 'दिवे-लामणदिवे' (१९८४), 'तुषार आणि तारे' (१९९१), 'अंगणातलं चादणं' 'अत्तर आणि गुलाबपाणी' (१९९६), 'जिवलग सारे' इत्यादी व्यक्तिचित्रांचे संग्रह आहेत. 'पश्चिमेचे पुत्र' (१९७८), 'पिंपळपान' (१९८६), 'हिरवीगार पानं' (१९९२) ही पाश्चात्त्य साहित्याचा परिचय करून देणारी पुस्तके असे विविध स्वरूपाचे लेखन पिंगे यांनी केले आहेत. पिंगे हे सिद्धहस्त लेखक आहेत. 'ललितलेख' या वाङ्मयप्रकारात त्यांचे सुमारे २०० ललितलेख 'माणूस' या साप्ताहिकातून सतत पाच वर्षे प्रकाशित झाले. याशिवाय 'सत्यकथा', 'मौज', 'दीपावली', 'वीणा' इ. नियतकालिकांतून त्यांनी अनेक ललितलेख लिहिले. 'सकाळ', 'महाराष्ट्र टाईम्स',

'केसरी' या वृत्तपत्रांतून ललित स्वरूपाचे सदरलेखन केले. समरसून, आनंदी वृत्तीने, लहानलहान, मधुर, स्मृतीत रेंगाळणाऱ्या अनुभवांचे शैलीदार शब्दचित्र रेखाटणारे हे त्यांचे लेखन अतिशय लोकप्रिय झाले.

'शतपावली' हा रवींद्र पिंगे यांचा सन १९७४ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. यामध्ये पिंगे यांनी आपल्या परिचयातल्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींविषयी स्फुटलेखन केले आहे. 'अर्थप्राप्तीसाठी केलेले स्फुटलेखन' हा या लेखनामागील हेतू प्रस्तावनेत स्पष्ट सांगितला आहे. त्यामुळे हे लेखन व्यक्तिचित्रे म्हणून केलेले नाही हे उघड आहे. असे असूनही ज्या लेखनात व्यक्तिचित्राचे स्वरूप आढळते ते स्फुट लेखन याप्रमाणे- 'डी.जी. : एक अवलिया' हे गांधींचे चरित्रलेखक आहेत. डी.जी. तेंडुलकर यांचे विक्षिप्त वागणे, त्यांच्या आयुष्याची घडण व त्यांचा मोठेपणा चित्रित करणारे आणि अवलियापणाची नेमकी साक्ष देणारे हे सुरेख चित्र आहे. कामगार सेवा आणि दया हेच जीवन मानणाऱ्या झाब्बावालांचे वयस्क अवस्थेतील सुंदर चित्रमय दर्शन 'झाब्बावाला-एक वेडा पारशी' मधून घडविले आहे. 'प्रियोळकर'मधून प्रसिद्ध संशोधक अ.का. प्रियोळकरांच्या निस्वार्थी, निरपेक्ष, भिडस्त, ज्ञान-विज्ञान लालसा असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो. तर 'नारायण हरी आपटे'मधून आपट्यांच्या वाट्याला आलेली उपेक्षा प्रतीत होते. 'अखेर ही अशी व्हायची होती' हा चित्रकार दलाल यांच्यावरील स्फुट लेख. सतत उद्योगी, मित्रपरिवार जमविणारे, कलेतील जाणकार व मनमोकळ्या स्वभावाच्या दलालाचे चित्रण या लेखात लेखकाने केलेले आहे.

हे वृत्तपत्रीय स्फुटलेखन असूनही क्षणजीवित्वाचा शाप या लेखनाला नाही. कारण वर्णनविषयक व्यक्तीच्या नेमक्या वैशिष्ट्यांची पिंग्यांना असलेली जाण! अकारण जिव्हाळा व कृत्रिम तटस्थता या दोन्हीही बाबी रवींद्र पिंगे यांच्याजवळ नाहीत. व्यक्तीच्या भावानुभवाशी एकरूप होऊन तिचा प्रत्यय वाचकांना घडविण्यात पिंग्यांचे सामर्थ्य दिसते. कल्पकता, वर्णन व संवादकौशल्य, सहज अलंकरण हे पिंग्यांच्या भाषेचे विशेष असून लेखाची उत्सुकतापूर्ण सुरुवात आणि कलात्मक अखेर हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य आहे.

'देवाघरचा पाऊस' हा रवींद्र पिंगे यांचा सन १९७५ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. या संग्रहामध्ये वीस व्यक्तिचित्रे आहेत. या लेखनाबाबत लेखक लिहितो, 'कुठलाही कित्ता समोर न ठेवता, कारणाकारणांनी लिहिलेल्या वीस व्यक्तिशोधांचा हा संग्रह आहे. माणसांची प्रकाशणारी अंगे आतून आणि बाहेरून पाहण्याचा मी प्रयत्न केला. संभ्रमित माणसांचे खटाटोप आणि नियतीने मांडलेला हुलकावणीचा ठाम डाव हा माझ्या सततच्या अवलोकनाचा आणि कौतुकाचा विषय आहे. त्यांचे कवडसे ह्या

लेखनात जागोजाग दिसतील.'' यावरून लेखकाची व्यक्तिचित्रलेखनाची दृष्टी स्पष्ट होते. या संग्रहात, काकांची सोनेरी सायंकाळ, महंत मंगेश पाडगावकर, पारदर्शक सोनोपंत मामा, हा पुत्र शारदेचा, बबन आणि प्रिय नीलम, गडसम्राट गो.नी. दांडेकर, समर्पित आचार्य, हरहुन्नरी भोबे, तर्कतीर्थ, प्रबोधनकार ठाकरे, नटवर्य नानासाहेब, साधुमाणूस युसुफ मेहेरअल्ली, सदाप्रसन्न जयवंत दळवी, तेंडुलकरांचे विजयदर्शन, पायाशुद्ध जितेंद्र अभिषेकी, मुरब्बी दामुअण्णा, रामुभैय्या नि अरुण दाते, पार्ल्याच्या आजीचं घर, खानोलकरांचं मोकळं आकाश, वीर सावरकरांचा मुलगा इत्यादींचा समावेश आहे.

'काकांची सोनेरी सायंकाळ' हे एक चांगले व्यक्तिचित्र आहे. वृद्ध काका कालेलकरांच्या उत्तरायुष्याचे वेळी त्यांच्या जीवनाचा, गुणांचा व कार्याचा चित्रमय, मोहक व ओघवत्या शैलीत घेतलेला परामर्श म्हणजे हे व्यक्तिचित्र होय. वृद्ध काका कालेलकरांचे दर्शन घडविणाऱ्या या व्यक्तिचित्रात काकांच्या बाजेवर पडलेल्या देहापासून त्यांचे दिसणे, बोलणे, त्यांच्या भोवतालची जागा यांचे चित्रमयवर्णन केले आहे. काकांचे घर लेखकाने चित्रमयतेने रंगविले आहे. काकांचे भटकण्याचे वेड, काकांच्या लेखनातील सहजता, काकांचा वाग्विलासयांच्या वर्णनाबरोबरच काकांच्या जीवनातील विविध पैलू प्रकट करणारे त्यांचे दर्शन घडविले आहे. लेखक लिहितो, ''हा ताठ माणूस केवढ्या प्रचंड अनुभवांचा धनी झाला! प्रत्येक ठिकाणी चित्तात समर्पणबुद्धी वागवून विद्यार्थी झाला, मास्तर झाला, हिमालयातील साधक झाला, राजबंदी झाला, हिंदी प्रचारक झाला, कोकणी प्रचारक झाला, लोकसाहित्याचा संकलक झाला, आश्रमीय स्वयंसेवक झाला, पन्नास पुस्तकं गाठीशी असलेला गुजरातीतला श्रेष्ठ शैलीकार झाला, वेदान्ती झाला, अर्धी पृथ्वी पायाखाली घालणारा अट्टल पदयात्री झाला, मूलोद्योगातला मर्मज्ञ झाला, संपादक झाला, कोशकार झाला आणि आता मधुरपणे निर्मम होत चालला आहे.'' यावरून काका कालेलकरांचे समृद्ध व्यक्तिमत्त्व आपणांसमोर साकार होते. त्यांचा व्यासंग व त्यांच्या कार्याच्या खोलीची ओळख होते. असा हा नव्वदीतही जिंदगीची सोनेरी सायंकाळ जगणारा आनंदयात्री रवींद्र पिंग्यांनी चित्रमय पद्धतीने आणि जिव्हाळ्याने आपल्यासमोर साक्षात उभा केला आहे.

'पारदर्शक सोनोपंत मामा' मधून ह.भ.प. दांडेकर मामांचे सात्त्विक दर्शन घडविले आहे. लेखक लिहितो, ''सोनोपंत मामांच्या शुचिर्भूत, शांत, पारदर्शक नजरेचा आढळ अक्षरशः अन्य कुठेही झाला नाही. मामांचे डोळे म्हणजे साक्षात तृप्तीचं तळं! खरोखरच मामा फार तृप्त होते. देवाचा ध्यास त्यांना लागला होता. त्यापरता अन्य स्वर्ग त्यांच्या लेखी तुच्छ होता. अवाजवी द्रव्यार्जन त्यांना वर्ज्य होतं. गळ्यातली माळ हे त्यांचं एकमेव धन होतं. बाळबोध पेहराव, गृहस्थाश्रमी अगत्य, हाती घेतलेल्या कामात

जिवाची गुंतवणूक, शुद्ध चित्त आणि मऊ शब्द इतक्या दुर्मिळ चिजा घेऊन हा लीन म्हातारा, टारारलेली पोटं आणि झिंगलेल्या मस्तकावरल्या तिरप्या पांढऱ्या टोप्यांच्या समुद्रात अगदी लीलेने ये-जा करायचा.'' या वर्णनातून एका पारदर्शक, सात्त्विक वारकऱ्याचे दर्शन आपणास होते. साधेपणातही मोठेपणा पाहणारा हा माणूस होता. 'समर्पित आचार्य' मध्ये भिसेनामक निवृत्त शिक्षकाच्या आदिवासींच्या सेवेत खर्च केलेल्या जीवनाचा आढावा घेतला आहे. 'हा पुत्र शारदेचा' मध्ये पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध आहे. पुलंचा विनोद, सुरेख गाणं बजावणं, पुलकित करणारं अखंड बोलणं यांमुळे चौघड्यासारखा एकसारखा एकटाच बोलत सुटलेला हा माणूस लेखकाला शारदेचाच पुत्र वाटतो. पु.ल. यांच्या काही आठवणींतून रवींद्र पिंग्यांनी पुलंचे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. 'हरहुन्नरी भोबे' हे एका हरहुन्नरी व्यक्तिमत्त्वाचा परिचय घडविणारे व्यक्तिचित्र. भोबे यांचा स्वभाव, रसिकता, वागणे, बोलणे, कलागुण, पिढीजात व्यवसाय इत्यादींद्वारे त्यांचे दर्शन घडविले आहे. 'नटवर्य नानासाहेब' मधून नानासाहेब फाटकांचे गुणदोष व वृद्धावस्थेतील विकलांग स्थिती यांच्यासह सर्वांगीण चित्रण आहे. 'पायाशुद्ध जितेंद्र अभिषेकी'मध्ये जितेंद्र अभिषेकी यांची विविध रूपे आली आहेत. त्यांचा स्वभाव, त्यांचे कथालेखन, त्यांचे संगीत, कलागुण इत्यादींतून तसेच अनेक घटनाप्रसंगांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. 'मुरब्बी दामुअण्णा' मध्ये दामुअण्णा मालवणकरांचे उतारवयातील दर्शन घडते. 'तर्कतीर्थ' मध्ये लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुणदोषांसह समग्रचित्र आले आहे, तर वृद्ध केशवराव ठाकरे यांचे चित्रण 'ठाकरेबाबा' मध्ये केले आहे. 'पार्ल्याच्या आजीचं घर' हे पु.ल. देशपांड्यांच्या आजीचे आठवणीतून उभे केलेले चित्रण आहे, तर 'गडसम्राट गो.नी. दांडेकर' मध्ये गो.नी. दांडेकरांचे सात्त्विक जगणे, प्रासादिक लिहिणे व गडावर जाणे या पैलूंचे दर्शन घडविले आहे. लेखक लिहितो, ''अखंड वणवण, समाजहितैषी दृष्टी, हिंदूंच्या मूळ ग्रंथांच्या आत्म्याची ओळख, हिंदी भाषेचे सुरेख ज्ञान, पत्करलेल्या एकलेपणाची सवय आणि छत्रपतींच्या गडाबद्दल अद्वैती प्रेम, ही बोरू शाईत बुडवेपर्यंतची दांडेकरांची अस्सल भारतीय ढंगाची कमाई.'' या वर्णनातून गो.नी. दांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या जीवनशैलीची नेमकी कल्पना येते. याखेरीज जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, बबन व नीलम प्रभू, रामूभैय्या व अरुण दाते, विक्रम सावरकर यांच्यावरील लेखन येथे आहे. पण त्याचे स्वरूप मुलाखत, व्यक्तीपर लेख असे झाले आहे.

एकंदरीत, या व्यक्तिचित्रसंग्रहाचा विचार करता असे लक्षात येते की प्रास्ताविकाचे एक-दोन परिच्छेद व्यक्तीला अनुसरून शैलीदार पद्धतीने लिहिणे, नंतर व्यक्तीचे स्वरूप-विशेष प्रसंगातून किंवा लेखनाच्या अखेरीस सरळपणे सांगणे ही पिंगे यांची

व्यक्तिचित्रलेखनाची पद्धत असून व्यक्तिशोधाची भूमिका असल्यामुळे सखोल बाह्यचित्रण फारसे केलेले नाही. (अपवाद-काका कालेलकर) 'देवाघरचा पाऊस' हे संग्रहाचे शीर्षक आहे. वर्णनविषयक व्यक्तीतील दैवीपण पाहण्याचा लेखकाचा येथे प्रयत्न आहे. माणूस व नियती यांच्यातल्या संघर्षाचे कवडसे क्वचित आढळतात. काका कालेलकर, मंगेश पाडगावकर, सोनोपंत दांडेकर, पु.ल. देशपांडे, भोबे, नानासाहेब फाटक, लक्ष्मणशास्त्री जोशी अशा ठळक व्यक्तिचित्रांमधून केवळ व्यक्तिशोध आढळतो. अन्यत्र, जलद व्यक्तिपरिचय घडविण्याकडे लेखकाची वृत्ती अधिक आढळते.

'तुषार आणि तारे' हा रवींद्र पिंगे यांचा व्यक्तिचित्रांचा संग्रह सन १९९१ साली प्रसिद्ध झाला. यामध्ये त्यांनी रेखाटलेली पंचवीस व्यक्तिचित्रे आहेत. त्यामध्ये किशोरी अमोणकरांचा गूढ-रम्य प्रवास, मंगेश पाडगावकरांचं प्रफुल्ल जग, वि.पु. आणि श्री.पु., बी. रघुनाथांचं पुढे काय झालं? असे हे गडकरी, मी आणि श्री.के. क्षी, स्वाध्यायमग्न पं. पुरुषोत्तमशास्त्री फडके, मित्र पुंडलिक, लेखनात रमलेले मनोहर मालगावकर, वाङ्मयसेवक गं.दे. खानोलकर, मधु मंगेशाची हनुमानउडी!, नजरेआडचा वनफुलासारखा कवी, दत्ता भटांचा अखेरचा प्रवास, राजा बढे : एक राजा माणूस, शांताराम बापू : एक भिन्न स्वर, साहित्यभक्त ढवळे, 'सोबत'कार बेहेरे, पं. कृष्णराव शंकर पंडित यांच्या घरी, शाहीर खाडिलकारांचा अस्त, अरुण जोगळेकर : एक आनंदी अभिनेता, भीमराव घाईघाईत गेले, डॉ. भगवंतराव सामंताचं अफाट काम, डॉ. काशिनाथ घाणेकरांच्या साखरगप्पा, चंद्रास्त, हरींद्रनाथ : एक वेल्हाळ आजोबा इत्यादींचा समावेश आहे. या व त्यांच्या इतर व्यक्तिचित्रलेखनाबद्दल रवींद्र पिंगे लिहितात, ''ह्या संग्रहातले लेख जमेस धरता, मी लिहिलेल्या शंभर व्यक्तिरेखा माझ्या पाच संग्रहात आता आल्या आहेत. एकाच लेखनप्रकारातलं शंभर पाकळ्यांचं कमळ मी साहित्यशारदेच्या चरणी वाहू शकलो, ह्याचं समाधान वाटतं. साहित्यसेवक, शास्त्री पंडित, गायक, अभिनेते, चित्रपटनिर्माते, प्रकाशक, पोवाडेवाले अशा अनेकविध मंडळींबद्दल मी आस्वादकाच्या भूमिकेतून लिहिलं, तोच माझा स्वधर्म आहे. ओरबाडणं, भुंकणं वगैरे मला सुचत नाही. महाराष्ट्रतल्या शंभर व्यक्तींशी माझा जवळून संबंध आला हे भाग्यच म्हणायचं.'' यातून पिंगे यांचे व्यक्तिचित्रलेखनामागील भूमिका आणि 'व्यक्तिचित्रा'बद्दलची आपुलकी, आदरभाव व्यक्त होतो.

या संग्रहामध्ये दत्ता भट, शांताराम बापू, अरुण जोगळेकर, काशिनाथ घाणेकर या कलावंतांची व्यक्तिचित्रे समाविष्ट आहेत. पिंगे या व्यक्तिचित्रांतून कलावंताशी असलेले मैत्रीपूर्ण नाते उलगडतात. त्यांचे खाजगी जीवन, त्यातील अनुभव, आठवणी, किस्से, कलावंतांच्या स्वभावाचे विविध पैलू, सवयी, लकबी, यांचे दर्शन या व्यक्तिचित्रांतून घडते. पिंगेंनी लिहिलेल्या नाट्य-सिनेकलावंताच्या व्यक्तिचित्रातून त्यांचे कलावंतांशी

असलेल्या व्यक्तिगत स्नेहाचे दर्शन होते. कलावंतांच्या गुणाबरोबरच त्यांच्या दोषांचे वर्णन पिंगे यांनी परखडपणे केले आहे.

या संग्रहात मंगेश पाडगावकर, वि.पु. आणि श्री.पु., बी. रघुनाथ, गडकरी, श्री.के. क्षीरसागर, विद्याधर पुंडलिक, मनोहर मालगावकर, ग.दे. खानोलकर, मधु मंगेश कर्णिक, ढवळे, बेहेरे, भीमराव कुलकर्णी इत्यादी साहित्यिक-लेखक-समीक्षक यांची व्यक्तिचित्रे आहेत. त्या त्या लेखकाच्या लेखनाचे व स्वभावाचे विविध पैलू, त्याचे जीवन, आठवणी, अनुभव, घटना-प्रसंग, त्यांचे गुणदोष इत्यादींच्या वर्णनातून व्यक्तिचित्र साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच किशोरी आमोणकर व पं. कृष्णराव पंडित या गायक-संगीतकारांचे व्यक्तिचित्र लिहून त्यांची व्यक्तिमत्त्वे उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. गायन व त्यावरील त्यांची निष्ठा यांचे वर्णन केलेले आहे. थोडक्यात, रवींद्र पिंगे हे मराठीतील प्रसिद्ध व्यक्तिचित्रकार आहेत.

आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्यांनी व्यक्तिचित्रलेखनाचा हेतू स्पष्ट केला आहे. कमीत कमी शब्दांत व्यक्तिचित्रे त्यांनी साकार केली आहेत. चित्रमयता व जिव्हाळा हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. लालित्यपूर्ण भाषेने त्यांनी व्यक्तिचित्रणात गोडवा आणला आहे. ते व्यक्तीच्या बाह्यवर्णनापेक्षा तिच्या मनाचा शोध घेताना दिसतात. रवींद्र पिंगे यांचे व्यक्तिचित्रलेखन अनेक गुणवैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिचित्र वाचकास भावते. विपुल व हेतूपूर्वक व्यक्तिचित्रलेखन करून रवींद्र पिंगे यांनी लेखकांचे, साहित्यिकांचे, समीक्षकांचे, अभ्यासकांचे लक्ष 'व्यक्तिचित्र'लेखनाकडे वेधले आहे. आणि व्यक्तिचित्र-वाङ्मयप्रकारामध्ये अत्यंत मोलाची भर घातली आहे. एकाच लेखनप्रकारामध्ये एवढे विपुल लेखन करणारे रवींद्र पिंगे हे एकमेव लेखक आणि व्यक्तिचित्रकार आहेत.

**पु.भा. भावे :**

भावे हे नवकथाकार म्हणून परिचित आहेत. कथा, कादंबरी, नाटक अशा विविध वाङ्मयप्रकारांमध्ये त्यांनी लेखन केले आहे. नव्याजुन्याच्या चौकटीत न बसता भावे यांनी आपल्या विशिष्ट अशा स्व-तंत्रानेच वैपुल्याने कथालेखन केले. भावे काहीसे परंपरावादी व सनातनी असले तरी त्यांनी आपल्या समर्थ लेखणीने उत्तमोत्तम कथा मराठीस दिल्या आहेत. कल्पनेचा झपाटा व कमालीची वेगवान भाषाशैली हे भावे यांच्या लेखणीचे दोन विशेष होत. अमूर्त वस्तूचे मूर्तिमंत व प्रत्ययकारी वर्णन भावे समर्थपणे करतात. 'मुद्रा'(१९७४) हा त्यांचा व्यक्तिचित्रसंग्रह आहे. या संग्रहात एकूण ११ व्यक्तिचित्रे असून त्यात मित्रवर्य अंतरकर, गोविंदा, सिंहहृदयी मुंजे, बाबूराव नावाचे झुंबर, शेवटचा दिवा विझला, हरिभाऊ माटे, देवाजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, हसणे

विसरलेला माणूस इत्यादींचा समावेश आहे.

यापैकी अंतरकर, गो.रा. दोडके, मुंजे, बाबूराव पेंढारकर, यशवंतराव चव्हाण, ग.दि.माडगूळकर, खापर्डे, बाबूराव देशमुख, मोटे व सावरकर या प्रसिद्ध व्यक्ती तर देवाजी वाघोड आणि हसणे विसरलेला भैय्या जोशी या अप्रसिद्ध व्यक्ती आहेत. बहुतेक लेखनाची आकर्षक सुरुवात झाल्यानंतर व्यक्तीचे बाह्यदर्शन, व्यक्तिविषयी आठवणी, व्यक्तीचे स्वभाव-गुणदर्शन, क्वचित मूल्यमापन व आकर्षक शेवट असे या लेखनाचे स्वरूप आहे. लेखक हिंदुत्ववादी असल्याने हिंदुनिष्ठ व्यक्तींकडे त्याचा ओढा अधिक आहे. भारून जाणे हा लेखकाचा गुणधर्म असून प्रामाणिकपणाची चाड व ढोंगीपणाची चीड त्याच्या लेखनात दिसते. बाह्यवर्णनात फारशी सूक्ष्मता नसली तरी वर्णनवियषक व्यक्तिबद्दलच्या जिव्हाळ्यामुळे लेखन जिवंत झाले आहे. याला अपवाद यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिचित्र. कारण यशवंतरावांविषयी सांगण्यासारखे लेखकाजवळ काही नाही. केवळ पानिपताची धूळ चव्हाणांनी माथी लावली म्हणून त्यांच्याबद्दल लेखकाला आपुलकी वाटली व त्यातून हे लेखन झाले आहे.

बहुतेक राजकीय व्यक्ती या लेखकाचे आदर्श आहेत. ज्यावेळी लेखक आपल्या मित्रपरिवाराकडे, परिचयातील व्यक्तीकडे येतो त्यावेळी वर्णनविषयक व्यक्तीशी असलेले त्याचे खरेखुरे नाते समजून येते. त्यादृष्टीने भैय्या जोशींवरील लेखन वैशिष्ट्यपूर्ण झाले आहे. भैय्या जोशी हा लेखकाच्या शाळेतील मित्र. त्याच्या मृत्यूनंतर लेखकाने हे लेखन केले आहे. खळाळून, सर्वांगाने धबधब्यासारखा हसणारा हा माणूस. हसताना त्याच्या शरीराची होणारी अवस्था लेखकाने वर्णिली आहे. त्यावेळी मित्रांच्या गाल, केस, पोट, डोळे यांत होणारे बदल लेखक सांगतो. मन:पूर्वक, मोकळेपणाने हसणे हा भैय्याचा स्वभाव आहे. भैय्याचा पोषाख गबाळा असे. शरीराचे दुखणे आणि आर्थिक परिस्थिती यामुळे हा माणूस जिकीरीला आला आणि हसणे विसरला. भावनिक पातळीवर हे लेखन झाल्यामुळे हे व्यक्तिचित्र हृदयस्पर्शी वाटते. हे एक चांगले व्यक्तिचित्र झाले आहे.

पु.भा. भावे हे एक शैलीदार लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या वैशिष्ट्याचे दर्शन 'मुद्रा' मध्ये होते. भाषेची वैशिष्ट्यपूर्ण योजना, व्यक्तीसंबंधी सुंदर विशेषणांचा वापर. उदा - सिंहहृदयी तसेच झुंबर, भूल इत्यादी खास शब्दांचा वापर या संग्रहात आढळतो. पूर्वी कधी वापरला न गेलेला पत्रात्मक पद्धतीचा बाज लेखकाने वापरला आहे. भावे यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे चांगली झाली आहेत. एका मातब्बर कथालेखकाने व्यक्तिचित्रलेखनाकडे वाचकांचे लक्ष वेधल्याने व्यक्तिचित्रलेखनाचे महत्त्व वाढले आहे.

**उद्धव शेळके :**

उद्धव शेळके हे मराठीतील प्रसिद्ध कादंबरीकार म्हणून परिचित आहेत. त्यांनी 'असे

हे, असे हे', 'अनौरस', 'लेडिज होस्टेल', 'धग' (१९६०) इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. तसेच त्यांनी 'कडुनिबांची सावली' (१९७५) हा व्यक्तिचित्रसंग्रह लिहिला. वास्तव जीवनाचे दर्शन हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य दिसते.

'कडुनिंबाची सावली' हा उद्धव शेळके यांचा सन १९७५ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रसंग्रह होय. लेखकाच्या आयुष्यात येऊन गेलेल्या काही अप्रसिद्ध व्यक्तींची चित्रे यात आली आहेत. परंतु निखळ व्यक्तिचित्रे म्हणावीत असे लेखन म्हणजे बाई, मुंबईचा मारोती, भोळाराम, बाबा, नागोरा ड्रायव्हर, एकमेव मित्र, असा हा नाना, एक प्रभावी व्यक्तिमत्त्व ही व्यक्तिचित्रे होत. अन्य लेखनापैकी चवदार भाबी व मामा ताम्रपट या व्यक्तिप्रधान कथा वाटतात. बाई, भोलाराम, बाबा, नागोराव, नाना या व्यक्तिचित्रांत संबंधित व्यक्तीचे बाह्यवर्णन बऱ्यापैकी आले असले तरी या व्यक्तिचित्रांसह इतर व्यक्तिचित्रांतून त्या त्या व्यक्तीचे जे अंतरंगदर्शन घडते तेथे लेखक कमी पडताना दिसतो. कारण त्याचा भर व्यक्तीचे आंतरिक व्यक्तिमत्त्व शोधण्यापेक्षा किंवा ज्ञात आंतरिक व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देण्यापेक्षा त्या व्यक्तीच्या व्यक्तिगत तसेच बाह्य परिस्थितीचीबाबत माहिती देण्यावर अधिक भर आहे. वर्णनविषयक व्यक्तीचे गुणदोष लेखकाने सांगितले आहेत. यादृष्टीने व्यक्तिचित्रे पाहिजे तेवढी परिणामकारक वाटत नाहीत. पण लेखकाने वर्णनातून वास्तव जीवनाचे दर्शन देण्याचा जो प्रयत्न केला तो महत्त्वाचा वाटतो.

**शिवाजी सावंत :**

सावंत हे कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा कालखंड १९४० ते २००२ असा आहे. पुण्यात राज्य सरकारच्या शिक्षण खात्याच्या 'लोकशिक्षण' मासिकाचे त्यांनी सहा वर्षे संपादन केले. पुढे केवळ लेखनास वाहून घेतले. सावंतांची 'मृत्युंजय' (१९६७) ही कादंबरी त्यांच्या लेखनकर्तृत्वाचे शिखर आहे. महाभारतातील कर्णाच्या व्यक्तिमत्त्वावर आधारलेली ही कादंबरी प्रचंड लोकप्रिय ठरली. तिच्या वीस आवृत्त्या निघून हजारो प्रती विकल्या गेल्या. 'मृत्युजंय'चे नाट्यरूपांतरही (१९७५) अत्यंत यशस्वी ठरले. ते सतत बारा वर्षे रंगभूमीवर सादर केले गेले. या कादंबरीची कन्नड, गुजराती, मल्याळी, बंगाली, राजस्थानी व हिंदीमध्ये भाषांतरे झाली व ती लोकप्रिय ठरली. चरित्रात्मक कादंबरीलेखन हे सावंतांचे आवडते क्षेत्र आहे. त्यांनी 'छावा' (१९७९), 'लढत'(१९८५), 'संघर्ष'(१९९५) इत्यादी चरित्रात्मक कादंबऱ्या. 'अशी मने असे नमुने'(१९७५), 'मोरावळा' ही व्यक्तिचित्रे व 'शेलका साज', 'कांचनकण' हे ललित लेखन केले. 'युगंधर' ही त्यांची श्रीकृष्णचरित्रावरील प्रदीर्घ कादंबरी २००० साली प्रकाशित झाली. 'युगंधर - एक चिंतन' हे पुस्तक प्रसिद्ध. भारतीय ज्ञानपीठाचा

मूर्तिदेवी पुरस्कार, पूनमचंद भुतोडिया हा बंगाली पुरस्कार, कोल्हापूरभूषण, पुणे विद्यापीठाचा जीवनगौरव इत्यादी अनेक सन्मान त्यांना लाभले. १९९० मध्ये साहित्याच्या नोबेल पारितोषिकासाठी नामांकन झाले होते.

'अशी मने अशी नमुने' हा शिवाजी सावंत यांचा सन १९७५ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. या संग्रहामध्ये एकूण १४ व्यक्तिचित्रे आहेत. त्यामध्ये कांत्या, गणपा, संतू, तुकारामबापू, तातू, टी.डी., सुदबू, तोतरा दत्तू, नारायण पावणा, मामू, शंकऱ्या, काका गवंडळकर, खडकावरची म्हातारी, पाचवा सावंत इत्यादींचा समावेश आहे. या व्यक्तिचित्रांविषयी सांगताना लेखक लिहितो, 'ही लाल मातीत वाढलेली नमुनेदार अशी घाटोळी मने आहेत. कोणत्याच अमुक एका जीवनवादावर ती दावा सांगू इच्छित नाहीत. बस्स, ती अशी जगली एवढंच त्यांचे म्हणणं. मी काहीही लिहिलं तरी माझ्यावरच्या प्रेमापोटी ते आवर्जून वाचावं असा त्यांचा निकोप गावठी प्रेम आहे.'' यातून लेखकाचा व्यक्तिचित्रलेखनाचा दृष्टिकोन लक्षात येतो.

'कांत्या' मध्ये लेखकाने आपला बालमित्र श्रीकांत याचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. त्याचा स्वभाव, त्याचे दारिद्र्य, त्याच्या मनाचा मोकळेपणा, त्याच्या बापाचे दारिद्र्य, गावाने खुळा ठरविलेला पण लेखकाचा मित्र, जातीनं ब्राह्मण पण अस्पृश्यता न मानणारा, विनोदी वृत्ती इत्यादींतून कांत्याचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. अशा कांत्याला लेखक त्याचा खुळा सुदामा मानतो. यातून लेखकाचा जिव्हाळा दिसून येतो. कांत्याच्या वेशभूषेविषयी व त्यांच्या जगण्याविषयी लेखक लिहितो, ''कांत्या... आईबापानी नि साऱ्या गावकऱ्यांनी अर्धवट- छे..., खुळा मानलेला कांत्या! उंच, शिडशिडीत, पेन्सिलीसारखी लांबट बोटं असलेला! नाक आणि कमरेवरची घसरणारी पँट एकदमच वर ओढणारा! केसाची वारेमाप वाढलेली झावळं आपलीच आहेत हे मान्य करायला कधीही तयार नसलेला! त्याचे केस केव्हा वाढले हे त्याला जसं कधी कळलं नाही, तसा तो माझ्या बालपणाच्या पाटीत कसा घुसला हे मलाही कधी समजलं नाही! दुसऱ्याला समजावं असं कांत्यानं कधीच काही केलं नाही. किंबहुना समजण्यासारखं काही करायचं असतं हेच त्याला मान्य नव्हतं!'' या वर्णनावरून कांत्याचा जीवनविषयक दृष्टिकोन आणि त्याच्या जगण्याचा स्वच्छंदीपणा आपल्या लक्षात येतो. शिवाजी सावंतांनी जिव्हाळ्याने हे व्यक्तिचित्र रेखाटल्याने ते परिणामकारक झाले आहे. त्याच्या सहवासातील घटना, प्रसंग यांतून हे व्यक्तिचित्र साकारले आहे.

'खडकावरची म्हातारी' हे व्यक्तिचित्र लेखकाने चांगले रेखाटले आहे. लेखकाच्या गावापासून दीडएक मैलावर 'रामतीर्थ' नावाचे एक नयनरम्य स्थान आहे. हिरण्यकेशीचा धबधबा तिथे अखंड कोसळत असतो. तिथल्या एका टेकडीवजा उंचवट्यावर, खडकावर

राहणाऱ्या म्हातारीचे चित्रण लेखकाने या व्यक्तिचित्रातून केले आहे. तिचा स्वभाव, धबधबा पाहण्यासाठी आलेल्यांची व पोहणाऱ्यांसाठीची काळजी, तहानेल्याला पाणी देणे, तिचं कुणबाऊ काळीज, तिची गावरान माया इत्यादी वर्णनातून म्हातारीचे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. तिचे वर्णन करताना लेखक लिहितो, ''समोर तिला आम्ही 'मामी' म्हणत असू, पण तिच्याबद्दल कुणाला काही सांगायचं झालं की तिचा उल्लेख आम्ही 'खडकावरची म्हातारी' असाच करायचो. आजही मला तिचं नाव माहीत नाही. मी बघत आलो तशी ही म्हातारी जशीच्या तशी होती. जोंधळ्याच्या शेताच्या बांधावर चांगली दोन-तीन वर्षे टिकून राहिलेल्या तुरकाटीसारखी शिडशिडीत, गोंदल्या हाताची, कपाळी आडव्या कुंकवाची बोटे घेतलेली, सुताडी लुगडं नेसणारी, डोकीवरच्या चुंबळेवर सदा एक पाटी असलेली. पान खाणारी (पण जिला पिंक-पिचकारी टाकताना मी कधीच पाहिले नाही) अशी.'' या वर्णनावरून खडकावरच्या म्हातारीचे व्यक्तिचित्र आपणासमोर येते. सर्वांना जीव लावणारी ही म्हातारी मनाने मात्र तरुण वाटते.

प्रस्तुत संग्रहात इतर जी व्यक्तिचित्रे आहेत, ती रेखाटताना लेखकाने त्यांचा स्वभाव, त्यांचे बाह्यवर्णन, त्यांच्या जीवनातील काही घटना-प्रसंग, त्यांचे वागणे, बोलणे, काही आठवणी, त्यांच्या जगण्याची रीत इत्यादी वर्णनातून त्यांचे व्यक्तिमत्त्व व त्यांची वेशभूषा साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. 'तातू' या व्यक्तिचित्रात गवळ्याच्या एका बाईचे चित्रण करताना लेखक लिहितो, ''पत्थरी काळ्या रंगाची, सडसडीत उभार नाकाची आणि टपटपीत डोळ्याची. काहीच न बोलणारी, विधवा. तिच्या कपाळावरचे, कधीकाळचे गोंदलेले हिरवे व्रण कळकले नाहीत! गेली वीस वर्षे तातू आपल्या पंधरा-वीस म्हशींच्या तांड्यात त्यातलीच एक थोराड, जाणती म्हैस म्हणून जगते आहे - एकटी! म्हशी बदलल्या आहेत. जुन्या जाऊन नव्या आल्या आहेत. तातू बदललेली नाही. ती जुनी झालेली नाही. नवी होण्याची तिची इच्छाच नाही.'' यातून तातूची वेशभूषा व तिची जगण्याची रीत, जनावरामध्ये जनावर म्हणून राहण्याची तिला झालेली सवय आणि त्यामध्ये तिला वाटणारा आनंद आपणास जाणवतो.

शिवाजी सावंत हे सिद्धहस्त लेखक आहेत. त्यांची भाषा लालित्यपूर्ण आहे. लाल मातीतील ही घाटोळी माणसाची रंगीत मने त्यांनी आत्मीयतेने, जिव्हाळ्याने चितारली आहेत. त्यामुळे ती परिणामकारक झाली आहेत. काही ठिकाणी चित्रमयता आली आहे. सावंतांनी व्यक्तिचित्रांसोबत छायाचित्रेही दिलेली आहेत. ती छायाचित्रे पाहिली की आपणास त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची दृश्यकल्पना येते. त्या व्यक्तीच्या जगण्याची धडपड लक्षात येते. शिवाजी सावंतांनी व्यक्तिचित्रे चांगली लिहिली आहेत. ती सामान्य जीवन जगणारी आहेत पण नमुनेदार आहेत. अशी व्यक्तिचित्रे लिहून शिवाजी सावंतांनी

मराठी व्यक्तिचित्र वाड्मयप्रकारात मोलाची भर घातली आहे.

**विद्याधर पुंडलिक :**

कथाकार, एकांकिकाकार, नाटककार, व्यक्तिचित्रकार, समीक्षक, समाजशास्त्र अभ्यासक म्हणून विद्याधर पुंडलिक परिचित आहेत. त्यांचा कालखंड १९२४ ते १९८९ असा आहे. त्यांनी उत्तमोत्तम कथा लिहिल्या. प्रांतीय किंवा राजकीय-सामाजिक आशयाच्या सरधोपट वळणाने जाण्याऐवजी पुंडलिकांनी वेगळे, अनोखे जीवनानुभव कथेत आणले. त्यांनी काही दीर्घ कथाही लिहिल्या. 'पोपटी चौकट' (१९६२), 'टेकडीवरचे पीस' (१९६९), 'देवचाफा' (१९७९), 'माळ' (१९८०), 'फॅन्टॅसिया' (१९९४) हे कथासंग्रह. 'माता द्रौपदी', 'चार्वाक', 'कुणीकडून कोणाकडे'(२०००), 'श्रद्धा'(२०००) ही त्यांची प्रकाशित नाटके. 'चार्वाक' या ऐतिहासिक व्यक्तिरेखेने पुंडलिकांना 'चार्वाक' या नाटकाची प्रेरणा दिली. 'आवडलेली माणसं'(१९७६) हा त्यांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचा संग्रह. 'शाश्वताचे रंग'(१९८६) हे समीक्षात्मक लेखन पुडलिकांच्या व्यक्तीमत्त्वाचे अनेक पैलू स्पष्ट करतो. व्यक्तीचा व ग्रंथाचा वेध घेताना पुंडलिकांच्या मनात अनेक संदर्भ जागे होतात. त्यांची अभ्यासू वृत्ती, व्यासंग, अननुभूत प्रदेशाकडे धाव घेण्याचा स्वभाव, चिंतनशीलता व प्रगल्भता त्यांच्या कथा-नाटकादि ललितकृतींप्रमाणेच त्यांच्या ललितेतर लेखनातूनही प्रतिबिंबित होते. कथालेखनाच्या, नाट्यलेखनाच्या क्षेत्रात स्वतःची वेगळी वाट शोधणारा लेखक म्हणून विद्याधर पुंडलिकांचे नाव महत्त्वाचे ठरते.

'आवडलेली माणसं' हा विद्याधर पुंडलिक यांचा सन १९७६ साली प्रकाशित झालेला व्यक्तिचित्राचा संग्रह होय. या संग्रहामध्ये त्यांनी पु.ग. सहस्रबुद्धे, इरावती कर्वे, शेजवलकर, अनंत काणेकर, साने गुरुजी इत्यादी अकरा व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. विद्याधर पुंडलिक हे एक चांगले कथाकार असल्यामुळे त्यांनी चांगले व्यक्तिचित्र रेखाटन केलेले आहे. या संग्रहातील व्यक्तींचा स्वभाव, त्यांच्या आठवणी, काही घटनाप्रसंगांतून त्यांना जाणवलेले संदर्भ, त्या व्यक्तींचा वेगळेपणा, साहित्यिक जाणीव, त्यांचे व्यक्तिमत्त्व इत्यादी वर्णनातून त्यांनी व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. 'इरावती कर्वे' यांना मरणही शांत, सुंदर आले असे पुंडलिकांना वाटते. ते लिहितात, ''त्या गेल्या तेव्हा त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी मी गेलो होतो. त्यांना पाहिल्यावर मला जाणवले की मरणाचा अचानक पडलेला घाव त्यांच्या सौंदर्याने शांतपणाने घेतला आहे. डोळे मिटले होते पण वर्ण तसाच लखलखीत होता. अस्तित्व गेल्याची पुसटशी खूणसुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर नव्हती.'' या वर्णनातून इरावती कर्वे यांचे व्यक्तिमत्त्व सुंदर होतेच, त्या जीवनही चांगल्या जगल्या पण मृत्यूनंतरही त्यांचे सौंदर्य अबाधित राहिल्याची जाणीव

पुंडलिकांना झालेली आहे. त्यांच्या सौंदर्याप्रमाणेच त्यांची बुद्धीही तितकीच तल्लख होती. त्या विदुषि होत्या. एक प्रकारचा आत्मविश्वास त्यांच्या रूपाने वावरत होता.

'साने गुरुजी' यांच्या व्यक्तिचित्रामध्ये त्यांचे मातृहृदयी जीवन, त्यांचे जगणे, विद्यार्थीप्रेम इत्यादी अनेक आठवणी सांगितल्या आहेत. पण साने गुरुजींनी प्राणघातक गोळ्या घेऊन आपले जीवन संपवले. या घटनेबद्दल पुंडलिक यांनी त्यांच्यावरील लेखात त्यांना जाब विचारला आहे की, ''हे श्याम असे मृत्यूच्या कुशीत शिरताना तुला तुझ्या आईची ती ओवी कशी ऐकू आली नाही? आईची शिकवण तुला कशी आठवली नाही?'' साने गुरुजींची आईवर अपार भक्ती होती. आई म्हणजे गुरू, कल्पतरू, मित्र, सौख्याचा सागर सर्व काही होते. अशा आईचा मुलगा इतक्या कमकुवत मनाचा का निघावा याचे कोडे पुंडलिकांना उलगडत नाही.

विद्याधर पुंडलिकांनी 'आवडलेली माणसे' या संग्रहामध्ये चांगली व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. या ग्रंथाच्या नावाप्रमाणे त्यांना आवडलेली, भावलेली, जवळची वाटणारी माणसे त्यांनी शब्दबद्ध केली आहेत. त्यातून त्यांची व्यक्तिमत्त्वे उभी केली आहेत. लालित्यपूर्ण भाषेतून, त्यांच्या आठवणी त्यातून आठविणारे संदर्भ देत ते व्यक्तिचित्र सजीव करतात. त्या व्यक्तीबद्दलचा जिव्हाळा, प्रेम त्यांना आहे हे त्यांच्या या लेखनातून जाणवते. विद्याधर पुंडलिकांनी व्यक्तिचित्रलेखन करून मराठी व्यक्तिचित्रलेखनात महत्त्वाची भर घातली आहे हे निश्चित.

**रेखा देशपांडे :**

रेखा देशपांडे यांनी लिहिलेल्या सिने-कलावंतांच्या व्यक्तिचित्रांचा संग्रह 'रुपेरी' हा सन १९८३ साली प्रसिद्ध झाला. या संग्रहात दहा व्यक्तिचित्रे आहेत कमाल अमरोही -मिजाज आशिकता, तलत मेहमूद, मवाळ हळवे सूर..., नौशाद : अभी राजे - दिल मे तराने बहुत है!, सोहराब मोदी : सिंहगर्जना, केदार शर्मा : किंग मेकर क्वीन मेकर, नलिनी जयवंत - एक घरेलू ग्लॅमर गर्ल, मा. भगवान - आठवणी मास्टरपणाच्या, के. वैकुंठ-पाडपडिल्ला पोर ते डायरेक्टर, देविकाराणी - राजयोगिनी, अशोककुमार-एक गप्पीष्ट लाजाळू. रेखा देशपांडे यांनी या सर्व सिनेकलावंताच्या सिनेजगतातील घडामोडी, अभिनय, भूमिकांचे जगणे, त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध, त्यांच्या महत्त्वाच्या आठवणी याबद्दल रंजकतेने लिहिलेले आहे. त्यातून त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. 'सोहराब मोदी' या कलावंताबद्दल लिहिताना देशपांडे लिहितात,''साहेबराव मोदी म्हणजेच मुळी संवादाची फटकेबाजी. पल्लेदार संवादाची जोरकस फेक. त्यातून त्यांच्या चित्रपटांचे विषय इतिहासातून निवडलेले, ऐतिहासिक कल्पनांतून सजवलेले, ध्येयवादी पात्रांनी पेललेले असे. कथाविषयांना

साजेशीच संवादाची भाषा आणि त्या संवादाची स्तंभित करून टाकणारी फेक असे. साहेबराव मोदीची काळाबरोबर विकसित होत गेलेल्या, नव्या तंत्राच्या दृष्टिकोनातून आज मोदीच्या संवादाची, संवादफेकीची ती शैली नाटकी, स्टेजी-वाटते, आणि तरीही, 'कालाय तस्मै नम:' म्हणायला लावणाऱ्या टीकेत तथ्य असूनही हिंदी चित्रपट क्षेत्रातले एक 'शैलीकार' म्हणून साहेबराव मोदींचे, त्यांच्या संवादपद्धतीचे स्थान अजून जसेच्या तसे आहे. संवादातून कमीत-कमी आणि व्हिज्युअल्समधून जास्तीत जास्त बोलण्याचा प्रयत्न करणाऱ्या नव्या तंत्राच्या पाईकांनीही ते स्थान आदराने जपले आहे.'' साहेबराव मोदींच्या या वर्णनातून आपणास त्यांच्या संवादशैलीची व व्यक्तिमत्त्वाची वेगळीच जाण येते. सिंहगर्जनेप्रमाणे संवादाची फेक करणारा कलावंत म्हणून मोदींचे चित्रण लेखिकेने केले आहे.

रेखा देशपांडे यांनी 'रुपेरी' मध्ये कलावंतांच्या आठवणींतून, प्रसंगांतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाना उजाळा दिला आहे. लालित्यपूर्ण भाषेत झिळमिळता रुपेरी अनुभव त्यांनी या व्यक्तिचित्ररेखाटनातून व्यक्त केला आहे.

**वि.भा. देशपांडे :**

वि.भा. देशपांडे हे एक प्रसिद्ध नाट्यसमीक्षक आहेत. देशपांडे यांना अनेक रंगकर्मींचा सहवास लाभलेला आहे. अनेकांशी त्यांचे मैत्रीचे, जिव्हाळ्याचे नाते आहे. परंतु व्यक्तिचित्र लिहिताना मात्र वि.भा. देशपांडे यांनी कलावंताच्या व्यक्तिगत जीवनाविषयी कोठेही लिहिलेले नाही. फक्त त्यांच्या नाट्यक्षेत्रातील कर्तृत्वाचे अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे. त्यांच्या 'नाट्यरंग', 'नाट्यस्पंदने', 'नाटकीय वेध' या संग्रहांतून राम गणेश गडकरी, प्र.के. अत्रे, वि.वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, रत्नाकर मतकरी, पु.ल. देशपांडे, पुरुषोत्तम दारव्हेकर हे नाटककार, डॉ. श्रीराम लागू, शदर तळवळकर, यशवंत दत्त, नाना पाटेकर, अमोल पालेकर, दिलीप प्रभावळकर, प्रभाकर पणशीकर, अरुण सरनाईक, काशिनाथ घाणेकर हे अभिनेते, तसेच सुलभा देशपांडे, भारती आचरेकर, लालन सारंग, आशा काळे, ज्योती चांदेकर, भक्ती बर्वे या अभिनेत्री आदींची व्यक्तिचित्रे संग्रहित केली आहेत.

या सर्व व्यक्तिचित्रांतून त्या त्या व्यक्तीच्या नाट्य-क्षेत्रातील कर्तृत्वाचा आलेख तर येतोच पण शिवाय त्याबरोबर गेल्या ५० वर्षांतील नाट्य इतिहास आलेला आहे. नाट्यविषयक घडामोडींचे दर्शन यातून झालेले आहे. तसेच नाट्यविषयक माहितीही आली आहे. काशिनाथ घाणेकर यांचा 'रायगडाला जेव्हा जाग येते' मधला 'संभाजी', दिलीप प्रभावळकर यांचा 'चिमणराव', श्रीराम लागू यांचा 'नटसम्राट' मधील 'गणपतराव बेलवलकर, भक्ती बर्वे यांची 'फुलराणी', नाना पाटेकर यांचा 'पुरुष' मधला 'गुलाबराव',

प्रभाकर पणशीकर यांची 'तो मी नव्हेच' मधली पंचरंगी भूमिका, सुलभा देशपांडे यांची 'बेणारे' ही चित्रे दिसतात. या संदर्भात वि.भा. देशपांडे लिहितात, ''या भूमिका या नटांनी अविस्मरणीय करून ठेवल्या आहेत. त्या भूमिकेवर त्यांचा ठसा उमटलेला आहे. या भूमिका दुसऱ्या कुणी केल्या तरी प्रेक्षकया नटांना विसरले नसतात.'' नाटककारांची निर्मितिप्रक्रिया, त्यांच्या नाट्यलेखनामागच्या प्रेरणा यांचे विवेचन देशपांडे यांनी केलेले आहे. उदा. वसंत कानेटकर यांच्यावरील व्यक्तिचित्रातून त्यांना 'हिमालयाची सावली' या नाटकाचे बीज कसे गवसले ते कळते. रत्नाकर मतकरी यांच्या व्यक्तिचित्रातून त्यांच्या 'लोककथा ७८' या नाटकाच्या निर्मितीची प्रक्रिया कळते.

नाटक लिहिताना विशिष्ट व्यक्ती नाटककारांच्या डोळ्यांसमोर असते का याचा शोध देशपांडे यांनी घेतला आहे. अमोल पालेकर, श्रीराम लागू, प्रभाकर पणशीकर, यशवंत दत्त, नाना पाटेकर, दत्ता भट, भक्ती बर्वे, सुहास जोशी, सुलभा देशपांडे, भारती आचरेकर यांनी साकार केलेल्या भूमिकांचे मूल्यमापन लेखकाने अतिशय साक्षेपाने केलेले आहे. नटवर्य नानासाहेब फाटक यांच्यामधील अभ्यासू नट, दत्ता भट यांचे भेदक डोळे, आत्माराम भेंडे यांचा मुद्राभिनय, अरुण सरनाईक यांचा खालच्या पट्टीतला परिणामकारक आवाज हे अभिनयातील बारकावे स्पष्ट केलेले आहेत. 'पु.ल. एक रंगमंचीय अनुभवणे आहे' या एकाच वाक्यातून त्यांनी पुलंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दर्शविले आहेत. 'रायगडाला जेव्हा जाग येते' मधील शंभूराजे, 'गारंबीचा बापू' मधील बापू, 'अश्रूंची झाली फुले' मधील लाल्या या सर्व भूमिकांमध्ये घाणेकरांचे दिसणे, असणे, वागणे, बोलणे आणि जगणे सगळेच कसे वेगळे आणि विलोभनीय होते हे नेमकेपणाने लेखकाने शब्दबद्ध केले आहे.

वि.भा.देशपांडे यांनी व्यक्तिचित्रण नाट्यसमीक्षेच्या अंगाने केलेले आहे. व्यक्तीचे वर्णन करताना त्यांच्यातील समीक्षक जागा होतो आणि त्यांनी कोणत्या नाटकात कोणत्या भूमिका केल्या, कशा केल्या, कशा साकारल्या याचे वर्णन येते. त्यामुळे गेल्या पन्नास वर्षांतील नाट्येतिहास लिहिताना ही व्यक्तिचित्रे निश्चितच उपयुक्त ठरतील. वि.भा. देशपांडे यांनी नाट्यक्षेत्रातील कलावंतांची व्यक्तिचित्रे रेखाटून मराठी व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारात मोलाची भर घातली आहे. नाट्यक्षेत्रातील व्यक्तीची व्यक्तिचित्रे फार कमी प्रमाणात लिहिली जातात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिचित्ररेखाटनाला महत्त्वाचे स्थान आहे.

**ज्योती दाते :**

ज्योती दाते यांचा 'वेध व्यक्तिमत्त्वांचा' हा व्यक्तिचित्रसंग्रह सन १९८९ साली प्रसिद्ध झाला. यामध्ये त्यांनी त्यांच्या आजूबाजूला वावरणाऱ्या असामान्य व्यक्तिमत्त्वाची,

कलावंतांची, गायकांची २५ व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. त्यामध्ये - अपूर्व सूर सोनाली वायपेयी, एक वृद्ध बालक - हरेन्द्रनाथ चटोपाध्याय, कथ्थक नृत्य विलासिनी - रोहिणी भाटे, एकसष्ठीच्या उंबरठ्यावर - बेगम शोभा गुर्टू, संगीत - विनोद यांची साक्षात मैफिल-कल्याणजी आनंदजी, जीवघेणी दर्दभरी तान - रेशमा, यशस्वी पटकथेचे हुकमी तंत्र -सलीम जावेद, पंजाबी ढंगाचे अस्सल सौंदर्य - के. महावीर, लेडी झाकिर - तबलापटू अनुराधा पाल, सारा नशिबाचा खेळ - कामिनी भाटिया, माझा विनोद लाखो सामान्य जनांसाठी - जगदीप, लवचिक शरीराचा जावेद - जावेद जाफरी, एका अफवेचा बळी -जगदीपपुत्र जावेद जाफरी, नृत्याभिनयाची जुगलबंदी - चारुशीला साबळे वाच्छानी ; अवखळ, अल्लड, फटकळ - भारती आचरेकर, पेच पल्लवीचा - पल्लवी जोशी, संगीतातील सूरबहार - साधना सरगम, छायालेखनातील भावेप्रयोग - डॉ. सुरेश भावे, आव्हानांच्या शोधात - अविनाश वारदेकर, रसना क्षितिजावरील मराठी तारा - राहुल लिमये, प्रिन्सेस वाईनच्या निर्मात्या - अचला जोशी, कर्तबगार महिला - मालती तांबे - वैद्य, फाइव्हस्टार व्यक्तित्व - रमोला महाजनी, व्यावसायिक वेषभूषाकार - मीना नाईक, आमच्या (सासू) बाई - माणिकबाई दाते, एक अदम्य सेनानी - माझे बाबा - वसंत वरखेडकर इत्यादींचा समावेश आहे.

या सर्व व्यक्तिचित्रांमधून लेखिकेने त्या त्या व्यक्तीतल्या असामान्य गुणांचा, असामान्य कलांचा धांडोळा घेत त्यांच्या नजरेत भरलेल्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतला आहे. ही व्यक्तिचित्रे परिचयांच्या व कौतुकाच्या भावनेतून लिहिली गेली आहेत. तशी ही सर्व व्यक्तिचित्रे लहान स्वरूपाचीच आहेत. मुद्देसूद रूपाने कलावंतांच्या व्यक्तिमत्त्वाची काही गुणवैशिष्ट्ये लेखिकेने सांगितली आहेत. म्हणून व्यक्तिचित्रे लिहिताना लेखिकेने त्या व्यक्तिचित्राच्या नावासमोर विशेषणे लावली आहेत. त्यातून त्या व्यक्तीच्या कलागुणांची नेमकी जाणीव आपणास होते. त्या व्यक्तीची थोडक्यात ओळख करून देऊन तिच्या गुणाचाच परिचय व कौतुक लेखिका करताना दिसते. सोनाली वाजपेयी या बाल गायिकेविषयी लिहिताना लेखिका म्हणते, ''सोनाली सगळ्या प्रकारची गाणी म्हणते. शास्त्रीय संगीतातील निरनिराळे राग, ताना, पलटे आत्मसात करून, कल्याणजींच्या पेटीच्या साथीवर सुरांच्या वेलांट्या मारीत ती सुंदर स्वरचित्र उमटवीत राहते. कधी आशा भोसले यांनी गायलेले सिनेमातील गीत, कधी लता मंगेशकर यांचे भजन, कधी गुलाम अलीची ठुमरी तर कधी मेंहदी हसनची गझल. गंमत म्हणून अगदी कर्नाटक संगीतसुद्धा सोनाली गात असते. पण जे सूर, जे शब्द तिच्या गळ्यातून उमटतात ते सगळ्या बारकाव्यांनी परिपूर्ण तर असतातच, पण मूळ गाण्याइतकेच भावनेने देखील ओथंबून बाहेर पडतात. या वर्णनातून दहा वर्षांची चिमुरडी सोनाली वाजपेयी हिचा

अपूर्व सूर लक्षात येतो. तिचे शास्त्रीय संगीत, भजन, चित्रपटगीत, गझल, कर्नाटकी संगीत इत्यादी सर्व क्षेत्रांतील प्रभुत्व आणि गाण्याइतकेच भावनेतून ओथंबून बाहेर पडणारे स्वर यांची कल्पना येते आणि तिचे व्यक्तिचित्र उठावदार व परिणामकारक होते.

'बेगम शोभा गुर्टू' यांचे व्यक्तिचित्रही चांगले रेखाटले आहे. त्या एक प्रसिद्ध गायिका आहेत. शोभा गुर्टूचा स्वर म्हणजे मूर्तिमंत नजाकत. ज्या सुराला वार्धक्य कधीच स्पर्श करू शकणार नाही असा चिरंतन तारुण्याचं वरदान लाभलेला सूर अशा शोभाताई विषयी दाते लिहितात, 'शोभाताईंच्या गाण्याप्रमाणेच त्यांच्या साध्या साध्या बोलण्यातही नजाकत भरली आहे. त्यांचा स्वर जसा एका जागी ठरत नाही तशी वाणीदेखील कधी एक भाषेवर स्थिरावत नाही. कधी उर्दूमिश्रित हिंदी, कधी लडिवाळ मराठी तर कधी गोव्याच्या लाघवी कोकणी भाषेत त्या सांधे बदलत राहतात. त्यांचा चेहरा विलक्षण बोलका आहे आणि नृत्य हाडीमासी खिळलं आहे. छोटे-छोटे किस्से सांगतानासुद्धा त्यांच्या चेहऱ्यावरील बदलत्या भावछटा व नेत्रविभ्रम बघणे व त्यातला सारखा डोकावणारा मिस्कीलपणा अनुभवणे म्हणजे अदा करून म्हटलेली ठुमरी ऐकण्यासारखाच अलौकिक आनंदानुभव.'' या वर्णनातून शोभाताई गुर्टू यांचे दर्शन होते आणि त्यांचे वेगळे व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर येते. अशा प्रसिद्ध गायिका शोभाताई प्रेमळ स्वभावाच्या. पहाडी सौंदर्याचा आवाज, जुन्या-नव्याचा सुंदर मिलाफ, दुसऱ्याची नक्कल करण्यात वाकबगार, त्यांच्या आवाजावर, गाण्यावर त्यांच्या गुरूंच्या मुसलमानी ढंगाचा गहिरा प्रभाव. इत्यादी वर्णनातून शोभाताई गुर्टूंचे व्यक्तिचित्र प्रभावी झाले आहे.

ज्योती दाते यांनी सर्वच व्यक्तिचित्रांतून व्यक्तींचा अल्प परिचय देत, त्यांचे संगीत, त्यांचा रियाज, आवाज, स्वर, प्रेमळ स्वभाव, विनयशीलता इत्यादींद्वारे व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. ही व्यक्तिचित्रे मराठीतील व्यक्तिचित्रलेखनाच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरावीत.

**रामकृष्ण बाक्रे :**

रामकृष्ण धोंडो बाक्रे उर्फ तात्या बाक्रे हे मुंबईच्या सांस्कृतिक विश्वातले एक नामवंत व्यक्तिमत्त्व आहे. 'लोकमान्य,' 'लोकमित्र', 'समाचार भारती', 'नवशक्ती' आणि 'नवाकाळ' यांच्या माध्यमातून त्यांची पत्रकारिता संपन्न झाली. त्यांच्या स्फुट लेखनाला अभिजात शैलीचा स्पर्श आहे. एक मर्मज्ञ संगीत समीक्षक आणि विदग्ध रसिक म्हणून त्यांची योग्यता मोठी आहे. त्यांच्या उपस्थितीने संगीताच्या मैफिलींना वजन प्राप्त होत असे आणि संगीतप्रेमींच्या विश्रब्ध बैठकींना एक निराळाच रंग चढे. त्यांचे लेखन काय आणि संभाषण काय, दोहोंना ताल असतो, तोल असतो आणि त्यांचे संस्कारित मन औचित्याचा विवेक कधी सोडत नाही. संगीत क्षेत्रातील बुजुर्गांची चित्रे काढणारा हा

कुशल चितारी आहे.

'बुजुर्ग' हा रामकृष्ण बाक्रे यांचा सन १९९० साली प्रसिद्ध झालेला, संगीत क्षेत्रातील व्यक्तींवरील शब्दबद्ध चित्रांचा संग्रह होय. या संग्रहात दहा व्यक्तिचित्रे आहेत. त्यामध्ये अक्षरकीर्ती राजा, अक्षरकीर्ती गायक, अल्लादियाखाँ, सारेच शापित, गानतपस्विनी अंजनीबाई मालपेकर, खांसाहेब भूर्जीखाँ, मोगूबाईचे मतलबी टीकाकार, प. शरच्चंद्र आरोळकर, भ्रमणयोगी पंडित निवृतिबुवा, पं. जगन्नाथबुवा : पुरोहित की प्रेषित, हे तो स्वप्नीचे धन इत्यादींचा समावेश आहे. या पुस्तकाविषयी बाक्रे लिहितात, ''पहिलं ख्यालाचं विद्यापीठ इचलकरंजीचं-बाळकृष्णबुवाचं. दुसरं कोल्हापूरचं-संगीतसम्राट अल्लादियाखां, भूर्जीखां याचं, तिसरं अंजनीबाई मालपेकरांचं, ग्रामदैवत म्हणून पंढरपूरचे पं. नारायणराव थिटे यांचं, ज्यांनी अनेक गाजते शिष्य आणि गाजत्या बंदिशी निर्माण केल्या त्या पं. जगन्नाथबुवांचं'' अशी संगीत विद्यापीठांची एक सरळ रेषा आखून बुजुर्गांची निवड केली आहे. यावरून असे लक्षात येते की, या संग्रहातील बुजुर्गांची, संगीत जाणकारांची निवड जाणीवपूर्वक केलेली आहे. रामकृष्ण बाक्रे यांनी आपल्या मनोगतामध्ये 'बुजुर्ग' लिहिण्यामागची प्रेरणा कथन करुन पुस्तकाचे अंतरंग उलगडून दाखविले आहे.

या सर्व व्यक्तिचित्रांमध्ये बाक्रे यांनी एकेका बुजुर्गाचे बालपण, गानविद्या मिळविण्यासाठी त्याने घेतलेले परिश्रम, त्याचे आप्तेष्ट, मैफिलीमध्ये त्याला साथ करणारे साथीदार, ज्यांनी आश्रय दिला ते इचलकरंजीकर, शाहू महाराज यांसारखे संस्थानिक, त्याने बांधलेल्या बंदिशी, त्याचा वृद्धपकाळ आणि मृत्यू या सर्व बाबतीत रामकृष्ण बाक्रे यांनी इतक्या बारकाव्याने लिहिले आहे की, आपल्या डोळ्यासमोर ते सर्व बुजुर्ग उभे राहतात. त्यांच्याबद्दलच्या आख्यायिका, त्यांनी आपल्या शिष्यांबरोबर अथवा मित्रांसमवेत केलेले वार्तालाप हे देखील ग्रंथकर्त्याने एखाद्या सिद्धहस्त कादंबरीकाराच्या शैलीने रंगविले आहेत. विशेष म्हणजे ते नुसते रंजक नाहीत तर उद्‌बोधक आहेत. उदा. पं. शरदचंद्र आरोळकर या व्यक्तिचित्रात आरोळकर यांनी ख्याल गायकीबद्दल लेखकापाशी केलेला खुलासा. ते म्हणतात, ''पहिला गायनप्रकार ही ख्याल गायनातील सर्वात खालची पायरी असून ख्याल 'पेश' करणं सर्वात वरची पायरी होय. वास्तविक 'राग' हे 'आसन' असून ख्याल ही 'अवस्था' आहे,'' एवढं सूत्रही सबंध ख्याल गायकीवर प्रकाश टाकू शकेल. ध्रुपदधमारातील भाववादित्व कमी झालं तेव्हा शोध घेता घेता ख्याल गायकी गवसली. अभिजात संगीताची अतिशय परिणत अशी ती अवस्था आहे. बंदिशीमधील शब्द, तिची धून आणि तिचा ठेका या तिहींचा ख्याल गायकीत समन्वय झालेला असतो. या वर्णनातून वाचकाला नवा प्रकाश किंवा शास्त्रीय संगीताविषयी नवी

जाण लाभल्यासारखे वाटते.

अल्लादियाखाँ, भूर्जीखाँ अशा बुजुर्गांबद्दल लिहिताना आपल्या सहजप्राप्त गाण्याने भल्याभल्यांना स्तिमित करणाऱ्या तानीबाईसारखीचा उल्लेख ते टाळीत नाहीत आणि खाँसाहेब अल्लादियाखाँ, भुर्जीखाँ यांच्याप्रमाणेच अंजनीबाई मालपेकर आणि जगन्नाथबुवा यांच्या संगीत क्षेत्रातील अमोल कामगिरीबद्दलही ते सारख्याच रसिकतेने लिहितात. या बुजुर्गांविषयी ना.ग. गोरे लिहितात, ''ग्रंथकर्त्याने निरनिराळ्या बुजुर्गांच्या गाण्यातील जे बारकावे सांगितले आहेत त्यांचा आस्वाद घेण्यासाठी संगीतातील मुरलेलाच मनुष्य हवा. पु.ल. देशपांड्यांच्या भाषेत 'कानसेन हवा' एवढी माझी पात्रता नाही. तरीदेखील आपल्याकडेही नव्या बंदिशी बांधणारे आणि नवे राग निर्माण करणारे गायक होऊन गेले हे वाचल्यानंतर अंगावर उगीचंच मूठभर मांस चढल्यासारखे वाटले. कारण आपल्याकडे 'कंपोजर' नाहीत असे जे म्हटले जाते ते त्यामुळे खोटे ठरते. आपल्या संगीत क्षेत्रात अभिजात संगीताची किती मोठी परंपरा हे लक्षात येऊन या कलावंतांबद्दलचा आपल्या मनातील आदरभाव वाढतो.''

रामकृष्ण बाक्रे हे सांस्कृतिक विश्वातले एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि संगीत समीक्षक व रसिक असल्यामुळे या संग्रहातील व्यक्तिचित्रे संगीत क्षेत्रातील नवीन माहितीच्या दृष्टीने फारच चांगली आणि महत्त्वाची आहेत. या व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये बुजुर्गांची रेखाचित्रे त्या त्या व्यक्तिचित्रासमवेत दिलेली असल्यामुळे त्या लेखांची श्रीमंती निश्चितच वाढली आहे. लेखकाने हा व्यक्तिचित्रसंग्रह एस.एम. जोशी या त्यांच्या गुरूंना अर्पण केला आहे. बाक्रे यांनी हा ग्रंथ खूप प्रेमाने आणि मेहनतीने लिहिला आहे. त्यांच्या या व्यक्तिचित्रसंग्रहामुळे, फारशी कोणाला ठाऊक नसलेली संगीत क्षेत्रातील मोठी कलावंत मंडळी लोकांच्या, अभ्यासकांच्या माहितीची झाली आहेत. अशी उद्‌बोधन करणारी व्यक्तिचित्रे लिहून रामकृष्ण बाक्रे यांनी व्यक्तिचित्रलेखनात निश्चितच मोलाची भर घातलेली आहे.

**भा.र. साबडे :**

साबडे हे उद्योजक संघटनेमध्ये सचिव म्हणून कार्यरत होते. पुण्याची 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' ही जिद्दी उद्योजकांची संघटना. या संस्थेत १९६० ते १९९५ पर्यंत पस्तीस वर्षे भा.र. साबडे यांनी सचिव म्हणून काम केले. या प्रदीर्घ काळात चेंबरमुळे लेखकाला अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या उद्योजकांबरोबर जवळून काम करता आले. या उद्योजकांबरोबर वैयक्तिक जवळीकीचे, आपुलकीचे व अनौपचारिक संबंध ठेवता आले. या सर्वांची व्यक्तिचित्रे त्यांनी वेळोवेळी लिहिलेली अशी आहेत. यातील बरीच व्यक्तिचित्रे चेंबरच्या 'संपदा' या मासिकातून प्रसिद्ध झाली आहेत. या

सर्वांचे मिळून, सन १९९१ मध्ये 'मोठी माणसं' या नावाने पुस्तक प्रसिद्ध झाले.

'मोठी माणसं' हा भा.र. साबडे यांचा सन १९९१ साली प्रसिद्ध झालेला, उद्योजकांच्या व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. उद्योग म्हणजे साहस. मोठे उद्योग म्हणजे मोठे साहस. मनात जिद्द, अमर्याद कष्ट करण्याची कुवत, धोका व जबाबदारी पत्करण्याची तयारी आणि चाणाक्षपणा असल्याखेरीज ही साहसे यशस्वी होत नाहीत. साहस पत्करून उद्योग जगतामध्ये नामांकित पावलेल्या उद्योजकांची ही व्यक्तिचित्रे आहेत. यामध्ये एक सभ्य, सुसंस्कृत नि संपन्न व्यक्तिमत्त्व - जे.आर.डी. टाटा, एक राजा माणूस - शंतनुराव किर्लोस्कर, असे होते आमचे भटसाहेब, मराठी माणसाला स्वाभिमान देणारे उद्योगपती - आबासाहेब गरवारे, एक कणखर नि खंबीर व्यक्तिमत्त्व - दामुअण्णा पोतदार, महत्त्वाकांक्षेला किनारा नसलेला उद्योजक - डॉ. नीलकंठ कल्याणी, स्वप्न पहिल्या क्रमांकाचे - राहुल बजाज, एक देशभक्त कारखानदार - नवलभाऊ फिरोदिया, एक कर्तबगार नि दिलदार उद्योगपती - चंद्रकांत किर्लोस्कर, वाहनउद्योगातील अग्रेसर उद्योजक - एच.के. फिरोदिया, जगमित्र उदयसिंगराव गायकवाड, एक प्रखर बुद्धिवादी माणूस - प्रा. वि.म. दांडेकर, एक नि:स्वार्थी नि निरलस कार्यकर्ता - बाबूभाई राठी, एक सेवाव्रती कारखानदार - श्री वि.म. देवल इत्यादी चौदा व्यक्तिचित्रांचा समावेश आहे. या व्यक्तिचित्रांविषयी लेखक लिहितो, ''या सर्वांची ही व्यक्तिचित्रे आहेत. त्यांची ही चरित्रे नव्हेत. मला ते कसे दिसले तसे त्यांचे व्यक्तिचित्रण करण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्यातून त्यांचे लोकोत्तर कर्तृत्वही दिसावे असाही प्रयत्न आहे. यामधून लेखकास उद्योजकांचे कर्तृत्त्व, आदर्श समाजासमोर ठेवायचे आहेत.''

या संग्रहातील 'प्रा.वि.म. दांडेकर' आणि माजी खासदार 'उदयसिंगराव गायकवाड' ही व्यक्तिचित्रे उद्योगांच्या व्याख्येत बसणारी नाहीत. लेखकांची त्यांचाशी असणारी जवळीक आणि आदर त्यामुळे ही दोन व्यक्तिचित्रे या पुस्तकात समाविष्ट केलेली आहेत. बाकीची बहुतांशी व्यक्तिचित्रे उद्योजकांची आहेत. या उद्योजकांची व्यक्तिचित्रे लिहिताना लेखकाने, या उद्योजकांची बाळपणापासून झालेली जडणघडण, त्यांची प्रेरणास्थाने, त्यांनी घेतलेले शिक्षण, घरातून मिळालेला वारसा, प्रोत्साहन, कष्टाची तयारी, परदेशातून शिकून घेतलेले नवे तंत्रज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, कामगारांशी असलेला संबंध यांचा आलेख रेखाटलेला आहे. कष्ट, ध्येय, आकांक्षा, जिद्द, संकटावर मात, अचूक निर्णयक्षमता, दूरदृष्टी या गुणांच्या बळावर या उद्योजकांनी यश खेचून आणलेले आहे आणि देशाच्या औद्योगिक विकासास मोठा हातभार लावलेला आहे.

या सर्वच उद्योजकांच्या व्यक्तिचित्रांतून दिसून येते की, महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास वरील सर्व उद्योजकांनी हातभार लावला आहे. या क्षेत्राचा पूर्ण अभ्यास

त्यांनी केलेला जाणवतो. अडचणीचे संधीत रूपांतर केल्याचे दिसून येते. मोठी स्वप्ने सातत्याने या व्यक्तींनी पाहिलेली आहेत. उद्योग हा त्यांच्या जगण्याचा गाभा होता; हे दिसून येते. या व्यक्तिचित्रांतून अनेक तरुणांना स्फूर्ती मिळू शकते. महाराष्ट्राचे उद्योगविश्व यांतून समोर येते. भा.र. साबडे लिहितात, ''सामान्यांचे असामान्यांशी काय नाते असते? काहीच नसते? त्यांच्यापासून येणारा एखादा स्फूर्तीचा किरण, कर्तृत्वाचा एखादा कवडसा आमच्यासारख्यांना पुरेसा होतो आणि भुईसपाट जगणे जगणाऱ्यांना तेवढाच वेळ आकाशात झेपावल्यासारखे वाटते.'' या उद्योजकांच्या कार्यातून मिळणारी स्फूर्ती किती महत्त्वाची असते हे लेखकाला सांगावयाचे आहे.

भा.र. साबडे यांनी मराठी व्यक्तिचित्र वाङ्मयामध्ये अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या उद्योजकांच्या व्यक्तिचित्रांची भर घालून ते समृद्ध केले आहे आणि ही बाब व्यक्तिचित्राच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

**य.दि. फडके :**

महाराष्ट्राच्या आधुनिक कालखंडाचे इतिहासकार, चरित्रलेखक, विचारवंत म्हणून य.दि. फडके प्रसिद्ध आहेत. य.दि. फडके यांची स्वतंत्र व संपादित अशी एकूण ६२ पुस्तके प्रकाशित असून त्यांपैकी ९ पुस्तके इंग्रजीत आहेत. त्यांचे बहुतांश लेखन विचारवंतांच्या चरित्राचा व कार्याचा तसेच आधुनिक महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासाचा वेध घेणारे आहे. 'डॉ. आंबेडकर व त्यांचे कार्य' हा त्यांचा अभ्यासाचा विषय असून फडके यांनी त्यांच्यावर तीन पुस्तके लिहिली आहेत. 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' (१९०१ ते १९४७) हा त्यांनी लिहिलेला महाराष्ट्राचा राजकीय इतिहास पाच खंडात प्रसिद्ध झालेला आहे. अस्सल कागदपत्रांच्या साहाय्याने, व्यक्ती वा काळ हा केंद्रबिंदू ठेवून राजकीय इतिहास उलगडत जाणे हे य.दि. फडके यांच्या लेखनाचे स्वरूप आहे. त्यामुळे त्यांचे लेखन अस्सल दस्तऐवजांवर आधारलेले, ठाम, ठाशीव व नेमके आहे. त्यामागे त्यांची स्वत:ची अशी राजकीय व सामाजिक भूमिका आहे. म. फुले, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, शाहू महाराज, अण्णासाहेब लठ्ठे, डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, बाबाराव सावरकर, सेनापती बापट, सुभाषचंद्र बोस इत्यादींवर फडक्यांनी लेखन केले आहे. 'महात्मा फुले समग्र वाङ्मय'(१९९१), 'दृष्टादृष्ट' (१९९२), 'शोधता शोधता'(१९९५), 'व्यक्तिरेखा'(१९९८), 'स्मरणरेखा'(१९९८), 'नाही चिरा नाही पणती'(२०००) या पुस्तकात फडक्यांचे स्फुटलेखन संग्रहित केले आहे. संशोधक, व्यासंगी विद्वान, चिकित्सक, मर्मग्राही लेखक व संपादक अशा अनेकविध भूमिकांतून लेखन करणाऱ्या फडक्यांनी १९६० नंतरच्या काळावर स्वत:ची वेगळी नाममुद्रा साहित्यजगती उमटवलेली आहे.

'दृष्टादृष्ट' हा य.दि. फडके यांचा सन १९९२ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. १९६६ ते १९९१ या सव्वीस वर्षांच्या काळात लेखकाने काही व्यक्तींवर लिहिलेल्या लेखांचा या संग्रहात समावेश आहे. यामध्ये मोगूबाई कुर्डीकर, (वि.स. खांडेकर) एक भेट, मी पाहिलेले आचार्य अत्रे, (बेगम अख्तर) खडा हूँ चेहरों के एक जंगल मे, न.र. फाटक आणि दत्तो वामन पोतदार, साक्षेपी प्रकाशक हरिभाऊ मोटे, डॉ. सातवळेकर यांच्या सहवासात, (गं.बा. सरदार) एक दिवा विझतो तेव्हा, मला दिसलेले महाकवी बेंद्रे, (बॉबी तल्यारखान) गुडबाय बॉबी, (सुनीती चौधरी-घोष) क्षण एक पुरे सोन्याचा, लोकमान्य टिळक : एक सच्चे मित्र, लोकमान्यांचा मुलगा (श्रीधर बळवंत टिळक), (सेनापती बापट आणि स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर) दोन तात्या, चार्ली चॅप्लीन, नव्या पाऊलवाटांचा प्रतिभावंत प्रवासी - बाबूराव पेंटर, (वीणा भौमिक दास) नाही चिरा नाही पणती, ज्ञानोपासक डॉ. आंबेडकर इत्यादींचा समावेश आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या अनेक माणसांविषयी त्यांना कुतूहल वाटले त्यातून त्यांनी हे लेखन केले आहे. या लेखनाविषयी लेखक लिहतो, ''जीवनप्रवाहात वहात चाललेल्या ओंडक्याप्रमाणे केवळ योगायोगाने माणसे काही काळ एकमेकांची साथ सोबत करतात आणि नंतर या ना त्या कारणामुळे दूर जातात. त्यांपैकी काहींचा आपल्यावर लोभ जडतो, काही आपल्याला आधार देतात. कळत नकळत आपण त्यांच्याकडून कितीतरी शिकतो. आपले छंद, आपल्या आवडीनिवडी यामुळे काहींना आपल्या भावजीवनात महत्त्वाचे स्थान मिळते. त्यांचे महत्त्व अनेकदा कालांतराने आपल्याला अधिक जाणवते. अशा व्यक्तीवर काळाने अचानक झडप घातल्याचे वृत्त कळते तेव्हा त्यांच्या आनंददायक सहवासाच्या आठवणी मनात गर्दी करू लागतात आणि त्यांच्याविषयीच्या आदराला आणि कृतज्ञतेला शब्दरूप दिल्याखेरीज राहवत नाही. या पुस्तकातील काही लेख लिहिले ते याच कारणाने.'' लेखकाने इथे त्यांच्या व्यक्तिचित्रलेखनाची प्रेरणा सांगितली आहे.

या सर्व व्यक्तिचित्रांतून य.दि. फडक्यांनी व्यक्तींचा स्वभाव, त्यांच्या आठवणी, काही घटना-प्रसंग, त्यांचे लेखनकर्तृत्व, त्यांची जीवनशैली सांगून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा दिला आहे. तसे हे लेखन स्फुट स्वरूपाचे आहे. तसेच व्यक्तिमत्त्वातील मार्दव, कलाप्रेम आणि वृत्ती यांची तन्मयता यांचे दर्शन यांतून होते. त्यांनी व्यक्तिचित्रे लिहिताना अनुक्रमणिकेमध्ये त्या व्यक्तींबद्दल काही विशेषणे वापरली आहेत. ती विशेषणे त्यांची व्यक्तिमत्त्वे उलगडण्यास मदत करतात. य.दि. फडके हे एक श्रेष्ठ संशोधक व विचारवंत आहेत. पण त्यांनी व्यक्तीवरती केलेले लेखन साधारण स्वरूपाचेच झालेले आहे. त्यांचे हे लेखन व्यक्तिचित्र लिहावे या हेतूने केलेले नसून त्या व्यक्तीच्या आदराला व

कृतज्ञतेला शब्दरूप दिल्याने ते परिणामकारक होऊ शकले नाही. तरीही एक श्रेष्ठ संशोधक व विचारवंत, साक्षेपी अभ्यासक, मर्मग्राही लेखक यांचे लक्ष व्यक्तिचित्रलेखनाकडे गेले आहे हे फार महत्त्वाचे आहे.

**गंगाधर गाडगीळ :**

गंगाधर गाडगीळ हे कथाकार, कादंबरीकार, समीक्षक, अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. १९४१ नंतर पुढची साठ वर्षे गाडगीळांनी सातत्याने कथालेखन केले. 'कडू आणि गोड'(१९४८), 'नव्या वाटा'(१९५०), 'भिरभिरे'(१९५०), 'संसार'(१९५१), 'उद्ध्वस्त विश्व'(१९५१), 'कबुतरे'(१९५२), 'खरं सांगायचं म्हणजे'(१९५४), 'तलावातले चांदणे'(१९५४), 'वर्षा'(१९५६) हे त्यांचे गाजलेले कथासंग्रह होत. १९४५नंतर 'नवकथेचे अध्वर्यू' म्हणून आपले स्थान गाडगीळांनी निश्चित केले. अनुभवाचा विस्तीर्ण परीघ, सूक्ष्म संवेदनक्षमता आणि कल्पकता ही गाडगीळांच्या कथालेखनाची खास वैशिष्ट्ये. निवेदनाच्या विविध परी, पात्रांच्या मनोव्यापाराचे, लकबीचे, गुणविशेषांचे सूक्ष्म चित्रण, आशयांच्या वेगळेपणाला तोलून धरणारी नवी भाषा गाडगीळांच्या कथेत आढळते. 'दुर्दम्य' खंड - १ (१९७०), खंड - २ (१९७१) कादंबरीच्या रूपाने त्यांनी चरित्रात्मक कादंबरीचा एक प्रयोग केला. नाटक, प्रवासवर्णने त्यांनी लिहिली. 'खडक आणि पाणी'(१९६०), 'साहित्याचे मानदंड'(१९६२), 'पाण्यावरची अक्षरे'(१९७९), 'आजकालचे साहित्यिक'(१९८०) या निवडक ग्रंथांसह त्यांची एकूण आठ समीक्षाविषयक पुस्तके आहेत. 'एका मुंगीचे महाभारत' या आत्मचरित्राने गाडगीळांना साहित्य अकादमी गौरव प्राप्त करून दिला. 'आठवणीच्या गंधरेखा' (१९९३) हा त्यांचा व्यक्तिचित्रसंग्रह. अनेक साहित्यप्रकारांची आव्हाने घेत. कथा, कादंबरी, विनोद, प्रवासवर्णन, समीक्षा यांवर आपल्या प्रतिभेचा व प्रज्ञेचा स्वतंत्र ठसा उमटवीत सातत्याने लेखन करणारे, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्नांवर सातत्याने विचार मांडणारे गंगाधर गाडगीळ हे विसाव्या शतकातील मराठी साहित्यविश्वातले महत्त्वाचे साहित्यिक होत. कुसुमाग्रजांच्या 'प्रतिष्ठान'तर्फे लाभलेल्या 'जनस्थान' पुरस्काराने त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा सर्वोच्च सन्मान झालेला आहे.

'आठवणीच्या गंधरेखा' हा गंगाधर गाडगीळ यांचा सन १९९३ साली प्रसिद्ध झालेला व्यक्तिचित्रांचा संग्रह होय. यामध्ये- माझी आजी, आमची तुळसा, साहित्यिकांच्या भेटीगाठी, साडेतीन कवी आणि एक फसलेला समीक्षक, आठवणीच्या गंधरेखा, माधव - एक देवाघरचा माणूस, प्रभाकर पाध्ये : एक मनस्वी व्यक्तिमत्त्व, एका उमद्या राजपुत्राची कथा, गोखल्यांची कथा, आत्मविलोपी कथाकार इत्यादींचा समावेश आहे.

'माझी आजी' या व्यक्तिचित्रात लेखकाने आपल्या आजीचे चित्रण केले आहे. आजीचा स्वभाव, तिचे वागणे, तिची पारंपरिकता, सोवळे-ओवळे, रागावणे, तिची माया, माणसावरचे प्रेम, तिचा उपदेश, संकटाच्या प्रसंगी पोटात घेणे इत्यादी वर्णनातून आणि आजीच्या आठवणींतून हे व्यक्तिचित्र लिहिले आहे. आजीचा स्वभाव व प्रेमळपणा याविषयी लिहिताना लेखक लिहितो, 'आजी चांगली प्रेमळ होती, पण एका गोष्टीबद्दल मात्र मला तिचा फार राग यायचा. मला वाटायचं की, आजीनं फक्त माझ्यावर प्रेम करावं. पण आजीचं आपलं सगळ्याच माणसांवर प्रेम होतं! सगळ्या माणसांना ती आपुलकी दाखवी. सगळ्या माणसांचं ती करी. घरात काही कार्य असलं, की आमचे कोणीही नातेवाईक तिला काम करण्याकरिता घेऊन जात आणि ती आनंदानं जात असे. आमच्या तुकाराम गड्याला सकाळी ताक हवंहवंसं वाटे, म्हणून ती आठवणीनं त्याला वाटीभर ताक घालीत असे.'' या वर्णनातून लेखकाच्या आजीचे प्रेमळ मन आणि माणसांविषयीचा प्रेमळ दृष्टिकोन लक्षात येतो. 'आमची तुळसा' ह्या व्यक्तिचित्रात लेखकाच्या घरच्या मोलकरणीचे चित्रण आहे. फिस्कारलेले, बुचकलेले केस, काळा रापलेला निर्बुद्ध चेहरा, अंगावर घाणेरडी लक्तरे अशी असणारी तुळसा लेखकाच्या घरात आल्यावर 'तुलसा आता बामणीन झाली' असे लोक तिला म्हणू लागले. इतके बदल तिच्यात झाले. तिचे बोलणे, तिची हुशारी, तिचा बोलण्यातला हास्यविनोद, कामतत्परता इत्यादी व्यक्तिमत्त्वाचे पदर लेखकाने उलगडले आहेत. आणि ती घरचीच एक सदस्य कशी झाली हे सांगितले आहे.

'आठवणीच्या गंधरेखा' मध्ये पु.शि. रेगे यांचे व्यक्तिमत्त्व साकार केले आहे. त्यांचे वर्णन करताना लेखक लिहितो, 'एक काळे, ठेंगू गृहस्थ सहलीत होते. चेहरा जवळजवळ चौकोनी, त्यावर थोडेसे वण, सोनेरी चष्मा, त्यामागे वाटोळे डोळे, बारीक चरचरीत केस, त्यांचा कपाळाच्या मध्यभागी पाडलेला भांग, चेहरा बिनबोलका, भावहीन असं त्याचं दर्शन होतं. यातून पु.शि. रेग्यांचे रेखाचित्र आपणासमोर येते. तसेच त्यांचा स्वभाव, सहजवृत्ती, कोणाशी दाट मैत्री नाही, त्यांच्यातील निर्लेपपणा, त्यांच्यातील कवी, उत्कटता, रसिकपणा, चतुराई, त्यांचा राग इत्यादी चित्रणातून त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार करण्याचा प्रयत्न केला आहे.

'माधव - एक देवाघरचा माणूस' या लेखामध्ये माधव आचवल यांचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. माधव हा बुद्धिवान, मेहनती व रसिक होता तो आर्किटेक्ट म्हणून स्वतंत्रपणे व्यवसाय करीत होता. तो उत्साही आणि आनंदी असायचा. एखादी गोष्ट डोक्यात घेतली की, जिद्दीनं तिचा पाठपुरावा करणे हा त्याचा स्वभाव होता. वास्तुकलेच्या अभ्यासामुळे त्यांची दृष्टी कलात्मक होती. माधवच्या सहवासात गाडगीळांना मुंबईतील ताजमहल हॉटेल, गेट वे ऑफ इंडिया, क्रॉफर्ड मार्केट, मरीन लाइन्स व मलबार हिल इत्यादी सुंदर

व भव्य इमारतींची कलात्मक जाणीव झाली. लेखक त्यांकडे फक्त इमारती म्हणून पाहत होता. शैली आणि सौंदर्य यांचा आचवलांमुळे परिचय झाला. याविषयी लेखक लिहितो, ''माधवकडून वास्तुकला, शिल्पकला आणि चित्रकला या तीन प्रमुख कलांच्या क्षेत्रांचा मला परिचय झाला. त्यांचं सौंदर्य प्रतीत होण्यासाठी लागणारी दृष्टी मला प्राप्त झाली. एक रसिक म्हणून माधवनं मला पुष्कळ श्रीमंत केलं. माझ्या आयुष्यात अनेक मित्रांकडून मला पुष्कळ काही मिळालं, पण माधवनं जितकं मला दिलं तितकं दुसऱ्या कोणीच दिलं नाही.'' यातून मित्र म्हणून माधव विषयीचा जिव्हाळा आपणास दिसून येतो. माधवचे बुद्धिवान व मेहनती व्यक्तिमत्त्व आपणासमोर येते.

याप्रमाणे प्रभाकर पाध्ये, गोखले व इतर व्यक्तिचित्रांतून त्यांचा स्वभाव, त्यांच्या आठवणी, त्यांचे वेगळेपण, साहित्यिक जाणिवा, त्यांची जवळीक इत्यादी वर्णनातून व्यक्तिमत्त्व साकार करण्याचा प्रयत्न केला आहे.

गंगाधर गाडगीळ हे एक श्रेष्ठ कथाकार व समीक्षक आहेत. त्यामुळे लालित्यपूर्ण भाषेत पण समीक्षेच्या भूमिकेतून त्यांनी या व्यक्तिमत्त्वांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. काही व्यक्तिचित्रात स्फुट असा आढावा आहे. तरी पण एका चांगल्या संशोधनकाराने व्यक्तिचित्रलेखन करून समीक्षकांचे लक्ष व्यक्तिचित्रलेखनाकडे वेधले आहे हे फार महत्त्वाचे वाटते.

**समारोप :**

या प्रकरणाचा कालखंड आपण १९६० ते १९९० असा निवडला आहे. या कालखंडाचे वैशिष्ट्य म्हणजे याला वास्तववादी कालखंड असे म्हटले जाते. म्हणजे या कालखंडातील साहित्याचा केंद्रबिंदू हा 'माणूस' होता. माणूस म्हणजेच व्यक्ती. कोणत्याही प्रकारचा आडपडदा न ठेवता जसा माणूस दिसला, जगला, वागला तसा तो त्याच्या गुणवैशिष्ट्यांसह रेखाटला जाऊ लागला. त्या व्यक्तीचे जीवनदर्शन, व्यक्तिदर्शन घडविणे याला या कालखंडात महत्त्व आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराच्या प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती झाली. गावकुसाबाहेरचा समाज लेखन करू लागला. वास्तव जीवनाचे दर्शन घडवू लागला. शेती आणि शेतकरी या विषयाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागला. बळिराजाचे विस्तृत व वास्तव दर्शन ग्रामीण साहित्यातून होऊ लागले. त्यामुळे सामाजिक प्रश्नांकडे साहित्याचा ओढा असलेला आपणास दिसतो. त्याचा परिणाम या कालखंडातील कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारांवर झाला. वास्तववादी प्रवृत्तीने लेखन होऊ लागले. व्यक्तिचित्र लेखनावरही परिणाम झाला. मध्यमवर्गीय व्यक्तीचे लक्ष बहुजन समाजातील श्रमकरी व आपली काहीएक गुणवैशिष्ट्ये घेऊन जगणाऱ्या व्यक्तींकडे गेली. बहुजन समाजातील व्यक्तींची व्यक्तिचित्रे लिहिली जाऊ लागली. 'व्यक्ती' हा व्यक्तिचित्रलेखनाचा केंद्रबिंदू असल्याने

लेखकांच्या जाणीवेनुसार व प्रवृत्तीनुसार व्यक्तिचित्राचे लेखन होऊ लागले.

एकंदरीत या कालखंडामध्ये विविध क्षेत्रांतील व विविधंगी व्यक्तींचे व्यक्तिचित्र लेखक रेखाटताना दिसतात. उदा. काल्पनिक व्यक्तींचे व्यक्तिचित्रे य.गो.जोशी यांनी 'विनायक', 'अण्णासाहेब', 'दत्तोपंत', अशी रेखाटली असून त्यातून जीवनाचे वेगळे दर्शन घडविले आहे. आनंद यादव यांनी 'बापू', 'सखाराम', 'लंगडा गोपा', 'खुळा इठू' या व्यक्तिचित्रातून दारिद्र्याच्या पार्श्वभूमीवर सामान्य वर्गातील व्यक्तींचे दर्शन घडविले आहे. पु.ल. देशपांडे यांनी 'नारायण', 'सखाराम गटणे', 'नाथा कामत'; इंदुमती शेवडे यांनी 'नकोशी', 'वारु आत्या'; शिवाजी सावंत यांनी 'कांत्या', 'खडकावरची म्हातारी' अशा सर्वसामान्य समाजात जगणाऱ्या, कुणाला फारशा परिचित नसणाऱ्या अप्रसिद्ध व्यक्तींच्या व्यक्तिचित्रांतून त्यांचे दैनंदिन जीवन आणि भावजीवन यांचे दर्शन घडविले आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाने प्रसिद्ध असणाऱ्या व्यक्तींची व्यक्तिचित्रे पु.ल. देशपांडे यांनी 'बाबा आमटे', 'कुमार गधर्व' आदी; माधवराव बागल यांनी 'राजर्षी शाहू महाराज', 'म. फुले', 'वि.रा. शिंदे', 'कर्मवीर भाऊराव पाटील' अशा व्यक्तिचित्रातून घडविले असून त्यांचा आदर्श समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अ.ह. लिमये यांनी 'फ्रेड हॉमलीन', 'जिम लेदरर', 'अझांगा आल्बर्ट' इत्यादी या परकीय मित्रांची व्यक्तिचित्रे लिहिली असून त्यांचा परिचय देऊन त्यांचे जीवन समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

गोपाळकृष्ण भोबे यांनी 'मोगुबाई कुर्डीकर', खाँसाहेब बडे गुलाम आलिखाँ, 'वसंत देसाई', कृ.द. दीक्षित यांनी 'मास्टर कृष्णराव', 'हिराबाई बडोदेकर', 'गोविंदराव टेंबे', रवींद्र पिंगे यांनी 'किशोरी आमोणकर', 'शांताराम बापू' या प्रसिद्ध संगीत आणि कला क्षेत्रातील व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्यामधून त्यांच्या रसिल्या आणि यशस्वी जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मराठीतील प्रसिद्ध साहित्यिकांचीही व्यक्तिचित्रे लिहिली गेली आहेत. म.श्री. दीक्षित यांनी 'श्री.म. माटे', 'लोकशिक्षण'कार जांभेकर, अ.ह. लिमये यांनी 'पं. महादेवशास्त्री जोशी', 'वि.द. घाटे', माधवराव बागल यांनी 'आचार्य जावडेकर', 'वि.स. खांडेकर', रवींद्र पिंगे यांनी 'मंगेश पाडगावकर', 'जयवंत दळवी', 'विजय तेंडुलकर' अशा साहित्यिकांच्या वाङ्मयीन कार्याचे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविले आहे. पु.भा. भावे यांनी 'यशवंतराव चव्हाण', 'स्वा. सावरकर' अशा प्रसिद्ध राजकीय व्यक्तींचे व्यक्तिचित्रे रेखाटून त्यांचा व्यासंग, विचारसरणी, त्यांची जीवनविषयक दृष्टी समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शं.के. पेंडसे यांनी 'भीष्माचार्य', 'भीम', 'कुंती', 'द्रौपदी'; दुर्गा भागवत यांनी 'कृष्ण', 'दुर्योधन', 'कर्ण'; इरावती कर्वे यांनी 'विदुर', 'गांधारी', 'द्रोण' अशा पौराणिक व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटून त्यांचा स्वभावधर्म, नीती, तत्त्वबोध समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. भा.र.

साबडे यांनी 'जे.आ.डी. टाटा', 'शंतनुराव किर्लोस्कर', 'आबासाहेब गरवारे', 'राहुल बजाज' अशा अनेक प्रसिद्ध उद्योगपतींची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. त्यांतून त्यांनी उद्योजकांचे कार्यकर्तृत्व, त्यांची चिकाटी, नवनवीन ज्ञान आत्मसात करण्याची प्रवृत्ती, दूरदृष्टी, आदर्श हे सारे समाजासमोर मांडले आहे. अशा विविध व्यक्तींच्या लेखनातून व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकार समृद्ध झालेला दिसतो. या व्यक्तिचित्रलेखनामधून लेखकाला ती व्यक्ती जशी भावली तशी ती प्रामाणिकपणे रेखाटण्याचा प्रयत्न दिसतो. पण ज्या प्रसिद्ध व्यक्ती आहेत त्यांची व्यक्तिचित्रे काही प्रमाणात चरित्रचित्रणाकडे जात असल्याचे दिसते. लेखकाला काही घटना प्रसंग आणि कार्यकर्तृत्वाच्या आधारे व्यक्तिचित्रच रेखाटावयाचे आहे, पण त्या व्यक्तीच्या कार्यव्याप्तीमुळे आपणास ते व्यक्तिचित्र चरित्रचित्रणाकडे गेल्यासारखे वाटते.

व्यक्तिचित्रविकासाला सुरुवात झाल्यानंतर या वाङ्मयप्रकारासंबंधी कोणतीही तात्त्विक चर्चा झाल्याचे दिसत नाही. जी चर्चा झाली ती अतिशय जुजबी व फुटकळ स्वरूपात झाली. तरीही या कालखंडामध्ये श्रेष्ठ दर्जाची व्यक्तिचित्रे व व्यक्तिचित्रसंग्रह निर्माण झाले. उदा. पु.ल. देशपांडे (व्यक्ती आणि वल्ली, गणगोत, गुण गाईन आवडी), शं.के. पेंडसे (महाभारतातील व्यक्तिदर्शने), आनंद यादव (मातीखालची माती), दुर्गा भागवत (व्यासपर्व), इरावती कर्वे (युगान्त), कृ.द. दीक्षित (षड्ज-गांधार),ग.दि. माडगूळकर (मंतरलेले दिवस), वि.वा.शिरवाडकर (विरामचिन्हे), रवींद्र पिंगे (शतपावली, देवाघरचा पाऊस, तुषार आणि तारे), शिवाजी सावंत (अशी मने असे नमुने), विद्याधर पुंडलिक (आवडलेली माणसं), रामकृष्ण बाक्रे (बुजुर्ग), भा.र. साबडे (मोठी माणसं), गंगाधर गाडगीळ (आठवणीच्या गंधरेखा) इत्यादी. तसेच नरहर कुरुंदकर, मधू जामकर, चंद्रकुमार नलगे, गंगाधर पानतावने, श्री.म. माटे, महादेव मोरे इत्यादी लेखकांनी केलेल्या ललित लेखनात व्यक्तिचित्रे साकार झाली आहेत. पण ती व्यक्तिचित्रे लिहावी या हेतूने साकारली नसल्याने ती परिणामकारक झालेली दिसत नाहीत. तसेच या कालखंडात चिंतनशील आणि वैचारिक लेखन करणारे लेखक वि.वा. शिरवाडकर, विजय तेंडुलकर, उद्धव शेळके, य.दि. फडके, गंगाधर गाडगीळ यांचे लक्ष व्यक्तिचित्रलेखनाकडे गेलेले आहे; हे इथे नमूद करणे महत्त्वाचे वाटते. समीक्षकांचे लक्ष व्यक्तिचित्रलेखनाकडे वेधले जाऊ लागले आहे. या कालखंडातील व्यक्तिचित्रोचा विचार व विकास पाहताना ज्या लेखकांनी व्यक्तिचित्रलेखन केले आहे त्या लेखकांच्या वाङ्मयीन पार्श्वभूमीतून त्या लेखकांचे, समीक्षकांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व लक्षात यावे आणि अशा लेखकांचे लक्ष 'व्यक्तिचित्र' या लेखनप्रकाराकडे गेले त्यातून त्यांनी केलेल्या व्यक्तिचित्रलेखनाचा विकास आणि विवेचन करून व्यक्तिचित्र या वाङ्मयप्रकाराचे स्थान निश्चित करणे हा मुख्य हेतू आहे.

१९६० ते १९९० या कालखंडात मानदंड म्हणून सांगता येण्यासारखा एकच संग्रह नसून दर्जेदार व्यक्तिचित्रसंग्रहाची संख्या या कालखंडात वाढली आहे. प्रत्येकाला आपापले वैशिष्ट्य लाभले आहे. दर्जेदार लेखनातील ही विधायक स्पर्धा व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकार स्थिर झाल्याचेच लक्षण आहे. या कालखंडात उत्कृष्ट व्यक्तिचित्रसंग्रह आहेतच; परंतु अन्य संग्रहांतील काही दर्जेदार व्यक्तिचित्रे यांचा परामर्श वेळोवेळी घेतलेला आहे.

व्यक्तिचित्रलेखन करताना केवळ अंतर्बाह्य ढोबळ वर्णनापर्यंत न थांबता त्या पलीकडे जाऊन व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याची प्रवृत्ती या काळात वाढलेली आहे. त्यामुळे वैचारिक व्यक्तिचित्राची निर्मिती हा व्यक्तिचित्राच्या विकासाचा पुढचा टप्पा या काळात दिसतो. लेखकाचे व्यक्तिमत्त्वही वरील लेखनातून प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे ज्याचे व्यक्तिचित्र असेल त्या व्यक्तीबरोबर ज्याने व्यक्तिचित्र रेखाटले त्याचीही ओळख पटण्याचा व्यक्तिचित्राचा एक महत्त्वपूर्ण पैलू दिसून येतो. या काळातील, वर उल्लेखलेल्या व्यक्तिचित्रसंग्रहांनी व्यक्तिचित्राचा आदर्श निर्माण केला आहे आणि व्यक्तिचित्राला सुंदर शैली दिली आहे.

सारांश, या कालखंडातील व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारामध्ये बदल आणि विकास होत गेलेला आहे. मराठी लेखकाची व्यक्तिचित्रलेखनाची समज, आकलन, प्रगल्भता, शैली या दृष्टीने विकास होत गेला आहे. त्यामुळेच श्रेष्ठ दर्जाची व्यक्तिचित्रे निर्माण झाली आहेत व ती अमर झाली आहेत. भाषाशैलीच्या अंगाने विचार करता लालित्यपूर्ण भाषा, मार्मिक तपशील, प्रादेशिक बोलीभाषेतील संवाद, वातावरणनिर्मिती, कारुण्य व विनोद, प्रादेशिक भाषा इत्यादींतून परिणामकारक व्यक्तिचित्रे साकारली गेली आहेत.

कोणत्याही वाङ्मयप्रकारात श्रेष्ठ दर्जाचे लेखन जसे असते तसेच निकृष्ट दर्जाचे लेखनही असते. व्यक्तिचित्राबाबतही हीच परिस्थिती असून व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकारात श्रेष्ठ दर्जाचे लेखक तसेच निकृष्ट लेखन निश्चितपणे झाले आहे. एका बाजूला गुणात्मक वाढ होत असताना दुसऱ्या बाजूला चित्रमयतेचा अभाव, अनावश्यक पसारा, वाङ्मयप्रकाराच्या वापरातील ढिलाई हे दोष आढळतात. अशा तऱ्हेने, गुण-दोषांनीयुक्त अशी या कालखंडातील 'व्यक्तिचित्रां'ची वाटचाल असली तरी संख्यात्मक, गुणात्मक व दर्जात्मक वाढीमुळे व्यक्तिचित्राला स्थैर्य प्राप्त झाले आहे. त्यामुळे व्यक्तिचित्र हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार ठरू शकतो असे आपल्याला म्हणता येते.

***

## प्रकरण पाचवे

# उपसंहार

वशिष्ट वाङ्मयप्रकार निर्माण होताना सामाजिक व सांस्कृतिक स्थितिगती, लेखकाची मूळ प्रवृत्ती, अभिव्यक्तीची स्वाभाविक गरज, आशयाचे विशिष्ट स्वरूप, वाङ्मयीन परंपरा या सर्वांचा साकल्याने विचार होत असतो. प्रत्यक्ष वाङ्मयप्रकाराच्या जडणघडणीत या व्यावहारिक घटकांचा अधिक भाग असतो. मराठीत वाङ्मयप्रकाराचा विचार ब्रिटिशपूर्वकाळात फारसा झालेला नाही, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे असा विचार करण्याची त्या काळात भूमिका नव्हती. दुसरी गोष्ट अशी की, मराठी साहित्याच्या संदर्भातला विचार आशयानुगामी असल्यामुळे बोधवाद, नीतिवाद, प्रचार, उद्‌बोधन इत्यादी दिशेने विवेचन होत राहिलेले दिसेल. प्रा. वा. ल. कुलकर्णी ज्याला 'साहित्याच्या घाटाची जाणीव' म्हणतात, ती सामान्यपणे १९२० नंतरच आलेली दिसते. सुरुवातीला विविध वाङ्मयप्रकारांची चिकित्सा झालेली दिसते. रविकिरण मंडळाचा काळ (इ.स. १९२०-२५) किंवा त्याच्या आसपासचा काळ या अर्थाने महत्त्वाचा वाटतो. म्हणजे विशिष्ट वाङ्मयप्रकाराची; विशेषत: काव्यप्रकाराची, आशयाची चिकित्सा होताना दिसते. थोडक्यात, काव्य, कादंबरी, नाटक या वाङ्मयप्रकाराविषयी चर्चा होत होती.

आधुनिक काळात वाङ्मयप्रकाराची ही चिकित्सा आणखी डोळस बनत गेली. इंग्रजी राजवटीचा काळ हा एकंदरीने संश्लेषणापेक्षा विश्लेषणाचा, नव्याचा स्वीकार करण्याचा दिसून येतो. इ. स. १९३० नंतरचा काळ संपूर्ण जीवनालाच एक प्रकारची गती देणारा होता. त्यामुळे सर्व फॉर्मना एक प्रकारचा आटोपशीरपणा आला. लघुनिबंध याच काळात आला. 'काय सांगितले' या बरोबरच 'कसे सांगितले' याकडे लक्ष वेधले गेले. याचे प्रामुख्याने श्रेय ना. सी. फडके यांच्याकडे जाते. त्यांनी आशयापेक्षा अभिव्यक्तीच्या अंगाने विचार अधिक केला. लघुनिबंध जन्माला घातला, लघुकथेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. लघुनिबंधाची वैशिष्ट्ये ठाशीव पद्धतीने सांगितली. 'प्रतिभासाधन' सारखा तंत्राचे विवेचन करणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. यामुळे वाङ्मयप्रकाराची जाणीव वाढू लागली. अनेक कलांपैकी वाङ्मय ही एक कला आहे.

या वाङ्मयकलेमध्येही पुन्हा कथा, कादंबरी, नाटक, काव्य असे प्रकार आहेत; हे वाङ्मयप्रकार जन्मजात नसतात, तर ते निर्मित असतात. एखादी संस्था जशी स्थापन करावी लागते, त्या संस्थेत पुन्हा परिवर्तन शक्य असते तसे वाङ्मयप्रकाराचे असते असे रेनेवेलेकने(Rene Wellek) म्हटले आहे. म्हणजे वाङ्मयप्रकाराला एक प्रकारचे व्यवस्थापन आणि बांधणी असते असे त्यांचे सांगणे आहे. वाङ्मयप्रकाराचा संबंध हा अनुभवाच्या स्वभावधर्माशी निगडित असतो. भिन्न वाङ्मयप्रकार म्हणजे मूळ अनुभवाने आपल्या स्वभावधर्मानुसार घेतलेले रूप आहे असे आपल्याला दिसेल. यापुढे जाऊन असे म्हणता येईल की, वाङ्मयप्रकार हे कृत्रिम, तांत्रिक व अपुरे नाहीत. ते वाङ्मयातील जीवनानुभवाशी निगडित आहेत. मानवाच्या मूलभूत प्रवृत्तीशी त्यांचा संबंध असतो. अनुभवाच्या मूलभूत गुणधर्मानुसार हे प्रकार अभिव्यक्त होत असतात व त्यानुसार त्यांच्यात अभिव्यक्तिभेद व रचनाभेद निश्चित होतात. भावानुभूतीच्या मूलभूत गुणधर्मानुसार त्यांच्या विशुद्ध स्वरूपात कमी-जास्त प्रमाणाने वा मिश्रणामुळे भावानुभूतीचे वेगवेगळे घाट बनतात व वाङ्मयप्रकार अस्तित्वात येतात.

इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने मराठी वाङ्मयात काही वाङ्मयप्रकार विकसित झाले. त्यापैकी व्यक्तिचित्र हा वाङ्मयप्रकार होय. व्यक्तिचित्र हा वाङ्मयप्रकार प्रथम शब्दचित्राचा एक विषय म्हणून रूढ झाला. शब्दचित्र, स्वभावचित्र, व्यक्तिचित्र या तीन शब्दांनी प्रामुख्याने ओळखल्या जाणाऱ्या या वाङ्मयप्रकारासाठी इतरही अनेक शब्द प्रचारात आहेत. परंतु हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून कधीच म्हटला गेला नाही. कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, ललित निबंध अशा प्रमुख वाङ्मयप्रकाराच्या यादीत व्यक्तिचित्राचा समावेश कधीच झाला नाही. मात्र, दुय्यम दर्जाचे लेखनप्रकार समाविष्ट असणाऱ्या ललितगद्य नामक व्यापक वाङ्मयीन भागाचा एक प्रकार म्हणून; तसेच कथा, चरित्र, निबंध यांचा उपप्रकार म्हणून व्यक्तिचित्राचे अस्तित्व मानले गेले. त्यामुळे 'व्यक्तिचित्रा'ची परिभाषा, तत्त्वे निश्चित होऊ शकली नाहीत. तसेच या प्रकाराचे नाव देखील निश्चित झाले नाही. व्यक्तिचित्र हा वाङ्मयप्रकार व्यक्त करणाऱ्या अनेक संज्ञा वापरात असून देखील, याची वैशिष्ट्ये नेमकेपणाने व्यक्त करेल अशी संज्ञा निश्चित नसल्याने व्यक्तिचित्रलेखन करणारे लेखक व समीक्षक यांच्यातही गोंधळ उडाला आहे. व्यक्तिचित्राला रूढ असणाऱ्या विविध संज्ञांच्या अर्थच्छटा कुणी लक्षात घेतल्याच नाहीत. या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर 'व्यक्तिचित्र' वाङ्मयप्रकाराची योग्य परिभाषा निश्चित करणे आवश्यक होते. त्यासाठी वापरात असलेल्या शब्दांचे अर्थ पाहून त्यांतून योग्य शब्द निवडणे व त्या योग्य शब्दामागील संकल्पनांना निश्चित करणे जरुरीचे होते. 'व्यक्तिचित्र' हाच शब्द या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये योग्यप्रकारे व्यक्त करू शकतो

असे दिसून आल्यामुळे प्रथम विविध शब्दांच्या चर्चेच्या साहाय्याने योग्य शब्दाची निवड करून पुढील चर्चेची योग्य पार्श्वभूमी तयार करण्याचे महत्त्वाचे काम सुरुवातीला या ग्रंथात केले आहे.

'व्यक्तिचित्रे' हा साहित्याचा एक प्रकार आहे. साहित्यकला एकच असली तरी तिचे अनेक प्रकार आहेत. तसेच ते एकमेकांहून वेगळे आहेत. पण या सर्व प्रकारांतील साहित्यतत्त्व किंवा वाङ्मयतत्त्व एकच आहे. असे असले तरी अनुभूती प्रकट करण्यासाठी निरनिराळया माध्यमांची आवश्यकता भासत असल्यामुळे, त्या आवश्यकतेनुसार निरनिराळे वाङ्मयप्रकार निर्माण होतात. कथा, कादंबरी, नाटक, काव्य अशा प्रकारांप्रमाणेच व्यक्तिचित्र हा प्रकार देखील याच आवश्यकतेपोटी निर्माण झालेला दिसतो. साहित्याचा हेतू व विषय व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व प्रकट करणारा असल्यामुळे 'व्यक्तिचित्र' निर्माण झाले असावे. ललितगद्य हा मराठी वाङ्मयातील असा एक प्रकार आहे की, ज्या लेखनाचा स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून समावेश होत नसेल, त्या सर्व लेखनाचा समावेश ललितगद्यात होतो. या ललितगद्यात प्रवासवर्णन, निसर्गपर लेखन, विनोदी लेखन, व्यक्तिपर लेख, शब्दचित्र, आठवणी, मृत्युलेख, वृत्तान्तकथन व त्याचे प्रकार इत्यादींचा समावेश होतो. ललितगद्यापैकी प्रवासवर्णन हा लेखनप्रकार स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून विकसित झाला. अलीकडे त्याला तशी मान्यता मिळू लागली आहे.

व्यक्तिचित्र हा ललितगद्याचा एक प्रकार असला तरी तो स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणण्याइतपत विकसित झाला आहे. त्याची व्याख्या, वाङ्मयीन अंगोपांगे याची चर्चा केली असता किंवा इतर प्रचलित प्रमुख व दुय्यम वाङ्मयप्रकारांशी तुलना केली असता असे दिसून येते की, 'व्यक्तिचित्र' इतर प्रमुख वाङ्मयप्रकार आणि ललित गद्यांतर्गत लेखनप्रकार यांच्याहून संपूर्णपणे वेगळा आहे.

व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण याबाबत अनेक गैरसमज प्रचारात आहेत. त्यामुळे हे दोन्ही एकच समजले जाते. व्यक्तिचित्र आणि व्यक्तिचित्रण यांचे स्वरूप भिन्न आहे. व्यक्तिचित्रण हे वाङ्मयात साधनरूपाने अवतरते तर व्यक्तिचित्र हे स्वतंत्रपणे साध्यरूपाने अवतरते. व्यक्तिचित्र हा वेगळा लेखनप्रकार आहे. तर व्यक्तिचित्रण अनेक वाङ्मयप्रकारांतर्गत आढळून येणारा एक घटक आहे. व्यक्तिचित्राप्रमाणे व्यक्तिचित्रणाला स्वतंत्र अस्तित्व नाही. व्यक्तिचित्रण हे वाङ्मयांतर्गत घटक असते. इतकेच नव्हे तर ह्या बऱ्याच व्यक्ती नसून व्यक्तीचे काल्पनिक नमुने असतात. व्यक्तिचित्रात नवनिर्मिती होऊ शकते. लेखकाच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे साधन म्हणून व्यक्तिचित्रण केले जाते. व्यक्तिचित्र मात्र 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्रे' या एकाच, नेमक्या व मर्यादित हेतूसाठी अवतरते. त्यामुळे व्यक्तिचित्राला वेगळे, स्वतंत्र अस्तित्व आहे.

इंग्रजी वाङ्मय व इंग्रजी साहित्यिक यांच्या अभ्यासामुळे मराठी वाङ्मय एका नव्या मार्गाने जाऊ लागले आणि त्यात काही नव्या लेखनप्रकारांची भर पडली. अशा विकासावस्थेत व्यक्तिचित्र हा लेखनप्रकार उदयाला आला. ए.जी. गार्डिनर या इंग्रजी लेखकाच्या लेखनावरून मराठीतील लेखकांना व्यक्तिचित्रलेखनाची प्रेरणा मिळाली. त्या गार्डिनरने या लेखनप्रकाराला 'Sketch' असे संबोधिले आहे. व्यक्तिचित्रांचा संग्रह काढण्याचा प्रथम मान ज्या कुमार रघुवीर यांच्याकडे जातो त्यांनी आपल्या 'हृदय' या संग्रहातील सर्व लेखनाला 'शब्दचित्रे' असेच म्हटले आहे व शब्दचित्रात व्यक्तिचित्राचा समावेश केला आहे. दिनकर वासुदेव दिवेकर यांनी ए.जी. गार्डिनरच्या लेखनावरून स्फूर्ती घेऊन व्यक्तिचित्रलेखनाचा प्रकार मराठीत सुरू केला. त्या दिवेकरांनी आपल्या पहिल्या व्यक्तिचित्रांना 'स्वभावचित्रे' असे नाव दिले आहे. सु.रा. चुनेकर यांनी 'काही म्हातारे व एक म्हातारी' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दोन समीक्षकांच्या परीक्षणाचा उल्लेख केला आहे. त्यात ना.ग. जोशी यांनी 'काही म्हातारे व एक म्हातारी' यातील लेखांना 'शब्दचित्रे' असे म्हटले आहे तर भि. अ. परब यांनी या लेखांना 'व्यक्तिचित्रे' म्हटले आहे. प.श्री. कोल्हटकर यांनी 'स्वभावचित्रे' हा शब्द व्यक्तिचित्रासाठी वापरला असून वि.ह. कुलकर्णी यांनी आपल्या संग्रहाचे नावच 'व्यक्तिचित्रे' असे ठेवले आहे. एक व्यक्तिचित्रकार वसंत शांताराम देसाई यांनी व्यक्तिचित्र हा शब्द वापरला आहे. सौ. कमलाबाई देशपांडे या 'हसरे निर्माल्य आणि चिमण्या' च्या प्रस्तावनेत 'शब्दचित्रे' हा शब्द वापरतात. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या 'माणदेशी माणसं' संग्रहावर 'शब्दचित्रे' हा शब्द वापरला आहे. पु.ल.देशपांडे यांना 'व्यक्तिचित्र' हा शब्द मान्य दिसतो. वि.स. खांडेकर यांनी 'ते दिवस ती माणसे' च्या प्रस्तावनेत 'व्यक्तिचित्र' हाच शब्द वापरला आहे. रवींद्र पिंगे हे आधुनिक लेखक; मात्र आपल्या 'देवाघरचा पाऊस' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आपल्या व्यक्तिचित्रांना ते 'व्यक्तिशोध' असे म्हणतात.

शब्दचित्र, व्यक्तिचित्र, स्वभावचित्र या शब्दांच्या वापराबाबत व त्यांच्या अर्थाबाबत मराठी लेखक व समीक्षक यांच्यात बराच संभ्रम झालेला दिसतो. हे सारे शब्द व त्यामागील अर्थच्छटा यांचा फारसा विचार न करता या शब्दाचा अतिशय ढिलेपणाने वापर होत राहिल्याने हा गुंता बिकट झाला.

अ.ना. देशपांडे यांनी या लेखनप्रकाराची चर्चा करताना 'शब्दचित्र वा व्यक्तिचित्र' आणि 'व्यक्तिचित्र वा स्वभावचित्र' असे उल्लेख केलेले आहेत. म्हणजे हे तीन शब्द ते एकाच अर्थाचे व पर्यायवाची म्हणून वापरतात हे स्पष्ट होते. म.ना. अदवंत या लेखन प्रकाराची चर्चा करताना 'शब्दचित्रे' वा 'व्यक्तिचित्रे' असा उल्लेख करतात. म्हणजे म.ना. अदवंत दोन्ही शब्दांचा अर्थ एकच समजतात. रा.श्री. जोग यांनी 'अविस्मरणीय

**उपसंहार ।** ५'व्यक्तिचित्रे' या दि.वा. दिवेकर यांच्या व्यक्तिचित्रसंग्रहाच्या प्रस्तावनेत एके ठिकाणी 'व्यक्तिचित्रे' तर दुसरीकडे 'शब्दचित्रे' असे शब्द वापरले आहे. रा.श्री. जोग यांनी हे दोन्ही शब्द समानार्थी वापरले आहेत. वा.भा. पाठक यांनी 'टीका आणि टीकाकार' मध्ये 'शब्दचित्र' आणि 'स्वभावचित्र' या दोन्ही शब्दांचा वापर एकाच अर्थाने केला आहे.

वा.ल. कुलकर्णी यांनी मराठी लघुकथेचा उत्क्रांतिमार्ग सांगताना एकदा 'शब्दचित्र' तर दुसरीकडे 'व्यक्तिचित्र' शब्दाचा वापर केला असून, एकाच लेखात ते 'शब्दचित्र' व 'व्यक्तिचित्र' हे शब्द एकाच अर्थाने वापरतात. इंदुमती शेवडे यांनी लघुकथेचा विकास सांगताना व्यक्तिविषयक काही चर्चा केली असून 'शब्दचित्रे' वा 'व्यक्तिचित्रे' असे म्हणून हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे मानले आहेत. सदा कऱ्हाडे 'व्यक्तिचित्र किंवा स्वभावचित्र' असे म्हणून हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे मानतात.

थोडक्यात, मराठी भाषेत 'व्यक्तिचित्रे' हा अर्थ स्पष्ट करणारे परंतु निरनिराळ्या सूक्ष्म अर्थच्छटा असणारे शब्दचित्र, व्यक्तिचित्र, स्वभावचित्र, व्यक्तिरेखा, व्यक्तिपरिचय, व्यक्तिपर लेख, व्यक्तिशोध, व्यक्तिपरीक्षण, व्यक्तिदर्शन, स्वभावचित्रण, रेखाचित्र असे शब्द आहेतच याखेरीज स्केच, रॅपिडस्केच, स्नॅपशॉट, वर्डपिक्चर, पेनपिक्चर, कॅरेक्टर स्केच असे इंग्रजी शब्दही मराठीत वापरले गेले आहेत. परंतु यांपैकी शब्दचित्र, व्यक्तिचित्र, स्वभावचित्र हे शब्द निखळ मराठीत अधिक प्रमाणात प्रचारात आहेत, तर इंग्रजीमध्ये स्केच आणि हिंदीमध्ये रेखाचित्र हे शब्द जास्त प्रचारात आहेत.

प्रचलित शब्दांच्या व्याख्या मान्यवर लेखकांनी पुढीलप्रमाणे केलेल्या आहेत. कुमार रघुवीर शब्दचित्राची व्याख्या करताना म्हणतात, 'एखादी व्यक्ती, एखादा प्रसंग किंवा एखादे दृश्य व त्यामुळे उद्‌भूत झालेले मनोविकार यांचे सूचक शब्दांत परिणामकारक व थोडक्यात काढलेले चित्र तेच शब्दचित्र होय'. ही व्याख्या सरोजिनी बाबर व वि.म. कुलकर्णी यांनी 'साहित्यदर्शन' या पुस्तकात दिली आहे. श्यामसुंदरदास शब्दचित्राची व्याख्या करताना लिहितात, 'शब्दों के माध्यम से किसी स्थान, घटना आदि का ऐसा वर्णन प्रस्तुत करना जिससे उसका रुपचित्र भासित हो उठे'. तर हरदयाळ रेखाचित्रासंबंधी व्याख्या करताना लिहितात, 'साहित्य मे कम से कम शब्दोंमे, कलात्मक ढंग से किसी वस्तू, व्यक्ति या दृश्य का अंकन 'रेखाचित्र' कहलाता है ।'

व्यक्तिचित्रांना बऱ्याच वेळा 'स्वभावचित्र' असे म्हटले गेले आहे. याबाबत वा.गो. आपटे यांनी केलेली व्याख्या महत्त्वाची वाटते. ते लिहितात, 'थोडक्यात केलेले

व्यक्तिवर्णन' (एक वाङ्मयप्रकार). एस.एस. भोसले स्वभावचित्राची व्याख्या करताना लिहितात, 'काही घटनांच्या साहाय्याने, मोजक्या शब्दसंगतीच्या आधाराने माणसाच्या स्वभावाचे दर्शन देणे ही स्वभावचित्राची स्थूल पद्धती आहे'.

**मराठी वाङ्मयातील व्यक्तिचित्रे : एक दृष्टिक्षेप । ९८मराठी वाङ्मयातील व्यक्तिचित्रे : एक दृष्टिक्षेप । ९८मराठी वाङ्मयातील व्यक्तिचित्रे : एक दृष्टिक्षेप । ९८मराठी वाङ्मयातील व्यक्तिचित्रे : एक दृष्टिक्षेप । ९८**व्यक्तिचित्राची संकल्पना स्पष्ट करताना प्रसिद्ध व्यक्तिचित्रकार पु.ल. देशपांडे लिहितात, 'व्यक्तिचित्राचे लेखन हे पोर्ट्रेट पेंटिगसारखे असते. तो पोर्ट्रेट ज्याचा आहे त्याची आणि त्याबरोबरच तो काढणाऱ्या चित्रकाराचीही त्यातून ओळख पटावी लागते आणि हे दर्शन नकळत घडावे लागते'. पु.ल. देशपांडे यांच्या अवतरणातून व्यक्तिचित्राची संकल्पना बरीचशी स्पष्ट होईल असे मला वाटते. थोडक्यात, व्यक्तीच्या एक-दोन घटना, प्रसंग आणि कार्य यामधून त्याच्या गुणधर्मांसह साक्षात व्यक्ती उभी करणे म्हणजे व्यक्तिचित्र होय.

व्यक्तिचित्र आणि इतर वाङ्मयप्रकार यांचा काही संबंध असतो असे वाटणे साहजिक असते. यादृष्टीने व्यक्तिचित्र आणि कथा, व्यक्तिचित्र आणि चरित्र, व्यक्तिचित्र आणि निबंध, व्यक्तिचित्र आणि कादंबरी, नाटक यांची तुलना करून व्यक्तिचित्रे या लेखनप्रकाराचे अनन्यसाधारणत्व वेगळेपणा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्तिचित्राचा ललित गद्यामध्येच समावेश केला जातो, म्हणून ललित गद्यांतर्गत येणारे लेखनप्रकार आणि व्यक्तिचित्र यांची चर्चा केली आहे. त्यामध्ये व्यक्तिचित्र आणि लघुनिबंध, प्रवासवर्णन, आठवणी, मुलाखत इत्यादींचा समावेश आहे.

व्यक्तिचित्राचा विकास पाहताना व्यक्तिचित्राची प्रेरणा, स्वरूप आणि वैशिष्ट्ये हा भाग येतो. व्यक्तिचित्रलेखन करीत असताना व्यक्तिचित्राच्या विविध प्रेरणा दिसतात. त्यामध्ये,भावलेल्या व्यक्तीबद्दल सांगण्याच्या उर्मीतून व्यक्तिचित्रे लिहिली जातात. एखाद्या श्रेष्ठ व्यक्तीचा लेखकाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध येतो, त्या अनुषंगाने व्यक्तिचित्र लिहिले जाते. प्रादेशिक जीवनदर्शन घडविण्यासाठी, त्या प्रदेशातील प्रातिनिधिक माणसाचे चित्रण करण्यासाठी व्यक्तिचित्रे लिहिली जातात. महान व्यक्तींच्या कर्तृत्वाला साकार करण्यासाठी अनेकदा व्यक्तिचित्रे लिहिली जातात. सर्वसामान्य व्यक्तीतील असामान्य गुण दाखविण्यासाठी व्यक्तिचित्रे लिहिली जातात. वाढदिवस, स्मृतिदिन, मुत्यू, एकसष्टी, पासष्टी अशा प्रासंगिक प्रेरणेतून व्यक्तिचित्रे लिहिली जातात.

व्यक्तिचित्राचे स्वरूप पाहता ते विविधांगी आहे. त्यामध्ये व्यक्तीचे रंगरूप, वय, बांधा, शारीरिक ठेवण, सवयी, लकबी, प्रकृती, पोषाख, बोलण्याची पद्धत, आवाज,

राहणीमान इ. बाह्यवर्णनातून व्यक्तिचित्रे लिहिली जातात. एखाद्या व्यक्तीच्या स्वभावाचे दर्शन घडवून व्यक्तिचित्रे लिहिली जातात. एखाद्या व्यक्तीच्या अंतरमनाच्या मनोविश्लेषणातून व्यक्तिचित्रे लिहिली जातात. व्यक्तीच्या जीवनात आलेल्या घटना-प्रसंगांच्या चित्रणातून व्यक्तिचित्रे लिहिली जातात. अशी व्यक्तिचित्रे अधिक परिणामकारक असतात. लेखकाला व्यक्तीच्या सहवासात काही कडू-गोड, चांगले-वाईट अनुभव आलेले असतात. त्या अनुभवातून जाणवलेली व्यक्ती समाजासमोर मांडावी या हेतूने लेखक व्यक्तिचित्र रेखाटतो. अनेक लेखकांनी आपल्या शब्दांतून अशी काही शब्दचित्रे रेखाटली आहेत की, त्या व्यक्ती प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्या डोळ्यासमोर उभी राहतात. म्हणजेच त्या व्यक्तिचित्रात चित्रमयता येते.

लेखकाला भेटलेल्या व्यक्ती, कलाकार, साहित्यिक, खेळाडू, नातेवाईक, मित्रमंडळी, उद्योगपती इत्यादींच्या सहवासातील अनेक आठवणींतून व्यक्तिचित्रे लिहिलेली दिसतात. प्रादेशिक जीवनाचे दर्शन घडविण्यासाठी, लेखक ज्या प्रादेशिक भूभागात राहतो त्या भागातील व्यक्तीचे व्यक्तिचित्र प्रादेशिक बोलीभाषेसह रेखाटली गेली आहेत.संवादात्मक निवेदन, व्यक्तिवैशिष्ट्ये इत्यादींमधून व्यक्तिचित्रे लिहिली जातात.

अशा प्रकारे व्यक्तिचित्राचे स्वरूप साकार होताना दिसते. व्यक्तिचित्राचा अभ्यास करताना काही वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यामध्ये व्यक्तीला अंतर्बाह्य स्वरूपात साकार करणे हा मुख्य हेतू असतो. त्यासाठी लेखक घटना, प्रसंग, आठवणी, माहिती, अनुभव, वर्णन यांचा आधार घेत असतो. लेखकाला जितकी आणि जशा स्वरूपात व्यक्ती भावते तितकेच तिचे चित्रण केले जाते. व्यक्तिच्या संपूर्ण जीवनाचा परामर्श घेणे हा हेतू नसतो. लेखक आणि वर्णनविषयक व्यक्ती यांच्या भावसंबंधाचे चित्रण व्यक्तिचित्रात येते. लेखक गौण असतो. ती व्यक्ती केंद्रस्थानी असते. लेखकाच्या प्रतिभाससामर्थ्याने व्यक्तिचित्र उभे राहत असल्याने त्यात जिवंतपणा येतो. 'चित्रमयता' हे व्यक्तिचित्राचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'जिव्हाळा' हा चांगल्या व्यक्तिचित्राचे महत्त्वाचे अंग आहे. ललित साहित्याची अनेक वैशिष्ट्ये व्यक्तिचित्रात आढळतात. व्यक्तिचित्राची भाषा ही लालित्यपूर्ण असते. मराठीमध्ये अनेक मान्यवर लेखकांनी व्यक्तिचित्र हा वाङ्मयप्रकार हाताळल्याने हा एक प्रवाह दाखवून देता येतो.

अन्य प्रचलित वाङ्मयप्रकार किंवा ललित गद्यांतर्गत लेखनप्रकारांपेक्षा व्यक्तिचित्र हा वेगळा लेखनप्रकार आहे. परंतु त्याला स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानले जात नाही. परंतु व्यक्तिचित्रामध्ये जशी व्यक्तिचित्राची 'व्यक्ती साक्षात उभी करणे', 'व्यक्तिचित्रासाठी व्यक्तिचित्रे', 'साध्यरूप लेखन' हे हेतू अन्य माध्यमांद्वारे किंवा अन्य वाङ्मयप्रकारांतून सिद्ध होऊ शकत नाहीत. व्यक्तिचित्राचा येणारा प्रत्येय, त्यापासून होणारा आनंद हा

अन्य वाङ्मयप्रकाराहून निश्चितच वेगळा, स्वतंत्र आहे. अन्य वाङ्मयप्रकारात साधनरूपाने वावरणारी व्यक्ती येथे साध्यरूपाने अवतरल्याने ते शक्य होते. लालित्य, लवचिकता या दोन्ही बाबतीत व्यक्तिचित्र स्वतंत्र वाङ्मयप्रकाराच्या कसोटीवर उतरू शकते. कोणत्याही वाङ्मयप्रकारातील दर्जेदार लेखनाचा विचार केला तर ते संख्येने कमीच असते. व्यक्तिचित्राचा जन्म व त्याची वाढ तर सुमारे गेल्या साठ-सत्तर वर्षातील. त्यातून हा लेखनप्रकार काहिसा दुर्लक्षित. हे ध्यानात घेतल्यास अन्य वाङ्मयप्रकाराच्या तुलनेने दर्जेदार व्यक्तिचित्रांची संख्या कमी नाही. उपलब्ध दर्जेदार लेखन हे या लेखनप्रकाराची गुणवत्ता निश्चितपणे वाढविणारे आहे.

व्यक्तिचित्राची व्याख्या, हेतू, बाह्यांग व अंतरंगाचे स्वरूप या साऱ्यांचा विचार करता प्रचलित साहित्यात जो वाङ्मयप्रकार स्वतंत्र वाङ्मयप्रकार ठरतो त्या सर्व तत्त्वांच्या कसोटीला व्यक्तिचित्र पूर्णपणे उतरते. मात्र याचा अर्थ व्यक्तिचित्र हा सर्वगुणसंपन्न वाङ्मयप्रकार आहे असा नाही. व्यक्तिचित्रामध्येही काही मर्यादा आहे. या वाङ्मयप्रकाराचा सखोल विचार झाला नसल्यामुळे आणि अन्य वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत व्यक्तिचित्रांची निर्मिती अलीकडची असल्यामुळे काही मर्यादा राहिलेल्या दिसतात. व्यक्तिचित्राचा हेतू वाचकांच्या मनात व्यक्ती साक्षात् साकार करण्याचा असल्यामुळे त्याचे यश परिणामकारकतेवरून मानले जाणे योग्य वाटते.

प्रस्तुत ग्रंथात व्यक्तिचित्रपूर्वकाळातील व्यक्तिचित्रसदृश लेखनापासून इ.स. १९९० पर्यंतच्या व्यक्तिचित्राच्या वाटचालीचा आढावा आलेला असला तरी या विकासामागील भूमिका मूळच्या तात्त्विक चर्चेला पुष्टी मिळावी अशी आहे. केवळ व्यक्तिचित्रांच्या संग्रहांचा सखोल विचार करावा अशी भूमिका येथे नाही. त्यामुळे या काळात प्रसिद्ध झालेल्या स्फुट व्यक्तिचित्रांचा विचार येथे केलेला नसून जी व्यक्तिचित्रे संग्रहरूपाने प्रसिद्ध झाली, त्यांचाच फक्त विचार केलेला आहे. त्या दृष्टीने या प्रबंधातील व्यक्तिचित्र वाङ्मयप्रकाराच्या इतिहासाची ही ठरवून घेतलेली मर्यादा आहे. कारण येथे मुख्य हेतू व्यक्तिचित्र या लेखनप्रकाराची, एक वाङ्मयप्रकार या दृष्टीने तात्त्विक चर्चा करावी व मराठीतील ठळक व्यक्तिचित्रांचा परामर्श हा आहे. त्या अनुरोधाने व्यक्तिचित्राचा उगम शोधून झालेल्या विकासाचे थोडक्यात अवलोकन केले आहे आणि या वाङ्मयप्रकाराच्या गुणात्मक विकासाच्या कसोटीवर 'व्यक्तिचित्र' हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानता येतो का? याचा विचार केलेला आहे. या चर्चेनुसार व्यक्तिचित्रासंबंधी संपूर्ण तात्त्विक चर्चा करून वाङ्मयप्रकार मानणे योग्य आहे या निष्कर्षापर्यंत यावे लागते. त्यादृष्टीने व्यक्तिचित्राची व्याख्या, वाङ्मयीन अंगोपांगे, वाङ्मयीन विकास, स्वरूप, वाङ्मयप्रकार म्हणून आढळणारी वैशिष्ट्ये या साऱ्यांचे साधार विवेचन करण्याचा प्रयत्न आतापर्यंत केला आहे.

व्यक्तिचित्राच्या संपूर्ण विकासामध्ये काही वेळा अनियमितपणा, दिशाहीनता आढळते. तसेच आजपर्यंत स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार म्हणून त्याचा विचार झाला नसल्यामुळे नेमकेपणा आढळत नाही. याच कारणाने वाङ्‌मयप्रकाराच्या शुद्धतेकडे दुर्लक्ष, इतर वाङ्‌मयप्रकारांच्या छटांची भेसळ किंवा एक वाङ्‌मयप्रकार म्हणून केलेले लेखन प्रत्यक्षात दुसऱ्याच वाङ्‌मय प्रकारात समाविष्ट होणारे असणे असे दोष दिसतात. परंतु याच वेळी दुसऱ्या बाजूला शुद्ध स्वरूप राखण्याचा काटेकोरपणा, पद्धतशीर लेखन, व्यक्तिचित्र वाङ्‌मयप्रकाराच्या आंगोपांगाचे पाळलेले भान, मांडणी, चित्रमयता, जिव्हाळा, लेखनशैली या दृष्टीने आणि परिणमकारकतेच्या दृष्टीने झालेले दर्जेदार लेखन यांचेही दर्शन घडते. व्यक्तिचित्रात्मक लेखनाने मराठी वाङ्‌मयात मोलाची भर घातली आहे. प्रसिद्ध व्यक्तींची व्यक्तिचित्रे लिहिताना त्यांच्या असामान्यातलं सामान्यत्व शोधण्याचा प्रयत्न असतो तर प्रातिनिधिक व्यक्तिचित्रामध्ये सामान्यातलं असामान्यत्व शोधलेलं असतं. दोन्ही प्रकारची व्यक्तिचित्रे अशी एकमेकांना पूरक ठरतात. कारण दोन्हीचा अंतिम उद्देश बाह्य द्वंद्वात्मकतेत अडकलेला माणूस, त्याच्या अंतर्यामीचा ओढ असलेला गाभा शोधणं हाच आहे. वाङ्‌मय प्रकाराच्या, घाटाच्या मर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तिचित्रांनी मराठी वाङ्‌मय समृद्ध केलं आहे एवढं निश्चित! काही विशिष्ट कालखंडानंतर येणाऱ्या लेखनातून या वाङ्‌मयप्रकाराला नवी दिशा देण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

व्यक्तिचित्राच्या विकासाच्या तुलनेत इतर वाङ्‌मयप्रकाराचा विकास पाहता; कोणताही वाङ्‌मयप्रकार रुजण्यास काही वर्षे जावी लागतात आणि दर्जेदार लेखक व लेखन याची संख्या कमी असते असे प्रामुख्याने दिसून येते. कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, निबंध या प्रमुख वाङ्‌मयप्रकाराच्या तुलनेत व्यक्तिचित्राचा जन्म खूपच नंतरचा असल्यामुळे त्याचा विकास मर्यादित आहे. परंतु ज्या ललित गद्यात त्याचा अंतर्भाव होतो त्यातल्या सर्व वाङ्‌मय प्रकारांपेक्षा व्यक्तिचित्राचा विकास सातत्याने व पद्धतशीरपणे होताना दिसतो. त्यामुळे कथा-चरित्र-निबंध या प्रमुख वाङ्‌मयप्रकारांचा उपप्रकार म्हटला जाणारा व ललित गद्याचा एक भाग म्हणून गणला जाणारा व्यक्तिचित्र हा एक वाङ्‌मयप्रकार म्हणजे नव्या, स्वतंत्र, विकसनशील वाङ्‌मयप्रकारातील एक आशास्थान आहे असे म्हटले पाहिजे.

व्यक्तिचित्र वाङ्‌मयप्रकाराच्या विकासाच्या तुलनेत त्याच्या समीक्षेचा विकास फारसा झालेला नाही. मग त्या मागील योग्य-अयोग्य कारणे कोणतीही आणि कितीही असोत. मराठी साहित्याच्या विकासाच्या दृष्टीने  ती फारशी चांगली बाब नाही. या विषयावरील चर्चा आणि त्या चर्चेवरील निष्कर्षाचे विहंगमावलोकन करता; व्यक्तिचित्रविषयक शब्दचर्चा, व्यवच्छेदकत्व, व्याख्या, वाङ्‌मयीन आंगोपांगे, उगम, प्रेरणा, स्वरूप,

वैशिष्ट्ये, विकास, गुणदोष, मर्यादा, समज-गैरसमज अशा विविध बाबतीत उहापोह केल्याने बहुतेक शंकांचे निराकरण होऊन, व्यक्तिचित्र हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहे हा विविध कसोट्यांवर सिद्ध होणारा निष्कर्ष पटण्यास हरकत नसावी. व्यक्तिचित्राचा उल्लेख व विचार ललित गद्यातर्गत एक लेखनप्रकार किंवा अन्य प्रमुख वाङ्मयप्रकाराचा उपप्रकार इतका मर्यादित स्वरूपात न होता एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून व्हावा.

व्यक्तिचित्राच्या जन्मापासून आजपावेतो गेल्या पन्नास-साठ वर्षांतील विकासावर नजर टाकली असता, त्याच्या विकासाचा व दर्जेदारपणाचा वेग पाहता, या वाङ्मयप्रकाराचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आहे असे म्हणावयास हरकत नसावी. फक्त प्रामाणिकपणे, वास्तव स्वरूपात, नेमकी, चित्रमय रीतीने, जिव्हाळ्याने आणि शैलीदार पद्धतीने व्यक्ती उभी करणारे प्रयोगशील दर्जेदार लेखक निर्माण व्हावेत. आजपर्यंत चालत आलेली, कुमार रघुवीर, दि.वा. दिवेकर, कुसुमावती देशपांडे, वि.द. घाटे, प्र.के. अत्रे, व्यंकटेश माडगूळकर, कृ.द. दीक्षित, पु.ल. देशपांडे, वि.वा. शिरवाडकर, ग.दि. माडगूळकर, आनंद यादव, मधुकर केचे, रवींद्र पिंगे, शिवाजी सावंत, विद्याधर पुंडलिक, य.दि. फडके, रामकृष्ण बाक्रे, भा.र. साबडे, गंगाधर गाडगीळ ही परंपरा पुढील काळात अविरत चालत राहील अशी आशा आहे.

'व्यक्तिचित्रे' हा आजपर्यत ललितगद्याचा एक उपप्रकार मानला जात होता. परंतु सविस्तर अभ्यास केल्यानंतर असे म्हणता येईल की व्यक्तिचित्रे, त्यांच्या प्रेरणा, स्वरूप, वैशिष्ट्ये आणि मराठीत झालेले विपुल लेखन यावरून हा एक स्वतंत्र, वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयप्रकार मानता येईल.

***

# संदर्भग्रंथ


आफळे, ज्योत्स्ना : 'स्वातंत्र्योत्तर काळातील ललितगद्य', प्रबंध, पुणे विद्यापीठ, २००५.

कऱ्हाड, सदा, : 'मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी', लोकवाङ्मय प्रकाशनगृह, मुंबई, आ. दुसरी, १९९०.

कुरुंदकर, नरहर : 'धार आणि काठ', देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७१

कुलकर्णी, गो. म.: 'ग्रंथकीर्तन', राजहंस प्रकाशन, पुणे, आ.आठवी, १९९३.

कुलकर्णी, गो. म.: 'सादपडसाद', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७४.

कुलकर्णी,गो. म.: 'वाटा आणि वळणे', नवसाहित्य प्रकाशन, बेळगांव, १९७५.

कुलकर्णी, भीमराव: 'काही साहित्यिक, काही साहित्यकृती', उत्कर्ष प्रकाशन,पुणे, १९८७.

कुलकर्णी, वा. ल.: 'वाङ्मयातील वादस्थळे', स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई आ. प्रथम, १९४६.

कुलकर्णी, वा. ल. : 'वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन', पॉप्युलर प्रकाशन,मुंबई आ. द्वितीय, १९६७.

कुलकर्णी, वा. ल.: 'वाङ्मयीन टीपा आणि टिपणी', पॉप्युलर प्रकाशन,मुंबई आ. तिसरी, १९७०.

कुलकर्णी, वा. ल.: 'साहित्य आणि समीक्षा', पॉप्युलर प्रकाशन,मुंबई, १९६३.

कुलकर्णी, वि. वा.: 'ललित साहित्यातील आकृतिबंधाची जडणघडण', प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८१.

कोत्तापल्ले, नागनाथ: 'साहित्याचा अन्वयार्थ', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,१९९६.

कोमरपंत, सोमनाथ: 'वाङ्मयीन संदर्भ आणि अवलोकन', मित्र प्रकाशन, गोवा, १९९२.

खंदारे, साहेबराव: 'मराठवाड्यातील ललित वाङ्मय : प्रेरणा व स्वरूप', प्रबंध डॉ. बा. आ. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,१९९७.

खोले, विलास (संपा): 'विसाव्या शतकातील मराठी समीक्षा', प्रतिमा प्रकाशन, पुणे, आ. प्रथम, २००४.

गणोरकर, प्रभा व इतर : 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश', (१९२० ते २००३), (संपा) जी.आर. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, आ. पाहिली, २००४.
गाडगीळ, गंगाधर: 'पाण्यावरची अक्षरे', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९८.
गाडगीळ, गंगाधर: 'आजकालचे साहित्यिक', उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९८०.
गोखले, म. वि.: 'मराठीतील 'अक्षर' ग्रंथकार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, आ.प्रथम, १९९७.
जाधव, मनोहर: 'साहित्य : दृष्टी आणि दृष्टिकोन', नवीन उद्योग, पुणे, १९९७.
जाधव, रा. ग.: 'वाङ्मयीन आकलन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७.
जाधव, रा. ग.: 'मराठी वाङ्मय स्वातंत्र्योत्तर संदर्भ', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प.आ. १९९८.
जोशी, प्र. न.: 'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे, प.आ.१९७९.
जोशी, लक्ष्मणशास्त्री: 'मराठी विश्वकोश' (खंड-५) महाराष्ट्र राज्य (संपा) साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७३.
जोशी, लक्ष्मणशास्त्री: 'मराठी विश्वकोश' (खंड-१८) परिभाषा संग्रह, महाराष्ट्र (संपा) राज्य, साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७३.
जोशी, व. स. : 'भाषा व साहित्य : संशोधन', महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८१.
जोशी, श्रीपाद : 'ग.दि. माडगूळकर यांचे वाङ्मय : एक चिकित्सक अभ्यास', अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, १९८१.
दाते, य. रा. (संपा): 'महाराष्ट्र शब्दकोश', (भाग-७),महाराष्ट्र कोश मंडळ लि. पुणे, १९६८.
देशपांडे, अ. ना.: 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' (भाग-२) व्हिनस प्रकाशन, पुणे, आ. तिसरी, १९७९.
देशपांडे, बालशंकर: 'ललित लेखनाचे तंत्र', साहित्य रसमाला प्रकाशन, मुंबई, प.आ. १९६३.
देशपांडे, वि. भा.: 'नाटकीय वेध', श्रीपाद प्रकाशन, पुणे.
देशपांडे, वि. भा.: 'नाट्यरंग', विमल प्रकाशन, पुणे, १९८६.
देशपांडे, वि. भा.: 'मराठी नाटक आणि रंगभूमी:पहिले शतक', व्हिनस प्रकाशन, पुणे, १९८८.
पवार, गो. मा.: हातकणंगलेकर म. द. (संपा), 'मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप (१९५०-१९७५)', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,१९८६.
पवार, मृणालिनी, : 'समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह', विजय लांजेवार ज्योती (संपा) प्रकाशन, नागपूर, १९८५.
पाठक, वा. भा.: 'टीका आणि टीकाकार', अनमोल प्रकाशन, पुणे, आ. दुसरी, १९७६.
पुंडे, द.दि. व गिंडे वा.पु. : 'वाङ्मयाचे अध्यापन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, (संपा) १९९४.
प्रदक्षिणा खंड - १: कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे, आ. आठवी, १९९३.

प्रदक्षिणा खंड - २: कॉन्टिनेटल प्रकाशन पुणे, आ. पहिली, १९९१.
फडके, ना. सी.: 'प्रतिभासाधन', देशमुख आणि कंपनी, पुणे, आ. पंधरावी, १९९३.
फडके, ना. सी.: 'कटाक्ष', परचुरे प्रकाशन, मुंबई, आ. प्रथम, १९७३.
फडके, ना. सी.: 'लघुकथा लेखन : मंत्र आणि तंत्र', व्हिनस प्रकाशन,पुणे, प.आ. १९५९.
फडके ,भालचंद्र दिनकर : 'मराठी कथेची वाटचाल', अप्रकाशित प्रबंध, डॉ. बा. आ. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९६७.
भागवत, पु. श्री. (संपा) : 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार', मौज प्रकाशनगृह, मुंबई, १९८७.
मंचरकर, र. बा. (संपा): 'दु. का. संत गौरवग्रंथ', सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १९८७.
यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आ. प्रथम, १९७९.
यादव, आनंद: 'मराठी लघुनिबंध : प्रेरणा, प्रवृत्ती आणि त्याचा विकास', (१९२० ते १९६८), अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ,१९७३.
यादव, आनंद : 'ललित गद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आ. प्रथम, १९९५.
वेलणकर, जयंत : 'प्रबंध कसा लिहावा', साहित्य प्रसार केंद्र नागपूर, प.आ.१९८८.
शेवडे, इंदुमती : 'मराठी कथा : उद्‌गम आणि विकास', सोमय्या पब्लिकेशन प्रा. लि., मुंबई, आ. प्रथम, १९७३.
संत, दु.का.: 'ललित कला आणि ललित वाङ्मय', फडके बुक सेलर्स, कोल्हापूर, आ. प्रथम, १९८२.
सावंत, वसंतः 'प्रवासवर्णन एक वाङ्मयप्रकार', म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आ. प्रथम, १९८७.
हातकणंगलेकर, म.द. : 'साहित्यविवेक', प्रतिमा प्रकाशन, पुणे, आ.प्रथम, १९९७
क्षीरसागर,श्री.के.: 'टीकाविवेक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६५.

* * *

## संदर्भग्रंथ - हिंदी


१. मिश्र, दुर्गाशंकर : 'साहित्यिक निबंध', प्रकाशन केंद्र, लखनौ, १९७४.

२. शर्मा, राजनाथ : 'साहित्यिक निबंध', विनोद पुस्तक मंदिर, आगरा, १९७४.

३. शर्मा, हरवंशलालः 'हिंदी रेखाचित्र', हिंदी समिती, सूचना विभाग (उ.प्र.) लखनौ, १९६९.

४. श्यामसुंदरदास (संपा) : 'हिंदी शब्दसागर'(भाग-८),काशी नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी, १९७१.

५. श्यामसुंदरदास (संपा) : 'हिंदी शब्दसागर'(भाग-९), काशी नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी, १९७२.

६. हरदयाल : 'आधुनिक हिंदी गद्य साहित्य', आदर्श साहित्य प्रकाशन.


* * *

# साधनग्रंथसूची


१. अत्रे, प्र.के. : आषाढस्य प्रथम दिवसे, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, प.आ., १९६९.

२. अत्रे, प्र.के. : दुर्वा आणि फुले, देशमुख आणि कंपनी, पुणे, आ. प्रथम, १९४९.

३. अत्रे, प्र.के. : पंचामृत, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, प.आ. १९५६.

४. अत्रे, प्र.के. : मराठी माणसे मराठी मने, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, आ.१५, २००३.

५. कर्णिक मधु मंगेश : कोकणी गं वस्ती ऽऽ, यशोदा प्रकाशन, रत्नागिरी, आ.दु.२००६.

६. कर्वे इरावती : 'युगान्त, देशमुख आणि कंपनी, पुणे आ. सोळावी, २००६.

७. काणेकर अनंत : 'निळ्या ठिणग्या, सरोज प्रकाशन, नागपूर आ.प्रथम, १९७२.

८. कुलकर्णी, वि. ह. : व्यक्तिचित्रे, देशमुख आणि कंपनी, पुणे, आ. प्रथम, १९३६.

९. केचे मधुकर बाबूराव : चेहरे मोहरे, किर्लोस्कर प्रेस प्रकाशन, पुणे,प. आ.,१९६९.

१०. कोल्हटकर, प्र.श्री. : ऋणानुबंधी, रा.दि. ह्वद्रे, पुर्ी१५७णे, आ. प्रथम, १९४२.

११. खरात, शंकरराव : बारा बलुतेदार, ठोकळ प्रकाशन, पुणे आ. प्रथम, १९५६.

१२. खांडेकर, वि.स. : गोकर्णीची फुले, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आ. पाचवी , २००४.

१३. खांडेकर, वि.स. : ते दिवस ती माणसे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आ.तिसरी, १९९९.

१४. खानोलकर, चि.त्र्यं. : दीपमाळ, श्री प्रकाशन पुणे, आ. प्रथम, १९७४.

१५. गाडगीळ, गंगाधर : आठवणीच्या ह्वगंधरेषा, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प.आ.१९९३.

१६. गाडगीळ, न. वि. : माझे समकालीन, व्हिनस बुक स्टॉल, पुणे, प.आ. १९५९.

१७. गाडगीळ, न. वि. : सत्तरीतील काका, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, प.आ., १९६५.

१८. घाटे, वि.द. : काही म्हातारे व एक म्हातारी, मौज प्रकाशनगृह, मुंबई, तृतीयावृत्ती, १९८८.

१९.घाटे, वि.द. : पांढरे केस हिरवी मने, मौज प्रकाशनगृह, मुंबई, आ.आठवी, २००३.

२०. जोशी, य. गो. : लक्षात राहिलेली माणसे, व्हिनस प्रकाशन, पुणे, प.आ.१९६१.

२१. तेंडुलकर, विजय : रातराणी, राजहंस प्रकाशन, पुणे, आ. तिसरी, २००५.

२२. तेंडुलकर विजय :हे सर्व कोठून येते?, राजहंस प्रकाशन, पुणे, आ. दुसरी,२००४.

२३. दांडेकर, मालतीबाई :विद्युतरेखा, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, प.आ. १९४४.

२४. दाते, ज्योती :वेध व्यक्तिमत्त्वाचा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे,प.आ.१९८९.

२५. दिवाकर, दि. वा. :अविस्मरणीय व्यक्तिचित्रे, व्हिनस प्रकाशन, पुणे, प.आ., १९६०.

२६.दिवेकर, दि. वा. :स्वभावचित्रे, आनंद मुद्रण मंदिर, पुणे, आ. प्रथम, १९३४.

२७. दीक्षित कृ.द. :षड्ज-गांधार, मौज प्रकाशनगृह, मुंबई, आ. दुसरी,१९९८.

२८. दीक्षित,कृ.द. :सहवास', मौज प्रकाशनगृह, मुंबई, प. आ. १९७५.
२९. दीक्षित म. श्री. : साहित्यिकांच्या सहवासात, व्हिनस प्रकाशन, पुणे, प.आ.१९६३.
३०. देशपांडे, कमलाबाई : हसरा निर्माल्य आणि चिमण्या, मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, प.आ.१९४४.
३१. देशपांडे, कुसुमावती :दीपमाळ, देशमुख आणि कंपनी, पुणे आ.प्रथम,१९५८.
३२. देशपांडे,कुसुमावती :मोळी, देशमुख आणि कंपनी, पुणे आ. प्रथम, १९४६.
३३. देशपांडे, पु. ल. : आपुलकी, मौज प्रकाशनगृह, मुंबई, आ. सातवी, २००७.
३४. देशपांडे, पु. ल. : गणगोत, देशमुख आणि कंपनी, पुणे आ.प्रथम, १९६६.
३५. देशपांडे, पु. ल. : 'गुण गाईन आवडी, मौज प्रकाशनगृह, मुंबई, आ.आठवी, २००१.
३६. देशपांडे, पु. ल. : मैत्र, मौज प्रकाशनगृह, मुंबई, आ. आठवी, २००८.
३७. देशपांडे, पु. ल. : व्यक्ति आणि वल्ली, मौज प्रकाशनगृह, मुंबई, आ. २९, २००८.
३८. देशपांडे, रेखा : रुपेरी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, आ.प्रथम, १९८३.
३९. देसाई, व.शां. :कलेचे कटाक्ष, जनार्दन सदाशिव लिमिटेड, पुणे, प.आ. १९४५.
४०. देसाई, व.शां. : रागरंग, व्हिनस बुक स्टॉल, पुणे, आ. प्रथम, १९६०.
४१. देसाई, व.शां. : कलावंताच्या सहवासात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प.आ. १९३९.
४२. पर्वते, त्र्यं. वि. : मी घेतलेल्या मुलाखती', (वाद संवादातील व्यक्तिदर्शने) आ. प्रथम, १९४०.
४३. पाटील, दि. द. :माझे शिल्पकार, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, आ. प्रथम,१९६२.
४४. पाणंदीकर, सुलभा : व्यक्ती तितक्या प्रकृती, अ. वि.गृह प्रकाशन, पुणे आ.प्रथम, १९५८.
४५. पाध्ये, प्रभाकर : प्रकाशातील व्यक्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प.आ. १९४१.
४६. पाध्ये, प्रभाकर : व्यक्तिवेध, केसरी प्रकाशन, पुणे, आ. प्रथम, १९७३.
४७. पिंगे, रवींद्र : देवाघरचा पाऊस, उत्कर्ष प्रकाशन, पुणे आ.चवथी, २००२.
४८. पिंगे, रवींद्र : तुषार आणि तारे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, आ.प्रथम,१९९१.
४९. पिंगे, रवींद्र : शतपावली, राजहंस प्रकाशन, पुणे, आ.प्रथम, १९७४.
५०. पेंडसे, शं.के. : महाभारतातील व्यक्तिदर्शने, मॉर्डन बुक डेपो, पुणे,द्वितीयावृत्ती , १९८३.
५१. पै, मारुती अनंत : वाङ्मय, लेखन व जीवित, मारुति अनंत पै. कारवार, प.आ. १९३७.
५२. पै, शिरीष : प्रियजन, प्रेस्टिज प्रकाशन, आ. प्रथम, १९६९.
५३. पोतदार, दत्तो वामन : ओळख, व्हिनस बुक स्टॉल, पुणे, आ. प्रथम, १९६१,
५४. पोहनेरकर न.शे. : विरलेल्या गारा, जोशी ब्रदर्स, गौलीगुडा, हैद्राबाद, प.आ.१९५२.
५६. फडके, य.दि. : दृष्टादृष्ट, श्रीविद्या प्रकाशन पुणे, आ. प्रथम, १९९२.
५७. फाटक, बा.वा. : मुंबईचे मानकरी, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, प.आ., १९४९.

५८. बाक्रे, रामकृष्ण : बुजुर्ग, साधना प्रकाशन, पुणे, आ. द्वितीय, १९९४.
५९. बागल, माधवराव : बहुजन समाजाचे शिल्पकार, ठोकळ प्रकाशन, पुणे, प.आ. १९६९.
६०. बागल, माधवराव : माझा परिवार भाग-१, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन, कोल्हापूर , प.आ. १९६६.
६१. बागल, माधवराव : माझा परिवार भाग-२, चंद्रकांत शेट्ये प्रकाशन, कोल्हापूर , प.आ. १९६७.
६२. बाबर, सरोजिनी : वडीलधारी माणसं‘, ह्यग्रामीण प्रकाशन संस्था, भिलवडी,प.आ. १९४८.
६३. बेनीपुरी, रामवृक्ष : मातीच्या मूर्ती, (अनु. कर्णीक द्वा.भ.) पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, आ. प्रथम, १९५७.
६४. भागवत, दुर्गा : रूपरंग, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आ. प्रथम, १९६७.
६५. भागवत, दुर्गा : व्यासपर्व,मौज प्रकाशनगृह, मुंबई, आ. अकरावी,२००६
६६. भावे, पु.भा. : मुद्रा, विश्वमोहिनी प्रकाशन पुणे, आ. प्रथम, १९६७.
६७. भेंडे, उमाकांत : पडछाया, ईशावास्य प्रकाशन पुणे, आ. प्रथम, १९६७.
६८. भोबे, गोपाळकृष्ण : चतुरंग रेखा, कैलास प्रकाशन, मुंबई आ. प्रथम, १९६४.
६९. माडखोलकर ग. त्र्यं. : अवशेष, देशमुख आणि कंपनी, पुणे,आ.प्रथम, १९४०.
७०. माडखोलकर, ग.त्र्यं. : माझे आवडते लेखक, व्हि. व्हि. पटवर्धन, मुंबई, आ.प्रथम, १९३९.
७१. माडखोलकर, ग. त्र्यं. : व्यक्तिरेखा, देशमुख आणि कंपनी, पुणे, आ. प्रथम,१९४३
७२. माडगूळकर, ग.दि. : मंतरलेले दिवस, विश्वमोहिनी प्रकाशन, पुणे, आ.पाचवी, २००३.
७३. माडगूळकर, व्यंकटेश : माणदेशी माणसं, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, आ.बारावी,२००८.
७४. माडगूळकर, व्यंकटेश : वाघाच्या मागावर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, आ. द्वितीय,२००८.
७५. माडगूळकर, व्यंकटेश : सीताराम एकनाथ, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, प.आ. १९५१.
७६. यादव, आनंद : मातीखालची माती, साधना प्रकाशन, पुणे, आ. प्रथम. १९६५.
७७. लिमये, अ.ह. : अनोखे मित्र, किर्लोस्कर प्रेस प्रकाशन, पुणे, आ. प्रथम, १९७१.
७८. लिमये, अ.ह. : सह्याद्रीची शिखरे‘, इनामदार बंधु प्रकाशन, पुणे, प.आ. १९६३.
७९. शिरवाडकर, वि.वा. : विरामचिन्हे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प.आ. १९७०.
८०. शेवडे, इंदुमती : असा प्रदेश अशी माणसं, ज्ञानदा प्रकाशन, पुणे, प.आ. १९७०.
८१. शेळके, उद्धव ज. : कडुनिंबाची सावली, पुष्पक प्रकाशन, पुणे, प.आ.१९७५.
८२. साबडे, भा.र. : मोठी माणसं, रसिक आंतरभारती प्रकाशन, पुणे, आ. तृतीय, २००८.
८३. सामंत र.ज.(कुमार रघुवीर): हृदय, कर्नाटक पब्लिकेशन्स, मुंबई, प.आ. १९३२.
८४. सावंत, शिवाजी : अशी मने असे नमुने, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, आ.५, २००६.
८५. क्षीरसागर, श्री.के. : सागरमंथन, व्हिनस प्रकाशन पुणे, आ. प्रथम, १९५९.

* * *